# स्वातंत्र्योत्तरकालीन सातारचा इतिहास

## (राजकीय, सामाजिक व आर्थिक) : १९४७ ते २०००

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ,पुणे

इतिहास विभाग

तात्विक व सामाजिक विद्याशाखांतर्गत इतिहास विषयातील
विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीसाठी सादर केलेला शोधप्रबंध

संशोधक

श्री.सावंत जयपाल चंद्रकांत

मार्गदर्शक

प्राचार्य डॉ.विजयराव नानासाहेब नलावडे

ऑक्टोबर २०१५

# प्रतिज्ञापत्र

मी **श्री.सावंत जयपाल चंद्रकांत** प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की, **‘स्वातंत्र्योत्तरकालीन सातारचा इतिहास’(राजकीय, सामाजिक व आर्थिक) : १९४७ ते २०००** हा संशोधन प्रबंध स्वतः लिहीलेला असून तो टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे यांच्या सामाजिक विद्याशाखांतर्गत इतिहास विषयातील विद्यावाचस्पती(पीएच.डी.) पदवीसाठी सादर केलेला आहे.

हा संशोधन प्रबंध यापूर्वी कोणत्याही पदवी अथवा पदविकेसाठी सादर केलेला नाही.

संशोधक

श्री.सावंत जयपाल चंद्रकांत

स्थळ : सातारा

दिनांक : /१०/२०१५

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, **श्री.सावंत जयपाल चंद्रकांत** यांनी **'स्वातंत्र्योत्तरकालीन सातारचा इतिहास'(राजकीय, सामाजिक व आर्थिक) : १९४७ ते २०००** या विषयावर संशोधन प्रबंध स्वतः लिहीलेला असून तो टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे यांच्या सामाजिक विद्याशाखांतर्गत इतिहास विषयातील विद्यावाचस्पती(पीएच.डी.) पदवीसाठी सादर केलेला आहे.

प्रस्तुत संशोधन प्रबंध त्यांनी माझ्या मार्गदर्शनाखाली स्वतः लिहीला असून तो इतर कोणत्याही पदवी अथवा पदविकेसाठी सादर केलेला नाही.

मार्गदर्शक

प्राचार्य डॉ.विजयराव नानासाहेब नलावडे
एम.ए., एम.फिल., पीएच.डी.
कला व वाणिज्य महाविद्यालय, पुसेगांव ता.कोरेगांव
जि.सातारा

स्थळ : सातारा

दिनांक : /१०/२०१५

# CERTIFICATE

This is to certify that the thesis entitled, 'स्वातंत्र्योत्तरकालीन सातारचा इतिहास'(राजकीय, सामाजिक व आर्थिक) : १९४७ ते २००० submitted by Shri. Sawant Jaypal Chandrakant to Tilak Maharashtra Vidyapeeth, Pune for the award of the degree of Doctor of Philosophy (Ph. D.) is a bonafide record of the research work carried out by him under my supervision. The contents of the thesis, in full or parts have notbeen submitted to any other Institute or University for theaward of any other degree or diploma.

Furthermore, in accordance with the UGC rules 2009: thatgovern the Ph.D. students, the students has completed the due process that includes Interview and pre-submission Viva.

Place: Pune Signature of Research Guide

Date - / 10 /2015 Signature of Head of the Department

Office seal

# ऋणनिर्देश

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे यांच्या सामाजिक विद्याशाखांतर्गत इतिहास विषयातील विद्यावाचस्पती(पीएच.डी.) पदवीसाठी **'स्वातंत्र्योत्तरकालीन सातारचा इतिहास'(राजकीय, सामाजिक व आर्थिक) : १९४७ ते २०००** या विषयावर संशोधन कार्य पुर्ण करून संशोधन प्रबंध सादर करत आहे. या संशोधनासाठी मला अनेक व्यक्तिंचे सहकार्य आणि योग्य मार्गदर्शन लाभले. या सर्वांच्या प्रती कृतज्ञतेची भावना व्यक्त करणे मी माझे आद्य कर्तव्य समजतो.

सर्वप्रथम माझे गुरूवर्य व प्रेरणा स्थान प्राचार्य डॉ.विजयराव नानासाहेब नलावडे यांनी मला संशोधनाची संधी दिली, प्रोत्साहीत केले, संशोधन योग्य दिशेने जात नसेल तर वेळप्रसंगी रागावलेही या त्यांच्या प्रेरणेमुळे व मार्गदर्शनामुळेच मी हे संशोधन पूर्ण करू शकलो. त्यांच्या ऋणातच कायमस्वरूपी राहण्यात मला आनंद आहे.

माझ्या संशोधन कार्यात टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणेचे आदरणीय कुलगुरू डॉ.दिपक टिळक व कुलसचिव डॉ.उमेश केसकर, तसेच सामाजिकशास्त्र विभागाचे अधिष्ठाता डॉ.श्रीकांत कार्लेकर यांनी बहुमोल सहकार्य केले त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. तसेच टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे येथील इतिहास विभागप्रमुख डॉ.नलिनी वाघमारे यांनीही वेळोवेळी संशोधन कार्यास योग्य दिशा दर्शवली व सूचना दिल्या त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. त्याचप्रमाणे टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या पीएच.डी. कार्यालय विभागप्रमुख प्रा.पौर्णिमा वाते व त्यांच्या कार्यालयीन वर्गानेही वेळोवेळी केलेल्या मदतीबद्दल मी त्यांचे आभार मानतो.

कोरेगांव एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष स्व. शंकररावजी जगताप (आण्णा) यांनी माझ्या संशोधन कार्याच्या आरंभी दिलेल्या प्रोत्साहानामुळे माझे संशोधन कार्य चालू झाले त्याबद्दल त्यांचे ऋण व्यक्त करणे हे माझे कर्तव्य आहे  त्याचप्रमाणे संस्थेच्या अध्यक्षा ॲड.सुनिताताई जगताप यांचे पाठबळ, संस्थेचे उपाध्यक्ष श्री.भिमराव पाटील(काका), सचिव श्री.गजाननराव बगाडे, खजिनदार श्री.डी.के.महाजन, सहसचिव, श्री.कोरडे जे.ए.तसेच श्री.विरकर सी.के. यांनी मला पीएच.डी करण्यासाठी प्रोत्साहन दिले त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. तसेच शंकरराव जगताप आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज

वाघोलीचे प्राचार्य डॉ.वाय.बी.गोंडे यांनी पीएच.डी. करण्यासाठीची माझी सतत मानसिक तयारी केली याबद्दल मी त्यांचे शब्दात ऋण व्यक्त करू शकत नाही.

माझ्या संशोधनासाठी सातारा जिल्हा परिषदेचा कार्यालयीन वर्ग, मुंबई पुराभिलेखागारातील संचालक अधिकारी, मराठी ग्रंथसंग्रहालय मुंबई, पुणे पेशवेदफ्तर व कोल्हापूर येथील पुराभिलेखागार संचालक व कर्मचारी, औंधच्या वस्तुसंग्रहालयाचे संचालक, छ.शिवाजी वस्तुसंग्रहालयाचे संचालक, सातारा नगरवाचनालय, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथालय, शिवाजी विद्यापीठाचे बॅ.खर्डेकर ग्रंथालय, सावित्रिबाई फुले विद्यापीठ पुण्याचे बॅ.जयकर ग्रंथालय, छ.शिवाजी कॉलेज साताराचे ग्रंथालय, शंकरराव जगताप आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज, वाघोलीचे ग्रंथालय या विविध ठिकाणी मला भरपूर माहिती प्राप्त झाली त्याबद्दल त्यांचे आभार. त्याचप्रमाणे विविध नगरपालिकांचे नगराध्यक्ष, नगरसेवक व कर्मचारी वर्ग, विविध शिक्षणसंस्थांचे पदाधिकारी, सातारा जिल्हा माहीती अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे अधिकारी, सातारा जिल्हा उपनिबंधक, सातारा जिल्हातील विविध बँकांचे पदाधिकारी, सातारा जिल्हा साहित्य परिषद, आंबेडकर आकादमीचे पदाधिकारी, महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मुलन समितीचे कार्यवाहक यांनी वेळोवेळी केलेल्या मदतीबद्दल मी त्यांचे आभार मानतो.

या संशोधन कार्यात मला प्रा.डॉ.विनायकराव जाधव, प्रा.डॉ.भास्कर कदम, प्रा.डॉ.व्ही.पी.पवार, प्रा.डॉ.एस.पी.शिंदे, प्रा.डॉ.डी.बी.मासाळ, प्रा.डॉ.अवनिश पाटील, प्रा.डॉ.अजित जाधव, प्रा.डॉ.सुमित यादव, प्रा.आर.के.देशमुख, प्रा. प्रविण रणबागले, प्रा. सातपुते आर.बी., प्रा. गौतम काटकर, प्रा.डॉ.दत्तात्रय कोरडे, प्रा. विकास काळे, प्रा.विकास यलमार, श्री.विजय मांडके, श्री.पार्थ पोळके, श्री.दिनकर झिंब्रे, श्री.मनोहर पवार आदींनी सहकार्य केले त्याबद्दल त्यांचे आभार.

माझ्या कच्च्या लेखनाचे वाचन करून त्यावर सुचना देणारे माझे मित्र प्रा.किरण कुंभार, प्रा.डॉ.एस.एस.बोडखे, या लेखनातील चूका निदर्शनात आणून देणाऱ्या प्रा.डॉ.उज्वला नलावडे, जेंव्हा भेट होईल तेंव्हा जिद्दीने काम करण्यास प्रोत्साहन देणारा मित्र श्री.उदय नलावडे यांचेही आभार.

शंकरराव जगताप आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज वाघोलीच्या इतिहास विभागप्रमुख प्रा.डॉ.एल.डी.आंदे, हिंदी विभागप्रमुख प्रा.पी.आर.रगडे, जिमखाना विभागप्रमुख प्रा.पी.एच. जाधव, प्रा.व्ही.व्ही.घाडगे तसेच कार्यालयीन विभागप्रमुख सौ.मंगल साबळे, माझे मित्र श्री.सुधीर काटकर याचप्रमाणे

या शोधनिबंधाचे अतिशय सुक्ष्मपणे वाचन करून देणारे व्याकरण दृष्टया दुरूस्त्या सुचवणारे प्रा.व्ही.एन.वैराट व प्रा.विद्या नावडकर सर्व प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी वर्ग यांचे मनःपुर्वक आभार.

या संशोधन कार्यात माझे कुटंब व नातेवाईक यांचे मोठे योगदान आहे. माझे वडील श्री.चंद्रकांत सावंत, आई सौ.अलका सावंत, काका श्री.सिध्दार्थ सावंत, काकी सौ.तिलोत्तमा सावंत, आत्या सौ.शारदा मुळीक, मामा श्री.लहु मुळीक, माझे भाऊ श्री.ऋषितोश व नितेश बहीण सौ.प्रणिता बैले, भाऊजी श्री.जितेंद्र बैले, सौ.मनिषा व श्री.संजय मुळीक, सौ.निलम व श्री.राजेंद्र मुळीक, सौ.रेखा व श्री.ओमप्रकाश मोरे तसेच सौ.सीमा व श्री.अविनाश मोतलिंग या सर्वांनी मला मदत केली त्याबद्दल सर्वांचा मी ऋणी आहे.

हे संशोधन पुर्ण व्हावे यासाठी सतत विचारणा करून मला प्रोत्साहीत करणारे माझे सासरे श्री.राजेंद्र सोनावणे व सौ.सविता सोनावणे तसेच श्री.मुकेश व श्री.योगेश सोनावणे यांचाही मी आभारी आहे.

तसेच कोणतेही कार्य पूर्ण होण्यासाठी व्यक्तिला सबळ पाठिंबा हवा असतो हा पाठिंबा देणारी माझी पत्नी सौ.प्रज्ञा जयपाल सावंत व चि.प्रजय यांचाही मी ऋणी आहे. याचप्रमाणे ज्यांनी मला शिक्षणाचे महत्व पटवून देऊन मला शिक्षणासाठी प्रोत्साहीत केले त्या माझ्या आजी–आजोबांचे ऋण मी व्यक्तच करू शकत नाही.

या प्रबंधाचे अचूक व सुबक टंकलेखन करून त्यास मोहक रूप दिल्याबद्दल समृध्दी टाईपरायटरच्या प्रो.प्रा.सौ.वैशाली कोरडे यांचेही मी आभार मानतो.

संशोधक

श्री.सावंत जयपाल चंद्रकांत

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरणाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ● | प्रतिज्ञापत्र | I |
| ● | प्रमाणपत्र | II |
| ● | प्रमाणपत्र | III |
| • | प्रबंध रुपरेषा<br><br>संशोधन समस्या, संशोधन विषयाची निवड, संशोधनाची उद्दिष्टे, संशोधनाची गृहीतके, संशोधनाची व्याप्ती व मर्यादा, संशोधन पध्दती, संशोधन विषयाचा आराखडा | VIII |
| १. | स्वातंत्र्यपूर्व कालखडांतील सातारा जिल्हा | १ |
| २. | स्वातंत्र्योत्तरकालीन साताऱ्यातील राजकीय घडामोडी | ३३ |
| ३. | स्वातंत्र्योत्तर सातारची सामाजिक स्थिती | १३५ |
| ४. | स्वातंत्र्योत्तर कालखंडातील सातारची आर्थिक स्थिती | २३३ |
| ५. | स्वातंत्र्योत्तर साताऱ्यातील सांस्कृतिक विकासाचे अवलोकन | २६२ |
| ६. | मुल्यमापन | ३५२ |
| ● | संदर्भ ग्रंथ सुची | ३७० |
| ● | परिशिष्टे | ३८० |
| ● | नकाशे | ३८४ |
| ● | छायाचित्रे | ३८६ |

# प्रबंध रूपरेषा

**प्रस्तावना :**

राजकारण, समाजकारण, शिक्षण, क्रीडा, सहकार, उद्योग, सांस्कृतिक कार्य अशा विविध क्षेत्रांमध्ये कर्तृत्वाची बहुविध शिखरे पादाक्रांत करणारा सातारा जिल्हा हा क्रांतिकारकांचा जिल्हा म्हणून प्रसिध्द आहे. विविध क्षेत्रांमध्ये सातारा जिल्ह्याने राज्यातच नव्हे तर देशात स्वतःचे असे एक आगळे–वेगळे स्थान निर्माण केलेले आहे.

सातारा जिल्ह्याला नैसर्गिक सौंदर्याचे आकर्षक वरदान लाभलेले आहे. त्यामुळे सातारा जिल्ह्यात अनेक नैसर्गिक पर्यटन स्थळे आहेत. याचप्रमाणे आपल्या पुर्वजांच्या पराक्रमाची साक्ष देणारी ऐतिहासिक स्थळे, संपूर्ण जिल्हाभर विखुरलेली आणि आध्यात्मिकतेचा संदेश देणारी धार्मिक स्थळे आपल्या वैभवशाली सांस्कृतिक परंपरेचा मागोवा दर्शवतात.

सातारा जिल्हा हा कणखर सह्याद्री पर्वताच्या कडेकपाऱ्यांवर वसलेला आहे. सह्याद्रीचा हा कणखरपणा येथील नेतृत्वातही उतरलेला दिसतो. त्यामुळेच प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक अशा इतिहासाच्या तिनही कालखंडात सातारा जिल्हा व या परिसरातील अनेक व्यक्तिमत्वांनी आपल्या कर्तृत्वाची छाप तत्त्कालीन ऐतिहासिक घडामोडींवर पाडलेली दिसून येते. हाच वारसा स्वातंत्र्योत्तर कालखंडातही चालवलेला दिसून येतो. स्वातंत्र्योत्तर कालखंडात सातारा जिल्ह्याने राजकीय व सामाजिक क्षेत्रात केलेल्या कार्याने महाराष्ट्र राज्यास दिशा देण्याचे कार्य केलेले आहे. या सातारा जिल्ह्याचे हे योगदान खरोखरच स्फूर्ती व प्रेरणा देणारे ठरत आहे.

## संशोधन समस्या :

संशोधन समस्या ही संशोधनाची पहिली पायरी असते. प्रो. टाउन शेड यांच्यामते, ''संशोधन समस्या म्हणजे निराकरणासाठी समोर आलेले प्रश्न होय.''[१] म्हणूनच मी 'स्वातंत्र्योत्तरकालीन साताराचा इतिहास' (राजकीय, सामाजिक व आर्थिक) १९४७ ते २००० ही समस्या संशोधनासाठी निवडली आहे.

## संशोधन विषयाची निवड :

आज विविध विद्यापीठे, संशोधन संस्था किंवा स्वतंत्र संशोधन करणारे संशोधक इतिहास संशोधनात प्रादेशिक किंवा स्थानिक इतिहास लेखनावर भर देताना दिसतात. डॉ.जयसिंगराव पवार

यांच्यामते, ''स्थानिक इतिहासलेखन केल्यास त्याच्या आधारे देशाचा व त्याच्या आधारे जगाचा तपशिलवार इतिहास मांडला जावू शकतो.''[२] स्वातंत्र्यपूर्व काळात सातारा जिल्ह्याची कामगिरी अभ्यासताना ती अत्यंत दैदीप्यमान असल्याचे जाणवते व या विषयावर विविध विचारवंतांनी मोठ्या प्रमाणावर लेखन केलेले आढळते परंतु स्वातंत्र्योत्तर कालखंडातील सातारा जिल्हा राजकीय, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक क्षेत्रातील परिस्थितीवर आजवर मोठ्या प्रमाणावर लिखाण झालेले नाही. सातारा जिल्ह्यातील राजकीय वर्तुळातील व्यक्तिंचा महाराष्ट्राच्या राजकारणावर असणारा प्रभाव अभ्यासणे, सामाजिक विचार प्रवाहांचा अभ्यास करणे, सांस्कृतिक परिस्थितीचा अभ्यास करणे आणि आर्थिक परिस्थितीचे विवेचन यातून साताराच्याच नव्हे तर महाराष्ट्रातील तत्कालीन परिस्थितीची माहिती होऊ शकेल. या सर्व बाबींमुळे मी हा विषय अभ्यासासाठी निवडलेला आहे.

## संशोधनाची उद्दिष्टे :

संशोधकाने संशोधन समस्या निर्धारण केल्यानंतर त्या विषयास अनुसरून संशोधकाने उद्दिष्टे निर्धारीत करणे गरजेचे असते. 'संशोधनाची उद्दिष्टेच अज्ञात किंवा अस्पष्ट असतील तर त्यामुळे संशोधन कार्य दिशाहीन व अर्थहीन बनते.'[३] यास्तव मी या संशोधन विषयाची काही उद्दिष्टे नियोजित केलेली आहेत. ती पुढीलप्रमाणे –

१. सातारा जिल्ह्याच्या इतिहासाचा मागोवा आणि त्याचे भौगोलिक स्थान याचे महत्त्व जाणून घेऊन स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील ऐतिहासिक घडामोडींची माहिती घेणे व त्याची मांडणी करणे.

२. स्वातंत्र्योत्तरकालीन साताऱ्यातील राजकीय घडामोडींचे चिकित्सक विश्लेषण करणे.

३. स्वातंत्र्योत्तरकालीन सातारा जिल्ह्यातील सामाजिक परिस्थितीचे विश्लेषण करणे.

४. स्वातंत्र्योत्तर सातारा जिल्ह्यातील आर्थिक परिस्थिती अभ्यासणे.

५. स्वातंत्र्योत्तर कालखंडातील सातारा जिल्ह्यातील सांस्कृतिक विकासाचे अवलोकन करणे.

६. स्वातंत्र्योत्तर कालखंडात सातारा जिल्ह्यामधील विकसित सहकारी चळवळ अभ्यासणे.

## संशोधन विषयाची गृहितके :

गुड आणि हॅट यांच्या मते, 'गृहितकृत्ये म्हणजे असे विधान आहे की, ज्याची समप्रमाणता ठरवण्यासाठी परिक्षण केले जाते आणि ते पुढील संशोधनासाठी उपयुक्त असते.'[४] म्हणूनच मी या

संशोधन विषयाची गृहितके पुढीलप्रमाणे मांडत आहे.

१. स्वातंत्र्यपूर्व कालखंडातच सातारा जिल्ह्यातील घटनांवरून या प्रदेशातील लोकांमध्ये लोकशाही पध्दती रूजलेली होती असे दिसते.

२. सातारा जिल्ह्यातील राजकिय व्यक्तिमत्वे महाराष्ट्राच्या राजकारणावर स्वातंत्र्योत्तर कालखंडातही आपला प्रभाव ठेवून होते.

३. साताऱ्यात निर्माण झालेल्या विविध विचार प्रवाहांनी तसेच इतर ठिकाणी निर्माण झालेल्या वैचारिक प्रवाहांनी सातारा जिल्ह्यामधील समाजजीवनावर स्वातंत्र्योत्तर कालखंडात आपला प्रभाव पाडलेला आहे.

५. स्वातंत्र्योत्तर कालखंडात सातारा जिल्ह्यात विकसित शेती व्यवस्था, उद्योगधंदे यामुळे आर्थिक स्थैर्य निर्माण झाले. सहकारी चळवळीने सामान्यांची आर्थिक स्थिती सुधारली.

## संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादा :

प्रस्तुत संशोधन हे इ. स. १९४७ ते इ. स. २००० या कालखंडातील सातारा जिल्ह्याचे आहे. या कालखंडात सातारा जिल्ह्यातील राजकीय, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक क्षेत्रात कोणकोणत्या महत्त्वपूर्ण बाबी झाल्या, त्याचे महाराष्ट्र राज्यावर काय परिणाम झाले तसेच राज्याच्या कोणत्या धोरणांचे या जिल्ह्यावर कोणत्या प्रकारचे परिणाम झाले याचा अभ्यास मी या ठिकाणी करणार आहे.

## संशोधन पध्दती :

कोणतेही संशोधन त्याच्या पध्दतीनुसार केल्यासच ठाम निष्कर्षापर्यंत येऊ शकते अन्यथा त्यातून मिळालेले निष्कर्श चुकीचेही असू शकतात. प्रस्तुत शोध प्रबंधासाठी मी विविध संशोधन पध्दतींचा वापर करणार आहे.

१. ऐतिहासिक संशोधन पध्दती.

२. सर्वेक्षण पध्दती.

३. विश्लेषणात्मक पध्दती.

४. सांख्यिकी पध्दती.

५. तुलनात्मक पध्दती.

६. मुलाखत पध्दती.

**संशोधन विषयाचा आराखडा** :

'स्वातंत्र्योत्तरकालीन सातारचा इतिहास : राजकीय, सामाजिक व आर्थिक' इ. स. १९४७ ते २००० या विषयाची मांडणी एकूण सहा प्रकरणात केलेली आहे. त्याच्या अभ्यासाचा प्रकरणनिहाय आराखडा पुढीलप्रमाणे व अधिक माहितीसाठी परिशिष्टांमध्ये संदर्भ सूची, नकाशे, छायाचित्रे दिलेली आहेत.

१. स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील सातारा जिल्हा.

२. स्वातंत्र्योत्तरकालीन साताऱ्यातील राजकीय घडामोडी.

३. स्वातंत्र्योत्तर सातारची सामाजिक स्थिती.

४. स्वातंत्र्योत्तर कालखंडातील सातारची आर्थिक स्थिती.

५. स्वातंत्र्योत्तर साताऱ्यातील सांस्कृतिक विकासाचे अवलोकन.

६. मूल्यमापन

अशाप्रकारे संशोधनाची रूपरेषा आहे. एकूण स्वातंत्र्यपूर्व कालखंडापासून इ. स. २००० पर्यंतचा सातारा जिल्ह्याचा समग्र इतिहास मांडण्याचा प्रयत्न मी या शोध-प्रबंधात केलेला आहे.

## संदर्भ


१. काचोळे, दा. धों. 'सामाजिक संशोधन पध्दती', कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, पहिली आवृत्ती १९९३, पृ. ४८

२. प्रकट मुलाखत, प्रा.डॉ. गावडे सदाशिव, फलटण जि.सातारा ३१.१२.२०११, वेळ सकाळी ११.३० वा.

३. भांडारकर पु. ल., 'सामाजिक संशोधन पध्दती', महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर, तिसरी आवृत्ती, १९८७, पृ. ७४

४. आगलावे प्रदीप, 'संशोधन पध्दती शास्त्र व तंत्र', विद्या प्रकाशन, नागपूर, पहिली आवृत्ती, २०००, पृ. १२१.

## प्रकरण पहिले

# स्वातंत्र्यपूर्व कालखडांतील सातारा जिल्हा

१.१ प्रस्तावना

१.२ प्राकृतिक भूस्वरूप

१.३ ऐतिहासिक मागोवा

अ) प्राचीन व मध्ययुगीन कालखंड

ब) आधुनिक कालखंड

क) सामाजिक व शैक्षणिक चळवळी

१.४ समारोप

# प्रकरण पहिले

# स्वातंत्र्यपूर्व कालखडांतील सातारा जिल्हा

## १.१ प्रस्तावना :

भारतीय स्वातंत्र्यलढ्यात पंजाब, बंगाल आणि महाराष्ट्र ही तीन राज्ये नेहमीच आघाडीवर राहिलेली होती. महाराष्ट्रामध्ये पश्चिम महाराष्ट्रातील पुणे, सातारा व सांगली हे जिल्हे स्वातंत्र्य चळवळीत विशेष सक्रीय असल्याचे दिसते. इ. स. १८८५ साली राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना झाली. तेव्हापासून राष्ट्रवादी चळवळीत महाराष्ट्र आघाडीवर आहे. परंतु लोकमान्य टिळकांच्या कालखंडात तर भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे केंद्रस्थान 'पुणे' हेच बनलेले होते. मुंबई, पुण्यामधील या राजकीय चळवळींचा प्रभाव नजिकच्या सातारा जिल्ह्यावरही पडलेला दिसतो. भारतीय स्वातंत्र्य चळवळीत सातारा जिल्ह्याने दिलेले योगदान फारच महत्त्वपूर्ण आहे. सातारा जिल्ह्याचा ऐतिहासिक मागोवा पाहण्यासाठी आपणास सातारा जिल्ह्याचा ऐतिहासिक भूगोल पाहणे गरजेचे आहे. कारण कोणत्याही इतिहासाच्या पुस्तकाचे पहिले प्रकरण भूगोलाचे असते. कोणतीही ऐतिहासिक घटना घडताना त्या घटनेवर त्या प्रदेशातील भौगोलिक परिस्थितीचाही परिणाम झालेला असतो. म्हणूनच सातारा जिल्ह्याचा ऐतिहासिक मागोवा पाहण्याआधी आपणास सातारा जिल्ह्याची भौगोलिक परिस्थिती पाहणे आवश्यक आहे.

## १.२ प्राकृतिक भूस्वरूप :

सातारा जिल्हा हा महाराष्ट्राच्या दक्षिण भागात मध्यभागी आहे. भौगोलिक दृष्टिकोनातून त्याचा विस्तार दक्षिण पठाराच्या पश्चिम सीमावर्ती भागात १७.५० ते १८.११ उत्तर अक्षांक्ष आणि ७३.३३ ते ७४.५४ पूर्व रेखांश आहे. सातारा जिल्ह्याचा पूर्व–पश्चिम विस्तार सुमारे १४५ किलोमीटर असून दक्षिणोत्तर विस्तार सुमारे १२० किलोमीटर आहे. सातारा जिल्ह्याच्या उत्तरेस पुणे जिल्हा, पूर्वेस सोलापूर जिल्हा, दक्षिणेस आणि आग्नेय दिशेला सांगली जिल्हा व पश्चिमसे रत्नागिरी जिल्हा आहे. सातारा जिल्ह्याच्या वायव्य दिशेला फक्त २४ किलोमीटर अंतरापर्यंत रायगड जिल्ह्याची सीमा स्पर्श करते.

सातारा जिल्ह्याची उत्तरेकडील सीमा निरा नदीने निर्धारित केलेली असून पश्चिम आणि नैऋत्येकडील सीमा सह्याद्री पर्वतरांगामुळे सुनिश्चित झालेल्या आहेत. सह्याद्री पर्वताचीच एक शाखा असणाऱ्या महादेव डोंगर रांगामधील शिखर–शिंगणापूर रांगेमुळे पूर्वेकडील सातारा–सोलापूर जिल्ह्याची सीमा काही प्रमाणात तयार झालेली आहे. हा सातारा जिल्ह्याचा सध्याचा विस्तार आहे. परंतु इ. स. १९६० पूर्वी हा जिल्हा खूपच विस्तारीत होता. ह्या जिल्ह्यात सध्याचा सांगली जिल्हा देखील अंतर्भूत होता. सध्याचा सातारा जिल्हा हा इ. स. १९६० मध्ये अस्तित्वात आलेला आहे.

## सातारा जिल्ह्याची प्राकृतिक भूरचना :–

सातारा जिल्ह्याच्या प्राकृतिक भूरचनेत टेकड्या व दऱ्या अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत. दक्षिण पठारावर निर्माण झालेल्या या अवशेष टेकड्या आणि त्यांना विभाजित करणाऱ्या दऱ्या ही सातारा जिल्ह्याच्या भूस्वरूपाची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. सातारा जिल्ह्यात प्रमुख दोन पर्वत रांगा आहेत – १) सह्याद्री पर्वत रांगा, २) शंभू महादेव पर्वत रांग. सह्याद्री पर्वत रांगेने १८ किलोमीटर लांब पश्चिम दिशेस सातारा जिल्ह्याची सीमा निर्धारित केलेली आहे. या पर्वतरांगेमध्येच डोंगरी किल्ले आहेत. उदा. प्रतापगड, मकरंदगड, जंगली जयगड इ. डोंगरी किल्ल्यांप्रमाणेच या रांगांमध्ये विपल्याण व पल्याण आहेत. ज्या ठिकाणी हे सुगम आहेत त्या ठिकाणी प्रमुख खिंडी, घाट मार्ग आहेत. उदा. महाबळेश्वरच्या पश्चिमेचा आंबेनळी घाट, याच्या नैऋत्येचा पारघाट व दक्षिणेचा हातलोट घाट. हातलोट घाटाच्या दक्षिणेस आंबोली व त्याच्याही दक्षिणेस कुंभार्ली घाट आहे. या घाट मार्गांपैकी आंबेनळी व कुंभार्ली या घाटांमधून कोकणात उतरण्याचे महत्त्वपूर्ण मार्ग गेलेले आहेत.

सातारा जिल्ह्यातील दुसरी महत्त्वपूर्ण पर्वतरांग म्हणजे महादेव श्रेणी किंवा शंभू महादेव पर्वतरांग होय. सातारा जिल्ह्याच्या उत्तरभागी महाबळेश्वरपासून ही डोंगररांग बाहेर पडते आणि प्रथमत: पूर्वेकडे व नंतर आग्नेयेस पसरत जावून ती सातारा जिल्ह्याचा पूर्व भाग व्यापते. ही पर्वतरांग सलग नसून ठिकठिकाणी खंडीत झालेली आहे. यामुळेच विविध भागांमध्ये ती विविध नावांनी परिचित आहे. पश्चिमसे तिला गांधारदेव डोंगर, मध्यभागी म्हस्कोबाचे डोंगर तर पूर्वेकडे सिताबाईचे डोंगर म्हणून ओळखले जाते.

या श्रेणीच्या दक्षिणेकडील गिरीपादांवर घेरा, केळंजा, वारूगड, ताथवडा हे तीन प्रमुख किल्ले आहेत. याचप्रमाणे या श्रेणीतील लहान लहान पल्याणांमधून अनेक महत्त्वाचे घाट मार्ग जातात. उदा. राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ हा खंबाटकी घाटातून, याच्या आग्नेय दिशेस तडवळे जवळून वाई–आदर्की आणि जूना सातारा पुणे मार्ग गेलेला आहे.

महादेव श्रेणीतच कृष्णा, वसना, वांगना, येरळा, माणगंगा इ. प्रमुख नद्यांची खोरी आहेत. या नद्यांचे जल विभाजक म्हणून या श्रेणीची गिरीपाद कार्य करतात.

## सातारा जिल्ह्यातील प्रमुख नद्या :–

सातारा जिल्ह्यात प्रमुख ५ नद्या आहेत – १) निरा,२) कृष्णा, ३) कोयना, ४) माणगंगा, ५) येरळा. यापैकी सातारा जिल्ह्याचा उत्तर विभाग हा निरा नदीने व्यापलेला असून आग्नेय दिशेस माणगंगा आणि दक्षिण दिशेला कृष्णा, कोयना व येरळा नद्यांची खोरी आहेत. या नद्यांच्या शिवाय वेण्णा, उरमोडी, तारळी, वसना, कुडाळी या प्रमुख उपनद्या देखील सातारा जिल्ह्यात आहेत.

सातारा जिल्ह्याचे पूर्णत: प्राकृतिक भूस्वरूप पाहता त्यात मोठ्या प्रमाणावर भिन्नता आढळते. या कारणामुळे सातारा जिल्ह्यातील भूरूपे, हवामान, जंगले आणि मानवी व्यवहार इत्यादी बाबी प्रभावित झालेल्या आहते. भौगोलिक लक्षणांनुसार सातारा जिल्ह्याचे तीन विभाग पडतात – १) पूर्व विभाग, २) मध्य विभाग, ३) पश्चिम विभाग.

सातारा जिल्ह्याच्या पूर्व विभागमध्ये पूर्वेकडील माळरान प्रदेशाचा समावेश होतो. यात खंडाळा, कोरेगांव, फलटण, माण आणि खटाव या पाच तालुक्यांचा समावेश होतो. मध्य विभागात कृष्णा खोऱ्याचा खोलगट अथवा सखल प्रदेश येतो. यामध्ये सातारा व कराड हे तालुके येतात. तर पश्चिम विभागामध्ये वाई, महाबळेश्वर आणि पाटण हे तालुके येतात.

सातारा जिल्ह्याच्या एका भागात सह्याद्री पर्वतांची रांग, तिची गिरीशिखरे आणि तिच्याशी निगडीत उंच पठारी प्रदेश तर दुसऱ्या भागात नद्यांचे सखल खोरे दिसते. पश्चिमेस महाबळेश्वरला वार्षिक सरासरी ६००० मि. मी. पेक्षा अधिक पाऊस पडतो तर पूर्वेकडे माण, खटाव व फलटण तालुक्यांच्या काही भागात दुष्काळ पडतो.

अशा प्रकारे सातारा जिल्ह्याच्या भौगोलिक आकृतीबंध असून या परिस्थितीचा सातारा जिल्ह्यातील जनतेवर परिणामही झालेला जाणवतो.

## १.३ ऐतिहासिक मागोवा :

इतिहासाच्या अध्ययनाने मानवी बुध्दी प्रगल्भ होते. भूतकाळात मानवाच्या हातून झालेली योग्य अयोग्य कार्ये तपासून पुढील कालखंडात चुकांपासून बोध घेत जीवन जगण्यासाठी मानवाला इतिहासाच्या अध्ययनाचा उपयोग होतो. मानवी बुध्दीस प्रगल्भ, क्रियाशील आणि उदयोन्मखु व प्रेरक बनवण्याचे सामर्थ्य इतिहासात असल्याचे आता सर्वमान्य झालेले आहे. सातारा जिल्ह्यासही एक वैभवशाली इतिहासाचा वारसा लाभलेला आहे. प्राचीन कालखंडापासून आधुनिक कालखंडापर्यंत या जिल्ह्यामध्ये अनेक ऐतिहासिक घटना घडलेल्या आहेत की ज्या घटनांनी जिल्ह्याच्याच नव्हे तर संपूर्ण देशाच्या इतिहासावर आपला प्रभाव पाडलेला आहे. इतिहासाचे बाह्यांग राजकीय घडामोडी आणि सनावळ्यांनी तयार होत असले तरीही विभिन्न भागाचा आत्मिक इतिहास सांस्कृतिक विकास व ऱ्हासाशी संबंधीत असतो. प्रस्तुत प्रकरणात संस्कृतीच्या अन्वेषणाचा तसेच सांस्कृतिक एकात्म वैशिष्ट्यांचा शोध घेण्याचा प्रयत्न मी केलेला आहे.

### अ) प्राचीन व मध्ययुगीन कालखंड :-

सातारा जिल्ह्यात झालेल्या पुरातत्वीय संशोधनातून पुरा–पुराश्मयुगीन मानवाचे अस्तित्व दर्शवणारे पुरावे उपलब्ध झालेले आहेत. साताऱ्याच्या प्रागैतिहासिक कालखंडाविषयी माहिती आपणास सातारा जिल्ह्यातील आसगांव, पाचवड, मर्ढे, माहुली, लिंब आणि सोनगांव इत्यादी ठिकाणी या काळातील हत्यारे उपलब्ध झाल्यानरे मिळते.[१] सातवाहनांच्या काळात संपूर्ण सातारा जिल्हा त्या वंशाच्या राजांच्या अंमलाखाली होता.[२] कराड येथील इसविसनाच्या पहिल्या शतकातील बौध्द लेणी, तसेच शिरवळ, वाई, भोसे, मलवडी, कुंडल इत्यादी ठिकाणच्या गुंफा सातवाहनांच्या काळातच खोदल्या गेल्या होत्या.[३] मानपूर या माण नदीच्या काठावरील राष्ट्रकूट राजांनी महाराष्ट्रातील पुणे, सोलापूर, सातारा, सांगली, कोल्हापूर आणि बेळगांव जिल्ह्यांच्या प्रदेशावर आपली सत्ता प्रस्थापित केलेली होती.[४] यानंतर काही काळ वाकाटक व वाकाटकांच्या नंतर महाराष्ट्रावर दीर्घकाळ बदामीच्या चालुक्यांनी राज्य केले.

महाराष्ट्राच्या राजकीय स्थित्यंतरात यादव घराण्या खालोखाल शिलाहार घराण्यास महत्त्व आहे. याच घराण्यातील राजा भोज दुसरा याने सातारचा किल्ला (अजिंक्यतारा) बांधला होता.[५] शिलाहारानंतर यादव घराण्याने महाराष्ट्रावर आपले वर्चस्व निर्माण केले. परंतु मुस्लिम

आक्रमकांनी हे हिंदू सामाज्य्र नष्ट करून आपली सत्ता येथे प्रस्थापित केली.

छ. शिवाजी महाराजांनी पुणे, सातारा, रायगड या प्रदेशावर आपले वर्चस्व स्थापन करून स्वराज्य उभारणी केली व याच प्रदेशात हे स्वराज्य विकसित केले. छ. संभाजी राजांची राजकीय कारकीर्दच कमी कालावधीची असल्याने सातारा जिल्ह्याचा फारसा संबंध आला नाही. छ. राजारामाने इ. स. १६९८ साली सातारा आपली राजधानी केल्याने सातारा मराठी राजकारणात प्रथमत: प्रकाशात आला. पुढे महाराणी ताराबाई व छ. शाहूच्या कालखंडात साताऱ्यातून मराठी सामाज्याची सूत्रे हाताळली जात होती.

इ. स. १८१८ रोजी पेशवाईचा इंग्रजांनी अस्त केला. दिनांक २५ सप्टेंबर १८१९ च्या तहानुसार ब्रिटीशांचे सार्वभौमत्व मान्य करून छत्रपती प्रतापसिंहांना मराठा गादी प्राप्त झाली.[६] मात्र छ. प्रतापसिंहांना सर्वाधिकार न देता इंग्रजांनी साताराला इंग्रज रेसिडेन्ट नियुक्त केला आणि मराठी राज्य इंग्रजांच्या सल्ल्यानुसार आता चालू लागले. माझ्या संशोधनाचा विषय 'स्वातंत्र्योत्तरकालीन सातारचा इतिहास' असल्याने प्राचीन व मध्ययुगीन काळाचा धावता आढावा मी घेतलेला आहे.

**ब) आधुनिक कालखंड :–**

ब्रिटिशांनी आपल्या योजनेनुसार भारतातील विविध राज्ये हळूहळू आपल्या वर्चस्वाखाली आणली. मराठ्यांचे राज्यच त्यांना सडतोड उत्तर देऊ शकत होते. परंतु इ. स. १८१८ मध्ये पेशवाई संपवून हे राज्य सुध्दा संपुष्टात आणले. मात्र छ.शिवरायांचे स्वराज्य नष्ट केल्यास स्थानिक जनता विरोधात जाईल यास्तव सातारला छ.प्रतापसिंह यांना आपल्या वर्चस्वात इंग्रजांनी गादीवर बसवले आणि साताऱ्याचा आधुनिक काळ सुरू झाला.

जेम्स ग्रँट डफ हा इंग्रजांचा साताऱ्यातील पहिला रेसिडेंट होता. याने छ. प्रतापसिंह राजांना राज्यकारभार विषयक मार्गदर्शन केले.[७] ग्रँट डफ व छ. प्रतापसिंह यांच्या परस्पर सहकार्याने सातारा संस्थान खूपच चांगले झाले असा अभिप्राय एका सुप्रसिध्द लेखकाने दिला आहे.[८]

छ.प्रतापसिंह महाराजांनी यवतेश्वर देवालयामागे एक मोठा सुंदर तलाव बांधुन त्यातील पाणी खापरी नळाने शहरास पुरवले. सातारा शहरात सरळ व आखिव हमरस्ते तयार केले. इ. स. १८२६ साली राजवाडा बांधला. दुकाने बांधण्यासाठी होतकरू लोकांना तगाई कर्जे दिली.

मुला–मुलींनी संस्कृत, मराठी व इंग्रजी शिक्षणास्तव एक मोठी पाठशाळा उघडली. एक छापखाना काढून तेथे अनेक उपयुक्त ग्रंथ छापून घेतले. मराठा मुला–मुलींच्या लष्करी शिक्षण घ्यावे म्हणून एका इंग्रज अधिकाऱ्याची नियुक्ती केली.[९]

छ. प्रतापसिंह राजांचे हे लोककल्याणकारी कार्य पाहून अनेक ब्रिटीश अधिकाऱ्यांनी त्यांची स्तुती सुमने गायलेली आहेत. छ. प्रतापसिंहांच्या काळात झालेली आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे एलफिस्टन नंतर गव्हर्नर पदावर आलेल्या सर जॉन माल्कम याच्या नावाने छ.प्रतापसिंह महाराजांनी माल्कम पेठ बसवली व अल्यावधीतच महाबळेश्वरचा विकास होण्यास मदत झाली.

एकूण छ. प्रतापसिंह महाराजांच्या काळात सातारा आधुनिकतेकडे वाटचाल करण्यासाठी पाऊल उचलू लागला. परंतु पेशवाई नष्ट करण्यात इंग्रजांना मदत करणारे बाळाजीपंत नातू व त्याच्या सहकाऱ्यांनी छ. प्रतापसिंहांपुढे अनेक अडचणी निर्माण केल्या. प्रारंभीच्या कालखंडात त्या दूर करण्यात महाराजांना यश आले. परंतु पुढे ब्रिटीश रेसिडेंट, गव्हर्नर यांच्या पाठींब्यामुळे नातूची कारस्थान वाढत गेली. या कारस्थानात इंग्रजांनी छ. प्रतापसिंहाचे बंधू आप्पासाहेब यांना घेतले. इंग्रजांनी सन १८३९ मध्ये छ. प्रतापसिंहास पदच्युत करून त्यांच्या जागी ४ सप्टेंबर १८३९ रोजी नवीन करार करून आप्पासाहेबांना बसवले.[१०] छ. प्रतापसिंहास रात्रीच्या वेळी रात्रीच्याच पोशाखात बिछान्यावर असताना पकडले व त्यांना साताऱ्याजवळील लिंब या गावी गोठ्यात पहाऱ्यात ठेवण्यात आले. दोन महिन्यानंतर त्यांची रवानगी काशीला करण्यात आली. व इ. स. १८४० साली ते काशीला पोहोचले आणि १४ ऑक्टोबर १८४७ रोजी काशी येथेच त्यांचे निधन झाले.[११]

या दरम्यानच्या काळात छ. प्रतापसिंहांच्या सुचनेनुसार रंगो बापूजी गुप्ते यांनी लंडनमध्ये जावून छ. प्रतापसिंहांच्यावर झालेल्या अन्याया संदर्भात वाचा फोडण्याचे काम केले. तथापि त्यांच्या या प्रयत्नांना यश आले नाही. छ. प्रतापसिंहांना पदच्युत केल्याने कराडच्या कोळे गावातील श्री. धारराव पवार यांनी इ. स. १८४१ साली बंड पुकारले व हे बंड पुढे चार वर्षे चालू होते.[१२] या बंडाळीशी श्री. रामचंद्र सातवे यांचेही नाव जोडतात. त्यांनी ब्रिटीश लष्करात बंडाळी माजवण्याचा इ. स. १८४० मध्ये प्रयत्न केला होता. इस्लामपूरच्या श्री. नरसिंग पेटकर यांनी छ.प्रतापसिंहाची लिंब येथे भेट घेतल्यानंतर पेटकरांचे बंड झाले. बदामीचा

किल्ला जिंकून तेथे साताऱ्याचे निशाण पेटकऱ्यांनी फडकावले.[१३] ब्रिटीशांनी ही बंडे मोडून काढली. मात्र जनतेतील असंतोष अजूनही धूमसत होताच. याचा परिणाम इ. स. १८५७ साली दिसून आला.

गव्हर्नर जनरल डलहौसी याच्या संस्थाने खालसा करण्याच्या धोरणानुसार सातारचे संस्थान इ. स. १८४८ साली खालसा झाले. याच दरम्यानच्या काळात भारतातील अनेक संस्थाने इंग्रजांनी खालसा केली. अशा अवस्थेत भूमिगत रंगो बापूजी गुप्ते यांनी तात्या टोपेंशी बाजीरावाचे दत्तक पुत्र नानासाहेब व रंगो बापूजींची भेट घडवली व उत्तर हिंदुस्थानातील संस्थानिक आणि दक्षिणी संस्थानिक व इतर लोकांनी पेशवाईच्या पुर्नघटनेसाठी एकदिलाने प्रयत्न करावा असे ठरले.[१४] अशा वातावरणात रंगो बापूजी गुप्ते यांनी उमाजी नाईकाच्या बंडा वेळी एकत्र आलेल्या मावळे, रामोशी, कातकारी, कोळी व भंडारी लढवय्ये यांना संघटीत केले. सातारा, भोर, रत्नागिरी, मावळ प्रांत, विजापूर, पंढरपूर, कोल्हापूर व बेळगांव परिसरात गुप्त संघटना उभारली. आपला पुत्र सिताराम याला या संघटनेवर देखरेख करण्यासाठी ठेवले.[१५]

याच काळात इंग्रज आपली सत्ता या परिसरात स्थिर करण्याचा प्रयत्न करू लागले व इंग्रजांनी इ. स. १८५० मध्ये नगरपालिका अधिनियम (क्रमांक सव्वीस) अंमलात आणला. त्यानुसार २ ऑगस्ट १८५३ रोजी सातारा व इ. स. १८५३ सालीच रहिमतपूर, इ. स. १८५५ मध्ये कराड व वाई, इ. स. १८५७ साली म्हसवड या नगरपालिका स्थापन करण्यात आल्या.

## सातारा राजद्रोह कट

इ. स. १८५७ मध्ये साताऱ्यात झालेल्या राजद्रोहाच्या कटाचे प्रमखु सूत्रधार रंगो बापूजी गुप्ते होते. या कटासाठी वाठार, येनवडे, देऊर, वर्धनगड, वारुगड, आर्वी, कळंबी, कराड, आरळे, अर्जुनगड, जकातवाडी, फलटण व सातारा येथे रंगोजींनी भूमिगत केंद्रे स्थापन केली होती. या कटात रंगोजींच्या सोबत साताऱ्याचे तात्या फडणीस, कराडचे दौलत पवार, महाडचे अण्णा चित्रे, भोरमधील शेट्ये बंधू, सातारच्या बावीसाव्या पलटणीतील दफेदार गणेश कारखानीस, सातारचे श्री. बाळाजी शिंपी व जकातवाडीचे श्री. हरी देवरूख हे प्रमुख सहकारी होते.[१६] या कटवाल्याचे प्रमुख ध्येय सातारच्या मराठी गादीवर छ. प्रतापसिंहांचे दत्तक पुत्र शाहू यास बसवून मराठा राज्य सुरू करणे होते. यासाठी सातारा येथील जिल्हा मुख्यालय जिंकून सरकारी खजिना लुटणे, सरकारी कारागहातील ३०० बंदीवानांना मुक्त करून आपल्या सोबत

घेणे, सातारा व महाबळेश्वर येथील सर्व युरोपीयन व्यक्तिंचा वध करून सरकारी खजिना लुटणे असे बेत आखण्यात आले. सर्व कट व्यवस्थित आखलेला होता. परंतु सैन्यात फितूरी माजवणारा मानसिंग याला इंग्रजांनी संशयावरून पकडले व १२ जून १८५७ रोजी त्यास तोफेच्या तोंडी देण्यात आले. मानसिंगचा तपास लागल्याने सातारच्या जिल्हाधिकाऱ्याने ताबडतोब हालचालींना प्रारंभ केला. त्यामुळे बंडाचा कट अयशस्वी झाला.[१७] या कटात भोरचे राजे चिमणाची रघुनाथ पंत सचिव सामील होऊन रंगोजींना सक्रिय मदत करीत होत. तसेच इतर जहागिरदारही या कटाला मदत करत होते.[१८]

दिनांक १७ ऑगस्ट १८५७ रोजी सातारच्या राजवाड्यास इंग्रजांनी वेढा घातला व छ.प्रतापसिंहांचे दत्तक पुत्र शाहू तथा जंगली महाराज, राजसबाई, गुणवंताबाई व तिचा दत्तक पुत्र दुर्गासिंग या सर्वांना अटक केली. त्यांना प्रथमत: खडकी व नंतर मुंबईच्या बुचर बेटावर वेगवेगळे ठेवण्यात आले. पुढे मार्च १८५८ मध्ये त्यांना कराचीला नेण्यात आले तर काहींना अहमदनगरच्या किल्ल्यात कैदेत ठेवले.

कटवाल्यांच्या मनसुब्याप्रमाणे उठाव तर झालाच नाही परंतु या कटात अडकलेल्यांची बरीचशी माहिती इंग्रज सरकारला मिळाली. रंगो बापूजी व त्यांचे २६ सहकारी लगेचच भूमिगत झाले व अखेरपर्यंत सरकारला ते सापडले नाहीत. ऑगस्ट १८५७ मध्ये सरकारने चार्लस फोर्बसच्या अध्यक्षेत खास न्यायालय नियुक्त केले. बंडात सहभाग असणाऱ्या पण माफीचे साक्षीदार बनलेल्या १५ व्यक्तिंना मुक्त करण्यात आले. हैबतराव महाडीक उर्फ आप्पासाहेब तोफखाने, पुतळाजी बिन बाबूराव सावंत, विठू बिन हणगु भोसले, विठू बिन सयाजी कुमकर, गुणु बिन खंडू भोसले, नारोजी बिन लिंगोजी नाईक कासकर, खेळेजी बिन लिगोजी नाईक कासकर, रघोजी बिन माना भोसले, नारायण विश्वनाथ शेवडे, गोपाळ बिन शिवराम जोशी, अवघट बुवा, केशव विनायक किबे या चौदा जणांच्या मालमत्ता जप्त करून त्यांना जन्मठेपेची शिक्षा ठोठावण्यात आली.[१९] या प्रकरणी खास न्यायालयाने १७ स्वातंत्र्य सैनिकांना देहदंडाची शिक्षा फर्मावली. ८ सप्टेंबर १८५७ रोजी सातारा शहरातील गेंडामाळावर त्यांना ही शिक्षा देण्यात आली. यापैकी नारायण (नाना) बापू पावसकर, केशव निळकंठ चित्रे, शिवराम मोरेश्वर बहुश्रुत (कुलकर्णी), विठ्ठल धोंडो (तात्या) व सिताराम रंगो गुप्ते या पाच जणांना गळफास लावून फाशी देण्यात आले. मनाजी उर्फ बाबू (नारायण), बाबर उर्फ भांदिर्गे, सखाराम बळवंत

शेटे, बाब्या नाथ्या गायकवाड मांग, येश्या नाथ्या गायकवाड मांग, गणेश सखाराम कारखानीस, नाना उमाजी रामोशी या सहा जणांना तोफेच्या तोंडी देण्यात आले तसेच रामजी बापूजी उर्फ रामसिंग चव्हाण, बाब्या हणगु (कानगु) शिरतोडे, नान्या नाईक रामोशी, शिवाजी सोमाजी पोटाळे, पर्वती विठोजी (गणेश) पोटाळे, पाटील येसू या सहा जणंना गोळ्या घालून ठार करण्यात आले.[२०] या स्वातंत्र्य समरात ब्राह्मण, कायस्थ प्रभूंबरोबर मराठे, मांग व रामोशींनीही बलिदान दिले. ध्येयस्फूर्तीसाठी केलेले आत्मबलिदान व पायाभूत सामाजिक एकात्मता यांचे यातून दर्शन घडते. आपल्या पाशवी शक्तीचा वापर करून इंग्रजांनी १८५७ चा उठाव मोडून काढला परंतु या विस्फोटाने लंडनमधील ब्रिटीश सरकारला आत्मचिंतन करण्यास भाग पाडले. यातून केवळ व्यापारासाठी हिंदुस्थानात गेलेली ईस्ट इंडिया कंपनी असंस्कृत, बेबेद व क्रूर कार्यपद्धतीने वागल्यामुळेच ब्रिटीशांच्या सामाज्यवादी धोरणास बाधा आल्याची खात्री ब्रिटनला झाली. म्हणून हिंदुस्थानमधील सत्ता ईस्ट इंडिया कंपनीकडून ब्रिटनच्या सरकारकडे घेण्यात आली. सर्वसाधारण समजसपणां व सर्वसमावेशक राज्य पध्दतीचा वापर इथून पुढे शासनकर्ते करतील असेही आश्वासन त्यांनी दिले.

ब्रिटीश पार्लमेंटने इ. स. १८५८ मध्ये सर्व सत्ता हाती घेतली. तरीही सर्वसामान्य जनतेत ब्रिटीशांचा अत्याचार कमी झाला नाही. याउलट हिंदी लोकांच्या कर्जबाजारीपणा मध्ये वाढच झाली. पूर्वी मराठा काळात शेती ही कर्जापोटी विकली जात नसे. परंतु ब्रिटीश आमदनीत जमीन खरेदी–विक्रीची बाब झाली. इ. स. १८८१ पासून अमेरिकेत यादवी माजण्यास प्रारंभ झाला. परिणामी शेतमालाच्या किंमती वाढल्या परंतु हे यादवी युध्द संपताच किंमती घसरल्या. याच काळात सरकारने सावकारांकरिता लिमिटेशन ॲक्ट पास केला होता. त्यामुळे जनतेच्या असंतोषात आणखीनच भर पडली. लिमिटेशन ॲक्ट १८६९, व शेतीमालाचे घसरलेले भाव यामुळे गुजर, सावकार शेतकऱ्यांचे शोषण करू लागले. या असंतोषातूनच १८७३–७४ मध्ये शेतकऱ्यांचे दंगे सुरू झाले.

याच दरम्यान पुण्यात इ. स. १८७० मध्ये स्थापन झालेल्या पुणे सार्वजनिक सभेने ब्रिटीशांविरोधी असंतोष निर्माण करण्याकरिता जमीन महसूल आकारणीमध्ये होणारा अन्याय हा विषय हाती घेतला. या सभेस प्रथमत: वाई येथे प्रतिसाद मिळाला व महादेव गोविंद रानडे यांच्या प्रेरणेने वाईस सार्वजनिक सभेची शाखा स्थापवन झाली. यानंतर पुण्याचे गणेश वासुदेव

जोशी तथा सार्वजनिक काका यांनी २८ मे १८७१ रोजी साताऱ्याला सभेची दूसरी शाखा स्थापली. लगेचच १३ ऑगस्ट १८७१ रोजी कराडची सार्वजनिक सभेची शाखा स्थापन झाली.[२१] सन १८७५ पर्यंत सातारा, कराड, वाई इ. ठिकाणी सार्वजनिक सभेच्या शाखा स्थापन झाल्या होत्या. सन १८७५ च्या दुष्काळाने सार्वजनिक सभेला सरकार विरोधात जनमानसात असंतोष भडकवण्याचे उपयुक्त साधन मिळाले. सार्वजनिक सभेच्या कार्यकर्त्यांनी सातारा जिल्ह्यात सर्वत्र फिरून जनजागती केली. लोकांच्या तक्रारी व मागण्यांची माहिती सरकारला देऊन सरकारी धोरणात बदल व्हावा यासाठीही सभा कार्यरत होती. परंतु सरकारने त्यांच्या अहवालावर अविश्वास दर्शवून त्यांचे अहवाल स्विकारले नाहीत. परंतु पुढे जनतेचा एवढा दबाव वाढला की शासनाला शेतकऱ्याच्या कर्ज निवारण विषयक गरजांकडे लक्ष देणे भाग पडले. शेवटी मुंबई इलाखा शासनाला या दंग्यांच्या चौकशीकरीता 'डेक्कन राईट्रस कमिशन' नियुक्त करावेच लागले.[२२] या कमिशनच्या अहवालानुसार 'डेक्कन ॲग्रिकल्चरिस्टस रिलीफ ॲक्ट' (१८३९ चा अधिनियम क्रमांक सतरा) पास करण्यात आला. या अधिनियमाच्या रूपाने दख्खनचे दंगे व सार्वजनिक सभेची मोहीम यांची फलनिष्पत्ती झाल्याचे दिसते.

सार्वजनिक सभेच्या शेतसारा बंदी आंदोलनाच्या सातारा जिल्ह्यातील मोहिमचे नेतृत्व नरसिंह चिंतामण केळकर यांच्याकडे होते. त्यांचे बंधू सातारा जिल्हाधिकारी कार्यालयात होते. त्यामुळे केळकरांना अनुकूल प्रतिसाद मिळून सार्वजनिक सभेच्या कार्याचे प्रयोजन स्पष्ट करता येत असते.[२३] इ. स. १८७५ च्या दुष्काळाचा एक महत्त्वाचा परिणाम ग्रामीण भागावर झाला तो म्हणजे सातारा जिल्ह्यातील दुष्काळप्रवण पूर्व भागातील लोक मोठ्या प्रमाणात मुंबईस उद्योगधंदा मिळेल या आशेने स्थलांतरित झाले.[२४]

अशा प्रकारची असंतोषाची परिस्थिती सातारा भागात निर्माण झालेली असतानाच भारताच्या राजकारणात राष्ट्रवादी विचारांची एक मोठी संघटना निर्माण झाली व त्या संघटनेत सातारा जिल्हाही सहभागी होऊन इंग्रजांना लवकरात लवकर भारताबाहेर घालवण्याचे स्वप्न ही जनता पाहू लागली.

## सन १८८५ ते सन १९०५ या कालखडांतील सातारा जिल्हा :-

सन १८५७ रोजी झालेल्या विद्रोहानंतर इंग्रजांनी या देशावरची आपली पकड मजबूत करण्यासाठी कंपनी ऐवजी ब्रिटीश पार्लमेंटचे वर्चस्व निर्माण केले. १८५७ सारखा विद्रोह पुन्हा

होऊ नये, जनतेच्या तक्रारी गाऱ्हाणी सरकारला समजाव्या या हेतून इंग्रजांनी ॲलम ह्युम यांनी निर्माण करत असलेल्या संघटनेचा विरोध केला नाही व तत्कालीन भारतीय विचारवंतांनी ह्युम यांची मदत घेऊन सन १८८५ साली मुंबई येथे राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना केली. जनसामान्यांचे प्रश्न सरकारपर्यंत पोहचवणारी पहिली देशव्यापी संघटना म्हणून याच्याकडे पाहिले जाते.

राष्ट्रीय काँग्रेसच्या कार्याचे तीन प्रमुख कालखंडांमध्ये विभाजन केले जाते.

१. इ. स. १८८५ ते इ. स. १९०५ (पहिला टप्पा)

२. इ. स. १९०५ ते इ. स. १९२० (दुसरा टप्पा)

३. इ. स. १९२० ते इ. स. १९४७ (तिसरा टप्पा)

प्रारंभीच्या कालखंडात धमनिरपेक्ष राहून सर्वांना बरोबर घेऊन स्वयंपूर्ण बनावे, सामर्थ्य वाढीस लागावे हा या संघटनेचा दृष्टिकोन होता. प्रारंभीची काही वर्षे या संघटनेची धोरणे सरकारशी मिळते–जुळते घेण्याची होती. या कालखंडात अर्ज, विनंत्याच करण्यात येत होत्या. कधीही सूर्य न मावळणाऱ्या ब्रिटीश साम्राज्याचे मालक असणाऱ्या इंग्रजांना कच्च्या मालाचा पुरवठा करणारे प्रदेश व पक्क्या मालाच्या बाजारपेठा यासाठी वसाहतींची आवश्यकता होती. म्हणूनच ते हे हितसंबंध जपत होते. त्यातून झालेच तर स्थानिकांचे कल्याण करून त्यांच्या विकासासाठीच या प्रदेशात आलेलो आहोत असा डांगोरा पिटण्यासाठी ब्रिटीशांनी या संघटनेच्या प्रारंभीच्या काळात थोडीफार मदतीचे नाटक केले. परंतु हळुहळू सुशिक्षित भारतीय जनतेस इंग्रजांचे खरे स्परूप कळून चुकले तेव्हा हे स्वरूप त्यांनी सर्वसामान्य जनतेसमोर उभे करण्यास प्रारंभ केला. इंग्रज भारतीयांचे सर्वांगिण शोषण करीत आहेत ही बाब राष्ट्रीय काँग्रेस प्रकर्षाने मांडू लागली. परिणामी इंग्रजांनी ही संघटना दडपण्याचे प्रयत्न चालू केले.

इ. स. १८८५ मध्ये हिंदी राष्ट्रीय सभेची स्थापना मुंबईस झाली त्यावेळी तिथे सातारा जिल्ह्यातून दादासाहेब करंदीकर गेले होते.[२५] रघुनाथ पांडुरंग तथा दादासाहेब करंदीकर आणि गणेश बल्लाळ फणसळकर हे दोघे वकिल टिळकांचे निकटचे सहकारी होते. किंबहुना टिळक कालीन साताऱ्याचे नेतृत्व यांच्याकडे असून दोघेही इ. स. १८९० पासून काँग्रेसचे सक्रिय सभासद होते. देशाच्या उध्दारासाठी कार्य करणाऱ्या या राष्ट्रीय सभेचे महत्त्व सर्वसामान्य जनतेला समजावे यासाठी दादासाहेब करंदीकर, बळवंतराव कोल्हटकर, कृष्णाजी आबाजी

गुरुजी, नानासाहेब वैद्य, गोविंदराव धोंडो लिमये, दत्तोपंत पारसनीस इ. कार्यकर्ते काँग्रेसचा प्रसार प्रचार करण्यासाठी तसेच स्वयंसेवक घडवण्यासाठी जिल्हाभर दौरे करत असत. अखिल भारतीय काँग्रेसचे कार्य प्रसारित व्हावे यासाठी सातारा जिल्ह्यात काही तालुका मंडळे स्थापन केली गेली. दिनांक २४ सप्टेंबर १८८८ रोजी कराड तालुका मंडळ स्थापन झाले.[२६] राष्ट्रीय सभेचे प्रतिनिधी निवडण्यासाठी आता छोट्या काँग्रेसचे मिळावे होऊ लागले. सन १८९३ साली वाळव्यात 'छोटी काँग्रेस' नामक अभिनव संघटनेच्या अधिवेशनाला ए. ओ. ह्युम आवर्जुन उपस्थित होते. या संघटनेत शेतकरी व इमानदारवर्ग सहभागी होत असल्याबद्दल अखिल भारतीय काँग्रेसचे त्यावेळचे अध्यक्ष ह्युम यांनी प्रशंसोद्‌गार काढले.[२७] वाळव्याप्रमाणेच कराड व वाई येथेही 'छोटी काँग्रेस' च्या बैठका संपन्न झाल्या.[२८] इ. स. १८९१ साली कराडला, इ. स. १८९१, १८९३, १८९५ साली वाईला या परिषदा झाल्या. इ. स. १८९३ सालच्या वाईच्या काँग्रेस मळाव्यासे तीन ते पाच हजार शेतकरी उपस्थित होते.[२९]

एकूण या कालखंडात सातारा जिल्ह्यामधील सुशिक्षित मंडळींनीं काँग्रेसच्या राष्ट्रवादी कार्यक्रमात सक्रिय सहभाग घेतला होता. याचा प्रत्यय काँग्रेसच्या प्रचार कार्यातून आणि छोटी काँग्रेस व काँग्रेसच्या प्रांतिक अधिवेशनावरून येतो. अखिल भारतीय काँग्रेसची विभागीय शाखा म्हणजे 'प्रांतिक परिषद' ही राष्ट्रवादी संघटना होय. या परिषदेचे इ. स. १९०० साली सातारला यशस्वी अधिवेशन झाले.

बंगालच्या फाळणी विरोधात लोकमान्य टिळकांनी आयोजित केलेल्या वंगभंग या स्वदेशी चळवळीस सातारा जिल्ह्यात लक्षणीय प्रतिसाद मिळाला. वंगभंग चळवळी बरोबरच देशात दहशतवाद उफाळून आला. सातारा–कराडमधील काही कार्यकर्ते इंग्रजांविरोधात भूमिगत सशस्त्र प्रतिकाराचा पुरस्कार करू लागले. कृष्णराव मारूतराव कळंबे हे अशा संघटनेचे अध्वर्यु होते.[३०]

काँग्रेसच्या बनारस येथील इ. स. १९०५ सालच्या अधिवेशनातील निर्णयानुसार काँग्रेसचे कार्य सतत चालू ठेवण्यास्तव 'सातारा जिल्हा सभा' जून १९०७ मध्ये स्थापन करण्यात आली.[३१] दादासाहेब करंदीकर जिल्हा सभेचे पहिले अध्यक्ष होते. सन १९०७ साली सुरत येथे झालेल्या राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनात अभूतपूर्व गोंधळ झाला व राष्ट्रीय काँग्रेस दुभंगली. जहाल आणि मवाळ असे दोन परस्पर विरोधी गट निर्माण झाले. काँग्रेसमधील दुफळी

स्वातंत्र्य आंदोलनास घातक असल्याने मवाळ व जहाल यांच्यातील वाद कमी करून ऐक्य भावना निर्माण करण्याच्या कामी सातारचे रामचंद्र गणेश तथा भाऊसाहेब सोमण व आप्पासाहेब आळतेकर यांनी बरेच प्रयत्न केले. मवाळ व जहाल यांच्यातील खडतर लढ्यात साताऱ्यातील नेत्यांनी टिळकांची बाजू उचलून धरून ही सामोपचाराची भूमिका वाढवली हे विशेष होय. टिळकांचे घनिष्ठ मित्र असलेले रघुनाथ पांडुरंग तथा दादासाहेब करंदीकर मवाळ व जहाल यांच्यामधील एक दुवा होते. इ. स. १९१४ साली प्रांतिक परिषदेचे अधिवेशन सातारला झाले. याप्रसंगी सातारकर राजकारण्यांनी मवाळ व जहाल पुढाऱ्यांमध्ये ऐक्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला. ही ऐक्याची प्रक्रिया १९१६ च्या बेळगांव प्रांतिक अधिवेशनात पूर्ण झाली. या कामी दादासाहेब करंदीकरांना पुष्कळ श्रेय द्यावे लागेल. सन १९२२ पासून जिल्हा सभेची अधिवेशने व्यापक लोकजागृतीचे ध्येय समोर ठेवून खेडेगावात भरवण्यात आली. सन १९२५ मध्ये पुन्हा साताऱ्यात प्रांतिक परिषदेचे अधिवेशन झाले.[३३] सातारा जिल्ह्यातील इस्लामपूर, कराड, तासगांव, विटा व वाई या शहरात इतर तालुक्यांच्या ठिकाणांपेक्षा काँग्रेस जास्त लोकप्रिय होती. या काळात दादासाहेब करंदीकर, नानासाहेब वैद्य, बळवंत सहस्त्रबुध्दे, गणपत फणसळकर, नारायण आगाशे, रावसाहेब लिमये, भाऊसाहेब भागवत, आर. जी. कुलकर्णी, नाथ घाणेकर व भाऊसाहेब सोमण हे जहाल गटाचे प्रमुख कार्यकर्ते तर रा. बा. काळे, विठ्ठलराव पाठक आणि वाग्भट नारायण देशपांडे हे साताऱ्यातील मवाळ गटाचे पुरस्कर्ते होते.[३४]

लोकमान्य टिळकांनी सुरू केलेल्या गणेशोत्सव व शिवजयंतीचा उपयोग सातारा जिल्ह्यातील राष्ट्रवादी विचारसरणीचा प्रभावी प्रचार–प्रसार करण्यासाठी करण्यात आला. पुण्यातील गणेश मेळ्यांच्या धर्तीवर सातारा, कराडलाही मेळे संघटीत करण्यात आले. या मेळ्यांच्या माध्यमातून राष्ट्रीय गीते, पोवाडे, पथनाट्ये व नाटकांचे प्रयोग करून जनतेत देशभक्तीची जागृती करण्याचा उपक्रम राबवला गेला. सातारा जिल्ह्यात इ. स. १९०० मध्ये अशा प्रकारचे १५ मेळे कार्यरत होते. या माध्यमातून सरकारविरोधी वातावरण निर्मिती होत असल्याचे लक्षात येताच अशा मेळ्यांना सरकारी परवानगी काढण्याचे बंधन घालण्यात आले. पोवाडे व गीतांवर सेन्सॉरशीप लादण्यात आली. मिरवणुकींवर बंधने आणली गेली इतकेच नव्हे तर मिरवणुकीतील घोषणा व मिरवणूक मार्गासाठी देखील दंडाधिकाऱ्यांची पुर्वपरवानगी घ्यावी

लागत असे. वाईतील गणेशोत्सव पुण्यापेक्षा बऱ्याच बाबतीत वेगळे होते. त्यांना स्थानिक लोकांनी वेगळे स्वरूप देऊन मेळा चळवळींचा 'द्वार सोहळ्याशी' समन्वय घडवून आणलेला होता.[३५]

**दहशतवादी चळवळीतील सातारा जिल्ह्याचे योगदान** :-

पुण्यात चाफेकर बंधुंनी इंग्रज अधिकाऱ्याची हत्या केल्यानंतर चाफेकर बंधूंचे धैर्य आणि त्यांच्या बाणेदारपणा याचा आदर सातारा जिल्ह्यातील युवकांनी केला इतकेच नव्हे तर बाळकृष्ण व वासुदेवराव चाफेकरांना पोलिसांची नजर चुकवून सुरक्षित राहता येईल अशी व्यवस्था सातारा जिल्ह्यातील वारुगड गावचे जमिनदार पांडुरंग जिवाजी सबनीस यांनी केलेली होती.[३६] सन १८९९ ते सन १९०९ या कालखंडात सातारा जिल्ह्यातील युवकांनी बाबाराव सावरकर व विनायक दामोदर सावरकर यांनी स्थापन केलेल्या 'अभिनव भारत' या संघटनेच्या गुप्त शाखा सातारा व कराडला स्थापन केल्या होत्या.[३७] कोरेगांवचे गुरव गुरुजी यांच्यासारखे काही ब्राह्मणेतर देखील या संघटनेला साथ देत. इंग्रजांविरुध्द सशस्त्र प्रतिकार करणाऱ्या एका भूमिगत गटात सातारा जिल्ह्यातील पाटण व शिराळा तालुक्यातील ५० मांग, कैकाडी व मराठा युवक होते.[३८]

अभिनव भारतच्या सातारा शाखेचे सभासद औंध बॉंब प्रकरणात पकडले गेले. या प्रकरणास 'सातारा कट खटला' असेही म्हणतात. औंध हायस्कूलच्या एका खोलीत २३ मे १९१० रोजी एक बॉंब सापडला. काही व्यक्तिंनी पोलीसांना माहिती पुरवल्याने आरोपी पकडले गेले व त्यांना सक्त मजूरीच्या शिक्षा झाल्या.[३९]

सातारा जिल्ह्यात अशा प्रकारच्या दहशतवादी कारवाया चालत असत परंतु पुढे राष्ट्रीय कॉंग्रेसने आपल्या कार्याचा प्रभाव वाढवल्याने युवक तिकडे आकर्षित झाले व दहशतवादी चळवळ एका मर्यादेत सीमित झाल्याचे दिसते.

**सातारा जिल्ह्यातील होमरूल चळवळ** :-

लोकमान्य टिळकांनी मंडालेच्या तुरुंगातून मुक्त झाल्यानंतर डॉ. ॲनी बेझंट यांना सोबत घेऊन १९१६ मध्ये होमरूल लिग स्थापन केली. साताऱ्यात लो. टिळकांचा चाहता वर्ग असल्याने होमरूल चळवळीस साताऱ्यात अनुकूल प्रतिसाद मिळाला. 'स्वराज्य हा माझा जन्मसिध्द हक्क आहे आणि तो मी मिळवणारच' हे लोकमान्यांचे निश्चयी वाक्य घेऊन सन

१९१७ साली आप्पासाहेब आळतेकर आणि दिगंबरपंत गोखले यांनी तासगांव, इस्लामपूर, कऱ्हाड, विटे भागात दौरा काढला आणि होमरूल लिगच्या शाखा स्थापन केल्या.[४०] अच्युतराव कोल्हटकर, तात्यासाहेब केळकर, अष्टपुत्रे आणि भाऊसाहेब सोमण यांनी रहिमतपूर, माहूली, पाटखळ, बोरखळ, पाटण या भागात होमरूल संबंधी जागृती केली.[४१] होमरूल लिगच्या वतीने मार्च १९१८ मध्ये युरोपात लिगच्या वतीने मार्च १९१८ मध्ये युरोपात पाठवलेल्या शिष्टमंडळात लो. टिळक, नरसिंह चिंतामण केळकर, दादासाहेब खापर्डे, बिपीनचंद्र पाल यांच्याबरोबर साताऱ्याचे रघुनाथ पांडुरंग करंदीकर ही होते.[४२]

थोडक्यात लोकमान्य टिळकांच्या होमरूल चळवळीस साताऱ्यातील काँग्रेसजनांनी भरघोस पाठिंबा दिलेला होता व लो. टिळकांनी पुकारलेल्या प्रत्येक चळवळीत हे काँग्रेसजन हिरीरीने आपला सहभाग नोंदवत असल्याचे दिसून येते. इ. स. १९२० साली लोकमान्य टिळकांचे निधन झाले. त्यांच्या विचारधारेचा पाठपुरावा करणारा एकही समर्थ नेता दिसत नव्हता तेव्हा सातारच्या दादासाहेब करंदीकरांच्यासोबत आणखी नऊ लोकांनी एक समिति नियुक्त करून सामुहिक नेतृत्व निर्मितीचा प्रयत्न करण्यात आला. परंतु तो अपयशी ठरला. तरी देखील या प्रयत्नातून निर्माण झालेल्या गटाला टिळक पक्ष असे नाव प्राप्त झाले.[४३]

## म.गांधीयुगीन सातारा जिल्हा:–

### असहकार आंदोलन :–

लो.टिळकांच्या मृत्यूनंतर भारतात म. गांधीजींचे एक नविन नेतृत्व उदयास आले. सन १९२० साली लो. टिळकांचा मृत्यू झाला व त्याच वर्षी म. गांधीजींनी भारतभर असहकार चळवळीचा नारा दिला. म. गांधीजींचे नेतृत्व भारतभर प्रभावी ठरू लागल्याने सातारा जिल्ह्यातील बहुसंख्य क्रियाशील काँग्रेस कार्यकर्त्यांनी त्यांचे नेतृत्व स्वीकारले. म. गांधीजींच्या आदेशानुसार साताऱ्यातही असहकार आंदोलन सुरू झाले. स्वत: म. गांधीजींनी ६ व ७ नोव्हेंबर १९२० रोजी महाराष्ट्र दौरा करत असताना वाई, सातारा, कराड, सांगली येथे भेटी दिल्या. असहकार चळवळीचा एक भाग म्हणून सरकारी न्यायालये, शासकीय शाळा किंवा शासन अनुदान प्राप्त शिक्षण संस्थांवर बहिष्कार घालावा असे त्यांनी प्रतिपादन केले. त्यानुसार सातारच्या न्यू इंग्लिश स्कूलचे शिक्षक नाथ घाणेकर व त्यांचे बंधू यांनी या शाळेतून बाहेर पडून १ मार्च १९२१ रोजी पाठशाळा सुरू केली.[४४] महाराष्ट्रामधील प्रसिध्द राष्ट्रीय शाळांमध्ये

साताऱ्याच्या या शाळेचा समावेश होत होता. कराड, मसूर व रहिमतपूरला देखील अशा राष्ट्रीय प्राथमिक शाळा सुरू झाल्या. वाईच्या प्राज्ञ पाठशाळेचे छात्र व अध्यापक असहयोग आंदोलनात सहभागी झालेले होते. या पाठशाळेचे लक्ष्मण शास्त्री जोशी, दिनकर शास्त्री कानडे, महादेव शास्त्री दिवेकर, श्रीपाद शंकर नवरे, भैय्याशास्त्री वाटवे, श्रीराम सावरगांवकर इत्यादींनी सत्याग्रहात सक्रिय भाग घेतला. काही काळाकरिता वकिली सोडणाऱ्यांमध्ये आप्पासाहेब आळतेकर, साताऱ्याचे अष्टपुत्रे, टिळक, यशवंत देशपांडे, गोविंद श्रोती मारूलकर यांचा समावेश होता. तासगांव तालुक्यात डॉ.दातार व चिंतोपंत काळेंच्या नेतृत्वात बारा राष्ट्रीय लवाद न्यायालये स्थापन करण्यात आलेली होती.[४५] कोरेगांव तालुक्यातील देऊर येथील पिराजी कदम, रघुजी कदम, रामराव कदम, रुद्राप्पा कदम, सीताराम कदम, नामदेव कदम, भाऊ ओझर्डे, धोंडीबा कदम, रावजी कदम इ. पाटण तालुक्यातील तारळ्याचे सीताराम गणपुते, वाई तालुक्यातील चांदकचे यशवंत कुलकर्णी, कराडचे वामन जोशी, येळगांवचे अनंत कुलकर्णी यांना असहकार आंदोलनात भाग घेतल्याबद्दल शिक्षा झाल्या. खंडाळा तालुक्यातील शिरवळचे नरहर वाळिंबे यांनी शाळा–कॉलेजांवर बहिष्कार टाकला. मुळशी सत्याग्रहात भाग घेतला. त्याबद्दल त्यांना शिक्षा झाली.[४६]

मॉन्टेग्यु–चेम्सफोर्ड कायद्यानुसार इ. स. १९२० च्या नोव्हेंबर महिन्यात मुंबई लेजिस्लेटीव्ह कौन्सिलच्या निवडणूका झाल्या. या निवडणुकांवर कॉंग्रेसने बहिष्कार घातलेला होता. यामुळे मवाळ पंथीय व ब्राह्मणेतरांना निवडून येणे सोपे झाले. या निवडणुकीत साताऱ्यातून ब्राह्मणेतर पक्षाचे उमेदवार पांडुरंग आढाव निवडून आले होते. सन १९२३ च्या मुंबई लेजिस्लेटीव्ह कौन्सिलच्या निवडणुकीत भास्करराव जाधव व धनजीशा कूपर हे निवडून आलेले होते.[४७]

साताररच्या दादासाहेब करंदीकरांनी सन १९२९ पर्यंतच्या सर्व कॉंग्रेस अधिवेशनात सक्रिय भाग घेतलेला होता. कॉंग्रेसच्या बहुतेक सर्व समित्यांच्या सदस्यपदी असलेल्या करंदीकरानी इ. स. १८९५ व इ. स. १९२९ मध्ये कॉंग्रेसचे अधिवेशन सातारला भरावण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. यांच्यासोबत नानासाहेब आगाशे व विनायकराव फणसळकर हे देखील असत. अखिल भारतीय कॉंग्रेस समितीवर दादासाहेब करंदीकरांच्या व्यतिरिक्त आप्पासाहेब आळतेकर, हकीम, रा. ग. सोमण, पांडुरंग अण्णा शिराळकर आणि गोसावी हे कॉंग्रेसजन काही

दिवस होते.[४८]

दिनांक १० मे १९२५ रोजी सातारच्या महाराष्ट्र प्रांतिक परिषदेचे अधिवेशन बॅ. रामराव देशमखांच्या अध्यक्षतेत झाले. या ठिकाणी काँग्रेस सभासदत्वासाठी असलेली सूत कताईची अट काढून टाकण्याचा प्रस्ताव मान्य करण्यात आला. फेब्रुवारी १९२७ मध्ये म. गांधींजी सातारा जिल्हा दौऱ्यावर गेले. या दौऱ्यात त्यांना अत्यंत अनुकूल प्रतिसाद मिळाला. या काळात साताऱ्याचे रा. ग. सोमण प्रांतिक काँग्रेस कमिटीच्या कारभारात सक्रिय होते व त्यांना बाबूराव गोखलेंची उत्तम साथ मिळत होती. त्यामुळेच काँग्रेसचा या प्रदेशातील प्रभाव दिवसेंदिवस वाढत होता. इ.स.१८२७ मध्ये कराड काँग्रेस समितीची स्थापना हे त्याचेच द्योतक आहे.[४९]

नोव्हेंबर १९२८ मध्ये पुन्हा मुंबई लेजिस्लेटीव्ह कौन्सिलच्या निवडणुका झाल्या. या निवडणुकात साताऱ्याचे रावजी रामचंद्र काळे व रँगलर रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे हे दोघे इंडियन नॅशनल पार्टीचे आमदार झाले. परंतु या जिल्ह्यातील धनजीशा कूपर शेठ, भास्करराव जाधव, रामचंद्र बी. शिंदे, भाऊराव पाटील यांच्यात एकमत नसल्याने इ. स. १९२६ च्या निवडणुकीत ब्राह्मणेतर पक्षाचे भास्करराव जाधव निवडून आले व रावजी काळे, लक्ष्मण महादेव तथा नानासाहेब देशपांडे हे ब्राह्मण मात्र ब्राह्मणेतरांचा पराभव करून निवडून आले.[५०] कराडमध्ये काँग्रेस समिती स्थापन झाल्यानंतर तेथील कार्यकर्त्यांमध्ये नविन उत्साह संचारला. लक्ष्मणशास्त्री जोशी, गणपतराव बटाणे, हरिभाऊ लाड, रघुअण्णा धोपटे, बाबूराव गोखले, गुलाबभाई बागवान, बापू नेते, बाबूराव अष्टेकर इत्यादी कार्यकर्ते सक्रिय बनले.[५१]

**सविनय कायदेभंग आर्दोलन व सातारा जिल्हा** :-

काँग्रेसच्या राष्ट्रीय कार्यकारीणीने २६ जानेवारी १९३० हा स्वातंत्र्य दिन म्हणून साजरा करण्याचे आवाहन १९२९ च्या लाहोर अधिवेशनात करण्यात आले. त्यानुसार सातारा येथेही स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला. या दिवसापासून सविनय कायदेभंग आंदोलनाच्या पूर्वतयारीस प्रारंभ झाला व लवकरच जिल्हा सभा कार्यशील बनली. डॉ. आठले, पंढरीनाथ घाणेकर, आचार्य शं. द. जावडेकर, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, रामचंद्र सोमण व इतर इत्यादी कार्यकर्ते यामध्ये आघाडीवर होते.[५२] महात्मा गांधीजींनी १२ मार्चला दांडीयात्रेस प्रारंभ केला. त्यामुळे सातारा येथे अभूतपूर्व झेंडावंदन झाले. वाई, सातारा, कराड येथील

हायस्कूलांवरही विद्यार्थ्यांनी झेंडे लावले. तांबव्याच्या मराठी शाळेवर झेंडा लावला म्हणून ही शाळा सहा महिने बंद पडली. सशस्त्र पोलीस हे झेंडे काढत तेव्हा संघर्ष होत असे.[५३] सातारा जिल्ह्याला समुद्र किनारा नसल्याने बाबूराव भिडे, पंडीत, कुलकर्णी इत्यादींनी बेकायदेशीर मीठ विकून कायदेभंग केला. पाडळी, उरूल, करंजखोप, कडेगाव, निगडी, तांबवे इ. ठिकाणी जंगल सत्याग्रह झाले. जिल्ह्यातील पन्नास हजार लोकांनी जंगल सत्याग्रहात भाग घेतला. बेलमाची व किकली येथे जंगल सत्याग्रह झाले. किकलीची जनावरे जबरदस्तीने सोडल्याबद्दल कवठ्याचे किसन वीर यांच्यावर खटला झाला. त्यांना ११ महिने सक्तमजूरी ९२५ रुपये दंड झाला.[५४] सविनय कायदेभंग आंदोलनाचा आणखी एक महत्त्वाचा भाग म्हणजे सरकारी कर्मचारी व अधिकारी यांना राजीनामा देण्यासाठी केलेले आवाहन होय. परकीय सत्तेची चाकरी सोडून सरकारी कर्मचाऱ्यांना राष्ट्रीय आंदोलनात सामील करून घेण्याचे प्रयत्न होत असत. गावचे पाटील, तलाठी व सरकारी कार्यालयातील कर्मचाऱ्यांना राजीनामे देण्यासाठी स्वातंत्र्यसैनिक प्रोत्साहित करीत असत.

सातारा जिल्ह्यातील सत्याग्रहींनी सातारा जिल्ह्यातच नव्हे तर सातारा जिल्ह्याबाहेरही अनेक सत्याग्रह घडवून आणले. वाईच्या प्राज्ञपाठशाळेचे विद्यार्थी विलेपार्ले व मालवणला मिठाच्या सत्याग्रहासाठी गेले होते. रत्नागिरी सत्याग्रह छावणीचे अधिपत्य काही दिवसांसाठी डॉ.आठल्ये यांच्याकडे होते. याशिवाय गुहागर, पेण, वेंगुर्ले येथील सत्याग्रह केंद्रावर देखील जिल्ह्यातील स्वयंसेवक होते. अखिल भारतात गाजलेल्या शिरोड्याच्या सत्याग्रहाची सूत्रे डॉ. वा. वि. आठल्ये, आचार्य शं. द. जावडेकर, विनायकराव भुस्कुटे यांच्याकडे होती.[५५]

सविनय कायदेभंग आंदोलनामध्ये ब्राह्मणेतर युवकांना संघटित करण्यासाठी नाना रामचंद्र पाटील (येडे मच्छिंद्र), आत्माराम पाटील व डॉ. हिंगमिरे यांच्या समितीने, सातारा, पाल, मसूर, उंब्रज, कराड, रेठरे (हरणाक्ष), पेठ येथे युवकांची शिबीरे भरवली. यावेळी विविध सामाजिक स्तरावरील लोक आंदोलनात सहभागी झाले. पार्वतीबाई काटकर, कासाबाई परटीण, कृष्णाताई कुलकर्णी, यमुताई केतकर इत्यादी महिलांचाही या आंदोलनात सहभाग होता.[५६] नाना पाटील, काशिनाथ राजाराम देशमख्, बापूसाहेब देशमुख, आत्माराम पाटील, विनायकराव थोरात, मारुती विष्णू कुलकर्णी तथा बाबूराव चरणकर, गणपतराव पाटील, बाबा लेले, किसन वीर, श्रीधर कुलकर्णी, बाबू सातपुते, विष्णू एकनाथ कान्हेरे, दादा आप्पाजी बस्ते तथा बरडे

मास्तर, पांडुरंग गोविंद पाटील तथा पांडु मास्तर अशा व्यक्ती प्रथमच आंदोलनात आल्या. साखवळकर हे तर जिल्हा काँग्रेस समितीचे सर्वाधिकारी होते.[५७] महाराष्ट्रामधील इतर जिल्ह्यांप्रमाणेच जून १९३० नंतर मिठाच्या सत्याग्रहाचा जोर कमी होऊन साताऱ्यात जंगल सत्याग्रहानंतर भर देण्यात येवू लागला. सातारा जिल्ह्यात अंदाजे ३५ ठिकाणी जंगल सत्याग्रह झाले. कर्मवीर भाऊराव पाटलांनी कामेरी येथे जंगल सत्याग्रह केला होता. या कालखंडात गाजलेला सत्याग्रह म्हणून बिळाशी सत्याग्रहाकडे पाहिले जाते. बिळाशी ग्रामस्थांनी तेथील जंगलातील सागवानी लाकडाचे सोट बेकायदेशीररित्या तोडून आणला व त्यावर राष्ट्रध्वज फडकवण्यात आला. हा सागवारी सोट व निशाण जप्तीसाठी पोलीस गेले असताना त्याच्या रक्षणासाठी गावागावातून शेतकरी जमू लागले. शेवटी सरकारने बिळाशी गावची नाकेबंदी केली व बळाचा वापर करून ध्वज व ध्वजस्तंभाचा विनाश केला. यावेळी मात्र उपस्थित जनसमुदायाने पोलिसांवर दगडफेक केली. पोलिसांनी बेछूट गोळीबार केला. यावेळी दोन युवक ठार झाले. २० सत्याग्रही गंभीर जखमी झाले.[५८] अशा रितीने बिळाशी गाव इतिहासात अजरामर झाले.

जानेवारी १९३१ पर्यंत हे आंदोलन कोणत्या ना कोणत्या स्वरूपात चालू होते. मात्र म. गांधींना वाटाघाटी करण्यासाठी २५ जानेवारी १९३१ रोजी मुक्त करण्यात आले व हे आंदोलन स्थगित करण्यात आले. परंतु गोलमेज परिषदेत काहीच निष्पन्न झाले नाही व म. गांधीजी रिकाम्या हातानेच भारतात परतले. आता पुन्हा आंदोलन सुरू झाले. दरम्यानच्या काळात कार्यकर्ते निश्चिंत झाले होते. सरकारने लगोलग कारवाई करून काँग्रेसच्या प्रमुख नेत्यांना अटक केली. त्याचप्रमाणे प्रमुख कार्यकर्त्यांचीही धरपकड केली. परिणामी इ. स. १९३२ नंतर या आंदोलनाची धार कमी झाली व शेवटी हे आंदोलन स्थगित करण्यात आले.

सविनय कायदेभंग चळवळ स्थगित झाल्यानंतर काँग्रेस जनांनी स्वत:ला विधायक कार्यात गुंतवून घेतले होते. इ. स. १९३६ चे अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे अधिवेशन महाराष्ट्रात होणार होते. यासाठी सातारा, अहमदनगर व पूर्व खानदेश जिल्हा यांनी दावे मांडले. याबाबत प्रांतिक काँग्रेसने मतदान घेतले असता अहमदनगराला कमी मते मिळाली. मात्र सातारा व पूर्व खानदेश यांना समान मते मिळाली. यावेळी महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस समितीचे अध्यक्ष शंकरराव देव यांनी आपले निर्णायक मत पूर्व खानदेशला दिल्याने सातारला अधिवेशनाचे

यजमान पद मिळाले नाही व अधिवेशन फैजपूर येथे घेण्यात आले.[५९]

इ. स. १९३७ च्या प्रांतिक विधीमंडळाच्या निवडणूकीत सातारा जिल्ह्यातील आठ जागांपैकी चार जागा काँग्रेसने जिंकल्या.[६०] सातारा जिल्हा काँग्रेसमध्ये आता मानवेंद्र रॉय यांचे अनुयायी असणाऱ्या रॉयवादी तसेच समाजवादी विचारसरणीच्या लोकांचा प्रभाव वाढू लागला. यामध्ये लक्ष्मणशास्त्री जोशी, भैय्याशास्त्री वाटवे, हणमंत महाजनी, वि. स. पागे, पंढरीनाथ घाणेकर यांचा समावेश होता. महाराष्ट्र काँग्रेस सोशालिस्ट पार्टीचे पहिले अधिवेशन कराड येथे झाले. याप्रसंगी श्री. यशवंतराव चव्हाण देखील हजर होते.[६१]

**सन १९४२ पूर्वीची साताऱ्याची स्थिती** :-

सन १९४२ चे सातारा जिल्ह्यातील आंदोलन पहावयाचे झाल्यास त्या आंदोलनाची पायाभरणी करणारी सविनय आंदोलनापासूनचा इतिहास अभ्यासणे गरजेचे आहे. सविनय कायदेभंग चळवळी प्रसंगी तुरुंगात गेलेल्या स्वातंत्र्यसैनिकांचा संबंध राजकीय विचारवंतांशी आला. परिणामी त्यांची वैचारिक बैठक बसण्यास मोठी मदत झाली. कारागृहातील युवक मानवेंद्र रॉय यांच्या डाव्या विचारसरणीकडे झुकू लागले. तसेच काँग्रेस सोशालिस्ट पक्षाकडेही युवक आकर्षित झाले. शेवटी उजवे, डावे काँग्रेसजन, कम्युनिस्ट व मानवेंद्र रॉय यांचे समर्थक यांच्यात संघर्ष सुरू झाला. यांच्यात कधी ऐक्य करण्यात यश येई तर कधी संघर्ष वाढत असे. द्वितीय महायुध्दापर्यंत ही परिस्थिती अशीच चालू होती. मात्र दुसऱ्या महायुध्द प्रसंगी प्रत्येक पक्षास आपली भूमिका स्पष्ट करणे आता गरजेचे झाले. सन १९४० मध्ये महाराष्ट्र काँग्रेस समितीवर सातारा जिल्ह्याने निवडून द्यावयाच्या जागांपैकी बहुसंख्य जागा डाव्या विचारसरणीच्या व्यक्तिंनी जिंकल्या. त्यातून जिल्ह्यात एक प्रभावी विचार आला. तो असा की, शेतकरी व कामकरी लोकांनी घडवून आणलेल्या कृषी क्रांती द्वारेच राष्ट्रीय स्वातंत्र्य प्राप्त होऊ शकेल. तेव्हापासून साताऱ्यातील काँग्रेस पक्षावर शेतकरी व कामकरी लोकांच्या नेत्यांचा प्रभाव पडू लागला. सातारच्या प्रतिसरकारचे नेतृत्व या वर्गाच्या प्रतिनिधींच्या कडे आले.[६२] सन १९४१ मध्ये काँग्रेस, काँग्रेस सोशालिस्ट, रॉयवादींची रॅडिकल डेमॉक्रॅटीक पार्टी या पक्षांव्यतिरिक्त सातारा जिल्ह्यात मराठी लिग, कूपर पार्टी, इंडीपेंडंट लेबर पार्टी व कम्युनिस्ट हे पक्ष अस्तित्वात होते. निवडणुकांच्या क्षेत्रात हिंदू महासभा प्रभावी नव्हती. मुस्लिम लिगचा प्रभाव पाकिस्तानची मागणी करणाऱ्यांमध्ये मर्यादित होता.[६३]

**सन १९४२ चा लढा व साताऱ्याचे पत्री सरकार (प्रति सरकार)** :-

क्रिप्स मिशनने कोणतेही ठोस पर्याय मांडले नाहीत असे जाहीर होताच संपूर्ण भारतभर राजकीय वातावरण बदलू लागले. सातारा जिल्ह्यातही हेच अनुभवास येऊ लागले. जनआंदोलना करीता संघटना बांधणीचे कार्य जोरात सुरू करण्यात आले. परंतु द्वितीय महायुध्द चालू असल्याने हे आंदोलन चिरडले जाणार असा युक्तिवाद मांडला जावू लागला. त्यामुळे भूमिगत आंदोलनाची संघटना उभारण्याचा पर्याय सातारकरांनी स्विकारला. राष्ट्रीय कॉंग्रेसच्या समितीने 'छोडो भारत' ठराव मंजूर केला त्याच दिवशी मुंबईतच सातारकरांच्या भूमिगत कारवायांचा प्रारंभ झाला. अच्युतराव पटवर्धन व शिरूभाऊ लिमये हे क्रांतिसिंह नाना पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांना मार्गदर्शन करत होते. मुंबई येथील कॉंग्रेसच्या अधिवेशनास गेलेले कार्यकर्ते मुंबईतूनच भूमिगत झाले. त्यामुळे त्यांना अटक झाली नाही व साताऱ्यातील हे आंदोलन इतर ठिकाणांपेक्षा जास्त दीर्घकाळ कोणत्याही नेतृत्वाशिवाय चालू राहिल्याचे दिसते. त्यांना नेतृत्वाची फारशी उणिव भासली नाही. सातारा जिल्हा आणि इतर ठिकाणच्या लढ्यांमधील हा फरक फारच स्पष्टपणे दिसून येतो.[६४] श्री. यशवंतराव चव्हाण मुंबईच्या क्रांतिकारी अधिवेशनातील जनक्रांतीचे मत्रं तंत्र नि सूत्र घेऊन कराडला आले होते. त्यांनी श्री.नारायणराव घाटगे, श्री.शांताराम इनामदार, श्री.वामनराव फडके वकिल यांच्याशी नव्या योजनेची चर्चा केली. कवठे, तांबवे, येळगांव येथील कार्यकर्त्यांच्या गाठी घेतल्या. कधी बैलगाडी, कधी सायकल, कधी मोटार सायकल तर कधी पायी प्रवास चालू होता. कवठ्यालाच श्री.किसन वीरांच्याकडे त्यांची पहिली जाहीर सभा झाली.[६५]

ऑगस्ट १९४२ च्या अखिल भारतीय कॉंग्रेसच्या अधिवेशनातील ठरावानुसार किर्लोस्करवाडी येथील कारखान्यात क्रांतिसिंह नाना पाटलांनी संप घडवून आणला. सातारा जिल्ह्यात यावेळचा पहिला मोर्चा कराडच्या मामलेदार कचेरीवर काढण्याचे ठरले. या मोर्चाचे नेतृत्व कॉंग्रेसचे धडाडीचे व ध्येयवादी प्रमुख कार्यकर्ते श्री.बाळकृष्ण उर्फ श्री. दादासाहेब पाटील उंडाळकर यांनी करावे असे ठरले.[६६] यावेळी त्यांच्यासोबत श्री.काशिनाथ राजाराम देशमुख, श्री.ल. ग. कुलकर्णी तथा कासेगावकर वैद्य, यशवंतराव चव्हाण इ. होते.[६७]

कराडच्या मोर्चाप्रमाणेच मामलेदार बुवा म्हाशवीकर यांनी पाटणच्या मामलेदार कचेरीवर मोर्चा नेला.[६८] या काळात सातारा जिल्ह्यात गाजलेला मोर्चा तासगांव येथील होता. ३ सप्टेंबर

१९४२ रोजी झालेल्या या मोर्चाचे क्रांतिसिंह नाना पाटलांनी या मोर्चाचे पूर्ण नियोजन करून यांचे नेतृत्व स्वत:कडे न घेता कृष्णा रामा कुऱ्हाडे, वि. स. पागे, गोविंद खोत, डॉ. सोहनी यांच्याकडे सोपवले होते. या मोर्चाला अटकाव करण्याचा प्रयत्न तेथील मामलेदाराने केला परंतु ते त्याला जमले नाही. उलट आपल्या कार्यालयाचा दरवाजा उघडून कार्यालयावर काँग्रेसचा झेंडा फडकवून झेंडावंदन करू दिले, पुढाऱ्यांसोबत राष्ट्रीय घोषणा दिल्या तसेच तत्पूर्वी अटक झालेल्या स्वातंत्र्य सैनिकांना मोर्चाच्या पुढाऱ्यांना भेटण्याची परवानी देणे या गोष्टी त्याला कराव्या लागल्या. तासगांव येथील तालुका न्यायाधीशास सुध्दा खादी टोपी परिधान करणे, राष्ट्रीय घोषणा देणे व देण्याचे आश्वासान देणे भाग पडले.[६९]

सातारा जिल्ह्यात रेल्वे गाडी रूळावरून घसरवण्याची पहिली घटना वाठार रेल्वे स्थानका जवळ घडली व पुढे अशा घटना जिल्ह्यात वारंवार घडू लागल्या. शांततेने सरकार विरोधातील राग व्यक्त करणे हळूहळू अशक्य होऊ लागल्याने आता हिंसाचार होऊ लागला व ऑक्टोबरपासून भूमिगत चळवळीस जोर वाढला. राष्ट्रीय कार्यासाठी हवा असणारा पैसा आता दरोडे घालून मिळवण्यात येऊ लागला. क्रांतिसिंह नाना पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांची अशा दरोड्यांना अनुमती असल्याने याविरुध्द पोलिसांकडे तक्रार करीत नसत.[७०] क्रांतिसिंह नाना पाटलांनी औंध संस्थानातील सावळज येथील पोलिस चौकी जिंकून घेण्याचा प्रयत्न देखील या काळात केला होता परंतु तो अयशस्वी झाला.[७१] सावळज नंतर थोड्याच दिवसात वाईचे दिवाणी न्यायालय व मल्हारपेठचा डाक बंगला जाळण्यात आला.[७२]

डिसेंबर १९४२ पासून सातारा जिल्ह्यामधील घातपाती कृत्ये वाढू लागली. ब्रिटीश अधिकाराखालील शेणोली आणि तत्कालीन जमखिंडी संस्थानातील व सध्याच्या सातारा जिल्ह्यातील शिरवडे ही रेल्वे स्थानके जाळून टाकली गेली. शिरवडे येथून स्वातंत्र्य सैनिकांनी सरकारी बंदूका आणि दारूगोळा हस्तगत केला. स्वातंत्र्य सैनिकांनी पोस्टाच्या थैल्या व मनीऑर्डरींच्या रक्कमा नेणाऱ्या पोस्टमनवर चढाई करूनही पैसे मिळवले होते.[७३] त्याच दिवशी वडूज येथेही असाच मोर्चा काढण्यात आलेला होता. औंध, खटाव भागातील शेतकऱ्यांना एकत्रित करून पैलवान परशुराम घार्गे यांनी या मोर्चाचे नेतृत्व केले. दोन–तीन हजारांचा शिस्तबध्द मोर्चा वडूजच्या मामलेदार कचेरीवर पोहचला. महात्मा गांधी की जय, वंदे मातरम, भारत माता की जय या घोषणांनी सारा आसमंत दणाणून गेला. मोर्चा कचेरीपासून अवघ्या

१०० फुटांवर आला तेव्हा फौजदार व मामलेदार यांनी पुढे आलात तर गोळ्या घालू, परत जा असे सांगितले. परंतु 'कचेरीवर तिरंगा फडकावणारच' असा पक्का निर्धार करून परशुराम घार्गे पुढे सरसावले. इंग्रजांनी अमानुष गोळीबार केला. या गोळीबारात परशुराम घार्गे, किसन बाळा भोसले, रामू कृष्णा सुतार, बाळकृष्ण दिगंबर खटावकर, बलभीम हरी खटावर, आनंदा श्रीपती गायकवाड, सिदू भिवा पवार, खाशाबा मारुती शिंदे आणि श्रीरंग भाऊ शिंदे शहीद झाले. शेकडो लोक जखमी झाले.[७४] वडूज आणि इस्लामपूरच्या मोर्चांनी स्वातंत्र्य आंदोलकांना धडा मिळाला. यामुळे नि:शस्त्र व सत्याग्रही स्वरूपाचा लढा थांबवण्याचा विचार पुढे आला. सप्टेंबरच्या अखेरीस क्रांतिसिंह नाना पाटलांनी कुंडल येथे काही प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक घेतली. सर्वांनी भूमिगत राहूनच कार्य चालू ठेवण्याचा निर्णय या बैठकीत झाला.[७५]

सातारा जिल्ह्यातील नेत्यांनी व्यवस्थितपणे हा लढा चालवण्यासाठी कार्यकर्त्यांचे पाच गट तयार केले. यापैकी कुंडल गटाचे नेतृत्व क्रांतिसिंह नाना पाटलांकडे होते. या गटांनी टेलिफोन व टेलिग्राफच्या तारा तोडणे, रेल्वे रूळ उखडणे, रेल्वेवर दरोडे घालणे, रेल्वे स्थानके जाळणे, पोष्टाच्या बॅगा हस्तगत करणे, पोलिसांची हत्यारे व दारूगोळा हस्तगत करून त्यांचा सरकारी यंत्रणा निकामी करण्यासाठी उपयोग करणे अशी कृत्ये केली. मार्च १९४३ मध्ये या भूमिगतांच्या प्रमुख कार्यकर्त्यांची कुंडल येथे बैठक झाली. घातपाती व विनाशकारी कृत्ये न करता विधायक कार्यावर भर देण्याचे यामध्ये ठरले. म. गांधींनी १० फेब्रुवारी ते ३ मार्च १९४३ मध्ये २१ दिवसांचे प्रदीर्घ उपोषण करून सरकारचा निषेध केला होता.[७६] त्या पार्श्वभूमीवर मुंबईत भूमिगत संचालनालयाची गोपनीय बैठक झाली. त्यातही विधायक कार्यावर भर द्यावा असे ठरले. त्यानुसार क्रांतिसिंह नाना पाटलांनी प्रति सरकारची योजना आखली.

याच सुमारास पोलिसांनी काँग्रेसची चळवळ बदनाम करण्यासाठी गुन्हेगारांना हाताशी धरले. सराईत गुन्हेगार आणि दरोडेखोर काँग्रेस व क्रांतिसिंह नाना पाटलांच्या नावाने दरोडे घालू लागले. युध्दजन्य परिस्थिती, अभूतपूर्व महागाई, अन्नधान्याच्या तुटवडा, त्यातच काही तालुक्यांमधील दुष्काळजन्य परिस्थिती या आर्थिक समस्यांनी जनता गांजलेली असतानाच आता त्यात दरोडेखोरांचा उपद्रव यामुळे सर्वत्र असंतोष पसरला. लोक न्याय व संरक्षणासाठी काँग्रेसकडे अपेक्षेने पाहू लागले. जनतेची अपेक्षा पूर्ण करण्यासाठी काँग्रेसने समांतर शासन यंत्रणा संघटीत केली आणि साठेबाजी करणाऱ्यांचे धोन्याचे साठे, कर्जबाजारी लोकांचे शोषण

करणाऱ्या सावकारांचे धन, रेशनच्या दुकानांमधील धान्य व इतर वस्तूंचा काळाबाजार करणाऱ्यांचे साठे हस्तगत करण्यासाठी काँग्रेसची समांतर शासन यंत्रणा कार्यरत झाली.[७७] क्रांतिसिंह नाना पाटलांना पकडण्यासाठी पोलिसांनी विविध मार्गाचा अवलंब केला. परंतु लोकांची पोलिसांना कोणतीही मदत होत नव्हती. ४ जानेवारी १९४३ रोजीच्या हल्ल्यात मात्र क्रांतिसिंह नाना पाटलांचा संबंध असूनही लोकांनी पोलिसांना मदत केली व काही स्वातंत्र्य सैनिकांना पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले. यामुळे सरकार संतुष्ट झाले व गावातील जमीन मालकांना त्या वर्षीच्या जमीन महसूलात तात्काळ सूट दिली. याचा अर्थ काही लोक सरकारला सक्रिय मदत करीत होते.[७८]

प्रतिकूल स्थितीतही स्वातंत्र्यसैनिकांनी आपले भूमिगत आंदोलन चालूच ठेवले होते. १ नोव्हेंबर १९४२ रोजी किसन वीरांनी येरवडा तुरूंगातून पलायन केले. सातारच्या भूमिगत आंदोलनातील प्रमुख पुढारी मधून–मधून एकत्र येत व आंदोलनाचा आढावा घेत. मार्च–एप्रिलमध्ये एक असा विचार मांडला गेला की दहशतवादी आंदोलन आता थांबवावे या विचाराचा पुरस्कार करणाऱ्यांमध्ये श्री.यशवंतराव चव्हाण प्रमुख होते. मात्र हा विचार इतरांना मान्य नव्हता. त्यातच १७ मे १९४३ रोजी फलटणमध्ये श्री.यशवंतराव चव्हाणच पकडले गेले.[७९]

१ जून १९४३ रोजी कामरी येथे किसन वीर यांनी भूमिगत नेत्यांची बैठक झाली व या बैठकीत प्रतिसरकारचा रीतसर प्रारंभ करण्यात आला.[८०] ७ जून १९४३ रोजी बिचूद व शेणोली स्थानकांदरम्यानच्या खिंडीजवळ पगाराची रक्कम घेऊन जाणारी 'पे स्पेशल ट्रेन' लुटण्यात आली. सांगली येथे एका घरात वसंतदादा पाटील यांना २२ जून १९४३ रोजी अटक झाली. परंतु २२ जुलै १९४३ रोजी सांगली मध्यवर्ती कारागृहातून पलायन केले. काही सरकारनिष्ठ लोक मुख्यत्वे पोलिस पाटील भूमिगत सैनिकांची माहिती पोलिसांना पुरवत, यांचा समाचार घेण्यासाठी प्रतिसरकारचे कार्यकर्ते वेगळ्या पध्दतीचा अवलंब करीत असत. ते पोलिसांच्या खबऱ्यांच्या तळपायावर मिठाचे पाणी ओतून काठीचे तडाखे मारीत. शिक्षेचा हा प्रकार पत्री लावणे या नावानरे ओळखला जाई. म्हणूनच 'प्रति सरकार' ला अपभ्रंशाने 'पत्री सरकार' हे नाव मिळाले.

या प्रति सरकार किंवा पत्री सरकारने लोकन्यायालये स्थापून अनेक लोकांचे तंटेबखेडे सामोपचाराने सोडवले. मद्य विक्री दुकाने बंद करावयास लावली. सावकारांनी लुबाडलेल्या

शेतकऱ्यांच्या जमिनी या यंत्रणेने शेती मालकांना परत मिळवून दिल्या. हे प्रतिसरकार 'स्वतंत्र भारत' नावाचे पाक्षिक प्रकाशित करीत व त्यातून संघटनेची माहिती, वैचारिक लेख देत असे. त्यांच्या या कार्यामुळे जनतेचा पाठिंबा त्यांना मिळत असे. यास्तवच हे सरकार १ जून १९४३ पासून १३ जून १९४६ पर्यंत कार्यरत राहू शकले.

जून १९४५ मध्ये प्रमुख भारतीय नेत्यांना सरकारने मुक्त केले आणि सिमला परिषदेचे नियोजन झाले. मात्र ही परिषद फिसकटल्याने पुन्हा अनिश्चिततेचे वातावरण निर्माण झाले. साताऱ्यात 'प्रतिसरकार'चे कार्य अजूनही जोमाने चालू होते. सातारच्या या आंदोलनाचा पोलिसांना बीमोड करता येत नव्हता. सातारा जिल्ह्यातील अधिकृत काँग्रेस संघटनेला हे आंदोलन थांबवावे असे वाटत होते. मात्र घातपाताचा निषेध करण्यास ते धजत नव्हते. दरम्यान निवडणूका झाल्या व काँग्रेसाचे सत्ता हाती घेतली. बाळासाहेब खेरांच्या शासनाने राजकीय बंदीवानांना मुक्त केले. दिनांक ५ मे १९४६ रोजी महत्त्वाचे भूमिगत नेते प्रकट झाले, १३ जून १९४६ रोजी न्यायदान मंडळाचे कामकाज बंद केले गेले.[८१] अशा रितीने साताऱ्याचे प्रतिसरकारचे कार्य समाप्त झाले. या साताऱ्यातील प्रतिसरकारचे व समांतर शासन यंत्रणेचे प्रमुख क्रांतिसिंह नाना पाटील यांनी पुढे समाजवादी चळवळीस वाहून घेतले.

**क) सामाजिक व शैक्षणिक चळवळी** :-

स्वातंत्र्य समतावादाच्या व वैचारिक अधिष्ठानावर सामाजिक संबंध प्रस्थापित करणाऱ्या अनेक सामाजिक चळवळी महाराष्ट्रात निर्माण झाल्या. या सर्व चळवळी कोणत्या ना कोणत्या स्वरूपात साताऱ्याशी निगडीत झालेल्या होत्या. कर्मठ व सनातनी विचारसरणी आणि अन्यायी रूढी परंपरा, आचार धर्म तसेच पुरोहित वर्गाचे वर्चस्व यामुळे समाजात अव्यवस्था माजलेली असताना सामाजिक व धार्मिक परिवर्तनाचा पुरस्कार करणारी विचारसरणी प्रसारित करणारा व वैदिक धर्माचे अंधानुकरण, अपभ्रष्ट कर्मठपणा यावर हल्ला करणारा सत्यशोधक समाज महात्मा फुल्यांनी स्थापन केला.

२४ सप्टेंबर १८७३ रोजी म. फुल्यांचा कटगुण जिल्हा सातारा येथे जन्म झाला. त्यांचा परंपरागत व्यवसाय फुलांचा असल्याने त्यांचे आडनावही फुले झालेले होते. समाजातील प्रतिगामी व्यवस्थेला विरोध करण्यासाठी तसेच समाजातील दुर्बल वर्गाला सामाजिक न्याय मिळवून देण्याच्या उद्देशाने म. फुल्यांनी सन १८७३ मध्ये सत्यशोधक समाजाची स्थापना

केली.[८२] म. फुल्यांचे अनेक अनुयायी सातारा जिल्ह्यात होते. दहिवडी सारख्या ठिकाणी ही धोंडीराम कुंभार यांच्यासारखे सत्यशोधक समाजाचे माहितगार व्यक्ती या काळात होते. म. फुल्यांच्या निधनानंतर मात्र साताऱ्यातील ही चळवळ थंडावली. कोल्हापूरात मात्र छ. शाहू महाराजांच्या आश्रयात ही चळवळ वाढत होती. त्याच वेळी महाराजांच्या दरबारातील एका गटाने आण्णा लठ्ठे आणि कर्मवीर भाऊराव पाटील यांना एका कारस्थानात गोवण्याचा प्रयत्न केला. परिणामी आण्णा लठ्ठे कोल्हापूर सोडून गेले. भास्करराव जाधवही सन १९२१ नंतर साताऱ्यास आले. या काळात साताऱ्यात पुन्हा सत्यशोधक चळचळ फोफावू लागली असल्याचे दिसते. सातारा जिल्हा सत्यशोधक समाजाचे चिटणीस यावेळी बाळकृष्ण नानासाहेब फाळके होते.[८३] कर्मवीर भाऊराव पाटलांचा सत्यशोधकी जलसा शेकडो लोकांचा जमाव खेचीत असे. सत्यशोधक विचार, लोकहीत आणि धर्मनिरपेक्षता यांचा पुरस्कार करणारे कर्मवीर व त्यांचे सहकारी सत्यशोधक चळवळ जोमाने चालवत होते. स्वाभाविकपणे त्यांना कर्मठांच्या विरोधाला सामोरे जावे लागत होते. याच काळात भास्करराव जाधवांसारखे सुशिक्षित ही या चळवळीत मोलाची साथ देत होते. पुढे सातारा जिल्ह्यातील सत्यशोधकांनी ब्राह्मणांशी असहकार केला. त्यांच्या मालकीच्या जमिनी खंडाने कसण्यास ब्राह्मणेतर कुळे नकार देऊ लागली. घरगुती धार्मिक विधीकरीता ब्राह्मणांना बोलावणे बंद केले. पाटण तालुक्यातील गारवडे येथे फेब्रुवारी १९२१ मध्ये सत्यशोधकी जलसा झाल्यानंतर सामाजिक ताणाव निर्माण झाला. परिस्थिती इतकी बिघडली की, सरदार मुतालिक, दादासाहेब करंदीकर, भाऊसाहेब सोमण, सदाशिव आळतेकर आणि सीताराम पाटील या पाच प्रतिष्ठीत पुढाऱ्यांना याची चौकशी करावी लागली.[८४]

सत्यशोधक जलसांप्रमाणेच सत्यशोधक तमाशा सुध्दा या कालखंडात निर्माण झाला. सन १९२५ मध्ये काले येथील रामचंद्र घाटगे यांनी सत्यशोधक तमाशा स्थापन केला. अल्पावधीतच अनेक ठिकाणी असे तमाशे निर्माण झाले. इ. स. १९२५ मध्ये पश्चिम महाराष्ट्रातील अस्तित्वात असणाऱ्या २४ व सत्यशोधक तमाशांपैकी १२ सातारा जिल्ह्यातील होते. या तमाशांमधून आधुनिक शास्त्र व शिक्षण यांचा पुरस्कार करण्यात येई. काही तमाशांमधून अस्पृश्यतेच्या प्रथेवर हल्ला केल्याचेही दिसून येते.[८५] या सत्यशोधक चळवळीमध्ये कर्मवीर भाऊराव पाटील, भास्करराव जाधव, केशवराव जेधे, खंडेराव बागल, केशवराव विचारे अशा अनेक विचारवंतांनी आपले योगदान दिलेले आढळते.

**रयत शिक्षण संस्था :–**

सत्यशोधक चळवळीसोबतच कर्मवीर भाऊराव पाटीलांनी एक वेगळा रचनात्मक कार्यक्रम हाती घेतला. अस्पृश्यता निवारण व बहुजन समाजाची सुधारणा या कार्यावर त्यांनी भर दिलेला होता. सामुदायिक शिक्षणाशिवाय याबाबी साध्य होणार नाही हे त्यांनी लवकरच ओळखले आणि शैक्षणिक विकास कार्यास त्यांनी वाहून घेतले. सन १९१९ मध्ये त्यांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली व बहुजन वर्गाला शिक्षणाचे दार उघडले. कर्मवीरांच्यावर म.गांधीजींच्या विचारांचा प्रभाव होता. त्यातूनच त्यांनी आजीवन खादी वापरण्याची व अनवाणी चालण्याची शपथ घेतली.[८६] कर्मवीरांनी विद्यार्थ्यांच्यासाठी वसतीगृहे सुरू केली. कमवा व शिका योजना राबवली. श्रम, स्वावलंबन, समता ही तत्त्वत्रयी स्वावलंबन, स्वाभिमान, स्वाध्याय व स्वातंत्र्य ही शिक्षणाची चतु:सूत्री राबवून मुलांच्या मनात सामाजिक समता, सर्वधर्मसमभाव व राष्ट्रप्रेम निर्माण केले.

'प्रत्येक खेड्यात, प्रत्येक वाडीत व प्रत्येक वस्तीच्या ठिकाणी शाळा असणे आवश्यक आहे' असे त्यांचे मत होते. त्यामुळेच त्यांनी व्हालंटरी शाळा काढल्या. विद्यार्थ्यांना माध्यमिक शिक्षण मोफत व चांगले मिळावे म्हणून हायस्कूल उभारली. बहुजन वर्गाच्या मुलांना उच्च शिक्षण मिळावे यासाठी त्यांनी अनेक महाविद्यालये रयत शिक्षण संस्थेच्या मार्फत उभारली. बहुजन मुलांचे शिक्षण पूर्ण व्हावे म्हणून त्यांनी या शैक्षणिक सोयींच्या सोबत वसतीगृहांचीही उभारणी केली. त्यांच्या या कार्यात त्यांच्या पत्नी लक्ष्मीबाई यांनीही त्यांना मोलाची साथ दिली.

कर्मवीरांच्या सोबत काही काळ असणारे शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे यांनीही श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था स्थापन करून सातारा जिल्ह्यात तिच्यामार्फत काही योगदान दिलेले आढळते. अशा विचारवंतांमुळेच खऱ्या अर्थाने सातारा जिल्ह्याची सर्वांगिण प्रगती झालेली आपणास दिसून येते.

## संदर्भ


१. काळे व्ही.सी, सातारा जिल्ह्यातील किल्ल्यांचे मराठा स्वातंत्र्य युध्दातील ऐतिहासिक महत्त्व १६८९–१९०७, एम. फिल. प्रबंध, टि. म. वि. पुणे, २००८, पृ. २

२. पाठक ए. एस. (संपा.) सातारा जिल्हा गॅझेटीकर, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९९९, पृ. ८२.

३. काळे व्ही.सी, पुर्वोक्त, पृ. २.

४. पाठक ए. एस., पुर्वोक्त, पृ. ८७.

५. बहुलेकर बाळासाहेब, आपला सातारा, मावळा प्रकाशन, सातारा, १९९४, पृ. १७.

६. पाठक ए. ए., पुर्वोक्त, पृ. १६२.

७. कित्ता, पृ. १६३.

८. ठाकरे के. एस., प्रतापसिंह छत्रपती आणि रंगो बापूजी, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मडळ, मुंबई, १९४८, पृ. ८०.

९. पाठक ए. एस., पुर्वोक्त, पृ. १६३, १६४.

१०. कित्ता, पृ. १६६.

११. सरदेसाई गो. स., मराठी रियासत (सुधारित आवत्ती), पॉप्युलर प्रकाशन, खंड ८, मुंबई, १९९२, पृ. ६४८.

१२. पाठक ए. एस., पुर्वोक्त, पृ. १७०.

१३. कित्ता, पृ. १७१

१४. ठाकरे के. एस., पुर्वोक्त, पृ. ३५८, ३५९.

१५. कित्ता, पृ. ३६०.

१६. पाठक ए. एस., पुर्वोक्त, पृ. १७१, १७२.

१७. बहुलेकर बाळासाहेब, पुर्वोक्त, पृ. ५६.

१८. सोर्स मटेरिअल फॉर अ हिस्ट्री ऑफ फ्रिडम मुव्हमेंट इन इंडिया खंड–१, १८१८–१८८५, मुंबई, शासन, १९५७, पृ. ३९७.

१९. बहुलेकर बाळासाहेब, पुर्वोक्त, पृ. ५८.

२०. कित्ता, पृ. ५९.

२१. पाठक, ए. एस., पुर्वोक्त, पृ. १७५.

२२. कित्ता, पृ. १७५.

२३. केळकर न. चिं., गतगोष्टी, यवतमाळ, पृ. २१३.

२४. पाठक ए. एस., पुर्वोक्त, पृ. १७६.

२५. बहुलेकर बाळासाहेब, पुर्वोक्त, पृ. ६५.

२६. कराड नगरपालिका शतसांवत्सरिक स्मृतीग्रंथ १८५५–१९५५, कराड नगरपालिका, १९५५, पृ. १४९.

२७. पाटणे संभाजीराव, स्वातंत्र्य संग्रामातील सातारा जिल्हा, भि. दा. भिलारे गुरूजी, संयोजक ऑगस्ट क्रांती सुवर्ण महोत्सव समिती सातारा, १९९२, सातारा, पृ. १६.

२८. गोखले पु. पां., जागतृ सातारा, कराड, १९३५, पृ. २८, २९.

२९. पाटणे संभाजीराव, पुर्वोक्त, पृ. १६.

३०. पाठक ए. एस., पुर्वोक्त, पृ. १७८.

३१. गोखले पु. पां., पुर्वोक्त, पृ. ६३.

३२. पाठक ए. एस., पुर्वोक्त, पृ. १७८.

३३. गोखले पु. पां., पुर्वोक्त, पृ. ५६.

३४. पाठक ए. एस., पुर्वोक्त, पृ. १७९.

३५. कॅशमैन रिचर्ड, दि मिथ ऑफ दि लोकमान्य : टिळक ॲण्ड मास पौलिटीक्स इन महाराष्ट्र, युनिव्हर्सिटी ऑफ कॅलिफोर्निया प्रेस, कॅलिफोर्निया, १९७५, पृ. २२६.

३६. फडके य. दि., विसाव्या शतकातील महाराष्ट्र, श्री विद्या प्रकाशन, पुणे, १९८९, पृ.१०४.

३७. कित्ता, पृ. १०४.

३८. कित्ता, पृ. २४७.

३९. पाठक ए. एस., पुर्वोक्त, पृ. १८०.

४०. गोखले पु. पां., पुर्वोक्त, पृ. ६९.

४१. कित्ता, पृ. ६९.

४२. पाठक ए. एस., पुर्वोक्त, पृ. १८१.

४३. कित्ता, पृ. १८१.

४४. कित्ता, पृ. १८६.

४५. गोखले पु. पां., पुर्वोक्त, पृ. ८४, ९५.

४६. पाटणे संभाजीराव, पुर्वोक्त, पृ. १९, २०.

४७. पाठक ए. एस., पुर्वोक्त, पृ. १८८.

४८. गोखले पु. पां., पुर्वोक्त, पृ. ८४, ९५.

४९. पाठक ए. एस., पुर्वोक्त, पृ. १८९.

५०. फडके य. दि., पुर्वोक्त, खंड ३, १९९१, पृ. २३६.

५१. कराड नगरपालिका शतसांवत्सरिक स्मृतिग्रंथ १८५५–१९५५, कराड नगरपालिका, कराड, १९५५, पृ. १५२.

५२. चौधरी के. के. (संपा.) सोर्स मटेरिअल फॉर हिस्ट्री ऑफ फ्रिडम मुव्हमेंट महाराष्ट्र शासन, मुंबई, खंड ११, १९९०, पृ. ६०३.

५३. पाटणे संभाजीराव, पुर्वोक्त, पृ. २२.

५४. कित्ता, पृ. २२.

५५. पाठक ए. एस., पुर्वोक्त, पृ. १९५.

५६. गोखले पु. पां., पुर्वोक्त, पृ. १४२ – १५६.

५७. पाठक ए. एस., पुर्वोक्त, पृ. १९६.

५८. कित्ता, पृ. १९७, १९८.

५९. कित्ता, पृ. १९७, १९८.

६०. कित्ता, पृ. २०२.

६१. कित्ता, पृ. २०२.

६२. कित्ता, पृ. २०२, २०३.

६३. कित्ता, पृ. २०३.

६४. कित्ता, पृ. २०४.

६५. पाटणे संभाजीराव, पुर्वोक्त, पृ. ३३, ३४.

६६. कित्ता, पृ. ३५.

६७. पाठक ए. एस., पुर्वोक्त, पृ. २०७.

६८. पाटणे संभाजीराव, पुर्वोक्त, पृ. ३६.

६९. पाठक ए. एस., पुर्वोक्त, पृ. २०७.

७०. कित्ता, पृ.२०८.

७१. कित्ता, पृ. २०८.

७२. कित्ता, पृ. २०८.

७३. कित्ता, पृ. २०८, २०९.

७४. पाटणे संभाजीराव, स्वातंत्र्य संग्रामातील सातारा जिल्हा, भि. दा. गुरुजी, संयोजन ऑगस्ट क्रांती सुवर्णमहोत्सव समिती, सातारा, १९९२, पृ. ३७.

७५. पाटील उत्तमराव – लाड आप्पासाहेब, क्रांतिवीर नाना पाटील, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ; मुंबई, १९८७, पृ. ८४, ८५.

७६. चौधरी के. के., हिस्ट्री ऑफ बॉम्बे : मॉडर्न पिरियड, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८७, पृ. २९८, २९९.

७७. पाठक ए. एस., पुर्वोक्त, पृ. २११.

७८. कित्ता, पृ. २११, २१२.

७९. कित्ता, पृ. २१२

८०. कित्ता, पृ. २१२.

८१. कित्ता, पृ. २१७

८२. ग्रोव्हर बी. एल., बेल्हेकर एन. के., आधुनिक भारताचा इतिहास, एस. चांद ॲण्ड कंपनी पब्लिकेशन, नवी दिल्ली, २००३, पृ. २०५

# प्रकरण दुसरे

# स्वातंत्र्योत्तरकालीन साताऱ्यातील राजकीय घडामोडी

## प्रस्तावना :

महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये सातारा जिल्हयाला महत्वाचे स्थान आहे. भारतीय स्वातंत्र्य चळवळीत सातारा जिल्हयाने महत्त्वपूर्ण भुमिका बजावली आहे. सन १९४२ च्या लढयामध्ये क्रांतीसिंह नाना पाटील व अन्य प्रभूतींनी चळवळीत भाग घेऊन साताऱ्याचे योगदान सिध्द केले आहे. त्याचप्रमाणे स्वातंत्र्योत्तर कालखंडातही महाराष्ट्राच्याच नव्हे, तर देशाच्या राजकारणामध्ये सातारा जिल्हयाचे नाव घेतले जात होते. सातारा जिल्हा हा स्वातंत्र्यपूर्व कालखंडामध्ये फार विस्तारित होता किंवा मुंबई प्रांतामध्ये आजच्या सांगली व सातारा या दोन जिल्हयांचा मिळून सातारा जिल्हा होत होता. स्वातंत्र्यानंतर या एवढया मोठया प्रदेशाचे प्रशासन करणे जड जाऊ लागल्यानंतर या सातारा जिल्हयाचे १ ऑगस्ट १९४९ रोजी विभाजन करण्यात आले. उत्तर सातारा व दक्षिण सातारा असे दोन वेगवेगळे जिल्हे अस्तित्वात आले.

सातारा जिल्हयाच्या प्रशासनाचा आढावा घेतला असता आपणास हे जाणवते की, पेशवाईच्या अंतानंतर १८१९ मध्ये छत्रपती प्रतापसिंह यांस ब्रिटिशांनी अधिकार प्रदान केले. प्रतापसिंहाच्या अंमलाखालील प्रदेश ११ महालामध्ये विभागलेला होता. त्यामध्ये सातारा, जावळी, तारगाव, कराड, वाळवा, वाई, कोरेगाव, पंढरपूर, खटाव, खानापूर आणि विजापूर महालाचा समावेश होता. हे ११ महाल सातारा व पंढरपूर सुभ्यांमध्ये समाविष्ट करण्यात आले होते. सातारा, जावळी, तारगांव, कराड, वाळवा, वाई व कोरेगाव या सात महालांवर साताऱ्याच्या सरसुभेदाराचा अंमल होता. खटाव, खानापूर, पंढरपूर आणि विजापूर या चार महालांवर पंढरपूरच्या सरसुभेदाराचा अंमल होता. त्यावेळी सरसुभेदार व मामलेदार हे प्रमुख शासकीय अधिकारी होते. मामलेदार हे महालाचा प्रमुख  असे व त्याच्या हाताखाली शिरस्तेदार हा मदतनीस म्हणून असे.[१] त्यानंतर १८२९ मध्ये साताऱ्याच्या राजाने प्रतापगडाच्या बदल्यात महाबळेश्वरमधील तीन खेडी ब्रिटिशांच्या स्वाधीन केली. जिल्हयाच्या इतर विभागांवर त्या त्या विभाग प्रमुखाच्या मृत्यूपरांत १८३७ आणि १८४८ दरम्यान ब्रिटिशांची सत्ता विजापूर, जावळी,

कराड, खानापूर, खटाव, कोरेगाव, पंढरपूर, सातारा, तारगाव, वाळवा आणि वाई अशा ११ विभागामध्ये विभागला होता. इ.स.१८५६ मध्ये जिल्हा पुनरीक्षणाच्यावेळी (Revision) या ११ उपविभागांव्यतिरिक्त १२ महाल किंवा लहान उपविभाग (Petty Divisions) स्थापन करण्यात आले.[२] प्रशासनीक सोयींसाठी १८६२ मध्ये पुन्हा जिल्हयाची पुनर्रचना करून ११ उपविभाग व १२ महालाऐवजी १४ उपविभाग व दोन लहान विभाग बनविण्यात आले. १९२७ मध्ये खंडाळा पेटा(महाल) रद्द करण्यात आला व माल्कमपेठ पेटयाचे नाव महाबळेश्वर ठेवण्यात आले. नंतर १९४७ मध्ये खंडाळा पेटयाची पुनर्रचना करण्यात आली. पूर्वी जिल्हयामध्ये फक्त तीन प्रांत किंवा उपविभाग होते. त्यामध्ये ११ तालुके व तीन महाल होते. दिनांक १ ऑगस्ट १९४९ रोजी संपूर्ण फलटण संस्थान तसेच भोर, औंध आणि जमखिंडी संस्थानातील काही गावे यामध्ये समाविष्ट करण्यात आली. याचवेळी खानापूर, वाळवा आणि तासगाव तालुके व शिराळा महाल नव्याने स्थापन झालेल्या दक्षिण सातारा(मुख्यालय सांगली, आता सांगली जिल्हा) जिल्हयात समाविष्ट करून उत्तरेकडील प्रदेशास उत्तर सातारा (आता सातारा) हे नाव देण्यात आले. संस्थानांच्या विलिनीकरणाच्या वेळी फलटण व वाई तालुके आणि खंडाळा महालाच्या सीमा पुन्हा बदलण्यात आल्या. नवीन प्रस्थापित झालेल्या सातारा जिल्हयाची तीन प्रांतांमध्ये विभागणी करण्यात आली. यामध्ये नऊ तालुके व दोन महाल होते.[३] सन १९६० मध्ये जिल्हयाचे उत्तर सातारा हे नाव बदलून सातारा असे ठेवण्यात आले. त्यावेळी जिल्हयात नऊ तालुके आणि दोन महाल होते. सन १९६२ ते ७१ या कालावधीत महालांची तालुक्यात श्रेणी वाढ झाल्याने तालुक्यांची संख्या ११ झाली व १९९६ अखेर ती कायम राहिली. या ठिकाणी स्वातंत्र्योत्तर सातारच्या राजकीय घडामोडी अभ्यासणार आहोत.

भारताला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी सन १९४६ साली झालेल्या सातारा जिल्हा लोकल बोर्डाच्या निवडणूकीत श्री.बाबासाहेब शिंदे(आखडकर), श्री.गौरीहर सिंहासने, श्री.गणपतराव तपासे, श्री.बुवासाहेब गोसावी, श्री.व्यंकटराव पवार, श्री.के.डी.पाटील, श्री.पुरूषोत्तम पांडुरंग तथा बाबुराव गोखले, श्री.यशवंतराव चव्हाण, श्री.सय्यद दादा मियॉ, श्री.विनायकराव थोरात आणि श्री.रामचंद्र मनोहर तथा रामभाऊ नलावडे या मंडळींनी विजय मिळवत या जिल्हा लोकल बोर्डाचे प्रतिनिधीत्व केलेले होते.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले आणि सातारा जिल्हयात सर्वत्र आनंदी आनंद झाला. अजिंक्यताऱ्यावर १५ ऑगस्ट १९४७ ला रात्री १२ वाजता राष्ट्रध्वज लावण्यात आला. गांधी मैदानावरील बागेत राष्ट्रध्वज डौलाने डोलू लागला. २० नोव्हेंबर १९४९ रोजी भारताचे तत्कालीन सरसेनापती जनरल करीअप्पा यांनी जिल्हयातील मुक्त झालेल्या सैनिकांना भेट दिली. त्यावेळचे जिल्हा लोकल बोर्डाचे अध्यक्ष श्री.बाळासाहेब देसाई यांनी पुढाकार घेतल्यामुळे त्यावेळी सातारला पंधरा हजार मुक्त सैनिकांचा मेळावा जमलेला होता. सन १९५१–५२ साली झालेल्या पहिल्याच सार्वत्रिक निवडणूकीने जिल्हयाचे राजकारणही ढवळून निघाले होते. मुंबई प्रांत त्रिभाषिक राज्यात १९५२ साली झालेल्या विधानसभा निवडणूकीच्या निमित्ताने पारतंत्र्यातील जनता स्वतंत्र होऊन प्रथमच मतदार बनली. पहिल्यांदाच लोकशाही प्रक्रियेव्दारे निवडणूका होत असल्याने लोकांमध्ये कमालीचे उत्साहाचे वातावरण होते. देशाच्या स्वातंत्र्यपुर्व काळापासून काँग्रेसची देशावर पकड असली तरीही सातारा जिल्हयात वेगळी परिस्थीती होती. इथे शेतकरी कामगार पक्षाची ताकद होती. महाराष्ट्र, गुजरात व कर्नाटक अशा त्रिभाषिक मुंबई प्रांताच्या या निवडणूकीचे पडसाद सातारा जिल्हयात उमटले होते.

स्वातंत्र्यानंतर प्रथमच लोकशाही मार्गाने लोकप्रतिनिधी निवडून देण्याच्या प्रक्रियेबाबत जनता अजाण होती. त्यामुळे मतदानाची टक्केवारी खूप कमी होती. जिल्हयात पुर्वी काँग्रेसने आपली मुळे घट्ट करण्याचा आणि भारतीय कम्युनिस्ट पक्षानेही आपले वर्चस्व कायम ठेवण्याचा प्रयत्न केला असला तरीही याचदरम्यान शेतकरी कामगार पक्ष स्थापन होऊन त्यामध्ये क्रांतीसिंह नाना पाटील, श्री.शंकरराव मोरे, श्री.केशवराव जेधे, कर्मवीर भाऊराव पाटील यासारखी अत्यंत जुणे जाणते नेतेमंडळी सहभागी झाल्यामुळे या काळात काँग्रेस पक्षात निर्माण झालेल्या पोकळीचा फायदा श्री.यशवंतराव चव्हाणांना मिळाला व त्यांचे काँग्रेस पक्षातील स्थान बळकट होत गेले. श्री.यशवंतराव चव्हाणांनी आलेल्या संधीचा फायदा घेऊन प्रथमतः सातारा जिल्हयामध्ये व नंतर महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये आपले स्थान बळकट केलेले या निवडणूकांमधून जाणवते. या विधानसभा निवडणूकीमध्ये सातारा जिल्हयातून एकूण दहा मतदारसंघातून एकूण अकरा आमदारांची निवड होणार होती. या निवडणूकीमध्ये फलटण माण मतदारसंघातून एक खुला व एक अनुसुचित जातीचा असे दोन उमेदवार निवडून देण्यात आले.

या अकरा आमदारांपैकी आठ आमदार कॉंग्रेस पक्षाचे, दोन शेकापचे तर एक कामगार किसान पक्षाचा उमेदवार निवडून आला. या विधानसभा निवडणूकीने श्री.मालोजीराजे निंबाळकर, श्री.यशंतराव चव्हाण, क्रांतिसिंह नाना पाटील, श्री.किसन वीर आबा, श्री.बाळासाहेब देसाई असे एकास एक नेते दिले. अत्यंत चुरशीने झालेल्या या निवडणूकांमध्ये श्री.किसन वीर आबा तसेच श्री.आनंदराव चव्हाण या तगडया उमेदवारांना पराभवाचा सामना करावा लागला. माण खटावमधील दुष्काळ हा त्यावेळच्या प्रचाराचा मुद्दा राहीला.फलटण आणि माण तालुक्यातील प्रत्येक मतदाराला दोन आमदार निवडून आणण्याचा विशेष अधिकार होता. त्यावेळी फलटण खुला तर माण राखीव होता. फलटणचे नाईक निंबाळकर घराण्यातील श्री.मालोजीराजे यांचा अपेक्षेप्रमाणे कॉंग्रेसमधून मोठा विजय झाला. त्याचवेळी सातारचे श्री.गणपतराव तपासे यांनी माणच्या राखीव जागेवर कॉंग्रेसमधून लढलेली ही निवडणूक त्यांच्या पथ्यावर पडली. पाटणच्या निवडणूकीत चुरस पहायला मिळाली होती. वकिली शिकलेल्या श्री.बाळासाहेब देसाईंना कॉंग्रसने तिकिट दिले. त्यांच्या विरोधात श्री.आनंदराव चव्हाण हे शेतकरी कामगार पक्षाकडून उभे होते.

श्री.आनंदराव चव्हाणांना त्यांच्याच कुंभारगावातील श्री.पी.एन.काकांनी कडवा विरोध केला आणि अत्यंत दुर्गम समजल्या जाणाया पाटण मतदारसंघातून श्री.बाळासाहेबांचा निसटता विजय झाला. सातारा विधानसभा मतदारसंघावर भारतीय कम्युनिस्ट पक्षाची मोठी पकड होती. क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या मुशीत तयार झालेले कार्यकर्ते निकराचा लढा देत होते. सातारमधील विधानसभा निवडणुकीचे तिकिट आपल्याला मिळणार अशी आशा हकिम मास्तर यांना होती. मात्र कॉंग्रेसने वयस्कर श्री.हकिम मास्तरांना डावलून श्री.रशूल इब्राहीम बागवान या तरूणाला तिकिट दिले. यांच्या विरोधात भारतीय कम्युनिस्ट पक्षाची उमेदवारी नानासाहेब तथा श्री.व्ही.एन.पाटील यांना उमेदवारी देण्यात आली. क्रांतिसिंह नाना पाटील, श्री.दत्ता देशमुख यांनी श्री.व्ही.एन्.पाटलांच्या प्रचाराची धुरा सांभाळली आणि त्यांना यश मिळाले.कराड दक्षिण आणि कराड उत्तर या मतदारसंघातही निवडणूक झाली. येथे शेतकरी कामगार पक्षाने श्री.केशवराव पवारांना उमेदवारी दिली त्याचवेळी कॉंग्रेसने श्री.यशवंतराव चव्हाणांना तिकीट दिले आणि ते निवडून आले. कराड दक्षिणची पहिली निवडणूक श्री.यशवंतराव मोहीते यांनी शेतकरी कामगार पक्षातून लढवली.येथे कॉंग्रेसने कॉं.संभाजीराव थोरात यांना उमेदवारी दिली

होती. तसेच डाव्या आघाडीच्यावतीने शेखकाकांनी निवडणूक लढवली. येथे श्री.यशवंतराव मोहीते मोठया मताधिक्याने निवडून आले. जावलीसारख्या अतिदुर्गम भागात श्री.बाबासाहेब आखाडकरांचे नेतृत्व स्वातंत्र्यपूर्वीच निर्माण झालेले होते. त्यामुळे सहाजिकच त्यांना काँग्रेसने उमेदवारी दिली. श्री.आखाडकरांनी शेतकरी कामगार पक्षाच्या श्री.मोरेंचा पराभव केला. सन १९५२ पासून वाई आणि खंडाळा या दोन्ही तालुक्यांचा एकच मतदारसंघ होता. येथे शेतकरी कामगार पक्षाने श्री.दादासाहेब जगताप यांना उमेदवारी दिली तर काँग्रेसने किसन वीरांना तिकीट दिले. किसन वीरांना राजकीय वलय असले तरीही या पहील्याच निवडणूकीत किसन वीरांना पराभवाचा सामना करावा लागलेला होता.खटाव विधानसभा मतदारसंघात काँग्रेसने श्री.तात्या जाधव यांना उमेदवारी दिली. माण व खटावातील दुष्काळ या प्रचाराच्या मुद्दयावरच त्यांनी ही निवडणूक जिंकली.

भारत १९४७ साली स्वतंत्र झाला परंतु सन १९५४ आले तरीही भारतातील गोवा, दीव दमण आदी भाग अजूनही वर्चस्वात होता. या प्रदेशाला मुक्त करण्यासाठी गोवा मुक्ती संग्राम समिती स्थापन करण्यात आली. सातारा येथे गोवा मुक्ती संग्राम समितीची शाखा द.रा.कुलकर्णी मास्तर यांचे अध्यक्षतेखाली सुरू झाली. बाळकृष्ण गणपतदास उर्फ बबनराव गुजर यांनी गोवा सत्याग्रहात तीन वेळा भाग घेतला. तुरुंगवास भोगला. या संग्रामात मकबुल रहमान शेख, नाथ घाणेकर आदीनींही भाग घेतला. श्री. नाथ घाणेकर तर यावेळी ८० वर्षांचे होते. १५ ऑगस्ट १९५५ रोजी गोवा मुक्ती सत्याग्रहाचे आयोजन करण्यात आले होते. या सत्याग्रहाला नाथ घाणेकरांच्या सोबत भाऊराव एकाबोटे आणि केशवराव सदाशिव साठे यांना देण्यात आले. या सत्याग्रहात गोवा सरहद्दीवर गोळीबारात तीन ठिकाणी १०० पेक्षा जास्त माणसे मृत्युमुखी पडली अशा प्रकारच्या बातम्या सातारमध्ये आली. १६ ऑगस्टला पहाटे निषेध करणारी फेरी काढण्यात आली. संध्याकाळी द.रा.कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेत गांधी मैदानावर सभा आयोजित करून हजारो लोकांनी निषेध केला.[४]

भारतात भाषावार प्रांतरचना करावी ही मागणी स्वातंत्र्यापुर्वीच काँग्रेस पक्षाने इंग्रजांकडे केली होती. परंतु स्वातंत्र्यप्राप्ती नंतरही अशी प्रांतरचना झाली नाही म्हणून महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसने मराठी भाषेसाठी महाराष्ट्र राज्यनिर्माण करण्याची मागणी काँग्रेस पक्षात मांडण्यास सुरूवात केली परंतू भारत सरकार आणि अखिल भारतीय काँग्रेस कार्यकारीणीने त्याला नकार

दिला. त्यामुळे मुंबई, बेळगांव, कारावार, निपाणीसह संयुक्त महाराष्ट्र निर्माण व्हावा यासाठी महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसने महाराष्ट्रात जाहीर सभा घेण्यास आरंभ केला. सन १९५६ साली सातारमध्ये गांधी मैदानावर काँग्रेस पक्षाच्या जाहीर सभेत काँग्रेसचे जुने जाणते नेते राजाराम केशव तथा राजाभाऊ पालकर व्यासपीठावर आले आणि म्हणाले की, संयुक्त महाराष्ट्र व्हावा याच मताचे आपण सर्वजण आहोत महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसने आवाहन केल्याप्रमाणे काँग्रेसजन आपआपल्या पदाचे राजीनामे देणार आहेत आताच सातार नगरपालिकेच्या सर्व सभासदांनी नगरपालिकेच्या सदस्यत्वाचे राजीनामे देण्याचा ठराव बिनविरोध मंजूर केला आहे. नगराध्यक्ष म्हणून सर्वांनी माझ्याकडे राजीनामे दिलेले आहेत. मी माझ्या राजीनाम्यासह सर्व राजीनामे माननीय जिल्हाधिकारी यांचेकडे सुपुर्त करणार आहे. अशा रितीने संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीसाठी राजीनामा देणारी सातरची नगरपालिका सर्वात पहिली आहे.[५]

महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसने सुरू केलेल्या या चळवळीला अखिल भारतीय काँग्रेसपक्षाने दम देऊन शांत करण्याचा प्रयत्न केला त्यावेळी काँग्रेसमधील महाराष्ट्रातील बडी नेतेमंडळी काँग्रेसपासून दुर झाली आणि काँग्रेसेतर सर्व पक्ष एकत्रित येऊन त्यांनी संयुक्त महाराष्ट्र समिती स्थापन केली. संयुक्त महाराष्ट्राच्या सातारा जिल्हा समितीचे अध्यक्षपदी व्ही.एन.पाटील यांची निवड झाली. त्यांनी या चळवळीत स्वतःला झोकून दिले. याच काळात विधीमंडळ व लोकसभेच्या निवडणूकांची घोषणा करण्यात आली.सन १९५७ साली मुंबईच्या त्रिभाषिक प्रांताच्या निवडणूकीत सातारा जिल्हयात मोठी राजकीय उलथापालथ झाली. मुंबई प्रांताची पहिली पाच वर्ष पार पडल्यानंतर संयुक्त महाराष्ट्राची चळवळ रंगात आली. त्रिभाषिक राज्याच्या व्दितिय निवडणूकीत संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचा वणवा पेटून सातारा जिल्हयातील काँग्रेस होरपळली. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचा परिणाम होवून माण, खटाव, फलटण, वाई, जावली, सातारा, कराड दक्षिण या सात मतदारसंघात काँग्रेस चारीमुंडया चित झाली आणि समितीने विजयाचे निशाण ठिकठिकाणी उभे केले. कराड उत्तर व पाटणचा अपवाद वगळता समितीला सर्वत्र यश मिळाले. कराड उत्तरमधून यशवंतराव चव्हाण आणि पाटणमधून लोकनेते बाळासाहेब देसाई यांचा अपवाद वगळाता काँग्रेसला सपाटून मार खावा लागला. यानंतर समितीमुळे जिल्हयातील कार्यकर्त्यांमध्ये उत्साह संचारला. त्याचबरोबर सातारा जिल्हयातील शेतकरी कामगार पक्ष, समाजवादी डावी आघाडी एकसंघपणे उभी राहीली.

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळ बलशाली झाल्यामुळे सन १९५७ च्या निवडणूकीत काँग्रेसला अनेक मतदारसंघात उमेदवार मिळणे अवघड झाले होते. या निवडणूकीत सातारा जिल्हयात काँग्रेस पक्षाला पराभवाचा सामना करावा लागला असला तरी याच निवडणूकीच्यानंतर व्दैभाषिक राज्याचे मुख्यमंत्री म्हणून यशवंतराव चव्हाण यांची निवड झाली. यानंतर मात्र यशवंतरावांनी जिल्हयातील काँग्रेस पुन्हा रूळावर आणली आणि सन १९५७ च्या निवडणूकीत पराभूत झालेल्या काँग्रेसने सन १९६२ च्या महाराष्ट्र विधानसभेच्या पहिल्या निवडणूकीत पुन्हा घवघवीत यश मिळावले. संयुक्त महाराष्ट्र समितीच्या चळवळीतील एक महत्वाचा प्रसंग होता तो म्हणजे नोहेंबर १९५७ मध्ये भारताचे तत्कालिन पंतप्रधान पं.जवाहरलाल नेहरू छ.शिवाजी महाराजांच्या पुतळयाचे अनावरणासाठी प्रतापगडला येणार होते. यावेळी संयुक्त महाराष्ट्र समितीच्या वतीने काळे झेंडे दाखवून त्यांचा निषेध करण्यात येत होता परंतु दुसऱ्या क्षणी तेच लोक पं.जवाहरलाल नेहरूंना नमस्कार करत होते. हा काय प्रकार आहे हे नेहरूंनी विचारले असता त्यांना सांगण्यात आले की संयुक्त महाराष्ट्र व्हावा ही जनतेची इच्छा आहे व तो मिळत नाही म्हणून निषेध तर आपणाविषयी असणाऱ्या आदरामुळे नमस्कार केला जात आहे. त्यानंतर लवकरच संयुक्त महाराष्ट्राचे स्वप्न पूर्ण झाले व १ मे १९६० रोजी मुंबईसह महाराष्ट्राची निर्मिती करण्यात आली. उत्तर साताऱ्याचे रूपांतर सातारा जिल्हयात व दक्षिण सातारचे रूपांतर सांगली जिल्हयात करण्यात आले.

सन १९६० साली महाराष्ट्राचा मंगलकलश आणण्यात आला. या नव्या राज्याच्या मुख्यमंत्री पदावर श्री.यशवंतराव चव्हाण यांची निवड झाली. मात्र १९६२ साली भारतावर चीनने आक्रमण केले. पं.नेहरूंनी यावेळी चव्हाण साहेबांना दिल्लीला बोलवून भारताच्या संरक्षणमंत्रीपदी नियुक्त केले. याच काळात महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणूका आल्या. सन १९६२ सालच्या निवडणूकीत शेकापच्या श्री यशवंतराव मोहीते यांनी कराड दक्षिणमधून विजय मिळवला. याचवेळी सन १९५२ साली पराभूत झालेल्या श्री संभाजीराव थोरातांना विधान परिषदेवर संधी मिळाली. कराड उत्तरमधे काँग्रेसच्या यशवंतराव चव्हाणांना यश मिळाले. कार्वे, वडगाव, कोरेगांव ही गावे दक्षिणेतून उत्तरेला जोडण्याची मोठी खेळी करण्यात आली. केशवरावांचे कार्यकर्ते असलेल्या गिजरेबापूंचा खून झाला. या निवडणूकीत श्री यशवंतराव चव्हाण मोठया फरकाने निवडून आले.पाटणमध्ये लोकनेते श्री बाळासाहेब देसाई यांचा दबदबा वाढत असताना

तेथे शेकापने श्री बाळासाहेब पाटणकर यांना उमेदवारी दिली. या लढतीत अपेक्षेप्रमाणे बाळासाहेबांनी विजय मिळवला. फलटण विधानसभा मतदारसंघात नाईक निंबाळकर घराण्याचे वर्चस्व असतानाही श्री. हरिभाऊ निंबाळकरांची चळवळ आकाराला येत होती.

या चळवळीत हिंदूराव ना.निंबाळकर यांच्या मातोश्रींचासुध्दा सक्रिय सहभाग होता. याच काळात कष्टकरी व साखर कामगाराच्या चळवळीनेही बाळसे धरले. भारतीय कम्युनिस्ट पक्षाकडून तिकीट मिळवलेल्या श्री.हरिभाऊंनी १९५७ साली मालोजीराजांचा पराभव केला. सन १९६२ साली मात्र राजे गटाच्या विरोधकांमध्ये फूट पडली आणि काँग्रेसने सीपीआयचा बदला घेतला. या निवडणूकीत श्री. मालोजीराजे बहुमताने निवडून आले.कोरेगांवमध्ये समाजवादी असलेल्या तुषार पवार यांना श्री. यशवंतराव चव्हाणांनी काँग्रेसमध्ये आणले. सन १९६२ च्या निवडणूकीमध्ये कूपरमधील कामगारांचे संघटन आणि श्री.यशवंतरावांचा पाठींबा यामुळे श्री.पवारांच्या विरोधात उमेदवारच मिळाला नाही आणि पवारांनी श्री.विठ्ठल भोसले या अपक्ष उमेदवाराचा सहज पराभव केला. संयुक्त महाराष्ट्राचा वणवा पेटल्यानंतर सातारा जिल्हयात प्रचंड नाराजीचे वातावरण होते.परिणामी त्यातून श्री.यशवंतराव चव्हाण देखील सुटले नाहीत. पुसेगावात त्यांच्या विरोधात मोर्चा निघाला.सन १९५७च्या निवडणूकीत समाजवादी पक्षाकडून केशवराव पाटलांना खटावमध्ये तिकीट देऊन त्यांच्यामागे मोठी ताकत निर्माण करण्यात आली.

सन १९६२च्या निवडणूकीत मात्र याच मतदार संघात काँग्रेसने श्री.शिवाजीराव पवारांना निवडून आणण्यात यश मिळवले. माण स्वतंत्र विधानसभा मतदारसंघ झाला होता आणि हा मतदारसंघ राखीव असल्याने इथे रिपाई विरोधात काँग्रेस असा सरळ सामना होता.सन १९६२साली माजी आमदार श्री.खंडेराव सावंत यांना पराभूत करून श्री. लक्ष्मण भिंगारदिवे हे याठिकाणी विजयी झाले.जावली मतदारसंघात म.गांधीजींच्यावर झालेला पहिला हल्ला रोखणारे श्री. भि.दा.भिलारे गुरूजी यांना कॉग्रेसने तिकीट सन १९६२ साली दिले आणि त्यांनी शेतकरी कामगार पक्षाच्या गणपराव भिलारे यांचा मोठया फरकाने पराभव केला.

१९५७च्या निवडणूकीत काँग्रेसला सपाटून मार खावा लागला होता. या निवडणूकीमध्ये काँग्रेसचे पानिपत झाले असले तरी सन १९६२ला काँग्रेसने जिल्हयातील सर्व सत्ताकेंद्रे हस्तगत करण्यात यश मिळाले होते.यशवंतराव चव्हाणांचा करिष्मा याच काळात

रंगात आला होता. त्यानंतरच जिल्हयात विकासाचे राजकारण सुरू झाले. सातारा जिल्हयाला नात्यागोत्याचे राजकारण नवखे नाही. यशवंतराव चव्हाणांचे भाचे श्री. धोंडीराम सिधोजी जगताप यांना सातारा विधानसभा मतदारसंघातून तिकीट देऊन श्री.यशवंतरावांनी त्यांना निवडून आणण्याचा अटोकाट प्रयत्न केला.

त्यानंतर १९६७च्या निवडणूकीतही बेरजेचे राजकारण करून श्री.यशवंतरावांनी त्यांनाच तिकीट दिले.मात्र सातारमध्ये छत्रपती शिवरायांच्या वंशजांचे राजघराणे असले तरी त्यांचा मानमरातब राखत या घराण्याला सक्रिय राजकारणापासून लांबच ठेवण्यात आले होते. देशभरातील राजघराणी सक्रिय राजकारणात होती. मात्र सातारमध्ये भोसले राजघराण्याला राजकारणापासून दुर ठेवण्यात यशवंतरावांना यश मिळालेले होते. राजकारणातील धूर्त खेळयामध्ये ही बाब लक्षात घेण्यासारखी होती.

सन १९७२च्या दुष्काळात झालेल्या निवडणूकीत जिल्हयातील अनेकांनी बंडाचा झेंडा फडकवला. श्री.यशवंतराव चव्हाण यांना दिल्लीतील राजकारणात घेतलेले असले तरीही सातारामध्ये त्यांचा शब्द डावलला जावू लागला त्यावेळचे जिल्हा परिषद अध्यक्ष श्री.भागवतराव देसाई यांना पायऊतार करून श्री.बाबुराव घोरपडे अध्यक्ष तर श्री.शंकरराव जगताप यांना उपाध्यक्ष करण्यात आले. याचवेळी चीनने भारतावर केलेल्या आक्रमणाला सामोरे जाण्यासाठी हिमालयाने सहयाद्रीला हाक दिली. यशवंतरावांना केंद्रात बोलावून नेहरूंनी त्यांना मोठी जबाबदारी दिली. महाराष्ट्र विधानसभेच्या दुसऱ्या निवडणूकीत चांगलेच राजकीय घमासान पहायला मिळाले. काँग्रेसची ताकद वाढत असताना शेकापची मात्र वाताहत होऊ लागलेली दिसते. यामुळे सहाजिकच यशवंतनिती राज्याला पहावयास मिळाली. त्यांनी याचवेळी बेरजेचे राजकारण केले. त्यांनी समाजवाद्यांना काँग्रेसमध्ये घेतले. परस्परांना कडवा विरोध असुनही त्यांनी आनंदराव चव्हाणांना सोबत घेतले. काँग्रेसचे मजबुतीकरण करत असताना त्यांनी नव्यांना संधी देत जेष्ठांना थोपऊन ठेवले.

श्री.किसन वीरांच्या मदतीने यशवंतरावांनी श्री.चंद्रहार पाटील, श्री. प्रतापराव भोसले, श्री.आनंदराव फाळके, श्री.कृष्णचंद्र भोईटे अशा अनेक कार्यकर्त्यांना त्यांनी राजकारणात आणले. सन १९६७ च्या निवडणूकीत काँग्रेसने यश मिळावलेले होते मात्र याचवेळी श्री.किसान वीरांच्या उमेदवारीवरून पक्षांतर्गत धुसफूस सुरू झाली. भुईंज गावच्या सरपंचपदी असणाऱ्या

प्रतापराव भोसल्यांना त्यांनी तिकीट दिले आणि त्यांनी विजय मिळावला आणि श्री.प्रतापराव भोसल्यांचे राज्याच्या राजकारणात वलय निर्माण झाले. यावेळी श्री.जगताप शेकापच्या तिकीटावर निवडणूक लढले असले तरी त्यांना पराभवाचा सामना करावा लागला. सातारमध्ये शेकपला मरगळ आलेली होती. त्यामुळे श्री.दादासाहेब जगताप यांनी समाजवादी पक्षाचे श्री.नारायणराव पवार यांचा सहज पराभव केला. सन १९७२ सालच्या निवडणूकीचाही तसाच निकाल लागला. पाटणमध्ये लोकनेते श्री.बाळासाहेब देसाई यांचे नाव मुख्यमंत्रीपदासाठी घेतले जात असल्याने मागिल दोन्ही वेळेला लोकनेत्यांच्या विरोधात लढणाऱ्या भडकबाबांना विक्रमसिंहानी कोयनाखोऱ्यातील जंगलात जावून मनवले. पुढे मात्र श्री.यशवंतरावांना ओलांडून जाण्याची किमया लोकनेत्यांना करता आली नाही. कराड उत्तरच्या राजकारणावर यशवंतराव चव्हाणांची मजबुत पकड होती. त्यांनी श्री.यशवंतराव मोहीते, श्री.बाबासाहेब चोरेकर आदींना काँग्रेसमध्ये आणले. श्री.केशवराव पाटलांच्या एकाकी परिस्थितीमुळे चव्हाणसाहेब सहज विजयी झाले. याचीच पुनरावृत्ती पुढे १९६७ ला झालेल्या निवडणूकीत झाली.

या निवडणूकीत यशवंतराव चव्हाणांना प्रचंड मते मिळाली. ही विधानसभा निवडणूक चव्हाण साहेबांची अखेरचीच ठरली. सन १९७२ साली श्री.यशवंतरावांचे भाचे श्री.बाबुराव कोतवाल काँग्रेसच्या तिकीटावर लढले आणि त्यांनी भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या डी.एम.पाटलांचा पराभव केला. पुढे कोतवाल यांनीही आपला दबदबा निर्माण केला. कराड दक्षिणमध्ये यशवंतराव मोहीतेंनी सन १९६७ साली भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या श्री.आर.आर.पाटलांचा पराभव केला. मात्र १९७२ च्या निवडणूकीआधी काँग्रेसमध्ये डेरेदाखल झाले. त्यामुळे कॅप्टन श्री.शंकरराव मोहीते तथा कॅप्टन श्री.एस.पी. यांनी शेतकरी कामगार पक्षामध्ये त्यांच्या विरोधात रान उठवले. याचवेळी कारखान्यांची उभारणी, कृष्णाकाठी सुरू झालेल्या पाणी योजना या मुद्यांमुळे भाऊंचा पुन्हा विजय झाला. या मतदारसंघात काँग्रेसची पकड असल्यामुळे शेकापचे नेते काँग्रेसच्या दावणीला बांधले गेले.

फलटणच्या राजकारणालाही या निवडणूकीत कलाटणी मिळाली. श्रीराम सहकारी साखर कारखान्यात एक स्लिप बॉय म्हणून काम करणाऱ्या श्री.कृष्णचंद्र भोईटेंनी राजकारणात मोठी झेप घेतली. त्यांनी सभापतीपद मिळवले. त्यांच्या या कर्तृत्वाची श्री.यशवंतरावांनी दखल घेतली आणि त्यांना विधानसभेचे तिकीट दिले. विजयसिंह मालोजीराजे नाईक निंबाळकर यांचे

तिकीट कापल्यामुळे या घराण्याचा काँग्रेसबरोबर या घराण्याचा कायमचा दुराव निर्माण झाला. पुढे १९७२च्या निवडणूकीत मात्र बाजीराव अप्पाजी जगताप यांनी भोईटेंची कोंडी केली. कांद्याला भाव मिळावा म्हणून लोणंद मार्केट बंद करणाऱ्या बाजीराव पैलवानांनी बारमाही पाण्यासाठी मेळावे घेऊन रान उठवले. पण बाजीराव पैलवानांचाही पराभव झाला आणि भोईटे दुसऱ्यांदा निवडून आले. रहिमतपुरच्या डॉ.पुरूषोत्तम देशपांडे यांनी कोरेगावातून संयुक्त समाजवादी पक्षातर्फे निवडणूक लढवली. काँग्रेसच्या आनंदराव फाळकेंनी त्यांचा पराभव केला. पुढे ज्योत्याजीराव फाळकेंचे चिरंजिव व शालिनीताई पाटलांचे बंधू असणाऱ्या श्री.वसंतराव फाळकेंना डावलून १९७२ साली काँग्रेसने श्री.दत्ताजीराव बर्गेंना उमेदवारी दिली यामुळे श्री. वसंतराव फाळकेंनी बंडखोरी केली. परंतू त्यांचा पराभव झाला. खटावच्या राजकारणातही मोठी उलथापालथ यावेळी झाली १९६७ ला चंद्रहार पाटलांना काँग्रेसने उमेदवरी दिल्याने त्यांना पुसेगांवच्या श्री.श्रीरंग जाधव तथा श्री.एस.एस.जाधवांनी कम्युनिस्ट पक्षातून विरोध केला. याचवेळी श्री.केशवरावांनी समाजवादीमधून काँग्रेसमध्ये प्रवेश केला. जिल्हापरीषदेच्या औंध–खटाव गटात त्यांनी औंध–खटाव गटात पराभुत करण्याचा प्रयत्न केला असला तरी सन १९७२च्या निवडणूकीत त्यांना काँग्रेसने तिकीट नाकारले. यावेळी त्यांनी बंडखोरी करून चंद्रहार पाटलांचा पराभव केला. या लढतीत यशवंतरावांनी आपली प्रतिष्ठा पणाला लावली. चंद्रहार पाटलांची उमेदवारी धोक्यात आल्याची माहीती समजताच श्री.यशवंतराव पुसेगांवात आले परंतु त्याचा काहीच उपयोग झाला नाही. माण मधून १९६७ आणि १९७२ या दोन पंचवार्षीक जिंकून सातारा जिल्हयातील पहील्या महिला आमदार होण्याचा मान मिळवला. तर जावलीमध्ये श्री.भिलारे गुरूजी १९६७ ला पुन्हा विजयी झाले त्यांनी शेकापच्या श्री.तरडेंचा पराभव केला.

पश्चिम महाराष्ट्रातील राजकारण सुरूवातीपासूनच टोकाच्या पातळीवर असले तरी राजकारण बाजूला ठेवून सर्वजण एकत्र यायचे. त्यावेळची संयुक्त महाराष्ट्राची चळवळ असो किंवा कोयनानगरचा भूकंप. अशा नैसर्गिक आपत्तीत नेत्यांनी कायम एकजूट दाखवली. देशावर चिनी आक्रमण झाल्यावर पंडित जवाहरलाल नेहरू यांनी श्री.यशवंतराव चव्हाणांना संरक्षणमंत्रीपद दिले. त्यावेळी हिमालयाच्या रक्षणासाठी सहयाद्री धावला असे रसभरीत वर्णन

आचार्य अत्रे यांनी वृत्तपत्रात केले होते. दिल्लीतील कारभाराची सुत्रे सांभाळल्यानंतर श्री. यशंतराव चव्हाण राज्याच्या राजकारणात फारसे आलेच नाहीत.

सन १९७८ नंतर झालेल्या विधानसभा निवडणूकांच्या पार्श्वभूमीवर राज्याच्या राजकारणात मोठी उलथापालथ झाली. राजकारण हे सत्तेसाठी असते, याची ओळख श्री. शरद पवारांनी महाराष्ट्राला करून दिली. त्याचवेळी सत्ताप्राप्तीसाठी आमदारांची प्रचंड फोडाफोडी झाली. श्री.शरद पवारांनी ३८ आमदारांना श्री.किसन वीरांच्या पुढाकाराने फोडून पुलोदचा प्रयोग केला. शरद पवार महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. त्याचवेळी केंद्रात श्रीमती इंदिरा गांधींची प्रचंड मोठी लाट निर्माण झाली आणि देशाची सुत्रे पुन्हा त्यांच्या हाती गेली. त्यामुळे श्रीमती इंदिराजींनी जनता पक्षातील आमदारांच्या सहकार्याने पुलोद सरकार बरखास्त करून टाकले. यामुळे महाराष्ट्रात मध्यावधी निवडणूका लागल्या. या सर्व बाबींचा सहाजिकच सातारा जिल्हयाच्या राजकारणावरही अत्यंत मोठे परिणाम झाले.

मुख्य प्रवाह असणारी काँग्रेस अनेक रूपांमध्ये विभागली गेली आणि सत्तालोलूप राजकारण सुरू झाल्याने त्याचा सातारा जिल्हयाच्या राजकारणावरही विपरीत परिणाम झाला. काँग्रेसमध्ये सुरू असलेले जिरवाजिरवीचे राजकारण आणि त्यातच सत्तेसाठी नेत्यांच्या बेडूकउडया तसेच गायवासरू, बैलजोडी आणि हाताचा पंजा अशा चिन्हांमुळे जनतेत संभ्रम निर्माण झाला. याचदरम्यान शरद पवारांचा राज्याच्या राजकारणात प्रवेश झाला. पुलोद चा प्रयोग झाला. याचवेळी कर्नाटकचे तत्कालिन मुख्यमंत्री देवराज अर्स यांच्या नेतृत्वात अर्स काँग्रेसची स्थापना करण्यात आली. यावेळी पवारांनी घेतलेल्या निर्णयाप्रमाणे जिल्हा अर्स काँग्रेसच्या पाठीमागे कायम राहीली. मात्र अर्ज काँग्रेसच्या वादळातही १९८० साली झालेल्या निवडणूकीत सातारा, पाटण, खटावमध्ये काँग्रेसमध्ये काँग्रेस आय पक्षाची ज्योत तेवत राहिली. सातारमधील राजकारणात सन १९७८ साली जनता पक्षाच्या माध्यमातून सातारचे राजघराणे राजकारणात आले आणि छ.अभयसिंहराजांनी सन १९७८ ची विधानसभा निवडणूक जिंकली. एका बाजूला सातारा जिल्हयात श्री.यशवंतराव चव्हाण आणि श्री.शरद पवार यांचा झंझावात सुरू असताना राजघराण्याने सातारा मात्र अजिंक्य ठेवला.

कोरेगांवमधून श्री.शंकरराव जगताप यांना चांगलाच राजकीय सुर सापडला होता. श्री.भागवतराव देसाईंच्या विरोधात ठराव करून अण्णांनी जिल्हा परिषद हाती घेतली होती.

श्री.यशवंतराव चव्हाणांशी झालेल्या जवळीकीमुळे त्यांना अर्स काँग्रेसची उमेदवारी मिळाली आणि श्री.शंकरराव जगताप (अण्णा) कोरेगांवातून दुसऱ्यांदा निवडून आले. फलटणमध्येही राजकीय सुत्रे बदललेली होती. अर्स काँग्रेसने श्री.चिमणराव कदम यांना तिकीट दिले तर याचवेळी काँग्रेस आयच्या खंबीर नेत्या प्रेमलाकाकी चव्हाण यांनी या पक्षाचे तिकीट हिंदूराव नाईक निंबाळकर यांना दिले. या निवडणूकीत हिंदूराव नाईक निंबाळकर यांचा चिमणराव कदम यांनी पराभव केला तरीही या निवडणूकीच्या निमित्ताने नाईक निंबाळकर आणि चव्हाण घराण्यांत स्नेहाचे ऋणानुबंध निर्माण झाले. माणमध्ये सदाशिव पोळ यांचा प्रभाव होता त्यामुळे सदाशिव पोळ ज्या पक्षात जाणार तो पक्ष निवडूण येणार हे निश्चित होते. सदाशिव पोळ हे अर्स काँग्रेसमध्ये गेले आणि त्यांनी विष्णूपंत सोनावणे यांना अर्स काँग्रेसचे तिकीट मिळवून दिले आणि श्री.विष्णूपंत सोणावणे निवडूनही आले. खटाव विधानसभा मतदारसंघातील परिस्थीती थोडी वेगळी होती. १९७८ साली काँग्रेस आयमध्ये आलेल्या श्री.केशवराव पाटलांनी जनता पक्षातून निवडणूक लढवणाऱ्या श्री.चंद्रहार पाटलांचा पराभव केला.

सन १९८०च्या निवडणूकीतही त्यांनी काँग्रेस आय पक्षाची उमेदवारी घेतली मात्र यावेळी अर्स काँग्रेसकडून श्री.हणमंतराव माने यांचा त्यांना कडवा विरोध सहन करावा लागला. श्री.केशवराव पाटील विजयी झाले असले तरीही त्यांचे मताधिक्य याठिकाणी कमी झाल्याचे जाणवते. वाई विधानसभा मतदारासंघात अर्स काँग्रेसने श्री.प्रतापराव भोसले यांना तर यांच्या विरोधात काँग्रेस आयने श्री.मदनराव पिसाळ यांना उमेदवारी दिली. या निवडणूकीत श्री. प्रतापराव भोसले विजयी झाले.

यावेळी जावली विधानसभा मतदारासंघात तब्बल अकरा जणांनी उमेदवारीचे अर्ज भरलेले होते मात्र प्रमुख लढत झाली ती म्हणजे अर्स काँग्रेसमधून निवडणूक लढवणारे डी.बी. कदम आणि श्री.किसनराव साबळे-पाटील यांच्यातच. यावेळी अवघ्या दीड हजार मतांनी श्री.डी.बी.कदम निवडून आले. कराड उत्तरेतून सन १९८० साली श्री.पी.डी.पाटील यांना अर्स काँग्रेसची तर जयसिंग लाड यांना काँग्रेस आयची उमेदवारी मिंळाली. येथे श्री.पी.डी.पाटील यांचा मोठया फरकाने विजय झाला. तर कराड दक्षिणेत श्री.विलासराव पाटील उंडाळकर यांच्या रूपाने राजकारणातील एक नवा नेता निर्माण झाला. त्यांनी १९८० ची निवडणूक एकाहाती जिंकत आपल्या प्रतिस्पर्ध्यांना अक्षरशः लोळवले. पाटणमध्ये १९७८ची निवडणूक जनता

पक्षातून विजयी झालेल्या श्री.बाळासाहेब देसाईंनी १९८०ची निवडणूक काँग्रेस आयच्या तिकीटावर लढवली त्यांच्या विरोधात अर्ज काँग्रेसने श्री.विक्रमसिंह पाटणकरांना तिकीट दिले परंतू येथे देसाईंचा विजय झाला. या निवडणूकीपासून या तालुक्यात श्री.देसाई–पाटणकर असे गटातटाचे राजकारण चालू झाल्याचे दिसते.सन १९८५ ची निवडणूक सातारा जिल्हयाच्या दृष्टीने वेगळी होती. या निवडणूकीच्यापुर्वी यशवंतराव चव्हाण आणि किसन वीर हे जिल्हयाच्या राजकारणाचे प्रमुख आधारवड गळून पडलेले होते. काँग्रेस अर्सच्या प्रयोगानंतर काँग्रेस एसच्या स्थापनेमुळे सातारा जिल्हयात प्रचंड उलथापालथ झाली.

श्री.शरद पवारांच्या धोरणी राजकारणाला संपुर्ण राज्यातून पाठींबा मिळत असतानाच १९८५ची निवडणूक एस(समाजवादी) काँग्रेसच्या लाटेवर हेलखावे खावू लागली. पवारांना याच निवडणूकीत सातारा जिल्हयाची नस सापडली. श्री.प्रतापराव भोसले, श्री. छ. अभयसिंहराजे भोसले, श्री.विलासराव उंडाळकर असे मातब्बर नेते या निवडणूकीने घडवले. पाटण, माण, कराड उत्तर या मतदारसंघांमध्ये दोन्ही काँग्रेसमध्ये कडवी टक्कर झाली. तरीही फलटण व माण येथून अपक्ष उमेदवार निवडून आले. सातारा विधानसभा मतदारसंघावर श्रीमंत छ.अभयसिंहराजे भोसले यांचाच वरचष्मा राहीला. यावेळी श्रीमंत छ.अभयसिंहराजे भोसले यांचे सख्खे मेहुणे दादाराजे खर्डेकर काँग्रेस एसचे जिल्हाध्यक्ष होते तर श्रीमंत छ.अभयसिंहराजे भोसले काँग्रेस आय मधुन निवडणूक लढवत होते. यावेळी श्रीमंत छ.अभयसिंहराजे भोसले यांच्या विरोधात अरविंद गवळींना तिकीट द्यावे, अशी शरद पवारांची इच्छा होती परंतू दादाराजे खर्डेकरांच्या आग्रहावरून काँग्रेस एसने श्री.गवळींऐवजी सर्जेराव जाधवांना तिकीट दिले. या खेळीमुळे भाऊसाहेब महाराजांचा निवडून येण्याचा मार्ग आणखी सुकर होऊन महाराज सहज विजयी झाले. कोरेगांव विधानसभा मतदारसंघावर श्री.शंकरराव जगताप यांचा दबदबा निर्माण झालेला होता. त्यांचा विजयरथ रोखण्यासाठी काँग्रेस एसने श्री.शिवाजीराव फळके यांना तिकीट दिले परंतु तेही श्री.शंकरराव जगताप यांना पराभूत करू शकले नाहीत. पुढे श्री.शंकरराव जगताप यांना विधानसभेचे सभापतीपद देण्यात आले. फलटणमध्येतर चिमणराव कदमांचा इतका प्रभाव निर्माण झालेला होता की त्यांनी या दोन्ही काँग्रेस पक्षांना बाजुला ठेऊन अपक्ष निवडणूक लढवली आणि ते यशस्वी झाले. माणमध्ये काँग्रेस आय पक्षाच्या गुंडोपंत माने यांनी काँग्रेस एस च्या सोनवणेंना जोरदार लढत दिली परंतू त्यांना माने पराभूत करू शकले नाहीत.

वाई विधानसभा मतदारसंघात काँग्रेस आयच्या वतीने मदनराव पिसाळांना तिकीट मिळाले तर समाजावादी काँग्रेस पक्षाने अरविंद चव्हाणांना तिकीट मिळाले. येथे काँग्रेस आय पक्षाच्या श्री.मदनराव पिसाळांनी यश मिळवले.या निवडणूकीत खरी मजा आली ती खटावमध्ये होय.

या विधानसभा मतदारसंघावर वर्चस्व ठेवणाऱ्या केशवराव पाटील यांच्या प्रचाराची धुरा सांभाळणाऱ्या मोहनराव तथा भाऊसाहेब गुदगे यांच्या सभा प्रथमतः श्री.केशवराव पाटलांसाठी आहेत असे वाटायचे परंतु त्यानंतर सभेत भाऊसाहेब गुदगे झिंदाबाद अशी घोषणा घुमत असे. काँग्रेस आय मधून श्री.केशवराव निवडणूक लढवीत असताना भाऊसाहेब गुदगेंनी अपक्ष अर्ज भरला आणि ते आमदार झाले. जावलीमध्ये श्री.डी.बी.कदम सहजपणे निवडून आले. त्यांच्या अपघाती निधनानंतर झालेल्या पोटनिवडणूकीतही शरद पवारांनी श्री.बबनराव बडदरे यांच्यासाठी जिवाचे रान केले परंतु त्यांना यश मिळाले नाही व येथून जी.जी.कदम विजयी झाले. कराड उत्तरमध्ये श्याम अष्टेकर या सामान्य कार्यकर्त्याला शरद पवारांनी उमेदवारी दिली. यावेळी काँग्रेस आय पक्षाचे उमेदवार होते पी.डी.पाटील परंतू श्याम अष्टेकर सारख्या साध्या कार्यकर्त्याने पी.डी.पाटलांचा पराभव केला. पुढे या श्याम अष्टेकरांना आपल्या मंत्रिमंडळात समाविष्ठ करून त्यांना क्रीडा राज्यमंत्रीपद देऊन सर्वांना आश्चर्याचा धक्का दिला. कराड दक्षिणमध्ये श्री.विलासकाका उंडाळकर यांनी आपला मतदारसंघावरचा प्रभाव सतत ठेवत त्यात वाढ केल्याचे दिसते. त्यांनी एकदा लोकसभा लढवूनही पाहीली परंतु त्यांचा पराभव झाला. त्यांनी पहिली विधानसभा निवडणूक अर्समधून लढली असली तरी ते काँग्रेसपासून कधीही दुर गेले नव्हते. पाटणमध्ये मात्र आता परिस्थती बदलत चाललेली दिसू लागलेली होती. येथे गटातटाच्या राजकारणाला उत आलेला होता. श्री.बाळासाहेब देसाईंच्या नंतर त्यांचे चिरांजीव शिवाजीराव देसाई यांनी विक्रमसिंहांच्या विरोधात निवडणूक लढवली परंतु आता पाटणकर घराण्याचा पाटणच्या राजकारणात दिर्घकाळासाठी उदय झालेला होता.

सन १९८२ साली झालेल्या पोटनिवडणूकीत अपक्ष लढलेल्या विक्रमसिंहांच्या पदरात यश मिळाले त्यानंतर लगेच १९८५ साली झालेल्या निवडणूकांमध्ये शिवाजीराव देसाई काँग्रेस आय कडून तर विक्रमसिंहांनी काँग्रेस एसचा झेंडा हाती घेतला आणि विजय मिळावला. राजीव गांधी यांच्या उपस्थित औरंगाबाद येथे समाजवादी काँग्रेसचे विलिनीकरण झाल्यानंतर शिवसेना व भाजपाने राज्यात हळूहळू बाळसे धरले. निवडणुकांच्या निमित्ताने सातारा जिल्हयात

आयोजित केल्या जाणाऱ्या बाळासाहेब ठाकरेच्या प्रचार सभांना अलोट गर्दी होत असे. परंतु या गर्दीचे रूपांतर मतपेटीत कधीच झाले नाही. श्री.शरद पवार यांच्यावर जिल्हयाचा विश्वास असल्याने युतीला याठिकाणी फारसे यश नाही. त्याचदरम्यान पवार राजकारणाचा राजकीय 'पॉवर प्ले' जिल्हयाने कित्येकदा पाहीला. समाजवादी काँग्रेस विलीन झाल्यामुळे सन १९९०च्या निवडणूकीत जिल्हयात भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची पुन्हा चांगलीच ताकद वाढली. याच दरम्यान स्थापन झालेल्या शिवसेना आणि त्यानंतर राज्यात आलेल्या भाजपाने बाळसे धरले. या पक्षांचे लोण शहरांपुरते मर्यादित न राहता ते गावागावात पसरले. या परिस्थितही माण वगळता इतर सर्व जागी राष्ट्रीय काँग्रेसने आपला प्रभाव कायम ठेवला.

सातारमध्ये श्री.छ.अभयसिंहराजे भोसले यांना शह देण्यासाठी त्यांच्या विरोधात शिवसेनेने श्री.छ.कल्पनाराजे भोसले यांनी लढवलेली निवडणूक लक्षवेधी ठरली. राजघराण्यातील दोन व्यक्तींमध्ये झालेल्या या निवडणूकीत श्री.छ.अभयसिंहराजे भोसले विजयी झाले. कराड दक्षिणमध्ये विलासराव पाटील उंडाळकर यांनी अपक्ष अर्ज दाखल केलेल्या इंद्रजित मोहीते यांचा पराभव केला. कराड उत्तरमध्येही श्यामराव अष्टेकर यांनी अपक्ष बाबासाहेब चोरेकरांचा पराभव केला. पाटणमध्ये श्री.बाळासाहेब देसाईंच्यानंतर शिवाजीराव देसाईंना फारसे यश मिळाले नाही. या निवडणूकीपर्यंत श्री.शिवाजीराव देसाईंचे निधन झालेले होते. यामुळे कारखाना गटाचे अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी श्री.बाळासाहेब देसाई यांच्या स्नुषा विजयादेवी देसाई यांनी निवडणूक लढवली परंतु श्री. विक्रमसिंह पाटणकर यांनी काँग्रेसच्या तिकीटावर ही निवडणूक जिंकाली. जावली विधानसभा मतदारसंघात जी.जी.कदमांनी शिवसेनेच्या सदाशिव सकपाळ यांना पराभूत करत आपली आमदारकी टिकावून ठेवली. खटावमध्ये श्री.भाऊसाहेब गुदगे यांनी काँग्रेसचे अधिकृत तिकीट मिळवले आणि त्यांनी जनता दलाच्या अरूण बागलांना पराभूत केले. फलटण विधानसभा मतदारसंघात श्री.चिमणराव उर्फ सुर्याजीराव शंकरराव कदमांसमोर भाजपाच्या विजय बोरावके यांनी आव्हान उभे केले परंतु कदमांनी एक हाती विजय मिळवला. वाईमध्ये प्रस्थापित भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे मदनराव पिसाळ यांना श्री. लक्ष्मणराव पाटलांनी बंडखोरी करून पराभूत करण्याचा प्रयत्न केला परंतू या निवडणूकीत मदनराव पिसाळ यांचा विजय झाला. कोरेगांवात शालिनीताई पाटलांनी माहेरातून निवडणूक लढवण्याचा निर्णय घेऊन श्री.शंकरराव जगताप यांना आव्हान

दिले परंतू श्री.शंकरराव जगताप अण्णांच्यापुढे ताईंचा टिकाव लागला नाही. माण मतदारसंघावर जिल्हयात झालेल्या राजकीय घडामोडींचा मोठा परीणाम झालेला होता. येथे भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे विष्णूपंत सोणावणे तर बसपाच्या नंदा सावंत यांच्यात जोरदार लढत झाली मात्र येथे वाघमारे यांचा विजय झाला. थोडक्यात या सर्व कालखंडात सातारा जिल्हयात काँग्रेसशिवाय कोणत्याही पक्षाला आपले बस्तान बसवता आलेले नाही. संपुर्ण जिल्हा शरद पवारांच्या मागे जेव्हा त्यांनी हाक दिली तेंव्हा उभा राहीलेला दिसते.

मा. शरद पवार यांनी सन १९९९ मध्ये आपला स्वतंत्र राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष स्थापन केला. या वेळीही सातारा जिल्हयाचे सर्वाधीक आमदार त्यांच्यासोबत गेल्याचे दिसते. सातारा जिल्हयात वाई, कोरेगाव, कराड उत्तर, कराड दक्षिण, पाटण, सातारा, फलटण व माण असे आठ विधानसभा मतदारसंघ अस्तित्वात आहेत. या विविध मतदार संघातून निवडल्या गेलेल्या अनेक महान व्यक्तीमत्वांनी आपल्या कर्तृत्वाची छाप महाराष्ट्र राज्याच्या राजकारणावर पाडलेली आहे. सन १९५२ ते १९७६ पर्यंत काँग्रेसचे महाराष्ट्रावरील वर्चस्व निर्विवादीत होते. १ मे १९६० पासून राजकारणाचे नवे पर्व सुरू झाले असले तरीही सन १९५६ पासुनच काँग्रेस वर्चस्वाची चौकट उदयास आली होती. श्री.यशवंतराव चव्हाणंनी ही चौकट बळकट करण्यावर भर दिला. सत्तेचे एक प्रारूप तयार करून घेतले. म्हणूनच महाराष्ट्रात काँग्रेसच्या वर्चस्वाचे वर्णन चव्हाण मॉडेल म्हणून केले जाते. श्री.यशवंतराव चव्हाणांचे या संदर्भातील श्रेय वादातीत आहे. ब्राम्हणेतर चळवळीतील.एक मोठा गट काँग्रेसमधे सामिल झाल्यामुळे महाराष्ट्रातील काँग्रेस विस्तारण्यास मोठा हातभार लागला. यातुन पुढे काँग्रेसच्या मार्फत आपल्या राजकीय आकांक्षा पूर्ण करण्याचे मराठा नेतृत्वाचे प्रयत्न सुरू झाले.

सातारा जिल्हयात पहील्या निवडणूकीपासून खालील विधानसभा मतदार संघ होते. त्यांची सन १९५१ ते सन १९९९ या काळातील त्यांची निवडणूकनिहाय माहीती पुढीलप्रमाणे.

**विधानसभा निवडणूक १९५१ :**

या निवडणूकीत वाई खंडाळा मतदारसंघात श्री.जगताप दादासाहेब खासेराव यांनी शेतकरी कामगार पक्षाच्या मार्फत निवडणूक लढवली व १९३९५ मते प्राप्त करून विजय मिळवला. तर यांच्या विरोधातील इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाचे उमेदवार श्री.वीर किसन महादेव यांना १७१३१ मते मिळाली.[६] खटाव मतदारसंघामध्ये यावेळी श्री.जाधव तात्या

आनंदराव.यांना इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाने उमेदवारी दिली. त्यांनी १६५३२ मते प्राप्त करत विजय मिळवला. त्यांच्या विरोधातील श्री.भोसले बाबासाहेब आनंदराव या अपक्ष उमेदवारास १०८१२ मते मिळाली.[७] कोरेगांव मतदारसंघातून श्री.घार्गे शंकरराव गणपतराव यांनी इंडीयन नॅशनल काँग्रेसपक्षातून उमेदवारी मिळवली आणि ९११२ मते मिळवून विजयी झाले.तर श्री.बोराटे पांडुरंग कोंडीबा यांनी  समाजवादी पार्टीमार्फत निवडणूक लढवली आणि ४५३६ मते मिळवली.[८] पुर्व सातारा मतदारसंघात यावेळी कामगार किसान पक्षाने  श्री.पाटील विठ्ठलराव नानासाहेब यांना याठिकाणी निवडणूकीस उभे केले व ९१२८ मतदान मिळवत त्यांनी ५०२२ मते मिळवणाऱ्या श्री.हकिम इस्माईल नूरमुहंम्मद या अपक्ष उमेदवाराचा पराभव केला.[९] पश्चिम सातारा मतदारसंघामध्ये इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाने या ठिकाणी श्री.घोरपडे बाबुराव बाळासाहेब यांना उमेदवारी दिली त्यांनी ५४१४ मते मिळवून कामगार किसान पक्षाच्या ४१२३ मते मिळवणाऱ्या श्री.ढाणे राजाराम दौलू यांचा पराभव केला.[१०] फलटण माण या मतदारसंघात यावेळी मतदारांना दोन उमेदवार निवडून देण्याचा अधिकार होता. खुल्या जागेवर इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाचे श्री.नाईक निंबाळकर मालोजीराव उर्फ नानासाहेब यांनी ३१६३३मते मिळवून तर राखीव जागेवर इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाच्याच श्री.तपासे गणपतराव देवजी यांनी २६८८७ मतदान मिळवून विजय मिळवला तर कामगार किसान पक्षाचे श्री.नलावडे कृष्णा बाळा यांना ११८६४ तसेच ऑल इंडीया शेडयुल कास्ट फेडरेशनचे श्री.बंदीसोडे सदाशिव मारूती यांना ७८५६ इतके मतदान मिळाले.[११] जावळी महाबळेश्वर मतदारसंघात श्री.शिंदे बाबासाहेब जगदेवराव यांना इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाने उमेदवारी दिली व त्यांनी १०७३४ मते मिळवून शेतकरी कामगार पक्षाच्या ४७०६ मते मिळवणाऱ्या श्री.तरडे कृष्णराव हरिभाऊ यांना पराभूत केले. [१२] पाटण मतदारसंघ पहील्या विधानसभा निवडणूकीत इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाच्या श्री.देसाई दौलतराव श्रीपतराव यांनी १७७५७ मते मिळवली. शेतकरी कामगार पक्षाच्या श्री.चव्हाण दाजिसाहेब रामराव यांना १७६५८ मतदान झाले व या निवडणूकीत श्री.देसाई दौलतराव श्रीपतराव यांनी विजय मिळवला.[१३] कराड उत्तर मतदारसंघामध्ये श्री.चव्हाण यशवंत बळवंत यांना इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाचे तिकीट देण्यात आले तर त्यांच्या विरोधात शेतकरी कामगार पक्षाने श्री.पवार केशव पाटलोजी यांना उमेदवारी दिली. या निवडणूकीत १५७७३ मते मिळवून श्री.चव्हाण यशवंत बळवंत यांनी १५५६५ मते मिळवणाऱ्या

श्री.पवार केशव पाटलोजी यांना  पराभूत केले. [१४] कराड दक्षिण या मतदारसंघात शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने यावेळी श्री.मोहीते यशवंत जिजाबा हे निवडणूकीस उभे राहीले आणि १३५२० मते मिळवून त्यांनी ११७२४ मते मिळवणाऱ्या इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाच्या श्री.थोरात शामराव मारूतराव यांचा पराभव केला. [१५]

**विधानसभा निवडणूक १९५७ :**

या निवडणूकीत कराड उत्तर मतदारसंघातून श्री.चव्हाण यशवंतराव बळवंतराव यांनी इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाच्या तिकीटावर निवडणूक लढवली व २५२९७ मते प्राप्त केली आणि विजयी झाले. तर यांच्या विरोधातील शेतकरी कामगार पक्षाचे उमेदवार श्री.पवार केशवराव पाटलोजी यांना २३६७१ मते मिळाली. [१६] कराड दक्षिण या मतदारसंघात  शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने यावेळीही श्री.मोहीते यशवंत जिजाबा हे निवडणूकीस उभे राहीले आणि २४६६६ मते मिळवून त्यांनी १३७६१ मते मिळवणाऱ्या इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाच्या श्री.जगताप  धोंडीराम सिदोजी यांचा पराभव केला. [१७] पाटण मतदारसंघामध्ये या विधानसभा निवडणूकीत इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाच्या श्री.देसाई दौलतराव श्रीपतराव यांनी १९५६८ मते मिळवली. शेतकरी कामगार पक्षाच्या श्री.पाटणकर बाळासाहेब गणपतराव यांना १३६८६ मतदान झाले व या निवडणूकीत श्री.देसाई दौलतराव श्रीपतराव यांनी विजय मिळवला. [१८] जावळी महाबळेश्वर मतदारसंघात  यावेळी श्री.तरडे कृष्णराव भाऊराव यांनी शेतकरी कामगार पक्षाने उमेदवारी दिली व त्यांनी ११३३८ मते मिळवून इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाच्या ७०६४ मते मिळवणाऱ्या श्री.ओंबळे बाबुराव रामचंद यांना पराभूत केले व मागिल निवडणूकीत पराभवाचा वचपा काढला. [१९] वाई मतदारसंघामध्ये कामगार किसान पक्षाने या ठिकाणी श्री.जगताप दादासाहेब खासेराव यांना उमेदवारी दिली त्यांनी २५६७१  मते मिळवून इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाच्या १०९७१ मते मिळवणाऱ्या श्री.वीर किसन महादेव यांचा पराभव केला. [२०] सातारा मतदारसंघात यावेळी श्री.पाटील विठ्ठल नानासाहेब यांनी अपक्ष निवडणूक लढवून  इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाने उमेदवारी दिली. त्यांनी २६६०२ मते प्राप्त करत विजय मिळवला. त्यांच्या विरोधातील श्री.घोरपडे बाबुराव बाळासाहेब या इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाच्या उमेदवारास १०९७१ मते मिळाली. [२१] कोरेगांव मतदारसंघातून श्री.माने विश्वासराव विठ्ठलराव यांनी इंडीयन नॅशनल काँग्रेसपक्षातून उमेदवारी मिळवली आणि १३११० मते

मिळवून विजयी झाले.तर श्री.देशमुख दिनकरराव दगडोबा यांनी अपक्ष निवडणूक लढवली आणि १२१९२ मते मिळवली.[२२] खटाव मतदारसंघात यावेळी श्री.पाटील केशव शंकर यांना प्रजा समाजवादी पार्टीने उमेदवारी दिली. त्यांनी २५९६४ मते प्राप्त करत विजय मिळवला. त्यांच्या विरोधातील श्रीमती.घार्गे हीराबाई परशराम या इंडीयन नॅशनल काँग्रेसच्या उमेदवारास १०५९३ मते मिळाली.[२३] फलटण माण मतदारसंघ या मतदारसंघात यावेळी सर्वसाधारण खुल्या जागेवर इंडीयन कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडीया पक्षाचे श्री.निंबाळकर हरिभाऊ विठ्ठलराव यांनी ४३३०७ मते मिळवून तर अनु.जाती या राखीव जागेवर ऑल इंडीया शेडयुल कास्ट फेडरेशन पक्षाच्या श्री.बंदीसोडे सदाशिवराव मारूतीराव यांनी ३७२३७ मतदान मिळवून विजय मिळवला.[२४]

**विधानसभा निवडणूक १९६२ :**

या निवडणूकीत कराड उत्तर मतदारसंघातून श्री.चव्हाण यशवंतराव बळवंतराव यांनी इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाच्या मार्फत निवडणूक लढवली व ४०७१३ मते प्राप्त केली आणि विजयी झाले. तर यांच्या विरोधातील शेतकरी कामगार पक्षाचे उमेदवार श्री.पवार केशवराव पाटलोजी यांना १५२३१ मते मिळाली.[२५] कराड दक्षिण या मतदारसंघात शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने यावेळीही श्री.मोहीते यशवंत जिजाबा हे निवडणूकीस उभे राहीले आणि २४६६६ मते मिळवून त्यांनी १३७६१ मते मिळवणाऱ्या इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाच्या श्री.जगताप धोंडीराम सिदोजी यांचा पराभव केला.[२६] पाटण मतदारसंघामध्ये या विधानसभा निवडणूकीत इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाच्या श्री.देसाई दौलतराव श्रीपतराव यांनी ४२९६५ मते मिळवली. शेतकरी कामगार पक्षाच्या श्री.पाटणकर बाळासाहेब गणपतराव यांना ४५७६ मतदान झाले व या निवडणूकीत श्री.देसाई दौलतराव श्रीपतराव यांनी विजय मिळवला.[२७] जावळी महाबळेश्वर मतदारसंघात यावेळी श्री.भिलारे भिकू दाजी यांना इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाने उमेदवारी दिली व त्यांनी २८४२३ मते मिळवून शेतकरी कामगार पक्षाच्या ५६५६ मते मिळवणाऱ्या श्री.भिलारे गणपत शिवराम यांना पराभूत केले.[२८] वाई मतदारसंघामध्ये इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाने या ठिकाणी श्री.जगताप दादासाहेब खासेराव यांना उमेदवारी दिली त्यांनी २७४५६ मते मिळवून शेतकरी कामगार पक्षाच्या १०६८४ मते मिळवणाऱ्या श्री.देशमुख बाळासाहेब बापूसाहेब यांचा पराभव केला.[२९] सातारा मतदारसंघात यावेळी श्री.जगताप धोंडीराम शिदोजी यांनी

इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाच्या तिकीटावर निवडणूक लढवली. त्यांनी ३५३९० मते प्राप्त करत विजय मिळवला. त्यांच्या विरोधातील श्री.पाटील विठ्ठलराव नानासाहेब या अपक्ष उमेदवारास १२०६८ मते मिळाली.[३०]

कोरेगांव मतदारसंघातून श्री.पवार तुषार पांडुरंग यांनी इंडीयन नॅशनल काँग्रेसपक्षातून उमेदवारी मिळवली आणि २०६०९ मते मिळवून विजयी झाले.तर श्री.भोसले विठ्ठल पांडुरंग यांनी अपक्ष निवडणूक लढवली आणि त्यांना ८१०७ मते मिळाली.[३१] खटाव मतदारसंघात यावेळी श्री.पवार शिवाजीराव दादासाहेब यांना इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाने उमेदवारी दिली. त्यांनी २४४७७ मते प्राप्त करत विजय मिळवला. त्यांच्या विरोधातील श्री.पाटील केशव शंकर या प्रजा समाजवादी पार्टीच्या उमेदवारास १६२०५ मते मिळाली.[३२] फलटण माण मतदारसंघ या मतदारसंघात यावेळी सर्वसाधारण खुल्या जागेवर इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाचे श्री.नाईक निंबाळकर मालोजीराव मुधोजीराव यांनी ३३७४१ मते मिळवून विजयी झाले तर त्यांच्या विरोधातील उमेदवार कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडीयाचे श्री.निंबाळकर हरिभाऊ विठ्ठलराव यांना ९२०९ इतकी मते मिळाली.[३३]

**विधानसभा निवडणूक १९६७ :**

या निवडणूकीत माण मतदारसंघात यावेळी अनु.जाती या राखीव जागेवर इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाचे श्री.पी.टी.सोनावणे यांनी २६४५४ मते मिळवून विजयी झाले तर त्यांच्या विरोधातील उमेदवार रिपाब्लिकन पार्टी ऑफ इंडीयाचे श्री.जी.बी.माने यांना १३७४१ इतकी मते मिळाली.[३४] फलटण मतदारसंघात यावेळी इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाचे श्री.भोईटे के.आर.यांनी २४७४९ मते मिळवून विजयी झाले तर त्यांच्या विरोधातील अपक्ष उमेदवार श्री.निंबाळकर व्ही.एम.यांना २२९७९ इतकी मते मिळाली.[३५] कराड उत्तर मतदारसंघातून श्री.चव्हाण यशवंतराव बळवंतराव यांनी इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाच्या मार्फत निवडणूक लढवली व ३५२८५ मते प्राप्त केली आणि विजयी झाले. तर यांच्या विरोधातील शेतकरी कामगार पक्षाचे उमेदवार श्री.पवार ए.जी.यांना १८१९६ मते मिळाली.[३६] कराड दक्षिण या मतदारसंघात इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाच्या वतीने यावेळी श्री.मोहीते यशवंत जिजाबा हे निवडणूकीस उभे राहीले आणि ४०६३३ मते मिळवून त्यांनी ९१४२ मते मिळवणाऱ्या कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडीया पक्षाच्या श्री.पाटील आर.आर.यांचा पराभव केला.[३७] पाटण

मतदारसंघामध्ये या विधानसभा निवडणूकीत इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाच्या श्री.देसाई दौलतराव श्रीपतराव यांनी ही निवडणूक बिनविरोध जिंकली.[३८]

जावळी महाबळेश्वर मतदारसंघात यावेळी श्री.भिलारे बी.डी.यांना इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाने उमेदवारी दिली व त्यांनी ३२६११८ मते मिळवून शेतकरी कामगार पक्षाच्या ४४६६ मते मिळवणाऱ्या श्री.तरडे के.एच.यांना पराभूत केले.[३९] वाई मतदारसंघामध्ये इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाने या ठिकाणी श्री.भोसले पी.बी.यांना उमेदवारी दिली त्यांनी ३३०१६ मते मिळवून शेतकरी कामगार पक्षाच्या ७९१८ मते मिळवणाऱ्या श्री.जगताप डी.के.यांचा पराभव केला.[४०] सातारा मतदारसंघात यावेळी श्री.जगताप डी.एस.यांनी इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाच्या तिकीटावर निवडणूक लढवली. त्यांनी ३३९८४ मते प्राप्त करत विजय मिळवला. त्यांच्या विरोधातील श्री.पवार एन.आर. या शेतकरी कामगार पक्षाच्या उमेदवारास १४२२८ मते मिळाली.[४१] कोरेगांव मतदारसंघातून श्री.फाळके ए.एन.यांनी इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षातून उमेदवारी मिळवली आणि ३७५४७ मते मिळवून विजयी झाले.तर श्री.देशपांडे पी.एन.यांनी संघटन सोशॅलिस्ट पार्टीच्या तिकीटावर निवडणूक लढवली आणि त्यांना १०४७६ मते मिळाली.[४२] खटाव मतदारसंघात यावेळी श्री. पाटील आर.जी.यांना इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाने उमेदवारी दिली. त्यांनी ४०५२९ मते प्राप्त करत विजय मिळवला.[४३] त्यांच्या विरोधातील श्री. जाधव एस.एस.या कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडीया पक्षाच्या उमेदवारास ६३५७ मते मिळाली.[४४]

**विधानसभा निवडणूक १९७२ :**

या निवडणूकीत माण मतदारसंघात यावेळी अनु.जाती या राखीव जागेवर इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षामार्फत श्रीमती.शिंदे प्रभावती जी.यांनी ३०२७१ मते मिळवून विजय मिळवला तर त्यांच्या विरोधातील अपक्ष उमेदवार श्री.भोसले बापूराव शिवराम यांना ५५२८ इतकी मते मिळाली.[४५] फलटण मतदारसंघात यावेळी इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाचे श्री.भोईटे के.आर.यांनी ३६८२७ मते मिळवून विजयी झाले तर त्यांच्या विरोधातील कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडीया पक्षाचे उमेदवार श्री.जगताप बी.ए.यांना ७१४४ इतकी मते मिळाली.[४६] कराड उत्तर मतदारसंघातून श्री.कोठाळ बाबुराव रामचंद्र यांनी इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाच्या मार्फत निवडणूक लढवली व ५३०९४ मते प्राप्त केली आणि विजयी झाले. तर यांच्या

विरोधातील कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडीया पक्षाचे उमेदवार श्री.पाटील डी.एम.यांना ७८९९ मते मिळाली.[४७] कराड दक्षिण या मतदारसंघात इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाच्या वतीने यावेळी श्री.मोहीते यशवंत जिजाबा हे निवडणूकीस उभे राहीले आणि ३४३९७ मते मिळवून त्यांनी २९९८० मते शेतकरी कामगार पक्षाच्या श्री.मोहीते शंकरराव पी.यांचा पराभव केला.[४८] पाटण मतदारसंघामध्ये या विधानसभा निवडणूकीत इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाच्या श्री.देसाई दौलतराव श्रीपतराव यांनी ६६८५७ मते मिळवून शेतकरी कामगार पक्षाच्या १०७१ मते मिळवणाऱ्या श्री.पाटणकर रावसाहेब एस.यांना पराभूत केले. [४९]

जावळी महाबळेश्वर मतदारसंघात यावेळी श्री.शिंदे लालसिंगराव बी.यांना इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाने उमेदवारी दिली व त्यांनी ३१५०४ मते मिळवून अपक्ष उमेदवार १७१११ मते मिळवणाऱ्या श्री.भिलारे मारूती सयाजी यांना पराभूत केले.[५०] वाई मतदारसंघामध्ये इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाने या ठिकाणी श्री.भोसले पी.बी.यांना उमेदवारी दिली त्यांनी ३३०१६ मते मिळवून भारतीय जनसंघ पक्षाच्या २८४० मते मिळवणाऱ्या श्री.पोरे अरविंद बाळकृष्ण यांचा पराभव केला.[५१] सातारा मतदारसंघात यावेळी श्री.जगताप डी.एस.यांनी इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाच्या तिकीटावर निवडणूक लढवली. त्यांनी ४१३०७ मते प्राप्त करत विजय मिळवला. त्यांच्या विरोधातील श्री.पवार एन.आर. या शेतकरी कामगार पक्षाच्या उमेदवारास १३०६८ मते मिळाली.[५२] कोरेगांव मतदारसंघातून श्री.दत्ताजिराव बी.बर्गे यांनी इतर कोणत्याही पक्षाचे तिकीट न घेता अपक्ष निवडणूक लढवली आणि ४१३०७ मते मिळवून विजयी झाले.तर श्री.फाळके वसंतराव आनंदा इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाच्या तिकीटावर निवडणूक लढवली आणि त्यांना १९३२२ मते मिळाली.[५३] खटाव मतदारसंघात यावेळी श्री.पाटील केशवराव एस. यांनी अपक्ष निवडणूक लढवली आणि ३८३४२ मते मिळवून विजयी झाले. त्यांनी ४०५२९ मते प्राप्त करत विजय मिळवला.त्यांच्या विरोधातील श्री.पाटील चंद्रहार या इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाच्या उमेदवारास २८५४३ मते मिळाली.[५४]

**विधानसभा निवडणूक १९७८ :**

या निवडणूकीत माण मतदारसंघात यावेळी अनु.जाती या राखीव जागेवर इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षामार्फत श्री.सोनावणे विष्णू तातोबा यांनी ३१५४१ मते मिळवून विजय मिळवला तर त्यांच्या विरोधातील जनता पार्टीचे उमेदवार श्ाी.लावंगारे नितिन जगन्नाथ यांना

१९६२२ इतकी मते मिळाली.[५५] फलटण मतदारसंघात यावेळी जनता पार्टीचे श्री.विजयसिंह उर्फ शिवाजीराजे मालोजीराव नाईक निंबाळकर यांनी ३२०११ मते मिळवून विजयी झाले तर त्यांच्या विरोधातील इंडीयन नॅशनल कॉंग्रेस पक्षाचे उमेदवार श्री.कदम सुर्याजीराव शंकरराव उर्फ चिमणराव यांना ३०५३९ इतकी मते मिळाली.[५६] कराड उत्तर मतदारसंघातून श्री.पवार केशवराव पाटलोजी यांनी शेतकरी कामगार पक्षाच्या मार्फत निवडणूक लढवली व ३५१४१ मते प्राप्त केली आणि विजयी झाले. तर यांच्या विरोधातील इंडीयन नॅशनल कॉंग्रेस पक्षाचे उमेदवार श्री.कोठाळ बाबुराव रामचंद यांना २६८४३ मते मिळाली.[५७] कराड दक्षिण या मतदारसंघात इंडीयन नॅशनल कॉंग्रेस पक्षाच्या वतीने यावेळी श्री.मोहीते यशवंत जिजाबा हे निवडणूकीस उभे राहीले आणि ४८८८५ मते मिळवून त्यांनी २२२२८ मते मिळवणाऱ्या शेतकरी कामगार पक्षाच्या श्री.मोहीते शंकरराव पांडुरंग यांचा पराभव केला.[५८] पाटण मतदारसंघामध्ये या विधानसभा निवडणूकीत श्री.देसाई दौलतराव श्रीपतराव जनता पार्टीच्या श्री.देसाई दौलतराव श्रीपतराव यांनी ५४३२१ मते मिळवून इंडीयन नॅशनल कॉंग्रेस (आय) पक्षाच्या १३३७८ मते मिळवणाऱ्या श्री.देसाई भगवंतराव आनंदराव यांना पराभूत केले. [५९]

जावळी महाबळेश्वर मतदारसंघात यावेळी श्री.भिलारे भिकू दाजी यांना इंडीयन नॅशनल कॉंग्रेस पक्षाने उमेदवारी दिली व त्यांनी २३२१७ मते मिळवून १९१२३ मते मिळवणारे अपक्ष उमेदवार श्री.साबळे बाळकृष्ण अनंत यांना पराभूत केले.[६०] वाई मतदारसंघामध्ये इंडीयन नॅशनल कॉंग्रेस पक्षाने या ठिकाणी श्री.भोसले प्रतापराव बाबुराव यांना उमेदवारी दिली त्यांनी ३७८९९ मते मिळवून जनता पार्टीच्या १५९९० मते मिळवणाऱ्या श्री.जगताप बुवासाहेब आबाजीराव यांचा पराभव केला.[६१] सातारा मतदारसंघात यावेळी श्री.राजे भोसले अभयसिंह शाहुमहाराज यांनी जनता पार्टीच्या तिकीटावर निवडणूक लढवली. त्यांनी ३७५४९ मते प्राप्त करत विजय मिळवला. त्यांच्या विरोधातील श्री.घोरपडे बाबुराव बाळासाहेब या इंडीयन नॅशनल कॉंग्रेस पक्षाच्या उमेदवारास ३०२६३ मते मिळाली.[६२] कोरेगांव मतदारसंघातून श्री.जगताप शंकरराव चिमाजी यांनी इंडीयन नॅशनल कॉंग्रेस पक्षाच्या तिकीटावर निवडणूक लढवली आणि ३०७६५ मते मिळवून विजयी झाले.तर श्री.पांडुरंग निळकंठराव उर्फ बाबासाहेब माने अपक्ष निवडणूक लढवली आणि त्यांना २४७४५ मते मिळाली.[६३] खटाव मतदारसंघात यावेळी श्री.पाटील केशवराव एस.यांनी इंडीयन नॅशनल कॉंग्रेसच्या तिकीटावर निवडणूक लढवली आणि

४२४०४ मते मिळवून विजयी झाले. त्यांनी ४०५२९ मते प्राप्त करत विजय मिळवला.त्यांच्या विरोधातील श्री.पाटील चंद्रहार या अपक्ष उमेदवारास २६७४२ मते मिळाली.[६४]

**विधानसभा निवडणूक १९८० :**

या निवडणूकीत माण मतदारसंघात यावेळी अनु.जाती या राखीव जागेवर इंडीयन नॅशनल काँग्रेस (यु) पक्षामार्फत श्री.सोनावणे विष्णू तातोबा यांनी ३२३०७ मते मिळवून विजय मिळवला तर त्यांच्या विरोधातील इंडीयन नॅशनल काँग्रेस (आय) चे उमेदवार श्री.माने गुंडोपंत बालाजी यांना २८१०१ इतकी मते मिळाली.[६५] फलटण मतदारसंघात यावेळी इंडीयन नॅशनल काँग्रेस (यु) पक्षाचे श्री.कदम सुर्याजीराव शंकरराव उर्फ चिमणराव यांनी ४६२१० मते मिळवून विजयी झाले तर त्यांच्या विरोधातील इंडीयन नॅशनल काँग्रेस (आय) पक्षाचे उमेदवार श्री. नाईक निंबाळकर हिंदुराव निळकंठराव यांना २२९०८ इतकी मते मिळाली.[६६] कराड उत्तर मतदारसंघातून श्री.पाटील पांडुरंग दादासाहेब यांनी इंडीयन नॅशनल काँग्रेस (यु) पक्षाच्या मार्फत निवडणूक लढवली व ४१६५० मते प्राप्त केली आणि विजयी झाले. तर यांच्या विरोधातील इंडीयन नॅशनल काँग्रेस (आय) पक्षाचे उमेदवार श्री.लाड जयसिंग बाबुराव यांना १७७०७मते मिळाली.[६७] कराड दक्षिण या मतदारसंघात इंडीयन नॅशनल काँग्रेस (यु) पक्षाच्या वतीने यावेळी श्री. पाटील विलासराव बाळकृष्ण हे निवडणूकीस उभे राहीले आणि ४३३४८ मते मिळवून त्यांनी २२५८६ मते मिळवणाऱ्या इंडीयन नॅशनल काँग्रेस (यु) पक्षाच्या श्री.पाटील भिमराव धोंडीराम यांचा पराभव केला.[६८] पाटण मतदारसंघामध्ये या विधानसभा निवडणूकीत श्री.देसाई दौलतराव श्रीपतराव यांनी इंडीयन नॅशनल काँग्रेस (आय) पक्षातून अर्ज भरला व ४०४८३ मते मिळवून इंडीयन नॅशनल काँग्रेस (यु) पक्षाच्या ३३६६० मते मिळवणाऱ्या श्री.पाटणकर विक्रमसिंह रणजितसिंह यांना पराभूत केले. [६९] जावळी मतदारसंघात यावेळी श्री.कदम धोंडीराम भिकोबा यांना इंडीयन नॅशनल काँग्रेस (यु)पक्षाने उमेदवारी दिली व त्यांनी ३७०९५ मते मिळवून ३५८३४मते मिळवणारे इंडीयन नॅशनल काँग्रेस (आय) चे उमेदवार श्री.साबळे बाळकृष्ण अनंत उर्फ किसनराव पाटील यांना पराभूत केले.[७०]

वाई मतदारसंघामध्ये इंडीयन नॅशनल काँग्रेस (यु) पक्षाने या ठिकाणी श्री.भोसले प्रतापराव बाबुराव यांना उमेदवारी दिली त्यांनी ४२४३८ मते मिळवून इंडीयन नॅशनल काँग्रेस (आय) च्या १८९१४ मते मिळवणाऱ्या श्री.पिसाळ मदनराव गणपतराव यांचा पराभव केला.[७१]

सातारा मतदारसंघात यावेळी श्री.राजे भोसले अभयसिंह शाहुमहाराज यांनी इंडीयन नॅशनल काँग्रेस (आय)च्या तिकीटावर निवडणूक लढवली. त्यांनी ३६०४८ मते प्राप्त करत विजय मिळवला. त्यांच्या विरोधातील श्री.उथळे बबनराव उर्फ लक्ष्मण सदाशिव या इंडीयन नॅशनल काँग्रेस (यु) पक्षाच्या उमेदवारास २८१९३ मते मिळाली.[७२] कोरेगांव मतदारसंघातून श्री.जगताप शंकरराव चिमाजी यांनी इंडीयन नॅशनल काँग्रेस (यु) पक्षाच्या तिकीटावर निवडणूक लढवली आणि ३४८२९ मते मिळवून विजयी झाले.तर श्री.बर्गे दत्ताजीराव भाऊसाहेब या इंडीयन नॅशनल काँग्रेस (आय)च्या उमेदवारास पराभूत केले त्यांना २३२२७ मते मिळाली.[७३] खटाव मतदारसंघात यावेळी श्री.पाटील केशवराव एस.यांनी इंडीयन नॅशनल काँग्रेस (आय)च्या तिकीटावर निवडणूक लढवली आणि ४०१०१ मते मिळवून विजयी झाले. त्यांच्या विरोधातील श्री.माने हणमंतराव जिजाबा या इंडीयन नॅशनल काँग्रेस (यु) यांच्या उमेदवारास २९३०१ मते मिळाली.[७४]

**विधानसभा निवडणूक १९८५ :**

या निवडणूकीत माण मतदारसंघात यावेळी अनु.जाती या राखीव जागेवर इंडीयन काँग्रेस (सोशॅलिस्ट) पक्षामार्फत श्री.सोनावणे विष्णू तातोबा यांनी ४१०९२ मते मिळवून विजय मिळवला तर त्यांच्या विरोधातील इंडीयन नॅशनल काँग्रेसचे उमेदवार श्री.माने गुंडोपंत बालाजी यांना ३२५१३ इतकी मते मिळाली.[७५] फलटण मतदारसंघात यावेळी अपक्ष श्री.कदम सुर्याजीराव शंकरराव उर्फ चिमणराव यांनी ४६७६३ मते मिळवून विजयी झाले तर त्यांच्या विरोधातील इंडीयन काँग्रेस (सोशॅलिस्ट)पक्षाचे उमेदवार श्री.भोसले राजाराम सखाराम उर्फ राज भोसले बारअॅटलॉ यांना ३५९९२ इतकी मते मिळाली.[७६] कराड उत्तर मतदारसंघातून श्री.आळतेकर शाम उर्फ जनार्दन बाळकृष्ण यांनी इंडीयन काँग्रेस (सोशॅलिस्ट) पक्षाच्या मार्फत निवडणूक लढवली व ४८१३४ मते प्राप्त केली आणि विजयी झाले. तर यांच्या विरोधातील इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाचे उमेदवार श्री.पाटील पांडुरंग दादासाहेब यांना ४०९७८ मते मिळाली.[७७] कराड दक्षिण या मतदारसंघात इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाच्या वतीने यावेळी श्री. पाटील विलासराव बाळकृष्ण हे निवडणूकीस उभे राहीले आणि ५४१५९ मते मिळवून त्यांनी ४२३९० मते मिळवणाऱ्या इंडीयन काँग्रेस (सोशॅलिस्ट) पक्षाच्या श्री.पाटील विलासराव गोविंद यांचा पराभव केला.[७८]

पाटण मतदारसंघामध्ये या विधानसभा निवडणूकीत श्री.पाटणकर विक्रमसिंह रणजितसिंह यांनी इंडीयन काँग्रेस (सोशॅलिस्ट)पक्षातून अर्ज भरला व ४८८७३ मते मिळवून इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाच्या ३६९३० मते मिळवणाऱ्या श्री.देसाई शिवाजीराव दौलतराव यांना पराभूत केले.[७९] जावळी मतदारसंघात यावेळी श्री.कदम धोंडीराम भिकोबा यांना इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाने उमेदवारी दिली व त्यांनी ६०६७७ मते मिळवून ३७२३१ मते मिळवणारे इंडीयन काँग्रेस (सोशॅलिस्ट)चे उमेदवार श्री.शिंदे लालसिंगराव बापूसो यांना पराभूत केले.[८०] वाई मतदारसंघामध्ये इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाने या ठिकाणी श्री.पिसाळ मदनराव गणपतराव यांना उमेदवारी दिली त्यांनी ३८०७४ मते मिळवून इंडीयन काँग्रेस (सोशॅलिस्ट)च्या ३३१६५ मते मिळवणाऱ्या श्री.फाळके शिवाजी गेविंदराव यांचा पराभव केला.[८१] सातारा मतदारसंघात यावेळी श्री.राजे भोसले अभयसिंह शाहुमहाराज यांनी इंडीयन नॅशनल काँग्रेसच्या तिकीटावर निवडणूक लढवली. त्यांनी ६०६७७ मते प्राप्त करत विजय मिळवला. त्यांच्या विरोधातील श्री.जाधव सर्जेराव विठ्ठलराव या इंडीयन काँग्रेस (सोशॅलिस्ट) पक्षाच्या उमेदवारास २६७५४ मते मिळाली.[८२]

कोरेगांव मतदारसंघातून श्री.जगताप शंकरराव चिमाजी यांनी इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाच्या तिकीटावर निवडणूक लढवली आणि ४८०४९ मते मिळवून विजयी झाले.तर श्री.फाळके शिवाजी गोविंदराव या इंडीयन काँग्रेस (सोशॅलिस्ट)च्या उमेदवारास पराभूत केले त्यांना ३३१६५ मते मिळाली.[८३] खटाव मतदारसंघात यावेळी श्री.गुदगे मोहनराव पांडुरंग यांनी अपक्ष निवडणूक लढवली आणि ३९२६७ मते मिळवून विजयी झाले. त्यांच्या विरोधातील श्री.पाटील केशवराव शंकरराव या इंडीयन नॅशनल काँग्रेसच्या उमेदवारास ३१६२० मते मिळाली.[८४]

**विधानसभा निवडणूक १९९० :**

या निवडणूकीत माण मतदारसंघात यावेळी अनु.जाती या राखीव जागेवर अपक्ष श्री.वाघमारे धोंडीराम गणपती यांनी ३८४९० मते मिळवून विजय मिळवला तर त्यांच्या विरोधातील अपक्ष उमेदवार श्री.सोनावणे विष्णू तातोबा यांना ३६०३६ इतकी मते मिळाली.[८५] फलटण मतदारसंघात यावेळी इंडीयन नॅशनल काँग्रेसने श्री.कदम सुर्याजीराव शंकरराव उर्फ चिमणराव यांना उमेदवारी दिली त्यांनी ५४६२० मते मिळवून विजय मिळवला तर त्यांच्या विरोधातील अपक्ष उमेदवार श्री.शिंदे सुभाषराव तुकाराम यांना २४९१५ इतकी मते मिळाली.[८६]

कराड उत्तर मतदारसंघातून श्री.आळतेकर शाम उर्फ जनार्दन बाळकृष्ण यांनी इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाच्या मार्फत निवडणूक लढवली व ५८२४३ मते प्राप्त केली आणि विजयी झाले. तर यांच्या विरोधातील अपक्ष उमेदवार श्री.बाबासाहेब चोरेकर यांना २८०१४ मते मिळाली.[८७] कराड दक्षिण या मतदारसंघात इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाच्या वतीने यावेळी श्री. पाटील विलासराव बाळकृष्ण हे निवडणूकीस उभे राहीले आणि ६४१०० मते मिळवून त्यांनी ३२६४३ मते मिळवणारे अपक्ष उमेदवार श्री.मोहीते इंद्रजित यशवंतराव यांचा पराभव केला.[८८] पाटण मतदारसंघामध्ये या विधानसभा निवडणूकीत श्री.पाटणकर विक्रमसिंह रणजितसिंह यांनी इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षातून अर्ज भरला व ६२६४७ मते मिळवून अपक्ष उभे राहून ४०००३ मते मिळवणाऱ्या श्रीमती.देसाई विजयादेवी शिवाजीराव यांना पराभूत केले.[८९] जावळी मतदारसंघात यावेळी श्री.कदम गेनूजी गोविंद यांना इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाने उमेदवारी दिली व त्यांनी ४६३८३ मते मिळवून २०६६२ मते मिळवणारे शिवसेनेचे उमेदवार श्री.सपकाळ सदाशिव पांडुरंग यांना पराभूत केले.[९०] वाई मतदारसंघामध्ये इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाने या ठिकाणी श्री.पिसाळ मदनराव गणपतराव यांना उमेदवारी दिली त्यांनी ३६६८० मते मिळवून अपक्ष उभे राहून २१७१३ मते मिळवणाऱ्या श्री.जाधव लक्ष्मणराव पांडूरंग यांचा पराभव केला.[९१]

सातारा मतदारसंघात यावेळी श्री.राजे भोसले अभयसिंह शाहुमहाराज यांनी इंडीयन नॅशनल काँग्रेसच्या तिकीटावर निवडणूक लढवली. त्यांनी ७४९३६ मते प्राप्त करत विजय मिळवला. त्यांच्या विरोधातील श्रीमती.भोसले राजमाता कल्पनाराजे प्रतापसिंह महाराज या शिवसेना पक्षाच्या उमेदवारास ३८७८३ मते मिळाली.[९२] कोरेगांव मतदारसंघातून श्री.जगताप शंकरराव चिमाजी यांनी इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाच्या तिकीटावर निवडणूक लढवली आणि ५६२४७ मते मिळवून विजयी झाले.तर श्रीमती.शालिनीताई पाटील या जनता दलाच्या उमेदवारास पराभूत केले त्यांना ४४६८८ मते मिळाली.[९३] खटाव मतदारसंघात यावेळी श्री.गुदगे मोहनराव पांडुरंग यांनी इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षामार्फत निवडणूक लढवली आणि ५५४८१ मते मिळवून विजयी झाले. त्यांच्या विरोधातील श्री.बागल अरूणराव शिवराम या जनता दल च्या उमेदवारास ४११५० मते मिळाली.[९४]

**विधानसभा निवडणूक १९९५ :**

या निवडणूकीत माण मतदारसंघात यावेळी अनु.जाती या राखीव जागेवर अपक्ष श्री.वाघमारे डी.जी. यांनी ६६७६५ मते मिळवून विजय मिळवला तर त्यांच्या विरोधातील इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाचे उमेदवार श्री.सोनावणे व्ही.टी. यांना ४२८४४ इतकी मते मिळाली.[९५] फलटण मतदारसंघात यावेळी श्री.नाईक निंबाळकर रामराजे प्रतापसिंह यांनी अपक्ष उमेदवारी घोषीत त्यांनी ८४८१६ मते मिळवून विजय मिळवला तर त्यांच्या विरोधातील इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाचे उमेदवार श्री.कदम सुर्याजीराव शंकरराव उर्फ चिमणराव यांना ४२३६७ इतकी मते मिळाली.[९६] कराड उत्तर मतदारसंघातून श्री.पाटील पी.डी.यांनी अपक्ष निवडणूक लढवली व ६७४६७ मते प्राप्त केली आणि विजयी झाले. तर यांच्या विरोधातील इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाचे उमेदवार श्री.पाटील आनंदराव रघुजी यांना ५२७७९ मते मिळाली.[९७] कराड दक्षिण या मतदारसंघात इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाच्या वतीने यावेळी श्री. पाटील विलासराव बाळकृष्ण हे निवडणूकीस उभे राहीले आणि ६९३८६ मते मिळवून त्यांनी ४८०१४ मते मिळवणारे अपक्ष उमेदवार श्री.मोहीते इंद्रजित यशवंतराव यांचा पराभव केला.[९८] पाटण मतदारसंघामध्ये या विधानसभा निवडणूकीत श्री.पाटणकर विक्रमसिंह रणजितसिंह यांनी इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षातून अर्ज भरला व ५९३९९ मते मिळवून अपक्ष उभे राहून ५८६६३ मते मिळवणाऱ्या श्री.देसाई शंभूराज शिवाजीराव यांना पराभूत केले. [९९] जावळी मतदारसंघात यावेळी श्री.सपकाळ सदाशिव पांडुरंग (भाऊ)यांना शिवसेना पक्षाने उमेदवारी दिली व त्यांनी ५०५०० मते मिळवून ४५६०० मते मिळवणारे इंडीयन नॅशनल काँग्रेसचे उमेदवार श्री.कदम गेनूजी गोविंद यांना पराभूत केले.[१००] वाई मतदारसंघामध्ये या ठिकाणी श्री.पिसाळ मदनराव गणपतराव यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज भरला व त्यांनी ५१७६१ मते मिळवून इंडीयन नॅशनल काँग्रेसचे उमेदवारी मिळवून ४११०३ मते मिळवणाऱ्या श्री.भोसले मदनराव प्रतापराव यांचा पराभव केला.[१०१] सातारा मतदारसंघात यावेळी श्री.राजे भोसले अभयसिंह शाहुमहाराज यांनी इंडीयन नॅशनल काँग्रेसच्या तिकीटावर निवडणूक लढवली. त्यांनी ८३०५३ मते प्राप्त करत विजय मिळवला. त्यांच्या विरोधातील श्री.घोरपडे भिमराव शामराव या अपक्ष उमेदवारास ३०४८५ मते मिळाली.[१०२] कोरेगांव मतदारसंघातून श्री.जगताप शंकरराव चिमाजी यांनी इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाच्या तिकीटावर निवडणूक लढवली आणि ५९७९३ मते मिळवून विजयी

झाले.तर श्रीमती.शालिनीताई पाटील या अपक्ष उमेदवारास पराभूत केले त्यांना ५३८०७ मते मिळाली.[१०३] खटाव मतदारसंघात यावेळी श्री.गुदगे मोहनराव पांडुरंग यांनी अपक्ष निवडणूक लढवली आणि ५२५१४ मते मिळवून विजयी झाले. त्यांच्या विरोधातील श्री.बागल अरूणराव शिवराम या इंडीयन नॅशनल काँग्रेस च्या उमेदवारास ५११९१९ मते मिळाली.[१०४]

**विधानसभा निवडणूक १९९९ :**

या निवडणूकीत माण मतदारसंघात यावेळी अनु.जाती या राखीव जागेवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या श्री.तुपे तुकाराम नामदेव यांनी ४५९९३ मते मिळवून विजय मिळवला तर त्यांच्या विरोधातील इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाचे उमेदवार श्री.वाघमारे धोंडीराम गणपती यांना ३४८७६ इतकी मते मिळाली.[१०५] फलटण मतदारसंघात यावेळी श्री.नाईक निंबाळकर रामराजे प्रतापसिंह यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामार्फत उमेदवारी घोषीत त्यांनी ६३९६० मते मिळवून विजय मिळवला तर त्यांच्या विरोधातील इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाचे उमेदवार श्री.कदम सुर्याजीराव शंकरराव उर्फ चिमणराव यांना ३२१८० इतकी मते मिळाली.[१०६] कराड उत्तर मतदारसंघातून श्री.पाटील बाळासाहेब उर्फ शामराव पांडुरंग यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामार्फत निवडणूक लढवली व ५९४२७ मते प्राप्त केली आणि विजयी झाले. तर यांच्या विरोधातील इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाचे उमेदवार श्री.पाटील आनंदराव रघुजी यांना ४२३२२ मते मिळाली.[१०७] कराड दक्षिण या मतदारसंघात इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाच्या वतीने यावेळी श्री. पाटील विलासराव बाळकृष्ण हे निवडणूकीस उभे राहीले आणि ६२७९५ मते मिळवून त्यांनी ३९१६१ मते मिळवणारे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार श्री. पाटील विलासराव गोविंद (वाठारकर बापू) यांचा पराभव केला.[१०८]

पाटण मतदारसंघामध्ये या विधानसभा निवडणूकीत श्री.पाटणकर विक्रमसिंह रणजितसिंह यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातून अर्ज भरला व ५३३३६ मते मिळवून शिवसेना पक्षामार्फत उभे राहून ५८६६३ मते मिळवणाऱ्या श्री.देसाई शंभूराज शिवाजीराव यांना पराभूत केले. [१०९] जावळी मतदारसंघात यावेळी श्री.शिंदे शशिकांत जयवंतराव यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने उमेदवारी दिली व त्यांनी ५४७८२ मते मिळवून ४२५९६ मते मिळवणारे शिवसेनेचे उमेदवार श्री.सपकाळ सदाशिव पांडुरंग (भाऊ) यांना पराभूत केले.[११०] वाई मतदारसंघामध्ये या ठिकाणी श्री.पिसाळ मदनराव गणपतराव यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातून उमेदवारी अर्ज

भरला व  त्यांनी ४३१८१ मते मिळवून इंडीयन नॅशनल काँग्रेसचे उमेदवारी मिळवून ४१३२६ मते मिळवणाऱ्या श्री.भोसले मदनराव प्रतापराव यांचा पराभव केला.[१११] सातारा मतदारसंघात यावेळी श्री.राजे भोसले अभयसिंह शाहुमहाराज यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या तिकीटावर निवडणूक लढवली. त्यांनी ५९७८० मते प्राप्त करत विजय मिळवला. त्यांच्या विरोधातील श्रीमंत छत्रपती उदयनराजे प्रतापसिंह महाराज भोसले या भारतीय जनता पक्षाच्या उमेदवारास ५४४१७ मते मिळाली.[११२] कोरेगांव मतदारसंघातून श्रीमती.डॉ.शालिनीताई पाटील यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या तिकीटावर निवडणूक लढवली आणि ६१६९२ मते मिळवून विजयी झाले.तर श्री.जगताप शंकरराव चिमाजी या इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाच्या उमेदवारास पराभूत केले त्यांना ३६०६९ मते मिळाली.[११३] खटाव मतदारसंघात यावेळी श्री.गुदगे मोहनराव पांडुरंग यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या तिकीटावर निवडणूक लढवली आणि ४२८१३ मते मिळवून विजयी झाले. त्यांच्या विरोधातील श्री.येळगांवकर दिलीप मुरलीधर या भारतीय जनता पक्षाच्या उमेदवारास ४१२४९ मते मिळाली.[११४]

**लोकसभा निवडणूका :**

देशात पहिली लोकसभा अस्तित्वात आली त्यावेळी जिल्हयातील दोन मतदारसंघांना दक्षिण सातारा व उत्तर सातारा असे संबोधण्यात येत असे.त्यावेळी दक्षिण सातारा असे संबोधण्यात येणाया या मतदार संघातून सन १९५२ मध्ये झालेल्या पहिल्या लोकसभा निवडणूकीसाठी चार उमेदवार उभे होते. इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाचे उमेदवार श्री.पवार व्यंकटराव पिराजीराव यांना १३३९१५ मते मिळाली व ते निवडून आले. यांचे विरोधी उमेदवार शेतकरी कामगार पक्षाचे श्री.पाटील धोंडोजी पांडुरंग यांना ५९७०५ इतकी मते मिळाली. यावेळीच उत्तर सातारा मतदारसंघात श्री.आळतेकर गणेश सदाशिव यांनी इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाच्या वतीने निवडणूक लढवली त्यांना ९१३१६ मते मिळाली व ते विजयी झाले तर श्री.नलावडे रामचंद्र मनोहर यांनी शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने निवडणूक लढवली. या निवडणूकीत त्यांना ५४०९५ मतदान मिळाले.[११५]

त्यानंतरच्या म्हणजेच सन १९५७ साली लोकसभेच्या जेव्हा निवडणूका झाल्या तेंव्हा सातारा व कराड हे दोन मतदारसंघ अस्तित्वात आले. सातारा मतदारसंघात या दुसऱ्या सार्वत्रिक निवडणूकीसाठी कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडीया या पक्षाच्या तिकीटावर क्रांतिसिंह नाना

पाटील म्हणजेच श्री.पाटील नाना रामचंद्र यांनी निवडणूक लढवली आणि १४५१९४ मते मिळवून विजय प्राप्त केला.तर त्यांच्या विरोधात श्री.आळतेकर गणेश सदाशिव यांनी इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाच्या वतीने निवडणूक लढवली त्यांना ७६७४५ मते मिळाली. कराड मतदारसंघात शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने निवडणूक श्री.चव्हाण दाजीसाहेब रामराव लढले व यांना १३२३१० मते मिळाली आणि ते विजयी झाले. यांच्या विरोधात इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाच्या वतीने श्री.स्वामी रामानंद भारती यांनी निवडणूक लढवली त्यांना १०६३४२ मते मिळाली.[११६]

सन १९६२ च्या तिसऱ्या सार्वत्रिक निवडणूकीसाठी सातारा मतदार संघातून इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाच्या वतीने श्री.वीर किसन महादेव यांनी निवडणूक लढवली आणि १६५८७९ मते मिळवून विजय मिळवला तर कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडीया पक्षाच्या वतीने या ठिकाणी क्रांतिसिंह नाना पाटील म्हणजेच श्री.पाटील नाना रामचंद्र यांनी निवडणूक लढवली व त्यांना ६२१८८ मते मिळाली. कराड मतदारसंघात इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाच्या तिकीटावर श्री.चव्हाण दाजीसाहेब रामराव निवडणूकीत उतरले व २१४५५३ मते मिळवून विजयी झाले. त्यांच्या विरोधात श्री.आत्माराम नाना पाटील यांना शेतकरी कामगार पक्षाने उतरवले.त्यांना एकूण ६७७७५ मते मिळाली.[११७]

पुढे सन १९६७ साली लोकसभेच्या जेव्हा निवडणूका झाल्या त्यावेळी सातारा मतदारसंघात या सार्वत्रिक निवडणूकीसाठी श्री.वाय.बी.चव्हाण यांना इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाच्या वतीने निवडणूकीत उतरवण्यात आले. त्यांनी २०७८९५ मते मिळवून शेतकरी कामगार पक्षाच्या श्री.के.पी.पवार यांना पराभूत केले. श्री.के.पी.पवार यांना या निवडणूकीत ८००५९ मते मिळाली. कराड मतदारसंघात या निवडणूकीच्यावेळी इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाच्या वतीने श्री.डी.आर.चव्हाण यांनी निवडणूक लढवली. त्यांना २३३९६२ मते मिळाली तर विरोधी उमेदवार शेतकरी कामगार पक्षाचे श्री.डी.के.पाटील यांना ६७९४० मते मिळाली आणि इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाचे श्री.डी.आर.चव्हाण विजयी झाले.[११८]

सन १९७१मध्ये झालेल्या पाचव्या सार्वत्रिक लोकसभा निवडणूकीसाठी सातारा मतदार संघातून एकूण तीन उमेदवारांनी आपले भविष्य आजमावले. इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाच्या वतीने श्री.चव्हाण यशवंतराव बळवंतराव यांनी निवडणूक लढवली आणि २४६१०० मते

मिळवून विजय मिळवला तर शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने या ठिकाणी श्री.पवार केशवराव पाटलोजी यांनी निवडणूक लढवली व त्यांना ६९२७० मते मिळाली. कराड मतदारसंघात इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाच्या तिकीटावर श्री.डी.आर.चव्हाण निवडणूकीत उतरले व २६३३५६ मते मिळवून विजयी झाले. त्यांच्या विरोधात श्री.बरावदे विठ्ठल रामचंद्र यांना शेतकरी कामगार पक्षाने उतरवले.त्यांना एकूण १९८९३ मते मिळाली.[११७]

सहाव्या सार्वत्रिक लोकसभा निवडणूका सन १९७७ साली झाल्या. या निवडणूकांमध्ये सातारा मतदारसंघातून इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाच्या वतीने श्री.चव्हाण यशवंतराव बळवंतराव यांनी निवडणूक लढवली आणि २६०५६२ मते मिळवून विजय मिळवला तर भारतीय लोक दलाच्या वतीने या ठिकाणी श्री.लावंगारे नितीन जगन्नाथ यांनी निवडणूक लढवली व त्यांना ६८९६१ मते मिळाली. कराड मतदारसंघात इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाच्या तिकीटावर श्रीमती चव्हाण प्रेमलाबाई दाजिसाहेब यांनी लोकसभेचा अर्ज भरला त्यांना २४३३०५ मते मिळाली तर त्यांच्या विरोधात श्री.देसाई भाऊसाहेब बळवंत यांनी शेतकरी कामगार पक्षातून अर्ज दाखल केला त्यांना ७२४९० मते मिळाली व श्रीमती चव्हाण प्रेमलाबाई दाजिसाहेब विजयी झाल्या

सन १९८० साली झालेल्या सातव्या सार्वत्रिक निवडणूकांसाठी सातारा मतदारसंघात तब्बल सात उमेदवार उभे होते. यावेळी काँग्रेस (अर्स) या पक्षातून श्री.चव्हाण यशवंतराव बळवंतराव यांनी निवडणूक लढवली आणि २२३२१३ मते मिळवून विजय मिळवला तर इंडीयन नॅशनल काँग्रेस (आय) च्या वतीने या ठिकाणी माजी मुख्यमंत्री असणाऱ्या श्री.वसंतदादा पाटील यांच्या पत्नी श्रीमती पाटील शालिनी वसंतराव यांनी निवडणूक लढवली व त्यांना १७०१८० मते मिळाली. तर कराड मतदारसंघात इंडीयन नॅशनल काँग्रेस (आय) पक्षाचे श्री.मोहीते यशवंतराव जिजाबा यांनी २१४८०७ मते मिळवून काँग्रेस (अर्स) पक्षाचे श्री.पाटील वसंतराव बाळकृष्ण यांचा पराभव केला. त्यांना २४०२२२ मते मिळाली.

सन १९८४ च्या आठव्या लोकसभा निवडणूकीसाठी सातारा मतदारसंघात आठ उमेदवार समोरासमोर होते. यापैकी इंडीयन नॅशनल काँग्रेस (आय) पक्षाचे श्री.भोसले प्रतापराव बाबुराव यांनी २७०११० मते मिळवत काँग्रेस (अर्स)पक्षाच्या श्री.निंबाळकर यशवंतसिंग आप्पासाहेब उर्फ दादाराजे खर्डेकर यांचा पराभव केला.त्यांना १७४५९० मते मिळाली.इकडे

कराड मतदारसंघात इंडीयन नॅशनल काँग्रेस (आय) पक्षामार्फत श्रीमती चव्हाण प्रेमलाबाई दाजिसाहेब यांनी निवडणूक लढवली त्यांना ३४६५७९ मते मिळााली व त्या विजयी झाल्या तर त्यांचे प्रतिस्पर्धी उमेदवार जनता पक्षाचे श्री.कच्छी युनुस अहमद यांना ६१३११ मते मिळाली.

नवव्या सार्वत्रिक लोकसभा निवडणूका सन १९८९ साली झाल्या. या निवडणूकांमध्ये सातारा मतदारसंघात तेरा उमेदवार होते. इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाच्या वतीने श्री.भोसले प्रतापराव बाबुराव यांनी निवडणूक लढवली आणि ३६९४६७ मते मिळवून विजय मिळवला तर जनता दलाच्या वतीने या ठिकाणी श्री.डी.डी.रणनवरे यांनी निवडणूक लढवली व त्यांना ५२४७६ मते मिळाली. कराड मतदारसंघात इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाच्या तिकीटावर श्रीमती चव्हाण प्रेमलाबाई दाजिसाहेब यांनी लोकसभेचा अर्ज भरला त्यांना ३४०६३१ मते मिळाली तर त्यांच्या विरोधात शाी.नायकवडी नागनाथ रामचंद यांनी अपक्ष अर्ज दाखल केला त्यांना १४७४६६ मते मिळाली व श्रीमती चव्हाण प्रेमलाबाई दाजिसाहेब विजयी झाल्या.

सन १९९१ च्या दहाव्या सार्वत्रिक निवडणूकीसाठी सातारा मतदार संघातून इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाच्या वतीने श्री.भोसले प्रतापराव बाबुराव यांनी निवडणूक लढवली आणि २६११२९ मते मिळवून विजय मिळवला तर शिवसेना पक्षाच्या वतीने या ठिकाणी श्री.हिंदुराव नाईक निंबाळकर यांनी निवडणूक लढवली व त्यांना १०१९१७ मते मिळाली. कराड मतदारसंघात इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाच्या तिकीटावर श्री.चव्हाण पृथ्विराज दाजिसाहेब निवडणूकीत उतरले व २७२४४० मते मिळवून विजयी झाले. त्यांच्या विरोधात श्री.नायकवडी नागनाथ रामचंद यांनी जनता दल पक्षाने उतरवले.त्यांना एकूण १८००६० मते मिळाली.

सन १९९६ च्या अकराव्या लोकसभा निवडणूकीसाठी सातारा मतदारसंघात सोळा उमेदवार निवडणूकीच्या रिंगणात होते. यापैकी शिवसेना पक्षाचे श्री.हिंदुराव नाईक निंबाळकर यांनी १९०५२६ मते मिळवत इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाच्या तिकीटावर निवडणूक लढवणाऱ्या श्री.भोसले प्रतापराव बाबुराव यांचा पराभव केला.त्यांना १७८७१७ मते मिळाली. कराड मतदारसंघात इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षामार्फत श्री.चव्हाण पृथ्विराज दाजिसाहेब यांनी निवडणूक लढवली त्यांना ३०७८४० मते मिळााली व ते विजयी झाले तर त्यांचे प्रतिस्पर्धी अपक्ष उमेदवार श्री.भोसले जयवंतराव कृष्णा यांना १५८२४४ मते मिळाली.

सन १९९८ साली बाराव्या लोकसभेसाठी निवडणूका लागल्या. यावेळी सातारा मतदारसंघात इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षामार्फत श्री.भोसले अभयसिंह शाहुमहाराज यांना विधानसभेऐवजी लोकसभेची संधी देण्यात आली.त्यांना ३८९२३८ मतदान मिळून ते विजयी झाले तर प्रतिस्पर्धी उमेदवार शिवसेनेचे श्री.हिंदुराव निळकंठराव नाईक निंबाळकर यांना २०७७६२ मते मिळाली. कराड मतदारसंघात श्री.चव्हाण पृथ्विराज दाजिसाहेब यांनी ३९९७९७ मते मिळवून शिवसेनेच्या श्री.भोसले जयवंतराव कृष्णा यांचा पराभव केला. त्यांना २२६८९० मते मिळाली.

बारावी लोकसभा लवकर बरखास्त झाली आणि सन १९९९ साली पुन्हा लोकसभेच्या निवडणूका लागल्या. या निवडणूकीत सातारा मतदारसंघात सहा उमेदवार निवडणूकीच्या रिंगणात होते. यापैकी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे श्री.जाधव पाटील लक्ष्मणराव पांडुरंग यांनी ३१३३२५ मते मिळवत शिवसेना पक्षाच्या तिकीटावर निवडणूक लढवणाऱ्या श्री.हिंदुराव नाईक निंबाळकर यांचा पराभव केला.त्यांना १८८५५४ मते मिळाली. कराड मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामार्फत श्री. पाटील श्रीनिवास दादासाहेब (मारूलकर)यांनी निवडणूक लढवली त्यांना ३५०५०४ मते मिळाली व ते विजयी झाले तर त्यांचे प्रतिस्पर्धी इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाचे उमेदवार श्री.चव्हाण पृथ्विराज दाजिसाहेब यांना २२७५४३ मते मिळाली.

अशा प्रकारे सातारा जिल्हयाची राजकीय वाटचाल असल्याचे दिसते. या वाटचालीत काही महत्त्वपूर्ण राजकीय व्यक्तिमत्वांनी भरीव योगदान दिलेले आहे.त्यांचा आढावा घेतला असता आपणास या कालखंडातील राजकीय घडामोडी लक्षात येतात.

## सातारा जिल्हयाच्या राजकारणातील काही महत्वपूर्ण व्यक्तिमत्वे:

सातारा जिल्हा हा क्रांतिकारकांचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. या जिल्हयाने स्वातंत्र्यापूर्वी ज्याप्रमाणे भारतीय स्वातंत्र्य लढयात महत्त्वाची कामगिरी बजावलेली आहे. त्याचप्रमाणे स्वातंत्र्योत्तर काळात सातारच्याच नव्हे तर महाराष्ट्र व देशाच्या राजकारणात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. या जिल्हयाने अनेक असे सुपूत्र जन्माला घातले आहेत की ज्यांनी राजकीय क्षेत्रात खूप मोठा प्रभाव पाडलेला आहे. त्यांच्या या वाटचालींचा आढावा घेणे या ठिकाणी आवश्यक आहे.

**क्रांतिसिंह नाना पाटील :**

महाराष्ट्रात (प्रामुख्याने सातारा, सांगली भागात) स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्त्व करणारे, तसेच प्रतिसरकार हा समांतर शासनाचा एकमेवाद्वितीय प्रयोग राबवणारे लढवय्ये कार्यकर्ते म्हणजे क्रांतिसिंह नाना पाटील होत. नाना पाटील यांचा जन्म सांगली जिल्हयातील बहे बोरगाव येथे झाला. लहानपणापासूनच नानांना दणकट शरीराचे वरदान लाभले होते. म्हणूनच पुढील काळातही त्यांच्या भारदस्त व्यक्तिमत्त्वामुळेच लोक त्यांच्याकडे आकर्षित होत. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर नानांनी काही काळ तलाठी नोकरी केली. पण समाजकारण व राजकारणाची ओढ असलेले नाना लवकरच नोकरीतून बाहेर पडले. १९३० च्या सविनय कायदेभंग चळवळीपासूनच त्यांचा स्वातंत्र्य लढयात सहभाग होता. स्वातंत्र्य लढा आणि बहुजन समाजाचा विकास या दोन्ही मार्गानी त्यांचे कार्य चालू होते. ब्रिटिश शासनाला समांतर अशी शासन यंत्रणा उभी केली पाहिजे. असा त्यांचा विचार होता. ‘आपुला आपण करू कारभार’ हे सूत्र त्यांनी इ.स.१९४२ च्या चले जाव चळवळीत प्रत्यक्ष अंमलात आणले. आपल्या देशाचा कारभार आपणच केला पाहिजे या जाणिवेतून प्रतिसरकार ही संकल्पना नानांनी प्रत्यक्षात आणली होती. प्रतिसरकारच्या माध्यमातून लोकन्यायालये, अन्नधान्य पुरवठा, बाजार व्यवस्था यासारखी लोकोपयोगी कामे केली जात. ब्रिटिशांची राज्यव्यवस्था नाकारून त्यांनी १९४२ च्या दरम्यान सातारा जिल्हयात स्वतंत्र राज्याची स्थापना केली.[१२८] या प्रतिसरकारच्या माध्यमातून बाजारव्यवस्था, अन्नधान्य पुरवठा, भांडणतंटे सोडविण्यासाठी लोकन्यायालयाची स्थापना, दरोडेखोरांना पिळवणूक करणाऱ्या सावकारांना व पाटलांना कडक शिक्षा अशी अनेक समाजोपयोगी कामे प्रतिसरकारच्या माध्यमातून करण्यात येत होती. या सरकार अंतर्गत क्रांतिसिंह नाना पाटील यांनी ‘तुफान सेना’ या नावाने सैन्य दलाची स्थापना केली होती. गावोगावचे १८ ते ४० वर्षे वयाचे तरूण या तुफान सेनेचे सैनिक होते.[१२९] ब्रिटिशांच्या रेल्वे पोस्ट आदी सेवांवर हल्ला करून त्याना नामोहरम करण्याचे तंत्रही नाना पाटील यांनी यशस्वीरित्या राबवले. १९४३ त १९४६ या काळात सातारा व सांगली जिल्हयातील सुमारे १५०० गावांत प्रतिसरकार कार्यरत होते. या संकल्पनेचा प्रयोग पुढे देशातही अनेक ठिकाणी करण्यात आला. १९२० ते १९४२ या काळात नाना ८ ते १० वेळा तुरूंगात गेले. १९३० च्या सविनय कायदेभंग चळवळीचे कार्य करण्यासाठी त्यांनी नोकरीचा त्याग केला. त्यांनी ग्रामीण

जनतेला गुलामगिरीची जाणीव करून देऊन, जनतेला धाडशी बनविण्याचा प्रयत्न केला. नानांवर वारकरी संप्रदायाचा प्रभाव होता. तसेच लोकांच्या भाषेत प्रभावी भाषणे करून त्यांच्यात प्रेरणा उत्पन्न करण्याची हातोटी नानांकडे होती. ग्रामीण भागातील, बहुजन समाजातील लोकांचा स्वाभिमान जागृत करून त्यांना स्वातंत्र्य चळवळीत सहभागी करून घेणे हे क्रांतिसिंहांचे प्रमुख योगदान होय.[१३०]

१९४२ ते ४६ या काळात ते भूमिगतच होते. ब्रिटिशांनी त्यांना पकडण्यासाठी बक्षिस लावले. जंगजंग पछाडले पण क्रांतिसिंह नाना पाटील ब्रिटिशांना सापडले नाहीत. ते भूमिगत असताना ब्रिटिशांनी त्यांच्या घरावर जप्ती आणली. त्यांची जमीनही सरकारजमा केली. याच काळात त्यांच्या मातोश्रीचे निधन झाले.

१९४६ साली सातारा भूमिगतांवरील क्रांतिसिंह नाना पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांच्यावरील पोलिस वॉरंट रद्द केली. क्रांतिसिंह नाना पाटील आपल्या सर्व भूमिगत कार्यकर्त्यांच्यासह कराड तालुक्यातील कोणेगाव येथे हे १९४६ मध्ये प्रकट झाले. त्यानंतर त्यांचे व त्यांच्या सहकार्यांचे सत्कार महाराष्ट्रभर सुरू झाले. केशवराव जेधे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष होते. त्यांनी क्रांतिसिंह नाना पाटील व साताराचे भूमिगत कार्यकर्ते यांचा गौरवपूर्ण उल्लेख करण्यास सुरूवात केली. त्याचबरोबर मुंबई इलाख्याचे श्री. बाळासाहेब खेराचे मंत्रिमंडळ हे वरिष्ठ वर्गाची पाठराखण करत असून बहुजन समाजाच्या विरोधात काम करत असल्याची कडवट टिका जाहीरपणे करण्यास सुरूवात केली. त्यातून वरिष्ठ ब्राम्हणी वर्गाचे नेतृत्त्व श्री. बाळासाहेब खेर, श्री. मोरारजी देसाई, श्री. शंकरराव देव, श्री. मामासाहेब देवगिरीकर विरूद्ध बहुजन समाजातील नेतृत्त्व यांच्यातील दरी अधिकच रूंदावत गेली. त्यांच्यामधील अंतर्गत संघर्ष अधिकच तीव्र होत गेला. अशा संघर्षाच्या वातावरणामध्ये इंग्रजांनी १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य दिले. श्री. केशवराव जेधे, क्रांतिसिंह नाना पाटील, श्री. शंकरराव मोरे, श्री. तुळशीदास जाधव, श्री. भाऊसाहेब राऊत, श्री. दत्ता देशमुख, श्री. काकासाहेब वाघ हे बहुजन समाजातील नेते बाहेर पडले व त्यांनी ऑगस्ट १९४८ रोजी रीतसर शेतकरी कामगार पक्षाची स्थापना केली.[१३१]

शेतकरी कामगार पक्षाच्या स्थापनेनंतर क्रांतिसिंह नाना पाटील पुन्हा एकदा संपूर्ण महाराष्ट्रभर झंझावती दौरा काढून पक्षाला महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात जनमानसामध्ये भक्कम

आधार मिळवून दिला. तथापि शेकाप पक्ष्यामध्येही श्री. शंकरराव मोरे यांच्या स्वभावामुळे क्रांतिसिंह नाना पाटील, श्री. दत्ता देशमुख या पुढाऱ्यांचे त्यांचे पटले नाही. त्यामुळे सन १९५२ मध्ये शेतकरी कामगार पक्ष सोडून कामगार किसान पक्ष या नव्या पक्षाची स्थापना केली.

१९५२ च्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत शेतकरी कामगार पक्ष व कामगार किसान पक्ष एकमेकांच्या विरोधात लढले. परिणामी दोन्ही पक्षांचे नुकसान झाले व काँग्रेस पक्ष प्रचंड बहुमताने विजयी झाला. त्यानंतर श्री. केशवराव जेधे, श्री. शंकरराव मोरे, श्री. तुळशीदास जाधव यासारखे शेकाप पक्षाचे मोहरे एकापाठोपाठ एक पुन्हा काँग्रेसमध्ये दाखल झाले. कामगार किसान पक्षही पुन्हा फुटला या सर्व परिस्थितीतचा विचार करून क्रांतिसिंह नाना पाटील यांनी अखेर १९५३ मध्ये भारतीय कम्युनिस्ट पक्षात प्रवेश केला व अखेरपर्यंत याच पक्षात कार्यरत राहिले. या संदर्भात क्रांतिसिंह नाना पाटील सारखे सारखे पक्ष का बदलतात? अशी टिकाही होऊ लागली. त्यावेळी त्यांनी या टीकेला अगदी समर्पक उत्तर दिले आहे. त्यांनी उदाहरण दिले की, "मला मुंबईला जायचे निश्चित होते यासाठी मी कोल्हापूरला रेल्वेत बसलो परंतु मिरजेत आल्यावर ती मुंबईला जात नाही असे समजल्यावर मी दुसऱ्या गाडीत बसलो. पुढे पुण्यात आल्यावर तीही गाडी मुंबईला जात नाही हे लक्षात आल्यावर मुंबईला जाणारी दुसरी गाडी पकडली पण म्हणून मला ज्या ठिकाणी जायचे होते ते जाण्याचे ठिकाण मी काही बदलले नाही. ज्या ठिकाणी जायचे होते ते ठिकाण निश्चित होते. त्या ठिकाणी जाण्यासाठी वाटेत गाडया बदलणे आवश्यक होते. म्हणून मी गाडया बदलल्या. तसे माझे ध्येय निश्चित आहे. कष्टकरी बहुजन समाजाच्या सुखाच्या अंतिम ध्येयाप्रत पोहोचणे हेच माझे ध्येय आहे. त्यासाठीच मी मध्ये मध्ये पक्ष बदलले."[१३२]

महाराष्ट्रातील बहुजन समाज, कष्टकरी शेतकरी वर्गामध्ये त्यांचे असलेले काम व त्या वर्गात त्यांनी मिळविलेली लोकप्रियता ध्यानात घेवून कम्युनिस्ट पक्षाने महाराष्ट्रातील किसान सभेची जबाबदारी त्यांच्यावरच सोपवली. १९५४ मध्ये महाराष्ट्र राज्य किसान सभेच्या अध्यक्षपदी त्यांची बिनविरोध निवड झाली. १९५५ च्या मे महिन्यात अखिल भारतीय किसान सभेच्या अध्यक्षपदी निवड झाली. किसान सभेच्या व्यासपीठावरून त्यांनी शेतकऱ्यांच्या अनेक प्रश्नांना वाचा फोडली, अनेक लढे लढवले. खंडकरी शेतकऱ्यांचा लढा, वाढीव पाणीपट्टी विरूद्धचा लढा, सक्तीच्या लेव्ही विरूद्धचा लढा, धरणग्रस्त शेतकऱ्यांचा लढा असे अनेक प्रश्न

घेवून पुन्हा एकवेळ स्वातंत्र्यातील,सत्ताधीशांच्या विरोधात तीव्र संघर्ष केला. शेतीमालाच्या बाजारभावाची कैफियत त्यांनीच या देशाच्या संदर्भात पहिल्यांदा मांडली. शेतकऱ्याने पिकविलेल्या शेतीमालाचे भाव त्यांच्या उत्पादन खर्च लक्षात घेऊन सरकारने बांधून दिले पाहिजेत ही मागणी या देशात पहिल्यांदा क्रांतिसिंह नाना पाटील यांनी मांडली हे सर्वांना मान्य करावे लागेल.[१३३] भारतीय शेतकऱ्यांच्या या लाडक्या नेत्याला १९५५ मध्ये ऑगस्ट महिन्यात सोव्हियत युनियनने आपल्या देशाच्या भेटीचे निमंत्रण दिले. या निमंत्रणावरून भारतीय शेतकऱ्यांच्या शिष्ट मंडळाचे नेतृत्त्व करून सोव्हिएत युनियन, झेकोस्लोव्हाकिया व हंगेरी या देशांना भेटी देण्याचा बहुमान मिळाला. सन १९५७ साली सातारा व १९६७ साली बीड मतदारसंघातून ते लोकसभेवर निवडून गेले.[१३४] संसदेत मराठीतून भाषण करणारे ते पहिले खासदार होते.[१३५] स्वातंत्र्यपूर्व काळापासून प्रामुख्याने सांगली जिल्हयासह संपूर्ण महाराष्ट्रात एक प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व म्हणून सातत्याने प्रकाशात असणाऱ्या क्रांतिसिंहाचे ६ डिसेंबर १९७६ रोजी वाळावा या गावी निधन झाले. मला वाळव्यामध्येच दहन करण्यात यावे ही त्यांची इच्छा होती त्यानुसार वाळव्यामध्येच त्यांचे दहन करण्यात आले.[१३६]

**आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार : श्री. यशवंतराव चव्हाण**

कोणताही मानव काही श्रध्दा व तत्वज्ञान यांनी प्रेरीत झालेला असतो आणि चांगल्या विचारांखेरीज चांगले घडू शकत नाही अशा सुधारणावादी विचारांनी प्रेरीत झालेले व्यक्तिमत्व म्हणजे ' श्री. यशवंतराव चव्हाण' हे होय.स्वातंत्र्यप्राप्तीनंतर महाराष्ट्राच्याच नव्हे तर देशाच्या राजकिय धोरणांवर ज्या महनिय व्यक्तींचा प्रभाव पडलेला दिसतो त्यामध्ये मा.यशवंतराव चव्हाण यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. सुधारणावादी विचार आणि त्याच प्रकारचे तत्वज्ञान यांची प्रेरणा घेऊन यशवंतरावांनी महाराष्ट्राचे नेतृत्व केले. बहुजन समाजाच्या चौफेर विकासाचा विचार करून यशवंतरावांनी समाजवादी समाजरचना निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसते. नेतृत्वाच्या संकल्पनेत सामान्य विशिष्ठ स्थान प्रतिष्ठा किंवा गुणवत्ता पुढारी व अनुयायी संबंधात व सक्रिय कार्याचे तत्व यांचा समावेश होतो. नेतृत्वाबाबत बोलताना आर.एम.स्टॉगडिल हे लेखक म्हणतात कि, "नेतृत्व म्हणजे निष्क्रीय स्थान किंवा विशिष्ट गुणवत्ता असलेले व्यक्तिमत्व नाही. एखाद्या समुहाच्या कार्यातील सक्रिय सहभाग व स्वातंत्र्याच्या नेतृत्वाने ते कार्य यशस्वी करण्याची क्षमता यामुळे नेत्याचे विशिष्ट स्थान निर्माण होते."[१३७]

हे स्थान यशवंतरावांनी आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात निर्माण केले व महाराष्ट्राच्या राजकीय, शैक्षणिक, सामाजिक, साहित्यिक, आर्थिक, सांस्कृतिक, जडणघडणीत मोलाचे योगदान दिलेले दिसते.'यशवंतराव चव्हाण ही एक व्यक्ती नसून तो एक विचार आहे' असे जेव्हा म्हटले जाते तेव्हा ती केवळ अलंकारीक भाषा नसते तर महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक व आर्थिक परिवर्तनाच्या विचारधारेला विकसित करण्याचे कार्य ती आपल्या समोर उभी करते. सत्तास्थानी राहून या विचारांना व्यावहारीक पाया मिळवून देण्याचे अत्यंत महत्त्वपूर्ण कार्य त्यांनी केलेले दिसते.

**पूर्वचरीत्र :**

यशवंतरावांचा जन्म १२ मार्च १९१३ रोजी श्री. बळवंतराव आणि विठाबाई या दाम्पत्याच्या पोटी तत्कालिन सातारा जिल्हयातील देवराष्ट्रे या गावी झाला.[१३८] सन १९१७ साली प्लेगच्या साथीमध्ये त्यांच्या वडिलांचे निधन झाले. त्यावेळी यशवंतरावांचे वय अवघे ४ वर्षाचे होते.[१३९] त्यानंतर आईसोबत त्यांनी आपल्या बालपणीचे थोडे दिवस देवराष्ट्रे येथे घालवले. पितृछत्र बालपणीच हरवल्यामुळे यशवंतरावांना घडवण्याची जबाबदारी त्यांची माता विठाबाई यांनी बखुबी वठवली.त्यांच्या प्राथमिक शिक्षणाचा आरंभ तेथेच झाल्याचे दिसते. पुढील प्राथमिक व माध्यमिक शिक्षण त्यांनी कराडला घेतले. सन १९३८ मध्ये त्यांनी इतिहास व राज्यशास्त्र या विषयांतून मुंबई विद्यापीठाची बी.ए.पदवी मिळवली. पुढे सन १९४१ मध्ये पुण्याच्या लॉ कॉलेजमधून एल.एल.बी.प्राप्त केली. शिक्षण पूर्ण होताच श्री. यशवंरावांचे लग्न फलटण येथील श्री. रघुनाथराव मोरे यांची कन्या वेणूताई यांच्याशी करून देण्यात आले.

**राजकारण :**

श्री. यशवंतरावांचे शिक्षण चालू असतानाच महात्मा गांधीजींच्या स्वातंत्र्य आंदोलनाने ते प्रभावित झालेले होते. सन १९३० साली म.गांधीजींनी कायदेभंगाचा लढा उभारला. या आंदोलनावेळी यशवंतरावांनी तिरंगा फडकवल्याबद्दल अठरा महिन्यांची सक्त मजूरीची शिक्षा त्यांना झालेली होती. सन १९४० साली श्री. यशवंतरावांची सातारा जिल्हा कॉंग्रेसच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली. पुढे १९४२ साली देशभरात चलेजाव आंदोलनाचे वारे वाहू लागले. या कालखंडात त्यांनी भूमीगत पध्दतीने कार्य करण्यास प्रारंभ केला परंतु दुर्दैवाने ते पकडले गेले आणि त्यांना दोन वर्षांचा कारावास भोगावा लागला. यामुळे यशवंतराव डगमगले

नाहीत तर त्यांच्या राजकीय कर्तृत्वाला आणखीन धार प्राप्त झाली. १६४६ साली झालेल्या कायदेमडळांच्या निवडणूकीत श्री. यशवंतराव दक्षिण सातारा या मतदार संघातून निवडून गेले. यावेळी त्यांना गृहखात्याचे पार्लेमेंटरी सेक्रेटरी म्हणून नेमण्यात आले. सन १९५२ मध्ये कराड मतदारसंघातून विधानसभेवर निवड होऊन ते नागरी पुरवठा मंत्री झाले.[१४०] सन १९५६ मध्ये द्विभाषिक मुंबई राज्याची स्थापना होऊन द्विभाषिक राज्याचे मुख्यमंत्री म्हणून त्यांची निवड झाली.[१४१] १९५६ ते १९६० हा कालखंड संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा होता. गुजराथी पुढारी मुंबई गुजरात राज्याला मिळावी यासाठी प्रयत्नशिल होते. या बिकट प्रसंगी यशवंतरावांच्या नेतृत्वाची कसोटी लागली. श्री. यशवंतराव चव्हाण नेहमी पं.नेहरूंना झुकते माप देत असत. त्यांच्या या वागण्यामुळे काही काळ संयुक्त महाराष्ट्र चळवळवादी आणि श्री. यशवंतराव चव्हाण यांच्यात तणाव निर्माण झालेला दिसतो. त्यांची भूमिका स्पष्ट होती की, आधी केंद्रिय नेतृत्व मुंबईसह महाराष्ट्र या कल्पनेला राजी होऊ द्यावे. श्री. यशवंतरावांनी फलटण येथील १ डिसेंबर १९५५ च्या सभेतील भाषणात, संयुक्त महाराष्ट्रापेक्षा पं.नेहरू अधिक मोठे आहेत. त्यांच्या नेतृत्वाचा आदर करणे हे मी अधिक महत्वाचे समजतो. असे म्हटले होते.[१४२] त्यांच्या या भूमिकेमुळे श्री. यशवंतराव महाराष्ट्रात अप्रिय ठरलेले होते. महाराष्ट्रात असे वातावरण असतानाच १६५६ साली श्री. यशवंतराव चव्हाण मुख्यमंत्री झाले.

संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीच्या भूमीकेत श्री. यशवंतरावांचा दुरदर्शीपणा होता. महाराष्ट्रापेक्षा देश महत्वाचा आहे. मुख्य राष्ट्रीय प्रवाहापासून आपण वेगळे राहीलो तर आपल्या राज्याची प्रगती खुंटेल अशी भिती यशवंतरावांना होती. पं.नेहरूंशी एकनिष्ठ राहून महाराष्ट्राचा प्रश्न त्यांनी सोडवला.व्दिभाषिक मुंबई राज्याचे विभाजन होऊन १ मे १९६० रोजी स्वतंत्र महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. श्री. यशवंतरावांनी महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीपासूनच महाराष्ट्र एकसंध कसा राहील याकडे राजकारण विरहीत प्रेमळ नजरेने पाहीले. सुरूवातीपासूनच वेगळया विदर्भाची जी मागणी पुढे येत होती ती महाराष्ट्राला अहितकारक आहे हे ओळखून श्री. यशवंतरावांनी पं.नेहरूंव्दारे श्री. कन्नमवारांना उपमुख्यमंत्रीपद दिले व वेगळया विदर्भाची मागणी सोडायला लावली.[१४३]

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री या नात्याने श्री. यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्रात केवळ प्रशासनावर भर न देता काही अत्यंत महत्त्वाचे निर्णय घेतले. विकेंद्रिकरणाला महत्व, पंचायत

राज, कसेल त्याची जमीन, सहकारी तत्वांवर १८ साखर कारखान्यांची उभारणी, पाटबंधारे व उद्योग विकासासाठी मंडळ, बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण आणि मराठी भाषेला राज्य भाषेचा दर्जा मिळवून दिला.[१४४] १९६२ साली चीनने भारतावर एकतर्फी आक्रमण केले यावेळी पं.नेहरूंनी यशवंतरावांना दिल्लीच्या राजकारणात बोलावले आणि त्यांना भारताचे संरक्षणमंत्रीपदी नियुक्त केले. १९६२ ते १९६६ या त्यांच्या संरक्षणमंत्री पदाच्या कार्यकाळात त्यांनी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतलेले आहेत. भारतीय हवाई दल मजबूत असावे याकरीता त्यांनी 'मिग–२१' ही लढाऊ विमान तयार करणाऱ्या सार्वजनिक क्षेत्रातील स्वतंत्र कंपनीची स्थापना करून विमान उत्पादनास प्रारंभ केला.[१४५] १९६५ चे भारत पाकिस्तान युध्द यशवंतरावांच्या कसोटीचा क्षण ठरला. या युध्दानेच श्री. यशवंरावांचे मुत्सद्दी नेतृत्व सर्वमान्य झाले.देशाचे सर्व सैन्य व जनता यशवंतराव चव्हाण यांच्याकडे एक समर्थ राजकीय नेता म्हणून पाहू लागली.[१४६] भारताच्या संरक्षण मंत्रीपदानंतर श्री. यशवंतरावांनी भारताचे गृहमंत्रीपद देखील सांभाळले. १९७० साली त्यांच्यावर केंद्रिय अर्थखात्याची जबाबदारी देण्यात आली. या ठिकाणी देखील यशवंतराव यशस्वीच ठरले. १९७४ साली त्याच्या खात्यात बदल करून त्यांना परराष्ट्रमंत्री पद देण्यात आले. श्री. यशवंतराव चव्हाण जसे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून ओळखले जातात तसेच ते भारतीय परराष्ट्र व्यवहाराचे शिल्पकार म्हणूनही ओळखले जातात. एक मुरब्बी, निर्णकुशल प्रशासक, अभ्यासू चतुरस्त्र वक्तृत्व शैली असणारा विव्दान राजकारणी अशीही त्यांची ओळख आहे.

**शिक्षण व साहित्य :**

शिक्षणसमाज परिवर्तनाचे एक प्रभावी माध्यम आहे. त्याचा उपयोग समाजहितासाठी करणे गरजेचे ठरते. भारत हा खेडयांचा देश असल्याने भारताचा संपूर्ण विकास करण्यासाठी शिक्षणाची ज्योत ग्रामीण भागात घरोघरी पेटवली जावी हा यशवंरावांचा ध्यास होता. श्री. यशवंतराव चव्हाण आपले शैक्षणिक विचार स्पष्ट करताना म्हणतात की, शिक्षण ही सामाजिक गरज असली तरी ते आर्थिक विकासाचे एक मुलभूत साधन आहे. व्यक्तीला शिक्षणाची जोड दिल्याशिवाय समाजात नवीन सामर्थ्य निर्माण होणार नाही.[१४७] श्री. यशवंतराव चव्हाण आपली शिक्षणाची व्याख्या स्पष्ट करताना म्हणतात कि, "शिक्षित व्यक्तीला स्वतःभोवती घडणाऱ्या इतर गोष्टी आणि जगामध्ये घडणाऱ्या इतर गोष्टी यांची ज्यामुळे संगती लावता येते, त्यांचा योग्य

अर्थ समजावून घेता येतो आणि त्याचा परिणाम आपल्या जीवनावर व व्यक्तीमत्वावर काय घडतो हे समजावून घेता येते आणि समजावून देता येते, त्याला शिक्षण म्हणतात."[१४८] श्री. यशवंतरावांना इतिहास, मराठी व गणित विषयांची फार आवड होती. इतिहास म्हणजे केवळ पुनरावृत्ती असा ठोकळ हिशोब ते करत नसत. इतिहास काल घडला, आज घडत आहे आणि उद्या घडणार आहे अशी त्यांची इतिहासाची उत्क्रांतीवादी श्रध्दा होती.[१४९] या शैक्षणिक विचारातूनच त्यांनी शिक्षण विकासाच्या अनेक योजना कार्यान्वित केल्या.

महाराष्ट्रामध्ये राजकीय, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक विकासासाठी सर्वत्र प्राथमिक शिक्षणाचा प्रचार प्रसार होणे गरजेचे आहे असे त्यांचे मत होते. शिक्षणासंदर्भात व्यक्त केलेले मत या संदर्भात अतिशय महत्त्वपूर्ण आहे. ते म्हणतात, समाजभिमुख शिक्षणाची संकल्पना मांडताना, शिक्षणातून केवळ ज्ञानाची उपासना वा बुध्दीची जोपासनाच करून चालणार नाही, तर भावनांची प्रगल्भता आणि अंतःकरणाचा मोठेपणा अंगी असणे आवश्यक आहे. मानवाचे मन शिक्षणाच्या संस्काराने अधिक संपन्न केल्याशिवाय समाज खऱ्या अर्थाने समाज बनत नाही.[१५०] शिक्षण घेतल्याने मानव स्वावलंबी होऊ शकतो आणि आपली प्रगती करून घेऊ शकतो. यामुळे शिक्षण घेण्याचा आणि सर्वांपर्यत शिक्षण पोहचवण्याचा संकल्प घेतला तर आपण निश्चितपणे प्रगती करू शकतो. यामुळेच यशवंतराव म्हणतात की, "शिक्षण व राष्ट्रीय दृष्टीकोणाचा अभाव यामुळे आपल्याला जीवनाच्या सर्वच क्षेत्रात माघार घ्यावी लागते. याऊलट शास्त्रीय वैज्ञानिक ज्ञानाने युक्त अशी राष्ट्रे स्वतःचे सार्वभौमत्व अखंड ठेऊ शकतात. इतकेच नव्हे तर दुसऱ्याच्या मदतीला धावूनही जाऊ शकतात. यामुळे शिक्षणरूपी ज्ञानाचा झरा वाहवत ठेवणे गरजेचे ठरते. असत्यातून सत्याकडे, अंधारातून प्रकाशाकडे, मृत्यूपासून अमृत्युकडे मला ने या अमृत्वाच्या प्राप्तीसाठी देवांनी समुद्रमंथन केले. पण त्या समुद्रमंथनातून अमृत शिल्लकच राहिलेले नाही. म्हणून आता ज्ञान हेच अमृत आहे. या अमृताने तुम्हाला समर्थ बनायचे आहे. समाजजीवन समर्थ बनवायचे आहे."[१५१]

श्री. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री पदावर असताना त्यांनी शैक्षणिक बाबतीत अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतल्याचे दिसते.सन १९५८ साली मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद येथे स्थापन झाले. आर्थिकदृष्ट्या कमकुवत असणाया विद्यार्थ्यांना इ.बी.सी. सवलत सुरू केली. सन १९६२ साली कोल्हापूरला शिवाजी विद्यापीठाची स्थापना, राहुरी येथे कृषी

विद्यापीठाची स्थापना, आदिवासींच्या मुलांसाठी आश्रमशाळांची स्थापना. साताऱ्यात सैनिक स्कुलची स्थापना, कराड व औरंगाबादेस अभियांत्रिकी महाविद्यालयांची सुरूवात, सर्वात महत्त्वपूर्ण बाब म्हणजे ते तहहयात रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष होते आणि जेव्हा ते या संस्थेचे अध्यक्ष झाले तेव्हा ते उदगारले होते की, "मी मुख्यमंत्री झालो त्यापेक्षा अधिक आनंद मला मी रयत शिक्षण संस्थेचा अध्यक्ष झालो त्यावेळी झाला."[१५२] नवोदित लेखक व कवींना प्रेरणा मिळावी व त्यांचे ग्रंथ प्रकाशित व्हावेत या हेतूने त्यांनी महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाची स्थापना केली.ते स्वतः एक उत्तम लेखक होते. १९७५ साली कराडला झालेल्या साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष आणि १९८४ सालच्या विदर्भ साहित्य संमेलनाचे उदघाटक असे साहित्यीक सन्मानही त्यांना मिळालेले होते. 'कृष्णाकाठ ही कृती त्यांच्यातील साहित्यीकाचे दर्शन घडवते. १ मे १९६० रोजी शपथविधी समारंभात महाराष्ट्राचा राज्यकारभार इंग्रजी ऐवजी मराठीत चालवण्याचे त्यांनी आश्वासन दिले व यासाठी त्यांनी डायरेक्टोरेट ऑफ लँगवेजेस हे खाते सुरू केले.[१५३]

**अर्थकारण :**

आर्थिक सुब्बत्ता हा कोणत्याही राष्ट्राचा 'कणा' असतो. महाराष्ट्र असो वा भारत देश यांच्या आर्थिक मजबुतीसाठी यशवंतरावांनी काही मुलगामी स्वरूपाचे विचार मांडलेले आहेत. त्यांच्या मते वैयक्तिक जीवनात जशी आपण प्रगती करतो तशीच ती सार्वजनिक जीवनात करावयाची असते. राज्य कारभारामध्ये सुधारणा व प्रगती करण्याचे ठरवून तुम्ही आणि मी जर काम करणार असलो तरी आत्मसंशोधनाची आत्मटीकेची आपल्याला फार जरूरी आहे.यशवंतरावांच्या मनातील देशाच्या आर्थिक विकासाची तळमळ, त्यांची आर्थिक विश्लेषणाबाबतची बुध्दी आणि कसब या गोष्टी लक्षात घेऊन इंदीरा गांधींनी आपल्या मंत्रिमंडळात १९७०–७१ साली अर्थमंत्री पदावर त्यांना नेमले. तेव्हांपासून सन १९७५ पर्यंत पाच वर्ष त्यांनी देशाचे अर्थमंत्रीपद सांभाळले. त्यांच्या मते देशाची आर्थिक वा राजकीय परिस्थीती कशा प्रकारची आहे यापेक्षा त्यांचे नियोजन कशा प्रकारचे आहे यावर त्यांची प्रगती अवलंबून असते. नियोजनाचे महत्व मांडताना यशवंतराव सांगतात आपले कुटूंब, गाव, समाज आणि राष्ट्र यांच्या प्रगतीची इमारत उभारण्याकरीता समाजवाद, लोकशाही आणि नियोजन अत्यंत महत्वाचे आहे.एखाद्या देशाची आर्थिक, सामाजीक किंवा राजकीय पध्दती कोणती का

असेना आर्थिक विकसनशिल किंवा आर्थिक विकासातील नियोजनाचे महत्व त्या देशाला कळालेले नसेल तर त्याला आर्थिक क्षेत्रात प्रगती करणे फार अवघड होऊन जाईल.[१५४] असे यशवंतराव चव्हाणांचे स्पष्ट मत होते.

अर्थमंत्री पदावर कार्यरत असताना त्यांनी देशातील काळया पैशावर नियंत्रण ठेवण्याची निकड त्यांनी वारंवार प्रतिपादीत केलेली दिसते. ते म्हणतात, "या काळया पैशाच्या निर्मितीची साधने बरीच असतात. कर चुकवेगिरी हे त्यातले एक प्रमुख साधन होय. याद्वारा प्राप्तीकर चुकवला जातो. या मिळकतीचा अंदाज सन १९६८–६९ मध्ये १४०० कोटी रू.इतका वांछू समितीने केल्याचा दाखला यशवंतराव देतात. या काळया पैशाच्या नियंत्रणाची नितांत गरज असल्याचे प्रतिपादन त्यांनी वारंवार केले होते."[१५५] महाराष्ट्राच्या समतोल विकासासाठी त्यांनी प्रयत्न केल्याचे दिसते. महाराष्ट्रातील ग्रामीण भागात शेतीमालावर प्रक्रिया करण्याचे उद्योग उभारावेत असे त्यांचे मत होते. ग्रामीण भागात उद्योगांची उभारणी करण्यासाठी येथे औद्यौगिक वसाहती स्थापन कराव्या आणि त्यात वीज, पाणी, रस्ते आदींची सोय करावी हा त्यांचा विचार एम.आय.डी.सी.च्या रूपाने सत्य झाला. या अनुशंगानेच १ ऑगस्ट १९६२ रोजी महाराष्ट्र राज्य औद्यौगिक विकास महामंडळाची स्थापना ठाण्यातील वागळे इस्टेटमध्ये तात्कालिन मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या उपस्थितीत समारंभपूर्व करण्यात आली.[१५६] उद्योगांच्या सोबतच कृषी विकासाकडेही त्यांनी तितकेच लक्ष दिले होते. भुमिहीनांचा प्रश्न असो किंवा शेतीच्या आधुनिकीकरणाचा श्री. यशवंतराव नेहमीच ते सोडवण्यात आघाडीवर असल्याचे दिसते.शेती उत्पादन वाढवण्यासाठी सहकारी तत्वावर शेती पध्दतीचा पुरस्कार करावा या मताचे ते होते. सहकारी चळवळीबाबत आपले मत मांडताना म्हणतात, "सहकारी चळवळ ही काही एखाद्या पक्षाची चळवळ नव्हे. तात्वीकदृष्टया सहकारी चळवळ ही मुख्यतः लोकशाहीची चळवळ आहे हे आपण विसरता कामा नये. सामान्य आणि शोषीत समाजाच्या उपायोगी पडणे हा तर या चळवळीचा प्राणच आहे. पण खऱ्या अर्थाने आपल्याला ही चळवळ चालवायची असेल तर तिच्याकडे आपण लोकशाहीच्या दृष्टीकोणातून पाहीले पाहीजे. लोकाशाही हे जे तिचे स्वरूप आहे ते आपण सुरक्षित ठेवले पाहीजे, जोपासले पाहीजे."[१५७] शेतीसंबंधी त्यांची विचारसरणी आधुनिक स्वरूपाची होती.कसेल त्याची जमीन हा कायदा त्यांनी अमलात आणला. कोयना आणि उजनी प्रकल्पांच्या उभारणीला गती दिली. श्री. यशवंतरावांनी महार वतने नष्ट केली व

दलितांच्या इनामी जमिनी त्यांच्या मालकीच्या केल्या व त्यांना गावाच्या कामाच्या शेकडो पिढयांच्या वेठबिगारीतून मुक्त केले.[१५८] थोडक्यात श्री. यशवंतरावांचे जे योगदान महाराष्ट्र राज्याच्या राजकीय क्षेत्रात दिसते तेच योगदान महाराष्ट्र राज्याच्या शैक्षणिक, सामाजिक व साहित्यीक क्षेत्रात नक्कीच आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

श्री. यशवंतराव चव्हाण यांनी केलेल्या कार्याची दखल अवघ्या महाराष्ट्रानेच घेतलेली नाही तर अवघा भारतवर्ष त्यांचे गोडवे गातो. त्यांच्या कार्याची पोहोच म्हणून त्यांना जे मानसन्मान मिळालेले आहेत ते पुढीलप्रमाणे सांगता येतील. डिसेंबर १९५९ मध्ये अलिगड मुस्लिम विद्यापीठाची ऑनररी डीग्री ऑफ एल.एल.डी. मिळालेली होती. त्याचप्रमाणे कानपूर विश्वविद्यालय, मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर या विद्यापीठांनी डॉक्टर ऑफ लॉ, मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी यांनी १९७६ साली डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी तर मार्च १९८४ मध्ये पुणे विद्यापीठाने डि.लिट. ही पदवी देऊन सन्मानित केले. ३१ मे १९८६ रोजी क्षेत्र माहूली येथिल श्री. रामशास्त्री प्रभूणे प्रतिष्ठानाने मरणोत्तर सामाजिक न्याय पुरस्कार देऊन त्यांना सन्मानित केले होते.[१५९]

अशा एका तेजस्वी राष्ट्रीय नेतृत्वाचा अस्त दिनांक २५ नोहेंबर १९८४ रोजी झाला आणि अवघा महाराष्ट्र एका असामान्य राजकीय कतृत्वाला आणि प्रतिभावंताला मुकला.[१६०]

**लोकसंग्रही नेतृत्व : श्री. किसन वीर**

भारतीय स्वातंत्र्यलढयातील महत्त्वपूर्ण चळवळ म्हणून चले जाव चळवळीकडे पाहीले जाते. या चळवळीत सातारा जिल्हयात आणि वाई तालुक्यात महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या व्यक्तीमध्ये स्व.किसन वीर यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. दि.११ ऑगस्ट १९०६ रोजी गोकुळाष्टमी दिवशी किसन वीर यांचा जन्म झाला. पुराणानुसार या दिवशी श्रीकृष्णाचा जन्म झालेला असल्याने या बालकाचे नाव किसन असे ठेवण्यात आले.[१६१] श्री. किसन वीर अवघे एक वर्षांचे असताना प्लेगच्या साथीत त्यांची आई वारली आणि येथून पुढे त्यांच्या मोठया भावच्या पत्नीने म्हणजेच त्यांच्या वहीनीने त्यांचा मुलाप्रमाणे सांभाळ केला.[१६२] श्री. किसन वीरांचे वडील कापडाचे व्यापारी होते आणि त्यांच्या या कामात किसन वीर आणि त्यांचे भाऊ मदत करत असत. किसन वीरांची वैचारीक जडणघडण बालवयातच झालेली दिसते. त्यांच्या या विचारसरणीला योग्य मार्गदर्शन मिळाले म.गांधीजींच्या सातारा दौऱ्याप्रसंगी. या दौऱ्यात

म.गांधीजींनी वाई, सातारा व सांगली येथे सभा घेतल्या. म.गांधीजींच्या वाई येथील सभेला किसन वीर आपल्या मित्रांसह हजर होते.[१६३] यानंतरच्या काळात म.गांधीजींच्या विचारांनी श्री. किसन वीर भाराऊन गेलेले दिसतात. याचदरम्यान पाचगणीच्या श्री. हरीभाऊ गाडेकर यांची कन्या राधाबाई यांच्याशी त्यांचा विवाह झाला.[१६४] तर किसन वीरांचा दुसरा विवाह १९२६ मध्ये एकनाथ तुकाराम एकबोटे यांची कन्या लक्ष्मीबाई यांच्याशी झाला.[१६५] पुढील काळात किसन वीर वैयक्तीक जीवनात अत्यंत हालाखीचे जीवन जत होते. त्यांच्या वडील बंधूंचे निधन झाले त्यातच त्यांचे राहते घर आणि विक्रीसाठी आणलेला कपडे आग लागून जळून गेली.[१६६] यानंतर त्यांनी करंजखोपच्या श्री. कुलकर्ण्यांची व वाघोलीच्या श्री. भोईटयांची जमीन आपल्या सासऱ्यांच्या मदतीने वार्षिक खंडावर घेतली. पं.नेहरूंनी काँग्रेसच्या कलकत्ता अधिवेशनात ‘स्वराज्या’ची मागणी केली. याला सातारमधून भरपूर प्रमाणात प्रतिसाद मिळाला. सातरामध्ये ज्याप्रमाणे श्री. भाऊसाहेब सोमण तर कराडमध्ये श्री. अळतेकर यांनी काँग्रेसची सदस्यसंख्या वाढवण्यासाठी प्रयत्न केले तसेच प्रयत्न श्री. किसन वीरांनी कवठे व परिसरात मध्ये केलेले दिसतात.[१६७]

श्री. किसन वीरांच्या जीवनात एक मोठा बदल घडवून आणण्यात ‘श्री. त्रिंबक वामन कुलकर्णी किंवा श्री. देव मास्तर’ यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. श्री. देव मास्तरांशी किसन वीरांची स्वातंत्र्यचळवळीबाबत नियमीत चर्चा होत असे. त्यांनीच श्री. किसन वीरांना भारतीय क्रांतीकारकांची चरित्रे वाचण्यास दिली. किसन वीर हे छ.शिवाजी महाराज व मराठा इतिहास याने प्रभावीत झाले. श्री.एन.के.बेहरे यांच्या ‘१८५७ चा उठाव’ या ग्रंथाने त्यांना फारच प्रभावीत केले. किसन वीरांनी यावेळी पुरंदर किल्ला ताब्यात घेऊन तेथिल शस्त्रास्त्रे मिळवण्याचा प्रयत्न सुरू केला आणि श्री. किसन कोळी नावाच्या मित्राला पुरंदर किल्ल्यावर पाळतीसाठी पाठवले.[१६८] देव मास्तरांशी श्री. किसन वीरांची या शस्त्रास्त्रांबाबत चर्चा झाली त्यावेळी त्यांनी वीरांना सातारच्या श्री. नाथ घाणेकर व श्री. निळूभाऊ यांची भेट घ्या म्हणून सांगितले. याप्रमाणे श्री. किसन वीर घाणेकरांना भेटलेही परंतु काही कारणास्तव श्री. घाणेकरंनी त्याची मदत करणे नाकारले. यानंतर श्री. देव गुरूजी व श्री. किसन वीर श्री.भुस्कूटे यांना बाँब बनवण्याच्या प्रक्रियेबाबत भेटलेही परंतू त्यातील धोके लक्षात आल्यानंतर त्यांनी तो विचार सोडून दिला.[१६९] यानंतर श्री. किसन वीर म.गांधीजीच्या विचारांकडे ओढले गेले.त्यांनी काँग्रेसचे

सदस्यत्व स्विकारले आणि काँग्रेसच्या विचारांचा प्रचार प्रसार करण्यास प्रारंभ केला.

क्रांतीवीर किसन वीरांच्या क्रांतीकारक कार्याचा आरंभ जंगल सत्याग्रहाने झाला त्यासाठी त्यांना ११ महिन्यांचा कारावास भोगावा लागला. विलासपूरच्या तुरूंगात वामनराव कुलकर्णी यांची भेट झाली व श्री. किसन वीरांच्या सुटकेनंतर यांनीच श्री. किसन वीरांची श्री. यशवंतराव चव्हांणांची भेट घालून दिली. येथून श्री. यशवंतराव चव्हाण व श्री. किसन वीर यांची मैत्री मरेपर्यंत राहीली.[१७०] किसन वीरांनी चलेजाव चळवळीत कैद झाल्यानंतर येरवडा तुरूंगातून पळून जाण्यासाठी जी उडी मारली त्याबाबत आपले मत व्यक्त करताना श्री. यशवंतराव म्हणतात की, "जेव्हा १९४२च्या आंदोलनाचा इतिहास लिहीला जाईल तेव्हा या घटनेचा उल्लेख इतिहासकार आवर्जुन करतील. ही घटना सातारच्या स्वांतंत्र्य चळवळीतील एक नवा अध्याय आहे."[१७१]

या पुढील काळात किसन वीर हे क्रांतीसिंह नाना पाटलांच्या प्रतिसरकारचे एक सक्रिय सदस्य म्हणून वावरताना दिसतात. ब्रिटीश सरकारने प्रतिसरकाच्या नेत्यांना पकडण्यासाठी वॉरंट  काढली व हे सर्वजण भूमिगत झाले. भूमीगत होऊन किसन वीरांनी प्रतिसरकारचे आपले कार्य तसेच चालू ठेवले अखेर २५ एप्रिल १६४६ रोजी सरकारने या भूमिगत नेत्यांच्या विरोधात काढलेली वॉरंट रद्द केली. यानंतर हि भूमीगत मंडळी प्रकट झाली. श्री. किसन वीरांच्या भूमीगत कार्याविषयी श्री.धन्वंतरी कासेगांवकर म्हणतात की, "किसन वीर हे सातारचे असे अद्विितीय व्यक्तिमत्व होते की ज्यांनी सरकारल झुकण्यास भाग पाडले. भारतात सर्वत्र स्वातंत्र्य चळवळ दडपण्यात आली मात्र सातारमध्ये प्रतिसरकार आणि सातारच्या जनतेपुढे सरकारला झुकावे लागले".[१७२] श्री. किसन वीरांच्या कैदेसाठी सरकारने जंग जंग पछाडले परंतू सरकारला ते शक्य झाले नाही.

भूमीगत असलेले श्री. किसन वीर सरकारी कैदेच्या जोखडातून मुक्त झाल्यानंतर काँग्रेस वर्किंग कमीटीची कराडला बैठक झाली व त्यात श्री. किसन वीरांची सातारा जिल्हा काँग्रेस कमिटीच्या सचिवपदी निवड झाली. यानंतर झालेल्या लोकल बोर्डाच्या निवडणूकीत श्री. किसन वीरांनी श्री. बाळासाहेब देसाईंना तर क्रांतीसिंह नाना पाटलांनी श्री. व्ही.एन.पाटीलांना आपला पाठिंबा दिला. या निवडणूकीत श्री. बाळासाहेब देसाई निवडून आले आणि यानंतर तर सातारा जिल्हा काँग्रेसचे सर्वाधिकारच त्यांना मिळाले.[१७३] म.गांधीजींच्या हत्येनंतर सर्वत्र

ब्राम्हणविरोधी दंगली उसळल्या. यावेळी श्री. किसन वीरांचे वाईतील दंगलीत कोणताही संदर्भ नसताना नाव घेतले जाऊ लागले. अशातच पुढे सन १९५२ साली निवडणूका झाल्या व वाईतून किसन वीरांनी ही निवडणूक लढवली. यांच्या विरोधात शेतकरी कामगार पक्षाचे श्री. दादासाहेब जगताप उभे होते. विरोधकांनी या दंगलींचा संदर्भ देत श्री. किसन वीरांवर कडक टिका केली. त्याचप्रमाणे विरोधकांनी वाईचा खरेदी विक्री संघ आणि सेवा सोसायटयांवर ताबा मिळवला. तसेच यावेळी रिपब्लीकन पार्टी आणि शेकापची युती होती.या सर्व कारणांमुळे या निवडणूकीत श्री. किसन वीरांचा पराभव झाला.[१७४]

सन १९५२च्या निवडणूकीनंतर श्री. किसन वीरांची सातारा जिल्हा काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदी निवड झाली. पुढे त्यांनी मार्केट कमिटी स्थापन करण्याचा प्रयत्न सूरू केला व लवकरच त्यांनी ती अस्तित्वात आणली आणि त्यांची मार्केट कमिटीच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली.[१७५] सन १९५५ ते १९५९ हा श्री. किसन वीर व श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या कसोटीचा काळ होता.१९५५ साली भाषीक आधारावर आंध्रप्रदेश या राज्याची निर्मीती करण्यात आली आणि महाराष्ट्रातही संयुक्त महाराष्ट्राची चळवळ सुरू झाली. दि.१ डिसेंबर १९५५ रोजी श्री. यशवंतराव चव्हाण यांनी संयुक्त महाराष्ट्र किंवा पं.नेहरू असा प्रश्न माझ्यापुढे आल्यास मी पं.नेहरूंना निवडेन असे प्रतिपादन केले यावेळी श्री. किसन वीर, श्री. बाळासाहेब देसाई व श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी श्री. यशवंतराव चाव्हाणांना पाठींबा दिला.[१७६] सन १९५७ साली महाराष्ट्रात निवडणूका झाल्या. वाईतून काँग्रेसने पुन्हा श्री. किसन वीरांना तिकीट दिले मात्र या निवडणूकांमध्येही किसन वीर विजयी होऊ शकले नाहीत. संयुक्त महाराष्ट्रच्या संदर्भातील श्री. किसन वीरांची श्री. यशवंतराव चव्हाणांना पाठींबा देण्याची भूमीका हे या अपयशाचे प्रमुख कारण होते.[१७७] नोहेंबर १९५७ मध्ये पं.नेहरूंनी प्रतापगडावरील छ. शिवाजी महाराजांच्या पुतळयाचे अनावरण केले यावेळी श्री. किसन वीर तेथे हजर होते. सन १९६० साली श्री. किसन वीरांची स्थानिक स्वराज्य संस्थामधून आमदारपदी निवड झाली. याचवर्षी महाराष्ट्र राज्याची स्थापना होऊन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून श्री. यशवंतराव चव्हाणांची निवड झाली.

सन १९६२ साली लोकसभेच्या निवडणूका झाल्या. या निवडणूकांमध्ये शेकाप पक्षाद्वारे क्रांतीसिंह नाना पाटलांना उमेदवारी देण्यात आली तर काँग्रेसने किसन वीरांना उभे

केले. या निवडणूकीत श्री. किसन वीर मोठया फरकाने निवडून आले. यापुढील काळात देशाच्या राजकारणात अनेक चढ उतार आले. सन १९६४ साली पं.नेहरू यांच्या मृत्यूने पंतप्रधान पदासाठी चढाओढ सुरू झाली यावेळी किसन वीरांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावत लालबहाद्दूर शास्त्री यांना पंतप्रधानपदी जाण्यास मदत केली. अशीच स्थिती सन १९६६ साली लालबहाद्दूर शास्त्री यांच्या मृत्यूने निर्माण झाली. यावेळीही पंतप्रधान पदासाठी चढाओढ सुरू झाली मात्र किसन वीरांना यावेळी श्री. यशवंतराव चव्हाणांची निवड पंतप्रधान पदासाठी व्हावी असे वाटत होते.तसा त्यांनी प्रयत्नही केला परंतु श्रीमती इंदीरा गांधींनी श्री. यशवंतराव चव्हाणांची भेट घेतल्यानंतर त्यांनी श्रीमती इंदीरा गांधींना पाठिंबा दिला आणि श्रीमती इंदीरा गांधी पंतप्रधान झाल्या. या प्रसंगी किसन वीरांची भूमिका अत्यंत महत्वाची होती.[१७८]

सन १९६७ च्या निवडणूकीत श्री. किसन वीरांनी आपली उमेदवारी घेण्यास नकार दिला आणि मला महाराष्ट्र व आपल्या लोकांसाठी स्थानिक पातळीवर काम करावयाचे आहे असे सांगितले. यानंतर त्यांनी काँग्रेसच्या प्रचार प्रसारात स्वतःला वाहून घेतले. या निवडणूकांमध्ये काँग्रेसने किसन वीरांच्या नेतृत्वात सातारा जिल्हयात सर्व जागा जिंकल्या. २८ जून १९७० रोजी कवठे गावच्या सरपंचपदी त्यांची निवड झाली ते सन १९७८ पर्यंत तेच या पदावर राहीले. सन १९७२ मध्ये सातारा जिल्हा परिषदेच्या निवडणूका झाल्या. या निवडणूकांनंतर श्री. यशवंतराव मोहीते यांच्या गटाने सातारा जिल्हा परिषदेच्या अध्यपदाच्या प्राप्तीसाठी प्रयत्न सूरू केले असता यावेळी अध्यपदाच्या निवडणूकीत श्री. बाबूराव घोरपडे यांनी श्री. किसन वीरांच्या मार्गदर्शनात अध्यक्षपद व श्री. शंकरराव जगताप यांनी उपाध्यक्षपदाच्या निवडणूका जिंकल्या आणि किसन वीरांनी सातारा जिल्हयावर आपले वर्चस्व असल्याचे दर्शवले. यानंतर वाई तालुका पंचायत समितीच्या निवडणूका झाल्या या निवडणूकांतही श्री. किसन वीरांचा गट जिंकला व श्री. लक्ष्मणराव पाटील हे सभापती झाले.[१७९] सन १९७४ साली नव्या नियमांनुसार वाईच्या नगराध्यक्षांची निवड थेट जनतेतून होणार या निवडणूकीत किसन वीराच्या पाठिंब्यावर श्री.राजाभाऊ जाधव हे नगराध्यक्ष झाले. सन १९७४ साली झालेले गिरणी कामगारांचे संप असोत किंवा सन १९७५ साली मुख्यमंत्री पदावरून काँग्रेस अंतर्गतच पडलेले दोन गट असोत प्रत्येक वेळी श्री. किसन वीरांनी पक्ष मजबुत असावा हिच आपली भूमिका असल्याचे स्पष्टपणे मांडलेले आहे. १९७७ सालच्या निवडणूकांमध्ये जनता

पक्षाने ३७४ जागा जिंकल्या आणि इंदीरा गांधींना पराभूत केले यावेळी आपले मत मांडताना श्री. किसन वीरांनी स्पष्टपणे म्हटले की, निवडणूकांच्या कालखंडात तरी प्रत्येक नेत्याने आपआपसातील मतभेद दुर करून एकत्रितरित्या काम करणे गरजेचे आहे. जर पक्षातील प्रत्येकाने आपला स्वार्थ पाहीला तर पक्षाचे भवितव्य अंधाकारमय होईल.आता जो पक्षाचा पराभव झालेला आहे त्याचे कारण म्हणजे काँग्रस सामान्य लोकांच्या आकांक्षा पुर्ण करण्यात अपयशी ठरलेली आहे. आपण चांगली स्वप्ने पाहतो आहे परंतू त्यांना सत्यात उतरवण्यात अपयशी ठरतो आहे.[१८०] त्यांच्या या भाषणातून त्यांची काँग्रेसप्रती असणारी अपार निष्ठा येथे स्पष्ट होते.

पुढील काळात काँग्रेस दुभंगली आणि काँग्रेस (आय) व काँग्रेस(रेड्डी) असे दोन पक्ष निर्माण झाले. सन १९७८ साली झालेल्या निवडणूकीत कोणत्याच पक्षाला बहुमत मिळाले नाही तेव्हा या दोन्ही काँग्रेस एकत्र येऊन श्री. वसंतदादा पाटील यांचे सरकार अस्तित्वात आले.परंतू हे सरकार टिकले नाही यानंतर शरद पवार यांनी पुरोगामी लोकशाही दलाची स्थापना करून सरकार स्थापन केले. श्री. किसन वीरांच्या भक्कम पाठिंब्यामुळेच शरद पवार पुरोगामी लोकशाही दलाची स्थापना करू शकले.[१८१] ऑगस्ट १९७९ मध्ये झालेल्या समांतर काँग्रेसच्या परिषदेत त्यांनी इंदीरा गांधीजींच्यावर टिका करताना म्हटले आहे की, "श्रीमती इंदीरा गांधी काँग्रेस पक्ष नष्ट करण्यासाठी काम करताहेत. ज्या यशवंतराव चव्हाणांनी काँग्रेस पक्षाच्या मजबुतीसाठी अपार कष्ट घेतले त्यांनाच अडचणीत आणण्यात आले. महाराष्ट्रातून त्यांना श्री. वसंतदादा पाटील आणि श्री. यशंतराव मोहीते हे त्यांना मदत करताहेत परंतू त्यांना यामध्ये यश येणार नाही."[१८२] याच काळात श्री. किसन वीरांची तब्येत खालावत होती त्यांना कावीळीचा त्रास होऊ लागलेला होता. त्रास अधिकच वाढल्याने त्यांना मुंबईला सेंट जॉर्ज हॉस्पिटलमध्ये हलवावे लागले. डॉक्टरांनी प्रयत्नांची शिकस्त करून त्यांना वाचवण्याचा प्रयत्न केला परंतु २८ नोहेंबर १९७९ रोजी त्यांची प्प्रणज्योत मालवली आणि हा लोकसंग्रही नेता अनंतात विलीन झाला.[१८३]

**लोकनेते श्री. बाळासाहेब देसाई**

सातारा जिल्हयाने देश घडविणाऱ्या अनेक नररत्नांना जन्म दिला व त्यांच्या हातून महाराष्ट्र घडविला. त्यामध्ये (कै.) श्री. यशवंतराव चव्हाण, कर्मवीर भाऊराव पाटील, क्रांतिसिंह

नाना पाटील, श्री. बाळासाहेब देसाई, श्री. यशवंतराव मोहिते, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, श्री. भाऊसाहेब सोमण, श्री. नरूभाई लिमये, श्री. किसन वीर यांचा प्रामुख्याने विचार करावा लागेल. स्वातंत्र्यापूर्वी आणि स्वातंत्र्यानंतर या जिल्हयातील अनेक कार्यकर्त्यांनी नेत्यांनी आपल्या जीवाची बाजी लावून काम केले समाजाला विसरता येणार नाही. याच थोर परंपरेतील दौलतराव श्रीपतराव तथा श्री. बाळासाहेब देसाई यांचे नाव आघाडीवर घ्यावे लागेल. ज्ञान ही एक शक्ती आहे. शिक्षण हे मानवाच्या सर्वांगीण सुधारणेचे प्रवेशद्वार आहे. शिक्षणाचा प्रसार सर्वत्र झाल्याखेरीज लोकांत नव्या जाणिवा निर्माण होणार नाहीत, समाजाचे पाऊल पुढे पडणार नाही. हा पुरोगामी शिक्षणविषयक विचार महात्मा जोतिबा फुले यांनी शिक्षणपासून पिढयान्पिढया वंचित समाजकरिता शाळा स्थापून कृतीत आणला.

छ.राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले. राहण्याची सोय उपलब्ध करून दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित समाजात स्वत्वाची जाणीव निर्माण केली. संघटित करून अन्यायाचा प्रतिकार करण्यास प्रवृत्त केले. १ मे १९६० नवनिर्मित विद्यामान महाराष्ट्राचे तत्कालिन पहिले शिक्षणमंत्री ना.बाळासाहेब देसाई हे ही महाराष्ट्राची उज्ज्वल शैक्षणिक परंपरा जपणारे होते. शिक्षणमंत्री पदावरून ई.बी.सी.सवलत, ग्रामीण भागात शाळांच्या संख्येत वाढ, तांत्रिक शिक्षण, एन.सी.सी., सातारा सैनिक स्कूल, शिवाजी विद्यापीठाची स्थापना, यशस्वी विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन अभिनंदन, शिक्षकांच्या प्रश्नांची सोडवणूक करून व ग्रामशिक्षण व प्रौढ शिक्षण मोहिम यासारखे धाडशी निर्णय व कार्यक्रम हाती घेतले.

लोकनेते बाळासाहेब देसाई यांचा जन्म १० मार्च १९१० रोजी त्यांचे आजोळ विहे या ठिकाणी झाला. त्यांचे गाव मरळी. ही दोन्ही गावे पाटण तालुक्यातीलच. बाळासाहेब उर्फ बाळू यांची आई दरूबाई त्यांच्या बालपणीच निधन पावल्या. त्यांचा सांभाळ मावशी पुतळाबाई यांनी केला. समोर आलेल्या प्रतिकूल परिस्थितीवर मात करण्याचा एकच मार्ग त्यांना दिसत होता, तो म्हणजे शिक्षणाचा. शिकून मोठे झाले पाहिजे ही इच्छाशक्तीची शिदोरी घेवून शिक्षणासाठी त्यांनी वयाच्या अवघ्या आठव्या वर्षी घराचा त्याग केला. बाळासाहेबांनी बारा वर्षाच्या खडतर तपानंतर बी.ए., एल.एल.बी.पर्यत शिक्षण पूर्ण केले. सन १९३७ मध्ये बी.ए., एल.एल.बी. झाल्यानंतर पाटण आणि कराड येथे त्यांनी वकिली सुरू केली. १९४० ते १९५२ या काळात

सातारा जिल्हा लोकल बोर्ड अध्यक्षपदी होते. १९५२ साली पाटण तालुक्यातून त्यांची विधानसभेसाठी बिनविरोध निवड झाली. १९५७ ला पुन्हा विधानसभेवरील निवडीनंतर राज्याचे कॅबिनेट बांधकाम मंत्रीपदी निवड झाली. १ मे १९६० ते मार्च १९६२ नवनिर्मित विद्यमान महाराष्ट्राचे तत्कालिन पहिले शिक्षणमंत्री होते, १९६२ ला कृषिमंत्री व लगेच गृहमंत्रीपद त्यांतर महसूल मंत्रीपद अशी पदे भूषविली. श्री. बाळासाहेब देसाई हे धिप्पाड शरीरयष्टीचे असे व्यक्तिमत्त्व होते. पाायघोळ धोतर, खादीचा नेहरू शर्ट, डोक्यावर गांधी टोपी, खादीचा कोट किंवा जॅकेट, पायात कोल्हापूरी चपला असा त्यांचा वेष होता. प्रसिद्ध पत्रकार श्री.प्रल्हाद केशव अत्रे यांनी बाळासाहेबांना लोकनेते ही पदवी बहाल केली. १९७८ ते ७९ ला विधानसभेचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले.

**शैक्षणिक विकासातील योगदान** :

'इकॉनॉमीकली बॅकवर्ड क्लास' (वार्षिक उत्पन्न रू ९००/-) अंतर्गत त्या काळात कमी लोकसंख्या या कायद्याखाली येत होती. श्री. बाळासाहेबांनी ही मर्यादा रू. १२००/- पर्यत वाढवावी अशी मागणी १३ जून १९६० रोजी विधीमंडळात केली.[१८४]

सार्वत्रिक शिक्षण प्रसार झपाटयाने होण्याच्या मार्गातील मोठी धोंड म्हणजे जनतेची आर्थिक दुर्बलता. मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांनी त्यांना मनोभावे उत्तेजन दिले. १२००/- रू.पेक्षा ज्यांचे वार्षिक उत्पन्न कमी आहे. असा गरीबांच्या मुलांना फी माफीची सवलत दिल्याचा, महाराष्ट्र शासनाचा निर्णय श्री. बाळासाहेबांनी जाहीर केला.[१८५] खालील तक्त्यानुसार आपणास समजेल की, या योजनेचा फायदा किती विद्यार्थ्यांस झाला.[१८६]

| वर्ष | वार्षिक उत्पन्न रू.१२००/- लोकसंख्या | खर्च | फायदा |
|---|---|---|---|
| १९६०-६१ | यामध्ये प्राथमिक शिक्षक, चतुर्थ श्रेणी कर्मचारी वर्ग इ. | १,५२,९५,०७६ रू | २,४२,००० विद्यार्थ्यास |

श्री. बाळासाहेबांच्या या निर्णयानंतर पुढे पंतप्रधान श्री. जवाहरलाल नेहरूंनी त्यांची पाठ थोपटली व म्हणाले. तुम्ही घेतलेला धाडशी व क्रांतिकारी निर्णय आजपर्यंत कोणत्याही राज्याच्या शिक्षणमंत्र्यानी घेतला नाही. परंतु तुम्ही याबाबत आर्थिक बाजू कशी सोडवली ? याचे उत्तर श्री. बाळासाहेबांनी अत्यंत व्यवहारी दिले, आजपर्यत ग्रामीण शिक्षणावर महाराष्ट्राच्या वाटयाला असलेली

लाखो रूपयांची रक्कम खर्च झालेली नाही हे मी अगादेर तपासून पाहिले आणि ही रक्कम खर्च करण्याचा दावा केला.[१८७]

**ग्रामीण भागात शाळांच्या संख्यात्मक वाढ (एक्सपान्शनचा काळ) :**

५ ऑगस्ट १९६० रोजी बाळासाहेबांनी आपले शिक्षण धोरणविषयी मूलगामी विचार व्यक्त केले आहेत. त्यांनी विरोधकांनी केलेला आरोप संख्यात्मक शिक्षण प्रसार योजनेमुळे गुणात्मक विकासाकडे दुर्लक्ष झाले आहे. यास त्यांनी नागपूरपासून ३० मैल अंतरावरील कोंडाळे गावातील एस.एस.सी पहिला आलेल्या विद्यार्थ्याचे उदाहरण दिले. तेथे १९५८ साली हायस्कूल सुरू झाले.[१८८] ई.बी.सी. योजनेमुळे शे–दोनशे लोकवस्तीच्या खेडेगावात शाळा सुरू झाल्या. तालुक्याच्या गावी महाविद्यालये निघाली. हजारो गरीब मुले आज त्या शाळामध्ये जाऊन ही जी उत्पन्नाची मर्यादा वाढविली आहे तिचा फायदा घेत आहेत. एक्स्पान्शन ज्या पद्धतीने जास्त होत जात, त्याच पद्धतीने गुणात्मक वाढ ही सफल होणार आहे. असा ठाम विश्वास बाळासाहेबास होता.[१८९]

| वर्ष | माध्यमिक शाळांची संख्या | वाढ |
|---|---|---|
| १९६० – ६१ | २४६८ | |
| १९६१ – ६२ | २९०१ | ४३३ |
| १९६३ – ६४ | ३३९५ | ४९४ |
| १९६८ – ६९ | ४६५० | १२५५ |
| १९६९ – ७० | ५००० पेक्षा जास्त | ३५० पेक्षा जास्त |

वरील तक्त्यानुसार आपणास समजेल की, या योजनेमुळे ग्रामीण भागात दरवर्षी साधारणपणे ४०० ते ५०० माध्यमिक शाळांची संख्या वाढलेली दिसून येते.[१९०]

**तांत्रिक शिक्षण :–**

श्री. बाळासाहेब देसाई यांना ३१ जून १९६० रोजी विदर्भातील एम.एस्सी मध्ये पहिली आलेल्या कु.कृष्णन या विद्यार्थिनीने प्रश्न विचारला, देशाला आज कशाची गरज आहे ? यावर श्री. बाळासाहेब देसाई म्हणाले, “संशोधनाची गरज आज देशाला आहे.”[१९१]

देशात औद्योगिक विकास चालू आहे आणि लोकाचे जीवनमान सुधारत आहे. देशाच्या विकासामध्ये भाक्रा–नांगल, दामोदर आणि कोयना योजना महत्त्वपूर्ण आहेत. ती आजची आपली तीर्थक्षेत्रे आहेत. भिलाई आणि दुर्गापूर कारखान्यामुळे औद्योगिकरणाला चालना मिळाली

आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत इंडस्ट्रीयल डेव्हलपमेंट बऱ्याच प्रमाणात होणार आहे. महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासाला लागणारे तंत्रज्ञ आणि यंत्रज्ञ निर्माण करणे याकरिता सरकार आज तांत्रिक शिक्षणावर भर देत आहे.[१९२]

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या सुरूवातीला महाराष्ट्रामध्ये एकंदर २ इंजिनियरिंग कॉलेजेस, १ पॉलिटेक्निक आणि ७ इंडस्ट्रियल स्कूल होती. आज ६ इंजिनियरिंग कॉलेजेस, १८ पॉलिटेक्निक आणि १९ इंडस्ट्रियल स्कूल काढल्या आहेत आणि त्यामध्ये खूप मुलं येऊन शिक्षण घेत आहेत. देशाच्या उत्पादनात आणि औद्योगिक वाढीकरिता हातभार लावीत आहेत.[१९३]

**सैनिकी शिक्षणः**

महाराष्ट्रास सैनिकी परंपरा जुनी आहे. कॉलेजमध्ये एन.सी.सी.चे शिक्षण सक्तीचे करावे असे बाळासाहेबांचे धोरण होते. या देशावर कठीण प्रसंग येईल त्यावेळी उपयोगी पडण्यासाठी व परंपरा जिवंत राहवी, तरूण पिढी निर्माण करण्यासाठी एन.सी.सी.ला परवानगी देण्यात आली.[१९४]

इ.स.१९६२ साली चीनी आक्रमणापुढे भारतीय सैन्यदलाच्या त्रुटी समोर आल्या. भविष्य काळातील भारतीय संरक्षणव्यवस्थेस थोडाफार हातभार लागण्याकरिता बाळासाहेबांनी शाळा, कॉलेजातील वेळापत्रकात आणखी एक तास वाढवून त्यावेळात लष्करी शिक्षणाची (एन.सी.सी.) व्यवस्था करण्यासंदर्भात अधिकाऱ्यांना आदेश सोडले व तशी कार्यवाहीही झाली.[१९५]

**सातारा सैनिक स्कूल :**

खडकवासला येथील लष्करी महाविद्यालयाच्या दीक्षांत समारंभाप्रसंगी बाळासाहेबांस जाणीव झाली की, मराठी विद्यार्थ्यांची उच्चपदस्थ लष्करी शिक्षणाकडे असणारी अनास्था, ती दूर करण्याकरिता भारत सरकार पुरस्कृत सैनिकी शाळांची योजना मूर्तस्वरुप पावली. महाराष्ट्र शासनाने सातारा येथे सैनिकी शाळा सुरू केली.[१९६] सैनिक स्कूलची स्थापना १९६१ साली झाली, ते देशातील ४ पैकी १ होते.

**पब्लिक स्कूल :**

बाळासाहेबांच्या शिक्षणमंत्र्याच्या कालावधीत विरोधकांची अशी एक तक्रार होती की, पहिलीमध्ये जेवढी मुलं येतात (उदा.१००), त्यापेक्षा सातवीमध्ये कमी असतात. (उदा.६०) ४० मुलं काठे जातात ? सरकारचा खर्च वाचवण्याकरीता सरकारला सर्वांच्या सहकार्याची अपेक्षा आहे.[१९७] यावर बाळासाहेबांनी दि.३० जानेवारी १९६१ रोजी इचलकरंजी येथील गोविंदराव हायस्कूल इमारतीच्या मजल्याचे उद्घाटनप्रसंगी गळती प्रमाण टाळण्यासाठी हुशार मुले एकत्र करून त्याच्या राहण्याची व शिक्षणाची व्यवस्था करणेसाठी पब्लिक स्कूल स्थापन करण्याची योजना मांडली.[१९८]

**शिवाजी विद्यापीठ स्थापनेतील योगदान :**

पुणे विद्यापीठाचा दक्षिण महाराष्ट्रातील बहुजनांना व्हावा तितका फायदा होत नाही. याकरिता दक्षिण महाराष्ट्रात एखादे विद्यापीठ असावे असे उद्‌गार श्री. बाळासाहेबांनी शिक्षणखात्याचा चार्ज स्विकारताना काढले होते.[१९९]

कोल्हापूरमध्ये स्वतंत्र विद्यापीठ असावे, या कल्पनेचे जनक डॉ.बाळकृष्ण हे होते. त्याकरिता त्यांनी जिवापाड प्रयत्न केले. करवीरच्या जनतेनेही कल्पना उचलून धरली. छ.राजाराम महाराजांनी नरेंद्र मंडळातील राजांकडून आर्थिक सहकार्यासह संमती मिळविली. परंतु १९३६ व १९४० साली अनुक्रमे छ.राजाराम महाराज, डॉ.बाळकृष्ण या दोघांचे मृत्यू झाले. त्यामुळे योजना स्थगित झाली. श्री. यशवंतराव चव्हाण व श्री. बाळासाहेब देसाई दोघेही राजाराम कॉलेजचे विद्यार्थी होते. स्वातंत्र्योत्तर काळात पुन्हा या प्रश्नाने डोकं वर काढलं. करवीर नगरपालिकेनं एक अभ्यास समिती नेमली. विद्यापीठ स्थापने संदर्भातील त्यांनी पाठवलेल्या अहवालास संयुक्त महाराष्ट्र सरकारकडून प्रतिसाद न मिळाल्याने पुन्हा प्रश्न प्रलंबित राहिला.[२००] नव्या राज्याचे शिक्षणमंत्री बाळासाहेबांनी १ सप्टेंबर १९६१ रोजी प्राचार्य स.रा.तावडे यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली. या समितीने नव्या विद्यापीठाची गरज आहे. असे अहवालात नमूद करून तो अहवाल सरकारकडे सादर केला. २४ जुलै १९६२ रोजी विधानसभेत विधेयक मांडण्यात आले. विधेयक पास होऊन त्या कायद्यास 'शिवाजी विद्यापीठ कायदा १९६२' असं नांव मिळालं.[२०१] पहिल्या कुलगुरूपदाची धुरा डॉ.आप्पासाहेब पवार यांनी २० सप्टेंबर १९६२ रोजी स्विकारली. विधिवत विद्यापीठाचे उद्घाटन १८ नोव्हेंबर

१९६२ रोजी राष्ट्रपती डॉ.राधाकृष्णन यांच्या हस्ते झाले.

**शिक्षकांचे प्रश्न व सोडवणूक :**

शिक्षक हा एक प्रकारचा आगळा इंजिनियर असतो. शिक्षकाला राष्ट्रबांधणीचे, राष्ट्रउभारणीचे कार्य करावयाचं असतं, असं श्री. बाळासाहेब आवर्जून सांगतात. त्यामुळे त्यांची आर्थिक स्थिती सुधारणे व त्यांना विशेष सवलती देणे आवश्यक आहे. यासाठी त्यांनी माध्यमिक शिक्षकांच्या वेतनश्रेणी सुधारल्या. पेन्शन योजना व महागाई भत्त्यात वाढ केली.[२०२]

२८ जानेवारी १९६१ रोजी सांगली जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांच्या मेळाव्यात अध्यक्षीय भाषणात स्पष्ट केले की, शिक्षकांच्या विविध प्रश्नांची सोडवणूक करण्याकरीता शिक्षक संघटना असाव्यात व त्या कार्यक्षम असव्यात. पण 'आपली शिक्षकांची संघटना' आहे हे जाणून विवेकी व विचारी पावल टाकावीत त्यांनी ट्रेड युनियन बनू नये असे प्रतिपादन केले.[२०३]

**विद्यार्थ्यांच्या घरी शिक्षणमंत्री :**

भारत समर्थ बनविण्यासाठी निग्रही, निश्चयी, करारी पिढी निर्माण झाली पाहिजे. तरूण वर्गाबाबत बाळासाहेबांचे मत आशादायी होते. जळगांव दौऱ्यावर असताना एस.एस.सी.मध्ये विदर्भात ८ जिल्हयात प्रथम क्रमांकाने पास झालेल्या फासेपारध्याच्या घरी जाऊन त्याचे अभिनंदन केले.[२०४] पुण्यामध्ये मुक्कामी असताना दिवसभर दौऱ्यामुळे कंटाळलेले असतानांही एस.एस.सी.मध्ये प्रथम आलेल्या विद्यार्थ्याच्या घरी रात्री ८ वा. जाऊन अभिनंदन केले होते.[२०५] यशस्वी विद्यार्थ्यांचे मनोबल वाढविण्याकरीता त्यांच्या घरी जाऊन अभिनंदन करणारा हा पहिला आणि एकमेव शिक्षणमंत्री होता.

**शिक्षण संस्था व श्री.बाळासाहेब देसाई :**

रयत शिक्षण संस्थेचे पहिले महाविद्यालय शिवाजी कॉलेज याची वास्तूची पायाभरणी कर्मवीर आण्णांच्या उपस्थितीत श्री.बाळासाहेबांच्या हस्ते झाली.[२०६] तसेच श्री. बाळासाहेब खेर सरकारने रयत शिक्षण संस्थेची ग्रँट बंद केली. शिवाजी कॉलेज तोटयात चालले होते. अशा वेळेस या संस्थेला श्री.बाळासाहेब देसाई यांनी लोकल बोर्डाचे अध्यक्ष या नात्याने दरसाल पाच हजाराची ग्रँट चालू ठेवली.[२०७]

१९५७ च्या चाफळ खोऱ्यातील दौऱ्यात श्री.बाळासाहेबांनी श्री.विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्य पाहून तात्काळ १०१ रूपये भरून सभासद झाले. मरळीतील हायस्कूलच्या इमारतीसाठी सरकारकडून ४४००० रूपये अनुदान मिळवून दिले. स्वतःच्या चिरंजिवांच्या लग्न प्रसंगी संस्थेला २०००० रू. देणगी दिली. श्री.बाळासाहेब ३०.०८.१९६४ रोजी या संस्थेचे अध्यक्ष झाले.[२०८]

त्यावेळची सामाजिक स्थिती, राजकारणातील विविध क्षेत्रे या गोष्टी त्यांच्या विशाल, अभ्यासू, ज्ञानपिपासू दृष्टीकोनातून अर्थातच सुटल्या नाहीत. समाज परिवर्तनातून राजकारण करण्याचा मानस ओळखून १९४० पासून सार्वजनिक कार्यास सुरूवात केली. श्री.बाळासाहेब देसाई यांनी सातारा जिल्हा लोकल बोर्डाचे बारा वर्षे अध्यक्ष म्हणून काम करताना जिल्हयातील रस्ते, पाणीपुरवठयाच्या योजना, शाळा, क्रिडांगणे, शेती विकासाच्या नव्या योजना राबवून शेती विकासाला चालना दिली. लहानमोठे पाटबंधारे योजना कार्यान्वित केल्या. शेती, वीजपुरवठा, तालमीचे आखाडे, सहकारी संस्था, ग्रामपंचायती यासारख्या सर्वांगीण विकासाच्या योजना आखून त्या नियोजनबद्ध राबविल्या आणि सातारा जिल्हयाचा समूळ कायापालट घडवून आणला, हे समाजाला कधीच विसरता येणार नाही.[२०९] बांधकाम मंत्री असताना रस्त्यांचे राष्ट्राच्या विकासातील महत्त्व ओळखून रस्ते बांधणीचा प्रश्न हाती घेतला. कोयना धरण व वीज प्रकल्प ही उल्लेखनीय कामे केली. मुंबई येथील गेट वे ऑफ इंडीया समोर छ.शिवाजी महाराजांचा पुतळा उभारण्याचे काम केले. कृषिमंत्रीपदी असताना शेतकरी सुखी झाल्याशिवाय खरा समाजवाद येणे कठीण आहे. जो कसेल त्याची जमीन या कायद्याला अनुसरून शेती सुधारणेच्या अनेक योजना राबविल्या. ११ डिसेंबर १९६७ रोजी पाटण तालुक्यात प्रलकारी भुकंप झाला. तेव्हा शासकीय यंत्रणेला जागे केले व स्वतः मुंबई सोडून पाटणमध्ये भुकंपग्रस्तांचे अश्रू पुसण्याकरिता आले. कुस्तीला व लावणीला त्यांनी राजाश्रय मिळवून दिला. कोल्हापूरात शेतकी महाविद्यालय, मरळीचा साखर कारखाना, बँक, हॉस्पिटल, उपसा जलसिंचन योजना, दुध, औद्योगिक प्रशिक्षण केंद्रे, विकास सेवा सोसायटया व पाटणचे महाविद्यालय इ. भगीरथ कार्यामुळेच श्री.बाळासाहेबांस महाराष्ट्राचे पोलादी पुरूष म्हटले जाते ते यथार्थ वाटते. श्री. श्री.बाळासाहेब देसाई यांचा मृत्यू २३ एप्रिल १९८३ रोजी झाला.

**सहकार महर्षी श्री.यशवंतराव माहिते**

इ.स.१९४७ ते २००० च्या दरम्यान सातारा जिल्हयातील ज्ञान, विज्ञान, कृषी, शिक्षण आणि समाजकारणाचे उपासक म्हणून सहकार महर्षी श्री.यशवंतराव माहिते यांना ओळखले जाते. स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये तत्त्वांचा आग्रह धरणाऱ्या ध्येयवाद्यामध्ये ज्येष्ठ विचारवंत म्हणून त्यांना अग्रस्थानी पाहिले जाते. राजकारणातील सत्तेसाठी तडजोड नाकारून बहुजन समाजाच्या उद्धाराचा मार्ग त्यांनी चोखाळला सत्तेचा उपयोग सर्वसामान्य जनतेसाठी होणार नसेल तर ती सत्ता राबविण्यात काहीच अर्थ नाही अशी विचारसरणी जोपासणारे अभ्यासू व तत्त्वनिष्ठ राजकारणी म्हणून त्यांच्याकडे संपूर्ण देश पाहत होता.

श्री. यशवंतराव मोहिते यांचा जन्म कराड तालुक्यातील रेठरे बुद्रुक या छोटयाशा खेडेगावात शेतकरी कुटूंबात ७ नोव्हेंबर १९२० रोजी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव माधवराव होते, तर आईचे नाव ताराबाई होते. श्री.यशवंतराव हे श्री.जिजाबा मोहिते यांना दत्तक गेले होते. श्री. यशवंतराव मोहिते यांचे बालपण रेठरे बुद्रुक व इस्लामपूर या गावी गेले. त्यांचे प्राथमिक शिक्षण रेठरे बुद्रुक येथील शाळेत झाले. मॅट्रिकपर्यतचे माध्यमिक शिक्षण इस्लामपूरच्या 'न्यू एज्युकेशन सोसायटी' या हायस्कूलमध्ये त्यांनी पूर्ण केले. त्यांनी कोल्हापूरच्या 'राजाराम महाविद्यालयात' इंटर सायन्सपर्यत उच्चशिक्षण पूर्ण केले होते.[२१०]

श्री. यशवंतराव मोहिते कोल्हापूर येथे शिक्षण घेत असतानाच इ.स. १९४२ च्या 'चले जाव' आंदोलनाने प्रभावित होवून त्यांनी स्वतःला स्वातंत्र्य लढयात झोकून दिले. राष्ट्रकार्यात या काळात क्रांतिकारक, सत्यशोधक समाजाचे कार्यकर्ते व सामाजिक आणि राजकीय विचारवंतांचा त्यांना सहवास लाभला. या निमित्ताने सामान्य जनतेच्या प्रश्नांशी त्यांचा जवळून परिचय झाला.

विद्यार्थीदशेतच त्यांनी प्रगाढ वाचन व चिंतन केले. याच काळात खलील जिब्रान, टॉलस्टॉय, कार्लमार्क्स, संत तुकाराम, महात्मा फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर या विचारवंतांच्या ग्रंथाचे वाचन केले. कोल्हापूर येथे त्यांनी तालीम संघ आणि दास्य विमोचन दलाची स्थापना केली. 'द्रष्टा' हे साप्ताहिक सुरू करून संपादित केले. गांधीवधानंतर उसळलेल्या दंगलीतील निराधारासाठी पन्हाळा येथे छावण्या उभारून त्यांना सर्वतोपरी मदत केली. या सर्व गोष्टी श्री. यशवंतराव मोहिते यांच्या विद्यार्थीदशेचे दर्शन घडवितात.[२११]

श्री. यशवंतराव मोहिते यांनी विद्यार्थीदशेत असताना कॉंग्रेस अंतर्गत समाजवादी गटाबरोबर काम केले होते. त्यांनी इ.स.१९४७ साली शेतकरी कामगार पक्षाची स्थापना करण्यात पुढाकार घेतला होता. या पक्षाचे सरचिटणीस म्हणून त्यांची निवड अहमदनगर येथे झालेल्या अधिवेशनात झाली होती. श्री. यशवंतराव मोहिते यांचा विवाह २४ मे १९५४ रोजी विदर्भातील बॅरिस्टर रामराव देशमुख यांची कन्या वनमाला यांच्याशी झाला होता.[२१२]

इ.स.१९५२ मध्ये शेतकरी कामगार पक्षातर्फे कराड दक्षिण मतदार संघातून विधानसभेची पहिली निवडणूक लढवून त्यामध्ये विजय मिळविला होता. त्यांनी विधानसभेत कोयना धरण तात्काळ आणि अग्रक्रमाने बांधण्याबाबत ठराव मांडला आणि तो मंजूर करून घेतला होता. १९५३ साली संयुक्त महाराष्ट्र निर्मितीबद्दल विधानसभेत ठराव मांडला, व तो मंजूर करून घेतला. श्री. यशवंतराव मोहिते यांनी इ.स.१९५४ साली कृष्णा सहकारी साखर कारखान्याची स्थापना शिवनगर येथे केली. ते विरोधी पक्षात असतानाच श्री .शंकरराव देव यांच्या अध्यक्षतेखाली संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर कार्यरत असलेल्या संयुक्त महाराष्ट्र परिषदेचे ते जनरल सेक्रेटरी झाले होते. संयुक्त महाराष्ट्र परिषद बरखास्त झाल्यावर संयुक्त महाराष्ट्र समितीची स्थापना करण्यात पुढाकार घेतला. इ.स.१९५६ साली संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावरून त्यांनी आमदारकीचा राजीनामा दिला. आणि पोटनिवडणूकीद्वारे विधानसभेवर बिनविरोध निवडून आले. त्यानंतर त्यांनी गोवा मुक्ती संग्रामात भाग घेतला होता.[२१३]

श्री. यशवंतराव मोहिते यांनी मजदूर किसान पक्षाची स्थापन करण्यात पुढाकार घेतला. या नवीन पक्षाने इ.स.१९५७ च्या विधानसभेच्या निवडणूकीत संयुक्त महाराष्ट्र समिती अंतर्गत लढवून भरघोस विजय मिळविला. याचे सर्व श्रेय श्री. यशवंतराव मोहिते यांना दिले जाते. विधानसभेत विरोधी नेते असताना त्यांनी संयुक्त महाराष्ट्र स्थापनेच्या सरकार प्रणित ठरावाला विरोधी पक्षात असताना पाठिंबा दिला होता. श्री. यशवंतराव मोहिते यांनी एप्रिल १९६० मध्ये मजदूर किसान पक्षाचे विसर्जन करून कराड येथे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या साक्षीने कॉंग्रेसमध्ये प्रवेश केला होता.[२१४]

१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या समक्ष कराड येथे श्री.यशवंतराव मोहिते यांची बोलणी झाली. तेव्हा श्री. यशवंतराव मोहिते यांनी मजदूर किसान पक्षाचे विसर्जन करून सन १९६० साली कँाग्रेसमध्ये प्रवेश केला.

याच वर्षी त्यांनी निर्माण केलेला कृष्णा सहकारी साखर कारखाना सुरू झाला. १ मे १९६० रोजी त्यांचा गृह उपमंत्री म्हणून महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात समावेश झाला. नोव्हेंबर १९६० मध्ये महाबळेश्वर येथे भरलेल्या शिबिरात कॅांग्रेसने कृषीप्रधान औदयोगिक समाजरचनेचे धोरण स्वीकारावे म्हणून सुतोवाच केले व शेवटी तसा ठराव या शिबिरात पासही झाला. पुढे नोव्हेंबर–डिसेंबर १९६१ मध्ये महाबळेश्वर येथे भरलेल्या शिबिरात श्री.यशवंतराव मोहिते यांनी कॉंग्रेसचा जाहीरनामा मान्य करण्याबाबतचा ठराव मांडला, व त्यावर प्रदिर्घ असे तीन तास भाषण केले.[२१५]

इ.स.१९६२ च्या विधानसभेच्या निवडणुकीत श्री. यशवंतराव मोहिते हे पुन्हा कराड दक्षिण विधानसभा मतदार संघातून निवडून आले आणि पुन्हा गृह उपमंत्री म्हणून मंत्रीमंडळात समाविष्ट झाले. श्री. यशवंतराव मोहिते यांनी इ.स.१९६२ मध्ये रशियाचा दौरा केला होता. गृहउपमंत्री असतानाच त्यांनी १९६२ च्या चिनी आक्रमणाच्या वेळी लष्कर भरतीसाठी संपूर्ण महाराष्ट्रभर दौरे काढून प्रचार केला होता. लष्करात भरती होण्यासाठी योग्य तरूण तयार होण्यासाठी ठिकठिकाणी ट्रेनिंग स्कूल काढली.[२१६]

इ.स.१९६३ साली श्री.वसंतराव नाईक यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राच्या मंत्रीमंडळात शेती उपमंत्री म्हणून त्यांचा समावेश केला गेला. शेती उपमंत्री असताना शेती खात्याला नवी दिशा देण्यासाठी ‘शेती :दिशा, व्याप्ती आणि प्राप्ती’ हे पुस्तक त्यांनी लिहिले. याचवेळी ज्वारीचे उत्पन्न मोठया प्रमाणावर निघाल्याने ती स्वस्त दराने विकली जाऊ लागली त्यामुळे शेतकरी अडचणीत आला तेव्हा प्रथमतःच सरकारने ज्वारी खरेदी करण्याची योजना आखून ती यशस्वीपणे राबविली.यशवंतराव मोहिते यांनी शेतीच्या विकासासाठी Area Development Planचे मॉडेल तयार केले होते. त्यांनी शेतीच्या जोडधंदयाना उत्तेजन देणाऱ्या योजना आखल्या आणि राज्यभर कुक्कूट पालन, वराह पालन, दुग्ध व्यवसाय यांना चालना दिली. याशिवाय मुंबईतील बोरीवली पार्क येथे बेकन अँड हॅम ही अद्ययावत फॅक्टरी उभी केली.त्यानुसार राज्यभर अंडी गोळा करणे व विक्री करण्याची त्यांनी योजना आखली. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना शेतीविषयक ज्ञान व्हावे, म्हणून त्यांनी महाराष्ट्र राज्यात चार विद्यापीठे स्थापन करण्यासाठी पुढाकार घेतला.

इ.स.१९६७ साली महाराष्ट्रात विधानसभेची निवडणूकीत श्री.यशवंतराव मोहितेंनी कराड दक्षिण मतदार संघातून निवडणूक लढवून प्रचंड मताने विजय मिळविला. या विजयाने त्यांना कॅबिनेट मंत्री म्हणून दर्जा मिळाला. त्यामध्ये त्यांच्याकडे गृहनिर्माण आणि परिवहन ही खाती त्यांना मिळाली. गृहनिर्माण मंत्री असताना भारतातील  घरदुरूस्ती व पुनर्बांधणी मंडळाची स्थापना करून भाडेकरूना वंशपंरपरेने घरे वापरण्याचा हक्क दिला होता.  गृहनिर्माण या खात्याबरोबरच त्यांच्याकडे परिवहन हे खाते ही होते. परिवहन खाते सांभाळत असताना त्यांनी मराठवाडा व विदर्भ येथील सर्व खाजगी वाहतुकीचे निर्धाराने शासकियीकरण केले व एस.टी.ची सेवा सुरू केली. 'गाव तेथे रस्ता व रस्ता तेथे एस.टी.' हे घोषवाक्य देऊन महाराष्ट्रातील सर्व दुर्गम गावे एस.टी ने जोडण्याचा कार्यक्रम हाती घेऊन तो फार मोठया प्रमाणावर यशस्वी केला.[२१७]

श्री.यशवंतराव मोहिते हे नोव्हेंबर इ.स.१९६९ मध्ये सहकारमंत्री बनले. त्यावेळी त्यांनी सहकार क्षेत्राचा सखोल अभ्यास करून सहकार श्वेतपत्रिका तयार करून या क्षेत्राला मार्गदर्शक ठरणाऱ्या साखर संचालनालयाची स्थापना त्यांनी केली. व्यापाऱ्याकडून शेतकऱ्यांची लूट होवू नये म्हणून डायरक्टोरेट ऑफ मार्केटिंग, यंत्रमाग व हातमाग महामंडळ, सूतगिरण्या, प्रत्येक साखर कारखान्यावर ग्रामीण बँकांची स्थापना व महिला नागरी सहकारी बँका हे सर्व प्रयोग महाराष्ट्राच्या या भूमीत श्री.यशवंतराव मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली साकार झाले. श्री.यशवंतराव मोहिते यांनी महाराष्ट्रात पाच ठिकाणी यंत्रमागाचे मोठे प्रकल्प उभे केले होते. वस्त्रोद्योगास चालना देण्यासाठी Directorate of Handloom, powerloom and Textile  स्थापन केले. त्यांनी सुताच्या गिरण्या काढण्यास चालना देऊन पंधराहून अधिक सूतगिरण्यांची स्थापना केली. सरकारमध्ये तेलबियांचे प्रकल्प हाती घेऊन व डाळी तयार करण्याचे उद्योग ठिकठिकाणी सुरू करून कच्च्या शेतमालावर प्रक्रिया करण्याचे धोरण त्यांनी अवलंबिले व ते यशस्वी करून दाखविले. शेती व्यवसाय भांडवलाच्या बाबतीत स्वंयपूर्ण करण्यासाठी गावोगावच्या विविध कार्यकारी सोसायटीमध्ये विविध सुधारणा करून व शेतीमालाच्या विक्रीतून कर्जे वसूल करण्याच्या योजना आखून त्या यशस्वी करून दाखविल्या.[२१८]

श्री.यशवंतराव मोहिते हे सहकारमंत्री झाले. त्यावेळी महाराष्ट्रात २६ सहकारी साखर कारखाने होते. ती संख्या वाढवून ७२ वर नेण्यात यश मिळाले. त्यांच्या कारकिर्दीत महाराष्ट्रात सहकारी कारखानदारी उदयास आली. त्यावेळी बहुतेक सर्व खासगी कारखाने सहकारात रूपातंर करण्यात ते यशस्वी झाले.सहकारी साखर उद्योगाला योग्य दिशा देण्यासाठी साखर संचालनालय याची रचना करून साखर उद्योगाच्या प्रगतीचे पाऊल त्यांनी रोवले.[२१९]

सन १९७२च्या विधानसभा निवडणूकीतून कराड दक्षिण मतदार संघातून पुन्हा प्रचंड मतानी श्री.यशवंतराव मोहिते निवडून आले. त्यावेळी त्यांच्याकडे सहकाराच्या जोडीला अन्न आणि नागरी पुरवठा खाते दिले गेले. हे खाते सांभाळत असताना त्यांनी महाराष्ट्रात धान्याची उपलब्धता वाढविण्याचा आटोकाट प्रयत्न केला. श्री.यशवंतराव मोहिते यांनी सुदान व इजिप्त या देशांचा दौरा करून तेथील कापूस एकाधिकार पद्धतीचा अभ्यास केला. हॉगकाँग जपान मलेशिया इत्यादी देशाचा दौरा केल्यानंतर त्यांच्या प्रयत्नाने ‘स्टेपल कॉटन’ निर्यातीमध्ये महाराष्ट्राने पुढाकार घेतला. यासाठी केंद्र सरकारनेही मदत केली. आणि उत्तम कापूस भारत निर्यात करू लागला. याचे सर्व श्रेय श्री.यशवंतराव मोहिते यांनाच दिले जाते.[२२०]

श्री.यशवंतराव मोहिते हे इ.स.१९७५ साली महाराष्ट्राचे अर्थमंत्री बनले. त्यावेळी त्यांनी आर्थिक बचत व शिस्त हे धोरणाचे मुख्य सूत्र ठेवून त्या अनुषंगाने सर्व कार्यक्रम आखले होते. महाराष्ट्राचे पहिले शिलकी अंदाजपत्रक सादर करणारे अर्थमंत्री म्हणूनही त्यांची ओळख महाराष्ट्रास होते.[२२१]

इ.स.१९७५ साली किमान जमीन धारणा कायदा कृतीत आणण्यासाठी त्यांनी स्वतःच्या मालकीची साडेबावीस एकर जमीन कोणताही मोबदला न घेता यांनी वाटून टाकली आणि बोलण्यासारखी कृती करून दाखविली. इ.स.१९७८ साली पुन्हा कराड दक्षिण मतदारसंघातून निवडणूक लढवून प्रचंड मतांनी ते विजयी झाले. आणि त्यावेळच्या कॉँग्रेस(एस.) व कॉँग्रेस(आय)च्या संयुक्त मत्रिमंडळात पुन्हा अर्थमंत्री झाले.१७ जुलै १९७८ रोजी हे संयुक्त मंत्रीमंडळ पडल्यानंतर त्यांनी विरोधी पक्षातून काम केले.[२२२]

श्री. यशवंतराव मोहिते यांनी इ.स.१९८० साली कॉँग्रेस(आय)मध्ये प्रवेश केला व त्याच वर्षी कराड मतदार संघातून लोकसभेची निवडणूक लढवून ते विजयी झाले. १९८५ साली राजकारणातून संपूर्ण निवृत्ती स्विकारून स्वतःचे रेठरे बुद्रुक गावी कायमचे वास्तव्य केले.

कृष्णा सहकारी साखर कारखान्यास नावलौकिक मिळावा म्हणून कारखान्यातील भ्रष्टाचार व अकार्यक्षमता संपविण्यासाठी यशस्वी प्रयत्न केले.[२२३]

श्री. यशवंतराव मोहिते यांचे राजकीय व सहकार क्षेत्रातील कार्य, वैचारिक निष्ठा आणि विचारसंपदा फार मोठया प्रमाणावर आहे. श्री. यशवंतराव मोहिते यांचे जीवनकार्य निर्मळ, पुरोगामी, लोककल्याणकारी, सामान्य माणसाला आर्थिक सामाजिक न्याय मिळावा, म्हणून त्यांनी केलेली विचारांची व कृतीची धडपड, फुले–शाहू–आंबेडकर या विचारप्रवाहावर त्यांची असलेली अविचल निष्ठा, भारतात लोकशाही समाजवाद यावा याकरीता काँग्रेसच्या व्यासपीठावरून त्यांानी केलेले प्रयत्न अशा प्रकारचे होते. कृष्णा सहकारी साखर कारखान्यातील भ्रष्टाचार निपटून काढला होता. श्री. यशवंतराव मोहिते यांचे राजकीय व सहकार क्षेत्रातील कार्य, वैचारिक निष्ठा आणि विचारसंपदा श्री. यशवंतराव मोहिते भाऊ यांचे राजकीय कार्य, सहकार क्षेत्रातील कार्य, वैचारिक निष्ठा आणि विचारसंपदा जेवढया प्रमाणात महाराष्ट्राला परिचित असो गरजेचे होते व आहे. तेवढया प्रमाणात परिचित नाही. उलट त्यांच्यासंबंधी काही गैरसमज पसरलेले आहेत, पसरविले आहेत. श्री. यशवंतराव मोहिते स्वच्छ, सार्वजनिक जीवन, निर्मळ पुरोगामी आणि लोककल्याणकारी नेतृत्त्व, सामान्य माणसाला आर्थिक, सामाजिक न्याय मिळावा म्हणून त्यांनी केलेली विचारांची व कृतींची धडपड फुले–शाहू–आंबेडकर या विचार प्रवाहावर त्याची असलेली अविचलनिष्ठा, भारतात लोकशाही समाजवाद्याकरिता त्यांनी केलेले प्रयत्न या सर्वांचा महाराष्ट्रातील जनतेला परिचय झाला पाहिजे.

श्री. यशवंतराव मोहिते यांच्यावर कार्ल मार्क्स, म.फुले, राजर्षी शाहू, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुरोगामी विचारांचा प्रभाव असल्याने त्यांनी पुरोगामी धोरणांचा खंबीरपणे पाठपुरावा केला. कोणत्याही धर्माच्या लोकांनी त्यांचे प्रदर्शन करू नये. आपल्या धर्मभावनेप्रमाणे जी काही पूजा करायची असेल ती चारभिंतींच्या आतच करावी असे त्यांचे ठाम मत होते.राजकीय सत्तेपसाठी धर्माचा वापर करणे ही शुद्ध फसवणूक आहे. असे श्री. यशवंतराव मोहिते म्हणत. बहुजन समाजाच्या हितासाठी झटत असल्याने नेहमी भाऊंची बदनामी करण्याचे प्रयत्न झाले. प्र.के.अत्रे यांच्याशी झालेला त्यांचा संघर्ष फार गाजला. यावेळी तत्कालिन प्रसारमाध्यमे श्री. यशवंतराव मोहिते यांच्या विरोधात गरळ ओकत होती. उच्च न्यायालयाच्या

१०९ वर्षाच्या इतिहासात एकही ब्राम्हणेतर न्यायाधीश का झाला नाही असा खडा सवाल मंत्री असताना न्यायालयाला विचारणारे भाऊ खरोखर निर्भीड होते. भाऊ जातीयवादी पक्ष संघटनाबद्दल म्हणत की, "आजही या देशातील जवळ–जवळ सर्व राजकीय पक्षांचे प्रजा समाजवादी संयुक्त सोशालिस्ट काँग्रेस संघ कम्युनिस्ट धरून नेतृत्त्व ब्राम्हणच करत आहेत. आणि त्यात मी काही वावगे मनात नाही. नेतृत्त्व एका ठराविक प्रक्रियेतून वाढावे लागते. ही प्रक्रिया करण्याची आजवरची वर्णश्रेष्ठत्वाची होती. त्यातून श्रेष्ठ वर्णाचे नेतृत्त्व आले. वावगे काही घडले नाही. मी वृथा तक्रार करणार नाही. पण आज राजकीय क्रांती झाल्यावर स्वातंत्र्य मिळाल्यावर सामाजिक क्रांतीचा आग्रह या नेतृत्त्वाने धरून नये हे खटकते."[२२४] सामाजिक क्रांतीबद्दल भाऊ म्हणतात. "महात्मा फुले शाहू महाराज किंवा बाबासाहेब आंबेडकर यांना जी सामाजिक क्रांती अभिप्रेत आहे ती यशस्वी झाली असे आपण कधी म्हणू शकू त्या क्रांतीतून निर्माण होणार या नवसमाजाच्या कसाची खरी कसोटी कोणती तो समाज एकसंघी एकजिनसी असला पाहिजे. म्हणजेच त्याची न चुकणारी कसोटी ठरते. त्या समाजात चालणारा निर्बध रोटीबेटी व्यवहार."[२२५] भाऊंनी ३०–३५ वर्षे महाराष्ट्रात अनेक मंत्री पदे भूषवली. अनेक बहुजन दलित साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदे भूषविली. पदासाठी कधी लुचेगिरी केली नाही. राजकारणासाठी स्वतःचा गट निर्माण केला नाही. भाऊंची फुले–शाहू–आंबेडकर वादावर अविचलनिष्ठा होती. १९८५ साली भाऊंनी राजकारणातून निवृत्ती घेतली. श्री.यशवंतराव मोहिते यांनी राजकीय, अर्थ, सामाजिक, सहकार, शैक्षणिक व औद्योगिक क्षेत्रात कार्य करून त्यांनी महाराष्ट्राच्या राजकारणात वेगळा ठसा उमटवला होता. महाराष्ट्राला श्री. यशवंतराव चव्हाण यांच्यानंतरचे लाभलेले नेतृत्त्व श्री. यशवंतराव मोहिते यांच्या रूपाने होते. श्री. यशवंतराव मोहिते यांनी राजकारणात कराड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे तब्बल २८ वर्षे व कराड लोकसभा मतदार संघाचे एकदा प्रतिनिधित्त्व केले होते. श्री. यशवंतराव मोहिते यांनी केलेल्या कार्याबद्दल भारती विद्यापीठाने विश्वविद्यालयाकडून डी.लिट. पदवी दिली होती. राजर्षी शाहु छ.मेमोरीयल कोल्हापुर यांनी इ.स.२००६ चा राजर्षि शाहू पुरस्कार दिला होता. अशा या द्रष्टया विचारधारेतून समाजाला दिशा देणाऱ्या जिल्हयाच्या या सहकार, राजकारण व समाजकारणातील महान नेत्याचे २३ ऑगस्ट २००९ रोजी निधन झाले. त्यावेळी त्यांचे वय ८९ वर्षे होते.

## चारित्र्यशील राजकारणी स्व.श्री.शंकररावजी जगताप (अण्णा)

राजकारणात राहूनही समाजाच्या सर्व स्तरात व सर्व पक्षात ज्या काही मोजक्या व्यक्तिमत्वांची गणना चारित्र्यशील राजकारणी म्हणून केली जाते त्या मोजक्या व्यक्तिमत्वांमध्ये श्री.शंकररावजी जगताप यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. हिमालयाप्रमाणे अविचल राहण्याच्या वृत्तीने समाजसेवेसाठी त्यांनी आपले जीवन चंदनासारखे झिजविले. गोरा वर्ण, धष्टपुष्ट शरीर, तेजस्वी चेहरा आणि करारी परंतू स्मितभाषीक असणारी मुद्रा असे प्रसन्न व्यक्तिमत्व लाभलेले श्री.शंकरराव जगताप होते. श्री.शंकरराव जगताप यांच्यावर महात्मा गांधी यांच्या विचारांचा आणि जीवनाचा फार मोठा प्रभाव होता. थकलेल्या भागलेल्या श्रमिकांबद्दल आणि कनिष्ठ वर्गाबाबत त्यांच्या अंतःकरणात अपार आत्मियता होती. महाराष्ट्राच्या राजकारणात जी एक पिढी यशवंतराव चव्हाणसाहेबांनी घडवली त्यातील एक श्री.शंकरराव जगताप होत. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर साठीच्या दशकात अनेक उच्चशिक्षित मंडळी सक्रिय राजकारणात उतरली. त्यामधील आण्णा हे एकमेव असे व्यक्तिमत्व होते कि जे सातारा जिल्हयालाच नव्हे तर संपुर्ण महाराष्ट्राला आदरणीय होते.

सातारा जिल्हयातील कोरेगाव तालुक्याचा उत्तर भाग हा दुष्काळी प्रदेश म्हणून ओळखला जातो. या दुष्काळी भागातील वाघोली या एका लहानशा खेडयात चिमाजी नाथाजी जगताप आणि गिरीजा चिमाजी जगताप या दंपतीच्या पोटी १४ फेब्रुवारी १९२३ रोजी शंकरराव यांचा जन्म झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण वाघोली गावात झाल्यावर पुढील शिक्षणासाठी त्यांनी वाई येथिल द्रविड हायस्कूलमध्ये प्रवेश घेतला. त्यांच्या या कालखंडाबाबत सांगताना त्यांचे बालमित्र श्री.पंडीतराव शेंडे म्हणतात, “शंकर माझा मित्र, आम्ही दोघे द्रविड हायस्कूलचे विद्यार्थी. तो मुळचा वाघोलीचा. लहान वयातच तो वाईला शिकण्यासाठी आला. रोकडोबा मंदीराचे मागील बाजूस राहणारे सिध्दनाथवाडीतील सिताराम बापू सूर्यवंशी यांचेकडे त्याचे शालेय शिक्षण झाले. शंकरला लहाणपणापासुनच शिक्षणाची आवड. शिक्षकांपैकी गोटखिंडीकर संस्कृतला तर गोंधळेकर इंग्रजीला. दोन्ही भाषेंवर शंकरचे प्रभूत्व. त्याची संस्कृत विषयाची शंकरशेठ शिष्यवृत्ती फक्त दोन मार्कांनी हुकली. शालांत परीक्षेत शंकरला ९८ मार्क पडले. पुढे तो शिकत गेला.”[२२६] श्री.शंकररावजी जगताप यांच्या शैक्षणिक प्रवासाबाबत शंकरराव जगताप आर्ट्स ॲण्ड कॉमर्स कॉलेजचे प्राचार्य आपले मत मांडताना म्हणतात, “He completed his

primary education in the district council primary school located at Wagholi. He took his secondary level education at Dravid Highschool, Wai. He Passed B.Sc. at fergussion College Pune and afterwards completed L.L.B. at Law College, Pune. Right from his early education he proved himself to be an extraordinary and talented student."[227]

त्यांचा शैक्षणिक विकास एका बाजूने होत असतानाच त्यांच्यावर महात्मा गांधीजींच्या स्वातंत्र्यलढयातील कार्याचा फार मोठा प्रभाव पडला आणि यातूनच ते भारतीय स्वातंत्र्यलढयाकडे वळाले. महाराष्ट्र विधानपरीषदेचे सभापती मा.शिवाजीराव देशमुख त्यांच्या आठवणी मांडताना म्हणतात, महात्मा गांधी यांच्या विचारांचा आणि जीवनाचा त्यांच्यावर फार मोठा प्रभाव होता.त्यामुळेच स्व.जगताप साहेबांनी देशप्रेमाने प्रेरीत होऊन स्वातंत्र्यलढयात सहभाग घेतला[२२८] आणि महात्मा गांधींचे विचार अखेरपर्यंत जोपासन्याचा प्रयत्न करून समाजातील गोरगरीब व पिडीत जनतेची सेवा करण्यासाठी पुढाकार घेतला.[२२९] श्री.शंकररावजी जगताप यांच्या निधनानंतर शोक प्रकट करताना महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा.पृथ्वीराज चव्हाण म्हणतात, "अगदी विद्यार्थीदशेत त्यांनी देशप्रेमाने प्रेरीत होऊन स्वातंत्र्यलढयात भाग घेतला. महात्मा गांधी यांच्या विचारसरणीचा आणि जीवनाचा त्यांच्यावर फार मोठा प्रभाव होता. हा प्रभाव त्यांच्या आयुष्यावर अखेरपर्यंत राहीला."[२३०] अशा पध्दतीने अण्णांनी आपले प्राथमिक शिक्षण वाघोली येथे, माध्यमिक शिक्षण द्रविड हायस्कूल वाई या शाळेत महाविद्यालयीन शिक्षण महाविद्यालय, पुणे येथे तर लॉचे शिक्षण लॉ कॉलेज पुणे येथून पुर्ण केले. आपले कायद्याचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर १९५१ साली त्यांनी कोरेगावात वकिली व्यवसायाचा श्रीगणेशा केला आणि निष्णात फौजदारी वकिल म्हणून अण्णा अल्पावधीतच प्रकाशझोतात आले. याचदरम्यान त्यांचा विवाह कारावार येथिल कमलताई यांच्याशी झाला आणि या दंपत्तीला आशा आणि सुनिता अशा दोन मुली झाल्या. अण्णांना साहीत्य, कला व वाचन यांचा छंद होता. निष्णात फौजदारी वकील म्हणून प्रकाशझोतात आलेल्या अण्णांनी त्यानंतर राजकारणामध्ये प्रवेश केला.

श्री.शंकररावजी जगताप यांच्या सक्रिय राजकारणाची सुरूवात सातारा जिल्हा परिषदेच्या निवडणूकीने झाली. कॉंग्रेस पक्षाचे निष्ठावंत असणाऱ्या काही मोजक्या नेत्यांमध्ये

श्री.शंकररावजी जगताप यांचे नाव घेतले जाऊ लागले. याच काळात महाराष्ट्र राज्याची विधानसभा निवडणूक आली आणि काँग्रेस पक्षाने शंकररावजी जगताप यांना सन १९७८ साली कोरेगांव मतदार संघातून निवडणूकीचे तिकीट दिले.

सन १९७८ साली झालेल्या विधानसभा निवडणूकीत कोरेगांव मतदार संघात एकूण वैध मतदान ७०५३४ इतके झाले. यावेळी इंडीयन नॅशनल काँग्रेस (यू) पक्षाचे उमेदवार श्री.जगताप शंकरराव चिमाजी यांना ३०७६५ मते पडली आणि त्यांचे जवळचे प्रतिस्पर्धी अपक्ष उमेदवार श्री.पांडुरंग निळकंठराव उर्फ बाबासाहेब माने यांना २४७४५ मतदान मिळाले. अशा रितीने श्री.जगताप शंकरराव चिमाजी यांनी आपल्या प्रतिस्पर्धी अपक्ष उमेदवारावर ६०३० मतांनी विजय मिळवला.[२३१] सन १९८० साली झालेल्या विधानसभा निवडणूकीत कोरेगांव मतदार संघात एकूण वैध मतदान ६३२९९ इतके झाले. यावेळी इंडीयन नॅशनल काँग्रेस (यू) पक्षाचे उमेदवार श्री.जगताप शंकरराव चिमाजी यांना ३४८२९ मते पडली आणि त्यांचे जवळचे प्रतिस्पर्धी इंडीयन नॅशनल काँग्रेस (आय) पक्षाचे उमेदवार श्री.बर्गे दत्ताजीराव भाऊसाहेब यांना २३२२७ मतदान मिळाले. अशा रितीने श्री.जगताप शंकरराव चिमाजी यांनी आपल्या प्रतिस्पर्धी उमेदवारावर ११६०२ मतांनी विजय मिळवला.[२३२]

सन १९८५ साली झालेल्या विधानसभा निवडणूकीत कोरेगांव मतदार संघात एकूण वैध मतदान ८१८६८ इतके झाले. यावेळी इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाचे उमेदवार श्री.जगताप शंकरराव चिमाजी यांना ४८०४९ मते पडली आणि त्यांचे जवळचे प्रतिस्पर्धी इंडीयन काँग्रेस (सोशॅलिस्ट) पक्षाचे उमेदवार श्री.फाळके शिवाजी गोविंदराव यांना ३३१६५ मतदान मिळाले. अशा रितीने श्री.जगताप शंकरराव चिमाजी यांनी आपल्या प्रतिस्पर्धी उमेदवारावर १४८८४ मतांनी विजय मिळवला.[२३३] या विजयानंतर श्री.शंकरराव जगताप यांच्या विद्वत्तेचा आणि कायद्याच्या अभ्यासाचा उपयोग सर्वांना व्हावा या हेतूने त्यांची विधानसभेच्या उपसभापतीपदी निवड करण्यात आली आणि अण्णांच्या कार्यकुशलतेची प्रचिती पुढील पाच वर्षात सर्वांना आली. सन १९९० साली झालेल्या विधानसभा निवडणूकीत कोरेगांव मतदार संघात एकूण वैध मतदान १०४८१९ इतके झाले. यावेळी इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाचे उमेदवार श्री.जगताप शंकरराव चिमाजी यांना ५६२४७ मते पडली आणि त्यांचे जवळचे प्रतिस्पर्धी जनता दल पक्षाच्या उमेदवार श्रीमती.शालिनीताई पाटील यांना ४४६८८ मतदान मिळाले. अशा रितीने

श्री.जगताप शंकरराव चिमाजी यांनी आपल्या प्रतिस्पर्धी उमेदवारावर ११५५९ मतांनी विजय मिळवला.[२३४]

या विजयानंतर श्री.शंकरराव जगताप यांच्या मागील पाच वर्षात केलेल्या कामामुळे त्यांची विधानसभेच्या सभापतीपदी निवड करण्यात आली.सन १९९५ साली झालेल्या विधानसभा निवडणूकीत कोरेगांव मतदार संघात एकूण वैध मतदान ११९५५९ इतके झाले. यावेळी इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाचे उमेदवार श्री.जगताप शंकरराव चिमाजी यांना ५९७९३ मते पडली आणि त्यांचे जवळचे प्रतिस्पर्धी जनता दल पक्षाच्या उमेदवार श्रीमती.शालिनीताई पाटील यांना ५३८०७ मतदान मिळाले.अशा रितीने श्री.जगताप शंकरराव चिमाजी यांनी आपल्या प्रतिस्पर्धी उमेदवारावर ११५५९ मतांनी विजय मिळवला.[२३५]सन १९९९ साली झालेल्या विधानसभा निवडणूकीत कोरेगांव मतदार संघात एकूण वैध मतदान १०४८३७ इतके झाले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या उमेदवार श्रीमती.शालिनीताई पाटील यांना ६१६९२ मते पडली आणि त्यांचे जवळचे प्रतिस्पर्धी इंडीयन नॅशनल काँग्रेस पक्षाचे उमेदवार श्री.जगताप शंकरराव चिमाजी यांना ३६०६९ मतदान मिळाले. अशा रितीने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या उमेदवार श्रीमती.शालिनीताई पाटील यांनी श्री.जगताप शंकरराव चिमाजी यांच्यावर २५६२३ मतांनी विजय मिळवला.[२३६]

आण्णा हे गोर गरीबांचे कैवारी होते. कर्मवीरांप्रमाणेच ज्ञानाची गंगोत्री बहुजन समाजापर्यंत पोहचवण्यासाठी आण्णांनी प्रामाणिक प्रयत्न केले.त्यांनी आपल्या कारकिर्दीत वीज, रस्ते, पाणी, आरोग्य, समाजमंदीरे आदी सुविधा देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. सन १९७२ च्या दुष्काळात त्यांनी केलेले काम चिरस्थायी आहे.पाण्याचे आणि जलसंधारणाचे महत्व ओळखून व दुरदृष्टीपणाने त्याचा प्रचार केला आणि कोरेगांव तालूक्यात १०० च्या वरती पाझर तलाव बांधले.आण्णांनी वैयक्तिक कामापेक्षा सार्वजनिक हिताच्या कामावर अधिक भर दिला. त्यांनी नेहमीच गरीब जनतेसाठी काम केले. कोरेगांव तालूका भौगौलिक दृष्टया दुष्काळी असल्यामुळे पावसाचा थेंब आणि थेंब जमिनित मुरवला पाहिजे याचा सातत्याने विचार केला.कोणत्याही तलावाचे काम कमी दर्जाचे झाले तर नेमक्या चूका कोणत्या आहेत हे आण्णा संबंधित ठेकेदाराला बोलावून वदवून घेत असत आणि चूकीचे काम पुन्हा करवून घेत असत. समाजातील दलितांना एकत्र आणून त्यांचे स्वत्त्व जागे केले. प्रत्येक गांव जवळच्या गावाला

जोडले. इतर तालुक्यांच्या तुलनेत सर्वाधिक लांबीचे डांबरी रस्ते कोरेगांव तालुक्यात आहेत.आण्णा हे गांधीवादी विचारसरणीचे एक बहुआयामी व्यक्तिमत्व होते. गांधीजींच्या विचारसरणीचा फार मोठा प्रभाव त्यांच्यावर होता. त्यांच्या जीवनातील एक सत्यप्रसंग असा की "रहिमतपूरच्या झोपडपट्टीला नळाचे पाणी नाही म्हणून नागरीकांनी मोर्चा काढला होता. आण्णा त्यावेळी विधानसभेचे अध्यक्ष होते.ती पाईपलाईन कशी टाकता येईल हे पाहण्यासाठी आण्णा रात्रीचे गेले असताना त्याठिकाणी एका दलित कुटूंबातील मूल भाजलेले होते. आण्णांनी ते पाहताच त्या मुलाला स्वतःच्या गाडीत घालून त्यास हॉस्पीटलला घेऊन गेले. यावेळी पाणीप्रश्नी नागरीक त्यांची गाडी अडवतात तेंव्हा आण्णा नागरीकांना सांगतात की, "मला घेराव घाला परंतु या मुलावर मला उपचार करूद्यात."[२३७] यावरून त्यांच्या मनातील करूणा, तळागाळातील समाजाबद्दलच्या जाणिवेचे दर्शन घडते.

अण्णांनी ज्या कालखंडात राजकारणात प्रवेश केला तो कालखंड म्हणजे महाराष्ट्राचे राजकारण जुन्या पिढीकडून नव्या पिढीतून हस्तांतरणाचा काळ होता. कोरेगांवमधून स्व.शंकरराव जगताप, साताऱ्यातून स्व.श्री.छ.अभयसिंहराजे भोसले तर पाटणमधून श्री.विक्रमसिंह पाटणकर अशा अनेकांचा राजकीय प्रवेश या कालखंडात झालेला होता. असे असले तरीही जातीय राजकारणाच्या या कालखंडात स्व.अण्णांनी आपल्या कार्यातून या कोरेगांव मतदारसंघवरची आपली पकड २५ वर्षे मजबुत ठेवलेली दिसते.अण्णांनी स्वतः नवी पायवाट तयार केली. आण्णांनी नेहमी सर्वसामान्यांच्या गरजा भागविल्या.दुष्काळी भागातील पाणीप्रश्न सोडवण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले.कोरेगांव एज्यूकेशन सोसायटी ही शिक्षण संस्था काढून त्यांनी दुर्गम भागात शिक्षणाचा प्रसार केला.प्रत्येक जातीधर्माबाबत त्यांना आस्था होती म्हणूनच त्यांनी लिहून ठेवले होते की, माझ्या मृत्यूनंतर अठरा पगड जातीतील लोकांनी मला खांदा द्यावा आणि माझा शेवटचा प्रवासही बौध्द व मातंग वस्तीतून व्हावा.[२३८] ऐन तारूण्यात पत्नी वियोगाचे दुःख एका बाजूला व दोन लहान मुलींचे संगोपन दुसरीकडे असताना देखिल अण्णांनी आपल्या हाती सत्ता असतानाही आपल्या चारित्र्यावर कधीही शिंतोडे उडू दिले नाहीत हेच त्यांचे वैशिष्ठय म्हणता येईल.

स्वातंत्र्य चळवळ, गांधीवाद, धर्मनिरपेक्षता, जातीचा राजकिय सहभाग ही सुत्रे ठेवून सत्ता ही सामान्यांसाठी असते याचे भान जपणारे अण्णा हे थोर प्रगल्भ व सैध्दांतिक आणि चारित्र्यशिल राजकारणी ठरतात.

## लोकनेते श्री.छ.अभयसिंहराजे भोसले

सातारचे भाग्यविधाते अजिंक्य उद्योग समुहाचे शिल्पकार आणि साताऱ्याच्या जीवनाशी एकरूप झालेले व्यक्तिमत्व म्हणजे श्री.छ.अभयसिंहराजे भोसले होय. राजघराण्यात जन्म घेऊनही राजेपद न मिरवणारे सर्वसामान्यात मिसळणारे एक संयमी व सुसंस्कृत राजकारणी म्हणून त्यांना ओळखले जाते. छत्रपती शिवरायांच्या राजघराण्याचा वारसा हा जनकल्याणाचा वारसा आहे हे जाणून आयुष्यभर अथक परिश्रम घेऊन त्यांनी सातारच्या भूमीचा कायापालट केला. शेतकऱ्याचे, कामगारांचे आणि जनसामान्यांचे जीवन उजळून टाकणारे, विवेकी, कृतिशील द्रष्टे नेतृत्व श्री.छ.अभयसिंहराजे भोसले यांच्या रूपाने सातारला लाभले. संयुक्त महाराष्ट्र निर्मितीनंतर साताऱ्याच्या या मतार संघावर काँग्रेसचे प्रभुत्व राहिले. श्री.यशवंतराव चव्हाण व श्री.किसन वीर यांनी सामान्य कार्यकर्त्यांना आमदार केले. स्वातंत्र्यानंतर १९५१ ला विधानसभेची पहिली निवडणूक झाली. त्यात कामगार किसान पक्षाचे श्री.व्ही.एन.पाटील आमदार झाले. त्यानंतरच्या काळात काँग्रेस जनता पक्ष, भारतीय जनता पक्ष, राष्ट्रवादी, शिवसेना या पक्षांचे उमेदवार निवडून आले. संयुक्त महाराष्ट्र निर्मितीनंतर आणीबाणीपर्यतचा काळ काँग्रेसचा राहिला १९७८ मध्ये श्री.छ.अभयसिंहराजे भोसले यांच्या रूपाने राजघराण्यातील व्यक्ती राजकारणात आली. तत्पूर्वी तीन वर्षे आधी श्री.छ.अभयसिंहराजे भोसले यांचे थोरले बंधू प्रतापसिंहराजे सातारा पालिकेत नगराध्यक्ष होते. थेट लोकांतून निवडून जाऊन नगराध्यक्ष होण्याची ती पहिली निवडणूक होती.

आणीबाणी नंतरच्या विधानसभा निवडणूकीत केंद्रात जनता पक्षाचे सरकार असल्याने या पक्षातील प्रमुखांनी श्री.छ.अभयसिंहराजे भोसले यांना रिंगणात आणले. श्री.छ.अभयसिंहराजे भोसले आमदार झाले. तेथून राजघराणे सत्तेत आले ते आजअखेरपर्यंत श्री.छ.अभयसिंहराजे भोसले यांनी मागे वळून पाहिले नाही.[२३९] सन १९८० मध्ये ते काँग्रेसमधून निवडून आले. बॅरिस्टर अंतुले यांच्या मंत्रीमंडळात मंत्री झाले. ते दीर्घकाळ मंत्री राहिले. अजिंक्यतारा सहकारी साखर कारखाना, दूध संघ, कुक्कुटपालन, बझार, सहकारी बँक, सूतगिरणी आदी संस्थांची

उभारणी झाली. पाच वर्षे ते सहकार मंत्री होते. १९७८ ते ९८ ही २० वर्षे आमदार राहिल्यानंतर लोकसभेच्या निवडणुकीत ते काँग्रेसकडून खासदार झाले. पुन्हा १९९९ च्या निवडणुकीत श्री.छ. अभयसिंहराजे आमदार झाले. काही वर्षे अजिंक्यतारा कारखान्याचे अध्यक्ष तर काही वर्षे ते मार्गदर्शक संचालक होते.[२४०] राजघराण्यात जन्म घेतलेली व्यक्ती सर्वसामान्य जनतेत इतक्या सहजपणे मिसळत नाही किंबहुना त्यांना याची गरज वाटत नाही. मात्र श्री.छ.अभयसिंहराजे भोसले याला अपवाद होते. आपण राजघराण्यात जन्म घेतलेला आहे परंतू या मोठेपणासोबतच आपणावर समाजसेवेची जबाबदारी आहे आणि ती व्यवस्थित पार पाडणे हे आपले कर्तव्य आहे राजमाता सुमित्राराजे भोसले यांची ही शिकवण लोकसेवक या नात्याने त्यांनी आयुष्यभर सांभाळली.

श्री.छ.अभयसिंहराजे भोसले यांना सर्वसामान्य जनता 'भाऊसाहेब' म्हणत असे.भाऊसाहेब या शब्दातूनच जनमानसात त्यांच्याविषयी असणारी आपुलकी जाणवते. भाऊसाहेब महाराजांनी लोकांना केलेल्या मदतीमुळे लोक त्यांना विसरू शकत नाहीत आणि यामुळेच खरेतर त्यांच्या राजकीय जीवनात ते कोणत्याही पक्षात गेले तरीही लोकांनी पक्ष न पाहता भाऊसाहेबांना निवडून दिले. त्यांच्या या वागण्यामुळेच ते लोकप्रिय नेते म्हणून ओळखले जात होते.राजकारणात राहुन समाजकारण करणारा नेता म्हणुन लोक त्यांच्याकडे पाहत. विविध संस्थांचे संस्थापक, अध्यक्ष, आमदार, मंत्री, खासदार अशा विविध पदांवर जाऊनही श्री.छ.अभयसिंहराजे भोसले हे सामान्य जनतेचे प्रतिनिधीच राहीले. कोणतीही व्यक्ती ती मतदार संघातील असो अथवा नसो आपले गाऱ्हाणे त्यांच्यासमोर मांडत असे आणि त्या समस्येवर उत्तम पर्याय ते नेहमी काढत असत.

लोकसंग्रहाची आवड असणारा हा नेता होता. सन १९७८ साली त्यांनी राजकारणात प्रवेश केला. यावेळी ते जनता पक्षाच्या तिकीटावर उभे राहीले होते. या निवडणूकीत ७२८६ मतांनी ते विजयी झाले.[२४१] त्यांनी या पदाचा उपयोग जनतेच्या विकासासाठी केला. दोन वर्षांच्यानंतर पुन्हा निवडणूका लागल्या आणि यावेळी त्यांनी काँग्रेस पक्षाच्या तिकीटावर निवडणूक लढवली. या निवडणूकीत ७८५५ च्या मताधिक्याने विजय प्राप्त केला.[२४२] यावेळी बॅ.अंतुले यांच्या मंत्रिमंडळात राज्यमंत्री म्हणून समावेश करण्यात आला. या काळात त्यांनी गृह, कृषी, पाणीपुरवठा आणि ग्रमिण विकास या खात्यांचा कारभार अतिशय उत्तम रित्या

सांभाळला पुढे १९८३ साली त्यांच्याकडे सहकार हे अत्यंत महत्वाचे खाते देण्यात आले.[२४३]सन १९८५ साली निवडणूका लागल्या आणि ३३९२३ मतांच्या मताधिक्याने विजय प्राप्त केला.[२४४] सन १९८८ साली त्यांच्याकडे सर्वप्रथम त्यांना कॅबीनेट दर्जाचे मंत्रीपद देऊन त्याचा सहकार क्षेत्रातील मागील अनुभव लक्षात घेऊन पुन्हा त्यांच्याकडे हे अत्यंत महत्वाचे खाते देण्यात आले.[२४५] या कालखंडात त्यांनी संपूर्ण तालुक्यातील रस्ते, पिण्याच्या पाण्याच्या पाणीपुरवठा योजना त्यांनी पुर्ण केल्या. उरमोडीच्या धरणामुळे सिंचनक्षेत्र वाढले. त्यामुळे माळरानावरही गवताच्या ठिकाणी उसाची शेती डोलू लागली व शेतकयांचे जीवनमानच बदलून गेले. त्यातच १९९० साली विधानसभेच्या पुन्हा निवडणूका आल्या यावेळी त्यांच्या विरोधात शिवसेनेने त्यांच्या मोठया भावाची पत्नी म्हणजेच श्री.छ.कल्पनाराजे प्रतापसिंहराजे भोसले यांना तिकीट दिले. यावेळी झालेल्या अटीतटीच्या लढतीत श्री.छ.अभयसिंहराजे भोसले ३६१५३ च्या मताधिक्याने निवडून आले आणि त्यांना ग्रामीण विकास मंत्रालयाचे कॅबीनेट मंत्री म्हणून मंत्रिमंडळात समाविष्ठ करण्यात आले.[२४६] या विविध खात्यांच्या मंत्रीपदाचा वापर त्यांनी लोकांच्या अडी अडचणी सोडवण्यासाठी केला त्यामुळे लोक भाऊसाहेबांना दुवा देऊ लागले.

सन १९९५ साली झालेल्या विधानसभा निवडणूकांमध्ये त्यांनी विरोधी उमेदवारपेक्षा ५२५६८ जास्त मते मिळवून विजय मिळवला[२४७] मात्र यावेळच्या मंत्रिमंडळातून त्यांना डावलण्यात आले. सन १९९८ साली लोकसभेची निवडणूक आली व पक्षाने श्री.छ.अभयसिंहराजे भोसले यांना लोकसभेची उमेदवारी दिली. या निवडणूकीत त्यांनी १८१४७६ मतांनी शिवसेनेचे उमेदवार श्री.हिंदूराव निंबाळकर यांना पराभूत केले.[२४८] १९९८–९९ साली केंद्रिय राजकारणात उलथापालथ होऊन श्री.शरद पवार काँग्रेस पक्ष सोडून बाहेर पडले यावेळी श्री.छ.अभयसिंहराजे भोसले यांनीही श्री.शरद पवारांसोबत काँग्रेस पक्ष सोडून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना केली. सन १९९९ साली झालेल्या विधानसभा निवडणूका त्यांच्या जिवनातील अखेरच्या निवडणूका ठरल्या. या निवडणूकांतही त्यांच्या विरोधात भाजपने त्यांच्या मोठया भावाचा मुलगा म्हणजेच श्री.छ.उदयनराजे प्रतापसिंहराजे भोसले यांना तिकीट दिले. यावेळी झालेल्या अटीतटीच्या लढतीत श्री.छ.अभयसिंहराजे भोसले ५३६३ च्या मताधिक्याने निवडून आले.[२४९]

या लोकनेत्याला जनतेने सहा वेळा आमदार व एक वेळ खासदार केले. आयुष्यमानाप्रमाणेच त्यांची किर्ती वाढत गेली. श्री.छ.अभयसिंहराजे भोसले यांनी सन १९७८ ते सन २००४ या कालखंडात सातारचे नेतृत्व केले. सामान्य जनतेच्या प्रश्नांची त्यांना जाण होती. मंत्रीपदावर असो किंवा नसो त्यांनी सतत सामान्यांची काळजी वाहीली. प्रत्येक चांगल्या कामात त्यांचे सर्वांना सहकार्य मिळत असे. सौम्य परंतु ठाम विचार असणारे व्यक्तिमत्व आणि आपले विचार पटवून देण्याचे कौशल्य त्यांच्या ठाई होते.महाराष्ट्राच्या राजकारणातील सालस आणि मितभाषी व्यक्ती म्हणून त्यांचेकडे पाहीले जाई. त्यांच्या २६ वर्षाच्या राजकीय कारकीर्दीत त्यांच्यावर कधीही वैयक्तिक स्वरूपाची टिका झालेली नाही किंबहुना त्यांचा स्वभावच असा होता की त्यांच्याकडे कोणीही बोट दाखवू शकत नाही. सर्वांना बरोबर घेऊन काम करण्याचा दृष्टीकोण त्याच्याकडे होता. ते एक निगर्वी व निष्कलंक राजकारणी होते.

श्री.छ.अभयसिंहराजे भोसले यांचे सर्वात आवडीचे क्षेत्र शेती होते. शेतीमध्ये आधुनिक तंत्राचा वापर करून शेतीचा विकास करणे हे त्यांचे उद्दीष्ट होते.शेतकरी सुखी तर सर्व रयत सुखी हे सुत्र त्यांना बरोबर माहीत असल्याने शेती विकासात त्यांनी मोठया प्रमाणावर लक्ष केंद्रीत केले होते. याच अनुशंगाने त्यांनी अठरा उपसा जलसिंचन योजना, उरमोडी नदीवर तिन कोल्हापूर पध्दतीचे बंधारे आणि ज्या ज्या ठिकाणी मध्यम स्वरूपाचे बंधारे बांधणे शक्य होते तेथे तेथे मायनर एरिगेशन प्लँाट उभारून पाणी अडवले . श्री.छ.अभयसिंहराजे भोसले यांनी ठोसेघर येथे तारळी नदीवर मायनर एरिगेशन टँक बांधून पुर्ण केला आणि त्या भागातील शेतकऱ्यांच्या दोन ते अडीज हजार एकर शेतीला पाण्याचा पुरवठा केला.[२५०] याशिवाय महत्वाचे प्रकल्प म्हणजे उरमोडी नदीवरील धरण, कुमठे येथिल जलसिंचन बंधारा यांचा उल्लेख क्रमप्राप्त आहे. त्यांच्या या परिश्रमांमुळेच साताऱ्यात हरितक्रांती झाली. शेतीतून मिळणाऱ्या या उत्पन्नाला देश परदेशातील बाजारपेठ उपलब्ध करून मालाची खरेदी विक्री करण्याची संकल्पनाही त्यांनी राबवली.

श्री.छ.अभयसिंहराजे भोसले यांनी सातारच्या ग्रामीण भागाचा कायापालट करण्याचा प्रयत्न केला. ज्या ग्रामीण भागाला आजवर रस्ते, पाणी, शाळा, या मुलभूत सोईंसाठी धडपड करावी लागत असे त्या भागात त्यांनी या सर्व सोई निर्माण करण्यास प्राधान्य दिले. ज्या गावी पिण्याच्या पाण्याची अडचण असे त्या गावात नळपाणीपुरवठा योजना त्यांनी राबवल्या. शैक्षणिक

विकासासाठी त्यांनी स्वतः शाळा कॉलेजेस काढली नाहीत मात्र ज्या शाळा कॉलेजेस उत्तम प्रकारे काम करताहेत त्यांना प्रोत्साहन देण्यात ते कमी पडले नाहीत. ग्रामिण भागाचा विकास होण्यासाठी भाऊसाहेब महाराज धडपड करीत होते तसेच शहरी भागातील समस्यांचा निपटारा करण्याच प्रयत्न ते नेहमी करीत असत. सहकार क्षेत्रातील त्यांचे कार्य उल्लेखनिय आहे.'अजिंक्य उद्योग समुह' हा आज महाराष्ट्रातील सहकारी तत्वांवर चालणाया विविध संस्थांना आदर्श म्हणून समोर ठेवावा असा उद्योग समुह आहे. या उद्योगाची पहिली मुहुर्तमेढ श्री.छ.अभयसिंहराजे भोसले यांनी १९८२–८३ साली 'अजिंक्यतारा सहकारी साखर कारखाना' उभारून रोवली.[२५१]माळरानात नंदनवन फुलवण्याचे कार्य त्यांनी केले. शेतकऱ्यांचे, कामकऱ्यांचे अर्थकारण मजबुत व्हावे, त्यांचे जीवनमान उंचवावे या हेतूने त्यांनी सहकारी संस्थांचे जाळेच सातारा तालुक्यात उभारले. अजिंक्यतारा सहकारी साखर कारखाना यशस्वी झाल्यानंतर त्यांनी अजिंक्यतारा कुक्कुटपालन संस्था, अजिंक्यतारा सहकारी ग्राहक भांडार, अजिंक्यतारा कामगारांची पतसंस्था, अजिंक्यतारा सहकारी बँक, अजिंक्यतारा महिला सहकारी बँक, अजिंक्यतारा सहकारी सुतगिरणी, अजिंक्यतारा शेतकरी सहकारी फळे, फुले व भाजीपाला खरेदी–विक्री संघ अशा सहकारी संस्थांची मालिकाच उभी केली. त्यामुळे या संस्थांशी निगडीत असलेल्या लोकांचे जीवनमान उंचावले. पंचक्रोशीतील युवकांना नोकऱ्या मिळाल्या. वर्षानुवर्षे अनेक कुटूंबांच्या नशिबी असलेले दारिद्र्य संपुष्टात आले. सातारा तालुक्यातील प्रत्येक कुटूंब त्यांच्या या सहकार क्षेत्रातील संस्थांशी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष जोडले गेलेले आहे.

श्री.छ.अभयसिंहराजे भोसले यांनी राजकीय व सामाजीक क्षेत्रात आपला ठसा ज्याप्रमाणे उमटवला त्याप्रमाणेच त्यांना साहित्याचीदेखील आवड होती. सन १९९३ साली साताऱ्यात ६६ वे अखिल भारतीय साहित्य संमेलन झाले.[२५२] या साहित्य संमेलनाचे प्रसंगी स्वागताध्यक्ष या नात्याने त्यांनी केलेल्या भाषणातून त्यांची साहित्यरसीकता स्पष्टपणे जाणवली होती.[२५३] सन १९९४ साली सातारा साहित्य संमेलन ट्रस्ट यांच्या माध्यमातून त्यांनी साताऱ्यात पहिले अभिजात साहित्य संमेलन आयोजित केले. या ठिकाणीही त्यांचा मोलाचा हात होता.[२५४]

श्री.छ.अभयसिंहराजे भोसले यांनी ज्या ज्या ठिकाणी काम केले तेथे तेथे त्यांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला त्यामुळेच त्यांच्या आयुष्याच्या अखेरपर्यंत समाजाने त्यांना आपला नेता मानले. म्हणूनच त्यांना समाजाभिमुख नेता असे म्हटले जाते.

**श्री.विक्रमसिंह पाटणकर**

महाराष्ट्र राज्याचे शिल्पकार स्वर्गीय श्री.यशवंतरावजी चव्हाण, लोकनेते स्वर्गीय श्री.बाळासाहेब देसाई, महाराष्ट्राचे खंबीर नेतृत्त्व स्वर्गीय श्री.वसंतदादा पाटील, भारताचे कृषीमंत्री मा.श्री.शरदचंद्रजी पवार यांच्या विचारांचा वारसा घेऊन तळागाळातील लोकापर्यंत पोहोचून, डोंगरदऱ्यात पायपीट करून, त्यांची दुःख, त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी १९६८ सालापासून जिल्हा परिषद, आमदार आणि नामदार या पदापर्यत विकासासाठी अविरत प्रयत्न करणारे एक कर्तृत्त्ववान व विकासाभिमुख नेतृत्त्व विक्रमसिंह पाटणकर उर्फ बाळ सरकार १९८३ साली यांना पाटण तालुक्यातील जनतेने प्रचंड बहुमताने निवडून दिले आणि ते आमदार झाले. पाटण तालुक्यातील जनतेने ज्या विश्वासाने आपणाला नेतृत्त्व बहाल केले त्या विश्वासाला तडा न जाऊ देण्याचा निग्रह करून ते विकासाच्या मागे लागले. लोकांच्या समस्या, लोकांचे प्रश्न, लोाकंना अपेक्षित असलेला विकास, त्यांना सुविधा यांचा परिपूर्ण अभ्यास करून तेच प्राधान्याने करून देण्याचा प्रयत्न त्यांच्या माध्यमातून होऊ लागला.

राजकीय डावपेच स्वतः कितीही आखले तरीही ते डावपेच वापरण्यासाठी कुणाच्या तरी मदतीची, सहकार्याची अपेक्षा असतेच. त्याशिवाय राजकीय चळवळीस गती प्राप्त होत नाही. ना.विक्रमसिंह पाटणकर यांच्या आजवरच्या वाटचालीत असंख्य सहयात्री त्यांना लाभले. त्यामुळे अशक्यप्राय असणारी उद्दिष्टे दृष्टिपथात आणता आली. पाटण तालुका आणि पाटणकर घराणे यांची नाळ अनेक वर्षापासून जोडली गेली आहे. या घराण्यावर असणाऱ्या प्रेमापोटी आणि आदरापोटी विक्रमसिंह पाटणकर यांना १९७२ साली जिल्हा परिषदेवर सदस्य म्हणून जनतेने बिनविरोध पाठविले. यातच या घराण्याचा लौकीक लक्षात येतो. आपली ७ वर्षाची जिल्हा परिषदेची कारकिर्द संपवून आपल्याला आता पुन्हा राजकारण नको असे म्हणणाऱ्या ना.विक्रमसिंह पाटणकरांना पुन्हा जनतेनेच आग्रह करणे सुरू केले आणि पुन्हा १९७८ साली बिनविरोध पाठविण्याचा प्रयत्न केला. कारण त्यांना त्याच रूपाने एक तरूण व उमदे नेतृत्त्व गवसले होते. त्याच दरम्यान बाळसरकारांचे नाव हळूहळू राजकारणाशी जोडले जावू लागले

होते. जिल्हा परिषदेचे सदस्यत्व, श्री.बाळासाहेब देसाई सह.साखर कारखान्याचे संचालक पद, शेती पाणी पुरवठा फेडरेशनचे अध्यक्षपद या माध्यमातून ते लोकाभिमुख झालेच होते परंतु सिकारीच्या छंदामुळे ते डोंगर कपारीतील लोकांशी निगडीत झाले होते. त्यामुळे ते जनतेला एकमेव आशेचा किरण वाटत होते. जनताही त्यांना नवा नेता म्हणून स्वीकारायला तयार होती. १९८० साली ना.विक्रमसिंह पाटणकर यांचा थोडया फरकाने पराजय झाला. १९८३ साली झालेल्या पोटनिवडणुकीत भरघोस मतांनी विजय प्राप्त केला आणि ना.विक्रमसिंह पाटणकर हे पाटण तालुक्याचे आमदार झाले. १९८३ सालापासून पाटण तालुक्यातील जनतेला आमचे आमदार कधीतरी नामदार व्हावेत असे अनेक वर्षापासुन वाटत होते. ते स्वप्न १९९९ साली पूर्ण झाले. १९९९ साली विधानसभेची निवडणूक झाली. त्यात त्यांनी नेहमीप्रमाणे प्रतिस्पर्ध्यावर मात करून विजय मिळविला. आघाडी सरकार सत्तेवर येताच मंत्रीपद पदरात पडले आणि सार्वजनिक बांधकाम खाते त्यांना देण्यात आले. ना.विक्रमसिंह पाटणकर यांनी सार्वजनिक उपक्रमातून कुशलतेने अनेक धनिकांना गुंतवणूक करायला लावून मुंबई–पुणे द्रुतगती मार्ग पूर्णत्वाला जावून महाराष्ट्रात एकूण विकास मार्गाला गती प्राप्त झाल्याचे चित्र निर्माण झाले. पाटण तालुक्याच्या जनतेचा सर्वांगीण विकास घडवायचा असेल तर प्रथम दळणवळणाची सोय झाली पाहिजे. म्हणून सर्वप्रथम ना.विक्रमसिंह पाटणकर यांनी रस्त्यांच्या कामाना प्राधान्य दिले. मुख्य खोरी, उपखोरी, हमरस्ते व गाव यांना जोडण्यासाठी रस्त्यांचे जाळे विणले. काही रस्त्यावर पूल, फरशी यांची बांधकामे करून बारमाही वाहतूक सेवा सुरू केली. शासकीय अधिकारी डोंगर कपारीत असलेल्या गावापर्यत जाऊन पोहचू लागले. ना.विक्रमसिंह पाटणकर यांच्या विधायक कार्यामुळे अनेक रस्त्यांची कामे मार्गी लागली. कोणत्याही प्रकारचा आप–परभाव न ठेवता जनतेची गैरसोय दूर करणे हाच ध्यास त्यांनी घेतला आहे. विहे गावातील जनतेला पावसाळयात हमरस्त्यावर येण्यासाठी गुडघाभर चिखलातून कसरत करून यावे लागत होते. विहे गावातील जनतेने आपली रास्त मागणी ना.विक्रमसिंह पाटणकर यांच्याकडे मांडली आणि जे ३० वर्षापासून न झालेले काम पूर्ण केले. रस्त्यांचे जाळे विणल्याखेरीज पाटण तालुक्यातील जनतेला सुविधा प्राप्त होणार नाहीत ही गमक ना.विक्रमसिंह पाटणकर यांनी जाणल्यानंतर शासनाच्या बांधकाम खात्याच्या विविध विभागामार्फत रस्त्यांची कामे हाती घेतली. ग्रामीण भागातील बेरोजगारांना, भूमिहीन शेतकरी व

शेतमजूर यांना रोजगार उपलब्ध व्हावा. त्यांना उदरनिर्वाहाचे साधन प्राप्त व्हावे म्हणून रोहयोखाली अनेक रस्त्यांची कामे हाती घेण्यात आली. नारळे–पाटण रस्ता, तारळी नदीवरील तारळे येथील पूल, आंबळे –आवर्डे रस्त्यावरील फरशी, चाफळ येथील राम मंदिराजवळील गणेश पूल, निसरे–मारूल, पाटण–मोरगिरी, ढेबेवाडी–उमरकांचन, पाटण –मणदुरे रस्त्याचे डांबरीकरण, चाफेर धक्यातील पूल मेंढजवळील पूल, निसरे येथील कोल्हापूर पद्धतीचा बंधारा, खिवशी– दिवशी नाल्यावरील पूल व अन्य शेकडो बांधकामे यामुळे रस्त्याची कामे पूर्ण झाली.[२५६]

प्राथमिक शिक्षण तळागाळापर्यंत जाऊन पोहोचले पाहिजे. ज्ञानाची गंगोत्री घरादारापर्यंत पोहोचली पाहिजे. यासाठी शासनाने योजना आखली. डोंगर कपारीत दुर्गम भागात वसलेल्या खेडयापाडयात शाळा सुरू केल्या. शाळांसाठी इमारती बांधल्या. पाटण तालुक्यातील दुर्गम भागात प्राथमिक शिक्षणाची सोय व्हावी भूकंपामुळे ज्या इमारतीची पडझड झाली होती. त्या इमारतीची दुरूस्ती व्हावी म्हणून आमदार पाटणकर यांनी कोयना पुनर्वसनाच्या कामांना प्राधान्य दिले. आणि त्यानुसार तालुक्याच्या डोंगराळ भागातील, तद्वतच ज्या ज्या ठिकाणी अत्यंत आवश्यक अशा ठिकाणी हा निधी उपलब्ध करुन दिला. पाटण तालुका शैक्षणिकदृष्टया मागे होता. गाव तेथे शाळा ही योजना राबवून दुर्गम भागाच्या कानाकोपऱ्यात प्राथमिक शाळा सुरू केल्या.[२५७] त्यांच्या इमारती बांधल्या. विविध संस्थेच्याद्वारे माध्यमिक विद्यालये सुरू केली. पाटण येथे दिडकोटी रूपये खर्च करून बांधल्या जात असलेल्या बाळासाहेब देसाई कॉलेजच्या इमारतीची जागा मिळवून देण्यात व आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्यात त्यांचे मोलाचे योगदान लाभले आहे. मुलींच्या शिक्षणासाठी सौ.सुलोचनाबाई पाटणकर कन्या शाळेस आर्थिक सहाय्य व मुलींच्यासाठी प्रियदर्शनी वसतीगृहास मंजुरी मिळवून दिली. रयत शिक्षण संस्था, स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोयना शिक्षण संस्था व तालुक्यातील स्थानिक विविध संस्थांच्या तसेच दादासाहेब पाटणकर हायस्कूल, म्हावशी, न्यू इंग्लिश स्कूल बेलवडे, न्यू इंग्लिश स्कूल कुठरे, माने देशमुख विद्यालय पाटण, तळमावले, लक्ष्मीदेवी हायस्कूल कुंभारगाव, न्यू इंग्लिश स्कूल मुरूड, आदी माध्यमिक विद्यालयासाठी सुमारे १४ लाख ८० हजार रूपये मदत या समितीकडून मिळवून दिली. आज अखेर तालुक्यातील १३५१३ बांधीव घरासाठी ६ कोटी २४ लाख ९२ हजार २८९ रूपये एवढी मदत वाटण्यात आली आहे.[२५८]

सहयाद्रीच्या कुशीत वसलेल्या पाटण तालुक्यातील बहुतांशी जमीन डोंगर उतारावरची आहे. पावसाचे प्रमाण बऱ्यापैकी असले तरी डोंगरावरून पाणी सपकन वाहून जाते. त्याामुळे जमिनीत पिके घेता येत नाहीत. येथील मागासलेला शेतकरी नाचणी, वरी, सावा, भात, ज्वारी अशी पिके पारंपारिक शेती पद्धतीने घेत असे. त्यामुळे येणाऱ्या उत्पन्नावर त्याच्या कुटुंबाचे पालनपोषण करणेही त्याला अवघड होई. स्वतः कुशल शेतकरी असल्याने शेतीने नवनवीन तंत्रे वापरून सुधारीत बियाणे, खते, औषधे यांचा वापर करून शेती उत्पादनात त्यांनी लक्षणीय वाढ केली होती. 'जे जे आपणाशी ठावे ते ते इतरासी द्यावे शहाणे करून सोडावे सकल जन'. या उक्तीनुसर आमदार पाटणकरांनी पाटण तालुक्याला नवी दिशा, नवे वळण देण्याचा सफल प्रयत्न केला. पाटण तालुक्यातील जनतेला आपले जीवनमान उंचवायचे असेल, त्यांची विस्कटलेली आर्थिक स्थिती पुनर्स्थापित करायची असेल तर त्यांच्या शेतीत सुधारणा घडली पाहिजे, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेती केली पाहिजे हे त्यांनी जाणले. स्वतः शेतकरी असल्याने त्यांनी आपले अनुभव तर इतरांना दिलेच पण त्याचबरोबर अन्य शेती तज्ञांच्या उपस्थितीत अगदी घाणबी, वाटोळेसारख्या दुर्गम भागातही शेतकरी मेळावे घेतले.

श्री.विक्रमसिंह पाटणकर यांना शेतीमध्ये नवीन नवीन प्रयोग करण्याचा छंद होता. तसाच नवीन शेतीपुरक व्यवसाय शोधण्याचा छंद होता. त्यांनी आपल्या म्हावशी येथे गाई–म्हैशी पाळून दुग्ध व्यवसाय सुरू केला. त्याचबरोबर मत्सपालन, शेळया–मेंढयांची पैदास, कुक्कुटपालन, वराहपालन, रेशीम पैदास यासारखे अनेक उद्योग केले. ते सर्व उद्योग यशस्वी केले. या सर्व व्यवसायांचे तंत्रशुद्ध प्रशिक्षण घेऊन व्यवसाय केला. श्री. विक्रमसिंह पाटणकर यांच्या प्रयत्नामुळे चाफळ, तारळे, ढेबेवाडी, मोरणा विभागात जी धरणे निर्माण झाली आहेत, त्यात जो पाण्याचा साठा उपलब्ध झाला आहे, त्यावरच बरेचसे क्षेत्र पाण्याखाली येईल आणि शेतकरी केवळ पावसावर अवलंबून न राहता वर्षातून दोन पिके घेवू शकेल. तालुक्यातील नगदी पीक म्हणून शेतकरी आजवर ऊस पीकवीत आले आहेत. मात्र आज हे पीक शास्वत आणि पैस मिळवून देणारे राहिले नाही. यावर मात करण्यासाठी व शेतकऱ्याला नवी संजीवनी देण्यासाठी श्री. विक्रमसिंह पाटणकर यांनी एका वेगळया प्रकल्पाची संकल्पना शेतकऱ्यासमोर मांडली. ऊसाला पर्यायी टोमॅटो, स्ट्रॉबेरी, अननस व पपई यासारखी पैसे मिळवून देणारी पिके घेता येवू शकतील व त्यांना विक्री व्यवस्थाही तालुक्यातच उपलब्ध करून देता येईल या

उद्देशाने  कोयना ॲग्रो लि.ची स्थापना केली. उत्पादित मालावर प्रकिया करून तयार उत्पादन परदेशात पाठविण्याचे प्रयत्नही श्री. विक्रमसिंह पाटणकर यांचे माध्यमातून सुरू केले. या प्रकल्पामुळे शेतकऱ्यांना आणि बेरोजगार युवकांनाही रोजगार निर्माण झाला आहे.[२६०] पाटण तालुक्यातील जनतेला आपले जीवनमान उंचवायचे असेल, त्यांची विस्कटलेली आर्थिक स्थिती पुनर्स्थापित करायची असेल तर त्यांच्या शेतीत सुधारणा घडली पाहिजे, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेती केली पाहिजे  हे त्यांनी जाणले होते. स्वतः शेतकरी असल्याने त्यांनी आपले अनुभव तर इतरांना सांगितलेच पण त्याचबरोबर अन्य शेती तज्ञांच्या उपस्थितीत अगदी घाणबी, वाटोळेसारख्या दुर्गम भागातही शेतकरी मेळावे घेतले. पाटण तालुक्यातील उद्योजक तरूणांना स्वतःचा उद्योग व्यवसाय उभा करता यावा यासाठी श्री. विक्रमसिंह पाटणकर यांनी शासन दरबारी लघुऔद्योगिक विकास संघ स्थापन करणेची मान्यता मिळवून तामकडे येथे लघुऔद्योगिक क्षेत्र निर्माण केले. याठिकाणी वीज, डांबरी रस्ते आणि पाण्याची सुविधा उपलब्ध करून दिली. या ठिकाणी अनेक उद्योग उभे राहत असल्याचे दिसून येते.

श्रीरामभूमी ॲग्रीकल्चरल अँड रिसर्च फौंडेशन ट्रस्ट मार्फत वांझोळे येथे सुमारे ४० एकर जमीन घेऊन त्याठिकाणी फलोद्यान विकास प्रकल्पाचे काम हाती घेण्यात आले. डोंगरी दुर्गम भागात राहणाऱ्या गरीब शेतकऱ्यांचे शेती उत्पन्न वाढविणे, त्यासाठी भरपूर पीक देणाऱ्या फळबागा शेतकऱ्याकडून उभ्या करून घेणे व प्रचंड वृक्षतोडीमुळे उघडे झालेले डोंगर फळबागेतील आणून पर्यावरणाचा समतोल राखणे हे ध्येय डोळयासमोर ठेवून फलोद्यान योजनेखाली मातृवृक्षांची लागवड करण्याचा कार्यक्रम येथे आकार घेऊ लागला. पाटण तालुक्यातील शेतकऱ्यांना पुरवठा करण्यासाठी हापूस, रत्ना, केशर या आंब्याची रोपे काजू वेंगुर्ला- ४ चिक्कू, काळी पती, चिक्कू क्रिकेट बॉल, नारळ, फणस, कोकम, लिंबू, मिरी, चहा, कॉफी, कोको आदीची प्रमाणित रोपे आणून पुरवठा करण्याचा कार्यक्रम येथे राबविला गेला. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून पॉली हाऊस उभारणयत आले.[२६१]

पाटण तालुका डोंगर दऱ्याचा तसेच डोंगर पठाराचा आहे. अशा पठारांचा उपयोग भविष्यकाळात वीज निर्मितीसाठी होऊ शकेल असे कोणालाही वाटले नव्हते. परंतु स्थानिक नैसर्गिक परिस्थितीचा परिपूर्ण अभ्यास करून श्री. विक्रमसिंह पाटणकर यांनी याच खडकावर पवनउर्जा पकल्प उभारून दुसऱ्यांना उभारायला प्रवृत्त करून पवन उर्जा क्षेत्रात तालुक्याला

मानाचे स्थान प्राप्त करून दिले आहे. आजवर भारतात तामिळनाडू, कर्नाटक, गुजरात, आंध्रप्रदेश, केरळ या राष्ट्राबरोबर महाराष्ट्र पवन उर्जेत अग्रेसर झाला आहे. तो केवळ वन कुसवडे, चाळकेवाडी, ठोसेघर येथील पवनचक्क्यामुळेच पठारावर उपलब्ध असणारा वारा हे या उर्जानिर्मिती प्रकल्पाचे मुख्य भांडवल त्या दृष्टीने चाचणी घेऊन हा प्रकल्प उभा केला. आज वनकुसवडे पठारावर ८५० मशिन्स सुमारे १४० कंपन्यांनी उभारून १५०० कोटींची गुंतवणूक केली गेली आहे. त्यामुळे पठारावरील तसेच तालुक्यातील शेकडो बेरोजगारांना रोजगार मिळाला आहे. पाटण तालुक्यातील जनतेलाही नव्या प्रवाहात आणि स्पर्धेत उतरवून आम्हीही विद्युतनिर्मिती करू शकतो हे दाखविण्यासाठी पाटण विन्ड एनर्जी या संस्थेची स्थापना मा.आ. विक्रमसिंह पाटणकर यांनी केली.[२६२]

सामान्य लोकांच्या सहभागातून विद्युत निर्मिती सुरु झाली. चाळकेवाडी वनकुसडे पठारावर टाटा, बजाज, सुझलॉन, घोडावत, भारत फोर्ज आदि कंपन्यांनी पवनचक्क्या बसवून मोठी आर्थिक उलाढाल केली आहे. खुद्द पाटण तालुक्यात अब्जावधीची गुंतवणूक होवून त्याचा फायदा केवळ बाहेरच्या लोकांना होत होता. स्थानिक जनतेला याचा काहीच उपयोग होत नसल्याने पाटण तालुक्याचे तत्कालिन लोकप्रतिनिधी व राज्याचे सार्व.बांधकाम मंत्री श्री. विक्रमसिंह पाटणकर यांनी पाटण विंड एनर्जी लि. ही कंपनी स्थापन केली. आज अखेर ८५० सयंत्रे खाजगी तत्त्वावर उभारणेत आली असून अजूनही २५०० ते ३००० सयंत्रांच्या उभारणीसाठी वाव आहे. पठारावरील कारवट, घाणबी, वनकुसवडे, काठी–अवसरी, भारसाखळे येथील स्थानिक जनतेला या कंपनीचे शेअर्स देवून सर्वसामान्य माणूसही या आधुनिक क्षेत्रात गुंतवणूक करून वीज निर्मिती करून रायाच्या उपक्रमात सहभागी होऊ शकतो हे त्यामुळे दिसून आले आहे. या प्रकल्पामुळे सुशिक्षीत बेरोजगारांना रोजगार मिळालेला आहे. या विभागातील लोकांचे आर्थिक जीवनमान उंचावले. पाटण तालुक्यातील दुर्गम डोंगराळ भागातील लोकांना विंड मिलचे मालक बनविण्याचा प्रयत्न ना.विक्रमसिंह पाटणकर यांनी केला आहे.[२६३]

पाटण तालुक्यातील जनतेला आरोग्य सेवा उपलब्ध व्हावी म्हणून आ.पाटणकर यांच्या प्रयत्नाने एकूण ११ प्राथमिक आरोग्य केंद्र व पाटण येथे सर्व सुविधांनी युक्त, सुसज्ञ कुटीर रूग्णालय बांधण्यास मंजुरी मिळाली. पाटण तालुका विविध उपखोऱ्यात विभागाला असल्याने प्रत्येक खोऱ्यातील जनतेला आरोग्याची सुविधा नव्हती. रूग्णांना आजारी अवस्थेत २० ते २५

मैल घेऊन जावे लागत होते. यासाठी श्री.पाटणकर यांनी परिस्थितीचा विचार करून रूग्णांना सोयीचे होण्याच्यादृष्टिने प्राथमिक आरोग्य केंद्र दिले जावे ही आग्रही मागणी केली. मरळी, काळगाव, हेळवाक, चाफळ, तारळे, सळवे, मोरगिरी येथील कामे पूर्णही झालेली आहेत. आ.पाटणकर यांच्या विशेष प्रयत्नाने पाटण येथे कुटीर रूग्णालयास मंजुरी मिळाली आणि तालुक्यातील रूग्णांची सेवा झाली.

कोयनानगर येथे कोयना धरणाच्या रूपाने राष्ट्रीय प्रकल्प उभारला गेला. विस्थापित झालेल्या गावांचे योग्य तऱ्हेने पुनर्वसन झालेले नव्हते. पुनर्वसीत गावांसाठी रस्ते, पिण्याचे पाणी, विद्युतपुरवठा, शाळा, समाजमंदीर, आरोग्य सेवा या प्राथमिक गरजाही त्यांच्यापर्यंत पोहोचलेल्या नव्हत्या. प्रकल्प उभारताना ज्यांच्या जमिनी गेल्या. ज्यांना आपला गांव, आपले घर, जमीनजुमला सारे सोडून जावे लागले अशा प्रकल्पग्रस्त कुटुंबियापैकी एका व्यक्तीला शासकीय नोकरीत सामावून घेण्यात येईल असे अभिवचन पाटण तालुक्यातील जनतेला शासनाने दिले होते. प्रत्यक्ष विद्युत पुरवठा सुरू होऊन कारखानदारी उभी करण्याकडे लक्ष केंद्रीत झालेल्या शासनाचे पुनर्वसनाच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष झाले. तब्बल २०–२२ वर्षे ही जनता रडत–खडत जीवन जगत होती. हा प्रश्न श्री.पाटणकर यांनी श्री. वसंतदादा पाटील यांच्या सहाय्याने मार्गी लावला.

**कुशल प्रशासक श्री.पी.डी.पाटील**

श्री.यशवंतराव चव्हाण यांच्या यांच्या विचारांनी प्रेरीत होऊन कराड तालुक्यात आणि सातारा जिल्हयात एक आदर्श प्रशासक म्हणून कार्य करणारे व्यक्तिमत्व म्हणून श्री.पी.डी.पाटील यांच्याकडे पाहिले जाते. गरीब घरात जन्म घेतलेल्या श्री.पी.डी.पाटलांनी वकीलीचे शिक्षण घेतले होते. सन १९५२ साली सर्वप्रथम कराड नगरपालिकेत नगरसेवक म्हणून निवडून आलेल्या श्री.पी.डी.पाटलांनी आपल्या अंगभूत गुणांच्या जोरावर लवकरच त्यांच्या गळयात कराड नगरपालिकेच्या अध्यक्षपदाची माळ पडली.सन १९५३ ते १९९६ अशी सलग ४३ वर्षे कराड नगरपालिकेच्या अध्यक्षपदाची धुरा त्यांनी यशस्वीरित्या सांभाळली.[२६५]

श्री.पी.डी.पाटील कोणताही दुजाभाव न दर्शवता योग्य जागी योग्य व्यक्तिचीच निवड करत असत त्यामुळे प्रशासनावरील त्यांची पकड घट्ट होती. एखादा चूकला तर त्याला त्याच्या चूका दाखवून त्या चूकांची पुनरावृत्ती होणार नाही याची काळजी घेण्याचे सांगण्यास

ते कधीही चूकत नसत. त्याच्या प्रशासनाचे उत्तम उदाहरण म्हणजे त्यांच्या काळात कराड नगरपालिकेत आणि त्यांच्या कोणत्याही संस्थेत कधीही संप झालेला नाही किंवा आंदोलन झालेले नाही. याचे कारण म्हणजे पी.डी.पाटील यांच्याविषयीची आदरयुक्त भिती तर होतीच परंतू त्याहीपेक्षा सर्वांना आपआपल्या संस्थेबद्दल आपुलकी होती आणि जेव्हा वेळ येईल तेंव्हा श्री.पी.डी.पाटीलसाहेब योग्य गोष्टी देणारच हा कर्मचारी वर्गाचा विश्वास होता.[२६६]

श्री.पी.डी.पाटील यांच्या कामाची पध्दत समजावून घेतली तर त्यांच्या अध्यक्षपदाच्या इतक्या मोठया कार्यकालात जनता का त्यांच्या मागे उभी राहीली याचा अंदाज आपणास येतो. पी.डी.पाटील कोणत्याही कामासाठी प्रथमतः सर्व कर्मचारी वर्गाला एकत्रित आणायचे, अधिकारी, मुख्याधिकारी आणि नगरसेवक यांनाही सोबत घेऊन चर्चा करून समजून सांगणे व समजून घेणे आणि मग कामाची सुरूवात करणे. या कार्यपध्दतीमुळे श्री.पी.डी.पाटील यांनी जनमानसात आपली प्रतीमा उंचावत ठेवली.

श्री.पी.डी.पाटील हे कुशल प्रशासक होते. शासनाने निवडणूक पध्दतीत अनेक बदल केले पण कराडकरांनी आपले श्रध्दास्थान बदलले नाही. उलट महाराष्ट्राच्या विधानसभेत आपला आमदार म्हणूनही या जनतेनी त्यांची निवड केली.

**श्री. केशवराव पाटील :**

खटाव तालुक्याचे पहिले आमदार म्हणून ज्यांनी महाराष्ट्राच्या विधानसभेत प्रवेश केला त्या केशवराव पाटील यांची प्रारंभीक वाटचाल राष्ट्रसेवा दलाच्या कार्यात झालेली होती. श्री.विनोबा भावे यांनी सुरू केलेल्या भुदान चळवळीत एस.एम.जोशी, श्री.रावसाहेब पटवर्धन, श्री.अंबीके आदींच्या सोबत केशवराव पाटील यांचा सक्रिय सहभाग होता. या राष्ट्रसेवा दलाच्या कार्यातच असलेल्या कर्नाटक ब्राम्हण कुटूंबातील गौराताई यांच्याशी त्यांचा परिचय झाला. राष्ट्रसेवा दलामध्ये कार्य करत असणारे श्री.अंबीके यांनी श्री.केशवराव पाटील आणि गौराताई यांना आपण दोघे जर एकत्र आला तर एक चांगला संदेश लोकांपर्यत जाईल असे सांगितले व सन १९५६ साली श्री.केशवराव पाटील व गौराताई यांचा आंतरजातीय विवाह पार पडला.[२६७] या दंपतीला चेतना, निलिमा, शुभदा आणि इंदीरा या चार मुली झाल्या.सन १९५२ साली झालेल्या निवडणूकीत आपण उभे राहवे असे श्री.केशवराव पाटील यांना वाटत होते पण सन १९५७ सालच्या निवडणूकीवेळी प्रजा समाजवादी पक्षाने त्यांना तिकीट दिले व ते सन

१९५७च्या विधानसभा निवडणूकीत उभे राहीले. ही निवडणूक काँग्रेस विरोधी सर्व पक्ष अशी झाली होती. या निवडणूकीत श्री.केशवराव पाटील यांनी २५९६४ मते मिळवून १०५९३ मते प्राप्त केलेल्या काँग्रेसच्या श्रीमती घार्गे हीराबाई परशराम यांचा पराभव केला आणि ते आमदार झाले.[२६८] सन १९६२ साली झालेल्या महाराष्ट्र राज्याच्या विधानसभा निवडणूकीत काँग्रेसच्या श्री.पवार शिवाजीराव दादासाहेब यांनी २४४७७ मते मिळवून १६२०५मते प्राप्त केलेल्या प्रजा समाजवादी पक्षाच्या मार्फत उभ्या असणाया श्री.पाटील केशव शंकर यांचा पराभव केला.[२६९] या पराभवाने खचून न जाता श्री.केशवराव पाटील उर्फ अण्णा यांनी अधिक जोमाने आपले राजकीय व सामाजिक कार्य चालू ठेवले. या कालखंडात त्यांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले. सन १९७२ साली विधानसभा निवडणूकीसाठी श्री.केशवराव पाटील यांनी अपक्ष अर्ज भरला व काँग्रेस पक्षाने त्यांच्या विरोधात श्री.चंद्रहार पाटील यांना तिकीट दिले. या निवडणुकीत श्री.केशवराव पाटील यांनी ५६.३९ टक्के मते मिळवत ३८३४२ मते मिळवली आणि ४२.३९ टक्के मते मिळवलेल्या श्री.चंद्रहार पाटील यांना २८५४३ मते मिळाली. या निवडणूकीत ९७९९ मतांनी श्री.केशवराव पाटील यांनी विजय प्राप्त केला.[२७०] महाराष्ट्रात सर्वत्र काँग्रेस पक्षाचे वर्चस्व निर्माण झाले होते आणि काँग्रेसच्या ध्येयधोरणात सर्वसामान्यांच्या विकास हाच मुद्या प्रमुख होता त्यामुळे विरोधासाठी विरोध करणे योग्य नाही या हेतूने श्री.केशवराव पाटील यांनी काँग्रेस पक्षात प्रवेश केला आणि सन १९७८ साली झालेल्या विधानसभा निवडणूकीसाठी काँग्रेस पक्षाने त्यांना तिकीट दिले. आणि यावेळी श्री.पाटील चंद्रहार उर्फ रामचंद्र गणपतराव यांना जनता पक्षाने तिकीट दिले. या निवडणूकीत श्री.केशवराव पाटील यांनी ४२४०४ मते प्राप्त करत चंद्रहार पाटील यांचा १५६५२ मतांनी पराभव केला.[२७१]सन १९८० साली झालेल्या विधानसभा निवडणूकीत श्री.पाटील केशवराव शंकरराव यांना काँग्रेस (आय) पक्षाने तिकीट दिले आणि श्री.माने हणमंतराव जिजाबा यांना काँग्रेस (यु) पक्षाने तिकीट दिले. या निवडणूकीत ४०४०१ मते मिळवून श्री.केशवराव पाटील यांनी श्री.माने हणमंतराव यांचा ११९०० मतांनी पराभव केला.[२७२]श्री.केशवराव पाटील यांच्यासोबत असणारे श्री.मोहनराव गुदगे उर्फ भाऊसाहेब यांनी नेहमी राजकीय पटलावर श्री.केशवराव पाटीलांचा प्रचाराचा रथ सांभाळला. सन १९८५ साली झालेल्या विधानसभा निवडणूकीत श्री.केशवराव पाटील यांच्या प्रचाराची धुरा नेहमीप्रमाणे श्री.मोहनराव गुदगे उर्फ भाऊसाहेब यांनी हाती घेतलेली होती परंतू स्वःता देखिल त्यांनी अर्ज

दाखल केलेला होता.श्री.केशवराव पाटील यांनी काँग्रेस पक्षामार्फत तर श्री.मोहनराव गुदगे उर्फ भाऊसाहेब यांनी अपक्ष ही निवडणूक लढवली आणि अनपेक्षितरित्या श्री.मोहनराव गुदगे उर्फ भाऊसाहेब यांनी श्री.केशवराव पाटील यांचा ७६४७ मतांनी पराभव केला व ते निवडून आले.[२७३] ही विधानसभा निवडणूक अखेरची ठरवून श्री.केशवराव पाटील यांनी राजकीय संन्यास घेतला व ते राजकारणातून कायमचे निवृत्त झाले. या कालखंडात सातारा जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या अध्यक्षपदीही त्यांची वर्णी लागलेली होती. या बँकेच्या माध्यमातूनही त्यांनी सर्वसामान्यांचा आर्थिक विकासाचा प्रयत्न केला. श्री.केशवराव पाटील यांनी एस.टी.महामंडळाचे प्रमुख म्हणूनही कार्य केलेले आहे.

श्री.केशवराव पाटील यांच्या संदर्भात बोलताना त्यांची कन्या इंदीरा पाटील म्हणतात, “आण्णांनी आपल्या राजकीय क्षेत्रातील पदांचा वापर फक्त सामाजिक कार्य करण्यासाठी केला. त्याच्या आमदारकीच्या कार्यकाळात अनेक गरीब वंचित घरातील मुलांच्या रोजगाराचा प्रश्न अण्णांनी सोडवला होता. सातारा जिल्हा ग्राहक संघाच्या माध्यमातून त्यांनी ग्राहक चळवळ अतिशय उत्तमरित्या चालवली.सातारा जिल्हा कॉपरेटीव्ह कंज्युमर फेडरेशनचे चेअरमन असलेले अण्णा महाराष्ट्र राज्य कॉपरेटीव्ह कंज्युमर फेडरेशनचेही बराच काळ अध्यक्ष होते. अण्णांच्या विचारात कधीही मुलगा–मुलगी असा भेदभाव नव्हता आणि त्यांना कधीही असे वाटत नव्हते की आपला राजकीय वारसदार हा आपल्या घरातील असावा. त्यांनी कधीही जातपात धर्म यांचा भेदभाव मानला नाही आणि आपल्या आसपास असणाऱ्या लोकांनाही तशीच शिकवण दिली.”[२७४]

**श्री.भाऊसाहेब गुदगे**

श्री.पांडुरंग गुदगे आणि वत्सलाबाई गुदगे यांच्या पोटी श्री.मोहनराव उर्फ भाऊसाहेब गुदगे यांचा जन्म ६ मार्च १९३७ रोजी झाला. आपले प्राथमिक शिक्षण मायणी येथे पुर्ण केल्यानंतर माध्यमिक शिक्षणासाठी त्यांना सांगली जिल्हयातील विटयाला महात्मा गांधी विद्यामंदीर येथे पाठवण्यात आले. सन १९५९ साली विलिंग्डन महाविद्यालयातून त्यांनी बी.ए. व सन १९६३ साली लॉ कॉलेज पुणे येथून एल.एल.बी.ची पदवी त्यांनी प्राप्त केली.[२७५]

भाऊसाहेबांचे शिक्षण चालू असतानाच त्यांना राजकारणाचे वेध लागले.त्या कालखंडात खटाव तालुक्यात श्री.केशवराव पाटील यांच्या राजकारणाचा वारू चौखूर उधळत होता आणि

या श्री.केशवराव अण्णांचे धडाडीचे कार्यकर्ते म्हणून त्यांची ओळख आता खटावभर झाली. २९ मे १९६६ रोजी श्री.भाऊसाहेब गुदगे आणि गडहिंग्लजच्या कु.जयश्री गाडवी यांचा शुभविवाह संपन्न झाला व सन १९६७ साली श्री.भाऊसाहेब गुदगे मायणी गावाचे सरपंच म्हणून निवडले गेले. सन १९६७ सालीच त्यांची मायणी गटातून सातारा जिल्हा परिषदेवर जिल्हा परिषद सदस्य म्हणून निवड झाली. सन १९७२ साली खटाव पंचायत समितीचे सभापती म्हणून त्यांची निवड झाली. याच वर्षी महाराष्ट्रात भयंकर दुष्काळ पडला यावेळी खटाव पंचायत समितीचे सभापती म्हणून ४५० पेक्षा जास्त पाझर तलावांची निर्मिती केली व तत्कालिन पंतप्रधान श्रीमती.इंदीरा गांधी यांच्या २० कलमी आर्थिक योजनेची तालुक्यात प्रभावी अंमलबजावणी केली.तर सन १९७५ साली कृषी उत्पन्न बाजार समिती खटावच्या सभापतीपदीही ते निवडले गेले.

श्री.भाऊसाहेब गुदगे यांच्या राजकीय प्रवासाला आता वेग येऊ लागला आणि सन १९८५ साली श्री.भाऊसाहेब गुदगे यांनी खटाव विधानसभा मतदारसंघातून अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला आणि या निवडणूकीत श्री.भाऊसाहेब गुदगे निवडून आले आणि विधानसभेत त्यांचा प्रवेश झाला आणि सलग चार वेळा म्हणजे २० वर्षे खटाव विधानसभा मतदार संघातून त्यांची विधानसभेवर निवड झाली. १७ ऑगस्ट १९८७ रोजी त्यांनी मुंबईत खटाव तालुका विकास परिषदेची स्थापना केली. तसेच सन १९८९ साली खटाव तालुका विकास सहकारी पतसंस्थेचीही मुंबईत स्थापना केली. पहिल्या निवडणूकीनंतर सन १९९० साली त्यांना काँग्रेस पक्षाने आपले अधिकृतरित्या तिकीट दिले व ते काँग्रेसचे आमदार झाले. खटाव तालुका हा दुष्काळग्रस्त तालुका म्हणून ओळखला जाते या भागाला पाणी मिळावे यासाठी दि. ६ ऑक्टोबर १९९३ रोजी उरमोडी पाणी योजनेस प्रशासकीय मान्यता मिळवून २०१२.०८ कोटी रूपये मंजूर करून आणण्यात त्यांचा फार मोठा वाटा होता. परंतू सन १९९५ सालच्या निवडणूकीत त्यांचे तिकीट कापून श्री.अरूणराव बागलांना देण्यात आले. यावेळी श्री.भाऊसाहेब गुदगे पुन्हा अपक्ष उभे राहीले व खटावच्या जनतेने त्यांना निवडून दिले. याच वर्षी मायणी भाग शिक्षण प्रसारक मंडळाच्या चेअरमनपदी ते आले. त्याचप्रमाणे दि मायणी को.ऑप.बँकेवर त्यांची निवड झाली. सन १९९९ साली श्री.शरद पवार यांच्या नेतृत्वात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना झाली. सातारा जिल्हयातील बहुतांश आमदार त्यांच्यासोबत गेले तेंव्हा श्री.भाऊसाहेब

गुदगे देखिल श्री.शरद पवार यांनी स्थापन केलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात गेले व सन २००० साली झालेल्या विधानसभा निवडणूकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार म्हणून ते निवडून आले.श्री.भाऊसाहेब गुदगे यांच्या या वाटचालीत त्यांनी पाझर तलावांची निर्मिती, उरमोडी, जिहे कठापूर, टेंभू आणि तारळी या सर्व प्रकल्पांच्या माध्यमातून खटाव तालुक्यातील ७५००० एकर क्षेत्र ओलीताखाली आणण्याचा त्यांनी प्रयत्न केला.[२७६]

त्याचप्रमाणे श्री.रामराजे निंबाळकर यांच्या राजकारणाचा श्रीगणेशा सन १९९५ साली झाला आणि फलटणच्या राजघराण्याचा प्रतिनिधी पुन्हा महाराष्ट्रच्या राजकारणात सक्रिय झालेला दिसतो. या नेतृत्वांच्याशिवाय सातारा जिल्हयात ज्या महत्वपूर्ण नेतेमंडळींचा नामोल्लेख केल्याशिवाय सातारा जिल्हयाचे राजकारण अपूर्ण राहील त्या व्यक्ती म्हणजे श्री.लक्ष्मणराव पाटील, श्री. प्रतापराव भोसले, श्री.आनंदराव चव्हाण व श्रीमती.प्रेमलाबाई चव्हाण, श्री.मदनराव पिसाळ, श्रीमती शालिनी पाटील, श्री.शंकरराव गाढवे, श्री.कदम सुर्याजीराव शंकरराव उर्फ चिमणराव, श्री.सदाशिवराव पोळ, श्री.पृथ्वीराज चव्हाण, श्री.विलासराव पाटील उंडाळकर, इत्यादी होत.

**समारोप :**

महाराष्ट्र राज्याच्या राजकीय वाटचालीचे प्रामुख्याने तीन टप्प्यात विभाजन करण्यात येते. पहिला कालखंड आहे तो काँग्रेस वर्चस्वाचा कालखंड(१९५२ ते १९७७). व्दितिय कालखंड आहे काँग्रेस व्यवस्थेची पडझड आणि हिंदुत्ववादी शक्तिंचा उदय (१९७८ ते १९९५) आणि तिसरा कालखंड हा आघाडयांचे राजकारण (१९९५ ते २००० व पुढे). महाराष्ट्राच्या राजकारणाचा विचार करता एक लक्षात येते की वरिल तीनही कालखंडात महाराष्ट्रात काँग्रेस पक्षासह इतर अनेक राजकीय पक्षांनी आपले स्थान अत्यंत मजबुतरित्या निर्माण केलेले आहे मात्र हाच संदर्भ घेऊन सातारा जिल्हयाचे राजकारण अभ्यासले असता सातारा जिल्हयात काँग्रेस वगळता कोणत्याही राजकीय पक्षाला स्थान मिळालेले नाही. अपवादात्मक स्थितीत ज्या ज्या वेळी सातारा जिल्हयातील काँग्रेसतर कोणत्याही पक्षाला यश मिळालेले आहे ते यश त्या पक्षाचे नसून त्या पक्षामार्फत उभ्या करण्यात आलेल्या उमेदवाराचे वैयक्तिक यश असल्याचे स्पष्टपणे जाणवते कारण त्यापुढील निवडणूकांमध्ये जर तो उमेदवार दुसऱ्या पक्षामार्फत निवडणूकीस उभा राहील्यास मागील वेळी विजयी झालेल्या पक्षाच्या उमेदवारांचे डिपॉझिटही

वाचू शकलेले नाही. सातारा जिल्हयाच्या राजकारणात फक्त काँग्रेस पक्षाचेच वर्चस्व असल्याचे जाणवते. सुरूवातीच्या काळात शेतकरी कामगार पक्षामार्फत क्रांतिसिंह नाना पाटील यांनी सातारा जिल्हयात काँग्रेस पक्षाला कडवा विरोध केला मात्र त्यांच्या नंतर श्री. यशवंतराव चव्हाणांच्या नेतृत्वात सातारा जिल्हा हा काँग्रेसचा प्रमुख बालेकिल्ला म्हणून महाराष्ट्र आणि देशात ओळखला गेलेला आहे.

## संदर्भ


१) कुलकर्णी अ.रा, खरे ग.ह.( संपा.), सातारा, मराठयांचा इतिहास, खंड ३ पृ.२९५–९८

२) डॉ.पाठक अ.शं., महाराष्ट्र राज्य गॅझेटीअर,सातारा जिल्हा, दार्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन, १९९९, पृ.५७७

३) कित्ता पृ.५७८

४) बहुलेकर बाळासाहेब, आपला सातारा, मावळा प्रकाशन, मार्च, १९९४, पृ.१३१

५) प्रकट मुलाखत, श्री.जगताप रामराव, मु.पो.जकातवाडी.ता.जि.सातारा दि.०६/०५/२०१५ स.१०:०० वा.

६) Election Commission of India - General Election, 1951 to the Legislative Assembly of Maharashtra, Statistical Report , Page No.305

७) कित्ता

८) कित्ता

९) कित्ता

१०) कित्ता, पृ. ३०६

११) कित्ता

१२) कित्ता

१३) कित्ता

१४) कित्ता

१५) कित्ता

१६) Election Commission of India - General Election, 1957 to the Legislative Assembly of Maharashtra, Statistical Report , Page No.384

१७) कित्ता

१८) कित्ता

१९) कित्ता

२०) कित्ता

२१)	कित्ता

२२)	कित्ता

२३)	कित्ता, पृ. ३८५

२४)	कित्ता

२५)	कित्ता

२६)	Election Commission of India - General Election, 1962 to the Legislative Assembly of Maharashtra, Statistical Report , Page No.294

२७)	कित्ता

२८)	कित्ता

२९)	कित्ता

३०)	कित्ता , पृ. २९५

३१)	कित्ता

३२)	कित्ता

३३)	कित्ता

३४)	कित्ता

३५)	Election Commission of India - General Election, 1967 to the Legislative Assembly of Maharashtra, Statistical Report , Page No.321

३६)	कित्ता

३७)	कित्ता

३८)	कित्ता

३९)	कित्ता

४०)	कित्ता

४१)	कित्ता, पृ. ३२१, ३२२

४२)	कित्ता, पृ.३२१

४३)	कित्ता

४४) Election Commission of India - General Election, 1972 to the Legislative Assembly of Maharashtra, Statistical Report , Page No.318

४५) कित्ता

४६) कित्ता

४७) कित्ता, पृ.३२१

४८) कित्ता, पृ. ३१८

४९) कित्ता, पृ.३१९

५०) कित्ता, पृ.३१९

५१) कित्ता

५२) कित्ता

५३) कित्ता

५४) Election Commission of India - General Election, 1978 to the Legislative Assembly of Maharashtra, Statistical Report , Page No.352

५५) कित्ता

५६) कित्ता

५७) कित्ता, पृ. ३५२, ३५३

५८) कित्ता, पृ.३५३

५९) कित्ता

६०) कित्ता

६१) कित्ता

६२) कित्ता, पृ.३५३, ३५४

६३) कित्ता, पृ. ३५४

६४) Election Commission of India - General Election, 1980 to the Legislative Assembly of Maharashtra, Statistical Report , Page No.345,346

६५)	कित्ता, पृ.३४६

६६)	कित्ता

६७)	कित्ता

६८)	कित्ता

६९)	कित्ता

७०)	कित्ता

७१)	कित्ता, पृ.३४६, ३४७

७२)	कित्ता, पृ. ३४७

७३)	कित्ता

७४)	Election Commission of India - General Election, 1985 to the Legislative Assembly of Maharashtra, Statistical Report , Page No.362

७५)	कित्ता

७६)	कित्ता

७७)	कित्ता

७८)	कित्ता, पृ.३६३

७९)	कित्ता

८०)	कित्ता

८१)	कित्ता

८२)	कित्ता

८३)	कित्ता

८४)	Election Commission of India - General Election, 1990 to the Legislative Assembly of Maharashtra, Statistical Report , Page No.395

८५)	कित्ता

८६)	कित्ता

८७)	कित्ता

८८) किल्ता

८९) कित्ता, पृ.३९६

९०) कित्ता

९१) कित्ता

९२) कित्ता, पृ. ३९६, ३९७

९३) कित्ता, पृ. ३९७

९४) Election Commission of India - General Election, 1995 to the Legislative Assembly of Maharashtra, Statistical Report, Page No.437

९५) कित्ता, पृ. ४३८

९६) कित्ता

९७) कित्ता

९८) कित्ता, पृ.४३८, ४३९

९९) कित्ता, पृ. ४३९

१००) कित्ता, पृ. ४३९, ४४०

१०१) कित्ता, पृ. ४४०

१०२) कित्ता

१०३) कित्ता

१०४) Election Commission of India - General Election, 1999 to the Legislative Assembly of Maharashtra, Statistical Report , Page No.356

१०५) कित्ता

१०६) कित्ता

१०७) कित्ता

१०८) कित्ता

१०९) कित्ता

११०) कित्ता, पृ.३५६, ३५७

१११) किल्ता, पृ. ३५७

११२) किल्ता

११३) किल्ता

११४) किल्ता

११५) Election commission of india - general elections, 1951 (1st lok sabha ) statistical report - volume i (national and state abstracts & detailed results) page no. 81

११६) Election commission of india - general elections, 1957 ($2^{nd}$ lok sabha ) statistical report - volume i (national and state abstracts & detailed results) page no.87

११७) Election commission of india - general elections, 1962 (3th lok sabha ) statistical report - volume i (national and state abstracts & detailed results) page no.139

११८) Election commission of india - general elections, 1967 (4th lok sabha ) statistical report - volume i (national and state abstracts & detailed results) page no. 148,149

११९) Election commission of india - general elections, 1971 (5th lok sabha ) statistical report - volume i (national and state abstracts & detailed results) page no. 156

१२०) Election commission of india - general elections, 1977 (6th lok sabha ) statistical report - volume i (national and state abstracts & detailed results) page no. 165

१२१) Election commission of india - general elections, 1980 (7th lok sabha ) statistical report - volume i (national and state abstracts & detailed results) page no. 188, 189

१२२) Election commission of india - general elections, 1984 (8th lok sabha ) statistical report - volume i (national and state abstracts & detailed results) page no. 188,189

१२३) Election commission of india - general elections, 1989 (9th lok sabha ) statistical report - volume i (national and state abstracts & detailed results) page no. 225,226

१२४) Election commission of india - general elections, 1991 (10th lok sabha ) statistical report - volume i (national and state abstracts & detailed results) page no. 156

१२५) Election commission of india - general elections, 1996 (11th lok sabha ) statistical report - volume i (national and state abstracts & detailed results) page no. 355,356

१२६) Election commission of india - general elections, 1996 (12th lok sabha ) statistical report - volume i (national and state abstracts & detailed results) page no. 222

१२७) Election commission of india - general elections, 1999 (13th lok sabha ) statistical report - volume i (national and state abstracts & detailed results) page no. 211,212

१२८) मढीकर दिलीप, क्रांतिसिह पाटील: चरित्र आणि कार्य, ललितराज प्रकाशन, पृ.२५

१२९) पाटील रा.तू., सांगली साताऱ्याचे राजकारण परखड प्रकाशन कराड १९८६ पृ.३९

१३०) भगत रा.तु.(संपा.), क्रांतिसिह नाना पाटील यांची निवडक भाषणे, क्रांतिवैभव प्रकाशन कराड,१९८२, पृ.७३

१३१) पाटील रा.तू., उपरोक्त पृ.७३

१३२) प्राचार्य इंगळे, व.न.पत्री सरकार : चरित्र, व्यक्तिमत्व आणि चळवळ, पृ.४६

१३३) पाटील दिनकर, क्रांतिसिह नाना पाटील आणि शेतकरी चळवळ, कीर्ती प्रकाशन नागपूर, १९८९ पृ.६१

१३४) http://www.dainikgomantak.com

१३५) पाटील रा.तू.उपरोक्त पृ.७३

१३६) पाटील विलास, क्रांतिसिह नाना पाटील, क्रांतिवैभव प्रकाशन कराड, १९८४ पृ.४३

१३७) डॉ.दिवान चंद्रशेखर, राजकिय सिध्दांत आणि राजकिय विश्लेषण, विद्या प्रकाशन, नागपूर, १९९०, पृ.६७

१३८)	चव्हाण यशवंतराव, कृष्णाकाठ, प्रेस्टीज प्रकाशन, प्रथमावृत्ती, पुणे, १९८७, पृ.१३
१३९)	कित्ता
१४०)	दै.तरूण भारत, १२ मार्च २०१२, स्व.यशवंतराव चव्हाण, जन्मशताब्दी विशेषांक, लेख, रामभाऊ जोशी, यशवंतराव आदर्श नेतृत्वाचा वस्तूपाठ, पृ.०४
१४१)	डॉ.दिक्षित दुर्गा (संपा.), डायमंड महाराष्ट्र संस्कृतीकोष, डायमंड प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २००९,पृ.५०
१४२)	वाघ रामनाथ, संपा., युगप्रवर्तक यशवंतराव चव्हाण, यशवंतराव चव्हाण व्यासपीठ, अहमदनगर, १९९०, पृ.१७
१४३)	नलावडे प्रमोद, मासिक लोकराज्य, माहीती व जनसंपर्क महासंचनालय, मुंबई, मार्च २०१२, पृ.१४
१४४)	डॉ.मेहंदळे विश्वास, यशवंतराव ते विलासराव, अनुबंध प्रकाशन, पुणे, २००७, पृ.८०
१४५)	सारडा शंकर, यशवंतराव कर्तृत्व आणि नेतृत्व, दिलिपराज प्रकाशन, पुणे, २००३, पृ.१४७
१४६)	जोशी रामभाऊ, यशवंतरावांचे अंतरंग विरंगुळा, यशोदा प्रकाशन, पुणे, २००८, पृ.१२९
१४७)	नलावडे प्रमोद, मासिक लोकराज्य, उपरोक्त, पृ.७३
१४८)	चव्हाण यशवंतराव, सहयाद्रिचे वारे, मुंबई, १९६२, पृ.१४०
१४९)	काळे बाबूराव, यशवंतराव चव्हाण, गो.य.राणे प्रकाशन पुणे, व्दितियावृत्ती, १९६५ पृ.१७
१५०)	चव्हाण यशवंतराव, भूमिका, प्रेस्टीज प्रकाशन, प्रथमावृत्ती, पुणे, १९७९, पृ.१६८
१५१)	भोळे भा.ल., यशवंतराव चव्हाण राजकारण आणि साहित्य, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९८५ पृ.१४२
१५२)	थोरात संभाजीबाबा, यशवंतराव चव्हाण झुंझार नेतृत्वाचा शोध आणि बोध, आगाशिव प्रकाशन, कराड, १९८८, पृ.१०५
१५३)	पाटील रा.तु. यशवंतराव चव्हाण : एक कर्तबगार पण वादग्रस्त मुसद्दी, जनवाणी प्रकाशन, पुणे, १९८७, पृ.३३

१५४) चव्हाण यशवंतराव, सहयाद्रीचे वारे, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, तिसरी आवृत्ती, मुंबई, १९९२, पृ.१९९

१५५) कित्ता पृ. ६५

१५६) Chavan Y.B., Pradhan R.D.(Ed.) Selected Speeches in Parliament 3 Volumes, page no. 59

१५७) डॉ.गगराणी भूषण, स्मरणिका, उद्योगस्मृती, महाराष्ट्र औद्यौगिक विकास महामंडळ सुवर्ण महोत्सव स्मरणिका, मुंबई,२०१२, पृ.३

१५८) चव्हाण यशवंतराव, युगांतर, कॉन्टीनेंटल प्रकाशन, पुणे, १९९९, पृ.१४०, १४१

१५९) डॉ.दुकळे प्रकाश, यशवंतराव चव्हाण : माणूस आणि लेखक, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, २०१२, पृ.४२

१६०) श्री.चव्हाण रा.ना., दै.ऐक्य, ९ सप्टेबर १९८० किसन वीर स्मृती अंक, पृ.०८

१६१) श्री.पाटील बी.एच., संपा., किसन वीर जीवन दर्शन, किसन वीर सत्कार समिती, सातारा, १९६७,पृ.०४

१६२) श्री.धर्माधिकारी बी.व्ही., क्रांतीवीर, विशकर्मा प्रकाशन सातारा, १९६९, पृ. १३

१६३) श्री.देशमुख आर.के. किसन वीर : जीवन व कार्य, एम.फिल शोधप्रबंध, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, १९९०, पृ.०५

१६४) श्री.धर्माधिकारी बी.व्ही., उपरोक्त, पृ.१४

१६५) श्री.पाटील बी.एच., संपा., उपरोक्त, पृ.८

१६६) श्री.धर्माधिकारी बी.व्ही.,उपरोक्त, पृ.१९

१६७) श्री.पाटील बी.एच.संपा., उपरोक्त, पृ.११

१६८) कित्ता पृ.१२

१६९) श्री.कित्ता, चव्हाण यशवंतराव, लेख पृ.०१

१७०) श्री.चिटणिस बी.एन्.संपा., किसन वीर स्मृती विशेषांक, यशवंत शिक्षण संस्था, सुरूर, १९८१, पृ.२३

१७१) श्री.कासेगावकर धन्वंतरी, दै.ऐक्य, १ सप्टेबर १९८० किसन वीर स्मृती अंक, पृ.१२

१७२) श्री.देशमुख आर.के.उपरोक्त, पृ.७१

१७३) श्री.धर्माधिकारी बी.व्ही.उपरोक्त, पृ.१२९
१७४) कित्ता, पृ.१३४
१७५) कित्ता, पृ.१४३
१७६) श्री.देशमुख आर.के.उपरोक्त, पृ.७५
१७७) श्री.देशमुख आर.के.उपरोक्त, पृ.८०
१७८) कित्ता, पृ.८०
१७९) प्रकट मुलाखत लक्ष्मणराव पाटील २८.०८.२०११
१८०) श्री.देशमुख आर.के.उपरोक्त, पृ.८४
१८१) कित्ता
१८२) श्री.धर्माधिकारी बी.व्ही.उपरोक्तक्क पृ.२४९
१८३) दै.पुढारी, कोल्हापूर, दि.१४ जून १९६०
१८४) सुर्यवंशी कृ.गो., बहुजन सुखाय, जगताप सुखाय, जगताप – कारले प्रकाशन, पुणे, १९७०, पृ. १९६– १९७
१८५) Debate Maharashtra Legislative Assembly July & August 196, page no. 692-
१८६) बहुलेकर वसंत, लोकनायक बाळासाहेब देसाई, मा.श्री.शंभुराज देसाई, मरळी, ता.पाटण, जि. शातारा, २०१०, पृ. १५३
१८७) सुर्यवंशी कृ.गो., पूर्वोक्त, पृ.२०६– २०७
१८८) विशेषांक, दौलत, ना.बाळासाहेब देसाई एकसष्ठी सत्कार समिती अंक, १९७१, पृ. २२
१८९) सुर्यवंशी कृ.गो., पूर्वोक्त, पृ.२०७–२०८
१९०) कित्ता, पृ.१९८
१९१) दै.पुढारी, कोल्हपूर, दि. १ जुलै १९६०
१९२) Debate Maharashtra Legislative Assembly March, 1961- page no. 1612 & 1613.
१९३) सुर्यवंशी कृ.गो., पूर्वोक्त, पृ.२१४, २१५

१९४) Debate Maharashtra Legislative Assembly March 1961, page no. 14

१९५) शेलार बजरंग, कोयनेचे पाणी, आधुनिक साहित्य प्रकाशन, उरूल, ता.पाटण जि.सातारा, १९६६, पृ.५९, ६०

१९६) Debate Maharashtra Legislative Assembly March 1961, page no. 1615.

१९७) सुर्यवंशी कृ.गो., पूर्वोक्त, पृ.२१८

१९८) दै.नवसंदेश, सांगली, दि. ३१ जानेवारी १९६१

१९९) दौलत, पूर्वोक्त, पृ. २०७

२००) सुर्यवंशी कृ.गो., पूर्वोक्त, पृ.२३७ ते २३८

२०१) Debate Maharashtra Legislative Assembly July & August, page no. 641 – 644.

२०२) सौ.मिसाळ सवितादेवी, महाराष्ट्राचे भाग्यविधाते ना.बाळासाहेब देसाई, १९६७, पृ. १३

२०३) दै.पुढारी, २९ जानेवारी १९६१

२०४) दै.पुढारी, ३१ जानेवारी १९६१

२०५) साप्ताहिक धुमकेतू, पुणे, १९६२

२०६) बहुलेकर वसंत, पुर्वोक्त, पृ.११४

२०७) कित्ता, पृ. ११६

२०८) शेलार बजरंग, पूर्वोक्त, पृ.९२, ९३

२०९) ठोके मो.नि.(संपा.), 'श्री. यशवंतराव मोहिते गौरव ग्रंथ', ७नोव्हेंबर १९९५, पृ.१३.

२१०) दैनिक सकाळ, सातारा, दि.२३.८.२००९, पृ.४.

२११) दैनिक ऐक्य, सातारा, दि.३१.८.२००९, पृ.६.

२१२) ठोके मो.नि.संपा. उपरोक्त,पृ.४.

२१३) दैनिक ऐक्य, सातारा, दि.२३.८.२००९, पृ.४.

२१४) ठोके मो.नि.संपा., उपरोक्त, पृ.१४.

२१५) कित्ता, पृ.१५.

२१६) प्रकट मुलाखत ठोके मो.नि. २४.१०.२०१४

२१७)	दैनिक सकाळ(सातारा), उपरोक्त, पृ.४.
२१८)	दैनिक स्वप्ननगरी, दि.२ नोव्हेंबर ते ८ नोव्हेंबर २०११, पृ.७.
२१९)	दैनिक लोकसत्ता, दि.२३.८.२००९ पृ.५.
२२०)	ठोके मो.नि.संपा., उपरोक्त, पृ.१७.
२२१)	कित्ता, पृ.१८.
२२२)	www.sahyadribana.com/2011/10/blog-post_29.html 02.10.2014
२२३)	www.sahyadribana.com/2011/10/blog-post_29.html 02.10.2014
२२४)	www.sahyadribana.com/2011/10/blog-post_29.html 02.10.2014
२२५)	दै.सकाळ, दि.२६/०८/२०१२ पृ.३
२२६)	शेंडे पंडीतराव, स्मरणिका, स्मृतीग्रंथ आठवणीची पुष्पांजली, प्रकाशक, सौ.सुनिता शंकरराव जगताप, सातारा सप्टेंबर २०१३, पृ.२४
२२७)	डॉ.गोंडे वाय.बी.स्मरणिका, स्मृतीग्रंथ आठवणीची पुष्पांजली, कित्ता पृ.४४
२२८)	देशमुख शिवाजीराव,स्मरणिका, स्मृतीग्रंथ आठवणीची पुष्पांजली, कित्ता पृ.१०
२२९)	कित्ता
२३०)	दै.ऐक्य, दि.२६.०८.२०१२, पृ. १
२३१)	Election commission of india – general election, 1978 to the legislative assembly of maharashtra, statistical report , page no.352,353
२३२)	Election commission of india – general election, 1980 to the legislative assembly of maharashtra, statistical report , page no.346
२३३)	Election commission of india – general election, 1985 to the legislative assembly of maharashtra, statistical report , page no.362
२३४)	Election commission of india – general election, 1990 to the legislative assembly of maharashtra, statistical report , page no.395
२३५)	Election commission of india – general election, 1995 to the legislative assembly of maharashtra, statistical report , page no.438
२३६)	Election commission of india – general election, 1999 to the legislative assembly of maharashtra, statistical report , page no.356

२३७) दै.सकाळ २६ ऑगस्ट २०१३ सातारा पा.क्र.८

२३८) प्रकट मुलाखत ॲड.सुनिता जगताप दि.१९.१२.२०१३ वेळ स.११:०० वा.

२३९) दै.सकाऴ, शैलेंद्र पाटील, दि.२३ .०९.२०१४ पृ.१२

२४०) www.eicin/statistic report.1978

२४१) www.eicin/statistic report.1980

२४२) www.biographical sketch member of parliament XII lok sabha

२४३) www.eicin/statistic report.1985

२४४) www.biographical sketch member of parliament XII lok sabha

२४५) www.eicin/statistic report.1990

२४६) www.biographical sketch member of parliament XII lok sabha

२४७) www.eicin/statistic report.1995

२४८) www.eicin/statistic report.1998

२४९) www.eicin/statistic report.1999

२५०) ठोके मो.नी. लेख चंदनगंध स्मरणिका पृ.१७

२५१) अजिंक्यतारा सहकारी साखर कारखाना वार्षिक अहवाल क्र.४ सन १९८४–८५ पृ. मुखपृष्ठामागिल बाजू

२५२) पाटणे यशवंतराव लेख चंदनगंध–स्मरणिका, २००५, पृ.११

२५३) कित्ता, पृ.०४

२५४) कित्ता,

२५५) प्रकट मुलाखत नारायण पाटणकर, म्हावशी दि.२०.११.२०१३ संध्या.०५:०० वा.

२५६) कित्ता,

२५७) www.vikramsinhpatankar.in, दि.०५.०९.२०१४ स.१०.०० वा.

२५८) प्रकट मुलाखत शिंदे पुरुषोत्तम, मु.पो.पाटण दि १९.१.२०११ स.११.३० वा.

२५९) www.vikramsinhpatankar.in दि.०५.०९.२०१४ स.११.०० वा.

२६०) प्रकट मुलाखत शिंदे पुरुषोत्तम, मु.पो.काटवटे दि १९.१.२०११ दु.०१.०० वा.

२६१) प्रकट मुलाखत पवार व्ही.डी., मु.पो.जळव दि १९.१.२०११ संध्या.०४.०० वा.

२६२) www.vikramsinhpatankar.in दि.०५.०९.२०१४ दु.०२.०० वा.

२६३)	प्रकट मुलाखत, सरकाळे राजेंद्र, मु.पो.मरळी  दि १९.१.२०११ स.११:०० वा.

२६४)	प्रकट मुलाखत जमिर व्ही .एन., मु.पो.कोयनानगर  दि ०९.६.२०१०  स.१०.०० वा.

२६५)	दै.ऐक्य, दि.०१/०७/२०१४ पृ.३

२६६)	दै.ऐक्य, दि.०४/१०/२०१३ पृ.९

२६७)	प्रकट मुलाखत श्रीमती.गौराताई पाटील, सातारा, दि. २६/०५/२०१५ दु.०४.०० वा.

२६८)	Statistical report on general election, 1957 to the legislative assembly of bombayelection commission of india page no.385

२६९)	Election commission of india - general election, 1962 to the legislative assembly of maharashtra, statistical report , page no. 295

२७०)	Election commission of india - general election, 1972 to the legislative assembly of maharashtra, statistical report , page no.321

२७१)	Election commission of india - general election, 1978 to the legislative assembly of maharashtra, statistical report , page no.352,353

२७२)	Election commission of india - general election, 1980 to the legislative assembly of maharashtra, statistical report , page no.346

२७३)	Election commission of india - general election, 1985 to the legislative assembly of maharashtra, statistical report , page no.372

२७४)	प्रकट मुलाखत श्रीमती.इंदीराताई पाटील, सातारा दि.२६/०५/२०१५ दु.०५.०० वा.

२७५)	प्रकट मुलखत श्री.मोहनराव गुदगे,मु.पो.मायणी दि. २८/०५/२०१५ स.११.०० वा.

२७६)	कित्ता

# प्रकरण तिसरे

# स्वातंत्र्योत्तर सातारची सामाजिक स्थिती

**प्रस्तावना :**

स्वातंत्र्यपुर्व कालखंडात भारतात राजकीय स्वतंत्रता आधी मिळवणे आवश्यक आहे की सामजिक सुधारणा यावरून वाद निर्माण झाले. एका बाजूला राजकीय स्वातंत्र्याची मागणी करणारे श्री. बाळ गंगाधर टिळक यांचा गट तर दुसरीकडे सामाजिक सुधारणा झाल्याशिवाय राजकिय सुधारणांचा लाभ घेता येणार नाही हे जाणून सामाजिक सुधारणांचा आग्रह धरणारे श्री.आगरकर व श्री.महात्मा जोतीबा फुले यांचा गट होता. स्वातंत्र्यापुर्वीच भारतात राजकीय चळवळी बरोबर सामाजिक सुधारणा चळवळ सुरू झालेली होती. मा.आगरकर, महात्मा फुले, श्री. वि.रा.शिंदे, श्री.छ.सयाजीराव गायकवाड, श्री.राजर्षी शाहु महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर इत्यादी समाजसुधारकांनी समाजसुधारणेला प्राधान्य देण्याचा प्रयत्न केला. या समाजधुरीणांनी समाजातील मागासलेल्या, दरिद्री आणि अशिक्षित समाजाच्या सुधारणांच्यावर लक्ष देण्याचा प्रयत्न केला. स्त्री उध्दार करण्यास प्राधान्य दिले.

भारत स्वतंत्र झाल्यानंतर स्वातंत्र्योत्तर कालखंडात या समाजसुधारकांच्या सामाजिक सुधारणांचा हा वसा महाराष्ट्रातील आजही सुरू आहे. तसेच येथिल दुर्बल घटकांसाठी केंद्र व राज्य सरकारांनी विविध कल्याणकारी योजना राबवून त्यांच्या परिस्थीतीत सुधारणा करण्याचा प्रयत्न केला आहे. प्रस्तूत प्रकरणात सातारा जिल्हयातील लोकसंख्या, जातीनिहाय परिस्थिती, सामाजिक चालिरीती, धार्मिक प्रथा आणि त्यांच्या रूढी, प्रथा आणि परंपरा यांचा अभ्यास केलेला आहे.सातारा जिल्हयातील विविध जातीजमाती आणि त्यांच्या चालीरिती यांची माहीती खालीलप्रमाणे आहे.

**प्रमुख जातीजमाती आणि त्यांचे रितीरिवाज :**

सातारा जिल्हयात मराठा, ब्राम्हण, माळी, लोणारी, कुंभार, रामोशी, धनगर, मांग, चांभार, ढोर, कैकाडी, कोल्हाटी, नंदीवाले, कातकरी इत्यादी जाती/जमाती व बौद्ध, इस्लामधर्मीय इ. लोक प्रामुख्याने आहेत. यांच्याशिवाय सातारा जिल्हयात ख्रिश्चन, जैन, गुजर व मारवाडी इ. जातीधर्मांचे लोक निवास करतात परंतू त्यांच्यापैकी कोणत्याही जातीधर्माने सातारच्या इतिहासावर म्हणावा असा प्रभाव पाडलेला नाही. जिल्हयातील विविध

जाती/जमातीचींची माहिती पुढीलप्रमाणे दिली आहे.

**मराठा**

कुणबी व मराठयांमधील फरक पुर्णपणे सामाजिक असून मराठे हे पूर्वी राजकारण, सैनिकी इत्यादी पेशात होते. मराठा महाराष्ट्रातील शेतीचा पारंपारीक व्यवसाय करणारा एक मोठा जातिसमुच्चय आहे.

मराठे हे स्वतःला क्षत्रिय वंशाचे मानत असले तरी त्यांच्यात अस्सल अथवा क्षत्रिय मराठे, कुणबी मराठे व इतर मराठे असे वर्ग आहेत. अस्सल मराठयांचे कुलीन, लेकावळे व अकरमासे असे पोटभेद आहेत. राजघराण्यांशी ज्यांचा रक्तसंबंध आहे ते स्वतःला अस्सल अथवा क्षत्रिय मराठे समजतात. पूर्वीचे राजे, सरदार, जमीनदार व लढवय्ये लोक यांचा या वर्गात समावेश होतो. त्यांना वैदिक संस्काराचा अधिकार असल्याचे समजतात. क्षत्रिय मराठे कुणबी मराठयांपेक्षा वर्णाने उजळ, देखणे व सुदृढ असतात. सातारा गादीचे वंशज, तसेच औंध, फलटण, जत व म्हसवडचे सरदार आणि मोठे जमिनदार यांचे पुष्कळ वंशज जिल्हयात आढळतात. पूर्वी त्यांच्यात 'पडदा' पद्धती रूढ होती. सामान्य मराठे हे प्रत्यक्ष शेती करताना दिसतात. मराठयांत ९६ कुळे आहेत अशी समजूत आहे. त्यांची काही आडनावे पुढीलप्रमाणे :- भोसले, मोहिते, पवार, घाटगे, चव्हाण, घोरपडे, सरनाईक, गावडे, नलगे, सरनोबत, नलावडे, फडतरे, शिंदे इत्यादी. सध्या मराठयांत शेकडो आडनावे आढळून येतात. त्यातील पाच किंवा सात कुलांचे गट केलेले आढळतात. अशा कुळाचा पूर्वज एक असावा.

विवाहप्रसंगी, नवीन गृहप्रवेश करताना व खळे तयार करताना पूजा केली जाते. यांची अगस्ती, अंगिरा, अत्री, कौडिण्य, कौशिक, भारद्वाज, काश्यप, वासिष्ठ, जमदग्नी, कपिल, पराशर, शांडिल्य आणि विश्वामित्र इत्यादी गोत्रे आहेत. पूर्वी देशमुख, इनामदार व गावपाटील हे दोन मजली किंवा बहुमजली इमारतीत किंवा चांगल्या घरात राहत होते. त्यांना वाडे म्हणत, त्यातील काही वाडे अजूनही अस्तित्त्वात आहेत तर बहुसंख्य मराठे साध्या घरात राहत होते.

जन्म, बाळंतपण आणि मृत्यू या विधी थोडयाफार फरकाने कुणब्यासारख्याच आहेत. मात्र मराठे व कुणबी यांच्या विवाहविधीमध्ये अनेक बाबतीत दखल घेण्याजोगा फरक आहे. मुलाकडील तीन-चार व्यक्ती मुलगी पाहण्यासाठी जातात. मुलीची पसंती झाल्यावर व लग्नाचा निर्णय ठरल्यावर भावी वधूवराची जन्मकुंडली पाहिली जाते. लग्न पक्के झाल्यावर सुपारी

फोडण्याचा कार्यक्रम होतो. त्यावेळी दोन्हीकडील माणसे एकत्र बसून 'यादी' तयार करतात. यादीमध्ये दोन्हीकडील मेढ रोवण, घाणा भरणी व मुहूर्तासंबंधी नोंद असते. तसेच लग्न जमले म्हणून दोन–तीन माणसांच्या साक्षीदार म्हणून स्वाक्षऱ्या असतात. प्रथम वराकडील लोक वधूकडे जाऊन 'साखरपुडा' करतात. नंतर असाच विधी वधूकडील लोक वराकडे करतात. त्यास शालमुदी असे म्हणतात. हल्ली लग्नाच्या दिवशीच साखरपुडा करणे अधिक पसंत करतात. सर्वसामान्यपणे विवाह वधूकडे होतो. तथापि सधन लोकांकडे विवाह वराकडे पार पाडतात. विवाहाच्या मुख्य विधीपूर्वी, अक्षता, घाणा, हळदी, तेलवण, देवक बावणे, सीमांतपूजन, गौरीहर इत्यादी विधी करतात. लग्न मंडपात होते. हल्ली शहरी भागात व श्रीमंत लोक मंगल कार्यालयात लग्ने करतात. घाणा हळद, लग्न व वरात यांचे ब्राम्हणाकडून अगोदरच मुहूर्त काढतात. मेढ रोवण व घाणा भरणे हे विधी वधूगृही केले जातात. मेढ रोवण्यासाठी ब्राम्हण काही माणसाच्या नावांची यादी तयार करून देतो. त्याप्रमाणे ती माणसे घरासमोर खड्डा खणून त्यात आंब्याचा व उंबराचा ढाळा(खांब) रोवतात. त्यास मेढ रोवण म्हणतात. घाणा भरणीच्या विधीसाठी स्त्रियांची नावे ब्राम्हणाकडून अगोदरच ठरवून घेतात. त्यानुसार त्या स्त्रिया नवीन कपडे हळदीमध्ये भिजवतात. व त्यात खारीक खोबरे, हळकुंड व गहू एकत्र बांधून ते कापड जात्याच्या मुखाशी बांधतात. त्यास 'घाणा भरणी' म्हणतात. तत्पूर्वीच वरवधू व मानपानासाठी लागणारे कपडे सोयीनुसार एकत्र खरेदी करतात. त्यास 'बस्ता बांधणी' म्हणतात. यावेळी गोड जेवण देतात. ज्या ठिकाणी विवाह असेल तेथे विवाहाच्या दिवशी सकाळी वऱ्हाड जाते. वऱ्हाड वेशीजवळ आल्यानंतर त्यांचे स्वागत करतात. तेल उतरणीचा विधी होतो. त्यावेळी वधूस साडीचोळी भेट देतात देवके बसवितात. वरास घोडयावर बसवून मारूतीच्या मंदिरात नेतात. तेथे लिंबोळया देणे(निंबलोण करणे) व कटयार तयार करणे हे विधी करतात. त्यावेळी पानसुपारीचा कार्यक्रम होतो. त्याचप्रसंगी वधूचा भाऊ घोडयावर बसून वाजतगाजत जानोस्यावर येतो तेव्हा वरपक्षाकडून त्याला पोशाख व नारळ भेट देतात. त्यानंतर वरास वाजतगाजत विवाह मंडपाकडे नेतात. मंडपाच्याद्वारी वधूकडील मावळणी वराचा घोडा अडवून वरास भेटवस्तू देतात. तेव्हा वराकडून त्यांना भेटवस्तू दिली जाते. ब्राम्हणाच्या हस्ते वरास नवीन पोषाख देतात. वधूपिता मुहूर्तपत्रिकेची पूजा करतो. यावेळी वर व वधूकडील मंडळींचे मानाचे पोषाख हातात. त्यानंतर वधूवरास मंडपात समोरासमोर उभे करून त्यांच्यामध्ये अंतरपाट धरतात. त्याप्रसंगी त्यांचे

मामा त्यांच्या पाठीमागे हातात तलवारी घेऊन उभे राहतात. मंगलाष्टके म्हणुन वधूवरावर अक्षता टाकतात. अंतरपाट दूर केल्यानंतर वरवधू आपापल्या हातातील हार एकमेकांच्या गळयात घालतात. त्याप्रसंगी ब्राम्हण मंत्र म्हणतो आणि शिंग, तुताऱ्या व इतर वाद्यांचा गजर होतो. निमंत्रितांना पानसुपारी, फुले देऊन अत्तरे लावतात व गोड जेवण देतात. त्यानंतर आंबवण, रूखवत, धृवदर्शन, सुनमुखदर्शन, ऐरणी किंवा जाल, वरात, लक्ष्मीपूजन, तोंड धुणे, रासन्हाणी इत्यादी कार्यक्रम करतात. शेवटी देवकोत्थोपन विधी करून विवाह समारंभ संपन्न होतो. हल्ली लग्न एकाच दिवसात आटोपतात. तरीपण लग्नकार्यात भरपूर खर्च करण्याची या समाजाची प्रवृत्ती आहे. विवाहानंतर वराच्या घरी सत्यानारायणाची पूजा करतात आणि गोंधळ घालतात.

स्त्रीचे पहिले बाळंतपण तिच्या माहेरी करतात. पाचव्या सहाव्या दिवशी अनुक्रमे पाचवी व सटवाईची पूजा करतात. त्यादिवशी बाळतिणीच्या खोलीत एक विडयाचे पान व विळा, फुले, चंदन, धूप इत्यादी ठेवून देवीला संतुष्ट करतात. बाळंतपणाचे दहा दिवस सुहेर पाळतात. काही लोक सोयीनुसार सव्वा महिन्यानंतरही बारसे करतात. मराठे शिवाचे व देवीचे उपासक आहेत. ते खंडोबा, जोतिबा, तुळजाभवानी, अंबा, दुर्गा, लक्ष्मी इत्यादीची पूजाअर्चा करतात.

या समाजात मृतदेह जाळतात. अंत्यसंस्कार विधीमध्ये तिसऱ्या दिवशी 'सावडणे' दहाव्या दिवशी पिंडदान, अकराव्या दिवशी सुतक संपण्यासाठी पंचगव्य प्राशन, बाराव्या दिवशी सपिंददान, तेराव्यास नातेवाईकांना श्राद्धभोजन आणि चौदाव्या दिवशी सर्वांना गोड जेवण देतात. मासिक व वार्षिक श्राद्धाची आणि महालय श्राद्ध करण्याची प्रथा यांच्यात आहे.

पूर्वी मराठे हे सरदार, जहागीरदार, देशमुख व पाटील होत. गावची पाटीलकी यांच्याकडे होती. सध्या शेतीव्यवसाय, व्यापार, सहकारक्षेत्र, नोकरी व राजकारणात बरेच लोक आढळतात. जिल्हयातील बरेच लोक संरक्षण दलात असून बहुसंख्य लोक पुणे, मुंबईस नोकरी, व्यवसायानिमित्त स्थलांतरित झाले आहेत. पूर्वी मराठे डोक्याला पागोटे किंवा पटका, अंगार बाराबंदी अथवा सदरा व कमरेस धोतर आणि अंगावर उपरणे असा पोषाख करीत, त्यांच्या बायका उंची साडी व चोळी घालीत. आता आधुनिक पेहराव करतात. काही लोक डोक्यावर टोपी व पागोटेही वापरताना दिसतात. स्त्रिया सहावारी साडी व चोळी घालतात. पोळा, दसरा, दिवाळी, होळी, संक्रांत, नागपंचमी, गणेशचतुर्थी इत्यादी सर्व सण साजरे करतात. एकादशी,

शिवरात्र, चतुर्थी, सोमवार, शनिवार इत्यादी उपवास करतात. गहू, तांदूळ, ज्वारी, बाजरी, डाळ हे या लोकांचे मुख्य अन्न आहे. कांदा भाकर, मिरचीचा ठेचा व शेंगदाण्याचा म्हाद्या हे गरीबांचे अन्न आहे. ते मांसाहार करतात. कोयना–कृष्णा खोऱ्यातील लोकांची बागयती शेती व औद्योगिकरणामुळे सांपत्तिक स्थिती सुधारली असल्यामुळे त्यांचे सामाजिक जीवन जिल्हयाच्या पश्चिमेकडील व अतिपूर्वेकडील दुष्काळी तालुक्यामधील मराठयांच्या तुलनेत सुधारलेले दिसते.

**कुणबी**

शेतीचा व्यवसाय करणाऱ्यांना 'कुणबी' म्हणतात. कुनमी(पृथ्वीला नमन करणारा) या शब्दापासून कुणबी हा शब्द तयार झाला असावा असे म्हटले जाते. कुणबी हा शब्द वाणी, माळी, भराडी, कोष्टी, कोळी, महार वगेरे शब्दाप्रमाणे जातिवाचक असला तरी तो व्यवसायवाचकही आहे. चैत्र गळे कुणबी पळे या म्हणीत कुणबी याचा अर्थ शेतकरी असा गृहीत आहे. खेडयातील सर्व व्यावसायिक कुणब्याला बळीराजा असे संबोधतात. कुणबी शब्द कुळंबी अथवा कौटुंबिक या शब्दावरून आला आहे. पंडित भगवानलाल इंद्रजीयांच्या मते संस्कृत शब्द कुटुंबिन यापासून व्युत्पत्ती झाली असावी. त्यांच्या मते प्राचीन काळापासून कुटुंबिन हे उपपद शेतकऱ्यांच्या नावामागे लावण्याचा प्रघात आहे.[१] कुल्लूक भट(इ.स.११५०–१२००) या विद्वानांच्या मते 'कुळंबी' या शब्दापासून कुणबी ही संज्ञा निर्माण झाली असावी. कुळपती, कुळवई–कुळवी–कुणबी या क्रमाने अपभ्रंश होऊन कुणबी हा शब्द बनला असावा. फोबर्स्च्या मते अकराव्या शतकात खेडयांत कुटुंबिक किंवा शेतकरी राहत असते.[२] महाराष्ट्रातील बौद्ध लेण्यांतील काही उत्कीर्ण लेखात कुटुंबिन या शब्दाचा उल्लेख येतो. त्यापासून कुणबी ही संज्ञा रूढ झाली असावी असेही एक मत आहे. इ.स.१८८५ मध्ये प्रसिद्ध झालेल्या सातारा जिल्हा गॅझेतियरमध्ये कुणबी शिर्षकाखाली स्वतंत्र माहिती दिलेली आहे. तथापि विसाव्या शतकात जिल्हयात कुणबी जातीचे स्वतंत्र अस्तित्त्व आढळत नसून ती मराठा जातीअंतर्गत लोप पावली असल्याचे आढळते. पुढील उताऱ्यावरून हे अधिक स्पष्ट होते. “ Under earlier Hindu and Muslim rule only the aristocracy was described as “ Maratha ” the rest being simply peasant “ Kunbis ” ................................in the twentieth century in identity of these various ill-defined categories began to merge : in the Deccan “ Kunis ” practically vanished into the “ Maratha ”caste, though distinctions continued to be made in the Konkan and in Vidarbha,

where " Kunbis " were considered to represent earlier popula-tion and "Marathas " more recent arrivals with the troops of Shivaji and his successours.[३]

कुणबी जिल्हयात सर्वत्र आढळतात. कुणबी कश्यप ऋषीला आपल्या जातीचा मूळ पुरूष मानतात. त्यांची शहाण्णव कुळे असून ती चव्हाण, गायकवाड, जाधव, शिंदे आणि शिर्के इत्यादी आहेत. येथील कुणबी काळसर, मध्यम बांध्याचे, काटक असून त्यांची मातृभाषा मराठी आहे. पशुपालन करतात. त्यांच्या घरात शेती अवजारे, धातू व मातीची भांडी, कट्टा, जाते, मुसळ इत्यादी वस्तू प्रमुख्याने आढळतात. आहारात ज्वारी, बाजरी, कडधान्ये, भाजीपाला, फळफळावळे, कंद, मिरच्या, मसाले, तेल, लोणी, मासे, अंडी, कोंबडीची व बकऱ्याची सागुती, शिवाय रानटी डुक्कर, ससे यांचे मांस यांचा समावेश असतो. महिला साडी, चोळी, भालावर कुंकू वापरतात. त्या कष्टाळू, मितभाषी, अतिथ्यत्यशील व प्रामाणिक असतात. कुणबी प्रमुख्याने शेतकरी असल्यामुळे स्त्रिया व मुले शेती कामात मदत करतात. ब्राम्हणांप्रमाणे हिंदूच्या सर्व देवदेवतांची पूजाअर्चा, सण–उत्सव व नेहमीचे उपासतापास करतात. ब्राम्हणांना पूजाअर्चेसाठी घरी बोलावून त्यांचा आदर सन्मान करतात.

स्त्रिया प्रथम प्रसूतीसाठी माहेरी जातात. बाळंतपणानंतर सुईण व सुवासिनीची ओटी भरून त्यांना हळद–कुंकू भेट देतात. ब्राम्हण अथवा जोतिष्याकडून बाळाचे नाव काढून त्यास पैसे भेट देतात. परंतु या नावाने मुलास नेहमी हाक मारीत नाहीत. सुखवस्तू कुटुंबात मुलाचा जन्म झाल्यास बाराव्या दिवशी मेजवानी आणि चोळखण भेट देतात. कुणबी परिवार जर शहरी भागात राहत असेल तर तेराव्या दिवशी संध्याकाळी बाळास पाळण्यात घालण्याचा पारंपारिक विधी करतात. हरभरा किंवा ज्वारीच्या घुगऱ्या उपस्थितांना वाटतात.

प्रथेनुसार लग्नाचा प्रस्ताव मुलाचा पित्याकडून येतो. मुलाचा पिता मुलगी पसंत करण्यापूर्वी तिच्या कुटुंबाची सर्वकष चौकशी करून समाधानअंती आपल्या भाऊबंदासह मुलीकडे जाऊन तिला कुंकू लावून कपडे व एखादा दागिना भेट देतो, त्याप्रसंगी मुलाकडील पाहुण्यांना मेजवानी देण्यात येते. ब्राम्हणाकडून लग्नतिथी निश्चित करतात. लग्नापूर्वी पंधरा दिवस आधी मुलामुलीस हळद लावतात. हळद लावल्यानंतर मुलास त्याचे भाऊबंद व नातेवाईक आपल्याकडे जेवणासाठी आमंत्रित करतात. पूर्वी श्रीमंत लोक मुलासह त्याच्या

कुटुंबास जेवणासाठी बोलावित असत. त्यावेळी वाजंत्री वाद्येही वाजवित. गोड जेवण देत आणि मुलाच्या डोक्याला मुंडासे बांधीत.

मुलामुलीची घरे एकाच गावी किंवा शहरात असतील तर देवकप्रतिष्ठा विवाहदिनी करतात. त्यांची गावे दूर असतील तर त्यावेली देवकप्रतिष्ठा ववाहपूर्वी दोन–तीन दिवस अगोदर करतात. देवक पूजेपूर्वी गृहदेवतांची पूजा करतात. नंतर मुलाचे आईवडील आणि भाऊबंद एकत्रितपणे वाजतगाजत मारूतीच्या मंदिराकडे जातात. चार माणसे त्याच्यावर कापड/चादर उंचावून धरतात. वरपित्याच्या खांद्यावर कुऱ्हाड किंवा दुसरे लोखंडी अवजार आणि बारा–पंधरा फूट लांबीचा दोरखंड असतो. वरमातेच्या हातात नैवेद्याचे ताट असते. त्या जोडप्यांच्या पाठीमागे चार–पाच सुवासिनी पाण्याने भरलेले पितळी तांबे घेऊन चालतात. तत्पूर्वी मंदरितील गुरवास पाचपालवी नेऊन दिलेली असते. गुरव मंदिरात देवाासमोर चंदन, फुले, धूप, नैवेद्य आणि पाचपालवी अर्पण करतो. पूजा झाल्यावर ही मंडळी पाचपालवीसह (पाच वेगवेगळया वृक्षांची पाने उंबर, वड, आंबा, जांभूळ, बोर या वृक्षाची पाने) घरी परतल्यानंतर ती पुरण पोळीबरोबर बोहल्याजवळील एका खांबास बांधतात. या दिवशी फक्त भाऊबंदकीतील लोकांना जेवण देतात. गावात प्रवेश केल्यानंतर वर घोडयावर बसून वाजतगाजत मारूतीच्या मंदरित जातो. त्यावेळी करवल्या त्याच्यासोबत असतात. त्यानंतर वर वऱ्हाडी मंडळीसह जानोस्यात थांबतात. संध्याकाळी वराचा भाऊ अथवा इतर जवळचे नातेवाईक मारूतीच्या मंदिरातून वाजतगाजत घोडयावरून वरदावा घेऊन वधूच्या घरी जातात. तेव्हा वधूपिता त्यांना भोजनाचे आमंत्रण तसेच त्याची सांपत्तिक स्थिती चांगली असेल तर पागोटे भेट देतो. त्यानंतर थोडे पक्वान्न तसेच नवरदेवासाठी द्यावयाचा पोशाखासह वधूकडील करवल्यासह घोडयावर बसवून वधूपिता त्याच्या वऱ्हाडी मंडळीसह मारूतीच्या मंदिरात जातो. त्यावेली चार–पाच लोक करवल्याच्या डोक्यावर पताकासह ध्वज धरतात. सोबत सुवासिनी थाळीत नारळ व विडयाची पाने घेऊन असतात. नंतर ब्राम्हण वरासमोर सुपारीच्या गणपतीची पूजा करतो व वराच्या पोशाखास हळदीचे बोट लावून तो त्यास परिधान करण्यास देतो. याप्रसंगी सर्व उपस्थितांना विडयाची पाने देतात. नंतर वर मारूतीसमोर दान विडयाची पाने, सुपारी आणि तांब्याची मुद्रा ठेवऊन प्रदक्षिणा घालतो. एका हातात लिंबू टोचलेला चाकू धतो. प्रस्थान करण्यापूर्वी भूतपिशाच्च्यापासून संरक्षणासाठी तो नारळ फोडतो. वर लग्नमंडपाजवळ आल्यावर मंडपाच्या

प्रवेशदारावर वधूची मामी त्यास ओवाळून कणकीचे दोन गोळे दोन विरूद्ध बाजूला फेकते. त्याप्रसंगी वर तिला खण भेट देता. त्यास वर ओवाळणी म्हणतात.

वराकडील वऱ्हाडी मंडपात उपस्थित हातात. वर बोहल्यावर उभा राहतो. वधू घरातून मंडपात येऊन वरासामेर उभी राहते. त्यानंतर दोघांमध्ये आंतरपाट धरतात. उपस्थितांना अक्षता वाटतात. ब्राम्हण मंगलाष्टके म्हणतात. शेवटचे मंगलाष्टक संपल्यानंतर उपस्थित लोक अक्षता वधूवरावर टाकून टाळया वाजवितात. वाजंत्री जोरात वाद्य वाजवितात. त्यानंतर वरवधू आपापल्या समोरासमोर बसतात. सुतावणे, कन्यादान, लाजाहाम हे विधी करतात. विवाहविधी पार पडल्यावर त्याच दिवशी वधूकडील मंडळी मारूतीच्या मंदिरात जाऊन पूजा अर्चा करतात. रूखवताचा कार्यक्रम होतो. वधूकडील मंडळी वाजतगाजत जाऊन वराकडील मंडळीना जेवणाचे निमंत्रण देऊन त्यांना वाजतगाजत आणतात. महिलांनाही भोजनासाठी आणतात.

दुसऱ्या दिवशी सकाळी नात्यातीला लोक व मित्रपरिवार वरवधूला घोडयावर बसवून नदीकाठी किंवा बागेत नेतात. तेथून वाजत–गाजत आणल्यानंतर हळद व तेलमिश्रीत कुंकू लावतात. सकाळी वधूवरास आंघोळ घालतात. त्यावेळी आंघोळीच्या ठिकाणी सभोवताली चार कोनावर चार तांबे ठेवून पांढऱ्या धाग्यांनी गुंफतात. आंघोळ झाल्यावर वरवधूला डाव्या हाताने उचलून त्याच्या डाव्या बाजूला ठेवण्याचा प्रयत्न करतो. त्यावेळी वधू लटका विरोध करते. वधूवरांना पोशाख करून यांच्या कपाळावर कुंकवाचा मळवट आणि हातापायांना हळद लावतात. त्यानंतर वधूवर एकमेकांना शेवया भरवतात. यास उष्टवणे म्हणतात. संध्याकाळी वधूपिता जातिबांधवाना जेवण देतो. उपस्थित पाहुणे मंडळी वधूवर पित्यांना आहेर भेट करतात. वधूपिता वरमायला आणि वरपिता वधूच्या आईला मानाची वस्त्रे भेट देतात. या कार्यक्रमास ‘पोटझाकणी’ म्हणतात.

वर गावी पोहोचल्यानंतर वधूवराला मारूतीच्या मंदिरात नेतात. संध्याकाळी वधूवरांना घोडयावर बसवून वाजतगाजत फटाके उडवित मिरवणूक काढतात. देव्हाऱ्यातील खंडोबाच्या मूर्तीला नारळ व विडयाची पाने ठेवलेल्या आरतीने ओवाळतात. त्यास खंडोबाची तळी म्हणतात. वधू देवघरात जाते त्याप्रसंगी वराची बहीण देवघराचा दरवाजा अडवते आणि जोपर्यत वधूवराकडून त्याची पहिली मुलगी तिच्या मुलासाठी देणार असे वचन मिळत नाही तोपर्यंत ती वाट सोडत नाही. वधूवर घराच्या देवासमोर सुपारी व तांब्याची मुद्रा ठेवून नमस्कार करतात.

वधूला लक्ष्मी समजून तिच्या कपाळी कुंकू लावतात. वधूवराच्या मध्ये गव्हाची रास तयार करून त्यात सोन्याचा तुकडा ठेऊन ती रास त्यांना विभागण्यास सांगतात. जर वधूकडील अर्ध्या राशीत सोन्याचा तुकडा सापडला तर शुभ समजतात आणि घर–कारभार ती व्यवस्थित सांभाळेल असे समजतात. त्यानंतर एका शुभ दिवशी वधूवरास आंघोळ घालून त्यांच्या अंगाची हळद काढतात. स्त्री प्रथमेवेळी गर्भवती असेल तेव्हा तिचे डोहाळे जेवण पाचव्या किंवा सातव्या महिन्यात करतात. त्यावेळी हिरवी साडी चोळी देतात.

कुणबी मनुष्याच्या मृत्यूनंतर सहा–सात फूट लांबीच्या दोन बांबूंच्यामध्ये आडवे तीन–चार बांबू बांधून तिरडी तयार करतात. प्रेतास गरम पाण्याने स्नान घालून नवीन कापड शरीराभोवती गुंडाळून घट्ट बांधतात. विडयाची पाने, गुलाल किंवा कुंकू प्रेताच्या तोंडात ठेवतात. प्रेताजवळ तांदुळ, तांब्याची नाणी व भाकरीचा तुकडा ठेवतात. त्याचा मुलगा आंघोळ करून अग्नीचे मडके हातात घेऊन मागे वळुन न बघता पुढे चालतो. प्रेत नेताना विसाव्याच्या जागी उतरवितात, खांदेकरी खांदे बदलतात. याचवेळी प्रेताजवळ ठेवलेले तांदुळ, तांब्याची नाणी, भाकरीचा तुकडा तेथेच फेकतात. जीवखडा म्हणुन तेथील दगड उचलतात. स्मशानात अथवा नदीकाठी लाकुड व गोवऱ्याचे सरान रचतात. प्रेतास गुंडाळलेले कापड काढून प्रेतं सरणावर ठेवून त्यावर लाकूड व गोवऱ्या  ठेवतात. तेव्हा प्रेताच्या  तोडांत मुलगा थोडे पाणी गाळतो. अग्नी देण्यापूर्वी मुलगा आंघोळ करून मोठया मडक्यात पाणी आणतो व प्रेताच्या डोक्यावर पाठीवर मडके घेऊन उभा राहतो. दुसरा माणूस पाणी बरलेल्या जीवाच्या मडक्याला दगडाने लहान छिद्र पाडतो. मडक्यातून पाणी खाली सांडते. अशा अवस्थेत मुलगा पाच प्रदक्षिणा घालतो व प्रेताचा डोक्याकडे येऊन मडके फेकून देतो आणि अग्नी देतो व जोरजोराने बोंबा मारतो. त्यानंतर इतर माणसे बसली असतील तेथे जातो. परंतु त्यांना स्पर्श करीत नाही. प्रेताची कवटी फुटल्याच्या आवाज झाल्यावर खांदेकरी आंघोळ करतात.

ज्या दगडाने मडक्याला छिद्र पाडले असेल तो दगड जीव म्हणून सांभाळून ठेवतात. सर्व मंडळी घरी जाताना कडुनिंबाची पाने खातात. त्यादिवशी नातेवाईकाकडून जेवण पाठविले जाते. ज्याठिकाणी माणूस मरत झाला असेल तेथे संध्याकाळी पेटता दिवा ठेवतात. दिव्यासभोवती पीठ पसरतात. दिव्यावर टोपली झाकून ठेवतात.

दुसऱ्या दिवशी सकाळी टोपली उचलतात आणि पिठाचे निरीक्षण करतात. जर पिठावर मृतव्यक्तीच्या पायाचे ठसे उमटले असतील तर त्याने माणसाचा पुनर्जन्म घेतला असे समजतात आणि पिठावर जर पक्षी वा अन्य प्राण्यांच्या पायाचे ठसे उमटले असतील तर त्याने पक्षी किंवा प्राण्याचा जन्म घेतला असे समजतात. दुसऱ्या दिवशी सकाळी मुलगा व त्याचे नातेवाईक प्रेत जाळलेल्या ठिकाणी जातात. तेथे तीन लहान मडकी घेऊन त्यांना भाकरी व पिंपळाच्या पानाचे झाकण करतात. त्यात गोमूत्र, दूध, मध, साखर भरून ती टोपल्यात ठेवतात. प्रेत जाळलेल्या ठिकाणी मुलगा जमिनीवर भाकर आणि गूळ ठेवतो. रक्षा जमा करतो. काही अस्थी ठेवून उर्वरित रक्षेबरोबर नदीत विसर्जित करतात किंवा तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी नेऊन विसर्जित करण्यासाठी बांधून घेतात. प्रेतास जाळलेल्या जागी शेणाचा सडा घालून गोमूत्र शिंपडतात. प्रेताचे डोके व पाय असलेल्या जागी एकेक मडके ठेवतात. रक्षा विसर्जित झाल्यावर सर्वजण स्नान करून घरी परततात.

तिसऱ्या दिवशी खांदेकऱ्यांच्या खांद्यांना तेल लावून त्यांना सुके खोवरे खाण्यास देतात. दहाव्या दिवशी घरातील सर्व मंडळी नदीवर आंघोळ करून कपडे धुतात. मुलगा केस काढतो व स्नान करतो. त्यानंतर ब्राम्हण मंत्र म्हणतो. तेव्हा मुलगा जीवखडा आणि अस्थींना गोमुत्रांने धुतो. भगव्या रंगाच्या कापडाच्या तीन पताका तयार करून काठीला बांधतो व ब्राम्हणास दक्षिणा देतो. नैवेद्याचे दहा गोळे तयार करुन मृतात्म्यास अर्पण करून दूर जाऊन बसतो. या नैवेद्यास कावळा शिवायची वाट पाहतो. नैवैद्यास कावळयानी शिवले तर मरत व्यक्तीची कोणतीही इच्छा अपूर्ण राहिली नाही असे समजतात. कावळा जर नैवेद्यास शिवला नाही तर मरत व्यक्तीची कोणतीही इच्छा अपूर्ण राहिली नाही असे समजतात. कावळा जर नैवेद्यास शिवला नाही तर मरत व्यक्तीच्या अपूर्ण इच्छा पूर्ण करण्याचे वचन दिले जाते. कावळा नेवेद्यास शिवल्यावर मुलगा व उपस्थित मंडळी स्नान करून घरी परततात.

तेराव्या दिवशी ब्राम्हनास दान करतात व नातेवाईकांना गोड जेवण देतात. एका पात्रात सर्व पदार्थ ठेवून कावळयासाठी मोकळया जागी ठेवतात. त्यास कावळा शिवल्यावर आप्तेष्ट जेवण करतात. संध्याकाळी जवळचे नातेवाईक मुलाच्या डोक्याला पागोटे बांधतात. मुलाला मारुतीच्या देवळात नेतात. त्यावेळी तो देवासमोर तांब्याची नाणी व सुपारी ठेवतो. प्रत्येक महिन्यात एका मणसाला मृताच्या नावने जेवण घालतात. साडेपाच महिन्यानंतर नातेवाईकांना

मरत व्यक्तीच्या नावाने गोड जेवण देतात. भाद्रपद महिन्यात मृताच्या नावाने पूजा करतात. सुवासीन स्त्री मृत्यू पावल्यास तिच्या प्रेतावर कुंकू, विडयाची पाने व अत्तर शिंपडतात. तिच्या कपाळावर हिंगूळ व शरीराला तेलमिश्रीत हळद लावतात. मृत्यू झालेल्या घरी दहा दिवस तर त्या कुळातील लोक तीन दिवस सुतक पाळतात. विधवा विवाहास मान्यता आहे. कुणबी जातीचे नियम कटाक्षाने पाळतात.[४]

**ब्राम्हण :–**

महाराष्ट्रात ब्राम्हणमध्ये पोटजाती  आहेत. त्यापैकी सातारा जिल्हयात देशस्थ, कोकणस्थ, चित्पावन, कऱ्हाडे, देवरूखे, गुजराथी, कनोजे, तेलंग, तिरगुळ, शेवणी इत्यादी पोटजाती आढळतात.

**कऱ्हाडे :–**

कऱ्हाडे ब्राम्हण दक्षिणी ब्राम्हणांची एक पोटजात आहे. त्यांचे मूळस्थान सातारा जिल्हयातील कऱ्हाड असावे असे म्हणतात. याला पूर्वी करहाटक असे म्हणत. यावरून कऱ्हाड येथे राहणारे ब्राम्हण ते कऱ्हाडे असे नाव पडले असावे. हे सर्वत्र आढळतात. कोल्हापूर शिलाहार राजवटीत कऱ्हाडे उदयास आलेले आहेत असे म्हणतात. कोल्हापूरची महालक्ष्मी ही बहुतेक कऱ्हाडयांची कुलदेवता आहे. बहुतेक कऱ्हाडे हे खोत, इनामदार, सरदेसाई, सरदेशपांडे, देसाई, सरपोतदार, पोतदार, मुकादम, सबनीस, कारखानीस इत्यादी सरकारी कामे करणारे हुद्देदार होते. त्यामुळे त्या गावातले किंवा भागातले ते प्रमुख असत. सध्या ते शासकीय व निमशासकीय नोकरी, ग्रंथकार, खाजगी क्षेत्रात डॉक्टर, वकील तसेच इतर व्यवसाय करतात. कऱ्हाडे इतरांप्रमाणेच नित्य व नैमित्तिक संस्कारांचे आचरण करतात.[५]

**कोकणस्थ :–**

चित्पावन हे सर्वसाधारणपणे कोकणस्थ या नावाने ओळखले जातात. कोकणातील चिपळूण हे त्यांचे मूळगाव असल्याची समजूत आहे. त्यामुळे यांना चिपळोणे असेही म्हटले जाते. चित्पावन शब्दाच्या अनेक व्युत्पत्ती सांगितल्या आहेत. चित्पावनांची मूळ साठ आडनावे म्हणजे साठ कुळी होत असा समज आहे. परंतु आता आडनावांची संख्या बरीच वाढली आहे. देशस्थ ब्राम्हणांपेक्षा चित्पावनाची आडनावे निराळे वाटतात. जसे कुंटे, केळकर, साठे, गद्रे, भट, मेहेंदळे, फडके, गोखले, रानडे, टिळक, कर्वे इत्यादी. हे लोक इ.स.च्या सतराव्या

शतकाच्या अखेरीस रायगड जिल्हयातील श्रीवर्धन येथून देशावर आले. त्या घराण्यातीलच बाळाजी विश्वनाथ हा थोरल्या छत्रपती शाहू महाराजांचा पहिला पेशवा तथा पंतप्रधान झाला. तेव्हापासून आजतागायत चित्पावन ब्राम्हणातील अनेक लोकांनी राजकारण, समाजकारण, तसेच वैदिक, ग्रंथकार, मुत्सुद्दी, न्यायशास्त्री, फडणवीस म्हणून कर्तबगारी दाखविली आहे.

**चित्पावन :–**

चित्पावन वैदिक धर्माप्रमाणे आचरण करतात. यांच्यात सगोत्र, सप्रवर व सपिंड विवाह होत नाहीत. यांची कुलदैवते बरीचशी कोकणात असून त्यात वाडेश्वर, हरिहरेश्वर, व्याघ्रेश्वर, सोमेश्वर यांचा समावेश होतो. पेशवे गणपतीचे उपासक होते म्हणून चित्पावन गणपतीची ही उपासना करतात. नवरात्रातील महालक्ष्मीची पूजा हे कोकणस्थ ब्राम्हणाचे खास वैशिष्टय म्हणावे लागेल. या दिवशी पिठाच्या उकडीची महालक्ष्मीची पूर्णाकृती तयार करून तिला वस्त्रे व अलंकार घालतात. या मूर्तीपुढे घागरी फुंकण्याच्या कार्यक्रम होतो. कोकणस्थ नित्य व नैमत्तिक संस्काराचे पालन इतर ब्राम्हणांप्रमाणेच करतात.[६]

**देशस्थ :–**

साधारणपणे घाटमाथ्याच्या प्रदेशाला देश आणि तेथे राहाणाऱ्यास देशस्थ असे म्हणतात. इतर ब्राम्हणांपेक्षा देशस्थांची लोकसंख्या या जिल्हयात जास्त आहे. देशस्थात ऋग्वेदी व यजुवेदी असे दोन भेद आहेत. ऋग्वेदी देशस्थांत स्मार्त आणि वैष्णव आणि यजुर्वेदी देशस्थांत शुक्ल व कृष्ण असे पोटभेद आहेत. भिन्न वेदांच्या अनुयांयात विवाह होत नाहीत. देशस्थ ब्राम्हण अग्स्ती, अंगिरस, अत्री, भृगु, काश्यप, वासिष्ठ, विश्वामित्र इत्यादी गोत्रांचे आहेत. सर्वसाधारणपणे गोत्र म्हणजे वंश प्रमुखाचे नाव आणि प्रवर म्हणजे गोत्रांचे पूर्वज असे म्हटले जाते. हे दोन्ही रक्तसंबंध दाखवितात. या कारणास्तव सगोत्र, सप्रवर व सपिंड विवाह निषिद्ध मानलेले आहेत. देशस्थ ब्राम्हण कोकणस्थ, कऱ्हाडे व देवरूखे ब्राम्हणांबरोबर शक्यतो विवाह करीत नाहीत. कोल्हापूरची महालक्ष्मी, बदामीची बाणशंकरी, दुर्गा गजानन, जोगेश्वरी, वाडी रत्नागिरीचा जोतिबा, जेजुरीचा खंडोबा, राम, विष्णू आणि शिव ही देशस्थांची कुलदैवते आहेत. ते शाकाहारी असून शकून, अपशकून यावर त्यांचा विश्वास असतो. देशस्थांची बरीच आडनावे कामधंद्यावरून किंवा मूळ गावावरून पडलेली आहेत. उदाहरणार्थ देशमुख , देशपांडे, कुलकर्णी, आजरेकर, देशस्थ पूर्वी प्रामुख्याने जमीनदार, सावकार, पुरोहित, भिक्षुक, लेखक

इत्यादी व्यवसाय करीत असत. सध्या शासकीय सेवा, खाजगी क्षेत्र व शिक्षण या क्षेत्रात त्यांचे प्रमाण बरेच असून नागरी विभागात त्यांची लोकवस्ती जास्त दिसते. हिंदूधर्मातील १६ नित्य संस्कार व २४ नैमत्तिक संस्कार कटाक्षाने पाळण्याकडे त्यांचा कल असतो.[७]

**महार/बौद्ध/नवबौद्ध**

महार जातीत महार, मुरळी महार, गावसी महार आणि जोगती महार अशा पोटजाती आढळतात. खंडोबाच्या सेवेसाठी वाहून घेतलेल्या मुरळीपासून झालेली संतती म्हणजे मुरळी महार होत. जोगती महार हे यल्लमा देवीला अर्पण केलेल्या महारांपासून झालेली संतती होय. सर्व पोटजातीचे लोक रोटीव्यवहार करतात. परंतु, आपापसात बेटीव्यवहार करीत नाहीत. परंपरेने हा समाज भारतीय जातिव्यवस्थेत कमी लेखला जातो. हा समाज अनुसूचित जातीमध्ये येतो, हिंदु धर्मातील जातिव्यवस्थेत हा समाज सर्वात खालच्या जातींपैकी होता. विसाव्या शतकाच्या मध्यात हया समाजाने बौद्ध धर्माचा स्वीकार केला. त्यामुळे त्या लोकांना नवबौद्ध असेही म्हणतात. हया समाजातील सर्वात महत्त्वाची व्यक्ती म्हणजे डॉ.बाबासाहेब आंबेडकर. पूर्वी अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या हया समाजाची जी काही आज स्थिती आहे. ती फक्त बाबासाहेब आंबेडकरामुळे. महार नावाच्या अस्पृश्य समाजातून येऊन परदेशी जाऊन शिक्षण घेऊन येणारे बाबासाहेब पहिली व्यक्ती आहेत. त्यांच्यामुळेच हा समाज बौद्ध झाला.[८]

महार दिसण्यात काळे, धडधाकट आणि कष्टाळू, आतिथ्यशील, प्रामाणिक असतात. ते जन्म, विवाह आणि मृत्यूसमयी जेवण देतात. पूर्वी महार गावसेवक म्हणून गावकीची कामे करीत. हिंदू धर्मातील महार लोकांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केला आहे. दि.१४ ऑक्टोबर १९५६ रोजी विजयदशमीला डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी बौद्ध धर्माची दीक्षा घेतल्यावर हजारोंनी त्यांचे अनुकरण केले. यास धम्मचक्रप्रवर्तन म्हणतात. तेंव्हापासून महारांना बौद्ध समजले जाते. धर्मातंरामुळे पूर्वाश्रमीच्या महार लोकांच्या जीवनात आमुलाग्र बदल घडून आला आहे. धम्मचक्रप्रवर्तनानंतर बौद्धांचे धार्मिक व सामाजिक विधी बौद्ध भिक्षुद्धारे होत असले तरी काही जुन्या रुढींचे अनुपालन काही लोक करतात.

हल्ली जन्म, नामकरण, दीक्षा, विवाह आणि मृत्यूनंतर अंत्यविधी बौद्ध पद्धतीनुसार साजरे करतात. मुलीकडे साखरपुडा करतात. भगवान बुद्धांच्या व डॉ.आंबेडकरांच्या छायाचित्रांची पूजा करतात. वधू–वर व भिक्षु, बुद्ध व डॉ.आंबेडकर यांच्या प्रतिमांना फुले अर्पण

करतात. वधू–वर एकमेकांच्या बोटात अंगठया घालून व एकमेकांना पुष्पगुच्छ अर्पण करून वाङ्‌निश्चय करतात. विवाह वधूपक्षाकडे मंडपात किंवा मंगल कार्यालयात करतात.

उच्चासनावर भगवान बुद्ध व डॉ.आंबेडकरांच्या छायाचित्रासमोर अगरबत्या व पाच मेणबत्या आणि पाण्याने भरलेला मातीचा कुंभ असतो. त्यात पिंपळाची पाने ठेवतात. कुंभाच्या तोंडाला सूत गुंडाळतात. भिक्षु त्रिशरण व पंचशील म्हणतो. त्याच्यामागे वधू–वर म्हणतात त्यानंतर त्रिरत्न वंदनापाठ म्हणण्यात येते. भिक्षु अठ्ठगाथा म्हणण्यास प्रारंभ करतो. प्रत्येक चरणांच्या शेवटी पुष्पवृष्टी करतात. शेवटी गाथा संपल्यावर एकमेकांच्या गळयात हार घालतात. वाद्यांच्या गजरात लग्न लागते. भिक्षु काही गाथांचे पठण करतो. वधू–वर हातात हात घेतात. अशाप्रकारे विवाहविधी संपन्न होतो. नामकरण, विवाह व अंत्येष्टी हे तीन संस्कार प्रामुख्याने करतात. जन्मानंतर १२ व्या दिवशी नामकरण करतात. त्यावेळी बाळ व त्याचे आई वडील शुभ्र वस्त्रे परिधान करतात. बुद्ध, धम्म व संघवंदना तसेच रतनसुत, करणीयमेतसुत व महामंगल गाथा यांचे पठण करून बाळाचे नामकरण करतात.

बौद्धामध्ये मृत्यू ही दुःखद घटना मानत असले तरी अंत्येष्टी करण्यापलिकडे तिला महत्त्व देत नाहीत. दहन किंवा दफन करतात. मृतास आंघोळ घालून शुभ्र वस्त्र नेसवून तिरडीवर बांधतात. भिक्षु पंचशील व त्रिशरण म्हणतो. उपस्थितही त्याचे अनुकरण करतात. स्मशानातही गाथांचे पठण करतात. दहन केल्यास तिसऱ्या दिवशी अस्थी गोळा करून नदीत विसर्जित करतात. ऐपतीनुसार दहाव्या किंवा तेराव्या दिवशी ज्ञातिभोजन व भिक्षुला दान देतात. आता बौद्ध लोक सुहेर व सुतक पाळत नाहीत.[९]

**मांग :**

महाराष्ट्रात मांग, मांतग, मिनिमादिग, मांग गारूडी, दख्खनी मांग, मांग महशी, मदारी, गारूडी किंवा राधेमांग असे सात पोटभेद आहेत. त्यापैकी  जिल्हयात प्रामुख्याने मांग, मांग गारूडी व मातंग हे तीन पोटभेद आढळतात. जिल्हयात कराड, खटाव, सातारा, पाटण आणि माण तालुक्यात बहुसंख्येने आढळतात. अंबाडी व वाखाचे दोर वळून विकणे हा या जातीतील लोकांचा प्रमुख परंपरागत व्यवसाय आहे. त्याशिवाय केरसुण्या, टोपल्या, सुपे वगैरे ते तयार करतात. विवाह व धार्मिक उत्सवाच्या प्रसंगी वाजत्र्यांची कामे करतात. पूर्वी हे लोक फाशी देण्याचे काम करीत असत. काही लोक शेती व मजूरी करतात. या जातीतील लोक तमाशा

कलावंत म्हणूनही काम करतात. हे लोक शारीरिक कष्टाची आणि मिळेल. ती मोलमजुरी करूनच उपजिविका करतात.

ही जात अनुसूचित जातीत समाविष्ट आहे. मांग जातीचा उल्लेख संस्कृत साहित्यात मांतग या नावाने केलेला आढळतो. मांग जातीची २४ अंतर्विवाही गटात विभागणी केली जाते. समान गटातील लोकांत विवाहसंबंध निषिद्ध मानतात. यांच्यात मामेबहिणीशी विवाह करण्याची परंपरा आहे. परंतु मावसबहिणीशी होत नाही. पूर्वी लहानपणी लग्ने होत असत. लग्न जुळवितांना मुलचा बाप मुलीला मागणी घालतो व देज म्हणून काही पैसे देतो. लग्नाच्या निमित्ताने बहिरोबा, काळूबाई इत्यादी देवतांच्या नवीन मूर्ती बनवितात किंवा घरातील जुन्या मूर्ती उजळतात. पूर्वी समाजात चारपाच दिवस लग्न समारंभ चालत असत. आंबा हे देवक मानले जाते. हे लोक जन्म, मृत्यू व विवाह यासंबंधीचे विधी आणि सणवार सर्वसामान्य हिंदूप्रमाणे करतात. हे लोक अंधश्रद्धाळू असून जुन्या रूढी व परंपरा पाळताना दिसतात. अंगात देवीचे वारे येणे, अंगारे–धुपारे आणि नवस करणे हे सर्व प्रकार आजही काही प्रमाणात पहावयास मिळतात. याचे रोजचे जेवण म्हणजे ज्वारीची भाकरी, आमटी आणि लसणाची चटणी हे आहे. त्याशिवाय ते बऱ्याचदा मांसाहारही करतात.[१०]

**माळी :**

जिल्हयात सर्वत्र आढळतात. हे लोक फळे व भाजीपाल्यांची शेती करून उदरनिर्वाह करतात. माळयांची आडनावे पुढीलप्रमाणे आहेत. नायकवडी, कर्णे, अडसूळ, बोराटे, झोरे, दगडे, जमदाडे, कुदळे, वचकळ, शिंदे, राऊत, रासकर, वाघ, निकम व कोरडे इत्यादी आढळतात. समान आडनावाच्या किंवा विशिष्ट आडनावांच्या समुदायांच्या स्त्री पुरूषात विवाह होत नाहीत. तसेच देवक समान असले तरी विवाह जुळवित नाहीत. आतेबहिण व मामेबहिणीशी विवाह होतो.

माळी कष्टाळू, मनमिळाऊ, अतिथ्यशील व काटकसरी असतात. ते बागायतदार, शेतकरी आणि काही शासकीय नोकऱ्यात असून त्यांच्या बायका शेतीकाम, फळे, फुले व भाजीपाला विकण्यासाठी मदत करतात. त्यांच्या चालीरीती, सण, उत्सव व धार्मिक विधी मराठयाप्रमाणेच आहेत. देशस्थ ब्राम्हण त्यांचे धर्मगुरू आहेत. आळंदी, जेजुरी, पंढरपूर आणि तुळजापूरची यात्रा करतात. तसेच भैरोबा, खंडोबा, ज्योतिबाची पूजा करतात. संत सावतामाळी

यांची पुण्यतिथी साजरी करतात.[११]

**सुतार :**

जिल्हयात सर्वत्र खेडेगावात यांची एकदोन कुटुंबे आढळतात. त्यांचा परंपरागत व्यवसाय बैलगाडया, नांगर, शेतीची अवजारे तयार करणे, नादुरूस्त अवजारांची दुरूस्ती करणे हा आहे. सुतार हा पूर्वी बारा बलुतेदारपैकी एक घटक होता. काही सुतार स्वतःला पांचाळ म्हणवतात व त्वष्टाचे वंशज असल्याचे सांगतात. त्यांचे पांचाळ, देशी, कोकणी इतयदी पोटभेद आढळतात. सुतारामध्ये धावड व पालकर या आडनावांमध्ये एकमेकांशी विवाहसंबंध होत नाहीत. आतेबहीण, मामेबहिणीशी विवाह होतो. मुलाची पाच वर्षाच्या आत ब्राम्हणाकडून मुंज करवून त्याला जानवे घालतात. ब्राम्हण त्यांचे पुरोहित असून त्यांचेकडून मुलाचे नाव ठेवतात व विवाहतिथी निश्चित करतात. इतर हिंदूप्रमाणेच सुहेर व सुतक कालवधीत कोणतेही धार्मिक विधी करीत नाहीत.ते भवानी, खंडोबा व विठोबा तसेच इतर देवदेवतांना भजतात.

**न्हावी :**

न्हाव्यांची परंपरागत धंदा म्हणजे दाढी हजामत करणे हा होय. पैतृक कर्मातील क्षौर, लग्नकार्ये इतयदी प्रसंगी त्यांना रोख रक्कम किंवा कपडे आणि शिधा मिळतो. त्याशिवाय वहिवाटीची इतरही कामे करतात. नागपंचमीच्या दिवशी तो मातीचे नाग करून घरोघरी देतो. त्याबद्दल त्याला धान्य आणि सणाची पोळी मिळते. नागाची सार्वजनिक पूजा तो करतो व त्याबाबत त्याला पूजेचे उत्पन्न मिळते. प्रत्येक मोठया सणाला न्हावी घरोघरी सण मागतो. खेडेगावी ही पद्धत अद्याप सुरू असून शहरी भागात ती लोप पावली आहे. शहरी भागात त्यांनी केशकर्तनालये थाटलेली असून आता ते इतरही व्यवसाय करतात. महाराष्ट्रात न्हावी हा बलुतेदारापैकी एक घटक होता. यांना इनाम जमिनी दिल्या होत्या. न्हाव्यांची गायकवाड, जगताप, जाधव, चव्हाण, मोहिते, पवार, शिर्के, कावरे, खरे, काशिद, देवकर इत्यादी आडनावे असून त्यांची मातृभाषा देवके व चालीरीती मराठयांप्रमाणेच आहेत. यांचे पुरोहित ब्राम्हण असतात.[१२]

**कुंभार :**

कुंभार हे नाव कुंभ म्हणजे मातीचा घडा व कार म्हणजे करणारा या शब्दांवरून पडले असून कुंभ ऋषीला त्यांच्या जातीचा मुळपुरूष मानतात. कुंभार बारा बलुतेदारापैकी एक घटक

असून नित्य उपयोगाची तसेच विशेष प्रसंगी लागणारी मातीची भांडी व वस्तू बनविण्याबाबत त्यास धान्याच्या स्वरूपात मोबदला मिळत असे. परंतु बलुतेदारी पद्धती आता बंद झाली आहे. ते कौले, विटा, मडके, घागरी इत्यादी मातीच्या वस्तू आणि मानव व प्राण्यांच्या मातीच्या मूर्ती तयार करून विकत. माती व मडकी वाहून नेण्यासाठी गाढवे पाळतात. ते कष्टाळू, काटकसरी, अतिथ्यशील आणि नीटनेटके असतात. कुंभारांमध्ये लग्नाच्या आधीच्या दिवशी मुलामुलीस त्यांच्या घरी हळद लावतात. एक सुवासिनी महिला वाजतगाजत आंबा, जांभूळ व उंबराची पाने आणून मंडपातील एका खांबाला बांधते. मुलगा घोडयावर बसून मिरवणुकीने वधुगृही जातांना मारूतीचे दर्शन घेतो. त्यावेळी पाच माणसे नवरदेवाला कणकीचे गोळे फेकून मारतात. तो देवाला नमस्कार करतो व वधूपित्याच्या घरी जाऊन प्रवेशद्वारावर उभा राहतो. त्यावेळी मुलीचे नातेवाईक एका नारळाने त्याला ओवाळतात व तो नारळ फोडतात. बोहल्यावर ब्राम्हण पुरोहित तांदुळ पसरून त्यावर पाच सुपाऱ्या, तांबे, सुके, खोबरे व हळकुंड ठेवतो. बोहल्यावर वधूवर एकमेकासमोर उभे राहतात व त्यांच्यामध्ये दोन जवळचे नातेवाईक नंदीचा शेला धरतात. शेल्याच्या मध्यभागी तीन हळदीच्या रेघा ओढतात व अशाप्रकारे लग्न लागते. वधूवर खाली बसल्यावर वधूचा पिता वराचे पाय धुतो. पुरोहित वर–वधूचा शेला व शालूची गाठ बांधतो आणि बाशिंग बांधतात. वधूचा पिता वरास पाण्याचे भांडे, कप आणि थाळी भेट देतो. एकमेकांना आहेर देतात. शिखर शिंगणापूरचा महादेव आणि जुन्या सातारा किल्ल्यातील जगदंबा ही त्यांची दैवते आहेत.

**चांभार :**

महाराष्ट्रात ही जात चांभार किंवा म्हणून ओळखली जातो. या जातीच्या व्युत्पत्तीविषयी अनेक दंतकथा प्रचलित आहेत. एका दंतकथेनुसार शिवाय भक्त व महाभक्त अरालय यांचे आपण वंशज आहोत असे हे लोकम्हणतात. अरालयाने आपल्या कातडयाचे जोडे करून देवास नजर केल्यामुळे महादेवाची त्याच्यावर खपा मर्जी झाली. जन्माचा तू चांभार होशील असा महादेवाने त्यास शाप दिला अशी दंतकथा प्रचलित असल्याचे सांगतात. ते जिल्हयात कराड, खटाव, पाटण आणि कोरेगाव तालुक्यात बहुसंख्येने आढळतात. चांभाराच्या स्थानिक कुणबी चांभार, ढोर, मोची व परदेशी चांभार असे पोटभेद असून तयंच्यात रोटीबेटी व्यवहार होत नाहीत. यापैकी मोची व परदेशींची वस्ती शहरी भागात असून ते उत्तर भारतातून आल्याचे

सांगतात. स्थानिक कुणबी चांभार स्वतःच मोची व परदेशी चांभारापेक्षा उच्च समजतात. मोची जोडे, चपला व इतर चामडयांच्या वस्तू तयार करतात. पूर्वी चांभार हा एक बलुतेदार होता परंतु आता ही पद्धत बंद झाली आहे.

ते आपल्या पोटजातीत लग्न करतात. यांच्यात गोत्रे असून समान गोत्रात किंवा देवकांत लग्ने होत नाहीत. कन्याशुल्क देण्याची पद्धती प्रचलित आहे. यांची आडनावे साळुंखे, तांबे, भोसले, काळे, कदम, गायकवाड, पवार, पंडित, कारंडे, लवंगारे, कांबळे, भगत, मोरे, दळवी, रावखंडे इतयदी आहेत. यांच्यात पूर्वी बहुपत्नीत्वाची प्रथा होती. तसेच मुलामुलींचे लग्न लहानपणी ठरवून आठव्या–नवव्या वर्षी करीत आणि मुलगी उपवर झाल्यावर सासरी पाठवित असत. हल्ली ही प्रथा बंद झाली आहे. आता अठरा वर्षानंतर मुलीचा विवाह करतात. ब्राम्हण किंवा जंगम त्यांचे पौरहित्य करतात. विवाह प्रसंगी सुपारी फोडणे, याद्या करणे, साखरपुडा करणे, बस्ता बांधणे, तिथी ठरवणे, गिरड पुजणे, मुहुर्तमेढ रोवणे, कळसास हळद लावणे, गोंधळ घालणे, लग्न लावणे, वरात काढणे इत्यादी विधी करतात. वऱ्हाड वेशीत आले म्हणजे त्यांना गूळ, कांदा व पाणी देणयची पद्धत आहे. मूल जन्मल्यानंतर स्त्रिया सोहर गीत गातात. पाचवी, सटवीपूजन व बारसे करतात. त्यावेळी गूळ व विडयाची पाने वाटतात. यांची घरे मातीच्या कच्च्या विटांची व छपरे कौलारू किंवा गवती असतात. ज्वारीची भाकरी डाळ, कांदा आणि लसणाची चटणी त्यांच्या आहारात असते. ते मांसाहारी असून मराठयासारखे पेहराव करतात. काही चांभार कबीरपंथी, नानकपंथी तर काही लिंगायत पंथाचे अनुयायी आहेत.[१४] त्याशिवाय ते अनेक साधु व बैरागी यांना भजतात.

हे लोक पूर्वीपासून धार्मिक वृत्तीचे असून ते हिंदू धर्माच्या रूढी व परंपरा पाळतात आणि देवदेवतांची उपासना करतात. तयंच्या घरामध्ये देवघर किंवा देव्हारे आढळतात. पाली व जेजुरीचा खंडोबा, मरीआई, काळूबाई आणि भैरोबा ही त्यांची दैवते आहेत. देवदेवतांच्या नावाने अंगारे, धुपारे व नवस करण्याची प्रथा आहे. महादेवाला या जातीत अत्यंत पवित्र असे स्थान आहे. दरवर्षी महादेवाच्या नावाने भंडार घालतात आणि उत्सव साजरा करतात. शिंगणापूरला हे लोक मोठया संख्येने जमतात. या यात्रेत त्यांची मानाची पालखी(काठी) असते. हे लोक नवस फेडतात आणि कोंबडे व बकरे बळी देतात. संत रोहिदास जयंती व पुण्यतिथी साजरी करतात.

संत रोहिदास जयंती व पुण्यतिथी साजरी करतात. पूर्वी या जातीत जातपंचायत होती. पंचायतीचा प्रमुख म्हणून या समाजची प्रतिष्ठित व्यक्ती न्यायनिवाडयाचे काम पाही. लग्नसोहळा किंवा दहाव्या तेराव्याचे कार्यक्रमाच्यावेळी जातपंचायीच्या प्रमुखांचा सहभाग मानला जात असे. हल्ली जातपंचायतीचे महत्त्व कमी जाले आहे. जिल्हयात महाबळेश्वर, पसरणी, पांडववाडी, बावधन, पाचगणी, धोम येथील चांभार लोक आधुनिक पद्धतीच्या चपला व जोडे तयार करतात व जास्त प्रमाणात महाबळेश्वर आणि इतर मोठया शहरात पाठवितात. पर्यटकामुळे महाबळेश्वरला चपला जोडयांची विक्री मोठ्या प्रमाणात होते.[१५]

**लोहार**

पूर्वीच्या ग्रामव्यवस्थेमध्ये बारा बलुतेदारापैकी लोहार हे एक बलुते होते. शेतकऱ्यांना शेतीसाठी लागणारी लोखंडी अवजारे तयार करून पुरविणे हा त्यांचा व्यवसाय आहे. त्यांना पांचाळ विश्वकर्मा लोहार असेही म्हणतात. प्रत्येक गावात त्यांची एकदोन कुटुंबे आढळतात. त्यांची जाधव, कावरे, मगदूम, निकम, पोवार, माने, थोरात, चव्हान अशै आडनावे आहेत. एकाच कुळात विवाह होत नाहीत. मामेबहिणीशी लग्न करता येते. काही ठिकाणी लग्नाच्या पूर्वी दोन दिवस आधी मुलास जानवे घालतात. त्यावेळी कोणताही विधी करीत नाही. लग्नात पाचपालवी, हातोडा, सांडशी, भाला, ऐरण व घन ही देवके बसवितात. मुलामुलींना एकत्र हळद लावतात. वधूकडे लग्न समारंभ पार पाडतात. वरास मारूतीच्या देवळात नेतात. तेथे वरदावा करतात. वरदाव्याच्या वेळी लिंबोळया हातात देऊन उखाणे म्हणतात. वर मंडपाजवळ आल्यानंतर वधूची आत्या घागरीतील पाणी त्याच्या पायावर ओतते. त्यावेळी वरपिता वधुच्या आत्याला साडीचोळी भेत देतो. लग्नविधी ब्राम्हण पार पाडतो. लग्नापूर्वी वधूवरास फुलांच्या मुंडावळया बांधतात. विवाहानंतर बाशिंग बांधतात. पानसुपारी व जेवण देतात. गृहप्रवेश करतेवेळी नववधू धान्याची रास ओलांडते. पूर्वी लग्न पाच दिवस होत असत. मानापानाच्या प्रथा आहेत. सत्यनारायणाची पूजा, गोंधळ व जागरणे करतात. भवानी, खंडोबा, सिद्धनाथ आणि विठोबा ही कुलदैवते आहेत विधवाविवाह व बहुपत्नीत्वास मान्यता असून भूतखेत व जादूटोण्यावर विश्वास ठेवतात. घटस्फोट होतात पण त्यांचे प्रमाण अल्प आहे. गरोदरपणात सातव्या महिन्यात माहेरी साडीचोळी करतात. मुलासाठी नवस करतात. पाचवी सटवीपूजन व बारसे करतात. मामाच्या हस्ते जावळ काढतात. हिंदूंचे सर्व सण साजरे करतात. तथापि,

गुढीपाडवा मोठया प्रमाणावर साजरा करतात. शाकाहारी व मांसाहारी असून कुणब्याप्रमाणेच आहाराच्या पद्धती आहेत. घरे मातीची, छपराची व कौलारू आहेत. काही लोक झोपडयात राहतात. मृतांना जाळतात व लहान मुले मृत्यू पावल्यास त्यांना पुरतात. दहा दिवस सुतक पाळतात.[१६]

**सोनार :**

जिल्हयात सर्वत्र मोठया गावात व शहरात आढळतात. देवांचा शिल्पकार जो विश्वकर्मा त्याचेपासून यांची व्युत्पत्ती झाली असे सांगतात. काही सोनार जिल्हयात मुंबई, गुजरात, कर्नाटक व मद्रास भागातून आलेले असून इतर स्थानिक रहिवाशी आहेत. सोने–चांदीचे दागिने, भांडी तयार करण्याचा त्यांचा प्रमुख व्यवसाय आहे. ते सावकारी, शेती व नोकरी करतात. जिल्हयात १८७६–७७ मध्ये पडलेल्या दुष्काळाचा त्यांच्या व्यवसायावर विपरीत परिणाम झाला होता. सोनारांचे अहिर, असरा, देवांगन किंवा दैवज्ञ, कडू, कानडे किंवा अकसाळी, लाड, भाळवी, मराठा, परदेशी, सादा, शिल्वंत, वैश्य किंवा जैन असे बारा पोटभेद आहेत. दैवज्ञ सोनार स्वतःस ब्राम्हण समजताता. दैवज्ञांचा सामाजिक दर्जा सोनारांत सर्वात श्रेष्ठ मानतात. त्यांच्या खालोखाल लाड सोनाराचा. पोटजातीत रोटीबेटी व्यवहार होत नाहीत. पाचपालवी, सांडशी व फुंकणी ही काहींची देवको आहेत. लग्नापूर्वी मुलाची मुंज करतात. समान गोत्र किंवा आडनाव असलेल्या कुटुंबामध्ये विवाहसंबंध होत नाही. काही सोनाराचा विवाह संस्कार ब्राम्हणांसारखाच असतो. काही लोक स्थानिक मराठयांप्रमाणेच विधी पार पाडतात. काही ठिकाणी जातीचे पुरोहित असतात. तर काही लोक स्थानिक मराठयांप्रमाणेच विधी पार पाडतात. काही ठिकाणी जातीचेच पुरोहित बोलावितात. घटस्फोट मान्य असला तरी विधवाविवाह करीत नाहीत. हिंदूच्या सर्व देवदेवतांची पूजा व सण, उपवास करतात.[१७]

**शिंपी**

शिंपी जिल्हयात सर्वत्र आढळतात. जैन शिंपी आणि नामदेव शिंपी अशा दोन पोटजाती आहेत. जैन शिंप्याचे नाव जैन धर्मावरून पडले असावे, तसेच नामदेव शिंपी जातीचे नाव संत नामदेवाचा नावावरून पडले असल्याचे सांगतात. त्याचा शिवणकाम करणे हा प्रमुख व्यवसाय असून तयार कपडे विकणे व इतर व्यवसाय ते करतात. जैन शिंप्याची संख्या अल्प असून ते कराड तालुक्यात आढळतात. ते ब्राम्हणासारखा पोशाख करतात. आणि ते कष्टाळू, विवेकी व

आतिथ्यशील आहेत. काहींनी शहरात शिवणयंत्रांची दुकाने घातली आहेत. शिंप्यांमध्ये हेंद्रे, माळवदे, कुमठेकर, टाळकुटे, गावबोटे, अवसरे, पोरे, चौगुले, लंगडे, मोहटकर, पिसे, जामदार, मुळे, पतंगे, गोटे, काकडे व इंडाळे इत्यादी आडनावे आहेत. बहुजन समाजाप्रामाणे यांचे जन्म, विवाह मृत्यू संस्कार आहेत. खंडोबा, जोतिबा, नाथ, मस्कोबा, भवानी व चंद्रसुन इत्यादी कुलदैवते असून पंढरपूरच्या विठोबाला मानतात. पंढरपूरची यात्रा करतात. यांच्यात वारकरी पंथाचे लोक जास्त आढळतात. संत नामदेवाची पुण्यतिथी साजरी करतात. पुरूष–स्त्रियांचा पेहराव, सण व उत्सव मराठयांप्रमाणेच करतात.

**गुरव**

जिल्हयातील मोठया गावी व शहरात गुरवांची एक दोन कुटुंबे तर धार्मिक स्थळी त्यांची जास्त वस्ती आढळते. ते गावातील मंदिरांचे वंशपरंपरागत पूजारी आहेत. गावातील मंदिराची साफसफाई करणे, पूजाअर्चा करणे इत्यादी कामे करतात. ग्रामस्थांना देवपूजेसाठी दररोज बेल व तुळशीची पाने व फुले पुरवितात. शिवाय पत्रावळी व द्रोण तयार करूनही विकतात. लग्न व इतर प्रसंगी वाजंत्र्यांची कामे करतात. उपनयनादी संस्कार व समान्य आचारविचारामध्ये सुसस्कृंत गुरव व ब्राम्हण यात फारसा फरक आढळून येत नाही. जिल्हयात गुरव जातीच्या शैव नीलकंठ गुरव गळयात जानवे घालतात. वंशपरंपरागत पुजारी असल्यामुळे बहुतेकांना देवस्थान इनाम जमिनी दिलेल्या आहेत. या जमिनीला गुरवकी म्हणतात. ग्रामीण भागात गुरवांना सुगीच्या दिवसात धान्य मिळते तसेच देवापुढे ठेवलेली दक्षिणा त्यांना मिळते. त्यांची कुदळे, दळवी, साखरे, निकम, पवार, गुरव, बारभाई, सातभाई व शिर्के अशी कुळे आहेत. ते मौजीबंधन करतात आणि मद्य, मांस सेवन करीत नाहीत. त्यांचे उपाध्ये त्यांच्याच जातीचे असतात. गुरव जातीमध्ये स्त्रीचे जेव्हा बाळंपण होते तेव्हा दहा दिवस सुहेर पाळतात. मुलाचे बाराव्या दिवशी व मुलीचे तेराव्या दिवशी नामकरण विधी करतात. मुलाची आई हिरवी साडी व हिरव्या बांगडया भरते. तिची तांदूळ व नारळांनी ओटी भरतात. त्यावेळी नातेवाईक बाळास भेत वस्तू देतात. राम–कृष्ण यांच्या पाळण्याचे गाणे म्हणतात व मुलाला पाळण्यात घालतात. उपस्थितांना घुगऱ्या किंवा जेवण देतात.

गुरव साखरपुडयाद्वारे लग्न पक्के करतात. त्यावेळी जोतिष्याने सांगितल्याप्रमाणे शुभ दिवशी मुलाचा पिता नातेवाईकांसह मुलीच्या घरी तिला हिरवी साडीचोळी आणि चांदीची

साखळी भेट देतो. मुलगी नवीन कपडे परिधान करते. त्यावेळी मुलाचा पिता पुरोहिताच्या समक्ष तिच्या कपाळावर मळवट लावतो. त्यानंतर मुलगी गृहदेवांना व उपस्थितांना नमस्कार करते. पाहुण्यांना जेवण दिल्यानंतर साखरपुडा किंवा मागणीचा कार्यक्रम संपतो. मुलामुलीचे वडील जोतिषाकडून लग्नाची शुभतिथी काढून घेतात. मुलामुलीच्या घरासमोर मांडव उभारले जातात व नातेवाईक, इष्टमित्रांना लग्नाचे आमंत्रण पठवितात. मांडवात एका कोपऱ्यात उंबराची देर/खांब रोवतात आणि हळकुंड, सुपाऱ्या बांधलेले कापड त्याला बांधतात. ज्येतिष्याने नावे काढून दिलेल्या पाच सुवासिनीवरीला लग्नाच्या दोनतीन दिवसाआधी हळद लावतात. उरलेली हळद वाजतगाजत नवरदेवाकडे नेऊन त्याला लावतात. गरम पाण्यांनी आंघोळ घालतात. त्यावेळी स्त्रिया गाणी म्हणतात. त्यानंतर हळदीचे जेवण देतात. नवरीला हळद लावणाऱ्या स्त्रियांना सुपाऱ्या भेट देतात. कुंभाराकडून आणलेली मडकी मांडवातील एका खांबाजवळ ठेवतात. लग्नदिनी नातेवाईक व इष्ट मित्रासह बधू वाजतगाजत मारूतीच्या देवळात जाऊन मूर्तीपुढे सुपाऱ्या व तांब्या ठेवून नमस्कार करून आशिर्वाद मागते आणि घरी परत येते. वर मुलगा घोडयावर बसून वऱ्हाडयासह वाजतगाजत वधूगृही जातो. त्यावेळी वधूपिता त्यांचे स्वागत करतो. जेव्हा लग्नघटिका समीप येते. त्यावेळी पुरोहित चौकोनी रांगोळी काढून त्यात दोन पाट ठेवतो. त्या पाटावर वरवधू समोरासमोर उभे राहतात. दोहाच्यामध्ये अंतरपाट धरतात आणि पुरोहित मंगलाष्टके म्हणतो. शुभघडीला लग्न लागते. त्यावेळी वाजंत्री वाद्य वाजवितात. वराचा शेला व वधूच्या शालूची गाठ बांधल्यावर गृहदेवतांना व वयस्क व्यक्तींना नमस्कार करतात. त्यानंतर एकत्र जेवण करतात. पाहुणे मंडळींना जेवण देतात. वर वधूला घेऊन वऱ्हाडासह आपल्या गावी जातो. वराच्या घरी जेवण देतात व नंतर लग्न संपते. प्रत्येक लग्नप्रसंगी पुरोहिताला पागोटे व पैसे मिळतात.

**रामोशी**

जिल्हयात माण, खटाव, फलटण व दहिवडी या तालुक्यांत प्रामुख्याने रामोशी आढळतात. रामोशी शब्द रामवंशी शब्दाचा अपभ्रंश असावा किंवा रानवासी म्हणजे रानात राहणारा या शब्दापासून त्याची व्युत्पत्ती झाली असावी. या जमातीचे लोक बहुधा गावाच्या सीमेवर राहतात. त्यांना नाईक नावानेही संबोधतात. हे स्वतःला रामवंशी समजतात. कर्नाटकात यांना बेरड म्हणतात. मराठेशाहीत त्यांच्यावर गावांच्या व गडाच्यां रक्षणाची

जबाबदारी असे. पूर्वी हे बलुतेदार होते. त्यामुळे काही गावांमध्ये त्यांना इनामे जमिनी दिल्या होत्या. त्यांच्यात व्हलगे रामोशी,  कोळी रामोशी, भिल्ल रामोशी आणि मांग रामोशी अशा चार पोटजाती मानल्या जातात. रामोशी ही जमात ब्रिटिश राजवटीत गुन्हेगार किंवा दरोडेखोर जमात म्हणून ओळखली जात असे. स्वातंत्र्योत्तर काळात राज्य शासनाने रामोशी विमुक्त जात म्हणून घोषित केले आहे. यांच्यात जाधव, पाटोळे, मदने, बोडरे,शिरतोड, हाडके, माने गुजले, मलमे, लांडगे, शेरकर इत्यादी कुळे आढळतात.

समान कुळे अथवा समान देवक असल्यास विवाह संबंध होत नाहीत. वासनवेल, उंबर, जांभूळ, कदंब, शमी, पाचपालवी, पानकणीस ही मुख्य देवके आहेत. मुलगी वयात आल्यानंतर वर शोधण्यासाठी मुलाकडे जातात. हल्ली वधूगृही विवाह संपन्न होतो. वधूमंडपी वधूवरांना हळद लावतात. लग्नाच्या दिवशी देवक गावातून फिरवून आणतात. त्यानंतर सोनाराकडून कुलेदैवतांच्या मूर्ती वाजतगाजत दोन्हीकडील पाहुणे जोडप्यासह आणतात. रामोश्यांचे खंडोबा हे कुलदैवत असून लग्नप्रसंगी कुलदैवत व इतर देवतांची पूजा करतात. वराला घोडयावर बसवून मारूतीच्या देवळात नेतात. त्यावेळी दोन्ही पक्षाकडील लोक तेथे जातात. तेथे वर मंगळसूत्रातील मणी ओवतो. त्यावेळी विवाहित पुरूषमंडळी वराला लिंबोळया (कणकीचे गोळे) मारून उखाण्यासह नावे घेतात. वधूकडून वराचा पोषाख काठीला बांधून त्याला देण्यासाठी वाजतगाजत आणतात. त्यानंतर वरात वधूमंडपी येते. त्याप्रसंगी वधूच्या आत्यास (मावळण) वराचे वडील साडीचोळी भेट देतात. सगुणघागरही असते. करवल्या वरास मंडपात आंघोळ घालतात. वधूवर लग्नास सज्ज झाल्यानंतर पुरोहित लग्नविधी पार पाडतो. वधूबरोबर वराकडे एक पाठराखीण येते. वधू वरगृही गृहप्रवेश करते. सत्यनारायणाची पूजा करतात. दुसऱ्या दिवशी जागरण करतात. त्यानंतर नवदाम्पत्य कुलदैवताच्या दर्शनास जाऊन येतात.

यांच्यात गरोदरपणी ओटी भरीत नाहीत. पाचवी व सटवीची पूजा करतात. बहुतांश लोक दहा दिवस विटाळ पाळतात. सव्वा महिन्याने बारसे करतात. बारसे लग्न आणि मृत्यू संस्काराच्या प्रसंगी मेजवानी देतात. या जमातीत खंडोबाला मुले–मुली सोडण्याची किंवा खंडोबाशी लग्न लावण्याची प्रथा आढळते. देवाला सोडलेल्या मुलीस मुरळी व मुलास वाघ्या म्हणतात. वाघे–मुरळी नाचगाण्याचे एकत्र कार्यक्रम करतात. रामोशी शुभकार्याला जय मल्हार या उद्घोषाने प्रारंभ करतात. खंडोबाच्या जत्रेत देवाची पालखी उचलण्याचा पहिला मान

रामोश्यांना दिला जातो. रामोश्यांचा पेहरावात धोतर, सदरा, गळयात काळया दोऱ्यात ओवलेले ताईत, कानात बाळया व एका हातात चांदीचे कडे असते. ते शरीराने राकट व बांधेसुद असून जाड मिशा ठेवतात. या जातीत काही लोक मृतास पुरतात तर काही जाळतात.

**जंगम**

हे लिंगायांचे धर्मगुरू अथवा पुरोहित असून जिल्हयात सर्वत्र आढळतात. धातूची शिवमूर्ती असलेली डबी गळयात बांधतात. जंगमाच्या प्रमुखास स्वामी म्हणतात. स्वामी जेव्हा मृत पावतो तेव्हा त्यांच्या शिष्यामधूनच एखादा स्वामी होतो. तो कराडच्या मठात वास्तव्य करतो. स्वामी चारपाच वर्षातून एकदा आपल्या अनुयांयाच्या घरी भेट देतो. तेव्हा त्याला धान्य व भेटवस्तू मिळतात. जंगम शाकाहारी असतात. मृतास पुरतात व समाधी बांधतात. समाधीवर शीवप्रतिमा तयार करतात.

**ढोर**

ढोरांचा पारंपारीक पद्धतीने कातडी कमविण्याचा व्यवसाय असला तरी ते मजूर म्हणूनही काम करतात. चामडयाच्या धंद्याशी संबंधित असलेल्या चर्मकार(चांभार) आणि ढोर या दोन स्वतंत्र जाती आहेत. यांच्यात पूर्वीपासून रोटीबेटी व्यवहार होत नाहीत. चांभार स्वतःला ढोर जातीपेक्षा उच्च समजतात. या जातीच्या व्युत्पत्तीसंबंधी काही दंतकथा प्रचलित आहेत. ही जात हिंदू समाजव्यवस्थेमध्ये पूर्वी अस्पृश्य म्हणुन ओळखली जात असे. या जातीचा अनुसूचित जातीत समावेश आहे. यांच्या सात पोटजाती असल्याचे सांगतात. हे मोठया खेडयांत व शहरातही राहतात. यांची जिल्हयात सोनावणे, खंदारे, शिंदे, कदम, व्हटकर, तपासे, जोगदंडे इत्यादी कुळे आढळतात. यांची उंबर, जांभूळ अशी देवके असून एकच देवक असणाऱ्या कुळात लग्नसंबंध होत नाहीत. पूर्वी बालविवाह पद्धती होती. मुलाकडील लोक मुलगी शोधतात. मुलगी पसंत झाल्यावर मुलीकडे साखरपुडा होतो. दोन्ही पक्षांकडे सोयीनुसार देवक बसविणे, वधूवरांना मंडपात हळद लावणे इत्यादी विधी करतात. लग्नविधी ब्राम्हण पार पाडतो. सध्या एकाच दिवशी लग्न पार पाडतात. पूर्वी लग्न सात–आठ दिवस चालत असत. लग्नात बोहले, बाशिंग व रूखवतही असतो. सत्यनारायणाची पूजा करतात व गोंधळही घालतात.

गरोदरपणी माहेरी डोहाळे जेवण करतात. पाचवी, सटवी पूजा, बारसे करतात. मुले जगत नसतील तर नवस करतात. ते हिंदूच्या सर्व देवदेवतांस पूजतात आणि सर्व सण साजरे

करतात. जोतीबा, खंडोबा, महादेव, विठोबा, नायकोबा, यल्लमा, भवानी ही त्यांची दैवते आहेत. हे लोक नागदेवतेचीही पूजा करतात. त्यांचे धार्मिक विधी ब्राम्हण व जंगम करतात. हे प्रामुख्याने जेजुरी, वाडी रत्नागिरी(ज्योतिबा) आणि पंढरपूरच्या यात्रेस जातात.[२०]

**कासार**

बांगडया तयार करणाऱ्यांच्या कासार आणि बांगड अशा पोटजाती असून ते उजळ वर्णाचे, मध्यम बांध्याचे आणि सडपातळ असतात. मराठी बोलतात. कष्टाळू, काटकसरी व नीटनेटके असतात. तांब्या पितळेची भांडी तयार करून विकतात. स्त्रियांच्या हातात बांगडया भरतात. काही लोक सूया, धागे, किरकोळ वस्तूची विक्री करतात. काही सावकारी, शेती व नोकऱ्या करतात. पहिल्या प्रसूतीच्यावेळी स्त्री माहेरी जाते. कासारांमध्ये मुलाचा जन्म झाल्यावर पाचव्या दिवशी सटवाईची पूजा करून तिची प्रतिमा त्याच्या गळयात बांधतात. दहा दिवस सुहेर पाळतात. बाराव्या दिवशी काही वयस्क स्त्रिया मुलाचे नाव ठेवतात. जातपंचायतीमध्ये सामाजिक तंटे मिटवितात.

**कोष्टी**

जिल्हयात हे सर्वत्र आढळतात. त्यांच्यात मराठा कोष्टी व लिंगायत कोष्टी असे दोन पोटभेद आहेत. ते एकमेकांशी रोटीबेटी व्यवहार करीत नाहीत. ते वर्णाने काळे, मध्यम बांध्याचे असून मराठी बोलतात. त्यांच्या घरी विणकामाचे साहित्य असते. लिंगायत कोष्टी लिंग धारण करतात. ते विवेकी, काटकसरी व कष्टाळू आहेत काही विणकाम व शेती करतात. तसेच शेतमजूरही आहेत. स्त्रिया पुरूषांच्या कामात मदत करतात. लिंगायत कोष्टी फक्त शिवाची पूजा करतात. तर मराठा कोष्टी ब्राम्हणाप्रमाणेच सर्व देवदेवतांची पूजा करून व्रत व उपवास करतात. मराठा कोष्टी ब्राम्हणांप्रमाणे सर्व देवदेवतांची पूजा करून व्रत व उपवास करतात. मराठा कोष्टयांचा गुरू ब्राम्हण असतो. त्यांचे लग्नविधी तो पार पाडतो. लिंगायत कोष्टयांचे रीतीरिवाज मराठयांसारखेच आहेत. लिंगायत मृतांना पुरतात व शोक करीत नाहीत. मराठा कोष्टी मृतांना जाळतात. व दहा दिवस सुतक पाळतात.

**भोई**

भोई जिल्हयात सर्वत्र आढळतात. त्यांची आडनावे कठवटे, चपके, जिरंगे, मुळे, भेकरे, शिंदे, खैरमुडे, नलवडे, काटकर, ठोंबरे, लोखंडे, खडके, जमदाडे, झंकार, सुपेकर,

चव्हाण, पवार, जाधव, गुजर इत्यादी आढळतात. ते काळे धडधाकट व कष्टाळू आहेत. हे पूर्वी पालख्या वाहून नेण्याचे काम करीत. परंतु हा व्यवसाय आता बंद झाला आहे. ते मासेमारीशिवाय शेती आणि मजुरी करतात. ते कोळ्यापेक्षा खालच्या दर्जाचे समजले जातात. तथापि त्यांचे रितीरिवाज कोळ्यांसारखेच आहेत. यांच्यात जातपंचायत होती. या जातीचा भटक्या जमातीत समावेश आहे.

**धनगर**

धनगराचे कन्नड भाषेतील नाव दनगार असे असून दन म्हणजे गुरेढोरे(गोधन), त्यावरून दनकारे–दनगार–धनगर(गुरेढोरे पाळणारा) अशा क्रमाने हा शब्द बनला असावा. महाराष्ट्रात धनगरांच्या तेवीस पोटजाती असून शासनाने त्यांचा भटक्या जमातीअंतर्गत समावेश केला आहे. त्यांच्या अहिर, अस्सल किंवा मराठा, बनजी, बरगेबंद किंवा मेढकरी, गडगे, गवळी, हटकर, होळकर, मेंढे, म्हसकर इत्यादी पोटजाती आहेत. हे महाराष्ट्रातील परंपरागत मेंढपाळ होत. ते मेंढयाशिवाय शेळया, गाई व म्हशी पाळतात. यांच्याजवळ चांगल्या जातीची कुत्रीही असतात. जिल्हयात यांची सर्वत्र वस्ती असली तरी पूर्वेकडील डोंगराळ भागात ते गुराचा व्यापारही करतात. महाबळेश्वर, पाटण व जावळी तालुक्यात त्यांना महसकर म्हणतात. महसकर हे गाई, म्हशी पाळतात व दुधदुभत्यावर उदरनिर्वाह करतात. जे मेंढराचे कळप बाळगतात त्यांना मेंढे म्हणतात. ते लोकर विकतात. शेतात खतासाठी बकऱ्या व मेढयां बसवून ते त्या मोबदल्यात शेतकऱ्याकडून धान्य किंवा पैसे घेतात. यासाठी ते गावोगाव भटकत असतात. धनगराची कुळे ही देवकावर आधारलेली आहेत. त्यांचा विवाह स्वतःच्या पोटजातीत व भिन्न कुळात होतो. काही लोक स्थायिक झाली असून शेती व शेतमजूरीही करतात. जिल्हयातील धनगरांची आडनावे पुढीलप्रमाणे आहेत :– डाबरे, धायगुडे, विचुफळे सूळ, शेळके, बरकडे, खताळ, झिमल, सरपल, पांढरे, हिरवे, विरकर, दाताडे, कारंडे, बनगर, शिंगाडे, खोत, धडस, चौगुले, माने, हाके, थोरात, देवकाते, कोकरे, चोपडे, गावंडे, जामळे, कोळेकर, केंडे इत्यादी. जन्म, विवाह, मृत्यू इत्यादी संबंधीचे संस्कार हिंदूप्रमाणेच असतात. यांची खास दैवते म्हणजे खंडोबा, बिरोबा, विठोबा, महादेव, मारूती, सटवाई, जनाई, म्हसोबा असून त्यांची उपासना करतात. तसेच बिरोबा, धुळोबा व नागोबा इत्यादींच्या जत्रा ज्यावेळी भरतात. त्यावेळी बकरे बळी देण्याची प्रथा आहे. पुणे जिल्हयातील जेजुरी व सांगली

जिल्हयातील आरेवाडी येथील दैवतांना धनगर फार मानतात. भाद्रपद व आश्विन महिन्यात बिरोबाची स्तुतीपर लोकगीते म्हणतात. त्याप्रसंगी मोठया ढोलाच्या तालावर लोकनृत्य करतात त्यास गजे नृत्य म्हणतात. लोकगीते व लोकनृत्ये याबद्दल धनगर जमात प्रसिद्ध आहे. 'सुंबरान मांडल' अशी सुरूवात करून ते स्वतः धनगरी ओव्या म्हणतात. नावरात्रात उपवास करतात.[२१]

धनगर काटक, कष्टाळू, आतिथ्यशील असतात. त्यांचा पेहराव म्हणजे तांबडे पागोटे, खांद्यावर घोंगडी, काखेत एक पिशवी, अंगात जाड कापडाचा कुडता, पायात करकर वाजणाऱ्या वहाणा व हातात जाड काठी असते. स्त्रिया लुगडे नेसतात. त्यांना चांदीच्या दागिन्याची फार हौस असते. पूर्वी स्त्रिया पुतळया, गजरटे, गोखरे, आंगठया, मासोळया, चांदीची सरी, बावट इत्यादी दागिने वापरीत.

**गोंधळी**

ते स्वतःला भवानीदेवीचे पुत्र किंवा भक्त समजतात आणि गळयात कवडयांची माळ घालतात. अंबाबाई व भवानी देवीचे सेवेकरी असल्यामुळे पोवाडे गातात व नाचगाणे करतात. हिंदू लोक जन्म, विवाह किंवा इतर शुभप्रसंगी त्यांचेकडून आपल्या घरी कुलदेवतांच्या नावाने गोंधळ घालतात. त्यांच्या रेणुकाराई, कदमराई आणि अकरामासी अशा पोटजाती आढळतात. यांची शिंदे, रेणके, इंगळे, बडगे, शिमणार, मोरे, काळे, गोरे, चव्हाण, पवार, माने, शिसोदे अशी कुळे आढळतात. गोंधळी हे जगदंबा, अंबाबाई, भवानी, यल्लमा, रेणुका इत्यादी देवतांची आराधना करून त्यांच्या नावांनी गोंधळ घालतात. रेणुकाराई गोंधळी गोंधळास जातातना धोटा व गुडघ्यामध्ये होईल अशा तऱ्हेने शेरवानी, अंगात मखमलीचा अंगरखा आणि गळयात ६४ कवडयांची माळ घालतो. कदमराई गोंधळी ३२ किंवा क्वचित प्रसंगी जास्त कवडयांची माळ घालतो. डोक्यावर कंगणीदार पगडया, शोभिवंत दागिने, कानाात भीकबाळया घालतात.मांत्र हल्ली लेंगा, टोपी, शर्ट परिधान करतात. देवीसमोर रात्रभर दिवटी पेटती ठेवतात. रेणुकराई गोंधळयाची दिवटी साडेतीन हात लांब तर कदमराईची दिवटी सव्वा हात लांबीची असते. त्यांना पूर्वी इनामे किंवा वतने दिली होती. प्रत्येकास दहाबारा गावांतून गोंधळ घालण्याची मुभा होती. इतर वेळी ते त्या गावातून भिक्षा मागित असत. एखाद्या गोंधळयासाठी नेमून दिलेल्या बारा गावांतून दुसऱ्यांनी परवानगीविना भिक्षा मागितली तर त्याला दंड आकारला जाई. त्यासाठी मूळ वतनदार गोंधळयास हिस्सा द्यावा लागत असे. त्यांनी तसे न केल्यास जातपंचायत दंड

आकारित असे. गोंधळासाठी संबळ, तुणतुणे, दिवटी व कवडयांची माळ ही साधने वापरतात. पूर्वी गोंधळास पाच जण जात असत. गोंधळात देवीची स्तुतीपर गाणी, गौळणी, कृष्णकथा, पोवाडे असे अनेक प्रकार असतात. उपरोधिक अलंकारिक भाषा वापरून ग्रामीण जीवनावर प्रकाश टाकतात.

बहुजन समाजाप्रमाणे यांच्यात विवाह ठरवितात. लग्न पक्के झाल्यानंतर मुलीच्या घरी 'साखरपान' या समारंभात मुलाकडील लोक मुलीला साडी देतात आणि कुंकू लावतात. हा विधी ब्राम्हण पार पाडतो. लग्न मुलीकडे होते. देवक बसवितात. विवाहापूर्वी वधूवरास एकत्र हळद लावतात. लग्नाच्यावेळी वराच्या गळयात जातीतील पाच विवाहित लोक कवडयांची एक माळ घालतात. हाच गोंधळी होण्याचा विधी समजला जातो. नवरदेव घोडयावर बसून मारूती किंवा रामाचे दर्शन घेऊन बोहल्यावर जातो. मराठयांप्रमाणे लग्न समारंभ पार पाडतात. लग्नात शेवटचा विधी 'वारल वाटणे' हा होतो. त्याप्रसंगी लग्नासाठी आलेल्या पाहुण्यांना कुंभाराने तयार केलेले नवीन लोटे त्यांच्या मानाप्रमाणे (लोटयात थंड पाणी, नागवेलीची पाच पाने, सुपारी ठेवून) देतात.[२२]

मुलाच्या जन्मानंतर पाचवी, सटवीपूजन, बारसे करतात. सव्वा महिना सुहेर पाळतात. अंत्यविधी मराठयांप्रमाणेच करतात. मृत पूर्वजांच्या नावाने टाक तयार करून देव्हाऱ्यात ठेवतात. खंडोबा, म्हसोबा इत्यादी देवतांचे गोल, लांबट असे गोटे तयार करतात. पुजेच्या वेळी दिवटी व संबळास मानाचे स्थान असते. हे लोक अंधश्रद्धाळू आहेत.

**कैकाडी**

सातारा जिल्हयात प्रामुख्याने सातारा, दहिवडी, फलटण व म्हसवड तालुक्यात कैकाडी आढळतात. हे मूळचे तेलंगणातील असावेत. त्यांची बोलीभाषा तेलगु आणि कानडीचे मिश्रण होती. परंतु आता ते मराठीच बोलतात. त्यांच्यात धोंतले, कोरवा, माकडवाले किंवा कोंची कोरवा, पामलोर व कोरवी हया पोटजाती आहेत. ते परंपरागत बुरूडकाम करतात. धोंतले कैकाडी सापांचा खेळ करतात. माकडवाले कैकाडी माकडाचा खेळ करीत गावोगाव भटकतात. कोरवी जादूचे खेळ करतात. स्थायिक झालेले आणि भटकंती करणारे असे कैकाडयांचे दोन गट दिसतात. कैकाडयामध्ये गायकवाड, जाधव, पवार, माने, मधवंत, मलाजू, काडे, चव्हाण, पाटोळे, बुधावले, गुजले, बोडरे इत्यादी कुळे आढळतात. जाधव आणि माने या कुळांना या

जमातीत विशेष प्रतिष्ठा आहे. त्यांच्या मुख्य कुळांच्या अनेक पोटकुळयाही आढळतात. जसे कनाडे, धनगरे, काडरे, मानके इत्यादी. पूर्वी क्वचित प्रसंगी ते प्राणी–पक्ष्यांचे आवाज आत्मसात करून सांकेतिक भाषा वापरित असत. स्वातंत्र्यपूर्व काळात कैकाडी ही गुन्हेगार जमात म्हणून ओळखले जात असे.[२३]

कैकाडयामध्ये आतेबहिण व मामेबहिणीशी विवाह प्रचलित असून मावसबहिणीशी विवाह निषिद्ध आहे. एक पुरूष दोन बहिणीसोबत तसेच दोघ भाऊ दोन बहिणीसोबत लग्न केल्याची उदाहरणे सापडतात. विवाहासाठी मुलाचे वडील मुलीच्या पित्यास ठेव म्हणून पैसे देतात. मुलीची मागणी वरपक्षाकडून केली जाते. मुलीकडे साखरपुडा होतो. मुलास टिळा लावतात. देवक बसवित नाहीत. लग्नप्रसंगी बोहले, बाशिंग व रूखवत असते. लग्नात आप्तेष्टांना दारू आणि जेवण देण्याची पारंपारिक पद्धत आहे. जंगम अथवा ब्राम्हण लग्न लावतो. नववधूच्या गृहप्रवेशानंतर सत्यनारायणाची पूजा व जागरण करतात व कुलदैवतास जाऊन येतात. पूर्वी नात्यातील गरोदर स्त्रियांच्या पोटाला कुंकू लावून गर्भातील बाळाचा विवाह ठरविला जात असे.

पूर्वी या जमातीत मुलींना दत्तक देण्याची पद्धत होती. परित्यक्ता स्त्रियांना दत्तक घेतल्यास त्यांना ‘उरसांड’ म्हणत. त्यांच्या प्रमुख देवता भवानी, बहिरोबा, मरीआई, तुकाई, गणपती, यमाई, जेजुरीचा खंडोबा, तुळजापूरची भवानी व मारूती या आहेत. त्यांची पूजा–अर्चा, जत्रा, नवस, उपास–तापास करतात. कोंबडे, बकरे कापून त्याचे नैवेद्य करून देवतांन प्रसन्न करणे हे अनेक पिढयासाठी आजतागायत सुरू आहे. अंधश्रद्धाळू असल्यामुळे अपत्य प्राप्तीसाठी नवस करतात. गरोदरपणी सातव्या महिन्यात माहेरी डोहाळे जेवण करतात. मुलाच्या जन्मानंतर पाचवी, सटवीपूजा व बारसे करतात. ते हिंदूचे सर्व सण साजरे करतात. मराठयांप्रमाणेच स्त्री–पुरूषांचा पोषाख असतो स्त्रिया पुरूषांबरोबर अंगमेहनतीची कामे करतात. स्थायिक झालेल्या कैकाडयांची दगडमातीची कच्ची घरे आढळतात. तर भटके कैकाडी पाल अथवा झोपडयांत राहतात. भटके कैकाडी घराचे सामान गाढवावरून दुसरीकडे वाहून नेतात. ते गाई व बकऱ्याही पाळतात. गाव कैकाडी डुकरे पाळतात,

यांच्यात मृतास भिंतीला टेकवून ठेवतात. प्रेतास जाळतात अथवा पुरतात. खांदेकऱ्यास पाच दिवस शिवत नाहीत मृतांच्या स्मृतीप्रित्यर्थ टाक करून त्यांची पूजा करतात. कैकाडयांची जात पंचायत ही न्यायसंस्था म्हणून ओळखली जाते. जातपंचायतीचे नियम अलिखित असले

तरी ते बंधनकारक असतात. अहमदगनर जिल्हयातील मढी व पुणे जिल्हयातील जेजुरी ही न्यायनिवाडयाची प्रमुख ठिकाणे आहेत.

**कोमटी**

जिल्हयात सातारा, कराड, जावळी व पाटण तालुक्यात आढळतात. कोमटी तेलंगणातील मूळ रहिवासी असले तरी सातारा जिल्हयात केव्हा आले याबाबत माहिती नाही. कोमटयामध्ये पोटभेद नाहीत. ते वर्णाने काळे, मध्यम बांध्याचे असून त्यांची मातृभाषा तेलगु आहे. ते प्रामाणिकपणे, नीटनेटके कष्टाळू व सौम्य प्रवृत्तीचे लोक आहेत. त्यांच्या रूढी व धार्मिक विधी सोलापूर कोमटयासारख्या आहेत.

**कातकरी**

कातकरी हे जावळी, महाबळेश्वर, खंडाळा, वाई आणि पाटण या पश्चिमेकडील तालुक्यात आढळतात. पूर्वी यांच्या खैराच्या झाडांपासून 'काथ' तयार करण्याचा व्यवसाय होता. त्यांची व्यत्पत्ती रामाच्या वानरसेनेपासून झाली असे कातकरी सांगतात. ही जमात ढोर कातकरी व सोन कातकरी अशा दोन प्रमुख गटांत विभागली आहे. त्यांच्यात रोटीबेटी व्यवहार होत नाहीत. सोन कातकरी स्वतःला ढोर कातकऱ्यापेक्षा उच्च समजतात. कातकऱ्यामध्ये पवार, निकम, काटकर, गायकवाड, वाघमारे इत्यादी आडनावे आढळतात. एकाच कुळात किंवा देवकात विवाह होत नाहीत. विवाहपूर्व संबंध निषिद्ध असून अशा प्रकरणात दंड आकारतात. पूर्वी बालविवाह होत. अलीकडे उपवर मुलींचे विवाह करतात. वधूपित्यास वधूशुल्क देण्याची प्रथा यांच्यात आढळते. मुलीच्या घरासमोर मंडप उभारले जाऊन त्यात विवाहसोहळा पार पाडतात. हळद लावणे, घाना, मांडव घालणे, बाशिंग बांधणे व प्रत्यक्ष लग्न हे विधि करतात. जमातीतील सुखी वैवाहिक जीवन व धर्मशील असलेल्या कातकऱ्यास गोतर्णी म्हणतात. व या गोतर्णीद्वारेही विधी पार पाडतात. कातकऱ्यामध्ये विधवाविवाह करतात. घटस्फोटितेस पुनर्विवाह करण्याची मोकळीक आहे.

गरोदर स्त्रिला विशेष बंधने व विधी नसतात. ती बाळंत होईपर्यंत घरची सर्व कामे करीत असते. बहुधा झोपडीत तिचे बाळंतपण जमातीच्या सुईणीमार्फत करतात. बाळंतपणात पाच दिवस सुहेर पाळतात. कातकरी पुरूष रंगाने काळे, ठेंगणे, काटक व चपळ असतात. स्त्रिया मध्यम उंचीच्या सडपातळ काळसर असतात. ते संशयी व बुजरे असतात. कातकरी

पुरूष लंगोटी नेसतात व त्याचे एक टोक पायामधून मागे खोवतात व दुसरे डाव्या खांद्यावरून ओढून मागे कोवतात. अंगात चोळी घालतात. ते जंगलातील मध, कंदमुळे, फळे, गवत व जळाऊ लाकडाच्या मोळया विकतात. प्रत्येक वाडीचा एक नाईक किंवा पुढारी असतो. पुढारीपण वंशपरंपरेने चालते. हा नाईक त्यांच्या पंचायतीचा प्रमुख असतो. तो त्यांच्या समाजिक व धार्मिक प्रश्नांचा निवाडा देतो आणि अपराधाबद्दल दंडही करतो. कातकरी रानउंदीर, खार, ससे, मोर, मासे, कंदमुळे, नाचणी, वरी, भाकरी व भात खातात. सर्वपित्री अमावस्या व शिमग्याला तांदळाची खीर, वडे व काही गोडपदार्थ करतात. त्यांच्यात दारू पिण्याचे प्रमाण फार आढळते. धार्मिक विधीत सर्रास दारू पितात. कातकऱ्यांचे कुलदैवत वाघदेव आहे. त्याशिवाय ते म्हसोबा, वेताळ, जरमिरी इत्यादी देवतांना पुजतात. हे लोक पितरांना फार मानतात आणि भुताखेतांना फार भितात व भगताकडून अंगारे–धुपारे करून घेतात. कातकरी मृतांना पुरतात किंवा जाळतात.

**कोल्हाटी**

'कोल्हाटी' या जातिवाचक नवाची व्युत्पत्ती 'कोलांटी उडी मारणारे' अशी केली जाते. 'कोला' या संस्कृत शब्दाचा अर्थ डुक्कर(कोला+हाटी+कोल्हाटी) व हाती म्हणजे विकणारे किंवा व्यवसाय करणारे. ही जमात डुक्कर पाळणारी असल्यामुळे कोल्हाटी असा शब्द रूढ झाला असावा. तथापि, उडया मारणारी, दोरीवर कसरत करणारी अशी कोल्हाटी जमात आहे. ही भटकी जमात आहे. हे लोक टोळीने गावोगाव भटकत असतात. टोळीप्रमुखास 'नाईक' म्हणतात. भटकताना सोबत चटयांची झोपडी अथवा कपडयांचे पाल व एक खाट आणि इतर साहित्य गाढवाच्या पाठीवर लादून प्रवास करतात. पावसाळयात ते कमी पावसाच्या प्रदेशात मुक्काम करतात. मांस खातात व मद्यपान करतात. पुरूषांच्या अंगावर इतर वस्त्रांबरोबर चादर पांघरलेली असते. पुरूष कानात भीकबाळया व हातात कडे घालतात. बायकांचा पोशाख व दागिने मराठयाप्रमाणे असतो. कोल्हाटी मिश्र बोली बोलतात. त्यांच्या बोलीत गुजराथी व हिंदी शब्द आढळतात तथापि ही बोली मराठीप्रमाणेच असून ते विशिष्ट हेल काढून बोलतात. ही भटकी जमात असल्यामुळे वेगवेगळया भागातील व भाषेतील शब्द किंवा त्या शब्दांचा अपभ्रंश झालेले शब्द यांच्या बोलीभाषेत आढळतात. त्यांच्या बारा पोटजाती आहेत. कोल्हाटयाचे मूळ वस्तीस्थान बार्शी तालुक्यातील (सोलापूर जिल्हा) माणकेश्वर असल्याचे सांगतात.

निरनिराळ्या ठिकाणी स्थायिक झाल्यामुळे तसेच इतर जातींशी संपर्कात आल्यामुळे पोटजाती निर्माण झाल्या असाव्यात.[२४]

जिल्हयात जावळीकर, लाखे, कुडाळकर, नीळकंठ, म्होरकर, दांडेकर, घुमरे, औंधकर, पाटकर, बेबळकर, ताथवडकर आणि पडकर अशी कुळे आढळतात. यांच्यात विभक्त कुटुंबपद्धती आढळते. मुलांचे लग्न झाल्यावर तो वेगळे पाल करून वेगळा प्रपंच थाटतो. यांची पक्की घरे नसतातच. स्त्री बाळंतीण झाल्यावर तीन दिवसांनी 'तिकोटी' हा विधी करतात. त्या दिवशी नवजात बालकाचे आईवडील उपवास करतात. मुलाचे वडील बाजारातून खोबरे हळद, कुंकू, दातवण, कापूर, उदबत्ती, तूप, तांदूळ इत्यादी वस्तू खरेदी करून आणतात.

जातीतील सुवासिनी स्त्रिया त्या घरी येऊन सटवाई देवीला आणि मुलाला आंघोळ घालतात. आंघोळ घालण्याच्या या ठिकाणास 'आढी' म्हणतात. तेथे मुलाचा पिता पहारेने आढी(खोल खड्डा) तयार करतो. पाच दगड ठेवून सटवाईची पूजा करतात. उपस्थित सर्व सुवासिनी बाळंतिणीस व सटवाईस हळद, कुंकू लावतात. नंतर स्त्रियांना पानसुपारीचे विडे देऊन खोबरे वाटतात. मुलाचा वडील जातीच्या सर्व पंचांना घरी बोलवितो आणि सुपामध्ये पान, सुपारी, तंबाखू, विडया, आगपेटी ठेवतो. विडयांच्या पानात एकेक रूपया ठेवून उपस्थितांना वाटतात. जमलेले पैसे गोळा करून जातीसाठी तांदूळ किंवा ज्वारी विकत आणतात. त्याला 'गावाची भाकर' असे म्हणतात. त्याप्रसंगी डुक्कराचे मांस खातात व मद्यपान करतात. तिकोटीच्या रात्री काळ्या रंगाची कोंबडी देवीजवळ कापतात आणि नवरा–बायको मांसाहार करून उपवास सोडतात.

मुलाचा जन्म झाल्यानंतर नवव्या दिवशी 'पानवत्ता' विधी करतात. त्यावेळी बाळंतीण पाच सुवासिनी व लहान मुलमुली घेऊन नदी किंवा ओढयाकाठी गूळ–भाकरी खाण्यासाठी जाते. नदीकडे जाताना ती ज्वारीचे दाणे जमिनीवर टाकत असते. भूत व पिशाच्च बाधा होऊ नये यासाठी हा विधी करीत. बाळंतीण चरवीत पाणी बरून ती डोक्यावर घेते व सर्वजण घरी परतात. त्यादिवशी घरी पाळणा बांधतात व पाळणा नवीन कपडे घालतात. बाराव्या दिवशी बारसे करण्यापूर्वी कुलदेवतेला कौल लावतात. कौल अनुकूल मिळाल्यावर गूळ वाटून नाव ठेवतात.[२५]

विवाह जुळविण्यापूर्वी मुलाकडील लोक प्रथम पाहण्यास येतात. मुलीचा वडील आणि नात्यातील वडील माणसांच्या संमतीनंतर मुलाचा पिता आणि आप्तेष्ट एकत्र बसून पुढील वाटाघाटी करता. याप्रसंगी मांसाहारी जेवण व मद्य देतात. नंतर देवाकडे कौल मागतात. अनुकूल कौल मिळाल्यास त्या मुलाशीच लग्न ठरवितात. या विधीस 'ओळख' म्हणतात. मुलीच्या वडीलास 'नऊपाच' म्हणजे नऊ रूपये, अठरा रूपये किंवा सत्तावीस रूपये या प्रमाणात पैसे देतात. 'नऊपाच' दिल्यानंतर साखरपुडा झाला असे समजतात. त्याप्रसंगी मांस, तांदुळ, ज्वारी आणि मद्यपानाची मेजवानी केली जाते. विवाह सोहळा शक्यतोवर मुलीकडे पार पाडतात. पाहुण्यांच्या व्यवस्थेसाठी पाल बांधून 'टेकमेढीची' मेजवानी देतात.

दुसऱ्या दिवशी गावातील पंच अणि प्रतिष्ठित लोक एकत्र येऊन लग्नाचा दिवस ठरवितात. वधूवरासाठी दोन वेगवेगळी पाले उभी करतात आणि पालांसमोर दोन मंडप उभारतात. नवऱ्या मुलाचे मुंडन केल्यानंतर नातेवाईकांना 'अलुलकी' देतात. 'अलुलकी' म्हणजे एक प्रकारचा मानपान आहे. लग्नाची वेळ निश्चित झाल्यावर एक जोडपे देवक आणून मंडपात ठेवते. लोखंडी दिवा(पणती), करवत, आंबा व उंबराची पाने यांना देवक मानतात. सुवासिनींना बांगडया भरतात. प्रत्येकीस खोबऱ्याची वाटी देतात. नंतर सर्वजण मंडपात परत येतात. तेथे तांदूळ आणि मांसाची 'पंचाची रास' तयार केलेली असते. जातीच्या पंचाच्या हस्ते सर्वांना सिधा वाटून दिला जातो. प्रत्येक कुटुंब आपला सिधा घेऊन जातात व स्वयंपाक तयार करून पुन्हा लग्नविधीसाठी मंडपात येतात. यावेळी सहभोजन देत नाहीत. लग्नविधी सुरु झाल्यानंतर वर, पंच व वऱ्हाडीसह वधूमंडपी येतो. वराच्या डोक्यावर एक वस्तू धरलेले असते. सोबत करवली व करा असतो. स्त्रिया गाणी म्हणतात. वधूमंडपी वरपक्षाकडील वडीलधारी व्यक्ती देवकासमोर सर्वांच्या साक्षीने विडा ठेवतो. हा विधी झाल्यानंतर वर परत आपल्या मंडपाकडे जातो. त्यानंतर एका गोधडीवर गहू व तांदळाच्या पिठाचा चौक भरतात आणि हळदीला सुरूवात करतात. सर्व तयारी झाल्यानंतर वर वधूच्या मंडपात येतो. लाल रंगाची साडी व हिरवी चोळी परिधान केलेली वधू मंडपात येते. ब्राम्हण देवकांची पूजा करतो. त्यानंतर लग्न लागते. आहेर, देणग्या वगैरे दिल्या जातात. वराच्या मंडपापर्यंत वरात जाते. त्यावेळी स्त्रिया गाणी म्हणतात. काही लोक ढोलाच्या तालावर उडया मारतात. तर काही लोक कसरती करुन दाखवितात. वरवधूला उचलून घेऊन आपल्या पालापर्यंत पळत जातो. त्यावेळी वधूकडील

मंडळी त्याला अडविण्याचा प्रयत्न करतात. त्याप्रसंगी वराकडील लोक त्याला सावरतात. नंतर करमणुकीसाठी कसरतीचे खेळ करतात. जातीतील नर्तकीचे नृत्य होते. संपूर्ण रात्रभर नाचगाणी चालतात.

सकाळी नदीतून चार तांबे पाणी आणून ते वधूवराच्या सभोवती चार बाजूला ठेवतात. बाशिंग व मुंडावळया उतरविल्यानंतर वधूवरांना आंघोळ घालतात. त्यावेळी घास देणे, नाव घेणे, अंगठी शोधणे इत्यादी खेळ वधू–वर खेळतात. नाचगाण्याचा कार्यक्रम पुन्हा सुरू होतो. त्यानंतर पाहुणे मंडळी आपापल्या गावी परततात. या जमातीत घटस्फोट मान्य नाही. विधवा विवाहास मान्यता असून विधवेचे रूईच्या झाडाशी लग्न लावले जाते आणि पुन्हा तिचे वराशी लग्न लागते.

दसरा हा कोल्हाटयांचा प्रमुख सण आहे. बाहेरगावी गेलेले कोल्हाटी त्यादिवशी आपल्या घरी परत येतात. देवतांना पुजतात. आणि बकरा किंवा डुकराचा बळी देतात. हिंदुच्या सर्व देवदेवतांची पूजा करतात. कुलदैवत म्हणजे चांदीचे किंवा तांब्याचे टाक असून ते पेटाऱ्यात ठेवतात. मरीआई, मसोबा, काळूबाई, महिषासूर या देवतांची पूजा करतात. झोपडीच्या मागच्या व बाहेरच्या बाजूस झेंडे लावतात. झेंडयाना वेगवेगळी नावे असून ती भगवी अथवा पांढऱ्या रंगाची असतात. कौल लावण्यावर यांचा फार विश्वास आहे. कोल्हाटयांच्या प्रमुख बारा पोटजाती असुन प्रत्येक पोटजातीचा एकेक पंच जातपंचयतीत असते. बहुतेक तंटे जातपंचायतीतच सोडविले जातात. जातीच्या परंपरा मोडणाऱ्या व्यक्तीकडून पंचायत दंड वसूल करते. हुशार व सामाजिक कार्याची आवड असलेल्या व्यक्ती पंच म्हणून नेमतात. काही पंच वंशपरंपरागत असतात. या जमातीच्या प्रत्येक कुटुंबातील व्यक्ती तमाशात काम करतात. त्यासाठी मुलींना नाचगाणी शिकवतात. शिवाय शिंगाच्या फण्या व  लाकडी कलात्मक वस्तू तयार करणे आणि डुकरे पाळणे हेही व्यवसाय करतात. यांच्यात शिक्षणाचे प्रमाण फार अल्प आहे.

**गोसावी**

हे लोक शिवभक्त असून शिवाची अखंड पूजा करतात. यांच्यात थोडयाफार फरकाने साडेबारा पोटजाती आढळतात. शैव आणि वैष्णव असे दोन भेद असून त्यांच्या त्यांच्यात बावा,

गिरी गोसावी, भारती आणि बैरागी या पोटजाती आहेत. त्यांच्या पोटजातीत रोटीबेटी व्यवहार होतात.

मुलगा अथवा मुलीकडील लोक वर अथवा वधू शोधतात. मुलीकडे साखरपुडा होतो. का हिंदुधर्मीय समाज आहे. अगोदर मुलामुलीला मंडपात हळद लावतात. त्यानंतर देवक बसवितात. देवकात पानकणीस व त्या सोबत उंबराची डहाळी व कुऱ्हाडही ठेवतात. लग्नविधीत होमहवन, मंगलाष्टके इत्यादी सोपस्कार करतात. हुंडा देण्याघेण्याचा प्रघात नाही. लग्नाचा खर्च दोन्ही पक्ष विभागून घेतात. पूर्वी पाच दिवस लग्न चालत, हल्ली एका दिवसातच लग्न उरकले जाते. वर मारूतीच्या मंदिरात जातो. तेथे मंगळसूत्रातील मणी ओवतो. त्यास 'शिलांगण' म्हणतात. वर मारूतीच्या समोर बसतो. त्यावेळी त्याच्या मुठीत बिटक्या (कणकीचे गोळे) आणि कडुलिंबाचा पाला असतो. त्याच्या मुठीतील बिटक्या व पाला नातेवाईक काढतात. त्यावेळी ते उखाण्यासह नावे घेतात. कटयार लिंबूसह नवरदेवासमोर ठेवतात. ती नवरदेव वधूच्या मंडपात येतो. त्यावेळी वधूची आत्या वराच्या पायावर पाणी घालून ओवाळते. तेंव्हा वरपिता तिला साडीचोळी भेट देतो. अंतरपाट धरून मंगलाष्टके म्हणुन जंगम लग्न लावतो. वाशिंग बांधतात. सप्तपदी व होम होत नाही. रूखवताचे वेळी वरपिता साडीचोळी भेट देतो. नववधू गृहप्रवेश करते. दुसऱ्या दिवशी वधुवरास आंघोळ घालतात. त्यास 'गोपाळ पाळणा' विधी म्हणतात. हया कार्यक्रमाच्या वेळी दोन पाट जवळजवळ ठेवतात. त्याच्या चार बाजूंना पाण्याने भरलेले भांडे ठेवात. त्यावेळी जमलेल्या महिला वरवधूस आंघोळ घालतात. मुलीचे नाव बदलताना साखर वाटतात. सत्यनारायणाची पूजा व गोंधळ घालतात. यास 'सोळावा विधी' म्हणतात. विधवाविवाहास मान्यता आहे. विधूर पुरूष कुमारिकेशी विवाह करू शकतो. घटस्फोट(काडीमोड) होतात. परंतु त्यांचे प्रमाण अल्प अअहेत.

यांच्यात गरोदर स्त्रिची ओटी भरतात. डोहाळे पुरवितात. पाचवी, सटवीपूजा नाही, बारसे करतात. विटाळ पाळीत नाहीत. मुलाचा मामा जावळ काढतो. मुंज करीत नाहीत. महादेव, तुळजाभवानी, पालीचा खंडोबा ही कुलदैवत मानतात. नवस करतात पण बळी देत नाहीत पेरणी करताना महादेवाला बियाणे अर्पण करतात. त्याला 'बेर' म्हणतात. पूर्वजांची पूजा करतात. जाते व झाडू यांना देवक मानतात. पुरूषाचा पोशाख म्हणजे भगवी वस्त्रे, काखेत झोळी, डोक्याला मुंडासे, काठी असा असून ते बहुधा अनवाणी चालतात. भस्म लावून

रूद्राक्षाची माळ घालतात. यांची घरे दगडमातीची असतात. भिक्षा मागतात व मजुरीही करतात. तर काही लोक शेती करतात. साक्षरतेचे प्रमण कमी आहे. गोसाव्यांची जातपंचायत आहे. तिच्या प्रमुखास 'मुखिया' म्हणतात. यांच्यातील जाणते लोक पंच म्हणून निवडतात. भांडणतंटे, लग्नकार्ये, धार्मिक कार्याच्या वेळी पंचप्रमुखास आणि पंचाना मानपान मिळतो. हे लोक नवरात्र महोत्सव मोठया प्रमाणात साजरा करतात. मृतास दफन करतात भगव्या रंगाचे कपडे घालतात. झोळीमध्ये प्रेत झोपवून नेतात. त्यासोबत रोटा, लोटा, व काठी नेतात. वैष्णव असेल तर प्रेताच्या डोक्यावर तुळशीपत्र आणि शैव असेल तर बेलपत्र ठेवून बसलेल्या स्थितीत पुरतात. त्याखाली पीठ व कडधान्य ठेवतात. प्रेतासभोवती मीठ टाकतात. काही लोक समाधी बांधतात. मृत्यूनंतर बारा दिवसानंतर दहावा पाळतात.

**घडशी**

घडशी किंवा वांजत्री जिल्हयातील मोठया शहरात तसेच जिल्हयाच्या पूर्व भागात आढळतात. त्यांच्यात पोटजाती नाहीत किंवा इतर जातीशी त्यांचे संबंध नाहीत. ते वर्णाने काळे, मध्यम बांध्याचे आहेत. त्यांचा वंशपरंपरागत व्यवसाय वाजंत्र्याचा असून बरेच लोक शेतमजुरी व इतर कामे करुन उपजिवीका करतात. काही बहुरूप्यांची सोंगे घेऊन गावोगाव भटकतात. त्यांच्यात विधवा विवाहास व बहुपत्नीत्वास मान्यता आहे. ते सर्व स्थानिक देवदेवतांची तसेच बहिरोबा आणि खंडोबाची पूजा करतात. तसेच हिंदूप्रमाणे सण साजरे करतात. जन्म विवाह व मृत्यूप्रसंगी धर्मिक विधी ब्राम्हणाद्वारे करतात. त्यांच्यात सामाजिक व धार्मिक विधी मराठयांप्रमाणेच आहेत. त्यांची जातपंचायत असून त्यात सामाजिक तंटे सोडवितात.

**घिसाडी**

या लोकांचा लोखंडापासून लहानमोठया वस्तू तयार करण्याचा व्यवसाय आहे. बहुतेक लोक गावोगावी भटकून उपजिवीका करतात. तर काही शहरी भागात स्थायिक झालेले असून वेल्डिंगचा व्यवसाय करतात. बहुतेक लोक मराठी बोलतात. चौहान, पडवळ, साळुंखे, सुर्यवंशी, शेलार अशी आडनावे आहेत. यांची तलवार, चवरी, कुऱ्हाड ही देवके आसून समान देवक व आडनावे असलेल्यांची लग्ने होत नाहीत. मामेबहीण, आतेबहिण यांना विवाहासाठी प्राधान्य देतात. मुलीकडील लोक मुलगा शोधतात. मुलगी पसंत पडल्यावर 'सुपारी फोडणे' हा कार्यक्रम

होतो. पूर्वी त्यास 'मागणं' असे म्हणत असत. साखरपुडयाला 'रीत' म्हणतात. साखरपुडयात मुलीस साडी, ओटीचे सामान व पैंजण देतात तसेच आप्तेष्टांना भोज देतात. लग्न मुलीकडे होते. पूर्वी बोहले पद्धत होती. सध्या आढळत नाही. पुर्वी लग्न सात दिवस चालत असे. आता तीन दिवसांत आटोपतात. वधुवरास एकाच मंडपात हळद लावून स्नान घालतात. यांचा विवाहविधी मराठयांसारखाच असतो.

प्रसूतीच्या एक महिन्यापूर्वी नातेवाईक स्त्रिला घरी आणून ठेवतात. बाळंत झाल्यावर तिसऱ्या दिवशी जातीतील लोकांना घोंगडयावर बसवून सुंठवडा वाटतात. पाचवीला बकरे कापतात. सव्वा महिना सुहेर पाळतात.

प्रेतास जाळतात. खांदेकऱ्यांना पोशाख देतात. नातेवाईकाकडून बाराव्या दिवशी मृत व्यक्तीच्या कुटुंबियांना मांसाहारी जेवण देतात. त्यास' रोटा जेवण' म्हणतात.

हिंदुच्या देवदेवतांची व महाराणा प्रतापसिंग यांची पूजा करतात. घिसाडीवर महाराष्ट्रीयन संस्कृतीचा परिणाम झालेला असला तरी ते राजस्थानी परंपरा पूर्णपणे विसरलेले नाहीत. स्त्रिया साडया, चांदीचे दागिने, हातात चुडा, पायात चांदीचे कडे, कपाळावर चंद्रकोर कुंकू लावतात. स्त्रिया शरीरावर गोंदवून घेतात. पूर्वी पुरूष राजस्थानी कुडता, हातात चांदीचे कडे, गळयात ताईत, पायात राजस्थानी जोडा असा पेहराव करीत. सध्या मराठयांप्रमाणे पोशाख करतात. जातपंचायतीला फार महत्त्व असून तिचे निर्णय सर्वांना बंधनकारक असतात.

**नंदीवाले**

गावोगावी सतत भटकून ढोलाच्या ठेक्यावर व सनईच्या सुराच्या तालावर नाचून नंदीबैलांचा खेळ करून दाखविणारी ही जमात महाराष्ट्रात 'नंदीवाले' म्हणून परिचित आहे. ते तिरूमलैया व व्यंकटेशाचे भक्त आहेत. त्यामुळे ते तिरूमल या नावानेही ओळखले जातात. यांच्याकडे उंच व धडधाकट, मोठया शिंगाचे बैल असतात. 'पाऊस पडेल का' असे विचारल्यावर मान डोलावण्याचे आणि लहान मुलाच्या पोटावर चारही पाय अलगदपणे ठेवून उभे राहणयचे प्रशिक्षण या बैलांना दिलेले असते. यांची मातृभाषा तेलगु समान असून त्यांच्या भाषेत मराठी, हिंदी शब्दाचे मिश्रण आढळते. बैलांचा खेळ दाखविताना हे लोक वेगळया ढंगात मराठी बोलतात. व्यवहारात सांकेतिक भाषेचाही वापर करतात. जिल्हयात यांची पवार, भोंगारे, गुसालकर, पानकर, देशमुख, जाधव इत्यादी कुळे आहेत.

या कुळात आपापसात बेटी व्यवहार करतात. भाचीबरोबर लग्न करता येते. मुलाचे वडील मुलगी शोधतात. वराकडून वधूस वधूमुल्य दिले जाते. लग्नाचा सर्व खर्च नवरदेव करतो. साखरपुडयाच्या वेळी उपस्थितांना जेवण व दारूसाठी मुलगा खर्च करतो. जातपंचायतीसमोर मुलीस कुंकू लावले जाते. लग्न सोहळा तीन दिवस चालतो. पहिला दिवस देवकार्याचा असून त्या दिवशी देवाच्या नावाने बकरे कापून जातबांधवाना जेवण देतात. दुसऱ्या दिवशी लग्नाचा मुख्य विधी पार पडतो. लग्न ब्राम्हण लावतो. तेव्हा मात्र गोड जेवण देतात. सध्या एकाच दिवशी लग्न आटोपतात. केरसुणी व सूप या देवकांची पूजा करतात. मंडपात बोहले करतात. रूखवत असतो. लग्नानंतर वधूची ओटी भरली जाते.[२७]

नववधूच्या गृह प्रवेशानंतर सत्यनारायणाची पूजा करतात. एकापेक्षा अनेक लग्न करतात. पूर्वीपेक्षा घटस्फोटांचे प्रमाण कमी झाले आहे. गरोदरपणी डोहाळे जेवण करतात. सुहेर पाळीत नाहीत. बारसे करतात. तिरूपती बालाजी हे कुलदैवत असून त्याची नियमित पुजा करतात. तसेच वाईची मांढरदेवी, सावडर्याची देवी, कोल्हापूरची महालक्ष्मी या देवतांचीही पूजा करतात. देवीला कोंबडे व बकऱ्यास बळी देतात.

पूर्वी मृतदेह गोधडीत गुंडाळीत पुरत असत. सध्या हिंदूप्रमाणेच जाळतात. भाऊबंदामधील सर्व पुरूषांनी त्या प्रसंगी केस काढणे बंधनकारक असते. अस्थी विसर्जित करुन दहावा दिवस करतात.

या जमातीत आजही जातपंचायतीला महत्त्वाचे स्थान आहे. जमातीतील भांडणतंटे सोडविणे, महत्त्वाचे आर्थिक व्यवहार करणे, लग्नकार्ये किंवा व्यक्तीगत हितसंबंधाचे व्यवहारात लक्ष घालून न्यायनिवाडा करण्याची कामे पंचायत करते. पंचायतीच्या प्रमुखास ‘सरपंच’ किंवा ‘पाटील’ म्हणतात. पंचायतीचे परंपरेने चालत आलेले अलिखित नियम अजूनही पाळले जातात.

हे लोक अंधश्रद्धाळू असल्यामुळे वेळप्रसंगी देवाला साकडे घालतात. देवाच्या नावाने कोंबडे, बकरे कापतात. पुरूष भविष्यही सांगतात. यांच्या स्त्रिया कष्टाळू असून त्या गोधडया शिवतात आणि भिक्षा मागताना सुई, दाभण, बिब्बे, मोत्याचे मणी इत्यादी वस्तू विकतात. काही लोक स्थायिक झालेले आहेत. तरीपण बरीचशी कुटुंबे भटकी आहेत. नंदीवाल्याची ठरलेली किंवा हक्काची गावे असून वर्षातून एकदा तेथे जाऊन भिक्षेची वसुली करतात. अंगात अंगरखा

कमरेला झेल्यासारखे गुंडाळलेला पंचा डोक्याला लाल रंगाचा फेटा असा त्यांचा पोशाख असतो. ही भटकी जमात आहे.[२८]

**पाथरवट**

वर्णाने काळे व धडधाकट असतात. व मराठी बोलतात. ते कष्टाळू, अतिथ्यशील आहेत. दगड फोडण्याचे काम करीत असले तरी ते देव, प्राणी व मानवाच्या मूर्तीही तयार करतात. त्याशिवाय जाते, पाटे व वरवंटे इत्यादी तयार करतात. त्यांच्या बायका त्यांना कामात मदत करतात. ब्राम्हणासारखे सर्व देवदेवतांची पूजा अर्चा व उपवास करतात. भवानी, खंडोबा व विठोबा ही कुलदैवते आहेत. जन्म, मृत्यू व विवाहाच्या विधी पुरोहित पार पाडतो. ते भूतपिशाच्च, जादूटोणा, मंत्रतंत्र, शुभशकून इत्यादीवर विश्वास ठेवणारे व कौल लावणारे आहेत.

मुलाचा पिता मुलासाठी मुलगी शोधतो व अनुरूप असल्यास मुलामुलीचे वडील ज्योतिषाकडे जाऊन त्यांचे ग्रह जमल्यास लग्न पक्के करतात. मुलीचा वडील सधन असेल तर तिच्या लग्नाचा संपूर्ण खर्च करतो आणि गरीब असेल तर वधूमुल्य घेऊन लग्नासाठी होकार देतो दोन्हीकडून होकार मिळाल्यावर मुलाचा पिता एका शुभदिनी एकदोन मित्रांना घेऊन मुलीच्या घरी जातो. आणि हिरवी साडीचोळी व काही वेळा चांदीची साखळी तिला भेट देतो. मुलाचा पिता मुलीला कुंकू लावतो व तिच्या हातात नारळ देतो. मुलगी गृहदेवता, पाहुणेमंडळींना नमस्कार करते व मागणीचा विधी संपन्न होतो. गावजोशी अथवा ब्राम्हणाकडून लग्नासाठी शुभ तिथी ठरवून दिल्यानंतर मुला–मुलीच्या घरी मांडव तयार करतात. लग्नाच्या एकदोन दिवसापूर्वी कुऱ्हाड व पांचपालवी मांडवातील मुहूर्तमेढीला बांधतात. देवक प्रतिष्ठा करुन त्यांची पूजा करतात. नवरा नवरीला हळद लावल्यानंतर हळदीचे जेवण देतात व देवकार्ये करतात. इतर पद्धती मराठयांच्यासारख्याच असतात. पाथरवटाची जातपंचायत असून जातप्रमुखास म्हेत्रे म्हणतात व तो सामाजिक तंटे जातपंचायतीत सोडवतो. जातिबहिष्कृत व्यक्तीकडून ज्ञातिभोजनाचा दंड आकारून त्याला जातीत घेतले जाते.[२९]

**बुरूड**

बांबूकाम करणारे लोक म्हणजेच बुरूड होत; त्यांच्या पोटजाती नसून इतर जातींसोबत त्यांचे संबंध नाहीत. गावाच्या बाहेर झोपडयात राहतात. बांबूच्या टोपल्या, पंखे, पक्षीघरे,

मुलांचे पाळणे आणि इतर घरगुती वापराच्या बाबूंच्या वस्तू तयार करतात. मुलाचे नाव ठेवतांना नातेवाईकाना गूळ वाटतात

मुलगी वयात आल्यानंतर जातीतील स्त्रियांना जेवण देतात. बहुपत्नीत्व व विधवाविवाहाची प्रथा आहे. त्यांचे प्रमुख देव जोतिबा, विठोबा आणि खंडोबा असून ते पूर्वजपूजा करतात. त्यांच्या घरी त्यांच्या देवतांच्या प्रतिमा असतात. ते पंढरपूर व वाडी रत्नागिरीची यात्रा करतात. ब्राम्हण त्यांचा पुरोहित असतो. मुलाचे नाव व लग्नमुहूर्त ब्राम्हणाकडून काढतात. ब्राम्हणांसारखे सर्व व्रत व उपवास करतात.

**लोणारी**

लोणारी पुर्वी चुना करणे, जळाऊ लाकूड आणणे व कोळसे तयार करून विकण्याचा धंदा करीत. त्यांच्या नावावरून मूळ धंदा मीठ(लोण) तयार करण्याचा असावा. पूर्वी त्यांची पाटण तालुका वगळता जिल्हयात सर्वत्र वस्ती होती. आता ते प्रामुख्याने माण, फलटण, व सातारा तालुक्यात आढळतात. यांच्यात शिंदे, नरळे, काळे, कारंडे, कुंटे, गोडसे, खांडेकर, आटपाडकर, सांगोलकर, होळकर, शिप्परकर, गीते, धंगेकर, बाळ, पाशाणकर, थिटे, खिलारे, चवरे, धने, रंगाट, संसारकर व गळवे इत्यादी आडनावे आढळतात.

मृत्यू झाल्यावर प्रेतास पोशाख करून भिंतीला टेकवून पूर्वेला तोंड करून बसवितात. आंघोळ घालतात. प्रेताला तिरडीवर झोपवून, पूजा करून स्मशानात नेतात. प्रेताच्या तोंडात सोन्याचा मणी व तुळशीपत्र ठेवतात. अग्नी देतात. इतर विधी मराठयासारखेच करतात.

आता पूर्वीचा व्यवसाय न करता इतरही व्यवसाय करतात. हिंदूप्रमाणेच सर्व सण साजरे करतात. फलटणचा धुळाबा, भिवाई, खरसुडींचा नाथ, जतची यलम्मा, कोळेगावची लक्ष्मी, तरंगफळचा नाथ, खंडोबा, तुळजापूरची भवानी इत्यादी देवतांची पूजाअर्चा करतात. यांच्यात समान कुळात विवाह होत नाहीत. लग्नपद्धती सामान्यपणे मराठयांप्रमाणेच आहे.[३०]

**वडार**

या जातीमध्ये माती वडार आणि दगड वडार अशा पोटजाती आहेत. दोन्ही पोटजातीमध्ये रोटीव्यवहार होतो. मात्र बेटीव्यवहार होत नाही. वडार काळे, धडधाकट, कष्टाळू, अडाणी, अशिक्षित असतात. त्यांची पक्की घरे आढळत नाहीत. भटके असल्यामुळे जेथे काम मिळेल तेथे अस्थायी झोपडया बांधतात. दगड वडार हे दगड खाणून काढतात आणि दगड

फोडतात. ते जाते, पाटे, वरवंटे, उखळ किंवा तत्सम वस्तू तयार करत असत. माती वडार तलाव व विहिरी बांधण्याचे आण खोदण्याचे काम करतात. गाढवे पाळून गाढवावरून माती वाहून नेतात. ब्राम्हणाकडून मुलाचे नाव व लग्नतिथी काढतात. वडारात धोत्रे, जाधव, गुजाळ, पवार, रणसुरे ही प्रमुख कुळे आहेत. ही कुळे म्हणजेच आडनावे समजतात.

वडारांमध्ये समान आडनावात विवाह होत नाहीत. हुंडा पद्धती नसली तरी वरपित्याने वधूपिता लग्नखर्चासाठी काही रक्कम देण्याची परंपरागत पद्धत आहे. त्याचसोबत पोटझाकणी, आजेचीर आणि साखरपुडयाचे कपडे लग्नप्रसंगी द्यावे लागतात. किंबहुना कपडे दिल्याशिवाय लग्न लावले जात नाही. अशी उदाहरणे घडतात. भवानी, खंडोबा, लक्ष्मीबाई ही दैवते असून प्रमुख देवतेस दसऱ्याला बकरे, कोंबडे कापणे, नवस बोलणे, किंवा उपासतापास असे विधी करतात. वडारात जातपंचायतीचे महत्त्व अजूनही टिकून आहे. लग्न किंवा इतर सामाजिक कार्यात पंच आणि जातप्रमुखास मानपान देण्याची पारंपारिक पद्धत या जातीत आहे. जातपंचायतीचे नियम या जातीतील लोक अजूनही काटेकोरपणे पाळतात.[३१]

**मुसलमान**

मुसलमानांमध्ये व्यवसायानुसार तीस पोटभेद असून त्यांच्यातील नऊ पोटभेदामध्ये आपापसात बेटीव्यवहार होतो. ज्या मुसलमानांमध्ये बेटीव्यवहार होतात त्यांच्या दोन प्रकारात समावेश केला जातो. त्यापैकी एकात मुघल, पठाण, शेख, सय्यद, दुसऱ्यात अत्तार कलाईगार, महावत, मण्यार, नालबंद यांचा समावेश होतो. मुसलमानांच्या २१ स्वतंत्र पोटजातीमधील बोहरा, मेहमान व मुकरी हे व्यापारी असून गायकसाब हे कसाई आहेत. स्थानिक १७ पोटजातीतील बागवान(फळे विकणारे) किंवा तांबोळी पाने विकणारे अथवा दुकानदार आहेत. धावड लोहार काम करणारे, धोंडफोडे अथवा टकार बांधकामाचे दगड घडविणारे, गवंडी विटांचे बांधकाम करणारे, झारस(राख गाळणारे), बकर कसाब(मटण विकणार), मोमीन(विणकाम करणारे), पटवेगार(रेशीमकाम करणारे), पिंजारी(कापुस पिंजणारे), रंगारी( रंगकाम करणार), शिकलगार(हत्यारांना धार लावणारे) धोबी, हजाम आणि पखाली हे नोकरी करणारे तर नगारजी आणि गारूडी हे खेळ करून उपजिवीका करणारे आहेत. शहरात बोहोरा, मेहमान नीटनेटके राहत असून खेडयात बागवान, गवंडी, कसाब इत्यादी राहतात.

मुसलमानांच्या मुघल, पठाण, शेख, सय्यद  हे संख्येने जास्त असून जिल्हयात सर्वत्र आढळतात. शेख आणि पठाण हे मुस्लिम धर्म स्वीकारण्यापूर्वी स्थानिक उच्चकुलीन हिंदूधर्मीय असल्याचा त्यांचा समज आहे. सध्या अस्तित्त्वात असलेल्या पोटभेदापैकी काहींची मुळच्या अरब, पठाण, मुघल आणि हबशी पूर्वजापासून तर उर्वरित हिंदू लोकाबरोबरच्या संकरापासून व्युत्पत्ती झालेली आहे.

मुसलमान स्त्रिया हिंदू स्त्रियाप्रमाणे कपाळावर कुंकू लावत नाहीत. गळयात काळया मण्यांच्या पोतीत मंगळसूत्राऐवजी चंद्रकोर असलेला ‘लच’ नावाचा अलंकार घालतात. जुन्या पिढीचे धर्मातंरित मुसलमान दाढी राखतात. त्यामुळे ते स्थानिक हिंदूपेक्षावेगळे दिसतात. हे लोक घरात उर्दू भाषा तसेच बाहेर मराठी भाषा बोलतात. बोहरा, मोमीन मात्र घरी कच्छी व इतरांशी मराठी बोलतात. सर्व मुसलमान लोक मांसाहारी असले तरी त्यांच्या रोजच्या जेवणात मांस असतेच असे नाही. मांसाहार जास्त खर्चिक असल्याने तो आर्थिक परिस्थितीवरच अवलंबून असतो. कपडयाच्या बाबतीत आता खास वैशिष्टय राहिले नाही. तथापि संस्कृतीचा प्रभाव असलेल्या प्रमुख मुसलमान लोकांच्या अंगावर शेरवानी, पायजमा, चुडीदार, सलवार, लुंगी, शर्ट आणि डोक्यावर गोल टोपी हे कपडे दिसतात. विशेषतः नागरी भागात पैजामा, सलवार, लुंगी,शर्ट आणि ठराविक बांधणीची गोल टोपी हे पुरूषांचे कपडे जास्त प्रमाणात दिसतात. बोहारा पुरूष डोक्याला मोठे सैल पागोटे, उंची गोल टोपी, अंगात बंडी किंवा अंगरखा व सैल विजार घालतात. भारतीय मुसलमानांप्रमाणेच जिल्हयातील मुसलमान मोहरम, ईद–ए–मिलाद, मेराज शबेरात, रमजान ईद, बकरी ईद इत्यादी सण साजरे करतात. सणासुदीला अन्न, वस्त्र व पैश्याचा स्वरूपात दानधर्म करतात. हज यात्रा करणे हे जीवनातील एक परमपवित्र कर्तव्य समजतात. ज्यांची आर्थिक स्थिती चांगली आहे असे सर्वच मुसलमान हज यात्रेला जाण्याचा प्रयत्न करतात. सर्व मुसलमान दिवसातून नेमून दिलेल्या प्रार्थना म्हणतात(नमाज पढतात). त्यासाठी जिल्हयात बऱ्याच मशिदी बांधलेल्या आहेत जिल्हयात प्रामुख्याने सुन्नीपंथीय मुसलमान असून ते काझीस मानतात व मशिदीत प्रार्थना करतात.[३२]

मुलाचा जन्म झाल्यावर ४० दिवस सुहेर पाळतात. पाचव्या दिवशी छट्टी विधी करतात. संध्याकाळी बाळास नवीन वस्त्रे परिधान करून हातात व पायात चांदीचे दागिने घालतात. स्त्रिया एकत्र येतात व मुलास पाळण्यात घालतात व गाणी गातात. मुलाचे नाव ठेवणापूर्वी

चंदनाचा तुकडा एका रूमालात गुंडाळून एकेक स्त्री पाळण्यासभोवताली ओवाळून झाल्यानंतर एकमेकींच्या हातात सोपवितात. काझी जन्माच्या वेळची ग्रहांची स्थिती पाहून मुलाचे नाव काढतो. त्यानुसार मुलाचे नाव ठेवण्यात येते.

**इसामी रूढी :**

प्रत्येक मुसलमान आपल्या मुलाचा 'सुन्नत' नावाचा विधी करतो. मुलगा सात दिवसांचा झाला की सुन्नत किंवा सुंता(खत्ना) करतात. या दिवशी हा कार्यक्रम झाला नाही तर सातव्या किंवा बाराव्या वर्षापर्यंत करून घ्यावा असा संकेत आहे. हा विधी अपरिहार्य मानतात. पूर्वी सुन्नत समारंभ ३ ते ४ दिवस चालत असे. हल्ली हा विधी एका दिवसात उरकतात. त्याप्रसंगी इष्टमित्र आणि नातलगांना मेजवानी देतात.[३३]

**बिस्मिल्ला :**

मूल चार वर्षे व चार दिवसांचे झाले की त्याच्या शिक्षणाचा शुभारंभ म्हणून हा विधी करतात. मुलाला नवी कपडे घालून मशिदीत किंवा शाळेत नेतात. तेथे त्याला 'बिस्मिल्ला हिर्रहमानिर्रहिम' हे वाक्य म्हणावयस लावतात. कुराणातील काही मंत्रही म्हणवून घेतात. बिस्मिल्ला म्हणजे ईश्वराच्या नावाने कुराणातील प्रत्येक अध्यायाच्या सुरूवातीला हा शब्द असतो. कोणतेही नवे कार्य सुरु करताना प्रथम हे वरील वाक्य म्हणतात. हा विधी धार्मिक संस्कार नसून परंपरागत प्रथा आहे.

**निकाह :**

'निकाह' हा धार्मिक संस्कार नसून तो सामाजिक करात असतो. मुलाचा पिता प्रथम मुलीला मागणी घालतो. मागणीच्या वेळी वस्त्रालंकार, खाद्यपदार्थ इत्यादी पाठवितात. वर, वरपिता, वधूपिता, काझी व मौलाना एकत्रित बसून वरपित्याने वधूपित्याला मेहेर द्यावयाच्या हे ठरवितात. या मेहेरवर मुलीचा हक्क असतो. त्यानंतर लग्नाचा दिवस निश्चित करतात. मागणी घतल्यानंतर लग्न लगेच केले पाहिजे असे नाही. वधूपिताही आपल्या कुवतीनुसार यावेळी वरास अंगठी, रूमाल व इतर वस्त्रे देतो. परंपरेनुसार सर्वसाधारणपणे तीन दिवस लग्नविधी चालतो. परंतु अलीकडे एका दिवसात उरकतात. लग्नाच्या ठरलेल्या दिवसाअगोदर एका रात्री 'रज्जक' नावाचा समारंभ करतात. दुसऱ्या दिवशी एक विवाहित स्त्री वराच्या वस्त्रांना त्याला कळू न देता

हळद लावते. या विधीला 'चोर हळद' म्हणतात. यानंतर वधूवरांना हळद लावण्यात येते. याला 'सावहळद' म्हणतात नंतर मेजवानी होते. वधूवरांना आहेर करतात.

मुख्य लग्नविधी वधूच्या घरी होतो. वधूकडून मेहंदी, वस्त्रे, मिठाई व इतर वस्तू वराकडे पाठवतात. वराच्या हातापायास मेहंदी लावतात. थोडया वेळाने धुऊन टाकतात. वर मिरवणुकीने वधुकडे निघतो. वराला जामा घालून मंदिज बांधलेला असतो. आणि या सर्व पोशाखावर जाई–जुई, मोगरा वगैरे फुलांची आपदमस्तक जाळी घातलेली दिसते. यास 'सेहरा' म्हणतात. वधूच्या हातापायास मेहंदी लावतात. वराची मिरवणूक 'बारात' वधूगृही पाहोचल्यावर सर्वांचे स्वागत केले जाते. नंतर काझीला लग्नाची नोंद करण्याबद्दल सांगण्यात येते.

मुलीच्या बाजूकडून एक वकील व एक साक्षीदार (गवाह) व मुलाकडून फक्त एक साक्षीदार काझीपुढे जाहीर करतात की, या विवाहाला त्यांनी अनुमती दिलेली आहे. व त्याबद्दल पुरावा ऐकण्याला ते तयार आहेत. यापूर्वी साक्षीदारांनी वधूला भेटून तिला वराची सर्व माहिती व वय सांगून तिची त्याच्याबरोबर विवाहित होण्याबद्दलची राजीखुषी पडताळून पाहिलेली असावी लागते. वधूला काय म्हणायचे आहे हे ऐकल्यावर ते सर्व काझीसमोर व जमलेल्या निमंत्रितासमोर जाहीर करतात. काझी कुराणातील लग्नविषयक मंत्र(आयता) म्हणुन लग्न लावतात. कुराणातील लग्नविषयक कायदा काझी वाचून दाखवितो. हे झाल्यानंतर वधूवरांच्या पित्यांना समोरासमोर बसवून काझी त्यांचे हात एकमेकांच्या हाती देतो व विवाहाची नोंद करतो. नोंद झाल्यावर सर्वासमक्ष नवरा मुलगा जाहीर करतो की, नोंद केलेली रक्कम म्हणजे मेहेर देऊन मी वधूला माझी पत्नी म्हणून पसंत केली आहे. वधूपिताही जाहीर करतो की, वराला माझी मुलगी सर्व कायदेशीर विधी करून व ठरलेल्या रकमेला पत्नी म्हणून दिली आहे. यानंतर वर वधूपित्याला अलिंगन देतो. व सर्वाना अभिवादन करतो.

मेहंदी व हळद लावणे, वाजंत्री मिरवणूक काढणे, भेटवस्तू देणे यासारख्या गेष्टी करण्याचा कायदा नसून त्या परंपरागत चालत आलेल्या रूढी आहेत. वधूकडूनही काही वस्तू आंदण देतात. या सर्व गोष्टींची नोंद काझी दप्तरात करून ठेवतो. याचा लग्नविच्छेदाच्यावेळी उपयोग होतो. ज्याने लग्नविच्छेद केला त्याने दुसऱ्यास सर्व वस्तू द्यावयाच्या असतात. काही कुराणतील सहा कलमे म्हणजे पवित्र मंत्र वधूवराकडून म्हणवून घेतो. दप्तरात लग्न समारंभाची नोंद करतो. व त्यावर साक्षीदारांच्या सहया घेतो. या सर्व कार्यक्रमावेळी जनाना म्हणजे स्त्रिया

व वधू निराळया ठिकाणी पडद्याच्या आड बसतात. लग्नविधी पार पडल्यानंतर काही वेळाने वधूचा भाऊ वराला स्त्रियांच्या दालनात बोलावितो, तेथे एका मंचकावर वधूवरांना एकमेकाशेजारी बसवतात. व एकमेकाकडे पाहण्यास सांगतात. ती दोघे बसल्यावर सर्वांना साखर वाटतात. वधूवर एकमेकांचे चेहरे पाहतात. एकमेकांच्या पाठीवर हात ठेवून पाचवेळा अल्ला परवरदिगारला वंदन करतात. मग वधू घरात जाते. वर तेथेच वरातीची वेळ होईपर्यंत बसून राहतो. ऐपतीनुसार वरात काढली जाते. लग्नप्रसंगी मिठाई, सरबत इत्यादी ठेवतात. नंतर मांसाहारी जेवण करतात. 'तलाक' म्हणजे घटस्फोट ही कायदेशीर बाब आहे. परंतु ईश्वराला तो पसंत नाही असा समज आहे.[३४]

मुस्लिम अंत्यसंस्कार करतेवेळी मरणोन्मुख व्यक्तीच्या तोंडात सरबत किंवा मक्केच्या पवित्र विहिरीचे पाणी घालतात. मरताना अल्लाचे नाव घेण्याची प्रवृत्ती आहे. कुराणातील वचनेही त्यावेळी म्हणतात. प्राण गेल्यावर मृतदेहाचे तोंड, डोळे बंद करतात व हातपाय सरळ करतात. मृतदेहास प्रथम गरम केलेल्या पाण्याने आंघोळ घालतात. शरीरास कापूर, चंदन इत्यादी सुंगधी द्रव्ये लावतात. 'अल्ला हा एकमेव देव आहे व मुहम्मद त्याचा प्रेषित आहे.' असे मौलाना त्या प्रेताच्या छातीवर व कपाळावर लिहितो. सर्व सांध्याच्या जागी कापराचे तुकडे ठेवतात. यानंतर मृतास कफन म्हणजे शुभ्र वस्त्र गुंडाळतात. आंघोळीच्या वेळी कुराणातील काही 'दुआ' म्हणतात.

प्रेतास पुष्पमाला घालून बाजेवर किंवा शवपेटीत (जनाझा) ठेवून कबरस्थानात नेतात. जाताना 'कलम–इ–शहादत'चा घोष सारखा चालू असतो. कुराणातील काही दुआ म्हणतात. प्रेतयात्रेस फक्त पुरूषच जातात. प्रेताला खंदे देणे पवित्र समजतात. म्हणून जाताना खांदेकरी बदलतात. प्रथम इदगाहजवळ प्रेत ठेवतात व तेथे प्रार्थना करतात. नंतर कबरीत मृतांचे तोंड मक्केकडे करून ठेवून प्रेतावर सर्वजण माती टाकतात. त्यावेळी 'तू मातीतून निर्माण झाला आहेस, मातीतच मिळून जात आहेस व अंतिम निवाडयाच्या दिवशी तुला मातीतूनच उठविण्यात येईल.' अशा अर्थाचा आयता (मंत्र) म्हणतात. दफन करताना सुरा–ए–यासीन व सुरा–ए–तबारक हे कुराणातील मंत्र म्हणतात. खड्डा बुजवल्यावर सर्वजण चाळीस पावले मागे जाऊन अल्लची प्रार्थनांना 'खातमा' असे म्हणतात. मृताचे घरी तीन दिवस स्वयंपाक करीत

नाहीत. घरातील लोकांना नातेवाईक जेवण आणून देतात. दफनानंतर मुल्ला, मौलवी, कुराण वाचतात. तिसऱ्या दिवशी सकाळी जिरायत नावाचा विधी मृताच्या घरी करतात.[३५]

### सातारमधील सेवाभावी संस्था

शिक्षण लोककल्याण व इतर क्षेत्रात सेवाभावी वृत्तीने कार्यरत असलेल्या अनेक संस्था जिल्हयात आहेत. त्यामध्ये १८६० च्या सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्ट खालील नोंदणीकृत संस्थांचा समावेश होतो. स्वातंत्र्योत्तर काळात अशा संस्थांचे नियमन १८६० च्या अधिनियमाखेरीज १९५० च्या बॉम्बे पब्लीक ट्रस्ट अधिनियमाखाली केले जाते. यासाठी साताऱ्यास सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालयाचा उप–विभाग असून त्यावर सहाय्यक धर्मादाय आयुक्तांची नेमणूक केलेली आहे. जून १९५८ पर्यत सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, कोल्हापूर विभाग यात सातारा जिल्हयातील सेक्शन ए, बी, सी, डी, इ व एफ[३६] याखाली अनुक्रमे असे एकूण १,४२२ न्यास नोंदणी केलेले होते. सप्टेंबर १९८९ अखेर सातारा उपविभागात एकूण ४,२७६ नोंदणी झालेले न्यास (ट्रस्ट) होते. पुढील विवरणपत्रात १९६१ ते १९९४ पर्यत नोंदणी झालेल्या धर्मादाय संस्थांची आकडेवारी दिलेली आहे.[३७]

| विभाग | १९६१ | १९७१ | १९८१ | १९९१ | १९९३–९४ |
|---|---|---|---|---|---|
| अ | १,४७० | १,७६७ | १,९१३ | २, ०७७ | २,१०८ |
| ब | १६४ | १९४ | २०७ | २३२ | २४७ |
| ख | २ | २ | २ | २ | २ |
| ड | ४ | २ | ३ | ३ | ३ |
| इ | ११७ | २६८ | ३४४ | ४४१ | ४९३ |
| फ | ४३ | १०७ | ४९० | १८६४ | ३११८ |
| एकूण | १८०० | २३४० | २९५९ | ४६१९ | ५९७१ |

## वृत्तपत्रे

स्वातंत्र्यपूर्व काळात जिल्हयातील वृत्तपत्र परंपरा ही स्वराज्याच्या ध्यासातून निर्माण झाली. त्यादृष्टिने १० डिसेंबर १८५८ रोजी रामचंद्र आप्पाजी पितळे यांच्या शुभसूचक या पत्राने जिल्हयात प्रथम वृत्तपत्रांचा श्रीगणेशा केला. वस्तुतः यापूर्वीही जिल्हयात बोधामृत व शुभचिंतक ही वृत्तपत्रे निघाल्याचा उल्लेख आढळतो. त्यापैकी बोधामृतच उल्लेख ज्ञानोदयमध्ये आढळतो. मात्र शुभचिंतकची उल्लेखापलिकडे माहिती उपलब्ध नाही. म्हणून शूभसूचक कडेच आद्य पत्राचा मान जातो. 'शूभसूचक' सातार्‍यातील यादवपेठेत शिळा प्रेसवर छापले जाई त्यास १८९५ पर्यत जिल्हयाचे प्रातिनिधीक पत्र म्हणून निर्विवाद प्रतिष्ठा लाभली होती.[३८]

या वृत्तपत्रामध्ये महत्त्वाची वृत्तपत्रे म्हणजे भाऊसाहेब सोमण यांचे प्रकाश व रा.रा.काळे यांचे ऐक्य ही होय. भाऊसाहेब सोमण हे लो.टिळकांच्या राजकीय चतुःसूत्रीचे उपासक व काँग्रेसचे अनुयायी. त्यामुळे त्यांच्या प्रकाशवर सरकारची करडी नजर असे. भाऊसाहेब सोमण यांच्या कर्तृत्वाने या पत्रास प्रतिष्ठा प्राप्त झाली होती. इस्लामपूरच्या विष्णुपंत आठल्ये यांच्या प्रेषितचे लेख प्रकाशमध्ये छापल्याबद्दल भाऊसाहेबांच्यावर खटला भरला होता. रावबहाद्दूर रा.रा.काळे यांच्या ऐक्यचे प्रथम संपादक नरहर गंगाधर जोशी हे होते. स्वपक्षियांच्या दोषांवर आवरण व परपक्षियांच्या गुणांवर पांघरून न घालणारे आणि सरकार व परपक्ष यांच्यावर सडेतोड टिका करणारे म्हणून ऐक्य वृत्तपत्राची पूर्वी प्रसिद्धी होती. प्रागतिकांना स्वार्थत्यागाचे आणि पराक्रमाचे धडे देणारे पत्र अशीही याची किर्ती होती. याचे संपादकपद पुढे चं.ह.पळणिटकर यांनी दिर्घकाळ सांभाळले. या पत्राने सातारा जिल्हा व नजीकच्या प्रदेशात लोकप्रियता मिळविली. सध्या ऐक्य हे पत्र दैनिक स्वरूपात सुरू आहे. यानंतरच्या काळात नरहर वामन लिमये संपादित प्रकाश(१९४८), वा. ज़ि. शहांचे साप्ताहिक आदेश (१९५३), ब.भ.पेटकरांचे फलटण–जनसेवा(१९५८) बाळ आंबेडकरांचे जिव्हाळा(सातारा–१९६९) ज्ञानेश्वर जराड यांचे आक्रोश(१९७१), दिलीपकुमार इतराज यांचे पाक्षिक संक्रमण(फलटण–१९७६), पोलीस पाटील(१९८४), कृष्णा एक्सप्रेस (१९९२), गंधवार्ता(१९९४) ही दैनिके, ऐक्य (१९२३), समर्थ(१९२७), ग्रामोद्धार (१९४५), आदेश(१९५९), जिव्हाळा (१९७०), कोयनातीर(१९८०), धनसंतोष (१९८७), कोयनाकृपा, शिवसंदेश (१९६४), पोलीस पाटील(१९७२), लोकजागर(१९८३), गंधवार्ता(१९८६), शिखरशिंगणापूर (१९९०) व एकता

दर्शन(१९९३), ही साप्ताहिके तर ग्रामोद्धार (१९३५) व लोकजागर(१९००) ही पाक्षिके आणि धनसंतोष व बंद दरवाजा ही मासिके प्रकाशित होतात.[35] सन १९५० मध्ये जिल्हयात २२, १९६० मध्ये ४९, तर १९९३-९४ मध्ये २८८ मुद्रणालये होती.

**ग्रंथालये**

सातार्‍यास छ.प्रतापसिंह महाराजांनी स्वतःचे नेटिव्ह जनरल लायब्ररी नामक ग्रंथालय सुरू केले. पुढे १८४९ मध्ये श्रीमंत अप्पासाहेबांच्या पत्नी राणी सगुणाबाई यांनी ते जनतेच्या स्वाधीन केले. सन १८५२ मध्ये सातारा शहरात 'सातारा सिटी लायब्ररी ' व 'सातारा स्टेशन लायब्ररी' अशी दोन ग्रंथालये होती. ती उपरोक्त संस्थेत १८६६ मध्ये विलीन झाल्यावर संस्थेच नाव 'सिटी जनरल लायब्ररी असे झाले. सन १९०५ मध्ये वाचनालयाची नवीन इमारत झाल्यावर त्याचे नाव 'व्हिक्टोरिया लायब्ररी' ठेवण्यात आले. सन १९३८ च्या डिसेंबर मध्ये पुन्हा ही नाव बदलून ते 'नगर वाचनालय' असे ठेवण्यात आले. सन १९९५-९६ मध्ये पुन्हा हे बदलून ते 'नगर वाचनालय' असे ठेवण्यात आले. सन १९९५-९६ मध्ये या वाचनालयात मराठी, हिंदी व इंग्रजी भाषांची मिळून एकूण १८ दैनिके, २९ साप्ताहिके नऊ पाक्षिके, ७८ मासिके व एक संस्कृत त्रैमासिक वाचकांसाठी ठेवण्यात येई. या ग्रंथालयात त्या वर्षी विविध विषयावरील ३९,६९६ ग्रंथ होते. वाचनालयाच्या साखळी योजनेमार्फत जिल्हयातील तालुका व इतर ग्रामीण ग्रंथालयांना ग्रंथ वाचनासाठी दिले जातात. सध्या या योजनेचा लाभ १६ ग्रंथालये घेत आहेत. या ग्रंथालयाची सदस्य संख्या १,२३३ आहे. हे जिल्हयातील सर्वात जुने व मोठे वाचनालय असून यास जिल्हा ग्रंथालयाचा दर्जा प्राप्त झालेला आहे. सन १८५७ मध्ये कराड येथे नगरपालिका नगर वाचनालय स्थापन झाले. महाराष्ट्र शासनाने ग्रंथालय विधेयक मांडल्याने सन १९६७ मध्ये राज्यात ग्रंथालय कायदा प्रथमच पास झाला. सन १९७१ पासून नवीन अनुदान संहिता अस्तित्त्वात आल्यावर या वाचनालयास 'अ' वर्ग दर्जा प्राप्त झाला.

सन १९९३-९४ मध्ये या वाचनालयात ३४,८७२ ग्रंथ, ३४ दैनिके, ३२ साप्ताहिके, आठ पाक्षिके व १९५ मासिके उपलब्ध हेती. हे वाचनालय यशवंतराव चव्हाण स्मृतिसदन, कराड या सांस्कृतिक केंद्राचा एक प्रमुख विभाग असून त्यास दरवर्षी ६४,०००रूपये शासकीय अनुदान मिळते. कै.वेणुताई चव्हाण स्मारकातही यशवंतरावांचा जीवनपट, विविध विषयांना स्पर्श करणारी त्यांची ग्रंथसंपदा, पत्रव्यवहार, भाषणांच्या ध्वनिफिती यांचा समावेश असलेले

एक संपन्न ग्रंथालय आहे. या ग्रंथालयात सर्व विषयावरील पुस्तके आणि असंख्य दुर्मिळ इंग्रजी, हिंदी व मराठी पुस्तके आहेत. जिल्हयात सध्या सुरू असलेल्या ग्रंथालयामध्ये महत्त्वाचे म्हणून लोकमान्य टिळक स्मारक सम्स्था संचलित लोकमान्य टिळक ग्रंथसंग्रहालय वाई, या ग्रंथालयाची स्थापना १९२९ मध्ये झाली.

लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख यांनी वाई येथे १८५२ च्या सुमारास नेटिव्ह जनरल लायब्ररीची स्थापना केली होती. तर वाईतील काही कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन 'वाई ग्रंथसंग्रहालय'नावाची संस्था १९११ साली सुरू केली. लोकमान्य टिळकांच्या निधनानंतर वाई येथेच या कार्यकर्त्यांनी लोकमान्य टिळक स्मारक संस्थेची स्थापना करून वाई ग्रंथसंग्रहालय व नेटिव्ह जरनरल लायब्ररी या दोन्ही संस्था लोकमान्य टिळक स्मारक संस्थेत विलीन केल्या. सन १९९३–९४ अखेर या ग्रंथालयात एकूण २६,००८ विविध भाषांची पुस्तके होती. त्याशिवाय २३ दैनिके, २८ साप्ताहिके, १८ पाक्षिके व ५४ मासिके उपलब्ध होती. या ग्रंथालयास तालुका वाचनालयाचा दर्जा असून दरसाल ३२ हजार रूपये शासकीय अनुदान मिळते.

या व्यतिरिक्त जिल्हयात २५ हजाराच्यावर ग्रंथसंपदा असलेले श्री भैरवनाथ सरकारमान्य मोफत वाचनालय, कोरेगाव, महात्मा गांधी वाचन मंदिर, उंब्रज, सरकारमान्य विद्यार्थी वाचनालय, पाचगणी, अरूणोदय वाचनालय, ओगलेवाडी, नेहरू वाचनालय, मायणी इत्यादी महत्त्वाची वाचनालये आहेत. सन १९६१–६२ मध्ये जिल्हयात सरकारी मान्यता असलेल्या १८ ग्रंथालयांपैकी एक जिल्हा ग्रंथालय, नऊ तालुका ग्रंथालये व आठ शहर ग्रंथालये होती. खालील विवरणपत्रात जिल्हयातील १९९३–९४ ची तालुकावार वाचनालयाची आकडेवारी व दर्जा दर्शविला आहे.[३९]

| वाचनालयाचा दर्जा | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| तालुका | अ | ब | क | ड | एकूण |
| सातारा | १ जि.वा. | | २ | ९ | १२ |
| कराड | १ ता. वा. | | ९ | १३ | २४ |
| कोरेगाव | | १ ता. वा.२ | | १७ | २० |
| खटाव | | १ ता. वा. | २ | १५ | १८ |
| खंडाळा | | १ ता. वा. | ३ | १८ | २२ |
| जावळी | | | १ ता. वा. | ७ | ८ |
| पाटण | | १ ता. वा.१ | १ | १३ | १६ |
| फलटण | | १ ता. वा. | ३ | २ | ६ |
| महाबळेश्वर | | १ ता. वा. | १ | | २ |
| माण | | | १ ता. वा. | ४ | ६ |
| | | | अ १ | | |
| वाई | १ ता. वा. | | १६ | १९ | ३६ |

ता.वा.= तालुका वाचनालय, जि.वा.= जिल्हा वाचनालय

**लोकसंख्या**

सन १९९१ च्या जनगणनेनुसार जिल्हयाची एकूण लोकसंख्या २४,५१,३७२ असून राज्यातील ३.११ टक्के लोक येथे वास्तव्य करतात. लोकसंख्येनुसार जिल्हयाचा राज्यात अकरावा क्रमांक लागत होता. इ.स.१९५१ पासून लोकसंख्या व प्रत्येक दशकातील वाढीचे प्रमाण खाली दिले आहे.[४०]

| वर्ष | लोकसंख्या | दशकातील फरक | दशकातील फरकाचे प्रमाण |
|---|---|---|---|
| १९५१ | ११,७७,०१६ | १,६३,८०४ | १६.१७ |
| १९६१ | १४,३०,१०५ | २,५३,०८९ | २१.५० |
| १९७१ | १७,२७,३७६ | २,९७,२७१ | २०.७९ |
| १९८१ | २०,३८,६७७ | ३,११,३०१ | १८.०२ |
| १९९१ | २४,५१,३७२ | ४,१२,६९५ | २४.२४ |

१९५१–६१ या दशकामध्ये २१.५ टक्के एवढया मोठया प्रमाणात वाढ झालेली आहे. लोकसंख्या वाढीचे हे प्रमाण राज्य सरासरीपेक्षा कमी असले तरी त्या प्रमाणात लोकसंख्या वाढते आहे. सन १९५१–६१ या दशकात लोकसंख्येचे प्रमाण सर्वाधिक सर्वाधिक वाढण्याचे कारण म्हणजे १९५० पासून साथीचे रोग व इतर रोग यावर प्रतिबंध उपाययोजना करण्यात आली हे होय. जिल्हयात तत्पूर्वी हिवतापाचा प्रादुर्भाव नेहमी होत असे. तो काबुत आणला गेला. काही प्रमाणात बी.सी.जी आणि देवी प्रतिबंधक लस टोचण्याच्या सामुहिक मोहिमामुळे देखील मृत्यू दर घटला. तथापि जनन प्रमाण मुळीच वाढले नसतानासुद्धा लोकसंख्या वाढीच्या प्रमाणात सुधारणा झाली. जिल्हयातील वाढीचे प्रमाण महाराष्ट्रातील सरासरीपेक्षा नेहमी कमी दिसते. याचे कारण म्हणजे येथील लोकांनी मुंबईला केलेले स्थलांतर होय. वाई, सातारा, जावळी, व पाटण या तालुक्यांतून जिल्हयाबाहेर जाणाऱ्यांची संख्या अधिक आहे. जिल्हा आणि राज्याच्या लोकसंख्येची १९५१–६१ पासूनची निव्वळ प्रतिशत वाढ खाली दिलेली आहे.[४१]

| वर्ष | सातारा जिल्हा | महाराष्ट्र |
|---|---|---|
| १९५१–६१ | २१.५० | २३.६० |
| १९६१–७१ . | २०.७९ | २७.४५ |
| १९७१–८१ | १८.०२ | २४.५४ |
| १९८१–९१ | २०.२४ | २५.७३ |

**लोकसंख्येची घनता–**

सन १९८१ मध्ये कराड तालुक्यात दर चौ.कि.मी. ला ३५८ माणसे तर माण तालुक्यात १०१ माणसे याप्रमाणे लोकसंख्या घनतेत फरक दिसून येतो. हा फरक त्या–त्या तालुक्याची भौगोलिक रचना व जमिनीचा वापर यांना अनुरूप असाच आहे. मध्यविभागात कृष्णा नदीकाठचा सुपीक प्रदेश असून प्रत्यक्ष पिकांखालील क्षेत्र अधिक असल्याने तेथे उद्योगधंद्यांची वाढ झाली आहे आणि या भागातच लोकसंख्येची घनता सर्वाधिक आहे. मध्य विभागाच्या दोन्ही बाजूस घनता कमी आहे. मात्र माण तालुक्यातील निकस जमीन व वारंवार उद्भवणाऱ्या दुष्काळी परिस्थितीमुळे तालुक्याच्या पूर्व भागातील लोकसंख्या विरळ आहे. वाई, कोरेगाव, सातारा आणि कराड हया तालुक्यांनी जिल्हयाचे फक्त १/३ क्षेत्र व्यापले असून देखील जिल्हयातील जवळजवळ निम्म्यापेक्षा जास्त लोकसंख्या त्यात समाविष्ट आहे.

**धर्मनिहाय लोकसंख्या**

जिल्हयात १९०१ मध्ये हिंदूचे प्रमाण ९४.१९ टक्के होते ते १९६१ मध्ये ८९.११ टक्क्यापर्यत घटले आणि १९८१ मध्ये हे प्रमाण ९८.९८ टक्क्यापर्यत किंचित वाढलेले दिसते. हिंदूच्या प्रमाणात जेवढी घट झाली तेवढीच साधारणपणे बौद्धधर्मियांच्या टक्केवारीत वाढ झाली आहे. बौद्धधर्मियांच्या प्रमाणात जी वाढ झाली आहे. ती पूर्वीच्या हिंदू महार लोकांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केल्यामुळे झाली. याचा पडताळ हिंदूमधील अनुसूचित जातींच्या प्रमाणात जी घट झाली त्यावरून येतो. १९०१ ते १९८१ या कालावधीत इस्लाम धर्माच्या प्रमाणात किंचीत वाढ झाल्याचे दिसून येते.

सन १९८१ च्या जनगणना वर्षात जिल्हयातील लोकसंख्येपैकी ९८.९८ टक्के लोक हिंदू होते. हिंदूचे प्रमाण नागरी क्षेत्रापेक्षा ग्रामीण क्षेत्रात अधिक होतील. बौद्धधर्मिय शहरांपेक्षा खेडयात जास्त आढळतात. जैनांचे प्रमाण नागरी भागात जास्त होते. ग्रामीण भागात हिंदू, बौद्ध यांचे प्रमाण सर्वाधिक होते. तर ख्रिश्चनांचे प्रमाण नागरी भागात जास्त होते. या वर्षात धर्मनिहाय स्त्री–पुरूषय गुणोत्तरप्रमाण पुढीलप्रमाणे होते. –बौद्ध– १,०९०, ख्रिश्चन – ९३४, हिंदु– १,०६६, जैन– ९३४, मुसलमान ९५९ आणि शीख ७०० होते.[४२]

## घरे

घरे पुढीलप्रमाणे चार उपप्रकारात विभागली होती. १. भाजलेल्या विटांच्या भिंती २. कौलारू छप्परांची, कौलारू अथवा गवत, ३. कामटयांचे विणलेले छप्पर आणि कच्च्या विटा अथवा मातीच्या भिंतीची गवत, कामटयाचे छप्पर आणि गवताचे चिखल थापलेल्या भिंतीची आणि मातीचे छप्पर ४. कच्च्या विटांच्या भिंतीच्या(धाबे) भटक्या जातींची घरे दोन प्रकारची असून त्यांचे प्रकार पुढीलप्रमाणे– १. जाडयाभरडया कापडाचे लहान तंबू अथवा पाल २. बांबूच्या कामटयापासून धवा ताडामाडांच्या झावळयापासून विणलेल्या झोपडया तसेच पावसाळयात त्यांना पावसापासून बचावासाठी गवत व काठयांचा आडोसा बांधून मुक्काम करावा लागत असे. चांगला प्रतीची घरे शहरात व मोठया खेडयात आढळत. ही घरे दुमजली व अनेक खोल्या असत. त्यात चौक, ओटा, पडवी, स्वयंपाकघर, स्नानगृह, कोठीघर, शयनगृह, अतिथीगृह अशा सर्व सोयी असत. स्वातंत्र्यपूर्वकाळात सरदार, जहागीरदार व इनामदार लोकांचे वाडे दुमजली, चौक असलेले, कौलारू आणि भाजलेल्या विटांचे अथवा दगडी भिंतीचे असत. गुरांकरिता मागील बाजूस गोठा असे. मागील परसात फुलझाडे असत. घरासमोर तुलसी वृंदावन असे. मोठा दिंडी दरवाजा व देवडी अशी रचना असे. सध्या अशा वाडयातही नव्या जमान्याला साजेशा सुधारणा झाल्या आहेत.

शहरातील नवीन घरे मुख्यतः सिमेंट कॉंक्रीटची बंगलेवजा आणि बहुमजली आढळतात. त्यात लाकूड शक्य तेवढे कमी वापरले जाते. ही सर्व घरे सर्व सोयीनी युक्त असून त्यांच्या पुढेमागे मोकळी जागा फार असत नाही. नगर रचना कायद्यातील नियमांना अनुसरून घरे बांधली जातात. खेडयातील शेतकऱ्यांची घरे बैठी दगडी व कच्च्या विटांची दोन खोल्यांची कौलारू किंवा धाब्याची असतात. जास्त पाऊस पडणाऱ्या पश्चिमेकडील डोंगराळ भागातील

गरीब शेतमजुरांची अथवा मागास मातीच्या लोकांची घरे साधारणतः एकच खोली असलेल्या झोपडया असतात. त्यांच्या भिंती बांबूच्या कामटया अथवा निरगुडीच्या किंवा तत्सम इतर काठयांवर चिखल थापूरा केलेल्या असतात. पूर्वेकडील भागात सपाट छताची तसेच कौलारू घरे आढळतात. जुन्या घरांच्या बांधकामात घडीव दगडांचा उपयोग केलेला दिसतो.

**दागदागिने**

ग्रामीण व नागरी भागातील लोकांच्या दागिन्यात विविधता आढळते. जातीपरत्वेही त्यात फरक आढळतो. पुरूष, स्त्रिया, मुले व मुली यांचेही दागदागिने भिन्न असतात. नागरी स्त्रिया सोन्याचे विविध प्रकारचे ठसठसीत दागिने घालतात. पायात वापरण्याचे तोडे, साखळया इत्यादी चांदीच्या असतात. ग्रामीण भागात गरीब लोक चांदी, तांबे पितळ इत्यादीचे दागिने तसेच काचेचेमणी वापरतात. हल्ली नकली दागिने सर्वत्र मोठया प्रमाणात वापरतात. आधुनिक काळात पुरूषांमध्ये दागिने वापराचे प्रमाण फार कमी झाल्याचे दिसते. तथापि परंपरावादी सुखवस्तू लोक अद्यापि भिकबाळी, पोची, गोफ किंवा कंठा वापरताना आढळतात. मात्र अनेक लोकांच्या हातात अंगठया असतात. लहान मुलांचे करगोटे, कडया सोने अथवा चांदीचे असतात.

स्त्रियांच्या दागिन्यांच्या प्रकारातही हल्ली बराच फरक झाल्याचे दिसते. एकेकाळी केसात मूद, अग्रफूल, केतकी, केवडा, गुलाबाचे फूल, वेणी, राखडी, बिंदी विजोर, चंद्र सूर्य नागगोंडे व गोंडे फले वगैरे सोन्यचे अलंकार घालीत परंतु आता थोडयाफार स्त्रिया हे दागिने वापरताना दिसतात. कानात चौकडी व कुडया मोत्याच्या घालतात. दागिन्याचे नवनवे प्रकारही येत आहेत. गळयात मंगळसूत्र नाही अशी विवाहीत हिंदू स्त्री आढळत नाही. मंगळसूत्र सौभाग्याचे लेणे मानले जाते. पूर्वीच्या साध्या काचेच्या मण्याऐवजी आता सोन्याच्या साखळीत मंगळसूत्राच्या वाटया गुंफणे रूढ झाले आहे. त्याशिवाय चंद्रहार, जोंधळी पोत, बकुळी हार, पोहेहार, मोहनमाळ, बोरमाळ, पुतळयांची माळ, कोल्हापुरी साज इत्यादी दागिने समारंभप्रसंगी घालतात. याशिवाय एकदाणी, सरी, वज्रटीका, तन्मणी, लफ्फा, पोत व पेंडे हेही रत्नमोत्याचे दागिणे वापरतात. हातात निरनिराळया घाटांच्या बांगडया व पाटल्या घालतात. मोती व हिरे यांनी जडवलेल्या बांगडया श्रीमंत स्त्रिया वापरतात. नथ, मुरणी, फुली व मुगबट(चमकी) हे

नाकात घालण्याचे दागिणे आहेत. लहान मुलांना बिंदल्या, मनगटया, कडीतोडे, वाळे, तोरडया, साखळया व चाळे वगैरे घालतात.

**शिक्षण**

छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी शिक्षणास दिलले उत्तेजन व महात्मा ज्योतिबा फुले, कर्मवीर भाऊराव पाटील, बापूजी सांळुंखे इत्यादी समाजधुरीणांनी केलेल्या शिक्षणप्रसाराच्या कार्यामुळे जिल्हयास उशिरा का होईना परंतु उत्तम शैक्षणिक परंपरा लाभलेली आहे. समाजसुधारणेचे प्रणेते व बंगालचे थोर समाजसुधारक राजा राममोहन रॉय (१७७३–१८३३) याच्या अलौकिक कार्याने प्रेरित झालेल्या श्रीमंत छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी बहुजन समाज व स्त्री शिक्षणाचे महत्त्व ओळखून सातारा येथे जिल्हयातील पहिली म्हणून उल्लेख करता येईल अशी मराठी पाठशाळा छ. शाहूच्या राण्यांचा राणीवसा म्हणून बांधलेल्या 'रंगमहाल' या वाडयात सन १८२९ मध्ये काढली. या शाळेत संस्कृत, पर्शियन, मराठी, इंग्रजी, ज्योतिष व व्यायामाचे शिक्षण देण्याची सोय केली. त्यामुळे कित्येक शतके अध्यापनावर पगडा असलेल्या सनातन्यांचे पित्त खवळले होते. परंतु यावर उपाय म्हणून छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी मुंबईचे डॉ. मिल्न यांच्या सहकार्याने तीन मिशनरी शिक्षक या पाठशाळेसाठी उपलब्ध करून दिले होते. पुढे आबा पारसनीस या पुरोगामी ब्राह्मण शिक्षकाने सदरहू पाठशाळा उत्कृष्ठरित्या चालविली. याच शाळेत महाराजांनी सनातन्यांचा विरोध झुगारून गोजराबाई व आपल्या कन्येस शिक्षणासाठी दाखल केले. महाराजांच्या या कार्याची प्रेरणा मुंबईचे नाना शंकरशेठ यांनी घेऊन स्वतःच्या घरात मुलींची शाळा सुरू केली. महात्मा फुले, राजर्षि शाहू महाराज व कर्मवीर भाऊराव पाटील यांनीही स्त्री शिक्षण प्रसाराच्या कामी छत्रपती प्रतापसिंहाचे कार्य प्रेरक ठरले.[४३]

गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट, १९३५ नुसर प्रांतिक स्वायत्ततेचा उदय होऊन पहिले लोकनियुक्त कॉंग्रेस मंत्रिमंडळ अधिकाररूढ झाल्यानंतर ग्रामीण भागातील शैक्षणिक विकासावर भर देण्यात आला. त्यानुसार १९२३ च्या कायद्यातील त्रुटी दूर करण्यासाठी १९३९ मध्ये नवीन कायदा करण्यात आला. पुढे हा कायदा रद्द करुन बॉम्बे प्रायमरी एज्युकेशन ॲक्ट, १९४७ अन्वये प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करण्यात आले. ते डिस्ट्रिक्ट स्कूल बोर्ड तसेच म्युनिसिपल स्कूल बोर्डाकडे सोपविण्यात आले. सन १९६२ च्या जिल्हा परिषद व

पंचायत समित्या अधिनियमानुसार प्राथमिक शिक्षणाची सर्व जबाबदारी जिल्हा परिषदेकडे सोपविण्यात आली. तथापि नगरपालिका क्षेत्रातील प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषदेच्या अधिकार क्षेत्रात न घेता नगरपालिकांकडेच ठेवण्यात आले. सध्या जिल्हा पातळीवर शिक्षण विभागाचा मुख्य म्हणून शिक्षणाधिकारी असून त्यांच्या मदतीस दोन उपशिक्षणाधिकारी असतात. सन १९७० मधील शैक्षणिक पुनर्रचनेनुसार संपूर्ण राज्यात प्राथमिक, माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षणासाठी १०+२+३ असा आकृतीबंध स्वीकारण्यात आला. शालांत परीक्षेचा दहा वर्षाचा सुधारित अभ्यासक्रम १९७३–७४ च्या शैक्षणिक वर्षापासून इयत्ता आठवीपासून कार्यान्वित करण्यात आला. ११ वी व १२ वीचे वर्ग आवश्यकतेनुसार माध्यमिक व महाविद्यालयांना जोडण्यात आले. परिणामतः पदवी परीक्षेचा अभ्यासक्रम तीन वर्षाचा करण्यात आला. मातृभाषेतून शिक्षण व महाविद्यालयाच्या सुविधामुळे १९७० ते १९९४ या काळात सातारा जिल्हयात शिक्षणाचा मोठा प्रसार झाला.

**रयत शिक्षण संस्था, सातारा**

सातारा जिल्हयात अग्रेसर व महाराष्ट्रात नावलौकिक प्राप्त असलेल्या या संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सन १९१९ मध्ये कराडजवळील काले येथे केली.[४४] या स्थापनेबरोबरच येथेच संस्थेचे पहिले वसतिगृह स्थापन झाले. सन १९२४ मध्ये सातारा येथे एक हरिजन विद्यार्थी घेऊन वसतिगृह सुरू केले. आणि सर्व जातीधर्मातील विशेषतः हरीजन व स्पृश्य समाजातील मुला–मुलीना एकत्र ठेवण्याची ज्या काळामध्ये केवळ कल्पनाही शिवली नसती त्या काळात या वसतिगृहाची मुहूर्तमेढ रोवली. याचेच १९२७ मध्ये महात्मा गांधी यांच्या हस्ते वसतिगृहास छत्रपती शाहू बोर्डिंग असे नामाभिधान झाले. 'कमवा आणि शिका' (Earn and Learn) या योजना कार्यातून स्वावलंबी शिक्षणाच्या प्रयोगाची सुरूवात यातूनच सुरू झाली.[४५] वसतिगृहाचे प्रायोगिक महत्त्व ओळखून महात्मा गांधीनी हरिजन सेवक फंडातून दरसाल ५०० रूपयेची मदत या वसतिगृहास देण्यास प्रारंभ केला. पुणे येथे उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी भाऊरावांनी १९३२ मध्ये 'युनियन बोर्डिंग हाऊस'ची स्थापना केली. तसेच सन १९४२ मध्ये विद्यार्थीनींसाठी साताऱ्यास पत्नीच्या स्मरणार्थ 'लक्ष्मीबाई पाटील वसतिगृह' सुरू केले. जिल्हयात प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिक सोयीच्या दृष्टीने १९३५ मध्ये संस्थेने "सातारा सिल्व्हर ज्युबिली रूरल ट्रेनिंग कॉलेज"(सध्याचे महात्मा फुले अध्यापक

विद्यालय) तर १९४२ मध्ये विद्यार्थिनीसाठी जिजामाता अध्यापिका विद्यालय सुरू केले. पूर्व प्राथमिक शाळांमधील शिक्षकांच्या प्रशिक्षणासठी १९४८ मध्ये सातारा येथे टीचर्स डिप्लोमाचा वर्ग उघडला तर पदवीधर माध्यमिक शिक्षकांसाठी १९५५ मध्ये साताऱ्यास आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशनची स्थापना केली. संस्थेने १९३६ मध्ये रावबहाद्दूर रा.रा.काळे यांच्या स्मरणार्थ पहिली प्राथमिक शाळा सुरू केली. त्यानंतर मुंबई शासनाच्या व्हालंटरी प्राथमिक शाळा योजनेनुसार १९३८ पासून खेडयात संस्थेने अशा शाळा उघडण्यास सुरूवात केली. प्रमुख्याने सातारा जिल्हयाच्या पश्चिमेकडील डोंगराळ भागात व पूर्वेकडील दुष्काळी भागात ६१५ शाळा सुरू केल्या.[४६] माध्यमिक शिक्षणासाठी संस्थेने १९४० साली सातारा येथे महाराजा सयाजीराव गायकवाड या मोफत आणि निवासी माध्यमिक शाळेची स्थापना केली. तर उच्च शिक्षणासाठी १९४७ मध्ये सातारा येथेच "छत्रपती शिवाजी कॉलेज" नामक मोफत शिक्षण व निवासी कॉलेजची स्थापना केली. संस्थेने काही माध्यमिक शाळातून तांत्रिक शिक्षणाचे विभागही सुरु केले तर काही ठिकाणी स्वतंत्र तांत्रिक शाळा सुरू केल्या.संस्थेच्या ज्युनियर कॉलेज विभागातही तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणाची सोय करण्यात आली आहे. याशिवाय सातारा येथे १९८३ पासून विनाअनुदान तत्त्वावर कर्मवीर भाऊराव पाटील तंत्रनिकेतन व अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू केले. सन १९९५-९६ मध्ये संस्थेची सातारा जिल्हयात पाच प्राथमिक विद्यालये, ९४ माध्यमिक विद्यालये, १५ महाविद्यालये तीन शिक्षक प्रशिक्षण (अध्यापक) विद्यालये होती. शिवाय मुलींसाठीची सहा वसतीगृहे मिळून एकूण २४ वसतिगृहे होती. संस्थेमार्फत सध्या अनेक उपक्रम हाती घेण्यात आले असून त्यात स्वयंमुल्यमापनातून स्वयंविकास योजना, मुष्टिफंड, गरीब विद्यार्थी सहाय्य निधी, विद्यार्थी सुरक्षा विमा योजना, कर्मवीर विद्याप्रबोधिनी आदींचा समावेश आहे. सध्या संस्थेचे कार्यक्षेत्र १४ जिल्हयात पसरलेले आहे.

**स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थाः**

कर्मवीर भाऊरावांच्या रयत शिक्षण संस्थेच्या कार्याने प्रभावित झालेल्या जिल्हयातील गो.ज्ञा.तथा बापूजी साळुंखे यांनी १९४५ ते १९५५ दरम्यान सातारा व रूकडी येथे या संस्थेच्या कार्यास वाहून घेतले नंतर मात्र त्यांनी नवसमाज निर्मितीसाठी दुर्गम खेडयापाडयांना शिक्षणाचा लाभ व्हावा या हेतूने स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची ६ जून १९५५ ला स्थापना

करून त्याद्वारे कोल्हापूर, तासगाव, कराड, चाफळ, उंडाळे, तारळे येथे पाच माध्यमिक विद्यालये व एक मुलींचे विद्यालय सुरू केले. सन १९९२–९३ मध्ये या संस्थेची जिल्हयात एकूण ८३ शैक्षणिक केंद्रे कार्यरत होती.[४७]

जिल्हयात ठिकठिकाणी माध्यमिक विद्यालये तसेच कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालये अध्यापनाचे कार्य करीत आहेत. जिल्हयातील साक्षरता, पूर्व प्राथमिक, माध्यमिक व उच्च माधयमिक शाळा, महाविद्यालये, तंत्रशिक्षण, प्रौढ शिक्षण याविषयीची माहिती खाली दिलेली आहे.

### पूर्व प्राथमिक शिक्षण

पूर्व प्राथमिक शिक्षणाची सुरूवात जिल्हयात स्वातंत्र्योत्तर काळात बालक मंदिरांद्वारे झाली. प्रथम कराड येथे एप्रिल, १९४८ मध्ये श्रीमती बनुबाई हवालदार यांनी पाच वर्षाच्या आतील मुला–मुलीकरिता बालक मंदिर सुरू केले. याच साली श्री.दादासाहेब आळतेकर यांच्या सहकार्याने श्रीमती आंबर्डेकर व श्री.पराजंपे यांनी आदर्श शिशू विहार संस्था कराड येथे सुरू केली.[४८]

सन १९५१ मध्ये जिल्हयात केवळ तीन बालक मंदिरे होती. तर १९०५–०६ मध्ये त्यांची संख्या नऊ इतकी झाली. त्यापैकी चार मंदिरे सरकारमान्य होती. रयत शिक्षण संस्थेने १९५४ मध्ये सातारा येथे एक बालवाडी व बालवस्तीगृह सुरू केले. सन १९७१–७२ मध्ये जिल्हयात जिल्हा परिषदेच्या १०७ पूर्वप्राथमिक शाळा होत्या. त्यापैकी १०१ मराठी, दोन इंग्रजी व चार इतर माध्यमाच्या शाळा होत्या. या शाळांमध्ये १,७३६ विद्यार्थी होते. त्यात ५२८ मागासवर्गीय विद्यार्थ्यांचा सामवेश होता. सन १९९५–९६ मध्ये जिल्हयातील पूर्व प्राथमिक शाळांची संख्या १,५४७ झाली. त्यात एकूण ३७,६०१ विद्यार्थी (मुले(१८,३७७, मुली १९,२२४) होते. आणि त्यांना १,५६५८ शिक्षक अध्यापन करीत होते.[४९]

### प्राथमिक शिक्षण

शिक्षणमहर्षी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या रयत शिक्षण संस्थेने रावबहादूर रामचंद्र रावजी काळे यांच्या स्मरणार्थ १९३६ मध्ये सातारा येथे धनिणीच्या(छत्रपती शाहू महाराजांची राणी सगुणाबाई) बागेत संस्थेची पहिली प्राथमिक शाळा सुरू केली. मुंबई राज्यात १९३७ मध्ये काँग्रेसचे मंत्रिमंडळ सत्तेवर आल्यावर प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारासाठी ऐच्छिक प्राथमिक

शाळांची योजना सुरू झाली. त्यानुसार या संस्थेने सन १९३८ पासून सन १९४९–५० पर्यत ५७८ शाळा सुरू केल्या. पुढे सन १९४७ मध्ये मुंबई शासनाने सक्तीच्या मोफत प्राथमिक शिक्षणाचा कायदा मंजूर केल्यामुळे प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी सर्वस्वी शासनावर पडली होती. त्यामुळे संस्थेने या सर्व शाळा हळूहळू जिल्हा स्कूल बोर्डाच्या ताब्यात दिल्या होत्या. याच कायद्याने सात वर्षाचा अभ्यासक्रम निश्चित करण्यात आला. त्यानुसार जिल्हा स्कूल बोर्ड व मान्यताप्राप्त नगरपालिकांकडे शाळा सुरू करण्यासंबंधीचे काही अधिकार देण्यात आले. साहजिकच प्राथमिक शाळांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली.

सन १९६२ मध्ये जिल्हा परिषदेच्या स्थापनेपासून प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी प्रामुख्याने जिल्हा परिषद, स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी संस्था यांच्यावर आली. जिल्हयात जिल्हा परिषदेच्या नियंत्रणाखाली १९५१–५२ मध्ये १,२९८ तर १९६१–६२ मध्ये १,५३४ प्राथमिक शाळा होत्या. १९६१–६२ ते १९९३–९४ पर्यतची प्राथमिक शाळांची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.[५०] सन १९६१–६२ मध्ये जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांमध्ये शिकणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांची संख्या ५९,८६५(३४,१८१ मुले, २५,६८४ मुली) होती. ती १९९१–९२ व १९९५–९६ मध्ये अनुक्रमे १,०७,४४५ (५८,०३३ मुले, ४९,४१२ मुली) व १,१६,११५ (६१,४१५ मुले, ५४,७०० मुली) एवढी झाली. जिल्हयात १९९५–९६ या वर्षी जिल्हा परिषदेच्या एकूण २,२४० शाळा (एकूण २,८८,१३३ विद्यार्थी, ९,१६९ शिक्षक), केंद्र सरकार पुरस्कृत एक (विद्यार्थी–४९, शिक्षक–२) राज्य सरकार पुरस्कृत तीन(विद्यार्थी–६०३, शिक्षक २४) व सातारा, कराड, वाई, महाबळेश्वर, पाचगणी व फलटण या नगरपालिकांच्या मिळून एकूण ६२ प्राथमिक शाळा (विद्यार्थी–१७,२१७, शिक्षक – ४०१) कार्यरत होत्या. याचवर्षी जिल्हयात जिल्हा परिषदेची एकून पाच वसतिगृहे होती.

**माध्यमिक शिक्षण**

सातारा जिल्हयात १८५१ मध्ये पहिले सरकारी हायस्कूल सुरू झाले. तेच आजचे प्रतापसिंह हायस्कूल होय. त्यानंतर द्रविड हायस्कूल वाई(१८८५), न्यू इंग्लिश स्कूल, सातारा(१८८९), मुधोजी हायस्कूल, फलटण(१८९३), श्री हायस्कूल, औंध(१८९८) या माध्यमिक शाळा सुरू झाल्या. सन १९५१–५२ मध्ये जिल्हयात १,२९८ प्राथमिक शाळा (१,४७,९७७ विद्यार्थी), ४१ माध्यमिक शाळा(८,४८८ विद्यार्थी) व दोन महाविद्यालये (१९०

विद्यार्थी) कार्यरत होती. सन १९५७–५८ यावर्षी जिल्हयात सरकारी क्षेत्रात उर्दू माध्यमाच्या सहा व मराठी माध्यमाच्या १,१५९ शाळा होत्या. तर १९९३–९४ मध्ये जिल्हयात ४७८ पूर्व प्राथमिक शाळा, २,२६३ प्राथमिक, ४६१ माध्यमिक व ९४ उच्च माध्यमिक शाळा होत्या.

| वर्ष | १९८१–८२ | १९९१–९२ | १९९५–९६ |
|---|---|---|---|
| एकूण कनिष्ठ महाविद्यालये | ७४ | ९२ | १०६ |
| मराठी माध्यम | ६५ | ८१ | १०५ |
| इंग्रजी माध्यम | ०९ | ११ | ०१ |
| इतर माध्यम | – | – | – |
| एकूण विद्यार्थी | ११३५० | १४१८७ | ३५४६४ |

**कनिष्ठ महाविद्यालये :**

कनिष्ठ महाविद्यालये उच्च माध्यमिक शिक्षण देणाऱ्या संस्थामध्ये समाविष्ट असून ती १९७३–७४ नंतरच स्थापन झाली आहेत. सन १९७३–७४ पूर्वी १ ते ७ वीपर्यंत प्राथमिक शाळा व ८ ते ११ वी पर्यंत माध्यमिक शाळा असा शैक्षणिक आकृतीबंध होता. इयत्ता ११ वी नंतर शालान्त परीक्षा अभ्यासक्रम चार वर्षाचा होता. तथापि, ही स्थिती फक्त पश्चिम महाराष्ट्रापुरतीच मर्यादित होती. शासनाने १९७२ मध्ये १०+२+३ हा संपूर्ण राज्यासाठी एकच समान शैक्षणिक आकृतीबंध स्वीकारला व त्यानुसार १९७३–७४ या वर्यापासून राज्यासाठी एकच समान शैक्षणिक आकृतीबंध स्वीकारला व त्यानुसार १९७३–७४ या वर्षापासून ८ व्या इयत्तेमध्ये माध्यमिक शिक्षणाचा नवीन आकृतीबंध कार्यान्वित करण्यात आला. व तीन भाषा, गणित, विज्ञान व सामाजिक अभ्यास हे विषय सक्तीचे करण्यात आले. त्यानुसार १९७५–७६ या शैक्षणिक वर्षापासून सुधारित शैक्षणिक आकृतीबंधानुरूप दहावीची शालांन्त परीक्षा घेण्यास प्रारंभ झाला. त्यानंतर + २ स्तरावरील ११ वी व १२ वी चा उच्च माध्यमिक अभ्यासक्रम कार्यान्वित झाला.

कनिष्ठ महाविद्यालयाचे ११ वी व १२ वी चे वर्ग आवश्यकतेनुसार सक्षम उच्च माध्यमिक शाळा व महाविद्यालयांना जोडण्यात आले. या दोन वर्षाच्या अभ्यासक्रमात विविध प्रकारच्या

सारख्या महाविद्यालयीन अभ्यासक्रमाची ओळख करून देण्याबरोबरच अभियांत्रिकी व वैद्यकीय वगैरे सारख्या व्यावसायिक शिक्षणासाठी लागणारी पूर्वपिठीकांही तयार करण्यात येते. जिल्हयातील कनिष्ठ महाविद्यालयांची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.[५१]

**उच्च शिक्षण**

स्वातंत्र्यपूर्व काळात जिल्हयात महाविद्यालयीन शिक्षणाची सोय नसल्याने बहुतांश विद्यार्थ्यांना पुणे, कोल्हापूर, मुंबई व बडोदा येथे उच्च शिक्षणासाठी जावे लागत होते. ही समस्या दूर करण्यासाठी कर्मवीर भाऊराव पाटील यांनी जिल्हयात १९४७ मध्ये सातारा येथे छत्रपती शिवाजी कॉलेज स्थापन केले. विशेष म्हणजे त्यांच्या पहिल्या माध्यमिक विद्यालयाप्रमाणेच हे महाविद्यालयही मोफत शिक्षण आणि वसतीगृह सुविधेबाबत घोषित करून आपला या क्षेत्रात वेगळा ठसा उमटविला. त्यानंतर त्यांनी १९५४ मध्ये कराड तालुक्यातील सैदापूर येथे सद्गुरू गाडगे महाराज महाविद्यालय नामक जिल्हयातील पहिले ग्रामीण महाविद्यालय सुरू केले.

जिल्हयात १९६१–६२ मध्ये एकूण सात महाविद्यालये होती. त्यात १,७८६ विद्यार्थी होते. ही महाविद्यालये कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठाची स्थापना होईपर्यत प्रथम मुंबई व नंतर पुणे विद्यापीठाशी संलग्न होती. मात्र सन १९६३ नंतर सर्व महाविद्यालये शिवाजी विद्यापीठास जोडण्यात आली. सन १९९३–९४ मध्ये जिल्हयात २६ कला, शास्त्र व वाणिज्य महाविद्यालये ही कार्यरत होती. सातारा जिल्हयात १९६२–६३ मध्ये १० अध्यापक विद्यालये आणि एक अध्यापक महाविद्यालय होते. सन १९९३–९४ यावर्षी जिल्हयात ११ अध्यापक विद्यालयामध्ये १,०४९ मध्ये विद्यार्थ्यासाठी ८९ प्राध्यापक कार्यरत होते. यावर्षी मात्र जिल्हयतल अध्यापक महाविद्यालयांची संख्या पाच(चार अध्यापक आणि एक शारीरिक शिक्षण महाविद्यालय) एवढी झाली. सन १९८४ साली स्थापन झालेल्या व्यायाम मंडळ, सातारा या संस्थेच्या शारीरिक शिक्षण महाविद्यालयात १९९३–९४ मध्ये ८८ विद्यार्थी शिक्षण घेत होते. सन १९९५–९६ मध्ये जिल्हयात ११ अध्यापक विद्यालये चार अध्यापक महाविद्यालये कार्यरत होती. याशिवाय जिल्हयातील एकमेव शारीरिक शिक्षण महाविद्यालयात याचवर्षी ११९ विद्यार्थी शिकत होते. ही सर्व महाविद्यालये खाजगी संस्था प्रणित होती. जिल्हयातील १९९५–९६ या वर्षातील अध्यापक महाविद्यालये, विधी आणि वैद्यक महाविद्यालये यांची यादी दिलेली आहे.

पुढे या कॉलेजमध्ये वसतिगृहात राहाणाऱ्या व शारीरिक श्रम करणाऱ्या विद्यार्थ्यांना फी मध्ये विशेष सवलती दिल्या आहेत. या कॉलेजमध्ये बी.ए.पर्यतचे वर्ग चालविले जात होते.

**सातारा जिल्हयातील महाविद्यालयांची यादी सन १९९५-९६** [५२]

| महाविद्यालयाचे नाव | विद्याशाखा | स्थापना वर्ष | संस्थेचे नाव |
|---|---|---|---|
| **कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालये** | | | |
| छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा | वा., साशा. | १९४७ | रयत शिक्षण संस्था |
| सद्‌गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड | वा., सा. वाणिज्य साशा | १९५१ | रयत शिक्षण संस्था |
| मुधोजी कॉलेज, फलटण | वा., सा. वाणिज्य साशा | १९५८ | दि फलटण एज्युकेशन सोसायटी, फलटण |
| यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स, कराड | शा | १९५८ | शिवाजी एजुकेशन सोसायटी ॲण्ड बोर्ड फॉर हायर एज्युकेशन सोसायटी ॲण्ड बोर्ड फॉर हायर एज्युकेशन, कराड. |
| किसन वीर महाविद्यालय, वाई. | वा | १९६२ | जनता शिक्षण संस्था, वाई |
| यशवंतराव चव्हाण इन्स्टिटयूट ऑफ सायन्स, सातारा | शा., वा., साशा | १९६५ | रयत शिक्षण संस्था |
| शहाजीराजे महाविद्यालय खटाव | वा., साशा. शा., वाणिज्य | १९६५ | एस.पी.मंडळ, खटाव. |
| दहीवडी कॉलेज दहिवडी | वा., साशा. | १९६५ | रयत शिक्षण संस्था |
| लालबहाद्दूर शास्त्री कॉलेज ऑफ आर्टस, सायन्स ॲण्ड कॉमर्स सातारा | वा., वाणिज्य साशा.,शा. | १९६७ | श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर |
| डी.पी.भोसले कॉलेज, कोरेगाव | वा., वाणिज्य | १९६८ | रयत शिक्षण संस्था |
| बाळासाहेब देसाई कॉलेज पाटण | वा., साशा. शा., वाणिज्य | १९६९ | के.ई.सोसायटी, पाटण |
| काकासाहेब चव्हाण महाविद्यालय, तळमावले | वा., वाणिज्य साशा. | १९६९ | श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर |

| | | | |
|---|---|---|---|
| वेणुताई चव्हाण कॉलेज, कराड | वा., वाणिज्य साशा. | १९७१ | एस.इ.एस.सोसायटीज बोर्ड फॉर हायर एज्युकेशन, कराड. |
| धनंजय गाडगीळ कॉलेज ऑफ कॉमर्स सातारा | वाणिज्य | १९७१ | रयत शिक्षण संस्था, सातारा |
| आर्टस अ‍ॅण्ड कॉमर्स कॉलेज सातारा | वा., वाणिज्य साशा. | १९७२ | एम.व्ही.पी.समाज, सातारा |
| कृष्णा महाविद्यालय ऑफ सायन्स, रेठरे बुद्रुक | शा. | १९७८ | शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ, रेठरे बुद्रुक |
| निंबकर ॲग्रीकलचरल रिसर्च इन्स्टिटयुट, फलटण | शा. | १९८० | निंबकर ॲग्रीकलचरल रिसर्च इन्स्टिटयुट, फलटण |
| आर्टस अ‍ॅण्ड कॉमर्स कॉलेज, शिरवळ | वा., वाणिज्य साशा. | १९८३ | रयत शिक्षण संस्था |
| शिक्षण महर्षी बापूजी साळुंखे महाविद्यालय, कराड | वा., वाणिज्य साशा. | १९८४ | श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर |
| शरदचंद्र पवार महाविद्यालय, लोणंद | वा., शा., साशा. | १९८५ | रयत शिक्षण संस्था |
| धनंजयराव गाडगीळ कॉलेज ऑफ कॉमर्स सातारा | वाणिज्य | १९७१ | रयत शिक्षण संस्था |
| आर्टस अ‍ॅण्ड कॉमर्स कॉलेज सातारा | वा., वाणिज्य साशा. | १९७२ | एम.व्ही.पी.समाज, सातारा |
| कृष्णा महाविद्यालय ऑफ सायन्स, रेठरे बुद्रुक | शा.. | १९७८ | शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ, रेठरे बुद्रुक |
| निंबकर ॲग्रीकलचरल रिसर्च इन्स्टिटयुट, फलटण | शा. | १९८० | निंबकर ॲग्रीकलचरल रिसर्च इन्स्टिटयुट, फलटण |
| महिला महाविद्यालय, कराड | वाणिज्य | १९८६ | शिक्षण मंडळ कराड |
| प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई | कला व साशा | १९८६ | प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई |
| महिला महाविद्यालय(आर्टस, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स), सातारा | वा., साशा. वाणिज्य | १९८९ | रयत शिक्षण संस्था |
| सौ.मं.रा.ज.महिला महाविद्यालय, उंब्रज | वा., साशा. वाणिज्य | १९८९ | रयत शिक्षण संस्था |
| आर्टस अ‍ॅण्ड कॉमर्स कॉलेज, पाचगणी | वा., साशा. वाणिज्य | १९९० | श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर |
| डी.बी.कदम कॉलेज, सातारा | वा., साशा. वाणिज्य | १९९० | सरस्वती शिंदे एज्युकेश्अन सोसायटी, सिवाजी पेठ, कोल्हापूर, |
| आर्टस अ‍ॅण्ड कॉमर्स कॉलेज, पाचवड | कला, वाणिज्य, शास्त्र | १९९१ | रयत शिक्षण संस्था |

| | | | |
|---|---|---|---|
| आर्टस अॅण्ड कॉमर्स कॉलेज मायणी ता.खटाव | कला, वाणिज्य | १९९१ | मायणी भाग शिक्षण प्रसारक मंडळ, मायणी ता.खटाव |
| आर्टस अॅण्ड कॉमर्स कॉलेज, मेढा | कला, वाणिज्य | १९९१ | मेरूलिंग शिक्षण मंडळ दरेखुर्द |
| स.मु.शंकरराव मोहितेपाटील आर्टस अॅण्ड कॉमर्स कॉलेज | कला, वाणिज्य | १९९२ | पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळ रहिमतपूर |
| आर्टस, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज, पुसेगाव, ता.खटाव | वा., वाणिज्य, शा. | १९९४ | रयत शिक्षण संस्था |
| राजा भगवंतराव महाविद्यालय, औंध, ता. खटाव | वा.,शा. | १९९४ | औंध शिक्षण मंडळ, औंध |
| यशवंतराव चव्हाण इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्सेस, जकातवाडी | शा.,शा. | १९९४ | इंडियन इन्स्टिटयुट ऑफ रिसर्च अॅण्ड डेव्हलपमेंट ऑफ नोमॅडिक अॅण्ड डिनोटिफाईड ट्राईब्ज, जकातवाडी |
| यशवंतराव मोहिते इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट मलकापूर, ता.कराड | वाणिज्य | १९९४ | भारती विद्यापीठ, पुणे |
| आर्टस अॅण्ड कॉमर्स कॉलेज, वडूज, ता.खटाव | कला, वाणिज्य | १९९५ | शिक्षण समिती नेसरी |

| **शिक्षणशास्त्र महाविद्यालये** | | | |
|---|---|---|---|
| आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशन, सातारा | शि | १९५५ | रयत शिक्षण संस्था |
| कॉलेज ऑफ एज्युकेशन, कराड | शि | १९८४ | श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर |
| बी.पी.एड, कॉलेज, सातारा | शारीरिक शि. | १९८४ | व्यायाम मंडळ, सातारा |
| बी.एड.कॉलेज, पाटण | शि | १९९० | दि कोयना एज्युकेशन सोसायटी, पाटण |
| कॉलेज ऑफ एज्युकेशन, फलटण | शि | १९९० | जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळ, जि.सातारा |

| वैद्यकीय महाविद्यालये | | | |
|---|---|---|---|
| एस.सी.मुथा आर्यांग्ल वैद्यक महाविद्यालय, सातारा | वै. | १९६३ | आयुर्वेद प्रसारक मंडळ, सातारा |
| गव्हर्नमेंट कॉलेज ऑफ फार्मसी, कराड | वै. | १९७४ | डिपार्टमेंट ऑफ टेक्निकल एज्युकेशन, गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्र. |
| कृष्णा इन्स्टिटयूट ऑफ मेडिकल सायन्सेस कराड. | वै. | १९८४ | कृष्णा चॅरिटेबल ट्रस्ट, कराड. |
| होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज व समर्थ हॉस्पिटल, सातारा | वै. | १९८४ | समर्थ एजुकेशन ट्रस्ट, सातारा |

| विधी महाविद्यालये | | | |
|---|---|---|---|
| इस्माईलसाहेब मुल्ला लॉ कॉलेज, सातारा | विधी | १९६८ | रयत शिक्षण संस्था |
| प्रियदर्शनी ज्ञान प्रबोधिनी लॉ कॉलेज, फलटण | विधी | १९९२ | प्रियदर्शनी ज्ञान प्रबोधिनी शिक्षण संस्था फलटण |
| **आभियांत्रिकी महाविद्यालये** | | | |
| कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कराड | अभि | १९८० | डिपार्टमेंट ऑफ टेक्निकल एज्युकेशन, गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्र |
| कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कराड | अभि | १९८३ | रयत शिक्षण संस्था |

वा. वाङ्मय विद्याशाखा
शा.शास्त्र विद्याशाखा
साशा. सामाजिकशास्त्रे विद्याशाखा
शा.शि. शारीरिक शिक्षण विद्याशाखा
वि. विधी विद्याशाखा
शि. शिक्षण विद्याशाखा
वै. वैद्यक विद्याशाखा

### सैनिकी शाळा

सातारा जिल्हयास सैनिकी पेशाची उज्वल परंपरा लाभलेली आहे. ब्रिटिश राजवटीत येथे लष्करी छावणी व लष्करी शाळा होती. ही शाळा १९२५ मध्ये बंद झाली. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारत सरकारने जून १९६१ मध्ये पहिली सैनिक शाळा साताऱ्यास स्थापन केली. भारतातील या प्रकारच्या एकूण पाच शाळांपैकी ही पहिली शाळा होय. या शाळेत विद्यार्थ्यांना सैनिक व शालेय

शिक्षण दिले जाते. त्यामुळे त्यांना राष्ट्रीय संरक्षण महाविद्यालयात प्रवेश मिळण्यास सोयीचे होते. ही शाळा केंद्र शासनातर्फे चालविली जाते. या शाळेची प्रवेश क्षमता १५० आहे.

**शिक्षक प्रशिक्षण**

सातारा जिल्हयात प्रथम रयत शिक्षण संस्थेने १९३५ मध्ये संस्थेने प्राथमिक शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी "सिल्व्हर ज्युबिली रूरल ट्रेनिंग कॉलेज" सुरू केले. हेच सध्याचे महात्मा फुले अध्यापक विद्यालय होय. प्रारंभी फक्त सात विद्यार्थी प्रशिक्षण घेत होते. याच संस्थेने १९४२ मध्ये शिक्षिकांच्या प्रशिक्षणासाठी सातारा येथे जिजामाता अध्यापिका विद्यालय सुरू केले. सन १९५४ मध्ये पांडुरंग देसाई ज्युनिअर कॉलेज ऑफ एज्युकेशन कुसूर सुरू केले.

**तंत्रशिक्षण**

जिल्हयात १८५८ मध्ये सातारा येथे खाजगी संस्थेची 'दि स्कूल ऑफ इंडस्ट्री' नामक औद्योगीक प्रशिक्षण शाळा स्थापन झाली. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर सन १९४९-५० मध्ये सरकारने युद्धोत्तर पुनर्बांधणी योजनेनुसार ही शाळा ताब्यात घेऊन त्यास तांत्रिक माध्यमिक शाळा जोडली. या शाळेने सातारा येथील स्थनिक तीन माध्यमिक शाळांमधील इ.८वी ते ११ वी पर्यतचा एक एक विभाग बनवून त्यांना भूमिती आणि यंत्र आलेखन(Geometrical and machine shop drawing), तंत्रशास्त्र(Workshop technology)(श्रेणी१) व अभियांत्रिक मुलतत्त्वे आणि विद्युत अभियांत्रिकी ते तीन तांत्रिक विषय कोणतीही फी न घेता शिकविण्याचे अंगिकारले.[५३]

**सार्वजनिक आरोग्य व वैद्यकीय सेवा**

जिल्हा रूग्णालयाचा दर्जा असलेल्या या रूग्णालयाला शासनाने सन १९६४ पासून स्वतंत्र इमारत उपलब्ध करून दिली आहे. या इमारतीत क्ष-किरण, भौतिकोपचार, कुष्ठरोग, क्षयरोग, शस्त्रक्रिया व प्रसूतिविभाग सुरू करणेत आलेला आहे. सन १९७८ मध्ये येथे रक्तपेढी स्थापन करण्यात आलेली आहे. इ.स.१९९०-९१ मध्ये एकूण जमा केलेल्या विविध रक्तघटकांची युनिट संख्या १,५९० एवढी होती. तर खाटांची संख्या २३५ होती, तर या रूग्णालयात ९०,७३९ बाहय व ८८,२५४ आंतररूग्णांवर उपचार करण्यात आले होते.[५४] प्रशासकीय अधिकारी म्हणून जिल्हा शल्यचिकित्सकाचे या रूग्णालयावर नियंत्रण असते.

सन १९५८ मध्ये कराड तालुक्यात वडगाव आणि इंदोली, सातारा तालुक्यात नागठाणे, पाटण तालुक्यात पाटण व ढेबेबाडी व वाई तालुक्यात कवठे येथे अशी एकूण ६ प्राथमिक केंद्रे कार्यरत आहेत.[५५] सन १९६०–६१ मध्ये दोन रूग्णालये, एक प्रसुतीगृह, ३२ दवाखाने व २९ ग्रामीण उपचार केंद्रामध्अून ७,०७९ आंतर व ३,१७,११३ बाहय रूग्नांवर उपचार करण्यात आले.[५६] जिल्हयात १९७१–७२ मध्ये खाजगी व सार्वजनिक क्षेत्रातील मिळून नऊ रूग्णालये, १७ प्राथमिक आरोग्य केंद्रे, ३३ दवाखाने, चार आरोग्य पथके, दोन क्षयरोग रूग्णालये, तर १९८१–८२ मध्ये शासकीय व शासन अनुदानित अशी एकूण ४५ रूग्णालये, १८ प्राथमिक आरोग्य केंद्रे, चार ग्रामीण रूग्णालये, ४५ दवाखाने, १४ प्राथमिक आरोग्यपथके व दोन क्षयरोग रूग्णालये कार्यरत होती.[५७] प्राथमिक आरोग्य व उपकेंद्र स्थापण्याच्या केंद्र शासनाच्या सुधारित धोरणानुसर १९८४ मध्ये जिल्हयात ६३ प्राथमिक आरोग्य पथके, ११ ॲलोपॅथिक दवाखाने, १७ आयुर्वेदिक दवाखाने, सहा सहाय्यकारी आरोग्य केंद्र, तीन फिरते ग्रामीण दवाखाने व एक सुसज्ञ असे जिल्हा रूग्णालय कार्यरत होते. तर १९९१–९२ मध्ये सार्वजनिक क्षेत्रातील १४ रूग्णालये, ५७ दवाखाने, एक प्रसुतीगृह व ६९ प्राथाकि आरोग्य केंद्रामध्ये एकूण २३५ डॉक्टर्स व ६८७ परिचारिका काम करीत होत्या. यावर्षी १.०२ लाख आंतर व ९.६२ लाख बाहय रूग्णावर उपचार करणयत आले. शन १९९४–९५ मध्ये जिल्हयात सार्वजनिक क्षेत्रात १४ रूग्णालये, (चार नागरी,१० ग्रामीण), ६९ प्राथमिक आरोग्य केंद्रे व ३०९ उपकेंद्रे तीन ॲथोपॅथिक व १७ आयुर्वेदीक दवाखाने, दोन कुटीर रूग्णालये, व एक विशेष रूग्णालय होते. तर याच वर्षी नगरपालिकेचे एक नागरी रूग्णालय, १२ ॲलोपॅथिक दवाखाने व एक विशेष रूग्णालय कार्यरत होते. यावर्षी खाजगी क्षेत्रातही १२८ नागरी रूग्णालये, १६ आयुर्वेदीक दवाखाने व ४२ विशेष रूग्णालये, होती. त्यात १,१७७ डॉक्टर कार्यरत होते.

**सामाजिक चळवळी**

सामाजिक परिवर्तनाच्या लढयात सातारा नेहमीच अग्रेसर राहिला आहे. परिवर्तनाच्या चळवळीचा मोठा वारसा साताराला आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात महात्मा फुले यांची सामाजिक चाली–रीतींच्या विरोधात समताधिष्ठित समाजरचनेसाठीची चळवळ, स्त्री–शिक्षणाची चळवळ, शेतकऱ्यांच्या शोषणाविरूद्धची चळवळ, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची दलितांच्या उत्थानाची

चळवळ अशा अनेक चळवळींनी सातारा तेव्हा ढवळून निघाला होता. या चळवळीचे दूरगामी विधायक परिणाम संपूर्ण समाजावर झालेले आहेत. या सर्व चळवळीमधून साताराचा आजचा पुरोगामी विज्ञानवादी चेहरा निर्माण झालेला आहे. आपल्याला स्वातंत्र्य मिळाले. राज्यघटनेमध्ये न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता या परविर्तनाच्या चळवळीच्या मूल्यांचा समावेश झाल. समतेसाठी परिवर्तन हे चळवळीचे मूल्य भारतीय राज्यघटनेचे ब्रीद झाले. आता वेगळया चळवळींची गरजच नाही. असे चित्र निर्माण झाले. परंतु हे चित्र आभासी होते. राजकीय सत्तांतर झाले. ब्रिटिश गेले. आपले राज्य आले. राजकीय बदलासोबत सामाजिक बदल झपाटयाने व्हायला हवे होते. पण ते झाले नाहीत. यामुळे स्वातंत्र्याकडून खूप मोठया अपेक्षा बाळगून असलेल्या संवेदनशील युवा पिढीची घोर निराशा झाली. स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये घटनेतल्या मानवी मूल्यांच्या अंमलबजावणीसाठी लढा देणे, हीच एक चळवळ होऊन बसली. दलितांच्या उत्थानासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतंत्र्यपूर्व काळापासून उभारलेला लढा स्वातंत्र्योत्तर काळातही जोमाने सुरू आहे. घटनेची मार्गदर्शक तत्त्वे जरी असली तरी त्यांची अमंलबजावणी करणयासाठी असणारा राजकीय इच्छाशक्तीचा अभाव... वर्षानुवर्षे झालेले जातीय संस्कार केवळ कायद्याने पुसणार नाहीत, त्यासाठी व्यापक प्रबोधनाची चळवळच उभारली पाहिजे. यासाठी डॉ.आंबेकरांनी चातुवर्ण्याधिष्ठित हिंदू धर्माचा त्याग करुन बौद्ध धर्माचा स्वीकार केला. ही घटना सातारच्या सामाजिक इतिहासात क्रांतिकारक ठरली. डॉ.आंबेडकरांच्या विचारांतून, कार्यातून प्रेरणा घेऊन नवशिक्षित, दलित, संवेदनशील, तरूणांनी चळवळ उभरली. प्रस्थापित व्यवस्थेला नकार आणि मानवी मूल्यांचा स्वीकार, हे त्या चळवळीचे ब्रीद राहिले. आंबेडकरी परंपरागत साहित्य संरचनेला धक्का देणारे होते. आंबेडकरी चळवळीचा एकंदर साहित्य व्यवहारावर खूप मोठा प्रभाव पडला. डॉ. आंबेडकरांचा समतावादी विचार आणि कार्य हे या चळवळीचे मोठे वैशिष्ट्य राहिले.

आपल्या देशात आपलेच लोकशाही राज्य असताना १९७० व १९८० च्या दशकातील तरूण पिढी घुमसट अनुभवत होती. १९८०–१९९० च्या दशकात श्याम मानव यांनी अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे स्थापना केली. समाजामध्ये वैज्ञानिक जाणीव जागृती व्हावी, समाजमन निकोप व निरोगी व्हावे ही भूमिका घेऊन चळवळींचे कार्य सुरू होते. बाबा, बुवा, मांत्रिक यांच्या कारवाया चव्हाटयावर आणल्यामुळे एक विधायक प्रतिमा समाजात निर्माण झली होती.

श्याम मानव डॉ.नेरंद्र दाभोळकर हे बुद्धिप्रामान्यवादी नेतृत्त्व या चळवळीला लाभले होते. व्यवस्था बदलाची आस धरणार संवेदनशील युवावर्ग या चळवळीकडे ओढला गेला. स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या चाळीस वर्षामध्ये या सर्व परिवर्तनाच्या चळवळीचा प्रवाह वेगवान होता. चळवलीचे दृश्यादृश्य परिणाम समाजावर होत राहायचे. व्यवस्था बदलाची तीव्र जाणीव व्यवस्थेच्या अंतःप्रवाही विषमतामूलक प्रवाहामुळे अस्वस्थ होणाऱ्या युवापिढीत निर्माण व्हायची. त्याच्यासाठी ही चळवळ हे एक जगणे होऊन जायचे त्यामुळे चळवळीचा प्रवाह जिंवत राहिला. अस्वस्थ युवा स्पंदनानी, अन्यायाविरूद्धच्या आक्रोशाने नवनिर्माणाच्या आशेने १९९५ पर्यंत चळवळीच प्रवाह खळाळत होता. त्यानंतरच्या कालखंडात हे चळवळीचे प्रवाह क्षीण क्षीण होत गेले. सामाजिक परिवर्तनाच्या लढयात सातारा नेहमीच अग्रेसर राहिला आहे. या चळवळीचे दूरगामी विधायक परिणाम संपूर्ण समाजावर झालेले आहेत. या सर्व चळवळीमधून सातारचा आजचा पुरोगामी विज्ञानवादी चेहरा निर्माण झलेला आहे. या सर्व चळवळी आणि सातारा जिल्हयातील काही निवडक सामाजिक कार्यकर्त्यांचे चळवळींमधील योगदान यांचा अभ्यास आपण या ठिकाणी करणार आहोत.

भारत स्वतंत्र झाल्यानंतर सातारा जिल्हयात दोन दशके मोठया प्रमाणावरील सामाजिक चळवळींचा मागमूस नव्हता. विसाव्या शतकाच्या शेवटच्या दोन दशकात आणि एकविसाव्या शतकाच्या पहिल्या दशकाच्या सुरूवातीला सामाजिक चळवळींनी विविध प्रश्नावर मांडलेली भुमिका नक्कीच कौतुकास्पद आहे. वास्तववादी विरोध करण्याचे काम या चळवळींनी केले आहे. या चळवळींचे क्षेत्र सातारा जिल्हयापुरते मर्यादित नव्हते तर महाराष्ट्रभर या चळवळी विस्तारित झालेल्या आहेत. लोकजगृती आणि जनसामान्यांचे संघटन करून शासनावर दबाव आणायचा आणि विकासकामे करायची असा प्रयत्न चळवळींनी चालवला. या चळवळींचा मुख्य आधारस्तंभ फुले, शाहु आणि आंबेडकर हा होता.[५७] डॉ.एन.डी.पाटील, डॉ.नरेंद्र दाभोळकर, लक्ष्मण माने, आ.ह.साळुंखे अशी कितीतरी नावे सातारा जिल्हयातून मोठी झालेली आहेत. या सर्व समाज नायकांनी असंघटीत असणाऱ्या समाजाला एकत्रित करून त्यांची मोट बांधली. शेतमजूर, स्त्रिया, कामगार, दलित, आदिवासी आणि पारधी हा कष्टकरी समाज चळवळीच्या माध्यमातून एकत्र आला. अशा चळवळी जनमाणसांचा मोठा आधार बनल्या.[५८] हे सर्व सातारा जिल्हयातच का घडले तर याचे एकमेव कारण म्हणजे या जिल्हयाला असणारी सत्यशोधक व धार्मिक परिवर्तनाचा पुरस्कार करणाया विचारांची पार्श्वभूमी होय. सातारमध्ये सत्यशोधक विचारसरणी यशस्वीरित्या

वाढवण्यासाठी कर्मवीर भाऊराव पाटील, केशवराव विचारे आदींनी प्रयत्न केले.[५९]

स्वातंत्र्योत्तर साताराची सामाजिक परिस्थीती पाहत असताना आपणास ज्या संस्था या समाजात राहुन सामाजिक कार्य करत होत्या त्याचे कार्य अभ्यासणे आवश्यक आहे. या सर्व संस्था कोणत्याही स्वार्थाशिवाय हे सामाजिक कार्य करत असल्याने त्यांना वगळून सामाजिक परिस्थीचे अवलोकन निटसे होणार नाही त्यामुळेच मी या चळवळींची माहीती येथे मांडतो आहे. या चळवळीमध्ये पुढील काही महत्त्वपूर्ण संस्थांचा समावेश करणे मला आवश्यक वाटते. समाजवादी युवक दल, विद्रोही चळवळ, भटक्या विमुक्त जातीजमाती चळवळ, मुक्तांगण चळवळ, समता आंदोलन, आंबेडकर आकादमी सातारा, अंधश्रध्दा चळवळ, परिवर्तन व्यसनमुक्ती चळवळ, कामगार चळवळ आणि स्त्री चळवळ यासारख्या चळवळी केवळ जिल्हयालाच नाही तर पुर्ण देशाला मार्गदर्शक ठरलेल्या आहे.

**१.समाजवादी युवक दल :**

डॉ.नरेंद्र दाभोळकर, श्री.विजय मांडके, श्री.प्रमोद कोपर्डे, श्री.दिनकर झिंब्रे व श्री.पार्थ पोळके यासारख्या कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन या समाजवादी युवक दलाची स्थापना केली होती. यांनी सर्वात मोठी क्रांती घडवली ती कोरेगांव तालुक्यातील त्रिपुटी या गावी. या गावात गावचे सार्वजनिक तळे आहे व काही रामोशी लोकांनी या तळयातून पाणी भरल्यामुळे गावच्या ग्रामस्थांनी या रामोशी लोकांना दंड आकारला. या विरोधात समााजवादी दलाने त्रिपुटी तळे सत्याग्रहाची आखणी केली आणि हा सत्याग्रह यशस्वी केला. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी महाडच्या चवदार तळयातील ओंजळभर पाणी पिऊन चवदार तळयाचा सत्याग्रह केला होता त्या घटनेला पन्नास वर्षे पुर्ण झाल्याप्रित्यर्थ या समाजवादी युवक दलाने लॉग मार्चचे आयोजन केले होते.एवढेच नाही तर सन १९८१साली भारताच्या पंतप्रधान इंदीरा गांधी या सातारमध्ये शंकराचार्यांचे दर्शन घेण्यासाठी आल्या होत्या तेव्हा त्यांना काळे झेंडे दाखवण्याचे साहस यानी दाखवून त्यांचा विरोध केला.[६०]

**२. भटक्या विमुक्त जातीजमाती चळवळ :**

सातारा जिल्हयाच्या फलटण तालुक्यातील निरगुडी सारख्या एका खेडयातून आलेल्या श्री. लक्ष्मण माने यांनी आपल्या ‘उपरा’ या आत्मकथनातून भटकणाऱ्या जातीजमातींची अवस्था मांडून एका दबलेल्या प्रश्नाला वाचा फोडण्याचे काम केले. अथक परिश्रम करून

भटकंती करणारी जाती या कोणत्या प्रकारचे जीवन जगण्यास बाध्य आहेत व समाजाच्या मुख्य प्रवाहापासून त्या कशा बाजूला फेकल्या गेलेल्या आहेत यांची मांडणी करून ते शांत बसले नाहीत तर त्यांनी या सर्व लोकांची संघटना बांधून या संघटनेच्या माध्यमातून शासनदरबारी त्यांचे प्रश्न मांडण्यासाठी मोर्चे काढले आणि शासनाला त्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यास बाध्य केले. हिंदू धर्मातील जातीव्यवस्था ही मोडता येत नाही हे पाहुन त्यांनी आपल्या अनुयायांसह हिंदू धर्माचा त्याग करून बौध्द धम्माची दिक्षा घेतली.[६१]

**३. समता आंदोलन :**

सन १९७७ साली भारतात आणिबाणी लागू करण्यात आली. सरकारच्या निर्णयाविरोधात अनेक ठिकाणी याचे पडसाद उमटलेले दिसतात. याच वेळी महार वतने बरखास्त करण्याचा निर्णय घेण्यात आला. हा निर्णय दिनदलित जनतेच्या हक्काची भाकरी हिरावून घेणारा होता. याच्य विरोधात संघटीतपणे आणि व्यापक स्वरूपात लढा उभारण्याचे कार्य श्री.पार्थ पोळके श्री.विजय मांडके आणि त्यांच्या सहकारी कार्यकर्त्यांनी ठरवले आणि त्यांनी समता आंदोलन उभारले. पुढे त्यांनी भिमसेना या संघटनेच्या मध्यमातून काम केले.[६२]

समता आंदोलनाच्या माध्यमातून त्यांनी सातारमध्ये यशवंत उद्यानात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे सुंदर स्मारक करवून घेतले. श्री.पार्थ पोळके यांनी 'आभारान', 'गावकुसाबाहेरच्या बाया' व इतर ग्रंथांचे लेखन केले. त्यांचा 'हिंदू विरूध्द वैदिक' ग्रंथाने या समता चळवळीला वैचारीक दिशा देण्याचे कार्य केले. हे कार्य करत असतानाच श्री.पार्थ पोळके आणि त्यांच्या सहकारी कार्यकर्त्यांनी मुकबधिर मुलांसाठी शाळा सुरू केली.

**४. मुक्तांगण चळवळ :**

श्री.लक्ष्मण माने, डॉ.नरेंद्र दाभोळकर, श्री.सुरेश पळणिटकर, श्री.प्रमोद कोपर्डे व इतर मान्यवरांनी या मुक्तांगण चळवळीची स्थापना केली. अज्ञान हे समाजातील सर्व अनाचाराच्या मुळाशी असतो आणि या अनाचारांना रोखण्याचा एकच उपाय म्हणजे समाज सुशिक्षित करणे. हाच उद्देश नजरेसमोर ठेऊन एकता शिक्षण मंडळाची स्थापना करण्यात आली. दलित मुलंच्या राहण्याची सोय करणे, त्यांना ग्रंथालय व अभ्यासिका उपलब्ध करून देणे अशा सुविधा त्यांना देण्यात आल्या. समाजप्रबोधन करण्यासाठी विविध विषयांवरील व्याख्यानांचे आयोजन करणे असे अनेक सामाजिक उपयोगाचे उपक्रम मुक्तांगण या संस्थेने राबवलेले आहेत.[६३]

### ५.विद्रोही चळवळ :

श्री.आ.ह.साळुंखे यांनी विद्रेही चळवळ निर्माण केली आणि त्यांच्या 'आस्तिक शिरोमणी', 'चार्वाक', या ग्रंथांच्या माध्यमातून चार्वाकांचे तत्वज्ञान त्यांनी सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहचवण्याचा प्रयत्न केला. 'धर्म की धर्मापलिकडे', 'हिंदू स्त्री आणि महाभारतातील स्त्रिया', 'मनूस्मृती समर्थकांची संस्कृती', 'विद्रोही तुकाराम', 'तुकारामाचा शेतकरी', 'बळीराजा' अशा विविध ग्रंथांच्या माध्यमातून त्यांनी ब्राम्हणवादाचा कावेबाजपणा दाखवून त्यांनी या फेऱ्यातून सर्वसामान्यांची सुटका व्हावी म्हणून शिवधर्माची मांडणी केली. त्यांच्या विद्रोही चळवळीने 'बडवे हटाव' चळवळ जनसामान्यात पोहचवण्याचे कार्य केले.त्यांच्या या कार्यात डॉ.धनाजी गुरव, डॉ.भारत पाटणकर, श्री.पार्थ पोळके यासारख्या अनेक सामाजिक कार्यकर्त्यांनी त्यांची साथ दिलेली आहे.[६४]

### ६.आंबेडकर आकादमी :

सन १९९२ साली थोर शिक्षणतज्ञ डॉ.एन.डी.पाटील यांच्या अध्यक्षतेखाली ही आकादमी स्थापन करण्यात आली. जेष्ठ विचारवंत प्रा.य.दी.फडके यांनी उपाध्यक्ष म्हणून तर कार्याध्यक्ष म्हणून श्री.किशोर बेडकीहाळ यांनी या संस्थेत कार्य केलेले आहे. राजकीय सामाजिक क्षेत्रात काम करणाया युवकांना प्रशिक्षित करणे, युवकांच्यासाठी आर्थिक सामाजिक विषयांवरील कार्यशाळांचे आयोजन करणे, राजकीय सामाजिक चळवळींचे विश्लेषणात्मक अध्ययन करणे, वैचारीक संमेलनांचे आयोजन करणे, समाजासाठी आवश्यक असणाया महत्वांच्या विषयांवर पुस्तिका, ग्रंथांचे प्रकाशन करणे, विविध सामाजिक शास्त्रे, शिक्षण, साहित्य, संस्कृती या क्षेत्राच्या अभ्यासासाठी सुसज्ज ग्रंथालयांची उभारणी करणे, पुरस्कार देणे इ. ध्येय व उद्दीष्टे समोर ठेऊन संस्थेने यशस्वी वाटचाल सुरू केली आहे. अनेक चर्चासत्रे, कार्यशाळा शिबिरांमधून आजपर्यंत महाराष्ट्रातील फुले आंबेडकरी चळवळ, फाळणीचे राजकारण, स्वातंत्र्योत्तर मुस्लिम राजकारण, गांधी विचार, हिंदुत्वाचे विचार, महिला आरक्षण विधेयक, प्रसार माध्यमे आणि समाजपरिवर्तन यासारख्या ज्वलंत प्रश्नावर प्रा.राजेंद्र व्होरा, प्रा.सुहास पळशीकर, प्रा.राम बापट, श्रीमती नलिनी पंडीत, श्रीमती मृणाल गोरे, श्री.कुमार केतकर यासारख्या तज्ञ व्यक्तिंना निमंत्रित करून कार्यशाळा शिबीरे यशस्वी केली.[६५] विचारवेध संमेलने हा आकादमीचा राज्यव्यापी उपक्रम म्हणून ओळखला जातो. विसाव्या शतकाच्या

शेवटी या शतकातील विविध क्षेत्रातील घडामोडींचे चिकित्सक परामर्ष घेणारी ही संमेलने सन १९९४ पासून महाराष्ट्राच्या विविध भागात तेथिल परिवर्तनवादी संघटनांच्या संयोजनाखाली भरवली गेली. आकदमीच्या या उपक्रमाला शिवाजी विद्यापीठाच्या मान्यताप्राप्त उपक्रमांच्या यादीत मान्यता आहे. या आकादमीने केलेल्या कार्याची पोचपावती भारताबाहेरून मिळाली आणि अमेरिकास्थित 'महाराष्ट्र फौंडेशन' या संस्थेचा सन्मानाचा पुरस्कार आकादमीस मिळाला.[६६]

**७.अंधश्रध्दा चळवळ :**

श्री. श्याम मानव यांच्या इ.स.१९८३ साली स्थापन झालेल्या अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्य सातारमध्येही सुरू झाले. या चळवळीचा प्रचार प्रसार सातारमध्ये झाला पण नंतर इ.स.१९८९ मध्ये त्यापासून वेगळे होऊन डॉ.नरेंद्र दाभोळकरांनी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती स्थापन केली. लोकांमध्ये भूतबाधा, करणी, जोतिष, बुवाबाजी, अंगात येणे, नरबळी, चमत्कार, मंत्रशक्ती, भानामती यासारख्या अनेक चुकीच्या प्रथा परंपरांना विरोध या चळवळीच्या माध्यमातून केला गेलेला आहे. वैज्ञानिक दृष्टीकोणाचा पाठपुरावा करण्यासाठी सामाजिक विचारवंतांची व कार्यकर्त्यांची साताराच नव्हे तर महाराष्ट्रभर चर्चासत्रांचे आयोजन केले गेलेले आहे. या चळवळीतून सदाचार, स्वच्छता, श्रमप्रतिष्ठा, स्त्री पुरूष समानता, सत्यशोधी विचार, शिक्षणातून वैज्ञानिक जाणिव करून देणे अशा अनेक वैज्ञानिक दृष्टीकोनाचा प्रसार महाराष्ट्रभर केला जातो.

अंधश्रध्दा समितीने स्थापनेपासून आजपर्यंत महाराष्ट्रभर प्रमुख मोहीमामध्ये शोध भुतांचा बोध मनाचा, मोहीम सर्वयात्रा, बुवाबाजी संघर्ष यात्रा परिषद, भानामती धडक मोहीम, चमत्कार सत्य शोधक मोहीम, वैज्ञानिक जाणिव कृती परिषद, महिला जाहीरनामा सभा परिषद मोहीम सर्व महाराष्ट्रभर यशस्वीपणे पार पडल्या आहेत व मोठया प्रमाणात समाज जागृतीचे काम केले आहे.[६७] डॉ.नरेंद्र दाभोळकर यांनी बुध्दीनिष्ठ समाजनिर्मितीसाठी बहुमुल्य योगदान दिले.

**८.कामगार चळवळ :**

दुसरे महायुध्द व स्वातंत्र्यानंतर औद्योगिकरणाचा प्रसार झालेला असल्यामुळे सातारमधील कामगार चळवळ याच काळात निर्माण झाली. भारतीय कामगार संघटना कायदा १९२६ नुसार सन १९५१ मध्ये सातारमध्ये कामगार संघटनेची नोंदणी झाली.[३८] सन

१९५२५३ मध्ये हॉटेलकिपर असोशिएशन, सराफ असोशिएशन व काच कामगार संघटनांखची नोंद झाली होती. मार्च १९५६ अखेर सातारा जिल्हयात कामगार संघटना कायदा नुसार १२ संघटनांची नोंद झालेली होती. नंतरच्या काळात साखर, अभियांत्रिकी, खाद्यपदार्थ तयार करणारे, अधातू खनिज पदार्थ इ.कारखाने सुरू झाल्यामुळे नविन कामगार संघटना उदयास आल्या. सन १९९०९१ मध्ये जिल्हयात ७८ संघटना होत्या तर सभासद २०६१७ इतके होते.[६८]

सातारा जिल्हयाचे कामगार नेते म्हणून प्रामुख्याने कॉम्रेड प्रभाकर महाबळेश्वरकर यांना ओळखले जाते. कामगारांची होणारी पिळवणूक, त्यांच्यावर होणारा अन्याय थांबवण्यासाठी त्यांनी वेळोवेली लढे दिले. सातारा जिल्हा 'जनरल वर्क्र्स युनियन 'ची स्थापना केली. संपुर्ण जिल्हयातील कामगारांना प्रेरीत करून त्यांना त्यांच्या न्याय्य हक्कांची जाणिव करून दिली. गोरगरीब महिला, नगरपालीका श्रमजिवी, कष्टकरी यांच्या अन्यायाविरूध्द सतत वाचा फोडली व चळवळीच्या माध्यमातून अनेकांना आर्थिक मदत मिळवून दिली. समाजातील गरीब कामगार, कष्टकरी जनता यांच्या चेहऱ्यावरील हास्य हेच आपल्या श्रमाचे फळ म्हणून कार्य करत होते.[६९]

**९.स्त्री चळवळी :**

समतेच्या चळवळीत स्त्रियांचा सहभाग आणि स्त्रियांचे योगदान फार मोठे होते. या चळवळींनी सामील समाजात स्वातंत्र्य आणि समता हे मूल्य रूजविण्यात हातभार लावला होता. स्त्रियांच्या प्रश्नांच्या वाच फोडण्याचे काम करणाऱ्या अनेक संस्था सातारा जिल्हयात स्थापन झालेली होती. सन १९३५ साली सातारमध्ये पहीले 'महिला मंडळ' स्थापन झाले व ते ऑल इंडीया वूमन्स असोशिएशनला जोडून घेतले होते. सन १९४० मध्ये सातारा येथे महाराष्ट्र महीला मंडळाचे अधिवेशन भरले होते.[७०] सुरूवातीच्या काळात अडाणी निरक्षर स्त्रीयांना साक्षर करणे, गरीब स्त्रियांना व मुलांना फुकट वैद्यकीय सल्ला देणे अशा पध्दतीची महीला मंडळाची कामे होती.[७१] सन १९४८ साली सातारा येथे जिल्हा महिला परिषदेचे अधिवेशन भरले होते व पुण्याच्या सौ.इंदीराबाई देवधर अधिवेशनाच्या अध्यक्षा होत्या. या अधिवेशनाला जिल्हयातील महीलांची संख्या मोठया प्रमाणावर होती. स्त्री अत्याचार, समाजाची तिला मिळणारी वागणूक, शिक्षण, लैंगिक अत्याचार, स्त्रीयांचे असंख्य प्रश्नावर या महीला मंडळांनी वाचा फोडली व अनेक समाजोपयोगी कामे केली.[७२]

१९९० च्या दशकानंतर सातारा जिल्हयात स्त्रीयांच्या प्रश्नांवर, त्यांच्या हक्कांसाठी लढा देणाया अनेक संस्था आणि व्यक्ती उदयास आल्या.डॉ.वर्षा देशपांडे, ॲड.वर्षा माडगुळकर, श्री.छ.सौ.वेदांतीकाराजे भोसले, सौ.अंजली महाबळेश्वरकर यांनी स्त्रियांच्या प्रश्नांवर आवाज उठवलेला दिसतो. या महीला संघटनेच्या नेत्यांनी स्त्री भ्रुण हत्या,सहकारातून स्त्रियांचा विकास घडवून आणने तसेच धुणीभांडी, अंगणवाडी सेविका यांच्यासंबंधीचा लढा देत आहेत.

**१०.सत्यशोधक चळवळ :**

महात्मा जोतीबा फुले यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाचे प्रचार आणि प्रसाराचे कार्य स्वातंत्र्योत्तर काळातही अव्याहतपणे चालू होते. सर थॉमस पेन, महात्मा कबीर व संत तुकाराम यांच्या विद्रोही विचारांचा फार मोठा प्रभाव महात्मा फुले यांच्यावर होता. सर थॉमस पेन यांच्या ‘एज ऑफ रिझन’ हा ग्रंथ सत्यशोधक समाजाच्या स्थापनेसाठी प्रामुख्याने प्रेरक ठरला.२४ सप्टेंबर १८७३ रोजी छोटेखानी सभा घेऊन महात्मा जोतीबा फुले यांनी ‘सत्यशोधक समाजा’ची स्थापना केली. दलित व बहुजन समाजाच्या मानेवरील वर्णाश्रम धर्माचे ‘जू’ उतरवण्याचा प्रयत्न या सत्यशोधक चळवळीने केलेला दिसतो. वर्णसंघर्षाच्या विरोधात उठलेल्या या आवाजाचे पडसाद पुढे खुप काळापर्यत उमटलेले दिसतात.

स्वातंत्र्यपुर्व काळात सत्यशोधक समाजाची अधिवेशन मालिका सन १९११ पासून सन १९२५ पर्यंत जोरात होत गेली. त्यानंतर मात्र ही मालिका कधी मंदावली तर कधी खंडीतही झाली तर कधी तिने उसळी मारून जोरदार पुनरागमनही केले. मानवमुक्तीचा विचार घेऊन चाललेल्या या चळवळीने जेंव्हा जेंव्हा ही विचारधारा अडचणीत येत आहे असे वाटले तेंव्हा तेंव्हा नवे संदर्भ घेऊन विषमतेचा विचार पसरवणाऱ्यांना कडाडून विरोध केला. सातारा जिल्हयात कर्मविर भाऊराव पाटील, श्री.केशवराव विचारे, श्री.शंकर आबाजी बोंगार, श्री.रघुनाथराव राणे वकील, श्री. ए.बी.आचरेकर, श्री.रामभाऊ नलवडे वकिल, श्री. रामचंद्र शिंदे वकील, वाईचे श्री.रामचंद्र चव्हाण, केंजळचे श्री.मानसिंगराव जगताप इत्यादी मंडळी सत्यशोधक चळवळीचे कार्य करीत होती.[७३]

सातारा जिल्हयात २५ सप्टेंबर १९१९ रोजी सत्यशोधक समाजाची विभागिय परिषद पार पडली. या परिषदेत रयतेच्या विकासासाठी, अज्ञानाच्या गुलामगिरीत पिचणायांसाठी कर्मविर भाऊराव पाटील यांनी एक महत्वपूर्ण निर्णय घेतला आणि ‘रयत शिक्षण संस्थेचा’

ठराव या परिषदेत त्यांनी मांडला. या ठरावासोबतच त्यांनी वस्तीगृहांचा ठरावही मांडला. हे दोन्ही ठराव उपस्थितांनी एकमतांनी पास केले.[७४] रयतचे रोपटे लावून देशाभिमान आणि देशातील बहुजनांना स्वाभिमानाने उभे करण्याचा प्रयत्न केला म्हणून या परिषदेचे महत्व अनन्यसाधारण आहे.

सन १९१९ नंतर श्री.केशवराव विचारे यांनी सातारा जिल्हयात सत्यशोधक चळवळीच्या कार्यास सुरूवात केली. सन १९१९ ते सन १९५७ असे अडोतिस वर्ष त्यांनी म.फुल्यांच्या तत्वज्ञानाप्रमाणे कार्य केले. खेडयापाडयातील जनता शहाणी व्हावी. त्यांना बोलता यावे.त्यांच्यात जागृती व्हावी म्हणून त्यांनी ग्रामीण परिसरामध्ये लोकशिक्षणाच्या माध्यमातून परिवर्तन घडवण्याची ईच्छा बाळगून प्रौढ शिक्षणाची मोहीम सर्वत्र राबवली. त्यासाठी सत्यशोधक विद्यार्थी संघाची स्थापना केली. पोस्टल क्लासेस चालवले. लोकशिक्षणासाठी शेकडो शिबीरे घेतली. त्या शिबीरातून व क्लासेसमधून श्री. केशवरावांनी स्वतः शिकवले. समोरच्या अडाणी व्यक्तीस शिकवून शहाणा करणे हा त्यांचा स्वभावधर्म होता. इतिहास, धर्मशास्त्र, सहकार, अर्थशास्त्र इत्यादी अनेक विषयांचा त्यांचा दांडगा व्यासंग होता. एक मोठी शिष्य परंपरा त्यांनी निर्माण केली म्हणूनच सर्वजण त्यांना ‘गुरूजी’म्हणत. सत्यशोधक चळवळीत कार्य करीत असताना त्यांनी जवळचा पैसा खर्च केला.

कालमानाप्रमाणे त्यांनी सत्यशोधक चळवळीच्या कार्याचे स्वरूप बदलले. शेतकऱ्यांच्यात जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी सातारा जिल्हा शेतकरी संघाची स्थापना केली. त्यांच्यात ऐक्य निर्माण करून सहकार चळवळ रूजवण्याचा प्रयत्न त्यांनी केला. सामुदाईक शेतीचा प्रयोग त्यांनी यशस्वी करून दाखवला. शेती आधारीत नवनवे उद्योगधंदे काढले, सोसायटया काढल्या व शेती व्यवसाय सहकाराच्या माध्यमातून यशस्वी करण्याचा प्रयत्न केला. त्याच्या काळात सातारा जिल्हा व त्यांचे राहते गाव पाडळी (सातारा रोड) काही काळ सत्यशोधक चळवळीचे केंद्र बनलेले होते. ७ नोहेंबर १९५७ रोजी श्री.केशवराव विचारे यांचे निधन झाले आणि सत्यशोधक चळवळीचा आधारवडच एकदम नाहीसा झाला. त्यांच्या कार्यकालात त्यांनी सत्यशोधक समाजाचे अधिवेशनाचे नियोजन केलेले होते परंतू त्यांच्या आजारपणामुळे हे अधिवेशन झाले नाही.त्यांच्या निधनानंतर मात्र सन १९५८ साली पाडळी (सातारा रोड) तालुका कोरेगांव  येथे सत्यशोधक समाजाचे सतरावे

अधिवेशन २५ मे १९५८ रोजी आयोजित करण्यात आले. या अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानी श्री.केशवराव विचारे यांचे पुत्र श्री.रामभाऊ विचारे होते तर अधिवेशनाचे उद्धाटक भाई माधवराव बागल होते. या अधिवेशनात जातीभेद व अस्पृश्यता या विषयांवर अतिशय मार्मिक विचार श्री.भाई माधवराव बागलांनी मांडले.या अधिवेशनाला सातारा व कोल्हापूर या जिल्हयातील निवडक सत्यशोधक प्रतिनिधी उपस्थित होते. पाडळी (सातारा रोड) पंचक्रोशीतील जवळपास ५०० श्रोते या अधिवेशनाला उपस्थित होते व या अधिवेशनात सतरा ठराव पास झाले.[७५] यानंतर सन १९६२ साली मौजे भक्तवडी तालुका कोरेगांव जिल्हा सातारा या ठिकाणी सत्यशोधक समाजाचे अठरावे अधिवेशन पार पडले. या अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष रामभाऊ विचारे हे होते तर ॲड.वसंतराव फाळके यांनी या अधिवेशनाला मार्गदर्शन केले. या अधिवेशनाची जादा माहीती मिळत नाही. सन १९६२ नंतर सातारा जिल्हयाला सन १९६५ साली सत्यशोधक समाजाचे एकोणिसावे अधिवेशन आयोजित करण्याचा मान मिळाला परंतू या अधिवेशनाची नोंद घेण्यात आली नाही व मुंबईमध्ये श्री.बाळासाहेब देसाई अध्यक्ष व बॅ.रामराव आदिक स्वागताध्यक्ष असताना सन १९७१ साली झालेले अधिवेशन एकोणिसावे अधिवेशन म्हणून मानले गेले.[७६]

दि.२७ व २८ नोव्हेंबर १९९० रोजी महात्मा फुल्यांच्या स्मृतीदिनी पाडळी (सातारा रोड) तालुका कोरेगांव येथे सत्यशोधक समाजाचे एकविसावे अधिवेशन भरवण्यात आले. या अधिवेशनाच्या स्वागताध्यक्ष पदावर ॲड.वसंतराव फाळके हे होते. त्यांनी आपल्या स्वागताध्यक्षाच्या भाषणात सातारा जिल्हयातील सत्यशोधक परंपरेचा आढावा घेताना म्हटले की, सातारा ही सत्यशोधकांची कर्मभूमी आहे. जोत्याजीराव फाळके, आबाजीराव साबळे आणि केशवराव विचारे यांची ती सत्यशोधक कर्मभूमी आहे.[७७] सन २००१ पासून सातारा जिल्हयातील ॲड.वसंतराव फाळके हेच या सत्यशोधक समाजाचे अध्यक्ष आहेत. ज्या चळवळीचा आरंभ महात्मा जोतीबा फुले व सावित्रीबाई या थोर समाजसुधारकांनी केला होता व तो वारसा पुढे श्री.अण्णाजी लठ्ठे, ना.भास्करराव जाधव, श्री.मुकुंदराव पाटील, ॲड.केशवराव बागडे, श्री.केशवराव विचारे यांनी चालवला परंतू यांच्यानंतर ही सत्यशोधक चळवळ ज्या प्रमाणात विस्तारीत होणे गरजेचे होते त्या प्रमाणात ती झाली नाही. त्यामुळेच या चळवळीचे सतरावे अधिवेशन सातारा येथे झाले असता या अधिवेशनाच्या अनुशंगाने दिनमित्र या पत्रात

सत्यशोधक श्री.गंगाधर गणपतराव जेवरे यांचे पत्र प्रकाशित झाले त्यात त्यांनी सत्यशोधक चळवळीच्या अधिवेशनाचे अंतीम उद्दीष्ट स्पष्ट करून अधिवेशन केवळ अधिवेशनांची संख्या वाढवण्यासाठी भरवू नये असे सांगितले आहे.[७८] श्री.केशवराव विचारे यांच्यानंतर सातारा जिल्हयात सत्यशोधक चळवळीच्या विकासासाठी कार्य चालू आहे परंतू त्याला हवी तशा प्रमाणात गती मिळालेली दिसत नाही.

**सातारमधील सामाजिक कार्यकर्ते**

आपण ज्या सामाजिक चळवळींचा आढावा घेतला त्या चळवळींमधुन सातारचा चेहरा म्हणून ज्यांची नावे घेता येतील असे अनेक कार्यकर्ते आहेत त्यातील काही प्रमुख सामाजिक कार्यकर्ते पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**डॉ.आ.ह.साळुंखे**

महाराष्ट्रातील तसेच देशभरातील परिवर्तनावादी चळवळीला परिचयाचे असलेले एक प्रसिद्ध नाव, जेष्ठ विचारवंत, संत साहित्याचे गाढे अभ्यासक, विद्वान समीक्षक, थोर साहित्यिक, परिर्वन चळवळीचे आधारस्तंभ अशी ख्याती असलेले व्यक्तिमत्त्व, व्याख्याते आणि संस्कृतचे गाढे अभ्यासक डॉ.आ.ह.साळुंखे आहेत. यांचा जन्म सांगली जिल्हयातील खाडेवाडी या लहानशा गावी एका शेतकऱ्याच्या कुटुंबात झाला. शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथून संस्कृत विषयात प्रथम येत त्यांनी आपली पदवी घेतली. एम.ए. मध्येही त्यांनी संस्कृत विषयात प्रथम क्रमांक पटकावला. ते संस्कृत विषयात पीएच.डी.आहेत. यांची 'लोकायत' ही प्रकाशन संस्था आहे.[७९] ते सातारा शहरातील लालबहाद्दूर शास्त्री महाविद्यालयात संस्कृत विषयाचे ३१.०५.२००३ पर्यत विभागप्रमुख आणि कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठाचे विद्याशाखेचे अधिष्ठाता(फॅकल्टी ऑफ आर्टसचे डीन) व ॲकॅडमिक कौन्सिलचे सदस्य होते. त्यांना राष्ट्रभाषा पंडित म्हणून गौरवण्यात आले होते.

डॉ.आ.ह.साळुंखे यांनी मराठी विश्वकोशात तुलनात्मक र्धाशास्त्र, संस्कृत इत्यादी विषयात १०० हून अधिक लेख लिहिले आहेत. १९५९ पासून जाहिररित्या सभांमधून भाषणे देत असले तरी त्यांची महाराष्ट्रभर व्याख्याने १९८९०–८१ पासून सुरू झाली. त्यासुमारास डॉ.आ.ह.साळुंखे यांनी चार्वाकावर लिहिलेली लेखमाला वाईच्या नवभारत मासिकात प्रकाशित झाली आणि दुसऱ्या बाजूने किर्लोस्कर मासिकाच्या जून १९८१ च्या अंकात मराठा

समाजावरील आत्मनिरीक्षणात्मक स्वरूपाचा गाजलेला लेख प्रसिद्ध झाला. तेव्हापासून डॉ.आ.ह.साळुंखे यांना आखिल महाराष्ट्रातून व्याख्यानाची आमंत्रणावर आमत्रणे येऊ लागली.

**डॉ.आ.ह.साळुंखे यांची ग्रंथसंपदा**

डॉ.आ.ह.साळुंखे यांनी अनेक ग्रंथांचे लेखन केलेले आहे. त्यांच्या ग्रंथांची नावे पुढीलप्रमाणे सांगता येतील. अंधाराचे बुरुज ढासळले, अशीच भेटत रहा तू, आता आमच्या धडावर आमचेच डोके असेल, आस्तिक शिरोमणी चार्वाक, ऐतरेय ब्राम्हण :एक चिकित्सा, गुलामांचा आणि गुलाम करणाऱ्यांचा धर्म एक नसतो. गौतम बुद्ध, चांदण्यात भिजायचं राहून जाऊ नये म्हणून, चिंतन बळीराजा ते रविंद्रनाथ, तथागत बुद्ध आणि तुकाराम, तुकारामांचा शेतकरी, तुझ्यासह तुझ्याविना, तुळशीचे लग्न–एक समीक्षा, त्यांना सावलीत वाढवू नका धर्म की धर्मापलिकडे, परशुराम : जोडण्याचे प्रतीक की तोडणयाचे, परिवर्तन शास्त्रही कलाही, बळीवंश, बहुजनांसाठी जीवनवादी सुभाषिते, मनुस्मृतीच्या समर्थकाची संस्कृती, महात्मा फुले आणि धर्म, महाभारतातील स्त्रिया भाग १, महाभारतातील स्त्रिया भाग २, मित्रांना शत्रु करू नका, वादाची वादळे, विद्रोही तुकाराम, विद्रोही तुकाराम समिक्षाची समिक्षा, वैदकि धर्मसूत्रे आणि बहुजनांची गुलामगिरी हे ऑडियो सी.डी.स्वरूपात आहे. वैदिकांच्या सांस्कृतिक कोलांटउडया, शंभर कोटी मेंदू, दोनशे कोटी हात, शिवरायः संस्कार आणि शिक्षण, सर्वोत्तम भूमिपत्र : आक्षेप, सर्वोत्तम भूमिपत्र : आक्षेप, सर्वोत्तम भूमिपुत्र गौतम बुद्ध, संवादहृदय श्रोत्यांशी, हिंदू संस्कृती आणि स्त्री, नागार्जुन, शीख धर्मातील निरपेक्ष जाणिवा, स्वातंत्र्याचे भय इत्यादी.[८०]

**डॉ.आ.ह.साळुंखे यांना मिळालेले पुरस्कार व मानसन्मान**

डॉ.आ.ह.साळुंखे यांनी ज्याप्रमाणे अनेक ग्रंथांचे लेखन केले तसेच त्यांना राज्यस्तरीय, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय मानसन्मान व पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. त्यांनी ७ फेब्रुवारी १९९९ रोजी धारावी येथे झालेल्या पहिल्या विद्रोही साहित्य संमेलनाचे उद्‌घाटक, १०.०४.१९९९ रोजी रा.ना.चव्हाण प्रतिष्ठान वाईचा महर्षि वि.रा.शिंदे पुरस्कार, २४–२५ एप्रिल १९९९ रोजी जळगाव यथे गंगाधर पानतावणे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या परिवर्तन साहित्य संमेलनाचे उद्‌घाटक १७–१९ डिसेंबर १९९९ या काळात सातारा येथील आंबेडकर अकादमीमार्फत बेळगाव येथे आयेजित केलेल्या 'संस्कृती आणि इतिहास' या विषयावरील

विचारवेध साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद, ८–९ जुलै २००९ रोजी मराठा सेवा संघाने अमरावती येथे आयोजित केलेल्या मराठा साहित्य संमेलनाचे अध्यक्ष, बौद्ध साहित्य परिषदेच्या वतीने २४.११.२०१२ रोजी बीड जिल्हाात येथील पहिल्या बौद्ध साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद, वाशीम येथे २९.११.२०१२ रोजी झालेल्या जिजाऊ ब्रिगेडच्या झालेल्या तिसऱ्या राष्ट्रीय महिला अधिवेशनात प्रमुख वक्ते म्हणून सहभाग. पुणे येथे १६–१७ फेब्रुवारी २०१३ रोजी झालेल्या तिसऱ्या अण्णाभाऊ साठे साहित्य संमेलनाचे संमेलनाध्यक्ष, पुण्यात १७.०२.२०१३ रोजी झालेल्या पहिल्या छत्रपती शिवाजी महाराज साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद इ. मानची पदे त्यांनी त्यांनी भुषवलेली आहेत त्याशिवाय त्यांना छत्रपती प्रतापसिंहराजे महाराज(थोरले) यांच्या स्मृतीप्रित्यर्थ सातारा नगरपालिकेने १९.०१.२०१० रोजी दिलेला पुरस्कार, मारवाडी फांउडेशनच्या वतीने प्रबोधनकार ठाकरे यांच्या स्मृतीदिनानिमित्त देण्यात येणारा प्रबोधनकार ठाकरे पुरस्कार (नोव्हेंबर २०११) महाराष्ट्र शासनाचा दोनदा डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार, सामाजिक कृतज्ञता निधीचा डॉ राम आपटे पुरस्कार, पंढरपूरच्या कैकाडी मठाचा पुरस्कार, बीड येथील पिंगळे वाचनालयाचा महात्मा फुले पुरस्कार, तीन वेळा महाराष्ट्र साहित्य परिषदेचा पुरस्कार, शिवाजी विद्यापीठाचा पुरस्कार आणि अमेरिकेतील महाराष्ट्र फाउंडेशनचा साहित्य प्राप्त झालेले आहेत.[८१]

**डॉ.नरेंद्र दाभोळकर**

एखादया माणसाचा शाश्वत विचार गोळीच्या एखादया काडसुताने कधीच नष्ट होत नाही. अगदी आजही अमेरिकेत मार्टिन ल्यूथर किंगचा वारसा सांगितला जातो. त्यानेही छातीवर गोळया झेलल्या होत्या.[८२] कोटयावधी जनतेला मनातली वर्षानुवर्षे चिकटलेली अंधश्रध्देची जळमटे दूर करणारे डॉ.नरेंद्र दाभोळकर एक गांधीवादी विचारवंत होते. ते अंधश्रध्दा निर्मूलन समितीचे संस्थापक व कार्याध्यक्ष होते.साने गुरूजीच्या 'साधना'चे संपादक होते.एक परिवर्तनवादी विचारवंत म्हणून प्रसिध्द होते. व्यसनमुक्तीसंस्थेचे प्रमुख होते.डॉ.नरेंद्र दाभोळकर उत्तम कबड्डी प्रमुख होते. डॉ.नरेंद्र दाभोळकर हे सातारा जिल्हयाची अस्मिता आहे. फुले शाहू आंबेडकरांचा वारसा जपण्याचे काम त्यांनी सन १९८२ ते ऑगस्ट २०१४ पर्यंत केले. पुरोगामी चळवळीचे आधारवड होते.[८३] डॉ.नरेंद्र दाभोळकरांचा मूळ पिंड हा अस्सल कार्यकर्त्याचा होता. ते तरूण वयापासून सामाजिक कार्याकडे ओढले गेले आहेत. राष्ट्रसेवा

दलात काम करत असताना त्यांच्या सत्यशोधक आणि चिंतनशील प्रवृत्तीला चालना मिळत गेली. समाजातील विवेकाचा वाढता ऱ्हास आणि कालबाहय रूढी, परंपरा व अंधश्रद्धा यांचा वाढता घोर यांनी त्यांना त्याच काळात अस्वस्थ केले. म्हणूनच त्यांना एम.बी.बी.एस. झाल्यावर सुस्थापित, चांगले आयुष्य जगण्याची संधी नाकारावीशी वाटली. १९७७ साली सरकारी नोकरांचा संप घडला. राजपत्रित अधिकारी असूनही दणाणून भाषण केल्याने दाभोळकरांची नोकरी गेली. त्यांना वैद्यकीय सेवेच्या पहिल्या चार महिन्यातच सातारा नगरपालिकेत भ्रष्टाचाराविरूद्ध आंदोलन करून चौकाचौकात सभा घेतल्या.

## कौटुंबिक पार्श्वभूमी व शिक्षण

दाभोळकर कुटुंब तसे मूळचे सिंधुदुर्ग जिल्हयातील. सुमारे शंभर वर्षापूर्वी श्री.अच्युत लक्ष्मण दाभोळकर व ताराबाई दाभोळकर हे दापंत्य सातारा येथे येऊन स्थायिक झाले.ते वकिलीचा व्यवसाय करीत होते. डॉ.नरेंद्र दाभोळकर यांचा जन्म सातारा जिल्हयातील माहुली या गावी झाला. डॉ.नरेंद्र दाभोळकरांचे माध्यमिक शिक्षण साताऱ्यातील न्यू इंग्लिश स्कूल शाळेत झाले. त्यांनी सांगलीतील विलिंग्डन महाविद्यालयातून विज्ञान शाखेतील उच्च माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. ते राष्ट्रीय–आंतरराष्ट्रीय स्तरावरचे उत्तम कबड्डीपटू होते. कबड्डीवर असलेले एकमेव शास्त्रशुद्ध पुस्तकही त्यांनी लिहिले. कबड्डीतील योगदानासाठी त्यांना मानाचा शिवछत्रपती पुरस्कारही मिळाला. इ.स.१९७० साली मिरज वैद्यकीय महाविद्यालयातून वैद्यकीय शाखेचे शिक्षण पूर्ण केले व त्यानंतर त्यांनी सातारा येथे वैद्यकीय व्यवसाय सुरू केला. पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू श्री.देवदत्त दाभोळकर व थोर विचारवंत श्री.दत्तप्रसाद दाभोळकर हे त्यांचे थोरले बंधू होत. गुरूवर्य बबनराव उथळे गुरूजींच्या मार्गदर्शनाखाली, सातारच्या शिवाजी उदय मंडळात त्याची क्रिडा भरारी सुरू केली. वयाच्या १८ व्या वर्षी त्यांनी कबड्डीच्या मैदानावर पाऊल ठेवले.मंडळाचे प्रतिनिधित्व करून त्यांनी अनेक स्पर्धा गाजविल्या. पुढे शिवाजी विद्यापीठ संघातून त्यांनी आंतरविद्यापीठ मैदाने गाजविली. शिवाजी विद्यापीठ कबड्डी संघाचे ते कॅप्टन होते. कबड्डीमधील ‘हनुमान उडी’ व त्यांची पक्कड, चपळता, त्यांचे तंत्रशुध्द चढाई धोरण यावर प्रेक्षक फिदा व्हायचे.[८४] त्यांच्या खेळाची दखल महाराष्ट्र शासनाने घेऊन त्यांना छत्रपती पुरस्काराने सन्मानित केले.सन १९५८ मध्ये त्यांनी शिवाजी उदय मंडळाकडे खेळण्यास प्रारंभ केला.त्यांना कबड्डीबरोबर, खोखो, आटयापाटया, लंगडी या खेळात अभिरूची

होती. महाराष्ट्र राज्य शासनाचा श्री.शिवछत्रपती पुरस्कार दोनवेळा प्राप्त करणारे ते महाराष्ट्रातील एकमेव व्यक्ती होते. मिरज वैद्यकीय महाविद्यालयातून सन १९७० मध्ये ते एम.बी.बी.एस .झाले.

**सामाजिक क्रांतीचा, परिवर्तनाचा ध्यास**

डॉ.नरेंद्र दाभोळकरांनी एम.बी.बी.एस ची पदवी घेतली खरी, परंतु त्या क्षेत्रात ते कधीच रमलेले दिसत नाहीत. त्यांना ध्यास होता तो 'अंधश्रध्दा निर्मूलन' या सामाजिक चळवळीचा. एम्.बी.बी.एस् नंतर प्रारंभी काही काळ सरकारी नोकरी केली.केरळचे रॅशनॅलिस्ट बी प्रेमानंद, युक्रांदचे नेते डॉ.कुमार सप्तर्षी, तसेच १९६९ मध्ये भारतीय सर्वोदय संघाचे कार्याध्यक्ष असलेले बंधू श्री. देवदत्त दाभोळकर यांच्या प्रेरणने डॉ.नरेंद्र दाभोळकर यांणी आपल्या सामाजिक कार्याची सुरूवात केली. पुढे सरकारी नोकरांच्या संपात त्यांनी सरकारच्या विरोधात दणकून टीका केली.परिणाम त्यांची सरकारी नोकरी गेली. यानंतर पुढील १२ वर्षे त्यांनी शैला दाभोळकर यांचे समवेत सातारमध्ये सदाशिव पेठेत मेडिकल व्यवसाय केला. दरम्यानच्या काळात अंधश्रध्दा निर्मूलन समितीच्या कामाचा व्याप वाढू लागला व डॉ.नरेंद्र दाभोळकरांची ओढाताण होऊ लागली म्हणून त्यांचा वैद्यकीय व्यवसाय सोडून त्यांनी पूर्णवेळ अंधश्रध्दा निर्मूलन समितीचे काम केले.

**डॉ.नरेंद्र दाभोळकरांचे समाजकार्य**

बाबा आढाव यांच्या एक गाव–एक पाणवठा या चळवळीत डॉ.नरेंद्र दाभोळकर यांचा सक्रिय सहभाग होता. त्यानंतर त्यांनी श्री.शाम मानव यांच्या इ.स.१९८३ साली स्थापन झालेल्या आखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन साम्तिीमध्ये कार्य सुरू केले. पण नंतर इ.स.१९८९ मध्ये त्यापासून वेगळे होऊन त्यांनी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती स्थापन केली. साने गुरूजींनी स्थापन केलेल्या साधना या लोकप्रिय साप्ताहिकाचे ते डिसेंबर २००६ पासून मृत्यूपर्यंत संपादक होते. सन १९७० ते १९८२ या काळात त्यांनी समाजवादी युवक दलाचे काम केले.या युवा संघटनेच्या माध्यमातून 'एक गाव एक पाणवठा' ही चळवळ त्यांनी चालविली.या चळवळीनंतर मराठवाडा विद्यापीठाला डॉ. आंबेडकर यांचे नाव देण्यासाठी ते नामांतर चळवळीत सहभागी झाले.या चळवळीत दोन वेळा पंधरा दिवसांचा तुरूंगवास भोगवा लागला. डॉ.नरेंद्र दाभोळकरांनी एकदा शिक्षण प्रसारक या संस्थेमार्फत विविध उपक्रम राबविले.

या संस्थेला शासनाचा डॉ.आंबेडकर ‘दलित मित्र पुरस्कार’[८५] मिळाला. डॉ.नरेंद्र दाभोळकर बालपणी विद्यार्थीदशेत राष्ट्रसेवा दलाच्या मुशीतून तावून सुलाखून निघाले होते. अंधश्रध्दा निर्मूलन व व्यसनमुक्ती चळवळी करीता त्यांनी महाराष्ट्रभर पायपीट केली.

त्यांनी कुणाचा कधीही व्यक्तिगत व्देष केला नाही. आपले विचार त्यांनी कधीही कोणावर लादले नाहीत. जीवनाच्या अखेरच्या श्वासापर्यंत ध्येयासाठी ते लढत राहीले. देव न मानणारा हा ‘देवमाणूस’ वैचारिक संघर्षाकरीता अविरत भटकला. त्यांनी कधीच टोकाची भूमिका घेतली नाही. डॉ.नरेंद्र दाभोळकर समाज परिवर्तनाबाबत आग्रही होते. धर्माचे आधारे सत्तेचे राजकारण केले जाते असे ते म्हणत.[८६] आजची धार्मिकता ती नैतिकता नाही कारण धार्मिकतेच्या नावाखाली आक्रमक व असहिष्णू वर्तन काही धर्मवाद्याकडून होत असल्याचे ते म्हणतात.सत्तेच्या हितसंबंधाचे राजकारण पोप, शंकराचार्य, मौला, मौलवी, सय्यद सत्ताधायांच्या मदतीने करीत आहे असे ते सांगत. डॉ.नरेंद्र दाभोळकर म्हणतात, सोळा ते पंचवीस या वयात माणसाचे मन श्रध्दावादी किंवा बुध्दीवादी होते. बहुतेक व्यक्ती तडजोडवादीवृत्ती स्विकारतात.अंधश्रध्देचा त्याग करण्यासाठी कॉलेजमधील युवक व युवतीपुढे प्रामुख्याने प्रबोधन केले जावे. डॉ.नरेंद्र दाभोळकरांनी प्रबोधनात्मक लेखन केले.त्यांनी गावोगाव जावून लोकांशी संवाद साधला.[८७] प्रबोधनात्मक भाषण दिले.

परिवर्तन चळवळीबाबत डझनभर पुस्तक लिहीली.त्यांच्या भ्रम आणि निरास पहिल्या पुस्तकाची पहिली आवृत्ती ऑक्टोबर १९८५ मध्ये निघाली त्यात ते नमूद करतात की अंधश्रध्दा निर्मूलन ही मूलतः प्रबोधनाची चळवळ आहे. परंपरा, रूढी, चालीरिती या सर्वाबाबत सत्य कसे शोधावे याचा डोळसपणा शास्त्रीय पध्दतीने शिकवणारी ही चळवळ आहे. ही चळवळ सुशिक्षित व अशिक्षित या दोघासाठी आहे. मनोगतामध्ये या पुस्तकातील अंतरंगाबाबत व उद्देशाबाबत त्यांनी लेखन केले आहे. अधंश्रध्दा ‘प्रश्नचिन्ह आणि पूर्णविराम’ या त्यांच्या दुसऱ्या पुस्तकांची सोळावी आवृत्ती सप्टेंबर २०१३ मध्ये निघाली. या पुस्तकाची मांडणी ९ विषयात विभागली आहे. प्रबोधन व्याख्यानानंतर चर्चा होते व त्याठिकाणी श्रोत्यातून प्रश्न येतात व कार्यकर्ते त्याला उत्तरे देतात अशा आशयावर हे पुस्तक आहे.

बुवाबाजी, संमोहन, भुताने झपाटणे, आत्मा, पुनर्जन्म, प्लँचेट, भानामती, फलज्योतीष इ.बाबींवर हे पुस्तक आधारीत आहे. डॉ.नरेंद्र दाभोळकरांचे तिसरे पुस्तक अंधश्रध्दा विनाशाय

यात प्रत्यक्ष चळवळीतील अनुभव आहेत.वैज्ञानिक दृष्टीकोनाबद्दल यात चर्चा आहे. अशा प्रकारे चौथे पुस्तक विचार तर कराल यात थोडा वेगळा विचार आहे.मतीभानामती या पुस्तकाचा हेतू कथन करताना डॉ.नरेंद्र दाभोळकर लिहीतात, प्रत्यक्षात अंधश्रध्दा निर्मूलन समिती गेली पंचवीस वर्षे भानामती विरोधी संघर्ष करत आहे. अचानकपणे घरावर दगड पडणे, कपडे फाटणे अगर जळणे, अन्नात विष्ठा/मीठ मिसळणे, अंगावर ओरखडे उठणे, बिब्ब्याच्या फुल्या उठणे इ. बाबी गेल्या २५ वर्षात २५० हून अधिक घडल्या या समितीने यशस्वीपणे सोडविल्या. 'तिमीरातुन तेजाकडे' या ग्रंथाची पहिली आवृत्ती एप्रिल २०१० मध्ये निघाली व ऑक्टो २०१३ मध्ये पाचवी आवृत्ती निघाली. प्रबोधन, लेखन करून त्यांनी पुरोगामी विचार खेडयापाडयात पोहचविला. जादूटोणाविरोधी कायदा करण्याकरीता ते आग्रही होते. सनातन्यांचा या जादूटोणाविरोधी कायदयाला विरोध होता. त्यांच्या प्रदिर्घ मुलाखतीत ते म्हणतात, "सनातन्यांचा विरोध हा समाजद्रोहच आहे. याबाबत त्यांनी त्यांची भूमिका स्पष्ट केली.फौजदारी कायदा जसा सर्वासाठी तसाच हा कायदा असावा. कायदयाने समाज बदलत नाही हे अर्धसत्य आहे. कायदयाशिवाय समाज बदलू शकत नाही.हे पूर्ण सत्य आहे. कठोर कायदा आणि चोख अमलबजावणी यामुळे परिस्थिती बदलेल अशी त्यांची भुमिका होती."[८८]

**अंधश्रध्दा निर्मूलन चळवळ**

स्वतः डॉ.नरेंद्र दाभोळकरांनी वृत्तपत्रातून लेखन केले. डझनभर पुस्तके लिहून आपले विचारसमाजपर्यंत पोहचविले.ही चळवळ मूलतः प्रबोधनाची चळवळ आहे.[८९] गुढ वाटणाऱ्या गोष्टी याबाबतचे सत्य कसे शोधावे. याचा डोळसपणा शास्त्रीय पध्दतीने शिकणारी चळवळ आहे.आपल्या समाजात याची गरज आहे. ही चळवळ अशिक्षित व सुशिक्षित या दोघांसाठी आहे.[९०] समाजात अनेक अंधश्रध्दा आहेत.शकून अपशकून आहेत.मांजर आडवे जाणे, पाल चुकचुकणे, दिवा विझणे, भात खाल्ला की जखमेत पू होणे, बुवाबाजी, भुताखेताने झपाटणे, देव अंगात येणे अशा गैरसमजूती आहेत.या अपशकूनसारखे चमत्कार करून सर्वसामान्य लोकांना भूरळ पाडून स्वार्थ साधणाया मंडळीविरोधी डॉ.नरेंद्र दाभोळकरांना लढाई करावी लागली. बुवाबाजी, भानामती चमत्कार होणाऱ्या ठिकाणी कार्यकर्त्यासह डॉ.नरेंद्र दाभोळकर भेट देत. तेथील प्रकाराचा शोध घेत. सत्याचा शोध घेत.व त्यावर प्रबोधन करीत. डॉ.नरेंद्र दाभोळकरांनी बुवाबाजी, भानामती चमत्कार, अनिष्ट रूढी, परंपरा अशा सर्व प्रकारच्या अंधश्रध्दांच्या

विरोधात अथक संघर्ष केला. प्रत्यक्ष भेटी, वस्तुस्थितीचा अभ्यास, सत्याचा शोध, चिंतन, प्रबोधन, लेखन इ. व्दारे त्यांनी समस्येवर उपाय करण्याचे प्रयत्न केले[९१]. त्यांचे भ्रम आणि निवास, अंधश्रध्दा, अंधश्रध्दा विनाशाय, विचार तर कराल.श्रध्दा अंधश्रध्दा या ग्रंथाव्दारे त्यांनी लोकांशी थेट संपर्क साधला.

**अंधश्रध्दा निर्मूलन व व्यसनमुक्ती चळवळ**

अंधश्रध्दा निर्मूलनाचा विचार, उच्चार, संघर्ष व त्यांची सैध्दांतिक मांडणी या पाचही आघाडयांवर अंनिस व डॉ.नरेंद्र दाभोळकर कार्यरत होते.त्यांचे विचार व त्यांची मांडणी तात्विक मांडणी स्तुत्य आहे.कृतिशीलतेमुळे त्यांच्या विचारांना आत्मप्रत्ययाची झळाळी प्राप्त झालेली आहे.[९२]त्यांचा 'गणेश मूर्तीचे विसर्जन नको दान करा' हा विचार ऑगस्ट १९९९ वृत्तपत्रातून त्यांनी व्यक्त केला.[९३] तसेच दारूबंदी विरूध्द महिलांनी संघटन करावे हा विचार त्यांनी ३०.५.८९ मध्ये वृत्तपत्रातून दिला.[९४](ऐक्य) डॉ.नरेंद्र दाभोळकर यांचा धर्म, श्रध्दा यांचा दांडगा अभ्यास होता. डॉक्टर असल्याने त्यांचा वैज्ञानिक दृष्टिकोन उत्तम होता. सन १९८२ ते ऑगस्ट २०१३ पर्यंतचा ते पूर्णवेळ अनिसचे कार्यकर्ते राहिले. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या माध्यमातून समाजातील अंधश्रद्धा, अनिष्ट रूढी, परंपरा मोडीत काढण्यासाठी लोकप्रबोधन करण्यात येते. महाराष्ट्र जादूटोणा विरोधी विधेयक विधीमंडळात मंजूर व्हावे, यासाठी डॉ.नरेंद्र दाभोळकर कार्यरत होते. या संदर्भात सातत्याने विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांच्या भेटी घेऊन विधेयकाच्या बाजूने सर्व पक्षीय मत बनवण्याचे काम ते करीत होते. समाजातील अनेक भोंदूबाबाचे पितळ डॉ.नरेंद्र दाभोळकर आणि अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्यकर्त्यांनी सप्रयोग उघड केले होते.

महाराष्ट्रातील १८० शाखाद्वारे सर्व जिल्हयात कार्यरत राहिले. त्यांनी वृत्तपत्रातून सातत्याने लेखन केले.त्यांनी हजारो व्याख्याने दिली.[९५] अंधश्रध्दा निमूर्लनाकरिता अथक संघर्ष केला. समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन रूजविण्याचा अथक प्रयत्न केला.[९६]'साधना' या साने गुरूजींच्या साप्ताहिकाचे बारा वर्षे संपादक, दशकातला सर्वोत्तम कार्यकर्ता म्हणून २००६ साली 'महाराष्ट्र फाउंडेशन'(अमेरिका)चा १० लाखांचा पुरस्कार मिळाला. ही सर्व रक्कम त्यांनी 'अनिस' ला प्रदान केली.[९७] डॉ.नरेंद्र दाभोळकरांचे जीवन म्हणजे अंधश्रध्दांच्या विरोधातील रोमहर्षक लढतीचे जीवंत चित्रण होय.[९८]

**पुरस्कार**

डॉ.नरेंद्र दाभोळकरांचे आंतरराष्ट्रीय पातळीवरील कबड्डीपटू म्हणून निवड झालेली होती आणि त्यांचा भारत विरूद्ध बंगलादेश या कबड्डी कसोटी सामन्यासाठी भारतीय संघाकडून गौरव झालेला होता. त्यांना व्यक्तिगत कौशल्याची सात सुवर्णपदके मिळालेली होती. त्याचबरोबर महाराष्ट्र शासनाचे शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार व शिवछत्रपती युवा पुरस्कार हे त्या–त्या क्षेत्रातील दोन्हीही सर्वोच्च पुरस्कार मिळविणारी डॉ.नरेंद्र दाभोळकर ही एकमेव व्यक्ती होती. महाराष्ट्र शासनाचा पुस्तक लेखनासाठी अंधश्रद्धा : प्रश्नचिन्ह आणि पूर्णविराम, ऐसे कैसे झाले भोंदू व अंधश्रद्धा विनाशाय या पुस्तकांना उत्कृष्ट ग्रंथनिर्मितीचा पुरस्कार. याशिवाय विविध मान्यवर संस्थांचे पुरस्कार. या सोबतच सामाजिक संस्थाकडून डॉ.नरेंद्र दाभोळकरांचे अनेक वेळा सन्मान करण्यात आले होते. महाराष्ट्र फौंडेशन, अमेरिका यांच्यामार्फत न्यूजर्सी येथे दशकातील सर्वोत्तम कार्यकर्ता हा दहा लाखाचा डॉ.नरेंद्र दाभोळकर यांना पुरस्कार मिळाालेला होता. एकूणच डॉ.नरेंद्र दाभोळकरांचे आयुष्यही अंधश्रद्धा निर्मूलनाची चळवळ बनले होते आणि प्रशंसनीय गोष्ट ही की, त्यांनी स्वतःचे भक्त किंवा अंधानुयायी निर्माण केलेले नाहीत. जे कार्यकर्ते या चळवळीत सहभागी होतात ते स्वतःला पटणाऱ्या विचारासठी, ध्योयाच्या दिशेने पुढे वाटचाल करतात. वेगवेगळ्या समस्यांवरच्या चळवळींना लोक पाठिंबा मिळू शकतो. पण अंधश्रद्धा निर्मूलनाकडे अजूनही देव–धर्माविरोधी चळवळ म्हणून काहीसे संशय व संभ्रमाने पाहिले जाते. अशा वेळी विवेकनिष्ठ दृष्टिकोनाचा झेंडा बळकटपणे वाहून नेण्याचे कार्य, ही चळवळ लोकमानसात रूजविण्याचे काम डॉ.नरेंद्र दाभोळकर यांनी केलेले आहे.

डॉ.नरेंद्र दाभोळकर यांची मंगळवार २० ऑगस्ट २०१३ रोजी सकाळी साडेसात वाजता पुण्यातील बालगंधर्व रंगमंदिरानजीक असलेल्या महर्षी शिंदे पुलावर किंवा ओंकारेशवर पुलावर अज्ञातांनी ४ गोळया झाडून हत्या केली. सामाजिक चळवळीचा अर्ध्वयू अशा रितीने संपवण्यात आला परंतू त्यांच्या मृत्यूने ही चळवळ थांबली नाही उलट जोमाने पुढे आली कारण व्यक्ती मृत झाल्याने त्याचे विचार संपत नसतात.

**रा.ना.चव्हाण**

सत्याशोधक समाजातील एक निष्ठावंत समाजप्रेमी जवळजवळ साठ वर्षे समाज प्रबोधन व परिवर्तन यासाठी सातत्याने अव्याहतपणे लेखणी ओघवती ठेवणारे वैचारिक लेखक आणि

बहुनज समाजाचे विनयशील हितचिंतक म्हणजेच श्रेष्ठ व प्रतिष्ठित परंतु प्रसिद्धी परामुख रा.ना.चव्हाण होत. वाईसारख्या "दक्षिण काशी" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कर्मठ तीर्थक्षेत्री २९ ऑक्टोबर १९१३ मध्ये त्यांचा जन्म झाला. वाईत प्राथमिक शिक्षण पार पाडून पुढील इंटरपर्यंतचे शिक्षण पुण्यास स.प.महाविद्यालयात झाले. शाळा, कॉलेजमध्ये असताना वाचनाची आवड वाढत गेली. वडिलांची आध्यात्मिक ग्रंथ वाचनाची आवड अंगी रूळली. पुढे राष्ट्रीय चळवळीचा जोर वाढत गेल्याने क्रमिक पुस्तकाखेरीज इतर वैचारिक वाचन वाढत गेले. पुण्याच्या वास्तव्यात तरूण रामचंद्रावर(१९३४–३६) त्यावेळच्या सामाजिक, राजकीय जागृतीचा मोठा परिणाम झाल. महर्षी वि.रा.शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील, श्री. जवळकर व अनेक निर्भिड विचारवंतांची व्याख्याने ऐकण्याचे योग आले. विशेषतः १९१९ नंतर वाईच्या रविवार पेठेत सत्यशोधक चळवळीच्या झऱ्यास अखंड ओघ येत राहिल्याने पुढे महर्षी वि.रा.शिंदे यांचे वाईस सारखे येणे–जाणे होत राहिले. पुण्याचे समाजसुधारक वि.रा.शिंदे, रा.ना.चव्हाणांना गुरूतुल्य होते. महर्षींच्या भव्य व्यक्तिमत्त्वाने व उदात्त विचारसरणीने ते भारून गेले. त्यांच्या सहवासातून –व्याख्यानांमधून विचारातून तौलनिक, तटस्थ व समन्वयक लेखन करण्याची दिशा त्यांना मिळाली. नोकरीचा व्याप सांभाळीत, प्रपंचाला हातभार लावत असताना त्यांनी स्वतःच्या वाचन–लेखनात कधीही खंड पडू दिला नाही. वयाच्या २३ व्या वर्षी १९३६ मध्ये प्रार्थना समाजाचे मुखपत्र –सुबोधपत्रिकेत "ब्राम्हधर्म व बहुजन समाज" हा पहिला लेख लिहून त्यांनी आपल्या अखंड लेखन कार्याचा प्रारंभ केला. त्यात वि.रा.शिंदे यांच्या विविध लेखनातील तटस्थवृत्ती व अलिप्तता यातून रा.ना.चव्हाण यांच्या लिखाणास प्रेरक व चैन्यदायी पुष्टीच मिळाली. पक्षनिरपेक्षता, समाजप्रबोधन हे लेखनाचे कायमचे वर्धमान ध्येय बनले."तू बहुजन समाजाच्या बाजूने लिही–माझ्यापेक्षा चांगले लिहीतोस"[९९] ही म. शिंदे यांची गुरूवाणी मनात कायम ठसली. हळूहळू लिखाणास सहागत्या प्रौढत्व व प्रसन्न शैली प्राप्त झाली. त्यातून दुर्मिळ साधन–संदर्भ ग्रंथ व प्राचीन लेख पत्रांचा शिस्तबद्ध संग्रह करण्याची वृत्ती जोपासली गेली. स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळात बहुजन समाज जागरणाचे कार्य अत्यंत निष्ठापूर्वक करणारा रा.नां. च्या सारखा अन्य ज्ञानोपासक दाखविणे अवघड आहे. त्यांनी राजकाराणात अग्रेसर असणाऱ्या बहुजन नेत्यांशी जवळीक साधून कधीच वैयक्तिक कामासाठी काही केले नाही. त्यांचे विविध सामाजिक विषयावरील लेखन ते सतत नियतकालिकांतून प्रसिद्ध करीत.

पण व्यक्तिगत प्रसिद्धीची त्यांना कधीच अपेक्षा नसे. समाजहितैषी वृत्तीने समाजासाठी निरंतर विधायक काम करत राहणे हेच त्यांचे जीवित ध्येय होते.

स्वातंत्र्योत्तर काळात अशी माणस फारच थोडी दिसतात. वाईसारख्या आडगावी राहून "रा.ना. चव्हाण साऱ्या महाराष्ट्रातील सामाजिक कार्यकर्त्याशी एकजीवभावाचे नाते ठेवून होते." श्री. रा.ना. चव्हाण लहानपणापसूनच विविध विषयांचे वाचन करण्याचा व टिपणे करून ठेवण्याचा नाद होता. १९२० ते १९२८ या काळात वाईतील सत्यशोधक चळवळीचे नेतृत्त्व यांच्या वडिलांकडे होते. त्यामुळे कुमारवयातच त्यांना सामाजिक प्रश्नांची जवळून ओळख घडू शकली. सन १९३३ पासूनच त्यांना महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्यासारख्या ज्ञाननिधीचा उत्कट सहवास लाभला. १९४५ पासून पुढे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा सहवास मिळाला. पण तर्कतीर्थांच्या ज्ञानोपासनेशीच रा.ना. संबद्ध राहिले. विश्वकोशकार्यातही त्यांनी महत्त्वाचा भाग घेतला.

तर्कतीर्थांचे जोतिनिबंध पुस्तक गाजले या पुस्तकाची प्रस्तावना रा.ना. यांची आहे. हे काम करण्यात तर्कतीर्थांना रा.ना.ची बरीच मदत झाली. पुढे त्यांच्याशी काही वेळी मतभेद झाले. पण ते वैचारिक. त्यातून व्यक्तिगत संबंधात कटुता आली नाही. ब्राम्हणेत्तर कार्यकर्त्याची एक मोठी मालिकाच महाराष्ट्राला सत्यशोधक चळवळीने दिली. त्यात एक अत्यंत प्रामाणिक, प्रसिद्ध परामुख विनम्र अन समंजस स्वभावाचे, तत्वनिष्ठ अन् ज्ञानसंपन्न कार्यकर्ते म्हणून रा.ना.चव्हाणांचे व्यक्तिमत्त्व विशेष उठून दिसते. सामाजिक चळवळीचा अभ्यास १९४५ ते १९५४ या कालावधीत वाईत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्यकडे जाणे–येणे वाढले.

लक्ष्मणशास्त्री जोशी हे मानवेंद्ररॉय यांच्या नवमानवतावादी विचारसरणीचे प्रवक्ते असल्याने त्यांच्या बरोबर सहजस्फूर्त गप्पा चर्चा होत राहिल्या.म. फुल्यांच्या पुस्तकांचे सार सांगणारे 'जोतिनिंबध' या तर्कतीर्थांनी लिहिलेल्या पुस्तकास रा.ना.चव्हाणांनी उत्स्फूर्त संदर्भ ग्रंथ व तपशील पुरविण्याचे सहकार्य करून त्या पुस्तकाची प्रस्तावना लिहिली. वाईच्या कर्मठ प्रभावावर लक्ष्मणशास्त्री जोशी यांनीच नवमानवतावाद व प्रबोधन यांचा साज चढविला. अशी रा.ना.चव्हाण त्यांची प्रशंसा करीत.[१००] १९ व्या शतकातील समाजप्रबोधन चळवळीचा एवढा तावून सुलाखून अभ्यास रा.ना.चव्हाणांएवढा कोणीच केला नसेल. छ.शाहू महाराज, महात्मा फुले, म.विठ्ठल रामजी शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे पुरोगामी

विचार प्रवाह वाहते ठेवण्याचे सात्विक व मौलिक कार्य इतक्या मनःपूर्वक व विनयशीलतेने कोणी केलेले नाही हे प्रकाशात येऊ लागले आहे. लेखनात मूलगामी संशोधक वृत्तीची जपणूक करून फक्त विषयाच्या मुळाशी जाण्याचा चिकित्सक आग्रह न धरता सोदाहरणाने सत्यान्वेषण मांडण्याची त्यांची वैशिष्ट्यपूर्ण लेखन घाटणी आहे.

वाईच्या इतिहासातच नव्हे तर महाराष्ट्राच्या समाजिक इतिहासात त्याची कायमची नोंद होईल. त्यांची लेखनसंपदा म्हणजे समाज व शासनास लाभलेला अचंबित ठेवा आहे. महाराष्ट्रातील राष्ट्रवीर, मराठा–जागृती सुबोधपत्रिका, दीनबंधू, अस्मितादर्श नवभारत, गावगाडा अशा अनेक प्रज्ञावंत व दर्जेदार विचारप्रधान नियतकालिकामधून निरपेक्षतेने लेख देत राहिले. समाज–प्रबोधनाचे काम कधीच थंडावू दिले नाही. ब्राम्हण–ब्राम्हणेत्तर संघर्षाच उजाळा न देता अत्यंत धूर्तपणे व सावधपणे बहुजन समाजाचे हित अबाधिक ठेवण्याचे अप्रतिम कौशल्य त्यांच्या लेखनात होते. समाज जीवनात समंजसपणाचे, खेळीमेळीचे व चांगुलपणाचे असावे या अंतउर्मीतून आपले मतप्रदर्शन करताना कागदोपत्रीचा आधार देऊन, ठासून ठाम भूमिका मांडत. वादग्रस्त विधानांना काटछाट देऊन संयमशीलतेने या विपुल लेखनाद्वारे जनता जनार्दनाची यथाशक्ती सेवा करीत राहण्यातच त्यांना जीवनाची धन्यता वाटते असे ते म्हणत असत.

त्यांनी फोडीले ज्ञानाचे भांडार धन्याचा हामाल मी तो हमाल भारवाही हा बाणा कधीच सोडला नाही. वयाच्या २२ व्या वर्षापासून अखेरपर्यंत 'ज्ञानभांडार' मुक्तपणे समाजाप्रत सुपुर्द करण्यात प्रयत्नशील राहिले. श्री. रा.ना. चव्हाण यांच्या १० एप्रिल या स्मृतिदिनी त्यांच्या किंवा त्यांच्याविषयी दरवर्षी एक ग्रंथ प्रकाशित झाला आहे. असे प्रसिद्ध झालेले ग्रंथ पुढीलप्रमाणे आहेत. स्मृतिग्रंथ (रानांच्या आठवणी), (१९९४) जनजागरण (रानाचे निवडक लेख), (१९९५) सेवितो हा रस वांटितो अनेक, भाग १ ला (रानांचे धर्मचितंनपर लेख) (१९९७), सेवितोहारसवांटितो अनेकां, भाग ३ रा (रानांचे धर्मचिंतनपर लेख) (१९९८), प्रबोधिन (रानांचे ऐतिहासिक चिंतनपर लेख) (१९९९), परिवर्तनाची क्षितिजे (रानांचे निवडक लेख) (२०००) महर्षी शिंदे : शोध व बोध (२००१) राजर्षी शाहू कार्य व काळ (२००२), रा.ना.चव्हाण विचारबोध (संकलन–२००३), रा.ना.चव्हाण यांचे साहित्य अक्षरवेध (साहित्यसमीक्षा), गौतम बुद्ध व त्याचे बौद्ध दर्शन, ग्रामीण महाराष्ट्राची शिक्षण परंपरा कर्मवीर

भाऊराव पाटील आणि शिक्षणानंद बापूजी साळुंखे, जनजागरण, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, परिवर्तनाची क्षितीजे, प्रबोधन, भारतीय संस्कृती व तिची वाटचाल (वैचारिक), महर्षी शिंदे यांच्या आठवणी, महर्षी शिंदे : शोध व बोध, महात्मा फुले यांचा शोध आणि बोध, महात्मा फुले, सत्यशोधक समाज व सामाजिक प्रबोधन, महाराष्ट्र आणि मराठे, महाराष्ट्राचे उपेक्षित मानकरी राजारामशास्त्री भागवत, डॉ.बाबासाहेब आंबेडकर व दलित चळवळ एक मागोवा, यशवंतराव चव्हाण यांचे समाजकराण, राजर्षी शाहू महाराज यांची सामाजिक विचारधारा व कार्य लोकनेते राजर्षी शाहू महाराज, काळ आणि कार्य, शककर्ते श्रीराजा शिवछत्रपती, एक समाजप्रबोधक व परिवर्तनकार, सत्यशोधक जोतिबा फुले, सार्वजनिक सत्यधर्मसार, सेवितो हा रस वांटितो अनेकां (भाग १, २, ३)

डॉ.आ.ह.साळुंखे यांनी म्हटल्याप्रमाणे शे–दीडशे वर्षाच्या सामाजिक इतिहासाचा प्रचंड तपशील रा.ना. यांच्या मस्तकात एखाद्या संगणकाप्रमाणे नोंदवून ठेवण्यात आला होता. रा.ना.चव्हाणांचे बहुतेक सारे लेखन स्फुट, प्रासंगिक लेखांतून साकार झालेले आहे. ते सर्वसामान्य मराठी माणूस समोर ठेवूनच त्यांनी केलेले असल्याने छोटयाछोटया, सुटसुटीत अन सुबोध वाक्यातून आपल्यापुढे येते. यात एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धापासून महाराष्ट्रात जी समाजसुधारणांची चळवळ झाली तिचे पडसाद उमटले आहेत. न्या.रानडे, महात्मा जोतिराव फुले,लो.टिळक, शाहू महाराज महार्षि विठ्ठल रामजी शिंदे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील अशा अनेक क्रियाशूर विचारवंत देशभक्तांच्या कार्यपद्धतीचा श्री रा.ना.चव्हाणांनी अतिशय निष्ठापूर्वक मागोवा घेतला आहे. त्यावर विचार प्रदर्शन करताना समन्वयशील दृष्तिकोण तर ठेवला आहेच, पण नवे अभिनिवेश वाढू नयेत, जातीयादी वृत्तींना खतपाणी मिळू नये अशी खबरदारीही घेतली आहे. श्री.रा.ना.चव्हाणांच्या हयातीत त्यांचे लेख ग्रंथरूपात प्रकासित होऊ शकले नाहीत. त्यांच्या विचारांची खरेतर दखलच कमी घेतली गेली. श्री.रा.ना.चव्हाण आयुषभर लिहीत होते. झपाटल्यासारखे पण अत्यंत तळमळीने लिहीत होते. परंतु त्यांच्या हयातीत त्यांचे फार थोडे लेखन ग्रंथरूपाने प्रकाशित झाले. जवळजवळ १५०० लेख त्यांनी विविध विषयावर लिहिले.[१०१]

श्री.रा.ना.चव्हाण हे मराठीतील एक विवेकशील, सयंमी, समन्वयवादी तरीही परखडपणे आपले विचार मांडणारे एक महत्त्वाचे विचारवंत आहेत. परिवर्तनवादी परंपरेचा त्यांचा अतिशय

सूक्ष्म अभ्यास आहे. गौतम बुद्ध ते श्री यशवंतराव चव्हाण एवढा मोठा कालखंड त्यांच्या चिंतनात सतत ध्वनित होत राहतो. तरीही १९ वे शतक हे त्यांच्या चिंतनाचे मुख्य केंद्र आहे. १९व्या शतकातील असंख्य दुवे ते सहजपणे उलगडून जातात. एकोणिसाव्या शतकातील अनेक तपशील ते देतात. अनेक महापुरूषांच्या कार्याचा ते नेमका वेध घेतात. अभ्यासकांना त्यामुळे एक नवी जाण येते.

एका अर्थाने १९ व्या शतकाचे ते एक महत्त्वाचे भाष्यकार ठरतात. अर्थात १९व्या शतकाचा विचार असो की विसाव्या शतकातील महत्त्वाच्या सामाजिक प्रश्नांचा विचार असो, तो का करावयाचा, याचे एक स्पष्ट भान त्यांना आहे. अभ्यासासाठी अभ्यास किंवा विद्वत्ता प्रदर्शनासाठी अभ्यास असा प्रकार त्यांच्याकडे नाही. एकूण भारतीय समाज सुखाने नांदावा, ही त्यांची तळमळ आहे. त्यासाठी समता, बंधुता, स्वातंत्र्य आणि सामाजिक न्यायांची प्रस्थापना झाली पाहिजे. असा त्यांचा आग्रह असतो. किंबहुना तीच त्यांच्या लेखनाची मुख्य प्रेरणा आहे. त्यांनी म.जोतिबा फुले ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर–यशवंतराव चव्हाण या परंपरेतील अनेक महापुरूषांबद्दल लिहिले आहे किंबहुना ते या महापुरूषांबद्दल पुन्हा पुन्हा लिहितात. त्यांच्या लेखनाची वर्गवारी करावयाची ठरवली तर त्यांनी सर्वाधिक लेखन महात्मा फुले यांच्याबद्दल केले आहे. असे लक्षात येईल. त्याखालोखाल राजर्षी शाहू छत्रपती, कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्याविषयी लिहिले आहे.

याशिवाय पहिला सत्यशोधक म्हणून ज्याचा गौरव करतात ते गौतम बुद्ध, महावीर वर्धमान, सर्व संत, शिवराय, बडोदा नरेश सयाजीराव गायकवाड, राजाराम मोहन रॉय, न्या.महादेव गोविंद रानडे, म.गांधी आणि समकालिनांपैकी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी व यशवंतराव चव्हाण हे सारे महापुरूष त्यांच्या चिंतन विश्वाचे भाग झाले आहेत. पण हे सारे कशासाठी तर स्वातंत्र्योत्तर जीवन अर्थपूर्ण व्हावे, समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि सामाजिक न्याय प्रस्थापित व्हावा आणि एकूण समाजाचे उन्नयन व्हावे, यासाठी. अर्थात बहुजन समाज सुधारल्याशिवाय एकूण समाजाचे उन्नयन होणार नाही. याबद्दल खात्री आहे आणि ते योग्यच आहे. म्हणूनच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाबद्दल लिहिताना त्यांच्या लेखणीला धार प्राप्त होत असली तरी एकूण ब्राम्हण समाजाबद्दल ते समंजस भूमिका घेतात. कारण एकूण भारतीय समाज आणि त्याचे उन्नयन हीच त्यांची मुख्य प्रेरणा आहे. म्हणूनच ज्याचे श्रेय ते त्याला देतात.

'बलसागर भारत होवो' ही त्यांची एकमेव प्रेरणा आहे. ही मुख्य प्रेरणा आहे. ही मुख्य प्रेरणा असल्यामुळेच आपल्याभोवतीच्या कटूवास्तवाची त्यांना नोंद घ्यावीशी वाटते.[१०२] श्री.रा.ना.चव्हाण वास्तवात राहणारे असल्यामुळे ते वास्तवातील साऱ्याच गोष्टीसंबंधी लिहितात. जातीयता, धार्मिक कर्मकांड आणि त्याद्वारे होणारे शोषण, आमचे पुढारी आणि त्यांचे वर्तन, मराठे, दलित, ओ.बी.सी. आरक्षण, सामाजिक ऐक्य हे आणि यासारखे असंख्य प्रश्न त्यांच्या चिंतनाचे विषय होतात. आणि या साऱ्याच प्रश्नासंबंधी ते रोखठोकपणे लिहितात. काही नवे विचारही ते प्रकट करतात. उदा. आता नव्या काळात केवळ वर्णसंघर्ष पुरेसा ठरणार नाही, तर वर्गसंघर्षही सुरू करावा लागेल असे ते सांगतात. त्यासाठी म.फुले आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची सांगड मार्क्सवादाशी घालावी लागते, असे ते आवर्जून सांगतात. आणि आज जागतिकीकरणाच्या काळात तर या विचाराचे मोल किती आहे, ते वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये फार थोडया लोकांकडे भांडवल संचय होत जातो. आणि इतर लोक भिकेला लागतात, हे आपण आज प्रत्यही पाहत आहोत. अशा परिस्थितीत श्री. रा.ना.चव्हाणांचे दृष्टेपण अधिकच लक्षात येते.

श्री. रा.ना.चव्हाण हे संतवृत्तीचे व्यक्तीमत्त्व होते, वाईमध्ये ब्राम्होसमाज विकसित झाला. ते ब्राम्होसमाज असले तरी सत्यशोधक विचारधारेशी त्यांचे एक आंतरिक नाते होते. याचा अर्थ असा, की त्यांच्या विचार विश्वात धर्माला फार मोठे स्थान आहे. किंबहुना जीवनाच्या सर्व अंगांना आणि चळवळींना धर्माचे अधिष्ठान असले पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. तरीही धर्म म्हणजे कर्मकंड नव्हे, त्याद्वारे होणारे शोषण नव्हे, तर सारासार विचार करण्याची विवेकबुद्धी म्हणजे धर्म होय, अशी एक फार महत्त्वाची व्याख्या त्यांनी धर्माची केली आहे. धर्म हा सर्वजीवनाचा पाया असला पाहिजे असे त्यांना वाटत असले तरी आधुनिक काळात झालेल्या बदलांचा ते सूक्ष्मपातळीवर वेध घेतात. म्हणूनच समाजसुधारणेची, प्रबोधनाची चळवळ केवळ धार्मिक पातळीवर करून उपयोगाचे नाही असे त्यांना वाटते. त्याबरोबरच राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, सहकार आणि आर्थिक पातळयावरही परिवर्तन आणि प्रबोधनाची चळवळ राबविली पाहिजे असे त्यांना वाटते. म्हणजे जीवनाच्या सर्व क्षेत्रात परिवर्तनाची आवश्यकता आहे हे पुन्हा पुन्हा सांगतात. हे त्यांच्या एकूण प्रेरणांशी अत्यंत सुसंगत आहे. म्हणूनच ते भारतातील जातीसंबंधी पुन्हा पुन्हा लिहितात.

या लिहिण्यामागे एक सकारात्मक दृष्टीही आहे. 'जात नाही ती जात' ही जातीची एक व्याख्या आपल्याकडे पुन्हा पुन्हा सांगितले जाते. परंतु रा.ना.चव्हाण मात्र जातीची सकारात्मक आणि परिवर्तनानुकूल व्याख्या करतात. 'जाते ती जात' अशी त्यांची व्याख्या करतात. आणि त्यांच्या दृष्टिने जात जाण्याच्या मार्गावर आहे. अस्पृश्यता तर पुष्कळशी संपली आहे. हे त्यांचे मतही निश्चितच आशादायक आणि विचार करण्यासारखे आहे. मग जात अजूनही का जाणवते आहे ? याचे उत्तर ते देतात, आजच्या राजकारणामध्ये जात लपलेली आहे, असे त्याचे रोकठोक मत आहे. आतमध्ये जातीचे कवच आणि बाहेरून पक्षाचे आवरण असे ते आजच्या राजकारणाचे वर्णन करतात. श्री. रा.ना.चव्हाण हे सत्याचा पाठलाग करणारे विचारवंत असल्यामुळे आणि राष्ट्र –समाजहितासाठी त्यांनी कुणाचीही मुलाहिजा ठेवला नसल्यामुळे, त्यांची उपेक्षा झाली नसावी, असे वाटते.

## समारोप

महात्मा जोतीबा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांनी प्रेरीत होऊन कार्य करणारा हा सातारा जिल्हा होय. या जिल्हयाच्या इतिहासाचा धांडोळा घेतला तर छ.शिवाजीमहाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या या भूमीत कधीही मोठया प्रमाणावर अन्याय होऊ शकलेला नाही किंबहुना या ठिकाणी अन्यायी राजवट टिकूच शकली नाही ती येथील समाजाच्या एकमेकांना होत असलेल्या सहकार्यामुळे असे म्हटले तर चूकीचे ठरणार नाही. ज्या कालखंडात पुण्यात पेशवाई होती त्या काळात या प्रदेशावर छत्रपतींचीच सत्ता होती याचा अर्थ असा नाही की येथे सामाजिक वर्गव्यवस्था नव्हती किंवा जातीव्यवस्थेचे उच्चाटन झालेले होते परंतू इतर प्रदेशापेक्षा येथिल परिस्थती चांगली होती. त्यामुळेच ब्रिटीश कालखंडातही येथे मोठया प्रमाणावर छत्रपतीच्यासोबत सर्व समाज असलेला दिसतो.

स्वातंत्र्योत्तर कालखंडात सातारा जिल्हयात अनेक चळवळी निर्माण झाल्या किंबहुना त्या निर्माण होण्यासाठी आवश्यक असणारी परिस्थीती सातारा जिल्हयात असल्यामुळे त्या निर्माण झाल्या. सातारा जिल्हयातील १९५० व ६० च्या दशकातील सामाजिक परिस्थतीचे अवलोकन करता असे दिसून येते की समाजतील वर्गभेद व जातीभेद पुर्णपणे नष्ट झालेले नव्हते परंतू त्यांच्यात असणारी कटूता ही कमी होती.

## संदर्भ


१. आर.ई.इन्थोवेन, ट्राईब्ज ॲण्ड कास्टस ऑफ बॉम्बे, खंड २, १९२२, पृ.२८४

२. आर.व्ही.रसेल, हिरालाल, ट्राईब्ज ॲण्ड कास्टस इन दि सेंट्रल प्रॉव्हिन्सेस अऑफ इंडिया, खंड ४, १९९३, (पुनर्मुद्रित), पृ.१७

३. गेल ऑम्वेट, अे कल्चरल रिवोल्ट इन अ कोलोनिअल सोसायटी : दि नॉन ब्राम्हण, मुव्हमेंट इन वेस्टर्न इंडिया, १८७३ टू १९३०, पृ.६९

४. डॉ.पाठक अ.श.(संपा.)महाराष्ट्र राज्य गॅझेटीअर, सातारा जिल्हा, दार्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९९९ पृ.६४ ते ७५

५. प्रकट मुलाखत श्री.श्रीधर कुलकर्णी, सोनगांव तर्फ सातारा दि.२५/०१/२०१४ स.११:०० वा.

६. कित्ता

७. कित्ता

८. प्रकट मुलाखत श्री.ग.सा.कांबळे,अतित, दि.२/०४/२०१४ दु.०१:०० वा.

९. कित्ता

१०. प्रकट मुलाखत श्री.गणेश भिसे, लोणंद, दि.२/०३/२०१४ दु.०१:०० वा.

११. प्रकट मुलाखत श्री.अरूण कुदळे ,उंब्रज, दि.२१/०५/२०१४ दु.०२:३० वा.

१२. प्रकट मुलाखत श्री.शाम दळवी, जकातवाडी, दि.०८/०६/२०१४ स.११:०० वा.

१३. प्रकट मुलाखत श्री.गणपत कुंभार व किरण कुंभार, वडूज, दि.१९/०७/२०१४ दु.१२:३० वा.

१४. प्रकट मुलाखत श्री.रामराव कारंडे, शिरसवडी, दि.२१/०३/२०१४ दु.०३:०० वा.

१५. कित्ता

१६. प्रकट मुलाखत श्री.काशिराम लोहार, दरे खुर्द, दि.१५/१०/२०१४ दु.०२:०० वा.

१७. प्रकट मुलाखत श्री.योगेश बोहरा , सातारा, दि.३०/०३/२०१४ स.१०:०० वा.

१८. प्रकट मुलाखत श्री.जनार्दन गुरव, आंबळे, दि.१५/०५/२०१४ संध्या.०५:०० वा.

१९. प्रकट मुलाखत श्री.उमेश मदने, करंडी, दि.१३/०६/२०१४ स.१०:०० वा.

२०. प्रकट मुलाखत श्री.नारायण सोणवणे, ढोरगल्ली, सातारा, दि.२५/०७/२०१४ दु.०१:०० वा.

२१. प्रकट मुलाखत श्री.प्रशांत सुळ, भावेनगर, दि.१३/०६/२०१४ स.१०:०० वा.

२२. प्रकट मुलाखत श्री.आनंदा शिंदे, आसनगांव, दि.१३/०६/२०१४ स.१०:०० वा.

२३. क्रिमिनल क्लासेस इन दि बॉम्बे प्रेसडिन्सी, १९०८, पृ.

२४. जोशी ब.स.(संपा.), "वाईतील कोल्हाटी जमात", कृष्णाई वार्षिक, मानव्य व वाणिज्य महाविद्यालय, वाई, १९७९, पृ.२५

२५. कित्ता

२६. प्रकट मुलाखत श्री.लखन घुमरे, निरगुडी, दि.१/०८/२०१४ संध्या.०६:०० वा.

२७. डॉ.पाठक अ.श.(संपा.)उपरोक्त, पृ.२७८

२८. कित्ता

२९. कित्ता पृ.२८१, २८२

३०. कित्ता पृ.२९३, २९४

३१. प्रकट मुलाखत श्री.कोंडीबा पवार, वडार गल्ली, सातारा, दि.१३/०६/२०१४ स.१०:०० वा.

३२. प्रकट मुलाखत श्री.जमिर मोमिन, पाटण, दि.२५/०९/२०१४ स.१०:०० वा.

३३. कित्ता

३४. प्रकट मुलाखत श्री.रशिद मुलाणी, कोरेगांव, दि.२५/०९/२०१४ स.१०:०० वा.

३५. कित्ता

३६. सेक्शन ए हिंदू, बी मुस्लिम, सी पारशी, डी इतर, इ विशिष्ट जमातीसाठी व एफ संस्था नोंदणी अधिनियमन, १८६० खाली नोंदलेल्या संस्था.

३७. प्राज्ञपाठशाळा मंडळ अहवाल, सार्वजनिक न्यास उपविभागीय नोंदणी कार्यालय, सातारा

३८. लेले रा.के., मराठी वृत्तपत्रांचा इतिहास, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, १९८४, पृ. १३२, २२१, २२३, ६२१–६२७, ८७८–८७९, १०७८.

३९. ग्रंथालय संचालनालय, नगर भवन, मुंबई, अहवाल, भाग दोन, पृ.२२०९.

४०. डॉ.पाठक अ.श.(संपा.)उपरोक्त, पृ.२२५

४१. डॉ.पाठक अ.श.(संपा.)उपरोक्त, पृ.२२६

४२. डॉ.पाठक अ.श.(संपा.)उपरोक्त, पृ.२३५

४३. कोष्टी प्रभाकरः शैक्षणिक वाटचाल, सातारा जि.प.गौरवगाथा, रौप्य महोत्सवी विशेषांक, १९९५, पृ.१४

४४. रयत शिक्षण संस्था, सातारा, वार्षिक अहवाल, १९८९–९०, पृ.१ ते ६, ७३ ते १०८

४५. लोकराज्य, कर्मवीर भाऊराव पाटील विशेषांक, जुलै १९८७, पृ.७, २२, २५

४६. कोष्टी प्रभाकर, उपरोक्त, पृ.१५

४७. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, सातारा, वार्षिक अहवाल, १९९२–९३, पृ.७२

४८. शतसांवत्सरिक स्मृती ग्रंथ, कराड नगरपालिका, १८५५–१९५५, पृ.१३७.

४९. महाराष्ट्र शासन, शिक्षणावर दृष्टिक्षेप, १९९५९६, सिक्षण संचालनालय, पुणे, महाराष्ट्र शासन, पृ.३७

५०. डॉ.पाठक अ.श.(संपा.)उपरोक्त, पृ.६५३, ६५४.

५१. कित्ता, पृ.६५६

५२. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, वार्षिक अहवाल, १९९५–९६

५३. डॉ.पाठक अ.श.(संपा.)उपरोक्त पृ.७२७.

५४. सातारा जिल्हा रूग्णालय कार्यक्रम अंदाजपत्रक, सार्वजनिक आरोग्य, १९९१–९२, पृ.४९.

५५. डॉ.पाठक अ.श.(संपा.) .)उपरोक्त पृ. ७३३

५६. सेन्सस ऑफ इंडीया, सातारा जिल्हा जनगणना निर्देशग्रंथ, १९६१, पृ.२२२

५७. दै.लोकमत सातारा प्रथम वर्धापनदिन विशेषांक ‘लढाऊ सातारा’१५.०५.२००७, पृ.२१

५८. कित्ता

५९. डॉ.पाठक अ.श.(संपा.), उपरोक्त पृ. १८१, १८२, १८३.

६०. प्रकट मुलाखत श्री.विजय मांडके १२/०२/२०१५ दुपारी ०१:०० वा.

६१. प्रकट मुलाखत श्री.लक्ष्मण माने २९/०८/२०१४संध्याकाळी ०५:०० वा.

६२. प्रकट मुलाखत श्री.विजय मांडके १२/०२/२०१५सकाळी ०९ः०० वा.

६३. दै.लोकमत सातारा प्रथम वर्धापनदिन विशेषांक 'लढाऊ सातारा'१५.०५.२००७, पृ.१६

६४. प्रकट मुलाखत श्री.आ.ह.साळुंखे २७/१०/२०१३दुपारी ०३ः०० वा.

६५. आंबेडकर आकादमी सातारा, कार्यवृत्तांत २००२पृ.०३

६६. दै.लोकमत सातारा प्रथम वर्धापनदिन विशेषांक 'लढाऊ सातारा'१५.०५.२००७, पृ.१५

६७. महाराष्ट्र अंधश्रध्दा समिती, वार्षिक अहवाल २००५०६ पृ.०५

६८. डॉ.पाठक अ.श.(संपा.)महाराष्ट्र राज्य गॅझेटीअर, सातारा जिल्हा, दार्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९९९, पृ..४३८

६९. प्रकट मुलाखत प्रभाकर महाबळेश्वरकर, दि.१५/०५/२००७ सकाळी ११ः०० वा.

७०. सातारा नगरपालीका शतसंवत्सरीक महोत्सवी अंक, १९५३, पृ.८८

७१. कित्ता

७२. आपटे अंजली, लेख, दै.मुक्तागिरी, २१ /०६/२०११

७३. नलावडे उज्वला विजयराव, सत्यशोधकाची संक्षिप्त गाथा, विचारे फार्मस् प्रा.लि.प्रकाशन संस्था, बदलापूर ठाणे,२००० पृ.२६

७४. उगले जी.ए., सत्यशोधक समाज अधिवेशनेः चिंतन आणि चिंता, मराठवाडा सार्वजनिक सभा प्रकाशन, औरंगाबाद, २००६, पृ. ६३

७५. कित्ता, पृ.१३६

७६. कित्ता, पृ.२७६

७७. कित्ता, पृ.१४८

७८. कित्ता, पृ.१३७

७९. प्रकट मुलाखत श्री.आ.ह.साळुंखे २७/१०/२०१३ दुपारी ०३ः०० वा.

८०. कित्ता

८१. कित्ता

८२. दै.सकाळ, डॉ.पाटील एन.डी.,लेख, बुधवार २१ ऑगस्ट २०१३,पृ.०८

८३. दै.सकाळ,लेख, उजेडावर घाला, सातारा, २१ ऑगस्ट २०१३,पृ.०६

८४. दै.सकाळ बुधवार २१ ऑगस्ट २०१३,पृ.०५

८५. दै.ऐक्य, संपादकीय,दि.२१.०८.२०१३,पृ.०९

८६. दै.ऐक्य,डॉ.दाभोळकर नरेंद्र, धर्माच्या आधारे सत्तेचे राजकारण, ०४/०५/१९८९, पृ.०८

८७. दै.पुढारी ,संपादकीय,दि.२१.०८.२०१३,पृ.०६

८८. दै.पुढारी,डॉ.दाभोळकर नरेंद्र, जादूटोणा विरोधी कायदा,दि.२१.०८.२०१३,पृ.०६

८९. डॉ.दाभोळकर नरेंद्र, भ्रम आणि निरास, प्रस्तावना,राजहंस प्रकाशन,पुणे,ऑक्टो, १९८५,पान नं.४

९०. गोरे ना.ग.,भ्रम आणि निरास, मूळावर घाव, राजहंस प्रकाशन,पुणे,ऑक्टो, १९८५, पान नं.२९

९१. डॉ.दाभोळकर नरेंद्र,विचार तर कराल, राजहंस प्रकाशन,पुणे,मनोगत

९२. दै.सकाळ,संपादकीय, दि.२१.०८.२०१३ ,पृ.०८

९३. दै.ऐक्य. डॉ.दाभोळकर नरेंद्र, २१/०८/ १९९९,श्रध्दाअंधश्रध्दा आणि व्यवहार ,पृ.०९

९४. दै.ऐक्य. डॉ.दाभोळकर नरेंद्र, २१/०८/ १९९९, गणेशमूर्तीचे विर्सजन नको ,पृ.०५

९५. दै.पुढारी संपादकीय, दि.२१.०८.२०१३, पृ.०९

९६. दै.पुढारी डॉ.दाभोळकर नरेंद्र, दि.२१.०८.२०१३, ले मशाल चल पडे, पृ.०५

९७. डॉ.दाभोळकर नरेंद्र, प्रश्नचिन्ह आणि पूर्णविराम, राजहंस प्रकाशन पुणे. सप्टें. २०१३,पान.४६

९८. डॉ.दाभोळकर नरेंद्र ,तिमिरातून तेजाकडे ,राजहंस प्रकाशन , पुणे, सप्टें.२०१३,पान क्र.६२

९९. http://www.marathisrushti.com

१००. कित्ता

१०१. प्रकट मुलाखत श्री.आ.ह.साळुंखे २७/१०/२०१३ दुपारी ०३:०० वा.

१०२. http://www.marathisrushti.com

## प्रकरण चौथे

# स्वातंत्र्योत्तर कालखंडातील सातारची आर्थिक स्थिती

## प्रस्तावना

आर्थिक व्यवहार मानवी समाजाच्या दैनंदीन जीवनाचे महत्वाचे अंग आहे. मानवी जीवन भौतिकदृष्टया सुखकर करण्याचा प्रयत्न करणे ही मानवाची नैसर्गिक प्रवृत्ती आहे.त्यातून आर्थिक व्यवहार सुरू होतात. सातारा जिल्हयाचा आर्थिक दृष्टीकोनातून विचार करताना स्वातंत्रोत्तर कालखंडात पश्चिम महाराष्ट्रात जे सहकार क्षेत्रात कार्य झाले त्यामध्ये सातारा जिल्हयाचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागते. सातारा जिल्हयाचा आर्थिक दृष्टीकोनातून विचार करावयाचा झाल्यास कृषी व त्यावर आधारीत पुरक व्यवसाय हेच जिल्हयाच्या आर्थिक व्यवस्थेचे प्रमुख घटक असल्याचे जाणवते. स्वातंत्र्याच्या प्राप्तीपुर्वी अर्थव्यवस्थेत मागासलेपण होते. मोसमी पावसावर आधारीत पारंपारीक शेती, सिंचन सुविधांचा अभाव, भांडवली बाजारपेठांची कमतरता, अविकसीत तंत्रज्ञान, उद्योगधंद्यांना प्रतिकुल परिस्थिती इत्यादी घटक कारणीभूत होते.

स्वातंत्र्योत्तर कालखंडात सातारा जिल्हयात सिंचन क्षेत्र वाढले.सहकार चळवळीच्या माध्यमातून विविध सहकारी संस्थांची स्थापना झाल्या. आधुनिक तंत्रज्ञानाने जुन्या पारंपारीक तंत्रज्ञानाची जागा घेतली तसेच आधुनिक अवजारे, संकरीत बी–बीयाणे, दळणवळणाच्या सोई–सुविधांमध्ये झालेल्या सुधारणा आणि शेतीपुरक जोडधंद्यांकडे स्वतंत्र व्यवसाय म्हणून पााहण्याचा वाढलेला कल या सर्व बाबींचा परिणाम म्हणजे आर्थिक स्थितीत बदल होण्यास प्रारंभ झाला आणि सातारा जिल्हा आर्थिक दृष्टया विकसित होण्यास सुरूवात झाली.

## औद्योगीकरणाचा इतिहास

कुटिरोद्योग आणि गूळ तयार करणे हे जिल्हयातील प्राचीन काळापासूनचे व्यवसाय आहेत. या व्यवसायाचा संपूर्ण इतिहास उपलब्ध नसला तरी इतके निश्चितपणे म्हणता येते की, सातवाहनकाळात म्हणजे दुसऱ्या व तिसऱ्या शतकात कराड हे समृद्ध व्यापारी केंद्र होते. सोपारा व चौल बंदरांपासून कराडपर्यंत येणारे दोन महत्त्वाचे व्यापारी मार्ग होते. पुढे ब्रिटीश अंमल प्रस्थापित होईपर्यंत या खेडयांचा समूह बहुतांश स्वयंपूर्ण होता. ब्रिटीश अंमल प्रस्थापित

झाल्यानंतर भारतात सामाजिक सुधारणा, शिक्षण, दळणवळणाच्या सोई व व्यापार उद्योगधंदे या क्षेत्रात प्रगती घडून आली त्यांच्या या धोरणांमुळे आर्थिक विकासाला चालना मिळाली.

सातार्‍याला सन १९३० मध्ये इब्राहीम जर्दा हा तंबाखूचा एक कारखाना काढला. हा जर्दा पुढे अनेक वर्षे सातारा जिल्हयातील खेडोपाडयात प्रसिध्द होता. सातारा जिल्हयातील औद्योगिकरणाची दुसरी घटना म्हणजे सन १९३३ मध्ये वालचंद ग्रुपने साखरवाडीस 'फलटण शुगर वर्क्स' हा जिल्हयातील पहिला साखर कारखाना सुरू केला. सन १९३४–३५ मध्ये कराडला साबण तयार करण्याचा कारखाना आणि रेशमाला पीळ देणे, गुंडाळणे व त्याला रंगविण्याचा कारखाना सुरू झाला. सन १९३५–३७ या कालावधीत जिल्हयात पाच छापखाने सुरू झाले. सन १९४० मध्ये कोरेगावलाही वीज निर्मिती केंद्र, ओगलेवाडीस औंध सोप वर्क्स व कराडला माणिक सोप वर्क्स हे साबण तयार करण्याचे कारखाने सुरू झाले.[१] सन १९४८ मध्ये महाराष्ट्र शासनातर्फे मुंबई राज्य परिवहन मंडळाने कराड व सातार्‍याला प्रत्येकी एक वर्कशॉप सुरू केले.[२] सन १९५४ मध्ये फलटणला श्रीराम सहकारी साखर कारखाना हा मालोजीराजे नाईक निंबाळकर यांनी सहकारी तत्व सुरू केला. सातारा जिल्हयातील हा दुसरा साखर कारखाना होय. सन १९५५ मध्ये यशवंतराव मोहिते यांनी रेठरे बुद्रुकला कृष्णा सहकारी साखर कारखाना सुरू केला. भावी काळामध्ये सहकार क्षेत्रातील एक नामवंत साखर कारखाना म्हणून तो नावारूपाला आलेला आहे. आशिया खंडातील एक नंबरचा कारखाना म्हणून त्याची काही काळ गणती होत होती. उद्योगपती ओगले यांनी सन १९५७ मध्ये ओगले ग्लास वर्क्स सुरू केले. यामध्ये इलेक्ट्रिक मोटारचे उत्पादन सुरु झाले.

कोयना नदीवर बांधण्यात आलेले कोयना धरण हे महाराष्ट्राचा आर्थिकदृष्टया व औद्योगिकदृष्टया कायापालट करणारा प्रकल्प ठरलेला आहे. या प्रकल्पामुळे महाराष्ट्राच्या सिंचनक्षेत्राबरोबरच विद्युत निर्मितीच्या क्षेत्रात फार मोठी प्रगती झालेली आहे. सन १९६२ मध्ये कोयना जलविद्युत केंद्र सुरू झाले. श्री.यशवंतराव चव्हाणांनी सातारा जिल्हयात कारखानदारी वाढावी म्हणून अनेक कार्यकर्त्यांनां प्रेरणा दिलेली दिसते. सातारा जिल्हयात साठच्या दशकात प्रभावी नेतृत्व म्हणून ओळखल्या जाणार्‍या श्री.किसन वीर उर्फ आबा यांनी सन १९६८ मध्ये भुईंजला सातारा सहकारी साखर कारखान्याची स्थापना केली. आज या साखर कारखान्याचे नाव 'किसन वीर सहकारी साखर कारखाना' असे आहे. आज हा साखर कारखाना नावरूपाला

येऊन सातारा जिल्हयातील सहकार क्षेत्रात शेतकऱ्यांचे व बहुजन समाजातील कामगारांचे जिवनमान उंचावण्यात मोलाची कामगिरी बजावताना दिसतो आहे. सन १९६९ मध्ये श्री.बाळासाहेब देसाई यांनी मरळीस(पाटण) बाळासाहेब देसाई सहकारी साखर कारखाना तर शिरसवडेला श्री.यशवंतराव चव्हाण यांचे उजवे हात समजल्या जाण-या श्री.पी.डी.पाटील यांनी सहयाद्री सहकारी साखर कारखाना स्थापन केला. आज हा साखर कारखाना देखिल नावारूपाला आलेला आहे. सन १९७० मध्ये फलटणला निरा व्हॅली को-ऑपरेटीव्ह डिस्टिलरी स्थापन झाली. सन १९७० मध्ये साताऱ्याला महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने औद्योगिक वसाहत स्थापन केली.[३]

सन १९७१ मध्ये सातारा येथे औद्योगिक विकास महामंडळाने सुमारे चारशे व नंतर सन १९८० मध्ये पाचशे अशा एकूण नऊशे एकर जमीनीवर औद्योगिकरणाचे रोपटे लावले.[४] जिल्हयाचा औद्योगिक विकास खऱ्या अर्थाने १९७१ नंतर सुरू झालेल्या अभियांत्रिकी, रासायनिक, डिस्टिलरी, कागद, खाद्य पदार्थ, साखर कारखाने, इत्यादी उद्योगांनी झाला. त्यात प्रामुख्याने किर्लोस्कर ब्रदर्स, व्हल्कन लाव्हल, के, आयर्न वर्क्स, अवंती माईनिंग टूल्स, भारत फोर्ज, डेलस्टार, वेस्टर्न इंडिया इरेक्टर, सायक्लो ट्रान्समिशन, महाराष्ट्र स्कूटर, पीएमपी, ऑटो इंडस्ट्रीज, परांजपे मेटल शेपर्स, शिर्के पेपर मिल, निरा पल्प ॲण्ड पेपर, आगाशिव शेतकरी सहकारी सूत गिरणी, अजिंक्यतारा सहकारी साखर कारखाना, युनिव्हर्सल लगेज मॅन्युफॅक्चरिंग, भोर वेबलॉक आणि मॅफको यांचा समावेश करता येईल.

उद्योगांच्या विकेंद्रीकरणाच्या धोरणानुसार शासनाने सातारा जिल्हयात कारखाने वाढावे यासाठी बऱ्याच सवलती जाहीर केल्या. तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व सिकॉमने पुढाकार घेऊन उद्योगधंदे विकासासाठी आवश्यक सोयी उपलब्ध करून दिल्यामुळे औद्योगिक विकास होत आहे.

## औद्योगिक वसाहती

### सातारा औद्योगिक वसाहत :

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने १९७० मध्ये १५२.४६ हेक्टर जमीन ताब्यात घेऊन साताऱ्याला औद्योगिक वसाहतीची स्थापना केली. परंतु उद्योजकांची भूखंडांची वाढती मागणी लक्षात घेऊन वरील औद्योगिक क्षेत्राजवळ सातारा-देगाव रस्त्यालगत १९८१ मध्ये

१९६.०३ हेक्टर क्षेत्रात अतिरिक्त औद्योगिक क्षेत्र निर्माण केले. सन १९९२–९३ मध्ये तेथे ४३५ कारखाने होते. त्यात ५,५३६ कामगारांना रोजगार मिळाला होता.[४] या वसाहतीत अभियांत्रिकी, खाद्य पदार्थ, अधातू खनिज पदार्थ, रसायने व रासायनिक पदार्थाचे कारखाने आहेत. तसेच वाई(१९८९) आणि कराडला (१९९२) अनुक्रमे १७७.२८ हेक्टर आणि १९५.४६ हेक्टर क्षेत्रात औद्योगिक वसाहतींची स्थापना झाली. त्यात १९९२–९३ मध्ये अनुक्रमे २८.१३ हेक्टर आणि ५.१० हेक्टरमध्ये भूखंड पाडून अनुक्रमे १४.६७ हेक्टर आणि ५.१० हेक्टर भूखंडाचे वाटप केले. यावर्षी वाईच्या वसाहतीत दोन कारखाने सुरू होते. उपरोक्त वसाहतीशिवाय फलटण, मायणी, कोरेगाव आणि पुसेगावला वसाहती विकसित करण्याचे काम सुरू असून माण, म्हसवड, पाटण आणि लोणंद येथे वसाहती काढण्याचे प्रयत्न होते. सातारा रोड, ओगलेवाडी आणि मलकापूर (कराड) येथे सहकारी औद्योगिक वसाहती आहेत.

### उद्योगांना आर्थिक सहाय्य

उद्योगांचे विकेंद्रीकरण व ग्रामीण भागात औद्योगीकरणाचा वेग वाढविण्यासाठी शासनातर्फे विविध योजना राबविण्यात येतात. नवीन उद्योग सुरू करणे, जुन्या उद्योगांचा विकास करणे, लघु उद्योजकांना भांडवल मिळवून देण्यासाठी वित्तीय महामंडळे तसेच औद्योगिक आधारभूत गरजा उपलब्ध करून देणारी महामंडळे स्थापन झाली आहेत. त्यांच्या कार्याचा आढावा खाली दिला आहे.

### महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ

या महामंडळाची शाखा सातारा येथे १९७०–७१ पासून कार्यरत आहे. हे महामंडळ उत्पादक काम करणा–या सार्वजनिक उद्योग समुहास व सहकारी औद्योगिक संस्थेस २० लाख रूपयापर्यंत आणि खाजगी उद्योजकांना १० लाख रूपयापर्यंत कर्ज देते.[६]

### महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ

लघु उद्योगांच्या विकासासाठी महामंडळाची १९६२ मध्ये स्थापना झाल्यावर १ ऑगस्ट १९६५ मध्ये प्रत्यक्ष कार्यास सुरूवात झाली. या महामंडळाची साता–यास १९८२ मध्ये शाखा स्थापना झाली. जिल्हयातील लघु उद्योग घटकांनी महामंडळास १९८५–८६ व १९८८–८९ मध्ये अनुक्रमे ७२.१७ लाख आणि १,०४.२९ लाख रूपयांची उत्पादने पुरविली. महामंडळाने १९८९–९० मध्ये १२६ घटकांना १,०४.५३ लाख रूपयांचे विक्री सहाय्य केले.

**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ** :

सातार्‍याला औद्योगिक वसाहतीची स्थापना एप्रिल १९७१ मध्ये झाली. या वसाहतीसाठी महामंडळाने १५२.४६ हेक्टर जमीन संपादन केली होती. परंतु उद्योजकांची वाढती मागणी लक्षात घेऊन १९८१ मध्ये सातारा–देगाव रस्त्यालगत १८९.७६ हेक्टर जमीन संपादित करून अतिरिक्त औद्योगिक वसाहतीची स्थापना केली. या औद्योगिक क्षेत्राची झपाटयाने वाढ होत असून त्या लगतच्या प्रकल्पग्रस्त गावांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा सवलतीच्या दराने केला जातो.

**पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ** :

सुशिक्षित बेरोजगारांना उद्योग सुरू करण्यासाठी बीज भांडवल उपलब्ध करून दिले जाते. तसेव विक्रीकर सूट योजनेनुसार आर्थिक सहाय्य, सर्वंकष प्रोत्साहन योजनेनुसार अर्थसहाय्य आणि खास भांडवल प्रोत्साहन योजनेनुसार अर्थसहाय्य दिले जाते. बीज भांडवलाशिवाय महामंडळाने १९८०–८१ पासून औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील प्रशिक्षणार्थींना विद्यावेतन योजना अमलात आणली. सर्वंकष प्रोत्साहन योजनेनुसार उद्योग घटकांना अर्थसहाय्य व अनुदान दिले जाते.

**महाराष्ट्र राज्य औद्योगिक आणि गुंतवणूक महामंडळ (सिकॉम)** :

औद्योगीकरण आणि औद्योगिक क्षेत्र निर्माण करण्यासाठी विकास पतपेढी म्हणून सिकॉमची स्थापना ३१ मार्च १९६६ रोजी करण्यात आली. महामंडळाने ३१ मार्च १९८९ पर्यंत विविध योजनांखाली जिल्हयातील १५३ उद्योग घटकांना आर्थिक सहाय्य केले होते.

## जिल्हा उद्योग केंद्र :

दोन लाख रूपयापर्यंत भांडवल असलेल्या लघु उद्योग घटकांना व्यापारी बँका ७५ टक्के भांडवल देतात. उर्वरित २५ टक्के भांडवल उभारणीपैकी १० टक्के भांडवल जिल्हा उद्योग केंद्र देते.[७]

## कुपर उद्योग समुह :

सर धनजीशा कुपर यांनी १९२२ मध्ये लोखंडी नांगर निर्मीती करण्यास आरंभ केला. सन १९३४ मध्ये भारतातील पहीले डिझेल इंजीन तयार करून देशात खया अर्थाने 'ॲटोमोबाईल युग' त्यांनी सुरू केले. कुपरच्या ऑईल इंजिनने कृषी विकासाचे एक वेगळे विश्व

साकार करून बागाईत क्षेत्र फुलवण्यात पुढाकार घेतला. एकविसाव्या शतकाच्या उंबरठयावर असताना औद्योगिक वसाहतीत कूपर उद्योग समुहाने निर्यातक्षम उत्पादनाचा प्रकल्प सुरू केला.येथे तयार होणारा प्रत्येक पार्ट मेड इन इंडीया म्हणून अमेरिका, इंग्लंड, इटली, फिनालँण्ड व जपान सारख्या देशात निर्यात होत असलेने सातारच्या औद्योगिक क्षेत्राची उंची वाढत आहे.कूपर कार्पोरेशन प्रा.लि.हा उद्योग आपली उलाढाल दोन हजार कोटींची करीत असून महाराष्ट्राच्या औद्योगिक प्रगतीचे एक वेगळे दालन खुले करीत आहे.[८]

याशिवाय 'सायक्लोचे' पांडुरंग शिंदे , कवित्सुचे वसंतराव फडतरे, ओरॅकलचे युवराज पवार, अजित मुथा, परांजपे ॲटो कास्ट यासारखे अनेक उद्योग सातारमध्ये आहेत. कृषी क्षेत्राात हरीतगृहांची उभारणी वेगाने होत असून या हरीत गृहातील फळे, फुले, भाजिपाला परदेशात निर्यात होत आहे.[९]

## खाद्यपदार्थ उद्योग :

या प्रवर्गात साखर, गूळ, खाद्य तेल, मिरची आणि मसाला पावडर, बेकरी, बिस्कीट आणि गोळया, बर्फ, लोणची, दुग्धजन्य पदार्थ इत्यादी तयार करणाऱ्या कारखान्यांचा समावेश आहे. हे कारखाने प्रामुख्याने सातारा, कराड, पाटण, महाबळेश्वर, फलटण, वाई, कोरेगाव तालुक्यांत आहे.

सन १९४७ मध्ये कराडला पहिली खाद्य तेल गिरणी सुरू झाली. १९४८ मध्ये जिल्हयात सुरू असलेल्या २९ भातगिरण्यांमध्ये ५५ कामगार होते.[१०] १९५४ मध्ये कराडला हळद पावडर कारखाना सुरू झाला. सन १९६१ मध्ये जिल्हयात सुरू असलेल्या २४ खाद्यापदार्थ कारखान्यांमध्ये १,५३९ कामगार होते. कोरेगावला १९७४–७५ मध्ये सुरू झालेल्या मॅफकोच्या कारखान्यात मटण गोठविण्याच्या प्रक्रिया होतात. सन १९८२–८३ मध्ये कोरेगाव मॅफकोने ८१,९३,७०६ रूपये किंमतीचे उत्पादन करून ७० लोकांना कायम रोजगार पुरविला. [११] सन १९६२ ते १९८८ दरम्यान या प्रवर्गात जिल्हयात २२३ कारखाने निघून त्यात ९८३ लोकांना रोजगार मिळाला.

## साखर उद्योग :

जिल्हयाच्या अर्थव्यवस्थेला कलाटणी देणारा हा महत्त्वाचा उद्योग असून १९९४–९५ च्या वार्षिक औद्योगिक सर्वेक्षणानुसार जिल्हयात सात साखर कारखाने कार्यरत होते.[१२] उसाची

मुबलकता व साखरेच्या भरपूर उताऱ्यामुळे सहकारी क्षेत्रात साखर कारखान्यांच्या स्थापनेस चालना मिळाली. त्यानुसार सन १९५४ मध्ये फलटणला श्रीराम सहकारी साखर कारखाना आणि सन १९५५ मध्ये रेठरे बुद्रुकला कृष्णा सहकारी साखर कारखाना स्थापन झाले. त्यांनी अनुक्रमे १९५७ आणि १९६०–६१ मध्ये उत्पादन सुरू केले. त्यांची प्रतिदिन गळीत क्षमता १,००० आणि १,२५० मे.टन होती.

सन १९६८ मध्ये भुईंजच्या किसनवीर सातारा सहकारी साखर कारखान्यात १९७१ मध्ये उत्पादन सुरू झाले. त्याची प्रतिदिन गळीत क्षमता १–२५० मे.टन होती. सन १९६१ मध्ये मरळीस (पाटण) बाळासाहेब देसाई सहकारी साखर कारखाना आणि शिरवडेला (कराड) सहयाद्री सहकारी साखर कारखाना स्थापन झाला. त्यापैकी पहिल्या कारखान्याने १९७४ मध्ये आणि दुस–याने १९७४–७५ मध्ये उत्पादनास सुरूवात केली. त्यांची प्रतिदिन गळीत क्षमता १,२५० आणि २,२०० मे.टन होती. सन १९७० मध्ये स्थापन झालेल्या अजिंक्यतारा सहकारी साखर कारखान्यात १९८४ मध्ये उत्पादनास सुरूवात झाली. प्रारंभी त्याची प्रतिदिन गळीत क्षमता १,२५० मे.टन होती. सन १०८९–९० मध्ये डॉ. शालिनीताई पाटील यांनी सहकारी तत्वावर चिमणगावला जरंडेश्वर सहकारी साखर कारखाना स्थापन केला. तर १९९६–९७ मध्ये खंडाळा येथे किसनवीर सहकारी साखर कारखाना व कुडाळ येथे प्रतापगड सहकारी साखर कारखाना स्थापन झाला. [१३]

## गूळ उद्योग :

गूळ निर्मिती हा जिल्हयातील फार जुना उद्योग असून एकोणिसाव्या शतकात तो महत्त्वाचा लघुउद्योग होता. दुसऱ्या महायुध्दाच्या शेवटापर्यंत त्याच्या भरभराटीत काहीच फरक झाला नाही. सन १९४८ मध्ये जिल्हयात सहा कारखाने होते आणि त्यात ६८ कामगार होते. [१४] नंतर साखर अधिक मिळू लागल्यावर आणि १९५४–५५ पासून साखर कारखान्यांमध्ये वाढ झाल्यामुळे गूळ उद्योगांची चांगलीच पिछेहाट झाली. सन १९५४ मध्ये जिल्हयात नोंद झालेले ४९ गूळ कारखाने होते. साखर कारखान्यांनी विस्तार केल्यावरही १९५९ मध्ये गूळ कारखान्यांची संख्या २९ झाली. हे कारखाने फलटण, कराड आणि वाई तालुक्यांत होते. सन १९६१ मध्ये १३ कारखान्यांमध्ये १३८ कामगार होते. सन १९८०–८१ मध्ये मात्र जिल्हयात केवळ १२ कारखाने सुरू होते व त्यात १३५ कामगार होते. बहुतांश उसाचा पुरवठा साखर

कारखान्यांना होत असल्यामुळे आता गूळ उत्पादन कमी झालेले आहे.

### मद्य व तंबाखू उद्योग :

यात विडी, जर्दा, पेये व मद्य उत्पादन कारखान्यांचा समावेश आहे. सन १९३० मध्ये साताऱ्यास विश्वनाथ नारायण चिपळूणकर यांनी जर्दा व्यवसाय सुरू केला. सन १९९३ मध्ये साताऱ्याच्या चार जर्दा कारखान्यांची वार्षिक उलाढाल पाच ते सात कोटी रूपये होती. त्यावर्षी त्यात अंदाजे ६०० कामगार होते. कारखान्यांना लागणारा तंबाखू गुजरातमधील भारदन येथून मागविला जातो. स्थानिक मागणी व्यतिरिक्त नाशिक, जळगांव, सांगली, कोल्हापूर, सोलापूर जिल्हयांतही येथील जदर्याला चांगली मागणी आहे.[१५]

साखर कारखान्यातील मळीपासून अल्कोहोल काढण्याचे काम या जिल्हयात प्रथम कृष्णा सहकारी साखर कारखान्यात २० डिसेंबर १९७१ ला सुरू झाले. या कामी गुंतविलेले भांडवल अंदाजे ४० लाख रूपये होते. सन १९८१–८२ ला त्यात विदेशी दारूचे उत्पादन सुरू झाले. सन १९८८–८९ मध्ये त्यात २२,३८,३०८ लीटर देशी व १७,२८७ लीटर विदेशी दारूचे उत्पादन  झाले. सन १९७० मध्ये फलटणला निरा व्हॅली को–ऑपरेटीव्ह डिस्टीलरी स्थापन झाली. त्यात प्रत्यक्ष उत्पादन १९७७ मध्ये सुरू झाले. या कारखान्याचे ३ ऑक्टोंबर १९९१ ला श्रीराम सहकारी साखर कारखान्यांत विलिनीकरण झाले. सन १९७२ साताऱ्याला निघालेला डॉबर्ग लागर ब्युअरीज हा बिअर तयार करण्याचा कारखाना सध्या बंद आहे.सन १९८७–८८ मध्ये यशवंतनगरला (कराड) सहयाद्री सहकारी साखर कारखाने काढलेल्या आसवनी कारखान्याची दैनिक उत्पादन क्षमता ४५,००० लीटर आहे. सन १९९०–९१ मध्ये शाहूनगरला (शेंद्रे) अजिंक्यतारा सहकारी साखर कारखान्यात आसवनी विभाग स्थापन झाला. मे १९९१ मध्ये प्रत्यक्ष उत्पादन सुरू झालेल्या कारखान्याची दैनिक उत्पादन क्षमता ३०,००० लीटर होती. सन १९९२–९३ मध्ये त्यात ३,३८,६२ लाख रूपये किंमतीचे ५४.२९ लाख लीटर अल्कोहोल तयार झाले. त्यात ५८ कामगार होते. सातारा सहकारी साखर कारखान्याने मार्च १९९३ मध्ये उभारणी केलेल्या आसवनी विभागात नोव्हेंबर १९९३ मध्ये उत्पादन सुरू झाले.[१६]

## औषध उद्योग :

आयुर्वेदीय अर्कशाळेत १२० प्रकारची औषधे तयार होतात. सन १९४१ मध्ये अवघी ३४,००० रूपये गुंतवणूक होती. मात्र १९५८ मध्ये त्याची मालमत्ता २,३२,६६७ रूपये होऊन ८४,९०५ रूपयांची औषधे तयार करण्यासाठी ६६ कामगार होते. सध्या (१९९३) कारखान्याची उलाढाल ८० लाख रूपये असून त्यात १२० कर्मचारी आहेत. उत्पादन पद्धती हस्तक्रियेवर आधारित असून यांत्रिकीकरणाचा वापर होत नाही. स्वतःच्या प्रयोगशाळेत अर्कशाळेने संशोधन करून मधुमेहावर मेहारी नामक औषधाचे उत्पादन सुरू केले.[१७]

## काच उद्योग :

ओगले ग्लास वर्क्समध्ये सुरूवातीला काचेच्या बांगडया आणि चिमण्या तयार होत. सन १९७७-१९१९ मध्ये कोळसा व कच्च्या मालाच्या तुटवडयामुळे हा कारखाना अत्यंत कठीण परिस्थितीत सुरू होता.[१८] सन १९१९ मध्ये या कारखान्याचे लिमिटेड कंपनीमध्ये रूपांतर झाले. सन १९२० मध्ये त्यात उत्तम प्रकारच्या चिमण्यांचे उत्पादन सुरू झाले. तेव्हापासून त्यात काचगोळे, फुलदाण्या, मंगलोरी काचेची कौले, बरण्यांचे उत्पादन सुरू झाले. सन १९२५ मध्ये त्यात हरिकेन कंदिलाचे उत्पादन सुरू झाले. कंदिलाचा दर्जा चांगला असल्यामुळे या कारखान्याची झपाटयाने वाढ झाली. त्यात एनॅमलच्या वस्तूही तयार होत. दुसऱ्या महायुद्धामुळे कारखान्याचा विस्तार होऊन अन्य काचेच्या वस्तूंचे उत्पादन सुरू झाले. सन १९५७ मध्ये येथे इलेक्ट्रिक मोटारचे उत्पादन सुरू झाले.[१९] सन १९७४ पासून कारखान्याची आर्थिक स्थिती बिघडत जाऊन १९८० मध्ये तो बंद पडला. सन १९८१ मध्ये तो भंडारी पोरवाल कंपनीने भाडयाने चालविण्यास घेतल्यावर त्यात ३० लाख रूपये किंमतीचे उत्पादन झाले. भंडारी पोरवाल कंपनीने दिवाळे काढल्यामुळे कारखाना १९८३ मध्ये कायम बंद पडला. साता-याला १९७७ मध्ये आर्ट सिरामिक वर्क्स, १९८६ मध्ये सातारा सेफ्टी ग्लास व १९८७ मध्ये एस्जे(Esjay) ग्लास वर्क्स स्थापन झाले.[२०]

## खाद्यतेल उद्योग :

तेल गाळणे हा जिल्हयातील फार जुना उद्योग आहे. सन १९५८ मध्ये ११ तेल गिरण्या व सोलणी कारखाने होते. त्यापैकी कराडच्या चार तेल गिरण्या अनुक्रमे १९४७, १९४८, आणि १९५७ मध्ये सुरू झालेल्या होत्या. त्यात मुख्यतः शेंगदाणा तेलाचे उत्पादन होत असे. एका

तेल गिरणीत शेंगदाणा व करंजीचे तेल गाळले जाई. तेल गिरण्या विजापूर व बागलकोट (कर्नाटक ) येथूनही शेंगदाणा खरेदी करीत. तेथील शेंगदाण्यामध्ये स्थानिक शेंगदाण्यापेक्षा तेलाचे परिमाण जास्त असे. सन १९८४ मध्ये जिल्हयातील १६ तेल गिरण्यांमध्ये २७० कामगार होते. [२१]

**लोखंड आणि पोलाद उद्योग** :

लोखंड आणि पोलादाचे कास्टिंग आणि फोर्जिंग फौंड्री, लोहमिश्र धातूचे उत्पादन आणि इतर धातूंचे कारखाने सातारा, कराड, फलटण, सांगवी व जरंडेश्वरला सुरू आहेत. या प्रवर्गातील पहिला कारखाना वालचंदनगर इंडस्ट्रिज लिमिटेड (इंजिन ॲण्ड फाउंड्री) १९३३ मध्ये सातारा रोड येथे सुरू झाला. सन १९८२–८३ मध्ये त्यात ६,४४,८५ लाख रूपये किंमतीचे उत्पादन झाले. [२२] ऑगस्ट १९८३ अखेर त्यात १,६७२ कामगात होते. सन १९७१ मध्ये किर्लोस्कर ब्रदर्स(कराड) कारखान्यात ॲलॉय आयर्न कास्टिंग, स्टील कास्टिंग आणि कास्ट आयर्न कास्टिंगचे उत्पादन सुरू झाले. साताऱ्याच्या अंगद मॅलिअेबल कास्टिंग (१९८१) मध्ये १९८३ साली मेलेबल ग्रे आयर्न कास्टिंगचे उत्पादन सुरू झाले. १९८५ मध्ये कूपर फाउंड्री सुरू झाली. वरील कारखान्यांशिवाय १९९३ मध्ये गाडोदिया स्टील इंडस्ट्रिज फलटण; प्राकाक्ता स्टील पेरले; ए.एस.पाटणकर, सांगवी; परांजपे मेटल, सांगवी हे कारखाने सुरू होते.

सन १९२० ला सातारा रोडला धनजीशाह कूपर यांनी डिझेल इंजिन बनविणारा देशातील पहिला कारखाना सुरू केला. सन १९४७ मध्ये तो वालचंद इंडस्ट्रिजला विकला. या कारखान्यात शेती अवजारे, प्लेन कॅलिको लुम्स, स्वयंचलित माग, पाच ते चाळीस हॉर्स पॉवरची इंजिने तयार होत. सन १९२१ मध्ये कराडला फडके इंडस्ट्रियल वर्क्स हा लोखंडी नांगर, उसाचे चरक आणि लोखंडी पलंग तयार करण्याचा कारखाना सुरू झाला. सन १९५७–५८ मध्ये कोयनानगरला सुरू असलेला हातमाग अंबर चरखा निर्मिती व दुरूस्ती कारखान्यात एकूण गुंतविलेले भांडवल ५५,००० रूपये होते. त्यात ५३,००० रूपये किंमतीचे उत्पादन आणि दुरूस्तीचे काम झाले. या कारखान्यात दहा कामगार होते. सन १९६० मध्ये साता–याला कूपर मेटल व सातारा इंडस्ट्रियल वर्क्स हे कारखाने सुरू झाले. सातारा इंडस्ट्रियल वर्क्समध्ये इंजिन सिलेंडर, लायनर, ट्राली इत्यादीचे उत्पादन होते. त्यात ९० कामगार होते. [२३]

सन १९७१ मध्ये ढेबेवाडीस किर्लोस्कर ब्रदर्सनी हर्मेटिक सीव्ड कॉम्प्रेसर, हौड्रॉलिक

प्रॉडक्ट इत्यादींचे उत्पादन करणारा कारखाना सुरू केला. सन १९८२-८३ मध्ये त्यात ४,२२,८९ लाख रूपये किंमतीची यंत्रनिर्मिती झाली आणि त्यात ४७८ लोकांना रोजगार मिळाला होता. जुलै १९८३ पर्यंत त्याने ४.८७ कोटी रूपये किंमतीच्या यंत्राची विक्री केली.[२४]

सन १९७७ मध्ये सातारा येथे स्थापन झालेल्या के.आयर्न वर्क्स मध्ये पुढील वर्षी उत्पादन सुरू झाले. त्यात साखर कारखान्यांसाठी लागणा-या यंत्रसामग्रीचे उत्पादन होते. सन १९७९ मध्ये कडोलीस अवंती माइनिंग टूल्स कारखाना स्थापन झाला. त्यात रॉक ड्रिलींग बिट्स, फिशिंग टूल्स व ड्रिल पाईपचे उत्पादन होते. सन १९८२ मध्ये जरंडेश्वरला भारत फोर्ब्ज कारखाना सुरू झाला. त्यात साखर, लोह व पोलाद कारखान्यांसाठी लागणाऱ्या यंत्रसामग्रीचे उत्पादन होते.[२५] सन १९८५ मध्ये कूपर फाउंड्रीमध्ये डिझेल इंजिनला लागणाऱ्या सिलेंडर लायनरचे उत्पादन सुरू झाले. याच वर्षी व्हल्कन लाव्हल मध्ये कॉम्प्रेसर, पर्यावरण नियंत्रण संयंत्र व साधनसामग्री, गॅस स्क्रू, कॉम्प्रेसर, बोल्ट इत्यादींचे उत्पादन सुरू उझाले.

सन १९७६ मध्ये साता-याला महाराष्ट्र स्कूटर हा सार्वजनिक क्षेत्रातील कारखाना सुरू झाला. कारखान्याने स्कूटर निर्मितीसाठी बजाज ऑटोबरोबर करार करून उत्पादन सुरू केले.[२६] सन १९८५ मध्ये साताऱ्याला पीएमपी ऑटो इंडस्ट्रीज कारखाना सुरू झाला. त्यात आल्टरनेटर, डिस्ट्रब्युटर, फासनर, वायफर मोटार व रेग्युलेटरचे उत्पादन होते. सन १९९० मध्ये परांजपे मेटल शेपर्स (खंडाळा) या कारखान्यास औद्योगिक परवाना मिळाला.

## कागद उद्योग :

या उद्योगाअंतर्गत कागदाचा लगदा, कागद, कागदी पुठ्ठा, वर्तमानपत्राचा कागद व तत्सम कारखाने आहेत. सन १९४९ मध्ये पुण्याहून ओगलेवाडीस कागद तयार करण्याचा कारखाना स्थलांतरित झाला. त्यात उच्च दर्जाचा हस्तनिर्मित कागद (ड्राईंग पेपर, बाँड पेपर, एअरमेल पेपर, ब्रिस्टल बोर्ड आणि डिग्री पेपर) तयार होत असे. सन १९६५ मध्ये मात्र कारखाना बंद पडला.[२७] सन १९८१ मध्ये शिरवळला शिर्के पेपर मिल स्थापन झाली. या मिलने १ डिसेंबर १९८२ ला उत्पादन सुरू केले. सन १९८३ मध्ये स्थापन झालेल्या निरा पल्प ॲण्ड पेपर कारखान्यात १९८७ मध्ये लेखन व मुद्रणासाठीच्या कागद उत्पादनास सुरूवात झाली. दिनांक १ मार्च १९९४ ला बोरगावला के.पल्प ॲण्ड पेपर मिल्स कारखाना सुरू झाला.[२८]

## वस्त्रोद्योग :

### सूत गिरण्या :

सन १९७९ मध्ये कराडला आगाशिव शेतकरी विणकरी सहकारी सूत गिरणी व फलटणला फलटण शेतकरी सहकारी सूत गिरणी आणि १९८९ व १९९१ मध्ये शेंद्रे येथे अजिंक्यतारा शेतकरी सहकारी सूत गिरणी व वाईला वाई तालुका सहकारी सूत गिरणी स्थापन झाली.[२९]

### हातमाग :

हा व्यवसाय वाई परिसरात प्राचीन काळापासून सुरू होता. स्थानिक लोकभाषेत वाय म्हणजे कोष्टी आणि त्यालाच वाय वेश किंवा वाई असेही म्हणतात. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर शासनाने विणकरांना आर्थिक, मदत, प्रशिक्षण व विक्री व्यवस्था करून दिल्यामुळे या व्यवसायास बरे दिवस आले. सन १९५०–५१ मध्ये जिल्हयात २,६१३ माग होते.[३०] सन १९५७–५८ मध्ये शासनाने सातारा, कोळेवाडी, वाई, म्हसवड व फलटणला हातमाग कापड विक्रीची दुकाने उघडली. यावर्षी जिल्हयात ४,००० विणकरांना रोजगार मिळाला. त्यांचे १,९०० माग होते. सन १९६१ मधील २,१३७ मागांची संख्या १९७६ मध्ये ४१६ झाली.[३१]

### लोकर विणकाम उद्योग :

या व्यवसायात लोकर काढणे, पिंजणे ताणणे व घोंगडया विणण्याची कामे केली जातात. सनगर व धनगर जातींचे लोक हा व्यवसाय करतात. हा व्यवसाय बिदाल, दहिवडी, महिमानगड, म्हसवड, चितळी, कलेढोण, गुंळुंब, माण अहिरे आणि शिवडे येथे आढळतो. सन १९५१ मध्ये या व्यवसायातील ७३ घटकांत १४४ कारागीर होते. १९५६–५७ मध्ये ६०० कारागीर होते. सन १९६१ मध्ये लोकर कताईमध्ये ७८१ आणि हातमागांवर घोंगडया विणणारे ६७५ कारागीर होते. सन १९७६ मध्ये जिल्हयात १६९ लोकरीचे माग होते. घोंगडयासाठी लागणारी लोकर लोणंद व म्हसवडला उपलब्ध असून म्हसवडच्या घोंगडया प्रसिद्ध आहेत. सन १९५७–५८ मध्ये जिल्हयात सात सहकारी संस्थांचे ३३६ सभासद होते. या संस्था गुंळुंब, म्हसवड, मल्हारपेठ, दुधेबावी, शिवडे, वाठार व वाईला होत्या. मार्च १९९५ अखेर जिल्हयात चार सहकारी संस्था होत्या. त्यापैकी तीन खटाव आणि एक कराड तालुक्यात कार्यरत होती.[३२]

**वन उद्योग** :

महाबळेश्वरला मधुमक्षिकापालन, कोळसा उत्पादन, शिकेकाई व हिरडा गोळा करणे आणि काठया तयार करण्याचे वनउद्योग आहेत. सन १९४७ मध्ये महाबळेश्वरला मधुसागर एपियरीज या संस्थेने मधुमक्षिकापालन केंद्र सुरू केले. सन १९५१ मध्ये ग्रामोद्योग मंडळानेही महाबळेश्वरला मधुमक्षिकापालन केंद्र सुरू केले. या केंद्रास भारत सरकारच्या खादी ग्रामोद्योग कमिशनने मान्यता दिली. सन १९५६–५७ मध्ये महाबळेश्वरला दोन संस्था होत्या. त्यापैकी एक शासकीय होती. दोन्ही संस्थांनी त्या वर्षी महाबळेश्वर परिसरातील लोकांना मधुमक्षिकापेटया वाटून मध गोळा केले. महाबळेश्वर येथील मधाची विक्री जिल्हयात आणि पश्चिम भारतात होते. महाबळेश्वरला आकर्षक नक्षीकाम केलेल्या पांढरीच्या लाकडापासून काठया तयार होतात. लोखंडी अथवा चिमट अथवा आपटीच्या लाकडापासून वेताच्या काठया तयार करतात. हे लाकूड महाबळेश्वरच्या जंगलात विपुल प्रमाणात आहे.[३३]

**आयुर्विमा** :

आज भारतभर कार्य करणारी व बहुसंख्य लोकांच्या जीवनाशी निगडीत असलेली लाईफ इंश्युरन्स कंपनी ही साता–यात बा.ग.चिरमुले यांनी स्थापन केली ही सातारकरांसाठी अभिमानाची गोष्ट आहे. सन १९१३ मध्ये साता–यास बा.ग.चिरमुले उर्फ नानासाहेब यांनी वेस्टर्न इंडिया लाईफ इंश्युरन्स कंपनी स्थापन केली. कंपनीचा विमा निधी १९४९ मध्ये ३,२५,३६,८३६ रूपये होता. कंपनीचे एकंदर खर्चाचे प्रमाण अत्यल्प उत्पन्नाच्या म्हणजे केवळ २३,०९ टक्के होर्त. कंपनीची एक शाखा तयार करण्यात आलेली होती.[३४] लाईफ इंश्युरन्स (इमर्जन्सी प्रोव्हीजन्स) ऑडीनान्स, १९५६ अनुसार आयुर्विम्याचे राष्ट्रीयीकरण झाल्यापासून आयुर्विमा महामंडळ ही एकमेव संघटना हा व्यवसाय करीत आहे. लाईफ इंशुरन्स कॉपरिशन ॲक्ट, १९५६ अनुसार भारत सरकारने १ सप्टेंबर, १९५६ रोजी आयुर्विमा महामंडळाची स्थापना केली. सन १९५६ मध्ये साताऱ्यास विभागीय कार्यालय होते. जिल्हयात महामंडळाच्या तीन शाखा असून सातारा, जावळी, वाई, महाबळेश्वर व कोरेगाव तालुक्यांचा समावेश सातारा शाखेत, कराड, व पाटण तालुक्यांचा समावेश कराड शाखेत आणि फलटण व माण तालुक्यांचा समावेश फलटण शाखेच्या कार्यक्षेत्रात करण्यात आला आहे.[३५]

**बाजारपेठा** :

शेतकऱ्याच्या मालास योग्य भाव मिळण्यासाठी सहकारी खरेदी–विक्री संस्था स्थापन करण्यात आले. मुंबई राज्य शासनाने १९२७ मध्ये मुंबई कापूस बाजार अधिनियम संमत केला. या अधिनियमामध्ये बऱ्याच उणीवा राहिल्याने व त्यामध्ये ब–याच कृषी मालाचे विनियमन झालेले नसल्याने मुंबई शासनाने १९३९ मध्ये मुंबई कृषी उत्पादन बाजार (विनियमन) अधिनियम संमत केला. या अधिनियमाची अंमलाबजावणी १९४१ पासून करण्यात आली. या अधिनियमात शेतीमालाचे बाजारभाव ठरविण्याबाबत काही बाजार (विनियमन) अधिनियमसंमत करून त्याची अंमलबजावणी १९६७ पासून सुरू केली. पतपुरवठा शेतीमालाशी संलग्न केल्यामुळे या संघाद्वारे मालाची योग्यभावाने विक्री करून शेतक–यांच्या गरजा भागविणे सुकर झाले आहे. तालुका पातळीवरील खरेदी–विक्री संस्था प्राथमिक विपणन संस्था म्हणून ओळखली जाते. शेतीसाठी अवजारे, बी–बीयाणे व खते पुरविणे आणि शेतमालाची किफायतशीर विक्री करणे ही प्राथमिक विपणन संस्थांची कर्तव्ये आहेत. प्रत्येक तालुक्यात खरेदी–विक्री संघ स्थापन करण्यात आले. कृषी उत्पादनास योग्य मूल्य मिळण्यासाठी जिल्हयात पहिली विनियमित बाजारपेठ १९४४ मध्ये कराडला व दुसरी १९४९ मध्ये कोरेगावला स्थापन झाली. सातारा जिल्हा खरेदी–विक्री संघाची स्थापना २५ जानेवारी १९६२ रोजी झाली. सन १९९२–९३ मध्ये नऊ कृषी उत्पादन बाजार समित्या व १८ उपबाजार होते.[३६]

**कराड कृषी उत्पन्न बाजार समिती** : कराड तालुक्यापुरते मर्यादित कार्यक्षेत्र असलेल्या या बाजार समिती स्थापना १ ऑक्टोंबर १९४४ रोजी स्थापन झाली. या मध्ये १३६ खेडयांचा समावेश होता. या समितीचे उंब्रज व मसूर येथे उपबाजार आहेत. येथे भुईमुग शेंगाची मोठी उलाढाल चालते. मसूर उपबाजार आवारात हळदीची उलाढाल मोठया प्रमाणात होते.

बाजार समितीच्या आवारात ऑक्टोंबर १९६४ पासून जनावरांचा बाजार भरविण्यात येत असे. कराड ही देशातील जनावरांची मोठी बाजारपेठ गणली जाते. येथे गुजरात, दिल्ली, पंजाब, कर्नाटक इत्यादी राज्यातून दुभत्या जनावरांची आवक फार मोठया प्रमाणात होते. सांगली, कोल्हापूर, रत्नागिरी , अहमदनगर, मुंबई, बीड आणि सोलापूर येथील व्यापारी जनावरांच्या खरेदी–विक्रीसाठी कराड येथे येतात.

**कोरेगाव कृषी उत्पादन बाजार समिती** :

या बाजार समितीची स्थापना १ डिसेंबर १९४९ रोजी झाली. या बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात कोरेगाव तालुक्यातील ७६ खेडयांचा समावेश आहे. मुख्य बाजार कोरेगावला असून वाठार (रेल्वे स्टेशन) व रहिमतपूर येथे उपबाजार आहेत. कोरेगाव विनियमित बाजारात कृषी मालाबरोबरच १९५९ पासून जनावरांचेही विनियमन होते. महाराष्ट्र राज्य को–ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन व कोरेगाव तालुका शेतकरी सहकारी संघामार्फत येथे घेवडयाची मोठया प्रमाणात उलाढाल होते. व्यापारी पेढयांमार्फत खरेदी केलेला घेवडा दिल्ली येथे पाठविला जातो. धणे प्रामुख्याने तामिळनाडू व आंध्र प्रदेशात व बटाटे मुंबईस पाठविले जातात. ओली मिरची पुणे, मुंबईला पाठविली जाते.[३७]

**फलटण कृषी उत्पादन बाजार समिती** :

या बाजार समितीची स्थापना १५ फेब्रुवारी १९५२ रोजी झाली. या बाजार समितीचे कार्यक्षेत्र संपूर्ण फलटण तालुका असून बरड येथे उपबाजार आहे. येथून कापूस मुंबईस, गहू व ज्वारी कोल्हापूर व पुणे आणि लोकर दिल्लीला पाठविली जाते.

**सातारा कृषी उत्पादन बाजार समिती** :

या बाजार समितीची स्थापना ११मे १९५२ रोजी झाली. या बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात सुरूवातीस सातारा, वाई व जावळी तालुक्यांचा समावेश होता. त्यानंतर १९७६ मध्ये महाबळेश्वर तालुक्याचा समावेश करण्यात आला. या कार्यक्षेत्राचे १९ मार्च १९८० रोजी विभाजन करून सातारा व वाई येथे स्वतंत्र बाजार समित्या अस्तित्वात आल्या. सातारा समितीच्या कार्यक्षेत्रात सातारा तालुक्यातील १८५ व जावळी तालुक्यातील २०७ गावे आहेत. अतित व वडूथ येथे उपबाजार आहेत. या बाजार आवारात गहू, ज्वारी, मूग, उडिद, हरभरा, चवळी, घेवडा, तूर, हळद , धने, कांदे आणि गूळ या कृषिमालांचेही विनियमन केले जाते.[३८]

**वडूज कृषी उत्पादन बाजार समिती** :

या बाजार समितीची स्थापना १ ऑगस्ट १९६५ रोजी झाली. या समितीचे कार्यक्षेत्र खटाव तालुक्यापुरते मर्यादित असून वडूज येथे मुख्य बाजार आवार आहे. पुसेगाव (१९८४) व पुसेसावळीला (१९९०) उपबाजार आहेत. वडूज ही जिल्हयाच्या पूर्व भागातील मुख्य बाजारपेठ असून ती गूळ व घेवडा यासाठी प्रसिद्ध आहे.

**मल्हारपेठ (पाटण) कृषी उत्पादन बाजार समिती, तालुका :**

या बाजार समितीची स्थापना ऑक्टोंबर १९६८ रोजी झाली. या समितीचे मुख्य बाजार आवार पाटणला आहे. मानेवाडी, मल्हारपेठ व तारळे येथे उपबाजार आहेत. येथे भुईमुगाच्या शेंगाची मोठी आवक व विक्री होते.

**लोणंद कृषी उत्पादन बाजार समिती :**

या समितीचे कामकाज १९५२ पासून फलटण कृषी उत्पन्न बाजार समितीचे देखरेखीखाली चालत असे. सन १९६९ पासून लोणंद समितीचे कामकाज स्वतंत्रपणे सुरू झाले. समितीच्या कार्यक्षेत्रात खंडाळा तालुक्यातील तीन निमशहरे व ५८ खेडयांचा समावेश आहे. मुख्य बाजार आवार सहा हेक्टर असून शिरवळ व खंडाळा येथे उपबाजार आहेत. लोणंद ही कांदयाची प्रसिद्ध बाजारपेठ असून येथे सातारा, पुणे आणि सोलापूर जिल्हयांतून कांदयाची मोठी आवक होते.

**दहिवडी कृषी उत्पादन बाजार समिती, तालुका माण :**

या बाजार समिती स्थापना ९ मार्च १९७० रोजी झाली. प्रारंभी बाजार समितीचा मुख्य बाजार गोंदवले बुद्रुक येथे होता. तो १९७२ मध्ये दहिवडी येथे स्थलांतरीत करण्यात आला. समितीच्या कार्यक्षेत्रात ७६ गावे असून गोंदवले आणि म्हसवडला उपबाजार आहेत. कृषिमालाचे विनियमन बरोबरच म्हसवडची शेळया-मेंढयांची यात्रा व नागोबा जनावरांची यात्रा बाजार समितीकडे आहे. जनावरे कोंबडया व कातडी यांचेही विनियमन करण्यात येते.[३९]

**वाई कृषी उत्पादन बाजार समिती :**

या बाजार समितीची स्थापना १९ मार्च १९८१ रोजी झाली. या समितीचे मुख्यबाजार आवार वाई-सोनगिरवाडी येथे असून क्षेत्र दोन हेक्टर आहे. पाचवड आणि भुईंज येथे उपबाजार आहेत. येथे बाजरी, गहू, ज्वारी, उडीद, घेवडा, हळद, धने, गूळ, भुईमूग या कृषिमालाचे विनियमन होते व हळदीचा व्यापार मोठा असतो.[४०]

**बँकिंग सुविधा :**

अण्णासाहेब चिरमुले यांनी २० ऑगस्ट १९०७ रोजी सातारा स्वदेशी कमर्शियल बँकेची स्थापना केल्यापासून वाणिज्य बँकांच्या जिल्हयातील व्यवहाराचा प्रारंभ झाला. सन १९१३ मध्ये युनायटेड वेस्टर्न बँक आण्णासाहेब चिरमुले यांनी स्थापन केली. [४१]

फलटणला मालोजीराजे नाईक निंबाळकर यांनी १९१८ मध्ये फलटण बँक स्थापन केली. साता-यास १९३६ मध्ये युनायटेड वेस्टर्न बँक ऑफ इंडियाची स्थापना झाली. सन १९३८ मध्ये औंधला बँक ऑफ औंध, १९४६ मध्ये कराडला बँक ऑफ कराडची स्थापना झाली. सन १९५१ मध्ये साता–यास बँक ऑफ कराडची शाखा तसेच १९५४ मध्ये लोणंदला युनायटेड वेस्टर्न बँक ऑफ इंडियाची शाखा निघाली. १९५६ मध्ये साता–यास स्टेट बँक ऑफ इंडियाची शाखा आली. कोल्हापूरची युनियन बँक यावर्षी युनायटेड वेस्टर्न बँकेत विलीन झाली. सन १९५८ मध्ये फलटण या बँकेने शाखा काढली. यावर्षी जिल्हयात १४ संयुक्त भांडवली बँका होत्या त्यापैकी आठ बँकांची मुख्य कार्यालये जिल्हयाबाहेर होती. सन १९६१ मध्ये अनुसूचित व बिगर अनुसूचित व्यापारी बँकाच्या अनुक्रमे १० व १२ शाखा होत्या. साता-याची स्वदेशी कमर्शियल बँक १९६२ मध्ये युनायटेड वेस्टर्न बँकेत विलीन झाली. जुलै १९६९ मध्ये झालेल्या बँकांच्या राष्ट्रीयीकरणानंतर या व्यवसायाच्या विकेंद्रीकरणास वेग येऊन लहान शहरे व मोठया गावांना वाणिज्य बँकांच्या ब-याच शाखा स्थापन झाल्या. सन १९९२ मध्ये अशा बँकांच्या १५० शाखा होत्या. त्यावेळी त्यांच्या ठेवी व त्यांनी दिलेली कर्जे अनुक्रमे ३२८,३० लाख रूपये व २०४,१५ लाख रूपये होती.[४२]

**सहकारी चळवळ** :

जिल्हयात १९०७ मध्ये पहिली कृषी पतसंस्था बोधे (ता.माण) येथे स्थापन झाली. त्यानंतर शेतक–यांच्या मूलभूत आर्थिक गरजा भागविण्यासाठी जिल्हयातील वेगवेगळया भागात कृषीपतसंस्था स्थापन झाल्या. इ.स.१९२१ मध्ये वाई तालुका को–ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीची स्थापना खंडेराव वाकडे, चुनीलाल गांधी व कोंडो गणेश दामले यांनी केली. या पतसंस्थेचे १९३१ मध्ये वाई अर्बन को–ऑपरेटिव्ह बँक या नागरी सहकारी बँकेत रूपांतर झाले.[४३] संस्थानातील प्रजेच्या आर्थिक अडचणी सोडविण्यासाठी मालोजीराजे नाईक निंबाळकर यांनी १९२६ मध्ये फलटणला लक्ष्मी सेंट्रल को–ऑपरेटिव्ह बँकेची स्थापना झाली. या सहकारी संस्था खेडयातील शेतक-यांना शेतीसाठीच पतपुरवठा करीत होत्या. यामुळे जिल्हयातील सामाजिक आणि आर्थिक गरजा भागविण्यासाठी वेगवेगळया घटकांतून पतसंस्था निर्माण झाल्या.[४४]

सन १९४०–४१ मध्ये जिल्हयात ३२९ सहकारी संस्था होत्या. मुंबई प्रांतातील इतर भागाप्रमाणे या जिल्हयातही आर्थिक प्रश्न सहकारी तत्वावर सोडविण्यासाठी सहकारी चळवळीने निरनिराळया क्षेत्रात पर्दापण केले. पुढे सहकारी खरेदी–विक्री संस्था अस्तित्वात आल्या. प्रतिकूल परिस्थितीत सहकारी संस्थांची वाढ होऊन १९६० मध्ये त्यांची संख्या ५७६, सभासद संख्या ६५,७९० व खेळते भांडवल रूपये १,०२,३१,९०१ होते. सहकारी संस्थांच्या १९४०–४१ मध्ये ३२९ व सभासद संख्या १६,८८१ होती. १९६०–६१ मध्ये ५७६ व सभासद संख्या ६५,७९० होती. १९८० –८१ मध्ये २,१४५ व सभासद संख्या ४,६९ (लाख) होती. व १९९०–९१ मध्ये ३,९८६ व सभासद संख्या १०.२० (लाख) होती.[४५]

सन १९९२–९३ अखेर जिल्हयात सर्व प्रकारच्या ४,३५६ सहकारी संस्था होत्या आणि त्यांची सभासद संख्या १२.५९ लाख होती. सहकारी संस्थांची माहिती पुढीलप्रमाणे होय.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक – १, प्राथमिक शेती पत पुरवठा–८५८, कृषक सेवा–३, नागरी सहकारी बँका – २०, पगारदार व नागरी पतपुरवठा –७२८, जिल्हा कृषी–औद्योगिक उत्पादन पणन –१, तालुका खरेदी–विक्री संघ – ११, प्राथमिक इतर पीक पणन–६, सहकारी साखर कारखाने–८, जिनिंग व प्रेसिंग–६, तेल गिरणी– १, प्राथमिक शेती माल प्रक्रिया – २१, मध्यवर्ती सहकारी दूध पुरवठा संघ – ८, प्राथमिक दूध पुरवठा–१,३३७, इतर पशु उत्पादन – ३४, कुक्कुट पालन–११४, प्राथमिक सामुदायिक शेती–९, उपसा जलसिंचन–५१८, मच्छीमार सहकारी–४१, हातमाग सहकारी–३, यंत्रमाग सहकारी– १२, इतर ग्रामीण उद्योग –१७, सरकारी गृहनिर्माण–६०४, मजूर–२६८, इतर सहकारी संस्था–३१३. मार्च १९९५ अखेर जिल्हयात या संस्थांची एकूण संख्या ४,८४३ होती व त्यांची सभासद संख्या १४,४९ लाख होती.[४६]

## सहकारी बँका :

**सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक** : समाजपरिवर्तनासाठी अर्थकारण ही अत्यंत महत्त्वाची असणारी बाब आहे. स्व.यशवंतराव चव्हाण यांनी सातारा जिल्हयातील शेतक–यांसाठी बँक असावी अशी कल्पना मांडली. श्री.बाळासाहेब देसाई, श्री.आर.डी.पाटील, श्री.आबासाहेब वीर इ.नेत्यांनी अथक परिश्रमातून सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची निर्मिती केली. सन १९४९ मध्ये साताऱ्याला नॉर्थ सातारा डिस्ट्रिक्ट सेंट्रल को–ऑपरेटिव्ह

बँक स्थापन झाली. फलटणच्या लक्ष्मी को–ऑपरेटिव्ह बँकेचे या बँकेत विलिनीकरण झाले. अशा रितीने आज उत्कर्षाच्या शिखरावर असणाऱ्या या बँकेची अल्पशा भांडवलावर दि.१५/८/१९४९ रोजी स्थापना झाली.[४७] सन १९९२–९३ मध्ये या बँकेच्या मुख्य कचेरीसह जिल्हयात १७५ शाखा होत्या. तसेच २,६८६ सोसायटया व १,७५६ व्यक्तिगत सभासद होते. सन १९९२–९३ मध्ये दिलेली कर्जे २१,७०६,५२ लाख रूपये, गुंतवणूक ५,८६६,३४ लाख रूपये व खेळते भांडवल ३०,७१९,६७ लाख रूपये होते.

शेतकऱ्यांना बी–बियाणे, रासायनिक खते, कीटकनाशके, पाणी व वीज बिले इत्यादीसाठी प्राथमिक संस्थांमार्फत अल्प मुदतीची कर्जे दिली जात. याशिवाय गाई, म्हशी, बैल, बैलगाडया, विद्युत मोटार इत्यादी खरेदीसाठी आणि विहीरींच्या दुरूस्तीसाठी अल्प मुदतीची कर्जे दिली जात. कृषी पंढरी योजनेनुसार वेगवेगळया योजनांतर्गत शेतकऱ्यांना कर्जपरुवठा केला जाई. सन १९९२–९३ मध्ये बँकेने ४८,४८,०५ लाख रूपये कर्ज वाटप केले. त्यापैकी सबळ सभासदांना १८,०४,०६ लाख दुर्बल सभासदांना ३०,४३,९९ लाख रूपये कर्ज दिले. नाबार्डकडून देशपातळीवरील उत्कृष्ठ कार्यक्षमतेचा सलग सहा वर्षे पुरस्कार प्राप्त करणारी देशातील सहकार क्षेत्रातील ही एकमेव बँक आहे.[४८]

मार्च १९९७ अखेर बँकेने २०७ शाखा आणि चार विस्तारीत कक्ष यांच्या माध्यमातून कृषी पतपुरवठयाबरोबरच शेतकऱ्यांना बँकींग सेवाही उपलब्ध करून दिली होती. शेतक–यांच्यासाठी ग्रामीण घरकुल कर्ज योजना, ठाणबंद शेळी प्रकल्प कर्ज पुरवठा, ग्रामीण शौचालय कर्जपुरवठा योजना व ग्रामीण विकासाशी निगडीत असलेल्या विविध कार्यकारी सहकारी सोसायटयांना रेशनिंग दुकान व्यवसायासाठी कमी व्याजदराने पतपुरवठा केला. शासन पुरस्कृत पीक विमा योजनाही बँकेने यशस्वीरित्या राबविली असून शेतक–यांना नुकसान भरपाईच्या रकमा मिळवून दिल्या आहेत. ग्रामीण भागात लघु उद्योगधंद्याची वाढ होण्यासाठी स्वयंरोजगारभिमुख दृष्टिकोन ठेवून बँकेतर्फे ग्रामीण कारागीर योजने अंतर्गत ग्रामीण भागातील कारागिरांना, सुशिक्षित बेकारांना व्यवसायासाठी प्रत्येकी कर्जपुरवठा केला.[४९]

**महाराष्ट्र राज्य सहकारी कृषी व ग्रामीण विकास बँक (भूविकास बँक) :**

सन १९७३ पूर्वी या बँकेला भूतारण बँक म्हणत. सन १९२५ च्या मुंबई प्रांत सहकार अधिनियमानुसार २८ जून १९३५ रोजी कराड येथे या बँकेची शाखा स्थापन झाली. या

शाखेच्या कक्षेत सांगली भागही होता. त्यानंतर मार्च १९५० मध्ये सांगलीला स्वतंत्र शाखा उघडण्यात आली. बँकेच्या कामकाजाच्या सोयीसाठी १९५८–५९ मध्ये फलटण सातारा, इस्लामपूर आणि तासगाव येथे शाखा उघडण्यात आल्या. बँकेचे मुख्य कार्यालय कराड येथेच होते. सांगली जिल्हा वेगळा झाल्यानंतर १९६४ मध्ये बँकेचे मध्यवर्ती कार्यालय साता–यास हलविण्यात आले. बँकेचा मूळ उद्देश शेतक–यांना कर्ज देणे, जुनी कर्जे फेडणे आणि शेती विकासासाठी कर्ज देणे हा होता. त्यानंतर जमिनीची बांधबंदिस्ती करणे, पडीक जमीन लागवडीखाली आणणे, विहीर खोदणे, जुनी विहीर दुरूस्ती करणे. ऑईल इंजिन व विद्युत मोटारीसाठी दीर्घ मुदतीची कर्जे देण्यास सुरूवात झाली. शिवाय गोबरगॅस आणि मळणीयंत्र खरेदीसाठीही कर्ज दिले. १ मे १९७३ पासून भूविकासाच्या कामकाजावर नियंत्रण ठेवून राज्यभर एकसूत्री अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने सर्व जिल्हा भूविकास बँकांचे शिखर बँकेत विलिनीकरण केले व महाराष्ट्र राज्य सहकारी भूविकास नामक राज्यस्तरावरील शिखर बँकेची स्थापना केली. कर्जवाटप धोरणातही काही मूलभूत बदल करण्यात आले. सन १९८७–८८ शिखर बँकेचे नाव बदलून महाराष्ट्र राज्य सहकारी कृषी आणि ग्रामीण विकास बँक असे ठेवण्यात आले. शेती आणि शेतीचे पूरक व्यवसाय ग्रामीण भागातील कलाकुसरीच्या कामाला प्राधान्य आणि शासकीय कामाचा एक भाग म्हणून बँकेने ग्रामीण कुटीरोद्योग या योजनेमध्ये १९८७–८८ मध्ये १०५ कुटीरोद्योगांना ११,९६,५८२ रूपये कर्ज वाटप केले.[५०]

**नागरी सहकारी बँका** :

सन १९१७ मध्ये स्थापन झालेली कराड अर्बन सहकारी बँक ही जिल्हयातील पहिली नागरी सहकारी बँक होय. त्या वर्षी तिची सभासद संख्या ५१ आणि भाग भांडवल ५१,००० रूपये होते. सन १०४८–४९ मध्ये जिल्हयातील ३९ नागरी सहकारी संस्थांचे १०,४४३ सभासद होते.[५१] सन १९६१ मध्ये त्यांची संख्या ४६ होती. त्यापैकी पाच नागरी सहकारी बँका, १२ नागरी सहकारी पतपेढया, २५ वेतनदारांच्या सहकारी संस्था आणि चार औद्योगिक कामगारांच्या संस्था होत्या. त्यांची एकूण सभासद संख्या १८,६७५ होती.[५२] या बँकांचा मुख्य उद्देश सभासदांना व्यापारासाठी भांडवल, मालमत्ता खरेदीसाठी, लग्नकार्य, शिक्षण इत्यादीसाठी कर्जपुरवठा करणे हा आहे. या बँका शेतीसाठी देखील कर्जपुरवठा करतात.

**प्राथमिक कृषी पतसंस्था :**

या संस्थांचा मुख्य उद्देश सभासदांना बी-बियाणे, खते, कीटकनाशके, अवजारे, बैल आणि बैलगाडयांसाठी कर्ज देणे असल्यामुळे त्यांना शेतकी सहकारी पतपेढया किंवा बहुउद्देशी सेवा संस्था असेही म्हणतात. या संस्था बहुतांश ग्रामीण भागात असून शेतकरीच त्यांचे सभासद असतात. पहिली शेतकी पतसंस्था बोधे येथे १९०७ मध्ये स्थापन झाली. सन १९४८-४९ मधील ५३१ प्राथमिक शेती पतसंस्थांची सभासद संख्या ३५, ६१८ होती. या वर्षी राज्यातील इतर जिल्हयाच्या तुलनेत साता-यार सर्वात जास्त संस्था होत्या.[५३]

**सहकारी औद्योगिक वसाहती :**

जिल्हयात खालील सहकारी औद्योगिक वसाहती असून त्यांचे स्थापना वर्ष कंसात दिलेले आहे.[५४]

(१) यशवंत सहकारी औद्योगिक वसाहत, सातारा रोड (१९६१).

(२) कराड, सहकारी औद्योगिक वसाहत, ओगलेवाडी (१९६१).

(३) कोयना औद्योगिक वसाहत, कराड(१९७६).

(४) सहकारी औद्योगिक वसाहत, लोणंद (१९८७).

(५) सहकारी औद्योगिक वसाहत, फलटण (१९८८).

**वीज निर्मिती आणि वितरण :**

दिनांक २ मे १९५१ पासून सातारा इलेक्ट्रिक कंपनीने सातारा तालुक्यातील २१ गावांना आणि कारखान्यांना वीज पुरवठा सुरू केला. सन १९५६ मध्ये राज्य पुनर्रचना झाल्यावर १ फेब्रुवारी १९५७ रोजी मुंबई राज्य विद्युत मंडळाची स्थापना होऊन त्यात यथावकाश सर्व लहान वीज निर्मिती केंद्रे विलीन करण्यात आली. मंडळाने वाईस उभारलेले डिझेल वीज निर्मिती केंद्र १७ एप्रिल १९५६ ला सुरू झाले. या केंद्रात डिझेलवर चालणाऱ्या तीन जनित्रांची उत्पादन क्षमता १३० किलोवॅट होती. सन १९५७-५८ मध्ये सातारा, कराड, वाई आणि कोरेगाव वीज केंद्रांची उत्पादन क्षमता ५८२,५२६,१३० व ४८ किलोवॅट होती.[५५] सन १९६०-६१ मध्ये जिल्हयातील सर्व डिझेल वीज निर्मिती केंद्रांची एकूण वीज उत्पादन क्षमता १,६२० किलोवॅट होती. त्यावर्षी जिल्हयातील ५८ गावे आणि एकूण लोकसंख्येच्या १८,३१ टक्के लोकांना विजेचा फायदा मिळाला. ऑक्टोंबर १९६२ मध्ये महाराष्ट्र राज्य विद्युत

मंडळाने ओगलेवाडी आणि कराड उपकेंद्राद्वारे विजेचा पुरवठा सुरू केला. सन १९६२–६३ मध्ये कोयना जलविद्युत केंद्र सुरू झाले. या केंद्राचे मुख्य उपकेंद्र कराड (मुंढे) असून ते २२० किलोवॅट दाबाने जोडण्यात आले. सन १९६३–६४ मध्ये महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने सातारा रोड उपकेंद्राद्वारे सातारा इलेक्ट्रिक सप्लाय कंपनीस विद्युत पुरवठा सुरू केला. तद्नंतर मंडळाने १९७१ मध्ये कराड इलेक्ट्रिक सप्लाय कंपनी व १९७३ मध्ये सातारा इलेक्ट्रिक सप्लाय कंपनी ताब्यात घेतली.

**कोयना जलविद्युत प्रकल्प** :

मुंबई शहर आणि परिसरातील भागास बरीच वर्षे विजेचा तुटवडा भासत होता. त्यावर मात करण्यासाठी टाटा हायड्रो–इलेक्ट्रिक सप्लाय कंपनीने १९१० मध्ये कोयनेवर जलविद्युत प्रकल्प उभारण्याबाबत पाहणी केली होती. मात्र अधिक हालचाल झाली नाही. सन १९३०–३१ मध्ये या प्रकल्पाच्या पाहणीचे काम पुन्हा केल्यावरही काहीच झाले नाही. टाटाचा संकल्पित प्रकल्प भूपृष्ठावर विद्युत निर्मिती केंद्रासाठी उपयुक्त होता. परंतु युरोपात १९१० ते १९५० च्या दरम्यान भूगर्भात विद्युत केंद्र उभारण्याच्या तंत्रज्ञानात प्रगती झाली होती. सन १९४५ मध्ये मुंबईच्या इलेक्ट्रिक ग्रिड विभागाने याच तंत्रज्ञानानुसार कोयना येथील भूगर्भातील विद्युत प्रकल्पाची आखणी केली. या प्रकल्पासाठी स्वित्झर्लंडच्या तज्ञांची मदत घेण्यात आली. प्रकल्पातील पहिल्या टप्प्याच्या प्रस्तावास १९५३ मध्ये प्रशासकीय मंजुरी मिळाली. या कामी न.वि.गाडगीळ यांनी यांनी केंद्रीय मंत्री असताना बरीच मदत केली. त्यानुसार महाबळेश्वर ते हेळवाक पर्यंत सरासरी ६,२२६ मि.मी.(२४५ इंच) जलवृष्टी होणा–या कोयनेच्या जलप्रदाय क्षेत्रातील पाणी अडवून देशमुखवाडीस कोयना नदीवर २,७९६ दशलक्ष घनमीटर क्षमतेचे धरण बांधून शिवसागर नामक जलाशय तयार केला. या धरणाचे प्राथमिक काम १६ जानेवारी १९५४ ला सुरू झाले. हे धरण स्वित्झर्लंडमधील धरणाच्या नमुन्यानुसार गुरूत्वप्रेरित तंत्रज्ञानाने बांधण्यात आले. जागतिक बँकेने या प्रकल्पासाठी १२ कोटी रूपये दिले होते. धरणातील पाणी नवजे गावाजवळील अधिजल बोगदयातून सहयाद्रीच्या पश्चिमेस पोफळी येथे आणून तेथे प्रचंड वेगाने आलेल्या पाण्यावर भूमिगत विद्युत केंद्राची उभारणी केली. पहिल्या टप्प्यात त्यात ६५ मेगावॅटची चार जनित्रे बसविण्यात आली. त्यापैकी पहिले जनित्र १६ मे १९६२ ला व इतर तीन जनित्रे अनुक्रमे २ ऑगस्ट १९६२, २८ जानेवारी १९६३, व २८ फेब्रुवारी १९६३ ला सुरू

झाली. विद्युत केंद्र १ एप्रिल १९६३ ला महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडे हस्तांतरीत झाले. प्रकल्पातील दुसऱ्या टप्प्यात १९६६–६७ मध्ये ७५ मेगावॅट क्षमतेची आणखी चार जनित्रे बसविण्यात आली.

पोफळी जलविद्युत निर्मिती केंद्रातून बाहेर पडणारे पाणी अधिजल भुयारातून पुन्हा एकदा वीज निर्मिती करण्यासाठी कोळकेवाडी धरणात वळविले आहे. या धरणाची साठवण क्षमता ३६.२२ दशलक्ष घनमीटर आहे. या पाण्यापासून विद्युत निर्मितीसाठी धरणाच्या पायथ्याशी १९६५ मध्ये अलोरे जलविद्युत केंद्राची उभारणी केली. या केंद्रातील पहिले जनित्र ६ जुलै १९७५ व इतर तीन जनित्रे अनुक्रमे १९७६, १९७७, व १९७८ मध्ये कार्यान्वित झाली. येथील जनित्रांची उत्पादन क्षमता प्रत्येकी ८० मेगावॅट आहे. याशिवाय चौथ्या टप्प्यात २५० मेगावॅट क्षमतेची चार जनित्रे बसविण्याची योजना आहे.

सातारा जिल्हयात जलसिंचनासाठी या धरणातून कोयना नदीत काही प्रमाणात पाणी सोडले जाते. या पाण्यावर कोयना धरणाच्या पायथ्याशी एक लहान विद्युत निर्मिती केंद्र उभारले असून त्यात १८ मेगावॅट क्षमतेची दोन जनित्रे बसविली आहेत. ती अनुक्रमे ३ ऑक्टोंबर १९८० व १६ मार्च १९८१ ला कार्यान्वित झाली. कोयना प्रकल्पातील पोफळी (टप्पा १ व २) विद्युत केंद्रातील जनित्रे पश्चिम जर्मनीकडून आयात केलेली असून अलोरे (टप्पा ३) व कोयना धरण पायथा विद्युत केंद्रातील जनित्रे भोपाळच्या भारत हेवी इलेक्ट्रिकल्सने तयार केलेली आहेत. या विद्युत केंद्रांवर एकूण गुंतवणूक १४२.६७ कोटी रूपये झालेली असून त्यांची एकूण क्षमता ९१६ मेगावॅट आहे.

कोयना जलविद्युत प्रकल्पाशिवाय जिल्हयात वीर (१९७५), यवतेश्वर(१९८८), कन्हेर(१९९०) आणि धोम (१९९०–९१) ही जलविद्युत केंद्रेही सुरू आहेत. त्यांची वीज उत्पादन क्षमता अनुक्रमे ९;०, ०७, ५;४ व २ मेगावॅट आहे. वीर जलविद्युत केंद्रातील जनित्रे हंगेरीहून आयात केलेली असून यवतेश्वर, कन्हेर व धोम वीज केंद्रांतील जनित्रे भारतीय आहेत. या केंद्रांवर एकूण १०.९६ कोटी रूपये गुंतवणूक झाली आहे.[५६]

**कामगार चळवळ :**

सन १९८० मध्ये नारायण मेघाजी लोखंडे यांनी मुंबई येथे मुंबई कामगार संघटना स्थापन केली. भारतातील ही पहिली कामगार संघटना होती. सन १९१० मध्ये मुंबईस कामगार

हितवर्धक सभा ही गिरणी कामगारांची संघटना स्थापन झाली. इतर उद्योगांतील कामगारांनाही आपल्या संघटना स्थापन केल्या. परंतु त्यामध्ये स्थैर्य आणि सातत्य नव्हते. कामगार संघटनांची चळवळ खऱ्या अर्थाने सुरू झाली ती पहिल्या महायुद्धानंतर. या सुमारास महाराष्ट्रातील वातावरण बदलून गेले होते. कामगार वर्गात अस्वस्थता वाढू लागली होती. त्यांच्यात असुरक्षिततेची भावना तयार झाली होती. त्यावेळेस राजकीय असंतोष निर्माण झाला होता. महात्मा गांधींनी असहकार चळवळ सुरू केली होती. रशियामध्ये झालेल्या कामगार क्रांतीचे पडघम पडत होते. त्यांचा कामगारांवर परिणाम झाला आणि १९१८ नंतर अनेक ठिकाणी कामगार संघटनांचा उदय झाला. तथापि औद्योगीकरणाचा प्रसार दुसरे महायुद्ध व स्वातंत्र्यानंतर झालेला असल्यामुळे कामगार चळवळ त्यानंतरच सुरू झाली. भारतीय कामगार संघटना कायदा, १९२६ नुसार १९४८ मध्ये फलटणला साखर संघटनेची नोंदणी झाली. सन १९५१ मध्ये साता-याला किर्लोस्कर कामगार संघटनेची नोंदणी झाली.[५७] सन १९५२-५३ मध्ये हाटेलकीपर असोशिएशन, सराफ असोशिएशन व काच कामगार संघटनांची नोंद झाली होती. मार्च १९५६ अखेर जिल्हयात कामगार संघटना कायदा, १९२६ नुसार १२ संघटनांची नोंद झालेली होती. नंतरच्या काळात साखर, अभियांत्रिकी, खाद्य पदार्थ तयार करणारे, अधातू खनिज पदार्थ कारखाने सुरू झाल्यामुळे नवीन कामगार संघटना उदयास आल्या.

सन १९५२ मध्ये फलटण शुगर वर्क्समध्ये अधिलाभांश न दिल्यामुळे दहा दिवस संप झाला. त्यात ६३६ कामगारांनी भाग घेतल्यामुळे ३ दिवस वाया गेले. या वर्षी ओगलेवाडीच्या काच कारखान्यातील १.३५० कामगारांनी चार तास संप करून ६७५ दिवस वाया घालविले.दोन्ही संपात कामगार अयशस्वी झाले. सन १९५३-५६ दरम्यान हातकागद कारखान्यात वेतनाची थकबाकी व अन्य सोयींसाठी १३ संप झाले. त्यात ८९७ कामगारांनी भाग घेतला होता. सन १९७०-७१ ते १९८२-८३ दरम्यान जिल्हयातील १४ कारखान्यांमध्ये वेतन, बोनस, कामगार कपात व रजा यावरून झालेल्या संपात १,४३४ कामगारांनी भाग घेतल्यामुळे ७६,४५० दिवस वाया गेले. ओगले ग्लास वर्क्सची आर्थिक स्थिती खालावल्यामुळे आणि कामगार विषयक अस्थिर परिस्थिती निर्माण झाल्यामुळे संचालकांनी ४ मे १९८३ पासून केलेल्या टाळेबंदीमुळे १,३१३ कामगार बेकार झाले. साता-याच्या अंगद मॅलिअबल कास्टिंगमध्ये १२ सप्टेंबर १९८५ ला कामगार व मालकात झालेल्या करारातील अटी

कामगारांनी न पाळता १६ सप्टेंबर १९८५ ला कोणतेही कारण न देता एक दिवस संप केल्याने आर्थिक नुकसान झाल्याने आणि कामगार ठरलेले उत्पादन देत नसल्यामुळे या कंपनीने १ जानेवारी १९८६ पासून टाळेबंदी केली. त्यामुळे ११७ कामगार बेकार झाले. सन १९८७ मध्ये साता-याच्या परांजपे ऑटो कास्टने ५ एप्रिल १९८७ ला टाळेबंदी जाहीर केली. परंतु मालक आणि कामगार याच्यात समेट होऊन टाळेबंदी ११ जून १९८७ ला उठली. टाळेबंदीमुळे १२२ कामगारांना ३८ दिवस कामाशिवाय राहावे लागले. सन १९९०-९१ ते १९९२-९३ या कालावधीत कृष्णा सहकारी साखर कारखाना, डेलस्टार, पतेजा ब्रदर्स फोर्जिंग ॲण्ड स्टॅम्पीग्ज; परांजपे मेटल शेपर्स; सुल्फा फौंड्री; वंदना फौंड्री व धनश्री इंडस्ट्रीज; मॅग्नाके फॉर्म्यार्स्युटिकल; आगाशिव शेतकरी विणकरी सहकारी सूत गिरणी; पॅगर बर प्रॉडक्ट; अभिजात इक्वीपमेंटस प्रा.लि.; कमल कोटींग्ज प्रा.लि.; व्हेपार एनर्जी मशिन्स प्रा.लि.; क्रिस्टल ग्रॅनाईट ॲण्ड मार्बल प्रा.लि.; पी.एम.पी.ऑटोइंडस्ट्रीज तसेच सातारा कराड, वाई आणि लोणंद येथील कृषी उत्पन्न बाजार समित्या, क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय व राज्य परिवहन महामंडळ, सातारा यामध्ये ३,३३९ कामगारांनी संप केले.[५८] सातारा जिल्हयाचे कामगार नेते म्हणून एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस कॉम्रेड प्रभाकर महाबळेश्वरकर यांच्याकडे पाहीले जात असे. कामगारांच्या न्याय मागण्यांसाठी त्यांनी वेळोवेळी लढे दिले. कॉम्रेड प्रभाकर महाबळेश्वरकर यांनी सातारा जिल्हा 'जनरल वर्क्स युनियन 'ची स्थापना करून त्या युनियनच्या माध्यमातून संपुर्ण जिल्हयातील कामगारांना प्रेरीत केले. त्यांना त्यांच्या न्याय्य हक्कांची जाणिव करून अन्यायाविरूध्द सतत वाचा फोडली. कामगार चळवळीच्या माध्यमातून अनेकांना आर्थिक मदत मिळवून दिली. समाजातील गरीब कामगार, कष्टकरी जनता यांच्या चेहऱ्यावरील हास्य हेच आपल्या श्रमाचे फळ म्हणून कार्य करत होते.[५९]

**समारोप :**

सातारा जिल्हयाचा आर्थिक विकासात शेती व शेतीपुरक उद्योगधंदे यांनी मोठा हातभार लावलेला आहे. सातारा जिल्हयातील पश्चिम भागात होणारी पर्जन्यवृष्टी ही अत्यंत जास्त प्रमाणात आहे तर उलट पुर्व भागात पिण्याच्या पाण्याची वानवा भासते. शेती व उद्योगधंद्यांसाठी आवश्यक असणाऱ्या पाण्याची गरज भागवणे तर अवघड बाब होती. याचप्रमाणे जिल्हयाच्या पश्चिम भागतील मृदा ही मुरमाड व कमी प्रतिची असुन पुर्व भागात मात्र हीच मृदा

काळी व सुपीक आहे. या सर्व परिस्थीतीवर मात करत येथिल जनतेने आपला आर्थिक विकास घडवण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

कुपर उद्योग समुह व मुथा यासारख्या उद्योगसमुहांनी सातारा जिल्हयात आपल्या व्यवसायाचा आरंभ करून सातारा जिल्हयास महाराष्ट्राच्या औद्योगिक नकाशावर स्थान मिळवून दिले.स्वातंत्रोत्तर काळात किंवहुना स्वतंत्र सातारा जिल्हयाच्या निर्मितीनंतरही सातारा जिल्हयाचा आर्थिक विकास म्हणावा इतका झालेला दिसत नाही. काही मोजके औद्योगिक कारखाने वगळता सातारा जिल्हयात औद्योगिक विकास झालेला दिसत नाही. सातारा जिल्हयाचा आर्थिक इतिहास पाहीला असता लक्षात येते की सातारा जिल्हयाच्या आर्थिक विकासासाठी आवश्यक असणारी भौगौलिक परिस्थीती येथे उपलब्ध असताना देखिल स्वातंत्रोत्तर कालखंडात मुलभूत सुविधांच्या अभावामुळे सन १९७१ नंतरच ख–या अर्थाने इथल्या औद्योगिक विकासाला आरंभ झाला. विविध महामंडळांच्या माध्यमातून औद्योगिकरणासाठी आर्थिक मदत पुरवण्यात आली व सातारा जिल्हयात विविध ठिकाणी एम.आय.डी.सी.च्या माध्यमातून औद्योगिक विकास करण्याचा प्रयत्न झाला. परंतू उद्योगांसाठी लागणारी विज व जागा यांच्या कमतरतेमुळे हा विकासाचा वेग फारच मंदावलेला दिसतो.

सहाकारी तत्वांवर सातारा जिल्हयात साखर कारखाने निर्माण झाले. या साखर कारखान्यांच्या धर्तिवर अनेक प्रकारच्या सहकारी संस्था उदा. दुध संघ, बँका, कृषी उत्पन्न बाजार समित्या व खरेदी विक्री संघ आणि सहकारी औद्योगिक संस्थांची निर्मीती जिल्हयात झाली आणि या जिल्हयातील शेतकरी वर्गास आपल्या शेतीउत्पादनांना योग्य न्याय मिळू लागला. सहकारी बँकांमुळे आर्थिक चणचण दुर होऊ लागली. परंतू काळाच्या ओघात या सहकारी संस्थांमधील काही संस्था डबघाईस आलेल्या दिसतात तर काही संस्था बंद झालेल्या आहेत.

जिल्हयात उद्योगधंद्यांसाठी लागणार कच्चा माल व मानवी बळ याची कमतरता भासत नाही परंतू राजकीय ईच्छाशक्तीची यासाठी हवी त्या प्रमाणात मदत होत नसल्याने सातारा जिल्हयाची औद्योगिक ओळख वाढली जात नाही उलट पुसली जात आहे. एकविसाव्या शतकात सेझ सारख्या संस्थांमुळे या आर्थिक विकासाचा वेग वाढेल अशी अपेक्षा आहे.

## संदर्भ


1. सातारा गॅझेटियर, १९६३, पृ.४१०
2. कित्ता.
3. कित्ता.
4. दै.लोकमत दि.२६/०१/२००९ 'सातारची औद्योगिक वाटचाल' पृ.२
5. मराठा चेंबर्स ऑफ कॉमर्स, सातारा डायरी, २००७, सातारा शहर व परीसरातील उद्योग व व्यापार याबाबत परीपुर्ण माहीती, पृ.२७१
6. सातारा गॅझेटियर, १९६३, पृ.४८०.
7. कित्ता. पृ.४८१
8. डॉ.वरेकर निवासराव अधिकराव, स्वातंत्र्योत्तर काळातील सातारा शहर : एक नागरी ऐतिहासिक अभ्यास', पीएच.डी. पदवीसाठी सादर केलेला शोधप्रबंध , शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, जुन २००९, पृ.१४९
9. दै.लोकमत, उपरोक्त , पृ.१
10. स्टॅटिस्टिकल ॲटलास ऑफ बॉम्बे स्टेट, १९५०, पृ.८१
11. सातारा जिहा उद्योग केंद्र, ॲक्शन प्लॅन, (१९८३–८४ ते १९८७–८८) पृ.२४, २५
12. वार्षिक औद्योगिक सर्वेक्षण, सातारा जिल्हा, पृ.२१५
13. मराठा चेंबर्स ऑफ कॉमर्स, सातारा डायरी, उपरोक्त , पृ.६५
14. स्टॅटिस्टिकल ॲटलास ऑफ बॉम्बे स्टेट, १९५०, पृ.८४.
15. सातारा गॅझेटियर, १९६३, पृ.४१९
16. कित्ता.
17. वार्षीक अहवाल, आयुर्वेदीय अर्कशाळा, २०१०, पृ.१६
18. रिपोर्ट ऑन दि ॲडनिनिस्ट्रेशन ऑफ द बॉम्बे प्रेसिडेन्सी, १९१७–१८ .१९१८–१९, पृ.८३.
19. कोठारी इकॉनॉमिक ॲन्ड इंडस्ट्रियल गाईड ऑफ इंडिया, १९७६, पृ.२३५
20. सातारा गॅझेटियर, १९६३, पृ.४२२, ४२३.
21. सातारा गॅझेटियर, उपरोक्त, पृ.४१८

22. सातारा जिहा उद्योग केंद्र, ॲक्शन प्लॅन, (१९८३–८४ ते १९८७–८८) पृ.२४, २५
23. डॉ.वरेकर निवासराव अधिकराव, उपरोक्त , पृ.१४९
24. उपकार्यकारी उपकार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र विकास महामंडळ यांचे रजिस्टरवरून
25. कित्ता.
26. कोठारी इकॉनॉमिक ॲन्ड इंडस्ट्रियल गाईड ऑफ इंडिया, १९७६, पृ.२५६
27. गोखले पु.पा., जागृत सातारा, पृ.६०
28. दै.महाराष्ट्र टाईम्स, १७/१०/१९९४, पृ.८
29. सातारा गॅझेटियर, उपरोक्त, पृ.४२९
30. कोठारी इकॉनॉमिक ॲन्ड इंडस्ट्रियल गाईड ऑफ इंडिया, १९७६, उपरोक्त, पृ.२३५
31. सातारा गॅझेटियर, उपरोक्त, पृ.४३२
32. सातारा गॅझेटियर, उपरोक्त, पृ.४३३
33. सातारा गॅझेटियर, उपरोक्त, पृ.४३७
34. कणगली एस.एम., पुण्याचा माहितीगार, १९४९, पृ.१०
35. सातारा गॅझेटियर, उपरोक्त, पृ.४८४
36. सातारा गॅझेटियर, उपरोक्त, पृ.४८७
37. कित्ता.
38. सातारा गॅझेटियर, उपरोक्त, पृ.४८८
39. सातारा गॅझेटियर, उपरोक्त, पृ.४८९
40. कित्ता.
41. मराठा चेंबर्स ऑफ कॉमर्स, सातारा डायरी, उपरोक्त , पृ. २६०
42. बँकिंग स्टॅटिस्टिक्स, बेसकि स्टॅटिस्टिकल रिटर्न्स, व्हाल्यूम २०, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, मार्च १९९१, पृ.३४१
43. दै.सकाळ, २२/०९/१९९३ पृ.४
44. सातारा गॅझेटियर, उपरोक्त , पृ.४७१
45. सातारा गॅझेटियर, उपरोक्त , पृ.४७२
46. कित्ता.

47. गोडबोले अरूण, युनायटेड वेस्टर्न बँक, उदय, उत्कर्ष आणि अस्त, सातारा २००७, पृ.१४८

48. सुवर्ण महोत्सवी वर्ष, 'सहकार गौरव ग्रंथ', सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.सातारा, सन १९९९–२०००, पृ.४०.

49. वार्षीक अहवाल, सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.सातारा सन, १९९९–२०००, पृ.३५.

50. सातारा गॅझेटियर, उपरोक्त, पृ.४७३

51. वकील सी.एन., को–ऑपरेटिव्ह मुव्हमेंट इन दि बॉम्बे स्टेट, १९५३, पृ.१४८

52. सातारा जिल्हा जनगणना निर्देशग्रंथ, सातारा, १९६१, पृ.३५

53. कित्ता, पृ.४८.

54. सातारा गॅझेटियर, उपरोक्त, पृ.४७९

55. सातारा गॅझेटियर, उपरोक्त, पृ.३९०

56. डॉ.पवार व्ही.पी., कोयना प्रकल्प : एक ऐतिहासिक अभ्यास' (१९५४ ते २०१०), पीएच.डी. पदवीसाठी सादर केलेला शोधप्रबंध, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे, मे २०१३, पृ.२९९ ते ३०२.

57. उपनिबंधक, श्रमिक संघ, पुणे यांचे रजिस्टरवरून

58. सातारा गॅझेटियर, उपरोक्त, पृ.४३८, ४३९

59. प्रकट मुलाखत प्रभाकर महाबळेश्वरकर, दि.१५/०५/२००७ सकाळी ११:०० वा.

## प्रकरण पाचवे

# स्वातंत्र्योत्तर साताऱ्यातील सांस्कृतिक विकासाचे अवलोकन

### प्रस्तावना

मानवी जीवनात सामाजिक व आर्थिक प्रगतीबरोबरच सांस्कृतिक प्रगतीलाही महत्त्वाचे स्थान आहे. किंबहुना आर्थिक व सांस्कृतिक प्रगतीमुळे मानवाची सामाजिक स्थिती उंचावत असते. अशावेळी आपण समाजाचा सांस्कृतिक विकास झाला आहे. असे म्हणत असतो. सांस्कृतिक विकासामध्ये समाज व व्यक्तीच्या जीवनाशी निगडीत असलेल्या भाषा, वाङ्मय, कला, क्रिडा, संगीत, गायन, धर्म, सण व उत्सव इत्यादी अनेक घटकांचा समावेश असतो. या निरनिराळया घटकामध्ये व्यक्तीगत पातळीवर व सामाजिक स्तरावर विकास होत गेल्यास आपण समाजाच सांस्कृतिक विकास झाला असे म्हणत असतो. म्हणून समाजाची प्रगती ही आर्थिक घटकाबरोबरच सांस्कृतिक विकासावरही मोजली जाते. यादृष्टीने आपण स्वातंत्र्यानंतर सातारा व सातारा जिल्हयातील सांस्कृतिक इतिहासाचा अभ्यास करणार आहोत.

सातारा जिल्हा हा राजकीय व सामिाजिकदृष्टया सदैव जागृत असलेला दिसून येतो. भारतीय स्वातंत्र्य चळवळीमध्ये या जिल्हयाचे योगदान अतिशय महत्त्वाचे आहे. '१९४२ च्या छोडो भारत' या आंदोलन काळात या जिल्हयात घडून आलेले भूमिगत आंदोलन हे भारताच्या इतिहासात प्रसिद्ध आहे. तसेच सामाजिक चळवळीच्या बाबतही या जिल्हयामध्ये अनेक पुरोगामी सामाजिक चळवळी घडून आल्या आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये सुरू झालेल्या सामाजिक चळवळीची मधुर फळे स्वातंत्र्योत्तर काळात महाराष्ट्राप्रमाणेच साताऱ्यातही पहावयास मिळातात. याचे उदाहरण द्यायचे तर १९१९ मध्ये कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शिक्षण प्रसारासाठी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. या शिक्षण चळवळीने गती स्वातंत्र्यानंतर शेकडो शाळा या महाराष्ट्रात निघाल्या  कर्मवीर भाऊरावांचे शैक्षणिक कार्य पाहून इतरांनाही सर्व महाराष्ट्रभर शाळा काढल्या. मागास व बहुजन समाजामध्ये झालेल्या या शिक्षणप्रसारामुळे सांस्कृतिक विकास होण्यात खूपच हातभार लागलेला दिसून येतो. भाऊरावांची ही शिक्षण चळवळ साताऱ्यातूनच सुरू झालेली होती.

प्रस्तूत प्रकरणात स्वातंत्र्योत्तर कालखंडातील साताऱ्याच्या बाबतीत विचार करावयाचा झाल्यास सातारा व जिल्हा परिसरात सापडणारी लेणी, पुरातत्वीय अवशेष, मंदीरे आणि किल्ले

येथील सण उत्सव, यात्रा, वारकरी संप्रदाय, साहित्य व साहित्यिक, नाटयक्षेत्र, पारंपारिक कला, चित्रपट, संगीत व वादन, शिल्पकला व चित्रकला, क्रीडा क्षेत्र, पर्यटनस्थळे, वस्तूसंग्रहालये या सर्व बाबींचा अभ्यास या ठिकाणी मी केलेला आहे.

**सण – उत्सव**

मानव हा समाजशिल प्राणी आहे. आपले सण हे कौटुंबिक व सामाजिक जीवनाशी अत्यंत निगडीत आहेत. या सणांमुळेच मानवी जीवनाला चैतन्य आणि उत्साह मिळतो. सणांच्या निमित्ताने माणूस नविन वस्त्रे परिधान करतो. कुटुंब आणि आपल्या मित्रांसोबत एकत्रितपणे मिष्टान्नाचे भोजन आदी करतो. एकमेकांना भेटी देतो.

सातार्‍यात महाराष्ट्राप्रमाणेच गुडीपाडवा ते होळी हे एक सणांचे चक्र आहे. हे सण या लोकांच्या वैयक्तिक व सार्वजनिक जीवनावर परिणाम तर करतातच त्याचप्रमाणे हे सण त्यांचे आरोग्य, निसर्ग व पर्यारणाशी संबंधीत आहेत. सर्वांसवे प्राचीन काळाविषयी आदरभावना व्यक्त होताना एका पिढीकडून दुसया पिढीकडे वारसा दिला जातो. आमच्या कुटूंबव्यवस्थेतील लहान बालकापासून ते वृध्दांपर्यंत सर्वांविषयी आदर व प्रेम या सणांच्याव्दारे व्यक्त होताना दिसते.

**गुढीपाडवा :**

हिंदू कालगणनेतील नववर्षाचा पहीला दिवस गुढीपाडव्याचा असून हा एक विजयोत्सव आहे. चैत्र शुध्द प्रतिपदा या नववर्षदिनी प्रभूरामचंद्रांनी चौदा वर्षांचा वनवास संपवून आणि दुष्ट प्रवृत्तीच्या रावणावर विजय मिळवून याच दिवशी अयोध्या नगरीत प्रवेश केला. या सणादिवशी संपूर्ण महाराष्ट्रात ज्याप्रमाणे घरोघरी या दिवशी गुढी उभारतात त्याप्रमाणे सातार्‍यातही घरोघरी या दिवशी गुढी उभारतात. घराच्या प्रवेशव्दारावर एका बांबूच्या काठीस नवे वस्त्र घालतात, त्या वस्त्रावर भांडे ठेवून त्यास फुलांची माळ, साखरेची गाठी घातली जाते व कडुनिंबाचा पाला बांधतात. या दिवशी गुळ, चणे आणि कडुनिंबाचा पाला खातात. मराठी सणांच्या परंपरेतील पहिलाच सण आहे. या दिवशी घरोघरी बहुधा पुरणपोळीचे जेवण असते. वर्षातील साडेतीन मुहूर्तपैकी हा एक शुभमुहूर्त मानला जातो. या शुभ दिवशी नवीन कामाचा आरंभ करतात.[१]

**नागपंचमी :**

या सणास ग्रामीण जीवनात अतिशय महत्व आहे. महाराष्ट्रात नागपूजेचे महत्व प्राचीन काळापासून आहे. श्रावण शुध्द पंचमीला नागपंचमी म्हणतात. या दिवशी मातीच्या नागाची प्रतिमा आणतात आणि त्याची पूजा करतात. दूध व लाहयांचा नैवेद्य दाखविला जातो. संध्याकाळी स्त्रिया व मुली गावाबाहेर शेतात जाऊन वारूळांची पूजा करतात. नवविवाहीता माहेरी येतात. खेडेगावात विशेषतः झिम्मा, फुगडी हे खेळ खेळतात. या गाण्यांमधून नागराजाचे कौतूक केलेले दिसते. कौटूंबिक जीवनात या सणासंबंधी काही संकेत पाळतात. या दिवशी काहीही चिरू नये, कापू नये, तोडू नये, चूलीवर तवा ठेवू नये, हिंसा करू नये यासाठी जेवणातही पुरणाची दिंड किंवा मोदकासारखे उकडलेले पदार्थ खाण्याची पध्दत आहे.

**रामनवमी :**

चैत्र शुध्द नवमीला दुपारी बारा वाजता राममंदीरात प्रभू श्रीरामचंद्राचा जन्मोत्सव साजरा केला जातो. या वेळी श्रीरामाला पाळण्यात घालतात. सर्व भक्तांना सुंठवडा आणि तिर्थप्रसाद दिला जातो. रात्रभर भजनकिर्तन चालते. उदा. चाफळचे राममंदिर, फलटणचे राममंदिर

**गौरीपूजा :**

चैत्र महिन्याच्या शुध्द पक्षाच्या तृतीयेपासून अक्षयतृतीया म्हणजेच वैशाख शुध्द तृतीयेपर्यंत कोणत्याही सोईस्कर दिवशी ब्राम्हण स्त्रिया गौरीपूजा करतात. यावेळी शेजारी आणि आप्तस्वकिय स्त्रियांना हळदी–कुंकवासाठी बोलविले जाते.

**बसव जयंती :**

साताऱ्यातील लिंगायत लोक वैशाख व्दितीयेला बसव जयंती उत्सव साजरा केला जातो. याप्रसंगी मिरवणूक, धार्मिक विधी आणि मिष्टान्न भोजन केले जाते.

**अक्षयतृतीया :**

हा सण वैशाख शुध्द तृतीयेस येतो.साडेतीन मुहूर्तांपैकी यास अर्धा मुहूर्त समजला जातो. अक्षयतृतीयेला आपल्या पितरांची पूजा केली जाते आणि कलश दान करतात. या शुभ दिवशी नवीन कामाची सुरूवात केली जाते. शेतकरी आपल्या शेतीच्या कामाचा शुभारंभ करतात.[२]

**वटपौर्णीमा :**

जेष्ठ शुध्द पौर्णिमेला वटपौर्णिमा म्हणतात. सावित्रीने हे व्रत करून आपल्या पतीचे म्हणजेच सत्यवानाचे प्राण यमाकडून परत मिळविले म्हणून तिच्या स्मरणार्थ हे व्रत करण्यात येतो. हिंदू स्त्रिया या दिवशी निरंकार उपवास करून वडाच्या झाडाची पूजा करतात व पतीला दीर्घायुष्य मिळावे म्हणून प्रार्थना करतात.

**आषाढी एकादशी :**

आषाढी शुध्द एकादशीला हिंदू लोक मुख्यत्वे वारकरी पंथाचे लोक उपवास करतात.ज्ञानदेव, नामदेव, तुकाराम आदी संत मंडळीचे अभंग गातात. काही वारकरी पायी चालत पंढरीची वारी करतात आणि विठ्ठलाचे दर्शन घेतात.[३]

**बेंदूर :**

सातारा जिल्हा हा कृषीप्रधान जिल्हा म्हणून ओळखला जातो. शेतकऱ्यांच्या जीवनात महत्वपूर्ण समजला जाणारा सण म्हणून पोळा किंवा बेंदुर आहे.वर्षभर आपल्या बैलांकडून शेतकरी काम करून घेत असतो. त्या बैलांविषयी त्याला वाटणारी कृतज्ञता तो या सणातून व्यक्त करतो.बेंदूर म्हणजेच पोळा हा सण होय. हा सण आषाढ शुध्द त्रयोदशीला साजरा करतात. या दिवशी शेतकरी आपल्या बैलांची पूजा करतात. व्दादशीच्याच दिवशी शेतकरी आपल्या बैलांना बाजरीच्या किंवा आंबीलघुगयाच्या पीठाचे उंडे खायला देतात. रात्रीच्या वेळी बैलांची मान तेल–हळदीने मळतात याला खांद मळणी असे म्हणतात. त्रयोदशीला सकाळी बैलांना नदी किंवा ओढयावरून धुवून आणून त्यांच्या अंगावर निरनिराळया रंगाचे छाप किंवा त्यावर विविध प्रकारची नक्षी काढतात. बैलांच्या शिंगांना रंगविण्यासाठी विशिष्ट रंग वापरतात याला ग्रामीण भाषेत हिंगूळ असे म्हणतात. शिंगांना बेगडाचे कागद, रंगित कापडी गोंडे किंवा पताका बांधतात. बैलांच्या पाठीवर झूल व माथ्यावर बाशिंग बांधून गावातून वाजतगाजत मिरवणूक काढतात. घरोघरी पुरणपोळीचे जेवण बनवले जाते. आपल्या बैलांची व त्याच्या मालक शेतकयांची घरी ओवाळणी करून बैलांना पुरणपोळीचा नैवेद्य खावयास देतात. याचप्रमाणे शेतकरी आपल्या शेतात जावून आपल्या शेताला नैवैद्य दावखतात.[४]

**नारळी पौर्णिमा :**

पावसाळा संपल्यानंतर साजरा केला जाणारा हा पहिला महत्वाचा सण होय. श्रावण शुध्द पौर्णिमेला नारळी पौर्णिमा किंवा राखी पौर्णिमा असेही म्हणतात. हिंदू धर्मशास्त्रात या दिवसाला विशेष महत्व दिलेले आहे. ही पौर्णिमा पोवती पौर्णिमा म्हणूनही ओळखली जाते. यजुर्वेदी व अथर्ववेदी ब्राम्हण या दिवशी उपाकर्म म्हणजेच श्रावणी करतात. पंचगव्य प्राशन करून नवीन यज्ञोपविते धारण करतात. जुने यज्ञोपवीत बदलून नवे धारण केले जाते. साताऱ्याच्या कुणब्यांमध्ये हा दिवस पोवत्याची पौर्णिमा म्हणून ओळखला जातो. कापसाचे सूत काढून ते हळदीत बुडवून स्त्री–पुरूषांच्या गळयात बांधतात. तसेच दिवे आणि शेतीच्या अवजारांभोवती सूत गुंडाळतात. याच दिवशी राखी पौर्णिमा असते. या दिवशी बहीण भावाच्या हातात राखी बांधते त्यावरून तिला राखी पौर्णिमा असेही म्हणतात.[५]

**गोकुळाष्टमी :**

गोकुळाष्टमी किंवा श्रीकृष्णजन्माष्टमी श्रावण वद्य अष्टमीला साजरी केली जाते. या दिवशी श्रीकृष्णाचा मध्यरात्री जन्मोत्सव होतो. यावेळी सजवलेल्या पाळण्यात कुंचीत नारळ घालून पाळणा गित, श्रीकृष्णस्तुतीपर भजने, गौळणी व अभंग म्हणतात. रात्री बारा वाजता लहानशा सजविलेल्या पाळण्यात कुंचित नारळ घालून पाळणागीत म्हणतात. त्यानंतर भक्तमंडळींना प्रसाद वाटला जातो. दुसया दिवशी दहिहंडीचा कार्यक्रम केला मोठया उत्साहाने साजरा केला जातो.

**दसरा :**

नवरात्रोत्सवाचा आरंभ आश्विन शुध्द प्रतिपदेला होऊन त्याची सांगता दशमीला होते. महीषासुर या राक्षसाने पृथ्वीवरील लोकांना त्रस्त करून सोडले तेव्हां अष्टभुजादेवीने अश्विन शुध्द प्रतिपदा ते दशमीपर्यंत युध्द करून त्याला ठार व विजय मिळवला. प्रभूरामचंद्राने रावणावर विजय मिळवला तोही याच दिवशी. तीच ही दशमी म्हणजेच दसरा किंवा विजयादशमी होय. लौकिक विधीनुसार सीमोल्लंघन, शमीपूजन, अपराजितापूजा आणि शस्त्रपूजा केली जाते. शिवकाळ व पेशवाकाळात पावसाळा संपल्यानंतर विजयादशमीच्या शुभमहुर्तावर मराठा सरदार मुलूखगिरी करण्यास आरंभ करत असत. सीमोल्लंघन – सीमोल्लंघन म्हणजे विजयादशमी दिवशी संध्याकाळी गावाच्या सिमेवर शमी व आपटयाची पाने लुटून सोने म्हणून ते एकमेकांना

वाटण्याचा समारंभ या दिवशी साजरा केला जातो. पांडव जेव्हा अज्ञातवासात होते तेव्हा शमी वृक्षाच्या ढोलीत त्यांनी आपली शस्त्रे ठेवली होती. ती हत्यारे त्यांनी या ढोलीतून विजयादशमीलाच बाहेर काढली असे मानले जाते.शस्त्रपूजा पुर्वी या दिवशी राजे आपल्या शस्त्रांची पूजा करीत असत त्याचप्रमाणे कारागिर व शेतकरीही आपल्या हत्यारांची पूजा या दिवशी करत. दसरा हा दिवस अत्यंत शुभ मानून या दिवशी लोक आपल्या नव्या कामाची सुरूवात करत असत.

**दीपावली :**

हिंदुंचा सर्वात महत्वपूर्ण व मोठा सण जो सातार्‍यात, महाराष्ट्राच नव्हे तर अवघ्या भारतात मोठया उल्हासाने धुमधडाक्यात साजरा केला जातो. जुन्या काळापासून दीपावलीचा सण अश्विन वद्य त्रयोदशी ते कार्तीक शुध्द व्दितीयेपर्यंत विविध आकार प्रकारच्या दिव्यांच्या सजावटीने साजरा केला जातो. दिपावलीमध्ये नरकचतुर्दशी, लक्ष्मीपूजन, बलिप्रतिपदा व भाऊबीज असे सण असतात. या प्रकाशमयी सणाच्या पूर्वसंध्येला, वसुबारस साजरा केला जातो. या दिवशी सवत्स धेनुची पूजा केली जाते.

दुसर्‍या दिवशी धनत्रोयदशीला यमराजाच्या पूजनाने दीपावली महोत्सवाला प्रारंभ होतो. या धनत्रोयदशीच्या दिवशी श्रीधन्वन्तरिपूजन करण्याचीही प्रथा आहे. नरकचतुर्दशी हा श्रीकृष्णाने नरकासुराचा वध करून बंदीवासात अडकलेल्यांना मुक्त केले तो दिवस होय. नरकचतुर्दशीच्या दिवशी सकाळी अभ्यंगस्नान करतात. या दिवशी नरकासुराची शेणाची प्रतिमा करून तिच्यावर केरकचरा टाकतात.

लक्ष्मिपूजनाला येते अश्विनी अमावस्या, वामन अवताररूपी विष्णूने या दिवशी सर्व देवांना बळी राजाच्या कैदेतून मुक्त केले असे मानतात. या सायंकाळी लक्ष्मीचे पूजन केले जाते. व्यापारीवर्ग हा दिवस फार शुभ मानतात या शुभमुहूर्तावर नविन किर्द–खतावणीस प्रारंभ करतात. याच्या पुढचा दिवस बलिप्रतिपदेचा किंवा पाडव्याचा होय. या दिवशी कार्तीक महिन्याचा प्रारंभ होतो. बलिप्रतिपदेला बळीराजाला वामनाने पाताळात दडपले अशी पौराणिक कथा आहे. साडेतीन मुहूर्तापैकी एक असलेल्या या पाडव्याच्या दिवशी पत्नीने आपल्या पतीला ओवाळण्याचीही प्रथा आहे. भाऊबीज किंवा यमव्दितीया हा दिवस भाऊ बहीणीच्या मधुर प्रेमाचे प्रतिक आहे. या भाऊबीजेला बहीण आपल्या भावाला घरी जेवणाला बोलावून त्याला

ओवळाते व भाऊ तिला यथाशक्ती भेटवस्तू देतो.

**तुळशी विवाह :**

हिंदू धर्मानुसार त्या वर्षातील लग्नकार्यांचा प्रारंभ तुळशी विवाहानंतर होतो. कार्तिक शुध्द व्दादशीला घरोघरी अंगणात असणाऱ्या तुळशीचा विवाह ऊसाच्या रूपातील विष्णूसोबत लावला जातो. यानंतर प्रसाद म्हणून कुरमुरे आणि खोबरे वाटले जाते.

**मकर संक्रांत :**

दरवर्षी १४ जानेवारीला येणारा मकरसंक्रातीचा हा सण हिवळयातील एक महत्वाचा सण आहे. माघ शुध्द सप्तमी ते रथसप्तमीपर्यंत साजरा केला जातो. संक्रात म्हणजे सूर्याच्या गतीचे प्रतिक होय. या दिवशी सुर्य मकर राशीतून संक्रमण होते आणि उत्तरायण सुरू होते. या दिवशी कुंभाराकडून आणलेल्या मातीच्या सुगडांची सुवासिनी पूजा करतात. सुवासिनी संक्रांतीचे व्रत करतात. एकमेकींना सुगडात उस, बोरे, गव्हाच्या लोंब्या, पावटा इत्यादी नवीन वस्तू देतात. धान्य, तिळाच्या पोळया, तिळाचे लाडू इत्यादी पक्वान्न सेवन करून एकमेकांना तिळगुळ वाटतात. संक्रातीच्या आदल्या दिवसाला 'भोगी' असे म्हणतात. या दिवशी विविध भाज्या एकत्रित करून त्या जेवणात समाविष्ठ केल्या जात.

**महाशिवरात्र :**

महाशिवरात्र या शब्दावरूनच हा सण महादेव किंवा शिवशंकर या देवतेशी संबंधीत असल्याची कल्पना येते. माघ वद्य चतुर्थीला शिवोपासक निरंकार उपवास करतात. शिवस्तूतीची भजने गातात. यानंतर दुसऱ्या दिवशी शिवपूजनानंतर उपवास सोडतात.

**होळी :**

हिंदू कालगणेतील बाराव्या महिन्यातील शेवटचा धार्मिक सण म्हणजे होळी होय. फाल्गुन शुध्द पौर्णिमेला रात्री होळी पेटवली जाते. पौर्णिमेच्या दिवशी गावच्या चौकात एरंडाची फांदी पुरली जाते. संध्याकाळी गोवऱ्या (शेणी) आणि लाकडे गोळा केली जातात. प्रथम होळीचे पूजन करून होळीला पुरणपोळीचा नैवैद्य दाखविला जातो. होळी पेटवताना तीन प्रदक्षिणा करून बोंब ठोकली जाते. होळी पेटवताना अर्वाच्य भाषा बोलली जाते. या प्रकारे अर्वाच्य भाषा बोलण्याचा हेतू असा आहे की, माणसाच्या मनातील वाईट वृत्तींचे शमन व्हावे. मनातील वाईट विचारांना या दृष्टीने आपण वत करून देतो.यानंतर फाल्गुन वद्य पंचमीला

रंगपंचमीचा सण येतो. या दिवशी लहान मोठे सर्वजण एकमेकांवर रंग उडवतात.

वर्षभरात येणाऱ्या या सण समारंभांनी मानवी जीवन बदलून जाते. वैयक्तिक आणि सामाजिक अशा विविध स्तरांवर विविध पर्वोत्सवांत जनमानसात संतूलन राखले जाते. कधी त्यामधून लोकशिक्षण तर कधी निखळ मनोरंजन होऊन औदासिन्य झटकले जाते. त्याचमुळे कदाचित या कालचक्रात नेमेचि येणारे लहान मोठे सण मोठया उत्साहाने साजरे करण्याची अखंड परंपरा आढळते. साताऱ्यात सणसमारंभाचे कालपरत्वे स्वरूप बदलत असले तरीही संस्कृतीचा वारसा जपणारा त्यातला गाभा पिढयानपिढया तोच आहे.

**सार्वजनिक उत्सव**

साताऱ्यात सार्वजनिक उत्सावांची फार मोठी परंपरा आहे. अनेक देवदेवतांच्या यात्रा, साधुसंतांच्या जयंत्या साजऱ्या केल्या जातात. या उत्सवांच्या निमित्ताने गावोगावी तमाशा, भजन, पूजन, किर्तन आदींचे आयोजन केले जाते. पूजाअर्चनेसोबतच मनोरंजन आणि करमणूकीचे कार्यक्रम आयोजित केले जातात. या उत्सवांमध्ये गणेशोत्सव, शिवजयंती हे प्रमुख हिंदू उत्सव आहेत.

**श्रावण महिना महोत्सव :**

महाराष्ट्रातील हिंदू लोकांना श्रावण महिन्याचे फार महत्व आहे. या महिन्यात अनेक उपवास, उत्सव आणि व्रते येतात. श्रावण महिन्यात सोमवार विषेश पवित्र समजले जातात.श्रावण महिन्यात शिवभक्त संध्याकाळपर्यंत उपवास करतात. हा महिना पुर्णपणे शाहाकारी असतो.श्रावण महिन्यात कोरेगांव तालुक्यातील जांब ब्रु ।। या गावच्या उत्तर दिशेला जरंडेश्वरचा डोंगर आहे. श्रावण महिन्यात दर सोमवारी या डोंगरावर मारूतीची पुजा अर्चना केली जाते. या महिन्यात लक्ष्मीपूजन, श्रावणी शुक्रवार, मंगळागौरी अशी अनेक व्रत वैकल्ये समारंभपूर्वक साजरे केली जातात. या वेळी जरंडेश्वर डोंगरावर कमीत कमी वेळेत चढाई करण्याची स्पर्धा आयोजित करण्यात येते.[६] मेरूलिंग, यवतेश्वर, पाटेश्वर, शिखर शिंगणापूर येथील शिवमंदिरात खूप गर्दी असते.

**गणेश चतुर्थी :**

उत्सव यात्रा यांना हिंदू समाज फार मोठे महत्व देतो. या उत्सवात्मक सणांमध्ये गणेशचतुर्थीला धार्मिक तसेच सामाजिक महत्व प्राप्त झालेले आहे. भाद्रपद शुध्द चतुर्थीला

'गणेशचतुर्थी ' असे म्हटले जाते. या दिवशी घरोघरी गणपतीच्या मातीच्या रंगीत व आकर्षक मुर्ती आणून मोठया समारंभपूर्वक त्याची प्राणप्रतिष्ठापना केली जाते. घरांमध्ये मुर्तीसमोर आरास व रोषणाई केली जाते. विधीवत पूजा करून २१ मोदकांचा नैवैद्य दाखवला जातो. हे गणपती विविध कालावधीसाठी प्रतिष्ठापीत केले जातात. काही गणपती दीड दिवसांचे, काही पाच दिवसांचे, तर काही सात दिवसांचे गणपती असतात. दहा दिवसांच्या गणपतींचे विसर्जन होते. शहरांमधून दहा दिवस सार्वजनिक गणेशोत्सव खुप मोठया प्रमाणावर साजरा केला जात होता. मुर्तीसमोर सजावट, दिव्यांची आरास, पौराणिक, ऐतिहासिक व सामाजिक देखावे सादर केले जातात. या सार्वजनिक गणेशोत्सवांमधून लोकमनोरंजनाचे आणि लोकशिक्षणाचे कार्यक्रम केले जातात. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे मोठया मुर्ती बसवतात. सार्वजनिक मंडळे या उत्सवाच्या काळात वेगवेगळया विषयावर व्याख्यानमाला, भाषणे, स्पर्धा आयोजित केल्या जातात.

या गणपतीच्या उत्सवामध्येच गौरींचाही सण येतो. गणेशचतुर्थीनंतर तिसऱ्या किंवा चौथ्या दिवशी पितळेचा किंवा मातीचा मुखवटा घालून गौरीची स्थापना केली जाते. हे जेष्ठा गौरीचे व्रत तीन दिवस चालते. अनुराधा नक्षत्रावर गौरीचे आवाहन, जेष्ठावर पूजन व मूळ नक्षत्रावर गौरींचे विसर्जन केले जाते. साताऱ्यात बहुजन समाजात गौरीस्थापनेची पध्दत पुढीलप्रमाणे आहे. मातीच्या पाच लहान सुगडांमध्ये हळदीने रंगवलेला दोरा, पाच खोबरे वाटया, खारखा घालून उतरंड रचतात. त्याच्यावर गौरीच्या मातीचा मुखवटा बसवितात. तिचे पूजन करतात. तिसऱ्या दिवशी ती सुगडे उतरवतात. त्यातील दोरे, खोबरे काढून त्याचे तुकडे करून ते दोरे सुवसिनी व मुले यांच्या गळयात घालतात. पुढे एखाद्या चांगल्या दिवशी ते दोरे काढून ते दहयादुधात भिजवितात आणि अंगणातील तुळशीत किंवा शेतामध्ये पुरतात. साताऱ्यातील काही भागात कुमारीका गौरी म्हणून सुवासिक वनस्पतींची रोपे घरी आणतात.त्या रोपांना आकार देवून वर मुखवटा बसवितात. दुसऱ्या दिवशी मोदकांचा नैवैद्य दाखवितात. गौरीपुढे दोऱ्यांचे १६ पट धागे घेऊन त्या गुंडयांचीही पूजा करतात. तिसऱ्या दिवशी तो दोरा हळदीने रंगवून गळयात घालतात व तो नविन पीक येईपर्यंत ठेवतात. या दोऱ्याला महालक्ष्मी म्हणतात. गौरी विसर्जनाच्या वेळी नदीतील वाळू घरी आणून घरामध्ये टाकतात. यामुळे समृध्दी वृध्दिंगत होते अशी समजूत आहे.

गणेशचतुर्थीनंतर ऋषीपंचमी ही भाद्रपद शुध्द पंचमीला येते. या दिवशी सुवासिनी उपवास करतात. बैलांच्या परिश्रमाने काढलेले कोणतेही धान्य, भाज्या वा फळे या दिवशी वर्ज्य असतात.

**नवरात्रोत्सव :**

सातार्‍यात नवरात्रचा हा उत्सव शहरांपासून गावांपर्यंत सार्वजनिक वा सामाजिक पातळीवर साजरा केला जातो. हिंदू समाजात घरात एक घट स्थापन करून तेथे देवीचा टाक ठेवला जातो. त्याखाली काळया मातीत सप्तधान्य पेरले जाते. नऊ दिवस घटाशेजारी फुलांची माळ चढत्या क्रमाने लावून अखंड नंदादीप ठेवला जातो. काही घरांतून सप्तशतीचा पाठ केला जातो. घरातील स्त्रिया किंवा पुरूष नऊ दिवस उपवास करतात. कुमारिकांना देवीस्वरूप मानून मिष्टान्न भोजन देऊन नवीन वस्त्र दिले जाते. काही ठिकाणी घटस्थापनेच्या दिवशी व उत्थापनाच्या दिवशी सुवसिनिंना व ब्राम्हणांना भोजनासाठी बोलाविले जाते. सार्वजनिक पातळीवर सातार्‍यात नवरात्रोत्सव मोठया प्रमाणावर साजरा केला जातो. विविध गावांमध्ये देवीच्या मंदिरांमध्ये घटस्थापना केली जाते. देवीच्या मूर्तीस प्रतिपदेपासून नवमीपर्यंत वेगवेगळी रूपे दिली जातात. विविध शहरांमध्ये आणि विविध गावांमध्ये चौकाचौकांतून विविध मंडळांच्याव्दारे देवीची मूर्ती स्थापन करून पूजा केली जाते विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. धार्मिक विषयांवर कीर्तने, भजन आदी कार्यक्रम आयोजित करतात. रात्रीच्या वेळी सातार्‍यामध्ये गुजरातमध्ये प्रसिध्द असलेला ‘गरबा’ हा नृत्यखेळ खूपच प्रसिध्द झालेला आहे असे स्पष्ट जाणवते.

**कृष्णामाई उत्सव :**

सातारा जिल्हयाच्या पश्चिमेचा तालुका महाबळेश्वर आहे. या महाबळेश्वरमधून पाच नद्या उगम पावतात. या नद्या म्हणजे कृष्णा, वेण्णा, कोयना, सावित्री आणि गायत्री या होय. यातील कृष्णा नदीचे पाणी तेथिल कुंडातून वाहत उगमाच्या खाली असणार्‍या कृष्णा नदीच्या पात्रात पडते. तेथे कृष्णामाई मंदीर आहे. कृष्णा नदी सातारा जिल्हयाच्या महाबळेश्वर, वाई, सातारा व कराड या तालुक्यांतून वाहत जाते. या नदीने सातारा जिल्हयाचा फार मोठा प्रदेश सुपीक केलेला आहे त्यामुळे या नदीला सातारा जिल्हयात फार मोठा सन्मान असल्याचे दिसते. या सन्मानातूनच कृष्णामाई उत्सव सातारा जिल्हयात विविध ठिकाणी साजरा केला

जातो. वाई शहरात कृष्णामाई उत्सवाला फार मोठी परंपरा असल्याचे दिसते. सरदार रास्ते यांनी या उत्सवासाठी सात घाटावरील धर्मिक उपक्रमासाठी सहा घाटांना इ.स.१७७४ मध्ये प्रत्येकी रू १००/– व रामढोह घाटास रूपये १५०/– आर्थिक मदत दिली होती. 'ब्राम्हणी लोक बहुत हा उत्सव करीत आहेत' असा उल्लेख केला होता.[७] प्रतापगडाचा संग्राम झाल्यानंतर छ.शिवरायांनी अफझलखानाचा वध केल्याची बातमी वाईच्या लोकांना जेंव्हा समजली तेंव्हा वाईत सर्वत्र आनंदीआनंद झाला. लढाईची धामधूम संपल्यानंतर श्रीकृष्णादेवीच्या कृपेने हे महान संकट टळले म्हणून रामढोह आळीच्या घाटावर मोठया थाटाचा उत्सव झाला व क्रमक्रमाने इतर सर्व घाटावर तो होऊ लागला. रामढोह आळीच्या घाटावरच्या उत्सवाला आर्थिक मदत श्रीमंत आनंदराव रास्ते यांनी करून दिली. वाईच्या या उत्सवाचे अनुकरण पुढे कृष्णा तटावरच्या इतर गावांमध्ये होऊ लागले.[८] आधुनिक काळातही वाईतील हा उत्सव त्याच उत्साहाने साजरा केला जाताना दिसतो. सर्व घाटावर उत्सवाचे स्वरूप साधारणतः सारखेच असते. श्रींची स्थापना ढोललेझिम, झांज व इतर वाद्ये याच्या सहाय्याने मिरवणूक होते. मंत्रजागर, चौघडा, किर्तने, प्रवचने, हळदी कुंकू, महाप्रसाद व रथोत्सव असे याचे स्वरूप असते. एका घाटाचा उत्सव उत्सव संपल्यानंतर दुसऱ्या घाटाचा उत्सव सुरू होतो.सर्व कार्यक्रम तिथीप्रमाणे होत असतात. प्रत्येक आळीच्या काठावर असलेली मंदीरे व घाट हे वाईच्या सौंदर्यात भर घालतात. प्रत्येक आळीच्या घाटावर उत्सवासाठी खास मंडप उभारले जातात. मंडपात हंडया, झुंबरे, मखर वगैरे लावून मंडप सुशोभित करतात. किर्तने, प्रवचने, हळदी कुंकू, महाप्रसाद इत्यादी व्यवस्थित पार पाडण्यासाठी आळीतील लहानथोर मंडळी आपल्याच घरचे कार्य आहे. अशी भावना बाळगून काम करताना दिसतात.[९] किर्तनासाठी मंडपात खुप लोक एकत्र येतात. या कार्यक्रमाचे वैशिष्टय म्हणजे मंडप घालणे व काढणे यासाठी कोणत्याही प्रकारचा मजुरीवर खर्च न करता सहकार्य व सहजिवन या उत्सवाचे परंपरेतून मिळत असते.[१०]

कराड शहरात चैत्र वद्य चतुर्थीस आणि श्रावण महिन्यातील शेवटच्या सोमवारी अशी वर्षातून दोन वेळा यात्रा भरते. या उत्सवात कऱ्हाड परिसरातील देवदेवता वाजतगाजत, मिरवणुकीने श्री कृष्णाबाईच्या भेटीसाठी येत असतात. कार्तिक पौर्णिमेस घाटावरील मंदीरावर विद्युत रोषणाई केली जाते. दीपमाळावर पणत्या लावल्या जातात. यास 'घाट पाजळणे' असे

म्हणतात. कृष्णेच्या वाळवंटात शोभेचे दारूकाम, आतषबाजी करण्यात येते.[११]

**जत्रा**

एखादा सण अथवा ग्रामदेवतेचा उत्सव पंचक्रोशीतील लोकांनी एकत्र येऊन साजरा करण्याच्या पद्धतीला जत्रा असे म्हणतात. लोकसंपर्क वाढविणे हा जत्रेचा मुख्य उद्देश्य असतो. बऱ्याच ठिकाणी जत्रेमध्ये अन्नदान केले जाते. एखाद्या देवाच्या नावाने लोकांना आमंत्रित करून त्यांना देवाचा प्रसाद म्हणून अन्न वाटले जाते. महराष्ट्रामध्ये जवळजवळ प्रत्येक गावामध्ये अशी प्रथा आढळते. एका ठरविलेल्या दिवशी गावातील प्रत्येक कुटुंब आपापल्या पाहुण्यांना, मित्रमंडळींना आमंत्रित करून जेवू घालतात. त्या दिवशी गावामध्ये मनोरंजनाचे विविध कार्यक्रमही आयेजित केले जातात. तमाशा हा त्यापैकीच एक असा मनोरंजनाचा प्रकार ग्रामीण भागामध्ये अतिशय लोकप्रिय आहे. महाराष्ट्रामध्ये ग्रामीण भागामध्ये लोकसंपर्काच्या ज्या अनेक पद्धती आहेत. त्यापैकी जत्रा ही एक अतिशय महत्त्वाची पद्धत आहे.

यात्रा म्हणजे एखाद्या देवतेच्या उत्सवासाठी अथवा एखाद्या सत्पुरूषाच्या पुण्यतिथी वा जयंती उत्सवासाठी अथवा एखाद्या तीर्थक्षेत्री वर्षातून ठराविक दिवशी वा ठराविक कालानंतर गावोगावच्या लोकांचा जो धार्मिक मेळावा जमतो. त्यास जत्रा असे म्हणता येईल. त्या त्या देवतेविषयी किंवा तीर्थक्षेत्रांतील भाविक लोक जत्रेला येतात. देवता वा सत्पुरूषांची आराधना करीता तेथे स्नान, दर्शन, पूजाअर्चा, श्राद्ध, भजन, क्रीडा, नृत्य, मेळा, मिरवणूक, शर्यती, भोजन इ.सत्कर्मे करतात. जत्रेच्या काळात त्या त्या देवतेचे विशेष पूजोपचार होतात. त्यांत देवतेची रथात बसवून वा  पालखीत बसवून मिरवणूक काढतात. प्रथा असेल, तर त्या देवतेचा विवाह समारंभही जत्रेच्या काळात सर्व भक्तगणांच्या उपस्थितीत साजरा होतो. जत्रा हा प्रामुख्याने देवतेचा वा सत्पुरूषाचा धार्मिक उत्सव असल्यामुळे त्यात भाविकांनी त्यादेवतेचे दर्शन घेणे, पूजोपचार करणे, नवस करणे वा फेडणे, प्रसाद ग्रहण करणे इ.गोष्टींना विशेष महत्त्व आहे. जत्रांहून तमाशा, दशावतारी, नाटके, कुस्त्यांचे फड, बैलगाडयांच्या शर्यती, सर्कस, चित्रपट, आकाश पाळणे, फिरते लाकदी घोडे, जादूचे खेळ इ. करमणुकीच्या कार्यक्रमांचा प्रामुख्याने अंतर्भाव होतो. कीर्तन, भजन, प्रवचन तसेच विविध स्तरातील लोक एकत्र जमल्यामुळे त्यांच्यात होणारी विचारांची व कल्पनांची देवान घेवान यामुळे त्यांचे सांस्कृतिक उद्‌बोधनही जत्रेत होते व सामाजिक एकात्मकता दृढ होण्यास मदत होते. हिंदू व्यक्तीने जसे

आयुष्यात एकदा तरी काशीची यात्रा करावी असे म्हटले जाते, तसेच प्रत्येक मुस्लिम व्यक्तीने मक्केची हाज(हज) यात्रा करावी असे म्हटले जाते.

**सातारा जिल्हयातील प्रमुख यात्राः**

सातारा जिल्हयात खालील एकूण ५६ यात्रा स्थळांना क वर्ग दर्जा जिल्हा नियोजन समिती साताराने दिलेला आहे.

**औंध रथोत्सव :**

औंध गावाच्या नैऋत्येस १५०० फुट उंचीवर श्री यमाईदेवीचे स्थान आहे. या शक्तीपीठास मुळस्थान असे म्हणतात. अतिप्राचीन कोरीव दुर्मिळ दगडी कलाकृतींचे सुबक दर्शन म्हणजे श्री यमाईदेवी मंदीर होय.दरवर्षी पौष महिन्यात नियमित ग्रामवासीनी आणि मूळपीठ निवासीनी श्री यमाईदेवीस अभिषेक घालण्यात येतो. त्यास भोगी म्हणतात. यावेळी मंत्रपुष्प, दही, दूध आदी पूजा साहीत्यासह देवीची षोडषोपचारे महापूजा केली जाते. पौष शाकंभरी पौर्णिमेला श्री यमाईदेवीची पालखीतून मिरवणूक काढली जाते.त्यास छबीना म्हणतात. यामध्ये गोंधळी, डवरी जागर सादर करतात. या ठिकाणी राज्यातील सर्वात उंच दिपमाळ असून ती याप्रसंगी प्रज्वलीत केली जाते. त्यानंतर दुसऱ्या दिवशी रथोत्सवाचे आयोजन करण्यात येते. रथोत्सवानंतर श्री यमाईदेवीच्या वार्षिक यात्रोत्सवास प्रंभ होतो.ही यात्रा १५ दिवस असते.[१२]

**पाल खंडोबा यात्रा :**

पौष महीन्याच्या शुक्ल त्रयोदशीला मुळ नक्षत्रावर श्री खंडोबा आणि म्हाळसा यांच्या विवाहानिमित्ताने पाल येथे मोठी यात्रा भरते. पाली हे गांव पुणे–बेंगलोर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४ वरील काशिळपासून पश्चिमेस ५ कि.मी. अंतरावर आहे. तारळी नदीने या गावाचे दोन भाग केलेले आहेत. दक्षिण पश्चिमेच्या भागास पाली तर उत्तर पुर्वेच्या भागाला पेंबर असे म्हणतात. खंडोबाचे देऊळ पेंबरमध्ये आहे.

या यात्रेप्रसंगी विविध गावचे मानकरी वऱ्हाडी म्हणून येतात. नारळाच्या झावळया, फुले, तोरणे यांनी सजवलेल्या बैलगाडीतून श्रीखंडोबाची वऱ्हाडी तारळी नदीवर येतात. प्रत्येक वऱ्हाडी मंडळींच्यापुढे वाद्यवृंद असते. सदानंदाचा येळकोट गजर करीत भंडाऱ्याची उधळण करीत वऱ्हाडी घोडयावर बसून तर मानकरी मानकरी देव–देवीचे मुखवटे पोटाशी बांधतात व

हत्तीवर विराजमान होऊन देवस्थानचे मुख्य परिसरात येतात. सवाद्य मिरवणूक देवळात आल्यानंतर यथासांग पूजा केली जाते. पोटाशी बांधलेल्या मुखवटयांसह पुन्हा मानकरी गजराजावर आरूढ होतात आणि त्यांची हत्तीवरून मिरवणुक काढली जाते. ही मिरवणूक पुढे तारळी नदीच्या पात्रातून बोहल्यावर येते. त्या ठिकाणी गोरज मुहुर्तावर खंडोबा आणि म्हाळसा यांचा विवाह मंगलाष्टका गाऊन संपन्न होतो. याप्रसंगी भंडाऱ्याने भरलेल्या खोबऱ्याच्या वाटया हत्तीवर बसलेल्या मानकऱ्यांच्या दिशेने चोहोबाजूकडून फेकल्या जात असत.

खंडोबा देवाच्या यात्रेस महाराष्ट्र आणि इतर राज्यातूनही मोठया प्रमाणावर लोक येतात. या वेळी लंगर तोडणे, जागरण घालणे अशा प्रकारचे विधी पार पाडले जातात. अलिकडे प्रशासनाने अनिष्ट रूढी परंपरांवर बंधने घालून यात्रा पार पाडण्याचा प्रयत्न चालवलेला दिसतो.[१३]

**मांढरदेव यात्रा :**

वाईपासून २२ किलोमीटर अंतरावर उत्तरेस उंच डोंगरावर मांढरदेव गाव वसलेले आहे. येथून एक किमी अंतरावर शंभूमहादेव डोंगररांगेतील मांदार पर्वतरांगेमध्ये समुद्रसपाटीपासून सुमारे साडेचार हजार फूट उंचीवर काळूबाईदेवीचे मंदीर आहे. दर वर्षी पौष पौर्णिमेला (शाकंभरी पौर्णिमेला) देवीची वार्षिक यात्रा भरते. महाराष्ट्र आणि शेजारील राज्यातूनही या यात्रेला लोक येतात. हे मंदीर हेमाडपंथीय असून त्यास लागून सभामंडप आहे. स्वयंभू मानल्या जाण–या देवीच्या मुर्तीवर मुखवटा चढवून देवीची पूजा केली जाते.[१४] मुख्य मंदीरासमोर मांगीरबाबा आणि गोंजीरबाबा या दोन भक्तांची मंदीरे आहेत. देवीच्या मंदीरासमोर दिपमाळ आहे. देवीला गोड नैवेद्य दाखवला जातो मात्र पहारेकऱ्यांसाठी प्राण्यांचे बलीदानाची प्रथा येथे आहे. सन २००५ साली या ठिकाणी झालेल्या दुर्घटनेनंतर या परीसरात पशुहत्या करण्यास, झाडांवर खिळे ठोकण्यास, लिंबे टाकणे, काळया बाहुल्या बांधणे आदी प्रकार बंद करण्यात आले आहेत. ही देवी नवसाला पावते या अशी येथे येणाऱ्या लाखो भावीकांची श्रध्दा आहे.[१५]

**बिरोबा यात्रा :**

धनगर बांधवांच्या दृष्टीने फलटण आणि सालपे येथील बिरोबा यात्रा अत्यंत महत्वाची समजली जाते. ही यात्रा अश्विनी पौर्णिमेला होते. फलटण शहराच्या दक्षिणेला असलेले बिरदेव मंदीर व सालपे गावाच्याही दक्षिणेला माळावर असलेले बिरदेव मंदीर ही दोन्ही ठिकाणे धनगर

समाजाची श्रध्देची ठिकाणे आहेत. या दोन्ही ठिकाणी ही यात्रा भरते. पहाटे विधीवत बिरदेवाच्या मूर्तीला अभिषेक झाल्यानंतर उपस्थित बांधव जयजयकार करीत भंडाऱ्याची उधळण करतात. याचप्रमाणे गजी नृत्य करून आपली लोककला सादर करतात. यात्रेच्या दुसऱ्या दिवशी सालपे येथील मंदिरातील बिरोबा देवाच्या मुर्तीला अभिषेक केला जातो आणि जयजयकार करीत भंडाऱ्याची उधळण करत गजी नृत्य करतात. या ठिकाणी घोडयांचा फार मोठा बाजार भरवला जातो.[१६]

**पुसेगाव रथयात्रा :**

पुसेगाव येथे सेवागिरी महाराजांनी सन १९४८ साली जिवंत समाधी घेतली होती. त्या वर्षापासून पूसेगांव येथे भरते. पूसेगांव येथे ज्याठिकाणी श्री सेवागिरी महाराजांचे समाधीस्थान आहे तो तळभाग छोटासा असून सुंदर अशा फरशीस्थानाने सुशोभित केला आहे. सदगुरू सेवागिरी महाराजांच्या समाधीवर चांदीच्या पादुका आहेत. समाधीवर सतत तेवणारा नंदादीप आहे. सेवागिरी महाराजांच्या रथोत्सवादिवशी मंदिरातून त्यांच्या रथाची पूसेगांव नगरीत प्रदक्षिणा घातली जाते. या यात्रेचे वैशिष्टय म्हणजे या यात्रेत जनावरांचे भव्य प्रदर्शन आयोजित केले जाते, चित्रपटांचे तंबू, तमाशा विविध प्रकारच्या करमणूकीची साधने भरपूर प्रमाणात येतात. यात्रेत कुस्त्यांचे जंगी मैदान भरवले जाते. सेवागिरी महाराजांच्या रथोत्सवादिवशी लाखो रूपयांच्या देणग्या सेवागिरी महाराजांच्या प्रतिमेस अर्पण केल्या जातात. सेवागिरी देवस्थान ट्रस्टने या निधीचा वापर करून अनेक सामाजिक आणि शैक्षणिक संस्था उभ्या केलेल्या आहेत. सेवागिरी महाराजांच्या यात्रेत विविध जातीधर्माचे लोक एकत्र येतात. ही यात्रा म्हणजे एक प्रकारचा अध्यात्मिक समतेचा महोत्सवच असतो.[१७]

**चाफळची सीतामाई यात्राः**

तीळ नव्हे हलवा येता जाता बोलवा, तिळगुळ घ्या गोड बोला, वसा घ्या वसा घ्यायचा कसा? मी सांगते तसा अशा एक ना अनेक स्नेहभावाने श्री क्षेत्र चाफळ ता.पाटण जि.सातारा येथील पुरातन श्रीराम मंदीरात परंपरेनुसार मकरसंक्रांतीदिवशी सुवासीनी अखंड सौभाग्याचा वसा घेतात. या यात्रेसाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून अनेक महीला उपस्थित राहतात. पारंपारिक वेशभुषेतील सुवासिनी सीतामाईच्या चरणी ओवसा व विडा घेतात. सुगडी (संक्राती) मध्ये तीळ, गुळ, गाजर, बोरे, ऊस, गव्हाच्या लोंब्या, पावटा, शेंगा, हरभरा, बिबी, घेवडा

सीतामाईच्या चरणी अर्पण करतात. खाऊच्या पानावर खोबरे, खारीक, बदाम, सुपारी, हळदीकुंकू ठेवून पाच सौभाग्यवतींच्या हातून ओटया घेतल्या जातात.एकमेकींना तिळगुळ देऊन आलिंगन दिले जाते. सीतामाईचा वसा घेतल्यास सौभाग्याच लेणं अखंड टिकते अशी ठाम भावना इथे येणाऱ्या महिलांमध्ये आहे.[१८]

**औंधचा संगीत महोत्सव :**

औंध ही नगरी सामाजिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक, शैक्षणिक कलेचा वारसा जपणारी नगरी म्हणून ओळखली जाते. विविध कलांचा वारसा जतन करणाऱ्या या नगरीमध्ये मागील सात दशकांपासून 'औंध संगीत महोत्सव'ने हा वारसा चिरंतन जतन केला आहे. ग्रामीण भागातील शास्त्रीय संगीत महोत्सवाचे आयोजन केला जाणारा हा एकमेव महोत्सव म्हणून ओळखला जातो. पं.अंतुबुवा जोशी यांचे गुरू शिवानंद स्वामी हे प्रतापगडावर राहायचे. परंतु पुढे वार्धक्य आणि आजारपणामुळे त्यांनी मला औंधला घेवून जावे. अशी ईच्छा व्यक्त केली तेव्हा पं.अंतुबुवा जोशी त्यांना औंधला घेऊन आले. येथेच गुरू शिवानंद स्वामी यांचे निधन झाले. पं.अंतुबुवा जोशी यांनी त्यांची समाधी श्री यमाईदेवीच्या मुळपीठाच्या डोंगराच्या पायथ्याशी समाधी बांधली. पं.अंतुबुवा जोशी हे औंध दरबारी गायक होते. दरबारी गायनासोबतच आपल्या गुरूसाठी, त्यांच्या पुण्यस्मरणासाठी काही तरी करावे हा विचार त्यांना गप बसून देत नव्हता व त्यानंतरच त्यांच्या विचारांनी, गुरूवार असलेल्या निस्सीम भक्तीतूनच औंध संगीत महोत्सवाची पायाभरणी केली. अश्विन वद्य पंचमी १९४० सालापासून ही प्रथा सुरू केली. ही प्रथा आजही चालू आहे. या ठिकाणी पं.अंतुबुवा जोशी, पं.गजाननबुवा जोशी, गानकोकीळा हिराबाई बडोदेकर, पंडीत भिमसेन जोशी, तबलानवाज थिरखवाँखाँसाहेब, अल्लारखाँ, दाऊदखाँ तसेच पु.ल.देशपांडे अशा नामांकित कलाकारांनी आपली कला सादर केली आहे.सन १९३९ ते १९७९ पर्यंत घरगुती स्वरूपात गुरूच्या सेवेसाठी केल्या जाणाऱ्या या उत्सवाने सन १९८० पासून महोत्सवाचे स्वरूप घेतले. औंध संगीत महोत्सवाचे वाढते स्वरूप व व्याप्ती पाहुन श्रीमंत गायत्रीदेवी पंतप्रतिनिधी यांनी 'औंध कला मंदिर' या भव्य दालनाची सोय निर्माण केली. या कलामंदिरामुळे औंध संगीत महोत्सवाच्या वैभवात भर पडली. औंध संगीत महोत्सवामुळे ग्रामीण भागातील रसिक श्रेत्यांना दिग्गज कलाकार जवळून पाहावयास व त्यांचे गायन, वादन आणि नृत्य अनुभवायास मिळते.[१९]

## मुस्लिम धर्मिय सण

### मोहरम

करबला येथे हजरत इमाम हुसैन व त्यांच्या अनुयायांना हौतात्म्य आले. त्यांच्या स्मृतीला अभिवादन करण्यासाठी मोहरम पाळण्यात येतो. या निमित्ताने विविध ठिकाणी ताबूत आणि पंजांची पारंपरिक पद्धतीने स्थापना करण्यात येते. मोहरमनिमित्त परंपरेनुसार शहरातील विविध ठिकाणी पंजांच्या भेटी, करबला, खाई फोडणे आदी कार्यक्रम होतात. इमाम हसन व हुसैन यांची आठवण म्हणून साजरा करण्यात येणारा मोहरम सर्वधर्मसमभावाचा प्रतीक म्हणून ओळखला जातो. हा उत्सव सर्वच जाती–धर्मातील लोक मोठया भक्तिभावाने साजरा करतात. इस्लाम तिथीच्या ३, ५ व ७ तारखेच पंजांची स्थापना होते.

मुस्लिम कुटुंबाबरोबरच हिंदू धर्मातील नागरिकांनी मोहरम सणाची परंपरा कायम ठेवली आहे. मोहरमच्या पाचव्या व सातव्या तारखेला सर्वच पंजे भेटीसाठी निघतात. हजरत मोहंमद पैगंबर हे मोहरमच्या नवव्या किंवा दहाव्या दिवशी उपवास करत. तशातच मोहमंद पैगंबर यांचे नातू हजरत इमाम हुसेन यांचे निर्वाण याच दिवशी झाले. त्यामुळे शियापंथीय मुसलमान या दिवशी शोक पाळतात. पृथ्वीवर प्रलय आल्यास तो मोहरमच्या दहाव्या दिवशी येईल. अशी एक धारणा आहे. या सर्व पार्श्वभूमीवर मोहरमचे वेगळे असे महत्त्व आहे.[२०]

मुस्लिम नागरिक मोहरम महिन्यात पहिला उपवास करतात. रमजानप्रमाणे मोहरमचे उपवास अनिवार्य नाहीत. यौमे आशुराचा महत्त्वाचा उपवास आहे. या दिवशी करबलाच्या युद्धात मोहंमद पैंगबर यांचे नातू हजरत हुसेन शहीद झाले होते. त्यामुळे त्यांच्या स्मरणार्थ हा विशेष उपवास मुस्लिम नागरिक करतात. या उपवासामुळे संकट टळते, अशी त्यांची धारणा आहे.

### रमजान :–

मुस्लिम धर्माचे दोन महत्त्वपूर्ण सण म्हणजे ईद–उल–फितर व ईद–उल–फितर ही आनंद साजरा करण्याची ईद मानली जाते. आपापसार बंधुत्वाचे संबंध प्रस्थापित करून प्रेम व आनंदाने साजरा केला जाणारा सण अशी त्याची ओळख आहे. याउलट ईद–उल–जुहा म्हणजे कुर्बानी व त्यागाचे पर्व मानले जाते. ईद–उल–फितर हा अरबी भाषेतील शब्द आहे. रमजान हा अरबी वर्षाचा नववा महिना. संपूर्ण महिना उपवास–रोजे करून तिसाव्या दिवशी ईद येते. पवित्र कुराण याच महिन्यात अवतरले असल्यामुळे इस्लाममध्ये रमजानला अनन्यसाधारण महत्त्व

आहे. इस्लाममधल्या एकमेव ईश्वरावरील श्रद्धा, नमाज, रोजे, जकात आणि हज या धर्माचरणाच्या पाच स्तंभापैकी एक असल्यामुळे या रोजांना पराकोटीचे धार्मिक महत्त्व प्राप्त आहे. सलग तीस दिवस रोजा(उपवास) धरले जातात. हा रोजा १२ तासांचा असतो. सुर्योदयापासुन अन्नपाणी वर्ज्य केले जाते. प्रत्येक माणसाच्या मनात सत्कृत्य होत असेल तर त्यात सहभागी व्हावे सदाचरणाचे व ईश्वरभीरूतेचे एक वातावरण निर्माण होते आणि सदाचरणाच्या सुगीचे दिवस येतात. रमजान महिन्यातले शेवटचे दहा दिवस अत्यंत महत्त्वाचे असतात. या १० दिवसात अल्लाहच्या कृपांचा वर्षाव होतो. पुढच्या दहा दिवसांत कृपावंत, दयाळू, अल्लाह आपल्या भरकटलेल्या, अपराधी, गुन्हेगार दासांना क्षमायाचनेनुसार क्षमा करतो. शेवटच्या दहा दिवसात अल्लाह आपल्या आज्ञाधारक, उपासक बंद्यासाठी मोक्षाचा निर्णय घेतो. हा महीना मुस्लिमासाठी पुण्यसंचयाचा महीना असतो. रोजे केल्याने उपाशी राहिल्याने पुण्य मिळत नाही. त्यासाठी जकात ही द्यावी लागते. तसेच नमाज अदा करणे, ईशपरायणता अंगी बाळगणे, कुराण पठण करून त्यातल्या आयतींचा अर्थ समजून घेण आणि ईश्वराचे प्रेषित मुहम्मद(स.) यांच्या शिकवणीचा अवलंब करणं या उपासनादेखील करण गरजेच असत. साडेसात तोळे सोने किंवा बावन तोळे चांदी किंवा तेवढयाच किमतीच्या अन्य रूपातल्या संपत्तीपेक्षा अधिक संपत्तीवर २.५ टक्के जकात देणे अनिवार्य कर्तव्य आहे. आपल्याकडे आपल्या आवश्यकतेपेक्षा जास्त आहे आणि ते दुसऱ्या गरजवंताला मिळावे हा उदात्त हेतू यामागे आहे. यावरून इस्लाम हा समानतावदी धर्म असल्याचं सिद्ध होते. सत्य, सदाचार आणि संयमाशिवाय केलेला रोजा पुण्याची प्राप्ती करून देत नाही. अस कुराणात स्पष्ट म्हटलेय म्हणून या महिन्यात सर्व मुस्लिम बांधव फक्त रोजा करून थांबत नाही, तर दिवसाचा जास्तीत जास्त वेळ कुराण पठणात आणि मशिदीत जाऊन प्रार्थना करण्यात घालवतात.[२१]

ईद या शब्दाचा अर्थ आनंद असा आहे. तर फितर म्हणजे दान करणे. अन्नाच्या स्वरूपात दान केले जाते. फितर हा मुस्लिम शरियत कायद्यातील मापदंड आहे. रमजान महिन्यातील रोजे संपल्यानंतर ईद येते. ईद हा आनंदाचा सण असल्यामुळे ईदच्या दिवसांमध्ये मुस्लिम बांधवांच्या चेहऱ्यावर आनंद खुललेला दिसतो. ईदला नवीन वस्त्रे परिधान करून मुस्लिम बांधव ईदगाह किंवा मशिदीत नमाज अदा करायला जातात. अल्लाच्या पती नमाज अदा केल्यानंतर मुस्लिम बांधव एकमेकांना अलिंगन देऊन ईदच्या शुभेच्छा देतात. या दिवशी मित्र

असो वा शत्रू ते दोघांची गळाभेट घेऊन शुभेच्छा देतात. सातान्यामध्येही मोठया प्रमाणात ईद साजरी करण्यात येते. कराड, फलटण, वाई, पाटण येथेही ईदसाठी उत्साह असतो. पवित्र रमजान महिन्याच्या उपवासाची सांगता रमजान ईदने होते.[२२]

रमजानचा मुख्य संदेश पुण्य कमवा आणि पापाला जाळा असा आहे. मुस्लिम या शब्दाचा अर्थ अल्लाच्या आज्ञांचे पालन करणारा किंवा शांततेचे रक्षण करणारा असा केला जातो. रमजान महिन्यात दिवसा व रात्री नमाज अदा केली जाते. रमजानचा मुख्य संदेश आनंदी रहा असाच आहे.

**बकरी ईद**

बकरी ईद हा मुस्लिम बांधवांचा महत्त्वाचा सण असून या दिवशी कुर्बानीची प्रथा आहे. इस्लाम धर्माचे पैंगबर हजरत इब्राहिम व त्यांचे पुत्र हजरत ईस्माईल यांनी सर्व सृष्टीचा निर्माता अल्लाहच्या मार्गात वेगवेगळया प्रकारे दिलेल्या कुर्बानी स्मृतींना बकरी ईद सणाद्वारे समाजबांधव या दिवशी उजाळा देतात. त्याग, बलिदान व श्रद्धेची शिकवण देणारा सण म्हणून बकरी ईद तथा ईद उल अज्हा सर्वत्र साजरी केली जाते. बकरी ईद अर्थात 'ईद–उल–अज्हा' मुस्लिम समाजबांधव दरवर्षी इस्लामी कालगणनेचा शेवटचा 'जिलहिज्ञच्या १० तारखेला त्याग व बलिदानाची शिकवण देणारा बकरी ईदचा सण साजरा करतात. संपूर्ण विश्वाचा निर्माता सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या आदेशाचे पालन व अल्लाहच्या मार्गामध्ये आपल्याला अत्यंत प्रिय असलेली वस्तू ही त्याच्या कृपेने मिळाली आहे. असे मानून ती वाहून देणे अर्थात कुर्बान करणे होय. इस्लाम धर्माचे शेवटचे प्रेषित हजरत मुहम्मद पैंगबर यांचे पूर्वज हजरत इब्राहिम अलैही सलाम व त्यांचे पुत्र हजरत ईस्माईल अलैही सलाम यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ बकरी ईद साजरी केली जाते. इस्लाम धर्माने प्रत्येक धनिका मुस्लिमावर बकरी ईदच्या निमित्ताने कुर्बानी देणे अनिवार्य केले आहे. बकरी ईदच्या दिवशी मुस्लीम बांधव सकाळी ईदगाह मैदानावर एकत्र येऊन ईदच्या विशेष नमाजचे पठण करतात. या नमाजपठणाचे नेतृत्त्व खतीब–ए–शहर यांच्याकडून केले जाते. मुख्य नमाज पठणानंतर खतीब 'खुतबा' वाचतात. यावेळी उपस्थित हजारो मुस्लीमबांधव एकाग्रतेने खुतबा ऐकतात. यानंतर संपूर्ण मानवजातीच्या कल्याणासाठी अल्लाहतआलाकडे प्रार्थना(दुआ) केली जाते. प्रार्थनेनंतर सर्वजण 'ईद मुबारकच्या शुभेच्छा देतात. बकरी ईद व रमजान ईद या दोन्हींचे नमाज पठण करणे धर्माने अनिवार्य केले आहे.[२३]

बकरी ईदच्या औचित्यावर ज्या समाज बांधवांनी कुर्बानी केली आहे. त्यांच्याकडून प्रसादाच्या रूपाने आपल्या नातेवाईकांसह परिसरात मांस वाटप केले जाते. बकरी ईद दरम्यान समाज बांधव बिर्याणी, पुलाव, कोरमा यासारखे अन्नपदार्थ तयार करतात. धार्मिकदृष्टया रमजान व बकरी ईद हे दोन्ही सण महत्त्वाचे मानले जाते. या दोन्ही सणांमध्ये नमाज पठणाचा मुख्य सोहळा हे साम्य आढळते. या दोन्ही सणाच्या निमित्ताने मुस्लीम बांधव घरांना रंगरांगोटी करून सफाई करतात. तसेच नवीन कपडयांची खरेदी करतात.[२४]

**बौध्द धर्मिय सण व उत्सव :**

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा जन्मदिन १४ एप्रिल रोजी दरवर्षी डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती म्हणून साजरा केला जातात. सन १८९१ मध्ये या दिवशी यांचा मध्यप्रदेशातील महु येथे जन्म झाला. भारतीय दलितांचे आणि स्त्रियांचे उध्दारकर्ते म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. सातारा जिल्हा हा पुरोगामी जिल्हा म्हणून ओळखला जातो. येथिल दलित तस्सेच सवर्ण सर्व लोक एकत्रितपणे या महामानवाची जयंती साजरी करतात. स्वातंत्र्योत्तर कालखंडात सन १९५६ साली डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धम्माची दिक्षा घेतली आणि हजारो वर्षांच्या गुलामगिरीतून या दलित वर्गाची मुक्तता डॉ.आंबेडकरांनी केली. या महामानवाच्या मृत्यूनंतर त्यांचा जन्मदिवस त्यांची जयंती म्हणून साजरा केला जाऊ लागला. या दिवशी सातारा जिल्हयातील प्रत्येक गावात लोक डॉ.आंबेडकर व गौतम बुद्धांच्या प्रतिमांचे पूजन करून त्रिशरण व पंचशिलांचे ग्रहण करतात. यानंतर लोक मोठया संख्येने ढोल तुतारीच्या गजरात डॉ.आंबेडकरांच्या प्रतिमेची मिरवणूक त्यांच्या गावत प्रमुख ठिकाणी काढतात. काही ठिकाणी डॉ.आंबेडकरांच्या जीवनावर मान्यवर व्याख्यात्यांचे व्याख्यान आयोजित केले जाते तर काही ठिकाणी संगित व नृत्याचे कार्यक्रम आयोजित केले जातात.

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन**

जगात अनेक क्रांतिकारी महापुरूष झालेत परंतु हिमालयापेक्षाही व्यक्तिमत्त्व, शून्यातून विश्व निर्माण करण्याची ताकद आनि फक्त आपल्या बुद्धी कौशल्यावर सर्व जगाला आपल्या कर्तृत्वाकडे आकर्षित करण्याची सत्याची कसोटी, ही तथागत बुद्धानंतर केवळ डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनीच स्वकर्तृत्त्वाने मिळविली. डॉ.आंबेडकरांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी बौद्ध

धम्माची दिक्षा घेतली आणि हजारो वर्षे अज्ञान अंधकारात पिचत पडलेल्या दलित जनतेला मुक्ती मिळवून दिली.मात्र यानंतर काही दिवसातच दि.०६.१२.१९५६ रोजी या महामानवाचे निधन झाले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या निधनानंतर दरवर्षी सहा डिसेंबर रोजी त्यांना अभिवादन करण्यासाठी सर्व दलित जनता दादर येथे चैत्यभूमीला येतात.

सातारा जिल्हयातील सर्व दलित समाजाचे लोक डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी मुंबईला जातात. ज्यांना मुंबईस जाणे शक्य होत नाही ते लोक आपआपल्या गावी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमीत्त त्यांच्या प्रतिमचे पुजन करण्यात येते. या दिवशी सातारा जिल्हयातील प्रत्येक गावात  लोक डॉ.आंबेडकर व गौतम बुद्धांच्या प्रतिमांचे पूजन करून त्रिशरण व पंचशिलांचे ग्रहण करतात.डॉ.आंबेडकरांच्या प्रतिमेची मिरवणूक त्यांच्या गावात प्रमुख ठिकाणी काढतात. काही ठिकाणी डॉ.आंबेडकरांच्या जीवनावर मान्यवर व्याख्यात्यांचे व्याख्यान आयोजित केले जाते.[२५]

**बुद्ध पौर्णिमा :–**

गौतम बुद्धांनी बौद्ध धर्माची स्थापना करून वेदकालनि यज्ञक्रियेतल्या पशुहत्यांना जन्मजात उच्च–नीचतेला लगाम घालण्याचे काम करत समाजाला योग्य दिशा दाखविली. त्यामुळेच समाजात बहुजनांना दिलासा मिळाला आणि ते नव मानवतावादी धर्माकडे आकृष्ट झाले. जगातील दुःख नाहीसे करण्यासाठी भगवान गौतम बुद्धांनी निरनिराळे मार्ग अनुसरले. यााठी स्वतःचे घरदार सोडून ध्यान मार्ग आणि तपश्चर्येचा मार्गही अनुभवला. मात्र वैशाख शुद्ध पौर्णिमेला त्यांना ज्ञान प्राप्त झाले आणि दुःखाचे मुळ व ते नाहीसे करण्याचा मार्ग सापडला. ही पौर्णिमा बुद्ध पौर्णिमा म्हणून साजरी केली जाते. दया, अहिंसा, शांती, मानवतावाद आणि समानता या चिरंतन तत्त्वांनी जीवनातल्या खडतरतेवर आणि दुःखावर मात करता येते हे त्यांना समजले. पुढे भिक्षूसंघाची स्थापना करून या तत्वांचा त्यांनी प्रसार केला. भिक्षूनी संघाची स्थापना, कर्माधारित उच्च–नीचतेचा पुरस्कार बहुमतांनी संघांचे निर्णय घेणे आणि सर्वसामान्यांच्या पाली भाषेत धार्मिक ग्रंथाचे लेखन ही त्यांची कृतिशील पावले होती. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी धर्मांतर करताना बौद्ध धर्माची निवड केली. मानवी अक्षय मूल्यांचा अंगिकार आणि प्रसार करणाऱ्य गौतम बुद्धाचे निर्वाण वैशाखी पौर्णिमेलाच झाले. या दिवशी सातारा जिल्हयातील प्रत्येक गावात लोक गौतम बुद्धांच्या आणि डॉ.आंबेडकर प्रतिमांचे पूजन

करून त्रिशरण व पंचशिलांचे ग्रहण करतात.गौतम बुद्धांच्या आणि डॉ.आंबेडकर प्रतिमेची मिरवणूक त्यांच्या गावात प्रमुख ठिकाणी काढतात.

**१४ ऑक्टोबर धम्मचक्र प्रवर्तन दिन....**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथील दीक्षाभूमीवर आपल्या ५ लक्ष अनुयायांना समता, बंधुता, स्वातंत्र्य, न्याय यावर आधारित बौद्ध धम्माची दिक्षा दिली. असमानतेने बरबरटलेल्या हिंदू नामक गचाळ मानसिकेतेतून कायमची मुक्ती करून घेतली. हजारो वर्षे लादल्या गेलेल्या गुलामगिरीच्या बंधनातून मानवमुक्तीचा इतिहास घडविला. जुने बुरसटलेले परंपरावादी मूल्य झुगारून बुद्धाच्या वैज्ञानिक दृष्टीकोनातून नवीन जीवन मूल्यांचा अंगीकार केला.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी घडवून आणलेल्या धम्मक्रांतीची या दिवसाची व तारखेची नोंद सर्व जगाने घेतली. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या आयुष्यातला सर्वात महत्त्वाचा दिवस, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या एका हाकेवर ५ लक्ष लोकांनी आपला जुना धर्म झुगारून लावला. भारतात दोन हजार वर्षानी प्रथमच भयमुक्त वातावरणात बुद्धम, शरणंम, गच्छामी...निनादनारा दिवस, म्हणूनच १४ ऑक्टोबर या तारखेला अनन्य साधारण महत्त्व आहे. सातारा जिल्हयातील प्रत्येक गावाात या दिवशी लोक गौतम बुद्धांच्या आणि डॉ.आंबेडकर प्रतिमांचे पूजन करून त्रिशरण व पंचशिलांचे ग्रहण करतात.[२६]

## ख्रिश्चन धर्मिय सण व उत्सव

### नाताळ

नाताळ हा मुख्यत्वे २५ डिसेंबरला ख्रिश्चन देवता येशू ख्रिस्त याच्या जन्मदिवसा–निमित्त साजरा केला जाणारा सण आहे. काही ठिकाणी नाताळ २५ डिसेंबरऐवजी ६, ७ किंवा १९ जानेवारीला साजरा केला जातो. ख्रिश्चन श्रद्धेनुसार नाताळ हा सण १२ दिवसांच्या ख्रिस्मस्टाईड पर्वाची सुरूवात करतो या सणात एकमेकांना विविध भेटवस्तू, शुभेच्छापत्रे देऊन परस्परांचे अभिनंदन करण्यात येते. या काळात आपापल्या घरांना रोषणाई करून सजवले जाते. ख्रिसमस वृक्ष सजावट(नाताळासाठी सजवलेले सूचीपर्णी झाड) हा या सणाचा एक अविभाज्य घटक आहे. याच दिवशी रात्री सांताक्लॉज लहान मुलांसाठी भेटवस्तू वाटतो असे मानले जाते. २५ डिसेंबर हा दिवस येशी ख्रिस्ताचा जन्मदिवस. जगभरचे ख्रिस्तानुयायी या

दिवशी आनंद व्यक्त करतात. साधू, संत, महात्मे यांची जयंती साजरी करण्याची प्रथा आणि परंपरा सर्व जगभर पाळली जाते. जगाच्या बऱ्याच मोठया भागात ख्रिसमसचा सण मध्यरात्री साजरा केला जातो.

ख्रिसमसच्या आदल्या संध्याकाळी म्हणजे २४ डिसेंबरला संध्याकाळी(याला ख्रिसमस ईव्ह म्हणतात) सजविलेल्या चर्चच्या अंगणात आबालवृद्ध स्त्रीपुरूष रंगीबेरंगी पोषाख करून एकत्र जमतात. गाणी गातात, काही देशात मद्यपान करतात. नंतर रात्री १२ वाजता चर्चच्या घंटानादात एकमेकांना शुभेच्छा देतात. ख्रिसमस कॅरोल्स (खास नाताळसाठी राचलेली भक्तिगीते) गात गात लहान मुले व तरूण रात्री १२ पासून पहाटे ३ ते ४ वाजेपर्यंत अनेकांच्या घरी जातात व शुभेच्छा व्यक्त करतात.

डिसेंबर २४ च्या रात्री घरात व चर्चमध्ये 'ख्रिसमस वृक्ष' रोषणाई करून सजवतात. नाताळच्या दिवशी नवे कपडे करणे, शुभेच्छा पाठवणे, एकमेकांना भेटवस्तू देणे इ. बाबी आंतरराष्ट्रीय पातळीवर चालतात. लहान मुले नाताळच्या आदल्या रात्री (२४ डिसेंबरच्या रात्री) झोपी जाण्यापूर्वी पलंगाला मोजे लोंबत ठेवतात. सकाळी झोपेतून उठल्यावर त्यात त्याना भेटवस्तू टाकलेल्या दिसतात. रात्री सांता क्लॉज म्हणजेच सेंत निकोलस धुराडयातून घरात उतरून मोज्यात त्या वस्तू ठेवून गेला. असे मुलांना पालकांकडून सांगण्यात येते. नाताळमध्ये विविध प्रकारचे केक तयार करण्याची प्रथ आहे. घरात व घरावर पणत्या लावणे, आकाशदिवे लावणे, ख्रिस्ती भक्तिपर गाणी भारतीय चालींवर म्हणणे. फटाके उडविणे, केकऐवजी इतर भारतीय मिष्टान्ने तयार करणे इ. पद्धती रूढ झाल्या आहेत. नाताळ हा सातारमधील ख्रिस्ती लोकांचा सर्वात मोठा व  महत्त्वाचा लोकोत्सव झाला आहे.[२७]

### वारकरी संप्रदाय

वारकरी संप्रदाय म्हणजे पंढरपूर येथील विठ्ठलास वारीला जाणाऱ्या लोकांचा संप्रदाय. ही वारी आषाढ आणि कार्तिक महिन्यातील शुद्ध एकादश्यांना होते. संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ, संत तुकाराम वारकरी संप्रदायातील महत्त्वाचे संत होत. वारकरी संप्रदायात लहान मोठा हा भेद नाही. तसेच नाम जपाने पुण्य मिळते हा भाव आहे. एकादशी आणि इतर पवित्र दिवशी नित्यनेमाने पंढरपूरला जाणे म्हणजेच वारी होय. जो नियमित वारी करतो तो वारकरी

वारकरी जो धर्म पाळतात त्याला वारकरी धर्म असे म्हणतात. वारकरी धर्मालाच भागवत धर्म म्हटले जाते.

**कीर्तन**

वेगवेगळया पद्धतीने काव्य, संगीत, अभिनय आणि क्वचित नृत्य यांच्यासह सादर करीत असलेल्या भक्तिरसपूर्ण कथारूप एकपात्री निवेदनाला कीर्तन असे म्हणतात आणि हे करणाऱ्या व्यक्तीला कीर्तनकार. महाराष्ट्रात कीर्तनाची परंपरा पूर्वांपार चालत आलेली आहे. नारद हा भारतातील कीर्तनकार आहे. असे मानले जाते.

**नीळकंठ ज्ञानेश्वर गोरे उर्फ बाबा महाराज सातारकर**

नीळकंठ ज्ञानेश्वर गोरे उर्फ बाबामहाराज सातारकर हे महाराष्ट्रातील एक प्रसिद्ध कीर्तनकार आणि प्रवचनकार आहेत. यांचा जन्म ५ फेब्रुवारी १९३६ रोजी साताऱ्याच्या नामवंत गोरे सातारकर घराण्यात झाला. त्यांनी वकिलीचे पदवीपर्यतचे शिक्षण घेतले. त्यांच्या घराण्यात गेल्या तीन पिढयापासून कीर्तनाची व प्रवचनाची परंपरा चालत आली होती. वारकरी संप्रदायातील प्रमुख फड म्हणून त्यांच्या घराण्याच्या सातारकर फडाचे नाव घेतले जात असे. प्रवचनकार दादा महाराज सातारकर यांनी या फडाची सुरूवात केली. हरिविजय, भक्तिविजय या ग्रंथावर ते प्रवचने करत असत. त्यांच्यानंतर त्यांचे दुसरे पुत्र अप्पामहाराज सातारकर यांनी फडाची धुरा सांभाळली. इ.स.१९६२ साली अप्पामहाराजांचे निधन झाल्यावर अप्पामहाराजांचे पुतणे नीळकंठ ज्ञानेश्वरांनी, अर्थात बाबामहाराज सातारकरांनी फडाची परंपरा सांभाळली, सातारकर घराण्याचे आडनाव गोरे असे आहे.

**गगनगिरी महाराज**

श्रीपाद बाळासाहेब पाटणकर जन्म १९०६ मणदुरे, पाटण , महाराष्ट्र निर्वाण ४ फेब्रुवारी २००८ खोपोली, महाराष्ट्र गगनगिरी महाराज यांचे मुळ नाव श्रीपाद बाळासाहेब पाटणकर(सांळुखे) असे होते. त्यांचा जन्म सातारा जिल्हयातील पाटण तालुक्यातील असलेल्या मणदुरे येथे १९०६ मध्ये झाला. त्यांच्या वडिलांचे नाव गणपतराव व आईचे नाव विठाबाई. महाराजांचे वय तीन वर्षे असतानाच त्यांचे आईचे व महाराज पाच वर्षाचे असतानाच वडिलांचे निधन झाले. सुरूवातीपासूनच ते नाथसंप्रदायातील दीक्षा मिळाली. पुढे चित्रकूट पर्वतावर त्यांनी चित्रानंद स्वामी यांची भेट झाली. णाथ संप्रदायातीळा महंताबरोबर ते संपूर्ण

भारतभर फिरले. नेपाळ, भूतान, मानसरोवर, गौरीशंकर, गोरखदरबार, गोरखपूर, पशुपतीनाथ येथून ते अल्मोडा येथे गेले. गंगा नदीच्या खोरे, हिमाचल प्रदेश येथूनही त्यानी आध्यात्मिक मान संपादण्यासाठी प्रवास केला. गगनगिरी महाराजांना विश्वगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. प.पू.महाराजांनी योग सामर्थ्याच्या संदेश सर्वत्र पोहचविला. १९३२ ते १९४० सालापर्यत १९६५ पासून त्यांची कीर्ती जगभर पसरली. गगनगिरी महाराजांचे अनुयायी महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, मध्यप्रदेश, गुजरात, कर्नाटक असा अनेक राज्यांमध्ये पसरले आहेत. संपूर्ण देशभरात, तसेच जगातही ठिकठिकाणी त्यांचे शिष्य व अनुयायी मोठया प्रमाणात आहेत. गगनगिरी महाराज यांनी रायगड जिल्हयातील खोपोली येथील गगनगिरी महाराज योगाश्रम पाताळगंगा तीर्थक्षेत्र आश्रमातील पर्णकुटीत ४ फेब्रुवारी २००८ रोजी पहाटे ३.३० वाजता देह ठेवला. महानिर्वाणाच्या समयी महाराजांचे वय १०३ वर्षाचे होते.[२८]

**गोंदवलेकर महाराज :–**

श्री ब्रम्हचैतन्य गोंदवलेकर महाराज मूळ नाव गणपतीरावजी घुगरदरे(कुलकर्णी) त्यांचा जन्म १९ फेब्रुवारी १८४५ रोजी गोंदवले येथे रावजी लिंगोपंत कुलकर्णी व गीताबाई यांच्या पोटी झाला. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात जे विख्यात महाराष्ट्रीय संत होऊन गेले त्यांच्यापैकी श्रीबम्हचैतन्य तथा गोंदवलेकर महाराज हे एक होते. त्यांचे घराण्यात विठ्ठल भक्ति व पंढरीची वारी असून पूर्वज सदाचार संपन्न व लैकिकवान होते. ते घरी थोडी शेती करून कुलकर्णीपणाचे काम करीत. श्री महाराजांचे मूळ नाव गणेशरावजी घुगरदरे असे होते. स्मरणशक्ति, चलाखबुद्धी, पुढारीपणा, निर्भयवृत्ती, एकांतप्रियता, राम नामाची आवड हया गोष्टी गणेशरावजी घुगरदरे यांच्यामध्ये लहानपणापासूनच होत्या. ते नऊ वर्षाचे असताना गुरू शोधार्थ घर सोडून गेले. पण त्यांच्या वडिलांनी ते कोल्हापूरला आहेत असे कळल्यावर त्यांनी त्यांना घरी परत आणले. त्यांचे वयाच्या अकराव्या वर्षी लग्न करण्यात आले. परंतु त्यांचे प्रपंचात चित्त रमेना आणि ते लवकरच गुरू शोधार्थ पुन्हा घर सोडून निघून गेले. शेवटी ते श्रीमहाराज, श्री तुकामाईकडे गेले. त्यांनी आपल्या घरी आणि इतरत्र अनेक ठिकाणी श्री राममंदिरांची स्थापना करून उपासनेची केंदे निर्माण केली. त्यांनी असंख्य लोकांना व्यसने, दुराचरण, दुराभिमान, संसार चिंता यांपासुन सोडविले. कौंटुबिक कलह मिटवून अनेकांचे संसार सुखाचे केले. यासाठी त्यांनी व्यक्तिगत उपदेश, प्रवचन, भजन कीर्तन यांचा उपयोग केला. त्यांचा लोकसंग्रह फार

मोठा होता. त्यांनी गोरगरीबांना आधार दिला. दुष्काळग्रस्तांना काम पुरवून अन्न दिले. गोरक्षण, अन्नदान भावी काळात मार्गदर्शक ठरतील असे उद्योग, वैदीक अनुष्ठाने, नामजप, भजन सप्ताह, तीर्थयात्रा करून प्रापंचिकांना परमार्थाला लावले. आधुनिक सुसिक्षितांमधील अंधश्रद्धा घालवून त्यांच्यामध्येही धर्माबद्दल व भक्तीबद्दल आदर उत्पन्न केला. अशा रीतीने लोकांमध्ये धर्मजागृती केली. लोकांना नामस्मरणाच्या मार्गाला लावून प्रपंच व  परमार्थचे मधुमीलन कसे करावे हे शिकविण्यासाठी त्यांनी आमरण खटाटोप केला आणि मार्गशीर्ष वद्य दशमी शके १८३५ (२२ डिसेंबर १९१३) या दिवशी गोंदवले मुक्कामी त्यांनी देह ठेवला.

**साहित्य**

सातारा जिल्हयाला मान्यवर साहित्यिक लाभल्याने सशक्त अशी साहित्य परंपरा आहे. या मध्ये ना.ह.आपटे, कवी विहंग,तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, बाबूराव गोखले, यशवंतराव चव्हाण, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, प्रा.रा.ग.जाधव, पंडीत सप्रे, रा.ना.चव्हाण, चिंतामणराव कोल्हटकर अशा मान्यवरांचा समावेश होतो. या सर्व मान्यवरांनी ही साहित्यसृष्टी सुशोभित झाली. याशिवाय या मान्यवरांच्या यादीत जाऊन बसण्याच्या योग काही लेखकांना मिळालेला दिसतो. या परंपरेत जी.ए.कुलकर्णी यांच्या प्रभावात लिहीणारे वाईचे एस.डी.ईनामदार, प्रकाश संत, माधव पिटके, बालसाहित्य व विनोदी लेखन करणारे म.वि.कोल्हटकर,अनुवादक, कथाकार आणि समिक्षक व.के.पाटील, वैचारीक व समिक्षात्मक लेखन करणारे शंकर सारडा आणि डॉ.आ.ह.साळूंखे कादंबरीकार  नाटककार आणि स्त्री प्रतिमांचे चित्रण करणारे कवी प्रमोद कोपर्डे, लोककलेच्या संदर्भात स्वतंत्र रचना देणारे दिलीप जगताप, ललित लेखक श्रीनिवास कुलकर्णी, यांचा समावेश होतो.

लेखकांच्या या स्तराशिवाय दलित विश्वाचे चित्रण करणारे ‘उपरा’ कार लक्ष्मण माने, संत साहित्याची समिक्षा लिहीणारे पार्थ पोळके, कवी रामकली पावसकर,व्यक्तिचित्रणे आणि प्रवासवर्णन लिहिणारे अरूण गोडबोले, मुलांसाठी विविध चरित्रे लिहिणारे रविंद्र बेडकिहाळ, ग्रामीण नाटक लिहिणारे जगन्नाथ शिंदे, तुषार भद्रे, विमल पाटील, कादंबरीकार शशिकांत तासगांवकर, डॉ.राजेंद्र माने याचप्रमाणे कथा कविता करणारे विजय माळी, वसंत शिंदे, रघुनाथ केंगार, मच्छिंद्र सकटे, विजय गाढवे, मानसी लाटकर,पर्यावरण आणि निसर्ग या विषयांवर लेखन करणारे डॉ.संदीप श्रोत्री, डॉ.उमेश करंबळेकर भक्ती व धार्मिकता या अंगाने कविता

लिहिणारे सु.शं.सरदेशमुख मधु नेने, संभाजीराव पाटणे, यशवंतराव पाटणे, दिर्घकाळ वृत्तपत्रातून लेखन करणारे जयवंत गुजर, प्रताप गंगावणे, श्रीनिवास कात्रे, वि.ल.आचार्य, डॉ.भाऊसाहेब कणसे,यांचा समावेश होतो.

या लेखनाप्रमाणे वैचारीक क्षेत्रात लेखन करणारे व संपादन करणारे फार कमी लोक साताऱ्यात आहेत. परराष्ट्र व संरक्षण तसेच युध्द इतिहास या विषयावर लेखन करणारे विश्वास दांडेकर, शंकर सारडा, कै.शिवाजीराव चव्हाण, राजेंद्र कुंभार, पार्थ पोळके, किशोर बेडकिहाळ, नरेंद्र दाभोळकर, दत्तप्रसाद दाभोलकर, रा.ग.जाधव, डॉ.आ.ह.साळूंखे यांचा त्यात समावेश होतो. या साहित्यीकांसोबतच साताऱ्यातील आजवर जे साहित्यिक झाले ते साहीत्यीक पुढीलप्रमाणे[२९]

**सातारा जिल्हयातील काही मान्यवर साहीत्यीक पुढीलप्रमाणे :**

सौ.विजया शरद आठवले, सातारा, श्री.म.स.आपटीकर, सातारा, श्री.दिनकर पांडूरंग आफळे, सातारा, श्री.विजय बाबर, सातारा, श्री.पांडुरंग शंकरराव भुजबळ, सातारा, प्रा.व.बा.बोधे, कोरेगाव, श्री.रविंद्र भट, वाई, श्री.विनायक शामराव काळे, सातारा, प्रा.डॉ.सौ.नलिनी महाडीक, सातारा, प्रा.डॉ.सौ.शुभांगी भुतकर, उंब्रज, डॉ.कृष्णचंद्र भोईटे, फलटण, श्री.रा.ना.चव्हाण, वाई, प्रा.शिवाजीराव भोसले, फलटण, श्री.अरूण गोडबोले, सातारा, प्रा.डॉ.सुरेश गायकवाड, सातारा, प्रा.एम.जे.जाधवे, फलटण, सौ.उषा कोल्हटकर, सातारा, श्री.मधुकर विष्णू कोल्हटकर,सातारा, श्री.व्दारकानाथ लेले, सातारा, डॉ.राजेंद्र माने, सातारा, श्री.लक्ष्मण माने, सातारा, श्री.मधुसुदन नेने, वाई, श्री.बजरंग शेलार, सातारा, डॉ.आ.ह.साळुंखे, सातारा, प्रा.संभाजीराव पाटणे, सातारा, श्री.यशवंत पाटणे, सातारा, श्री.जगन्नाथ शिंदे , सातारा, श्री.मोहन सरडे, कराड, प्रा.सुहास साळुंखे, सातारा, श्री.शंकर सारडा, सातारा, डॉ.रामचंद्र साळुंखे, शिवथर, डॉ.उमेश करंबळेकर, सातारा, प्राचार्य मा.के.यादव, सातारा, श्री.प्रमोद कोपर्डे, सातारा, श्री.किशोर बेडकीहाळ, सातारा, डॉ.दत्तप्रसाद दाभोळकर, सातारा, डॉ.संदीप श्रोस्त्री, सातारा, श्री.आदित्य फडके, सातारा, श्री.शाम मनोहर, सातारा, श्री.महालिंग मेनकुदळे, सातारा, डॉ.हमिद दाभोळकर, सातारा, श्री.रविंद्र बगाडे, वाई, प्रा.महादेव बरसावडे, श्री.दत्तात्रय हर्षे, सातारा, श्री.श्रीधर दाढे, औंध, श्री.तर्कतीर्थ

लक्ष्मणशास्त्री जोशी, श्री.बाबूराव गोखले, श्री.यशवंतराव चव्हाण, श्री.श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, श्री.ना.ह.आपटे इत्यादी.

## साहित्यसंमेलन

मराठी साहित्य संस्कृती केवळ मोठमोठया नगरांमध्ये किंवा शहरांमध्ये मर्यादीत न राहता महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पसरावी आणि सर्व थरातील स्थानिक आणि नवोदीत लेखक तसेच कवींना प्रकाशात येण्याची संधी मिळावी; ज्या साहित्यीकांचे लेखन मासिके आणि ग्रंथांमधून वाचनात येते त्यांना प्रत्यक्ष पाहणयाची संधी वाचकांना मिळावी यासाठी साहित्यसंमेलनांचे आयोजन करण्यात येते.साताऱ्यात झालेली सर्व संमेलने ही प्रासंगिक, उत्सवी तर काही गंभीर होती. या साहित्य संमेलनांनी सातारमध्ये वैचारीक प्रगल्भता निर्माण केल्याचे चित्र समोर उभे राहते.

सातारा जिल्हयात वैयक्तिक साहित्यनिर्मीती, वैचारीक लेखन आणि संपादन करणारे अनेक व्यक्तिमत्वे असूनही साहित्य क्षेत्रातील संमेलनांची संख्या मात्र मर्यादीत आहे.सन १९६० पासून अगदी सन २००५ पर्यंत सातारा जिल्हयात सातारा आणि कराड येथे दोन वेळा अखिल भारतीय साहित्य संमेलने झाली. कराडच्या ‘चौफेर’ संस्थेने घेतलेले पहिले लेखिका संमेलन, शंकर सारडांच्या पुढाकाराने झालेली सातारा व कराड येथिल बालसाहित्य संमेलने, १९९३ च्या साहित्य संमेलनाच्या उर्वरित निधीतून झालेले अभिजात साहित्य संमेलन, विद्रोही चळवळीचे संमेलन, विचारवेध संमेलन, लक्ष्मण मानेंच्या फुले–आंबेडकर पंचायतीच्यावतीने झालेले दलित साहित्य संमेलन, राजेंद्र कुंभारांचे आपले साहित्य संमेलन इतकी मोजकीच संमेलने या ४५ वर्षात जिल्हयात झाली.[३०]

## प्रकाशन संस्था :

सातारच्या साहित्य परंपरेचे एक दुर्दैव म्हणजे सातारला एवढया मोठया प्रमाणावर वाचक वर्ग असूनही सातारमध्ये एकही नामवंत प्रकाशन संस्था निर्माण झाली नाही आणि ज्या निर्माण झाल्या त्या रूजल्या नाहीत. सातारा जिल्हा हा मुख्यत्वे ओळखला जातो तो सहकारी तत्वांवर आधारित कार्यासाठी मात्र या क्षेत्रात कोणी सहकारी तत्वांवरसुध्दा मोठया प्रमाणावर काम केल्याचे दिसत नाही. याला लोकव्रत प्रकाशनाचाच तेवढा अपवाद आहे. काही किरकोळ

अपवाद वगळता या जिल्हयामधील प्रकाशनाची कामे ही संस्थांतर्गत न होता व्यक्तिकेंद्रित झालेली आहेत. अगदी आ.ह.साळूंखे किंवा अरूण गोडबोले यासारख्यांना आपले लेखन आपल्या स्वतःच्या प्रकाशनाव्दारेच प्रकाशित करावे लागते.

**कवी**

**बाळ सीताराम मर्ढेकर**

बाळ सीताराम मर्ढेकर उर्फ बा.सी.मर्ढेकर यांचा जन्म १ डिसेंबर १९०९ हे मराठी कवी व लेखक होते. त्यांना मराठी नवकाव्याचे प्रवर्तक मानले जाते. मर्ढेकरांच्या कवितेतून निराशा व वैफल्य प्रगट होते. याचे कारण असे सांगितले जाते की, दुसऱ्या महायुद्धानंतर जी परिस्थिती निर्माण झाली. जीवनात जी नीरसता व कृत्रिमता आली आणि युद्धात जो मानव संहार झाला तो पाहून त्यांचे मन विषण्ण झाले. त्यावर काही उपायन सल्यामुळे त्यांच्या मनातील विफलता काव्यातून उमटली. बा.सी.मर्ढेकर हे भाषाप्रभू होते. त्यांच्या काव्यात आशय आणि अभिव्यक्ती यांचा सुसंवाद आढळतो. परंपरागत सांकेतिक उपमान  व प्रतिमान वापरता त्यांनी नव्या प्रतिमांचा उपयोग केला. त्याचबरोबर ते आपल्या अनुभूतीशी प्रामाणिक राहीले. बा.सी.मर्ढेकरांचे काव्य वेदनेचे काव्य आहे. रात्रीचा दिवस/ तांबडी माती, पाणी, सौंदर्य आणि साहित्य, कला आणि मानव आदी त्याचे गाजलेले कवितासंग्रह आहेत. त्यांना १९५६ चा साहित्य अकादमीचा पुरस्कार ‘सौंदर्य आणि साहित्य’साठी पुरस्कार मिळालेला आहे.[३१]

**अशोक नायगावकर**

अशोक नायगावकर यांचा जन्म २९ डिसेंबर १९२७ रोजी झाला. त्यांनी बी.कॉम. पदवीपर्यत शिक्षण केले. शिक्षणानंतर त्यांनी बँक ऑफ बडोदा या बँकेत ३१ वर्षे नोकरी केली आणि मग स्वेच्छानिवृत्ती घेतली. अशोक नायगावकर हयांची खालील पुस्तके प्रसिद्ध झालेली आहेत. त्यांनी सप्टेबर १९९२ मध्ये ‘वाटेवरच्या कविता’ आणि जुलै २००१ ‘कवितांच्या गावा जावे’ या कवितासंग्रहाचे संपादन केले आहे.[३२]

**यशवंत**

आधुनिक मराठी कवी परंपरेत राजकवी यशवंत यांना महत्त्वाचे स्थान आहे. रविकिरण मंडळातील सप्तर्षीमध्ये माधव जुलियन सोबत यशवंत यांच्या नावाचा अग्रक्रमाने उल्लेख केला जात असे. बडोदा संस्थानाचे राजकवी यशवंत उर्फ यशवंत दिनकर पेंढारकर यांचा जन्म

सातारा जिल्हयात चाफळ येथे ९ मार्च १८९९ रोजी झाला. त्यांचे बालपण तेथेच गेले. आपण चाफळचे रहिवाशी आणि मध्ययुगिन कालखंडात सांस्कृतिक उत्थानासाठी भरीव कार्य केलेले समर्थ रामदार चाफळचे, या योगायोगाबद्दल त्यांना अत्यंत अभिमान वाटायचा. यशवंतांच्या लौकिक जीवनाचा मार्ग अत्यंत खडतर होता. शालेय शिक्षणास ते सांगलीला राहिले. तेथील सिटी हायस्कूलमधून डिपार्टमेंट स्कूल फायनलच्या परीक्षेत ते उत्तीर्ण झाले. पुढचे शिक्षण प्रतिकूल परिस्थितीमुळे त्यांना घेता आले नाही. त्यातही जमेची बाब ही की त्या शाळेतील शिक्षक, नामवंत कवी आणि कादंबरीकार साधुदास उर्फ गो.गो.मुजुमदार यांच्या व्यक्तिमत्वाचा प्रभाव यशवंतांवर पडला.

यशवंताच्या प्रेम कवितेत प्रीतिसाफल्य, तिची विफलता, मृत्यूवर मात करणारे तिचे चिरंजिवीत्व इत्यादी छटांचे चित्रण आढळते. त्यांच्या प्रेम कवितेवर रविकिरण मंडळीतील कवींचा ठसा उमटलेला दिसतो. केवळ प्रियकराच्या नवथर भावनांचे प्रकटीकरण करण्यात त्यांची प्रतिभा रमत नाही. कल्पना सृष्टीतील प्रेयसीच्या सौंदर्याचे मानसिक चिंतन करण्याची प्रवृत्ति त्यांच्यात आढळते. प्रीतिसंगम, प्रेमाचीदौलत, 'चमेलीचे झेले' मध्ये तीन कविता एकत्र गुंफलेल्या आहेत.

यशवंतांचा काव्य प्रवास हा एका प्रयत्नवादी आणि अनुभवसंपन्न व्यक्तिमत्त्वाच्या जीवन विकासाचा आलेख आहे. १९५० साली मुंबईस भरलेल्या तेहतिसाव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. 'महाराष्ट्र कवी' म्हणून त्यांना गौरवाने उल्लेखले जाते.[३३]

**शंकर केशव कानेटकर**

शंकर केशव कानेटकर उर्फ गिरीश यांचा जन्म २८ ऑक्टोबर १८९३ रोजी झाला. साताऱ्यात जन्मलेल्या कानेटकरांनी फर्ग्युसन व विलींग्डन या कॉलेजातून अध्यापन केले. ते मुधोजी हायस्कूल फलटण या शाळेचे प्राचार्य होते. त्यांनी अनेक प्रसिद्ध कविता फलटण मुक्कामी रचल्या आहेत. नाटककार वसंत कानेटकर व मुंबई आकाशवाणीवरील भूतपूर्व अधिकारी आणि गायक मधुसूदन कानेटकर ही यांची मुले होत. शंकर केशव कानेटकर उर्फ कवी गिरीश यांचा मृत्यू १९७४ साली झाला. बालगीत, कांचनगंगा, फलभार, चंदलेखा आणि

सोनेरी चांदणे हे त्यांचे गाजलेले काव्यसंग्रह तसेच कवी यशवंत आणि गिरीश यांच्या कवितांचे एकत्रित 'वीणाझंकार' व यशागौरी' हे संग्रह आहेत.[३४]

**नाटयक्षेत्र**

**सातारा :**

सातारा शहर आणि जिल्हयाच्या रंगभूमीला प्रदीर्घ इतिहास आहे. सामाजिक, ऐतिहासिक व लोकरंजनात्मक हौशी नाटके सादर करणाऱ्या रंगकर्मी व काही रंगधर्मी सातारा जिल्हयात सत्तर व ऐंशीच्या दशकात मोठया प्रमाणात निर्माण झाले. पन्नास व साठीच्या दशक सातारच्या रंगभूमीचा रचनात्मक पाया घालणार सुवर्णकाळ होता. 'अभिनव कलामंदिर' आणि 'कलामंदिर' या संस्थांनी ऐतिहासिक व सामाजिक नाटके सादर केली. शां.गो.गुप्ते हे नाटककार दिग्दर्शक व आधुनिक रंगभूमीचा पाया रचणारे आद्य जनक म्हणता येतील. पन्नाशीच्या दशकात केवळ ऐतिहासीक नाटके सादरीकरणाच्या गर्तेत अडकलेल्या रंगभूमीला स्वतंत्र सामाजिक विषय व आशय देऊन नाटके लिहीली व सादर केली. याच काळात काशिनाथपंत आपटे यांनी अनेक ऐतिहासिक व सामाजिक नाटके सादर केली.

साठीच्या दशकानंतर मात्र सातारच्या रंगभूमीला उतरती कळा लागली आणि अभिनव कलामंदिर संस्थेची नाटय धडपड थंडावली. पुढे सन १९७२–७३ साली शाम भुर्के, संजय कोल्हटकर, विलास वंजारी, दत्ता भिडे, संजय पारंडेकर आदी मंडळींनी पुन्हा रंगभूमीला नवा आयाम दिला. याचकाळात ॲड.मनोहरपंत भागवत, तात्या कुलकर्णी, बबनराव वराडेकर, राजाभाऊ बंड आणि सौ.रेखा बंड यांनी अव्दैत रंगभूमीची स्थापना व अव्दैत रंगभूमीचे पुनरूज्जीवन केले. यांच्यानंतरच्या काळात मी एक नटसम्राट, फुटपाथ, क्रांतीसिंह, यासारख्या एकांकिकांनी दिलीप आंबेकर यांना नावलौकिक मिळवून दिला. सत्तरच्या दशकात साताऱ्याने पुर्नउभारणी घेतल्यानंतर साधारण ७६–७७ वर्षापासून जो नाटय विचार सूरू झाला, त्यातूनच साताऱ्याचा नाटयब्रँड विकासित झाला.

सुनिल कुलकर्णी व सुधीर माजगांवकरांमुळे अभिनव कला मंदिराची वाटचाल जोमाने सुरू असताना, नाटक ही गांर्भियाने सादर करण्याची कला आहे हा विचार दृढ होत असताना सुनिल कुलकर्णी तुषार भद्रे सयाजी शिंदे यांनी विविध एकांकिकांच्या प्रयोगाने मॉडर्न थिएटरची जाणीव साताऱ्यात प्रगल्भ होत असताना रविंद्र डांगे, माधव सोळसकर, मधू फल्ले, सुजित

शेख, रमेश कदम, बापू आफळे, नयन मंत्री, हेमांगी डांगे आदी नवोदय कलाकारांचा उदय होत असताना अभिनव कला मंदिर संस्था फुटली आणि ती तीन संस्थांत विभागली गेली.रवी डांगे व सुधिर माजगांवकर यांनी थिएटर वर्कशॉप सुरू केले तसेच दिलीप आंबेकर, शिरीष चिटणीस, शेखर कुलकर्णी यांनी नाटयासक्त संस्था सुरू केली. तुषार भद्रे मधु फल्ले, माधव सोळसकर, बापू आफळे, सयाजी शिंदे, सुजित शेख, प्रमोद कोपर्डे आणि कै.विलास ढाणे यांनी 'लोकरंगमंच' संस्थेची स्थापना केली.[३५]

थिएटर वर्कशॉप संस्थेच्या माध्यमातून रवी डांगे, नंदू पाटील अशोक शिंदे यांनी महाराष्ट्रभर साताऱ्याचे नाव गाजवले. शेखर कुलकर्णी या ताज्या दमाच्या रंगकर्मीने अख्खा ग्रुप घडवला त्यांना शिरिष कुलकर्णी यांनी समर्थ साथ दिली. याच दरम्यान 'नाटयदीप' संस्थेव्दारा रविंद्र इनामदारांनी साता–याचा दबदबा वाढवला. लोकांनी लोकांच्या प्रश्नासाठी सुरू केलेली नाटयचळवळ हे ब्रिदवाक्य घेऊन 'लोकरंगमंच'ने वाटचाल सुरू केली.

१९९७–९८ पर्यंत लोरंगमंचने जे जे उपक्रम केले त्यातून साताऱ्याच्या नाटयचळवळीला गतीमान केले. व्यवस्थापन तंत्र मधू फल्ले, प्रकाश योजना वासुदेव शेटे, नेपथ्य कै. आशिष नांदगांवकर, रंगभूषा कुमार भुरके, लोककला सुजित शेख, लोकसंगीत राजीव मुळये असे अनेक तज्ञ साताऱ्यात निर्माण झाले. कल्याण राक्षे, सोनाली पंडीत, वैशाली घाडगे, मधू फल्ले, शशी गाडे, श्रीकांत शहा, अतुल कुलकर्णी, बाळकृष्ण शिंदे, किरण माने, दीपक इंगळे, मिनिष उमाराणी या नव्या कलाकारांना नवे आकाश निर्माण केले. पुढे फोर्ड फांउडेशनच्या शिष्यवृत्तीतून भद्रे यांनी लिहिलेले नाटक 'कारान' ने पुणे–मुंबईच्या नाटय चळवळीला साताऱ्याची दखल घ्यायला भाग पाडले. भूमितीचा फार्स या नाटकाने राज्य नाटय स्पर्धेत अंतिम फेरीत दुसरा क्रमांक मिळवून इतिहास रचला. गजर नाटकाच्या निमित्ताने वैशाली घाडगे ही साताऱ्याची पहिली महिला दिग्दर्शिका म्हणून उदयास आली. अजय मोरे, राजू शेळके, मनोज तिवारी, किशोर रावखंडे, सबनिस आढाव यांनी नाटय वाटचाल सुरू केली. दिपक खांडके या सारखा गायक नट याच लोकरंगमंचमुळे प्रकाशात आला. गुणी कलाकार संतोष पाटीलने नाटयक्षेत्रातील वाटचाल येथेच सुरू केली. आशा व विजयश्री टोपे यांनी धाडसी कलाकृती सादर केल्या. मात्र एवढे होत असतानाही सन १९९७–९८ ला लोकरंगमंचाने विराम घेतला.[३६]

लोकरंगमंचची चळवळ विराम पावली असताना तोच विचार 'लोकायत'च्या माध्यमातून राजीव मुळ्ये, चंद्रकांत कांबिरे, दिलीप आफळे यांनी पुढे नेला. पुढे लोकायतही बंद पडली परंतु तरीही लोकरंगमंचचा विराम भरून काढण्याचे काम किरण माने यांनी 'सारांश सातारा'च्या माध्यमातून सुरू ठेवले. साताऱ्याच्या नाटय चळवळीला लाभलेले आणखी एक बिनिचे शिलेदार म्हणजे सतीश आपटे, ज्यांनी अभिनव कलामंदिराचा विचार आजही जपलेला आहे. याचप्रमाणे रघुविर आपटे यांनी एसटी महामंडळातील कामगार कलावंतांमधून अप्रतिम नाटयनिर्मिती केली. प्रदीप गोसावी, अशोक मुढेकर, सतीश कुलकर्णी, दीपक इंगळे यांनी अव्दैत रंगभूमीच्या माध्यमातून अनेक नाटनिर्मिती केलेली आहे. गणेश ईनामदार, विश्वनाथ दीक्षित यांनी सादर केलेल्या दर्जेदार एकांकिका, विजय गाडवे यांची नाटके या सर्व बाबीही अत्यंत महत्वाच्या आहेत.[३७]

डॉ.इ.के.माजगांवकर, विश्वास दांडेकर, बाबा कदम, पी.अनंत, संजय कोल्हटकर, रमेश (तात्या) कुलकर्णी, राजाभाऊ बंड ही मंडळी साताऱ्याच्या रंगभूमीचा ठेवा आहेत. या सर्व चळवळीत रंगपीठ उपलब्ध करून देणारे उपक्रम व संयोजक यांचाही उल्लेख ऐतिहासिक दृष्टया गरजेचा आहे. यामध्ये वाईची प्रतीक करंडक स्पर्धा, गोंदवल्याची नाटय स्पर्धा, अभिनव कला मंदिराची एकांकिका स्पर्धा, शामण्णा शानभाग एकांकिका स्पर्धा व रमेश शानभाग, ऐक्य करंडक एकांकिका स्पर्धा व कै.सुरेश पळणिटकर, सायक्लो करंडक एकांकिका स्पर्धा व सुनिल अराणके, पांडूरंग शिंदे, समर्थ एकांकिका स्पर्धा व राजेश मोरे, शेखर कुलकर्णी आणि शिरीष चिटणिस या स्पर्धा व संयोजकांचे नाटय चळवळीत फारच मोठे योगदान आहे.[३८]

**वाई :**

वाईच्या प्रतीक थिएटर्सची स्थापना सतिश शेंडे, बंडू गोरे, प्रदीप पाटणककर, सतिश खरे, यशवंत ओतारी, जयप्रकाश काप्रे यांनी केली आणि प्रतीक करंडक एकांकिका स्पर्धा सुरू केली. या स्पर्धेतूनच तुषार भद्रे, प्रा.दिलीप जगताप यासारखे लेखक निर्माण झाला. यानंतर हौशी रंगभूमी रिटायर्ड झाली. केवळ हौस म्हणून नाटक करणारे या स्पर्धेत टिकले नाहीत. शिवाजीराव जगताप, रमाकांत वाघचौरे, सॅमसन समुद्रे, जॉन फणसे, भगवान सुर्यवंशी यांना सोबत घेऊन प्रा.दिलीप जगताप 'गेट टुगेदर सहकारी नाटक कारखाना' वाईत सुरू केला. याच कालखंडात सतिश खरेंची संकेत थिएटर्स वाईच्या नाटयक्षेत्रात कार्यरत झाली. राज्य नाटय

स्पर्धेच्या अनागरी स्पर्धा विभागात प्रतिक थिएटर्सचे नाटक प्रथम आले. यामुळे राज्य नाटय स्पर्धा जिंकणारी संस्था म्हणून सातारा जिल्हयात प्रतिक थिएटर्सचे नाव झाले. यानंतर मात्र वाईच्या नाटयक्षेत्राला पुन्हा उतरती कळा लागली. ही पोकळी भरून काढण्याचे काम सन १९९६–९७ साली वाईत युनूस पिंजारी, केदार शिंदे, व संतोष पवार यांनी केले.[३९]

**कराड**

कऱ्हाडच्या 'रसगंध' संस्थेची स्थापना सी.व्ही.व व्ही.एस.कुलकर्णी आणि मंदार कुलकर्णी यांनी केली. 'अदाकार' या संस्थेची स्थापना जुगल किशोर ओझा यांनी केली. या दोन्ही संस्थांनी कऱ्हाडच्या रंगभूमीला नवे पैलू पाडले. रसगंध नंतर कऱ्हाड शिक्षण मंडळाच्या माध्यमातून मुकुंदराव कुलकर्णी यांनी अनेक दिग्गज नाटककारांची सामाजिक व ऐतिहासिक नाटके साकारली. कऱ्हाडचे आणखी दुसरे योगदान म्हणजे काका करंबळेकर सांस्कृतिक मंडळ आणि पी.डी.पाटील प्रतिष्ठान यांनी चालवलेल्या यशवंतराव चव्हाण स्मृती सुवर्ण चषक एकांकिका स्पर्धा होय.

सातारा जिल्हयात १९५८ मध्ये ४० वे आणि १९९० मध्ये ७१ वे अखिल भारतीय नाटय संमेलन आयोजित करण्यात आले होते. तसेच कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आलेल्या सन १९४९ साली, सन १९७१ साली कुर्ला येथे झालेले अखिल भारतीय नाटय संमेलन याचे अध्यक्ष वसंतराव कानेटकर, मुंबईला झालेले सन १९८० साली साठावे अखिल भारतीय नाटय संमेलनाचे अध्यक्ष छोटा गंधर्व, सन १९८७ साली चित्तरंजन कोल्हटकर आणि मुंबई येथे झालेले सन १९८९ सालचे अखिल भारतीय नाटय संमेलनाचे शाहीर कृष्णराव साबळे यांनी सातारा जिल्हयाचे नाव महाराष्ट्राच्या नाटयक्षेत्रावर आपले नाव कोरलेले दिसते.[४०]

**नाटय क्षेत्रातील महत्त्वपूर्ण व्यक्ती**

सातारा जिल्हयाच्या नाटयक्षेत्रात ज्यांनी बहुमोल असे योगदान दिलेले आहे असा काही व्यक्तिंचा येथे उल्लेख होणे क्रमप्राप्त आहे ही व्यक्तीमत्त्वे पुढीलप्रमाणे–

**रविंद्र सदाशिव भट**

रविंद्र सदाशिव भट यांचा जन्म १७ सप्टेंबर १९३९ रोजी वाई येथे झाला. मराठी संतांचे चरित्र कादंबऱ्यातून रेखाटणारे लेखक प्रसिद्ध कवी नाटककार पटकथाकार होते. त्यांनी महाराष्ट्र साहित्य परिषेदेचे प्रमुख कार्यवाह म्हणून काम पाहिले होते. यांचा मृत्यू २२ नोव्हेंबर

२००८ रोजी पुणे येथे झाला. यांच्या प्रमुख गाजलेल्या कादंबऱ्या पुढीलप्रमाणे आहेत. इंद्रायणी काठी, सागरा प्राण तळमळला, भेदीले सूर्य मंडळा, भगीरथ, अनादिमी अनंतमी, घरटयात मी एकटा, देवाची पावले, आभाळचे गाणे, सत्यम शिवम सुंदरम, घास घेई पांडुरंगा, एका जनार्दनी हे चि दान देगा देवा, योग सुखाचे सोहळे, ज्ञान देवा डोळा पाहूचला, कृष्णाकाठचा भुत्या, सारी पावले मातीचीच असे संसार संसार, केल्याने होत आहेरे, अवघी दुमदुमली पंढरी, एका जनार्दनी इत्यादी होत. त्याचप्रमाणे त्यांची गाजलेली नाटके पुढीलप्रमाणे आहेत. असा नवरा नको ग बाई, एक कळी फुललीच नाही. याचप्रमाणे त्यांनी अनेक कविता केलेल्या आहेत. मोगरा फुलला, ओठावरचे गाणं, जाणता अजाणता, मन गाभारा गाभारा, खुर्ची, मोगरा फुलला, दीनांची माऊली या काही त्यांच्या गाजलेल्या कविता आहेत. त्यांनी बालसाहित्याचे लेखन केलेले आहे. जय गंगे भगीरथी, स्वातंत्र्यवीर, जय ज्य रघुवीर समर्थ, संत एकनाथ, संत तुकाराम, संत नामदेव, विवेकानंद, कथा समर्थाच्याही त्यांची गाजलेली बालसाहित्य आहेत. याच्याशिवाय त्यांनी काही चित्रपटांचेही लेखन केलेले आहे. ते माझे घर, गोविंदा गोपाळा, नसती उठाठेव या चित्रपटांच्या कथा पटकथा त्यांनी लिहीलेल्या आहेत.[४१]

**वसंत शंकर कानेटकर**

वसंत शंकर कानेटकरांचा जन्म २० मार्च १०२० रोजी सातारा जिल्हयातील रहिमतपूर येथे झाला. मराठी भाषेतील कवी गिरीश त्यांचे वडील होते. प्रा.वसंत कानेटकर यांचे अखेरपर्यंत वास्तव्य नाशिक येथील शिवाई बंगला येथे होते. त्यांनी प्रिन्सिपल गोखले एज्युकेशन सोसायटीच्या महाविद्यालयात अध्यापनाचे काम अनेक वर्षे केले. कानेटकरांनी ४० नाटके व ३ कादंबऱ्या लिहिल्या. त्यांची नाटके व्यावसायिकदृष्टया खूप यशस्वी झाली. अखेरचा सवाल अश्रूंची फुले, इसे ओशाळला मृत्यू, कवी आणि कवित्व, जिथे गवतास भाले फुटतातदोन ध्रुवांवर दोगे आपण नल दमयंती, प्रेमाच्या गावा जावे, प्रेमा तुझा रंग कसा, मत्सगंधा, मास्तर एके मास्तर, रायगडला जेव्हा जाग येते. लेकुरे उदंड झाली, शिवशाहीचा शोध, सूर्याची पिल्ले इत्यादी त्यांची काही महत्वाची गाजलेली नाटके आहेत. प्रा.वसंत कानेटकर यांनी इ.स.१९८८ साली ठाणे येथे झालेल्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद भुषवले होते. वसंत कानेटकर यांच्या नावाने रंगत संगत प्रतिष्ठान तर्फे वसंत कानेटकर स्मृति पुरस्कार दिला जातो. अशा या मराठी नाटककाराचा मृत्यू ३१ जानेवारी २००१ रोजी झाला.[४२]

**नितीन बानुगडे पाटील**

नितीन बानुगडे पाटील यांचा जन्म १०.०५.१९७७ रोजी झाला. नितीन बानुगडे पाटील हे प्रसिद्ध मराठी लेखक, वक्ते, नाटककार व भौतिकशास्त्राचे प्राध्यापक आहेत. नितीन बानुगडे पाटील हे सातारा जिल्हयातील रहिमतपूर येथील पंचक्रोशी शिक्षण संस्थेत प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. त्यांची शिवाजी महाराज, संभाजी महाराज, जगणं समाजासाठी, आई यांसारख्या विषयावरील व्याख्याने गाजली आहेत. त्यांचे छत्रपती शंभूराजे हे मराठीतील महानाटय प्रसिद्ध आहे. या नाटकाचे दिग्दर्शनी त्यांनी केले आहे. इ.स.१९९२ मध्ये त्यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले आहे.[४३]

**पारंपारीक कला**

**तमाशा**

तमाशा हा गायन, वादन, नृत्य यांनी युक्त असलेला लोकनाट्याला एक आविष्कार आहे. तमाशा हा शब्द मूळ अरबी असून, त्याचा अर्थ दृश्य, खेळ या नाटय्प्रयोग असा आहे. तमाशाचे खेळ(प्रयोग) गावोगाव असणाऱ्या जत्रात, उघडयावर किंवा तंबूत होत असतात. त्यामुळे प्रयोगाला फारसे नेपथ्य लागत नाही. तमाशात काम करणारी पुरूष पात्रे नेहमीच्याच वेशात असतात. तर स्त्रीपात्राची वेशभूषा शक्य तितकी आकर्षक व उद्दीपक असते. तमाशातले गायक, वादक, सुरत्ये(सुरत्या–गायनात सूर देऊन साथ करणारा) व नर्तकी सदैव मंचावरच असतात. या मंचाला तमाशाच्या भाषेत 'बोर्ड' म्हटले जाते. गायनाला ढोलकी, कडे, झांज, बाजाची पेटी आणि ट्रॅंगल यांची साथ असते. तमाशाच्या एका खेळामध्ये गण–गौळण, रंगबाजी आणि वग असे तीन प्रकारचे नाटय असते.

गण म्हणजे गणपतीला केलेले आवाहन. तमाशाचा खेळ निर्विघ्नपणे पार पडावा म्हणून तमाशाचा सरदार म्हणजे मालक हे आवाहन करतो, सर्व साथीदार चढया आवाजात ध्रुपद आळवतात आणि सुरत्येध्रुपदाचा अंतिम सूर झेलून उंचावर नेतात.

**गौळण–**

गण संपल्यावर काही काळ ढोलकी व कडे यांचे वादन होते. ढोलक्याची लय पुरेशी अंगात भिनल्यावर तमाशातील स्त्रियांचे नृत्य आणि मग गौळण. गौळणीच्या विषय असतो. श्रीकृष्णाच्या गोकुळातील लीला. नर्तकी या गोपी होतात. आणि त्यांच्यामध्ये वयस्कर असणारी

एक 'मावशी' असते. या गोपी मथुरेला दूध, दही, लोणी वगैरे घेऊन जात असतात आणि वाटेत श्रीकृष्ण आणि त्याचे सवंगडी किंवा पेंद्या त्यांना अडवतो. या पेंद्याचे काम करणारा बहुधा सोंगाडया(हास्यकलाकार) असतो. या वेळेस या दोन पक्षांमध्ये जे विनोदी संवाद होतात ते ऐकून खदखदून प्रेक्षक हसतात. पौराणिक काळाला आधुनिक संदर्भ देऊन केलेला हया गौळणी हास्य व शृंगाररसाने ठासून भरलेल्या असतात.

**सवाल जवाब**

मंचावर जर दोन फडांचे (तमाशा मंडळांचे) तमासगीर एकाच वेळी असतील तर त्यांच्यातील सरस नीरस ठरवण्यासाठी त्यांच्यामधे आपापसात सवाल जवाब होतात. बहुधा पौराणिक कथांवर आधारलेले कूटप्रश्न एकमेकांना काव्यांतून विचारून त्यांची उत्तरे ओळखण्याचा हा कार्यक्रम असतो.

**रंगबाजी**

मंचावर होणारे शृंगारिक लावण्याचे सादरीकरण म्हणजेच रंगबाजी. मंचावर एकापेक्षा अधिक फडांचे तमासगीर असतील तर त्या रंगबाजीला संगीतबारी म्हणतात.

**लावणी–**

लावणी हा महाराष्ट्रातील कलाप्रकार आहे. लावणी कित्येकदा तमाशाचा हिस्सा म्हणूनही सादर करतात. लवण म्हणजे सुंदर. लवण या शब्दावरून लावण्य गति वा लावणी शब्द तयार झाला आहे.(१) लावणी म्हणजे गीत, नृत्य आणि अदाकरी यांचा त्रिवेणी संगम. लावणी शृंगाराची खाण आणि महाराष्ट्राची शान आहे. गावोगावच्या जत्रांमधून, उत्सवामधून लावणी पिढयानुपिढया जनसामान्यांचे रंजन करीत राहिली. यमुनाबाई वाईकर यांना देखील लावणीतील विशेष योगदानाबद्दल संगीत नाटक अकादमी पुरस्कार प्राप्त झाला आहे. त्यांनी बालेघाटी लावणीतला प्रतिष्ठा प्राप्त करून दिली.

**वग**

वग म्हणजे नाट्यरूपाने सादर केलेली कथा. या कथा पौराणिक, ऐतिहासिक किंवा लोककथा असतात. या कथांमधील संवाद लिखित नसून पात्रांनी ते केवळ स्वतःच्या बुद्धीने म्हणायचे असतात. अधूनमधून समय सूचकतेने शेरे मारणारा सोंगाडया इथे महत्त्वपूर्ण भूमिका बजावर असतो. सोंगाडयामुळेच वगाद्वारे सांगितल्या जाणाऱ्या कथा वस्तूला चांगली रंगत येते.

सेंगाडया हा उत्कृष्ट नकलाकार असतो. तो हजरजबाबी असावा लागतो. तो प्रेक्षकांची करमणूक तर करतोच पण त्याचबरोबर समोर घडणारे प्रसंगही खरेखुरे नसून नाटकी आहेत याची जाणीव करून देणे, त्या प्रसंगाची आधुनिक काळाशी सांगड घालणे, सद्य जीवनावर भाष्य करणे, प्रतिष्ठितांचा दंभ स्फोट करणे आणि प्रसंगी सादर होत असलेल्या नाटकाचे विडंबन करणे ही कामेही तो करीत असतो.

सन १८४३ ते सन १९२० हा कालखंड सातारा जिहयातील तमाशाचे सुवार्णयुग म्हटले जाते. या कालखंडात साता–यात अनेक वगनाटये उदयास आली. या काळात तमाशाने मराठी लोकवाङ्‌मयात मोलाची भर घातली.यानंतरच्या काळात जुन्या तमासगिरांबरोबर अनेक नवे लोक निर्माण झाले. त्यात सातारा जिल्हयातील कांताबाई सातारकर,साहेबराव नांदवळकर, यमुनाबाई वाईकर असे अनेक गाजलेले तमासगीर होत.[४४]

**कांताबाई सातारकर :**

या महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध लावणी गायिक होत. त्यांना लावणी सम्राज्ञी म्हणून ओळखले जाते. पुणे, मुंबई, नाशिक, बार्शी सोलापूर, पंढरपूर, नागपूर तेथे बेळगाव आणि कोकण असा सारा उभा–आडवा नाटय आणि संगीत गावोगावच्या रसिकांना अनुभवायला मिळाले आहे.

**यमुनाबाई वाईकर–**

यमुनाबाई वाईकर यांचे मूळ नाव यमुना विक्रम जावळे. त्या रहात असलेली वाईची ही कोल्हाटी समाजाची वस्ती म्हणजे एक लोककलेचे माहेरच होते. यमुना, तारा, हिरा या तीन बहिणी. आईचे नाव गीताबाई त्याही गायच्या. यमुनाबाई दहा वर्षाच्या असतानाच आपल्या दोन लहान बहीणींना घेऊन गावोगाव तमाशाच्या फडाबरोबर हिंडू लागल्या. रंगू–मंगू सातारकर यांच्याकडे त्यांना तमाशातले गाणे आणि अभिनयाची अदाकारी यांचे धडे मिळत राहिले. कासू–वारू आणि यमुना–हिरा–तारा–वाईकर असे एकेकाळाचे गाजलेले फड होते. अभिनय हा अंगभूत गुण असल्याने लोकनाटयात यमुनाबाई वाईकर नाटकाकडे वळल्या. त्यांनी भावबंधन, मानापमान आदी संगीत नाटके सादर केली. त्यांची संशयकल्लेळ' नाटकातील भूमिका नाटयवेडया रसिकांच्या खास पसंतीस उतरली होती. त्यांनी 'धर्मवीर संभाजी' 'मोहित्यांची मंजूळा' आणि महारांची पोर' या अन्य नाटकामध्ये भूमिका केल्या. 'महाराची पोर' नाटक बघावयास सानेगुरूजी आले होते. या प्रयोगाचे सर्व उत्पन्न यमुनाबाईनी गुरूजींच्या

समाजकार्याला दिले होते. गावागावातून पोटासाठी कला प्रदर्शन करणाऱ्या आपल्या कोल्हाटी समाजाला स्थैर्य यायला हवेयाची जाणीव यमुनाबाई वाईकरांना सतत सतावत होती. वाईच्या मध्यभागातली आणि कृष्णातीरावरची पाले उठली पाहिजेत. आपल्या समाजबांधवांना भिंतीचे घर हवे असे विचार मनात येत राहिले आणि यमुनाबाई वाईकरांनी समाजसाठी हौसिंग सोसायटी निर्माण केली. पोटासाठी भीक मागणाऱ्या आणि रस्तोरस्ती गल्ली बोळात गाण्यांची तान मारत हिंडत राहिलेल्या आपल्या भगिनींना यमुनाबाई वाईकरांनी घरे दिली होती. यमुनाबाई वाईकरांना मध्यप्रदेश शासनाचा राष्ट्रीय देवी अहिल्या सम्मान हा इ.स.१९९९–२००० सालचा पुरस्कार मिळाला. यमुनाबाई वाईकरांना भारत सरकारचा पद्मश्री पुरस्कार २०१२ साली मिळाला. लोककलेसाठी आयुष्य वेचणाऱ्या प्रेक्षकांच्या मनोरंजनासाठी एकेकाळी रात्रंदिवस मेहनत करणाऱ्या पैशापेक्षा कलेला अधिक महत्त्व देणाऱ्या प्रसिद्धीपासून दूर राहणाऱ्य, पण सध्या दुर्लक्षित असलेल्या वीसहून अधिक कलावंताचा सत्कार, 'पवळा पठ्ठे बापूराव संगीत लोककला आणि साहित्य अकादमी यांच्या वतीने आणि महाराष्ट्र सरकारच्या सांस्कृतिक विभागाच्या राज्यमंत्री फौजिया खान यांच्या हस्ते १५ मे २०१२ रोजी करण्यात आला. त्या समारंभामध्ये पद्मश्री पुरस्कार विजेत्या लावणी सम्राज्ञी यमुनाबाई वाईकर यांचा विशेष गौरव करण्यात आला. याचप्रमाणे इ.स.२०१२ सालचा संगीत नाटय अकादमीचा रवींद्रनाथ टागोर रत्न पुरस्कार संगीत कला केंद्राच्या वतीने दिला जाणारा 'आदित्य विक्रम बिर्ला कला शिखर पुरस्कार' लावणी सम्राज्ञी यमुनाबाई वाईकर यांना महाराष्ट्राचे मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या हस्ते नोव्हेंबर २०१२ मध्ये दिला गेला. यमुनाबाई वाईकर यांचे प्रभाकर ओव्हळ यांनी लिहिलेले चरित्र, (लावणी सम्राज्ञी) यमुनाबाई वाईकर' या नावाने कोल्हापूरच्या पारस प्रकाशनाने प्रसिद्ध केले आहे.[४५]

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत तमाशाच्या बाजाने लोकनाटयाच्या रूपाने प्रबोधनाचे कार्य केले. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर या कलेला उर्जितावस्था प्राप्त होऊन गण, गौळण, रंगबाजी, फार्स, वगनाटय, असा तमाशाचा अविष्कारक्रम सुरू झाला. परिणामी उघडया पारावरच्या तमाशास पुण्या–मुंबईच्या थिएटरांमध्ये प्रतिष्ठा लाभली.[४६]

यमुनाबाईच्या प्रेरणेने साताऱ्यात व्दारका सातारकर, अनुसया सातारकर यांचे फड नावारूपाला आले. पुढील कालखंडात रोशन सातारकरांच्या लावण्या व लोकगिते अत्यंत

गाजली.रोशन सातारकर आणि उषा वाईकर यांनी ही लोकनाटय कला जिवंत ठेवण्यात महत्वाची भूमिका बजावलेली दिसते.

**गोंधळ :**

देवीची भक्ती आणि मनोरंजन या दुहेरी हेतूने गोंधळ घातला जातो. मुख्यत्वे लग्न किंवा मुंज अशा प्रसंगी देवीच्या स्मरणार्थ केल्या जाणाऱ्या पद्यात्मक नृत्यास गोंधळ असे म्हणतात. संबळ तुणतुणे या वाद्यांच्या साथीने सादर होणाऱ्या गोंधळाचे रेणूराई आणि कदमराई असे दोन प्रमुख प्रकार आहेत. कदंबाच्या काळापासून गोंधळ महाराष्ट्रात प्रचलीत असून कोल्हापूर, माहुर, तुळजापूर, पुणे, सातारा, सांगली आदि परिसरात रेणूराई गोंधळी आणि कदमराई गोंधळयांची परंपरागत घराणी आहेत.[४७]

**शाहिरी :**

स्वातंत्र्य आंदोलन काळात राष्ट्रीय पोवाडे गाणारे अनेक शाहीर निर्माण झाले.त्यात निनाम–पाडळीचा शाहीर सदानंद प्रसिध्द होता. सत्यशोधक समाजाच्या प्रचारकांनी तमाशा आणि जलशांचे फड निर्माण केले होते. त्यात भाऊ पाटोळे भिलवडीकर यांचा फड खुपच गाजला. स्वातंत्र्य चळवळीत राष्ट्रीय जागृतीचे काम करणाऱ्या शाहिरांना काळाची दिशा पाहूनच कार्य करावे लागले. या काळात सातारा जिल्हयात पसरणीचे शाहिर कृष्णराव साबळे उदयास आले. त्यांनी आपल्या बुलंद वाणीने स्वातंत्र्याचा संदेश गावोगावी पोहचवला. त्यांना 'महाराष्ट्र शाहीर' म्हणून गौरवले असून त्यांचे गर्जा महाराष्ट्र हे गित अतिशय लोकप्रिय झाले. त्यांनी लोकनाटयातील गणगौळण प्रकारास फाटा देऊन मुक्तनाटय हा नवीन प्रकार उदयास आणला. त्यांनी १९४५ मध्ये सातारा जागृती मंडळ स्थापन केले. त्यानंतर शाहीर साबळे आणि पार्टीची स्थापना केली. सन १९५१ पासून लोकनाटयाचे व मुक्तनाटयाचे प्रयोग सुरू केले. याकरीता त्यांनी मोबाईल थिएटरची निर्मीती केली. सन १९८४ मध्ये संगीत नाटक अकादमी पुरस्कार व सन १९८८ मध्ये अमरशेख पुरस्कार मिळाला. सन १९८९मध्ये ७०व्या अखिल भारतीय नाटय परिषदेचे ते अध्यक्ष होते.सन १९८९ मध्ये महाराष्ट्र गौरव सन १९९७ मध्ये रा.ना.गोडबोले ट्रस्टचा 'सातारा भूषण' असे अनेक पुरस्कार मिंळालेले आहेत.[४८]

स्वातंत्र्योत्तर काळात रहीमतपूरचे शाहीर दादूभाई मुल्ला, मसूर–कवठे येथिल दत्तोबा केळसकर, लोणी–भोसरेचे बाळा भिसे, वाई येथील सखाराम सुर्यवंशी, पुसेसावळीचे गजानन

गुरव व लक्ष्मण क्षीरसागर, दीवशी बु.चे लक्ष्मण लोहार हे सर्व शाहीर कलगी शैलीचे शाहीर प्रख्यात झाले तर मसूर चिखलीचे मारूती सावंत, वाईचे सोनबा पवार, अभेपूरीचे दगडू गिमवेकर, शिरवळचे गंगाराम तारू, कराडचे बाबूराव चव्हाण, लोकशाहीर यादव यांनी तुरा शैलीची आपली परंपरा पुढे कायम चालू ठेवली. अखिल भारतीय पातळीवर पोवाडयाच्या लेखन स्पर्धेत याच तुरा परंपरेतील शाहीर रामचंद्र खेडकर(दळवी) यांनी सुवर्णपदक मिळवले. तसेच राज्यपातळीवर कलगी तुऱ्याचे नेतृत्व करणारे शाहीर अप्पासाहेब ईनामदार, पांडूरंग दत्तात्रय खानविलकर, बी.डी.कराडकर, अच्युतराव कोल्हटकर, घनश्याम गणेश दातार, दामूअण्णा एकाबोटे, मारोतराव हळबे, दादा साखवळकर, बाळकृष्ण रामचंद्र जोशी हे ऐतिहासिक पोवाडे गाणरे शाहीर याच सातारा जिल्हयातील होत.[४९]

**चित्रपट :**

अमेरिकन चित्रपटसृष्टीला हॉलीवूड, मुंबईच्या चित्रपटसृष्टीला बॉलीवूड, तेलगू चित्रपटसृष्टीला टॉलीवूड तर सातारच्या चित्रपटसृष्टीला सॉलीवूड या नावाने संबोधले जाते. तुलनात्मक विचार करता हॉलीवूडसारखे सॉलीवूड म्हटले जाणे हे गौरवास्पद आहे आणि असे घडण्यामागे कोणताही राजकीय हात नसून हे आपोआप घडले आहे. याचे कारण म्हणजे इतके वैविध्य असणारा दुसरा जिल्हा नाही. सातारा शहराच्या पश्चिमेकडे कास पठार, महाबळेश्वर, पाचगणी ही निसर्गरम्य स्थळे, तर पुर्वेला वडूज, खटाव, फलटण, हा दुष्काळी, तसेच निमदुष्काळी भाग सातारा शहरापासून जास्तीतजास्त पन्नास कि.मी. अंतरावर निसर्गाची ही विविध टोके. त्याच सोबत कृष्णा, कोयना, वेण्णा या नद्यांचे घाट आणि त्या घाटांवरची प्राचीन मंदिरे, तर वाई, सातारा, फलटण, कराड शहरातील जुने वाडे आणि जुन्या वास्तू, समृध्द आणि शिस्तबध्द खेडी अशा एक ना अनेक गोष्टी सातारमध्ये आहेत ज्यांचे सर्व दिग्दर्शकांना भुरळ पडते आहे.

अगदी सुरूवातीच्या काळात मुख्यत्वे महाबळेश्वर आणि पाचगणी ही चित्रीकरणाची स्थळे होती. सन १९५० च्या काळात राज कपूर आणि नर्गिस यांच्या 'बरसात' या चित्रपटाचे पाचगणीत शूटींग झाले होते. 'गुंज उठी शहनाई'चे माहुलीमध्ये, तर सुनिल दत्त, नर्गिस यांच्या 'मदर इंडीया' चे चित्रीकरण भुईंजमध्ये करण्यात आले होते.[५०]

नट मंडळींमध्ये देव आनंद, राज कपूर, सुनिल दत्त, जितेंद्र, विनोद खन्ना, आमिर खान, शाहरूख खान, सलमान खान, अजय देवगण आदी अनेक हिरो तर नर्गिस, डिंपल कपाडीया, माधूरी दिक्षीत, विद्या बालन, आमिशा पटेल, अशा अनेक हिरॉईन यांनी सातारच्या सॉलीवूडमध्ये हजेरी लावलेली आहे. तर राज कपुर, मेहबूब खान, रोहीत शेट्टी, विशाल भारव्दाज, प्रकाश झा, आशुतोष गोवारीकर, राजकुमार संतोषी, मनिष झा अशा अनेक दिग्दर्शकांनी सातारमध्ये आपल्या अनेक चित्रपटांचे चित्रीकरण केलेले आहे.बिईंग अ सायरस, द विदाऊट गन नावाच्या इंग्रजी आणि पय्या या तेलगू चित्रपटांनीही साताऱ्यात दस्तक दिली आहे. डिस्कव्हरी या चॅनेलसाठीही इनक्रेडेबल इंडीयाचे शुटींग सातारा जिल्हयात झाले आहे.[५१]

मराठी चित्रपटांमध्ये उमेश कुलकर्णी यांचा 'वळू' जब्बार पटेल यांचे 'यशवंतराव, एक होता विदूषक' या सारख्या अनेक चित्रपटंनी चित्रपटसृष्टीवर आपला ठसा उमटवला आहे. मराठी चित्रपट निर्मितीमध्येही सातारा आघाडीवर आहे. 'कशासाठी प्रेमासाठी, नशीबवान, धुमाकुळ' अशा चित्रपटांचे निर्मिती करणारे अरूण गोडबोले, तांबव्याचा विष्णूबाळा, बापू बिरू वाटेगांवकर यांचे निर्माते आण्णा देशपांडे, यांच्याप्रमाणेच दीपक देशमुख, राजू नित देवकर, रमेश शानभाग, अरूण कचरे, प्रसाद सुर्वे, सुश्रुत पुराणिक, आबूभाई शेख, के.ए.मिस्त्री, हेमंत गांधी, दिलीप आंबेकर, अनिल देव, मनू सावंत, डॉ.भाऊसाहेब कणसे, सयाजी शिंदे या मंडळींचाही साताऱ्याचा चित्रपट व्यवसाय वाढवण्यात मोलाचा वाटा आहे.

सातारच्या चित्रपटसृष्टीत लघुपटांचेही योगदान आहे. बाळकृष्ण शिंदे, संयोग माने, अमित देशमुख, अभिजित वाईकर, सागर मोहीते, संदीप कुंभार, संदीप जंगम, वनराज कुमकर, जमीर आतार, केतन हेंद्रे, कैलास जाधव, धस्के, दीपाली आंबेकर–देशमाने, संतोष भंडारे, पृथ्वीराज बर्गे, गणेश वाघ यांनी सातारच्या चित्रनगरीच्या लघुपटांची बाजू सांभाळलेली दिसते. 'शिकार द वाईल्ड हंट' 'टू यू', माय शुज, कॉट नॅपींग, आऊट ऑफ कव्हरेज, इफ द म्युजिकल, एकलव्य, संगी, नाऊ यु, गोल्डन केज, कैफ या लघुपटांनी साता–याला आंतरराष्ट्रीय पातळीवर बहुमान मिळवून दिलेला आहे. थोडक्यात या चित्रपटक्षेत्रातही सातारचे सॉलीवूड आपले नाव कोरत असल्याचे दिसते आहे.[५२]

## क्रीडा

सातारा जिल्हयातील अनेक खेळाडूंनी कबड्डी खो–खो आणि इतर वैयक्तिक खेळांमध्ये जागतिक पातळीवर नावलौकीक मिळवलेला आहे. विविध स्पर्धांमध्ये या खेळाडूंनी भारताचे प्रतिनिधीत्व केलेले आहे. कुस्ती हा क्रीडाप्रकार साताऱ्यात अत्यंत आवडीचा होता.सातारच्या छत्रपतींकडे अनेक नामवंत मल्ल आश्रयास होते. या पैलवानांमध्ये बाबाराया मोहीते, बळीराम चौकवाले, बाबुमियाँ कुरेशी, पापा पैलवान, श्रीरंग जाधव, कोंडीराम शिंगरे, साहेबराव पवार, गणपतराव साठे, बुवा गोसावी, निजाम पैलवान, शंकरराव घाटगे, कृष्णा परखंडीकर, गणपतराव डाळवाले, लक्ष्मण वीरमाडे, दगडू न्हावी, वामन पैलवान, गंगाराम तेली, धन्नु तरडे, गणपत रायगावकर, विठ्ठलराव जाधव, रामू शिवथरकर, शिवराम मोहोर, तुकाराम कामटी, रामचंद्र चव्हाण, रामभाऊ शिंगरे, गणपत काशिद, बाबुराब बर्गे, बाबुराव पवार, बाबू न्हावी, पांडू पैलवान, वामन पवार उंबरडेकर यांचा आवर्जून उल्लेख करण्यात येतो.[५३] गजानन व्यायामशाळेच्या बाळकृष्ण चिंतामण आपटे यांनी जिल्हा पातळीवरील सामन्यात सुवर्णपदक मिळवले होते.[५४] माहुलीचे श्रीरंग विठ्ठल जाधवांनी हेलसिंकी येथे १९५२ साली संपन्न झालेल्या ऑलिंपिकमध्ये भारताचे प्रतिनिधीत्व केले होते. ते बराच काळ महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेचे सचिव होते. रहिमतपूरचे बाबूराव काशिद यांनी मनिला येथील आशियाई स्पर्धेत रौप्यपदक मिळविले.[५५] कुस्ती या क्रीडाप्रकाराला जागतीकस्तरावर मान मिळवून देण्याचे कार्य खाशाबा दादासाहेब जाधवांनी केले. खाशाबा दादासाहेब जाधव यांचा जन्म सातारा जिल्हयातील कराड तालुक्यातील रेठरे येथे १५ जानेवारी १९२६ रोजी झाला. हे ऑलंपिक पदक विजेते मराठी कुस्तीगीर होते. इ.स.१९५२ सालातल्या ऑलंपिकमध्ये त्यांनी जिंकलेले फ्री स्टाइल कुस्तीतले कांस्य पदक हे भारतासाठी स्वातंत्र्योतत्तर काळातले पहिले वैयक्तिक पदक होते. खाशाबा दादासाहेब जाधव इ.स.१९४८ सालातील लंदन उन्हाळी ऑलंपिक स्पर्धामध्ये फ्लायवेट वजन गटातील कुस्तीत सहावा क्रमांक मिळवला. इ.स.१९५२ सालातील हेलसिंकी उन्हाळी ऑ.१९५२ स्पर्धामध्ये ५२ किलोग्रॅम वजन गटात फ्री स्टाइल प्रकारातंर्गत कांस्य पदक जिंकले. यांचा मृत्यू दिनांक १४ ऑगस्ट १९८४ रोजी झाला.

दादा माने व साहेबराव जाधवांनी महाराष्ट्र केसरीचा मान मिळवला. सन १९६२ मध्ये सातारा शहर तालीम संघ स्थापन झाला. कराड व वाई येथेही तालीम संघ कार्यरत झाले. पुढे

सातारा जिल्हयात अनेक मंडळे आणि व्यायाम संस्था स्थापन झाल्या. त्यातून अनेक नामवंत खेळाडू पुढे आले.श्री शिवाजी उदय मंडळ सातारा सन १९४५, भारतमाता मंडळ सन १९४९, पाटण स्पोर्स्टस् असोशिएशन, नवरत्न क्रीडा मंडळ, कराड, लिबर्टी मजदुर मंडळ, कराड अशा अनेक संस्था क्रीडा क्षेत्रात कार्यरत होत्या. सन १९७७ साली साताऱ्याला शाहु स्टेडीयम सुरू झाले आणि क्रीडा क्षेत्राला नवीन उभारी प्राप्त झाली.[५६] देशी खेळात कब्बड्डीमध्ये गणपतराव साठे, शंकरराव गोसावी, करंदीकर गुरूजी, बाबुराव भोसले, बापू यादव, देशमुख बंधू, जयसिंह पाटणकर, किसन जाधव, शंकरराव पेंढारकार, बबनराव उथळे, संपत तारळेकर, डॉ.नरेंद्र दाभोळकर यांनी सातारचा नावलौकीक वाढवला.नरेंद्र दाभोळकर राष्ट्रीय आांतरराष्ट्रीय स्तरावरचे उत्तम कबड्डीपट्टू म्हणून क्रीडा जगतात प्रसिद्ध होते. कबड्डी वर उपलब्ध असलेले एकमेव शास्त्रशुद्ध पुस्तकही त्यांनी लिहिले. कबड्डीपटू श्री.बबनराव उथळे यांच्या शिवाजी उदय मंडळाचे श्री.बबनराव उथळे, कुमार कुलकर्णी, नरेंद्र दाभोळकर, विजय जाधव या खेळाडूंनी शिवछत्रपती पुरस्कार मिळवले.[५७]

खो–खो मध्ये प्रताप लाड, डॉ.मेहंदळे, शशी थोरात, संग्राम उथळे, तर मल्लखांब क्रीडा प्रकारात शिवलिंग साखरे, रघुजी कदम असे अनेक खेळाडू राज्यभर चमकले. नंदा जाधव यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर महीला धावपटू म्हणून आपला नावलौकिक निर्माण केला. याचप्रमाणे व्हॉलीबॉल या खेळात ज्ञानू जाधव, उस्मान महंमद बागवान, आप्पा किसन पवार, आकाराम पाटील यांनी तर कबड्डीमध्ये उस्मान महंमद बागवान, गणेश किराणे तसेच अरविंद फडके खो–खो मध्ये सईद इसाक विजापूरे बास्केटबॉल या खेळांमध्ये राज्य व अखिल भारतीय स्तरावर चमकलेले खेळाडू आहेत. सन १९७६ मध्ये एस.आर. धारवाडकर यांना खो–खो या क्रिडाप्रकारातील उल्लेखनिय कार्याबद्दल महाराष्ट्र शासनाने राज्य पुरस्काराने सन्मानीत केले आहे.[५८]

सन १९३० मध्ये बॅडमिंटन व १९६० च्या सुमारास सातारा जिल्हा क्रिकेट असोशिएशन या खेळांच्या संघटना सातारमध्ये स्थापन झाल्या. त्यानंतर १९७५ ते ८० या कालावधीत टेबल टेनिस, फुटबॉल, अॅथलॅटिक्स, बास्केटबॉल, जलतरण, हॉकी अशा अनेक खेळांच्या संघटना स्थापन झाल्या. सन १९८१ च्या सुमारास छत्रपती शाहु स्टेडीयमच्या मैदानाबाहेर पोलीस मैदानही सुसज्ज झाले.

क्रिकेट, बास्केटबॉल, फुटबॉल, ॲथलॅटिक्स, बॅडमिंटन, जलतरण, अशा अनेक खेळांच्या संघटना सातारा जिल्हयात कार्यरत आहेत. सातारा जिमखाना, अजिंक्य जिमखाना, शिवाजी उदय मंडळ, महात्मा गांधी क्रीडा मंडळ शामसुंदर चॅरिटेबल व रिलिजिअस ट्रस्ट, कऱ्हाड सोशल क्लब, कऱ्हाड जिमखाना अशा अनेक संस्था क्रीडा विषयक प्रशिक्षण शिबीरे, स्पर्धा आयोजित करत. साताराचे अनेक क्रीडा संघटक राज्य कार्यकारीवर नियुक्त झालेले होते. सातारमधील पुरस्कार विजेते खालीलप्रमाणे आहेत.[५९]

श्री.विजय नारायण जाधव, सौ.निलीमा अनिल कदम–तुपल्लीवार, श्री.शिवाजी पांडूरंग पाचपूते, श्री.कुमार अनंत कुलकर्णी, श्रीमती जयश्री पांडुरंग संकपाळ, कै.नंदा जाधव, श्री.प्रभाकर मुरलीधर पाठक, श्रीमती उज्वला उत्तमराव माने, श्री.कैलास भीमराव माने, सौ.माया शिवतेज मोहीते, श्री.विश्वतेज विजयसिंह मोहीते, श्रीमती अर्निका रणजित गुजर, श्रीमती सीमा अरूण लाड, श्री.राजेंद्र उत्तमराव मोहीते, सौ.प्राची निखील थत्ते–वेलणकर, श्रीमती शुभांगी प्रल्हाद कारंडे इ. पुरस्कारप्राप्त क्रीडा संघटकामध्ये श्री.बबनराव उथळे, श्री.आनंद कोल्हापूरे, कै.खाशाबा जाधव, श्री.नरेंद्र दाभोळकर इ.चा समावेश होतो.

**पर्यटन स्थळे**

**प्रतापगड**

प्रत्येकाला अभिमान वाटेल असा इतिहास प्रतापगडाशी जोडलेला सर्वांना ज्ञात आहे. प्रतापगड हा किल्ला महाबळेश्वर तालुक्यात असून शिवरायांच्या पराक्रमाची साक्ष देणारी अफझलखानाची कबरही येथेच आहे. प्रतापगडाची उंची ३५५६ फूट व १४०० फूट लांबी आणि ४०० फूट रूंदी एवढा त्याचा विस्तार आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या आज्ञेनुसार पेशवे मोरापंत पिंगळे यांच्या देखरेखीखाली प्रतापगडाचे बांधकाम झाले. इ.स.१६५६ प्रतापगडाचे बांधकामपूर्ण झाले. दि. १० नोव्हेंबर १६५९ रोजी शिवाजी महाराज आणि अफझलखान यांच्यात प्रतापगडाचे यद्ध झाले. अफझलखानाच्या वधाने राजांचे नाव झाले आणि स्वराज्याच्या पाया मजबूत झाला. इ.स.१६५९ ते १८१८ या प्रदीर्घ कालावधीत इ.स.१६८९ मधील काही महिन्यांचा अपवाद वगळता प्रतापगड शत्रूच्या ताब्यात कधीच गेला नाही.

**प्रतापगड गडावरील पाहण्यासारखी ठिकाणे :–**

वाहनतळावरून गडाच्या दक्षिणेच्या टेहळणी बुरूजाखालून सरळ जाणाऱ्या पायवाटेने आपण गेलो की, थोडया वेळातच तटबंदीत लपविलेल्या पश्चिमाभिमुख महादरवाज्यात येऊन पोहचतो. महादरवाज्यातून आत गेले की उजव्या हाताला चिलखती बांधणीचा बुरूज दिसतो. हा बुरूज पाहून परत पायऱ्यांच्या मार्गाने भवानी मंदिराकडे जाता येते. या मंदिरात भवानी मातेची सालंकृत प्रसन्नमूर्ती आहे. या मूर्तीशेजारीच हा शिवाजीच्या नित्यपूजेतील स्फटिकाचे शिवलिंग व सरसेनापती हंबीरराव मोहिते यांची तलवार आहे. मंदिरासमोरून बालेकिल्लाकडे चालू लागल्यास उजव्या हाताला समर्थ रामदास स्थापित हनुमानाची मूर्ती दिसते. पुढे बालेकिल्ल्याचे प्रवेशद्वार ओलांडल्यानंतर आपन केदारेश्वर महादेवाच्या मंदिराजवळ येऊन पोहचतो. येथे मंदिरात भव्य शिवलिंग आहे. या मंदिराशेजारीच प्रशस्त सदर आहे. केदारेश्वर मंदिराच्या मागील बाजूस राजमाता जिजाबाईच्या वाडयाचे अवशेष आहेत. उजवीकडे बगीच्याच्या मधोमध छ.शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा आहे. या पुतळयाच्या जागीच पूर्वी राजांचा राहता वाडा होता. या पुतळयाशेजारी शासकीय विश्रामधाम असून येथील बागेतून उजव्या बाजूच्या वाटेने तटावर जाऊन तटबंदीवरून फेरफटका मारताना जावळीचे विंगहम दृश्य दिसते. प्रतापगड किल्ल्याला महारादरवाज्याखेरीज घोरपडीचे चित्र असणारा राजा पहाऱ्याचा दिंडी दरवाजा आहे. त्याच्याजवळ रेडका बुरूज पुढे यशवंत ड्ररूज तर त्याच्यापुढे सूर्य बुरूज हे बुरुज आहे.

पुढे असणाऱ्या भवानी मंदिरात सभा मंडप व नगारखाना आहे. मंदिरापासून शे–दोनशे पावले चढल्यावर एक छोटेखानी दरवाजा लागतो आणि तेथून बालेकिल्ल्यात प्रवेश होतो. त्याच्यापुढे एक पडीक चौथरा आहे. इतर गडापेक्षा या गडला विशेष चांगली तटबंदी आहे. वायव्येकडील कडे ८०० फुटाहून अधिक उंच आहेत. बालेकिल्ल्याच्या ईशान्येला दोन तळी आहेत. तेथून कोयनेचे खोरे सुंदर दिसते.

प्रतापगडाला जाण्यासाठी उत्तर सातारा जिल्हयाच्या जावळी तालुक्यात महाबळेश्वराच्या पश्चिमेस ८ मैलावर प्रतापगडाचा डोंगर अआहे. पार आणि किनेश्वर या दोन गावामधला एका टेंभावर या किल्ल्याची बांधणी झाली आहे. महाबळेश्वराहून महाडला जाणारी गाडी कुमरोशी गावाजवळ आली की तेथून अर्ध्या तासाच्या प्रवासात प्रतापगडला जात येते.

त्या गडाच्या खाली डाव्या हाताला एक पायवाट दिसते. दर्गा शरीफकडे जाण्याची वाट अशी पाती दिसते. दर्गा शरीफ म्हणजे अफझलखानाची कबर या गडाला एकच महाद्वार आहे.त्याच्या खालच्या बाजूला वरून आलेले पाणी खाली लोटणारा पावसाळी ओढा आहे. थोडया पायऱ्या चढून गेल्यावर दरवाज्यात उभे राहता येते दरवाज्याच्या आतल्या बाजूला द्वाररक्षकाची ठिकाणे दिसतात. हा बुरूज सोमसूत्री प्रदक्षिणा करून पाहता येतो.[६०]

**व्याघ्रगड किंवा वासोटा किल्ला**

कोयना नदीच्या परिसरात वासोटा नावा दुर्गम किल्ला आहे. महाराष्ट्रातील मोजक्या वनदुर्गांपैकी एक दुर्ग म्हणजे वासोटा किंवा व्याघ्रगड होय. जावली तालुक्यात शिवसागर जलाशयाजवळ हा किल्ला आहे. याची समुद्रसपाटीपासूनची उंची ३७०० फूट आहे. पन्हाळयाच्या शिलाहार घराण्यातील शेवटचा राजा दुसरा भोज याने हा किल्ला बाराव्या शतकाच्या उत्तरार्धात बांधला. छ.शिवाजी महाराजांनी याचे नाव वज्रगड असे केले होते. येथे मानवी वस्ती अतिशय कमी असून वन्य श्वापदांचा येथे मुक्त संचार असतो. येथील परिसरात घनदाट जंगल असून पर्यटक व गिर्यारोहक यांचे हे आवडते ठिकाण आहे. सातारा–कास–फळणी मार्गे वासोटयाला जाता येते. नैसर्गिक दुर्गमता लाभलेला हा किल्ला जावळीच्या जंगलामधील एक अनोखे दुर्ग रत्न आहे. साहसाची अनुभूती पसरलेली आहे. या रांगेला समांतर अशी धावणारी घेरादाते गडाची रांग घाटमाथ्यावर आहे. ही रांग महाबळेश्वरपासून दातेगडापर्यंत जाते. या दोन रांगाच्यामधून कोयना नदी वाहते. या जावळी खोऱ्यामधून वाहणाऱ्या कोयना नदीवर हेळवाक येथे धरण बांधलेले आहे. या जलाशयाला शिवसागर म्हणतात. या शिवसागर जलाशयाचे पाणी वासोटा किल्ल्याच्या पायथ्याला स्पर्श करतो. शिवसागराचे पाणी तापोळापर्यत पसरलेले आहे. सहयाद्रीची मुख्य रांग आणि शिवसागराचे पाणी यामधील भागात घनदाट अरण्य आहे. पूर्वेला घनदाट अरण्य आणि पश्चिमेला कोकणात कोसळणारे धबधबे यामुळे वासोटयाची दुर्गमता खूप वाढली आहे. वासोटयाला जाण्यासाठी प्रामुख्याने दोन मार्ग आहेत. एक कोकणमधून आणि दुसरा घाटमाथ्यावरून. कोकणातील चोरवणेपासून नागेश्वराच्या सुळक्याकडून वासोटयाकडे जाण्यासाठी शिवसागर ओलांडावा लागतो. त्यासाठी बामणोलीमध्ये लाँचेस उपलब्ध होतात. वनखात्याची परवानगी घेऊन येथून आपण वासोटयाकडे जाऊ शकतो. लाँचमधून साधारण ४० ते ५० मिनिटाच्या प्रवासानंतर आपण वासोटयाच्याजवळ

पोहचतो. पाण्याच्या फुगवटयानुसार कालावधी कमी जास्त होतो. पायथ्याजवळ मेट–इंदवली नावाचे गाव होते. ते फार पूर्वीच उठून गेलेले आहे. त्याचे अवशेष अजूनही दिसतात. या अवशेषांच्या जवळूनच गडावर जाणारा धोपट मार्ग आहे. या मार्गाने काही अंतर गेल्यावर आपण पायथ्याला पोहोचतो. पायथ्याला ओढयाकाठी मारूतीची मूर्ती आहे. येथूनच किल्ल्याची चढण आणि जंगल सुरू होते. हा चढाईचा मार्ग दुतर्फा असलेल्या घनदाट जंगलामधून जातो. यात वेगवेगळया प्रकारची  झाडे व वनस्पती आपल्याला दिसतात या जंगलात अनेक प्रकारची वन्यश्वापदे गवे आणि अस्वले प्रामुख्याने आहेत. अर्धा अथिक किल्ला चढल्यावर एक वाट उजवीकडे जाते. ही वाट केतकीच्या गादया जवळून पुढे नागेश्वराकडे जाते वर चढल्यावर किल्ल्याच्या पायऱ्या लागतात. त्या चढून भग्न प्रवेशद्वारातून आपण गडात प्रवेश करतो. या प्रवेशद्वाराजवळून डावीकडील तटबंडीच्याकडेने गेल्यावर आपण पूर्वेकडील बाजूस पोहोचतो. या बाजूला पाण्याचे टाके आहे. हे टाके भिंतीमुळे दोन भागात विभागले गेले आहे. पिण्यायोग्य पाणी गडावर आहे. येथून झाडीतून दक्षिण टोकावर गेल्यावर समोरच जुन्या वासोटयाचा डोंगर दिसतो. गडावर सर्वत्र झाडी वाढलेली असल्यामुळे गडावरच्या वास्तू त्यात लुप्त झाल्या आहेत. वाटेवर मारूती मंदीर मोठया वाडयाचे अवशेष तसेच महादेव मंदिर आहे. तेथून पुढे उत्तरेकडील माची आहे. या माचीवर बांधकाम नाही. पण येथून दूरपर्यतचा परिसर दिसतो. कोकणातील विस्तृत प्रदेश येथून पाहता येते. वासोटा हा गिरिदुर्गाबरोबरच वनदुर्गसुद्धा आहे. म्हणून याला मिश्रदुर्ग म्हतले जाते. या किल्ल्याचे ऐतिहासिकदृष्टया अनन्यसाधारण महत्त्व होते. या किल्ल्याची मूळ बांधणीही शिलाहारवंशीय दुसऱ्या भोजराजाने केली असल्याचा उल्लेख आढळतो. १६५६ मध्ये शिवाजीराजांनी जावळी प्रांताबरोबरच या वासोटा किल्ल्याचाही स्वराज्यात समावेश केला. वासोटयाचे नाव महाराजांनी व्याघ्रगड असे ठेवले. षाच्या दुर्गमतेबद्दल पेशवाईत सुद्धा नोंद आहे. त्यासंबंधी एका जुन्या आर्येमध्ये वासोटयाचा गमतीचा उल्लेख आहे. तो असा, ‘श्रीमंत प्रतिनिधीचा हा अजिंक्य किल्ला वासोटा ताई तेलीण मारील सोटा, बापू गोखल्या सांबाळ कासोटा’ शिवाजीच्या काळात या किल्ल्याचा वापर तुरूंग म्हणून केला जात असे याचे कारण तेथील निर्जन व घनदाट असे अरण्य. पूर्वी तेथे वाघ. बिबटयासारखे प्राणीही होते. अफझलखानाच्या वधानंतर छ. शिवाजी महाराजांच्या सैन्याने राजापुरावर हल्ला करुन तेथील इंग्रजांना अफझलखानाच्या गलबतांचा पत्ता विचारला. त्यांनी

सांगितला नाही म्हणुन इंग्रजांच्या गिफर्ड नावाच्या अधिकाऱ्याला अटक केली व वासोटयावर ठेवले तसेच रेव्हिंग्टन आणि इतर इंग्रज कैदी वासोटयावरच बंदीस्त करून ठेवले होते. याच किल्ल्यावर छ.शिवाजी महाराजांना मोहरांचे हंडे सापडले होते.[६१]

**अजिंक्यतारा**

सातारा जिल्हयाचे मुख्य ठिकाण असलेल्या सातारा शहरात अजिंक्यतारा किल्ला आहे. हा किल्ला शिलाहार राजवटीत राज दुसरा भोज याने बांधल्याची नोंद इतिहासात सापडते. १६७३ मध्ये हा किल्ला छ. शिवाजी महाराजांनी स्वराज्यात आणला होता. अजिंक्यतारा हा किल्ला सातारा शहराच्या अगदी जवळ आहे व तो सातारचा किल्ला म्हणून देखील ओळखला जातो. अजिंक्यतारा किल्ल्याची उंची साधारणतः ३०० मीटर असून ती दक्षिणोत्तर विस्तार ६०० मीटर आहे. कोणत्याही मार्गाने गड गाठण्यास साधारन १ तास लागतो. सातारचा किल्ला (अजिंक्यतारा किल्ला) म्हणजे मराठयांची राजधानी होती. साताराचा किल्ला हा शिलाहार वंशातल्या दुसऱ्या भोजराजाने इ.स.११९० मध्ये बांधला. पुढे हा किल्ला बहामनी सत्तेकडे आणि मग विजापूरच्या आदिलशहाकडे गेला. इ.स.१५८० मध्ये पहिल्या आदिलशहाची पत्नी चांदबिबी येथे कैदेत होती. छ.शिवाजीच्या राज्याचा विस्तार होत असताना २७ जुलै १६७३ मध्ये हा किल्ला छ.शिवाजी महाराजांच्या हाती आला. छ.शिवरायांना ताप आल्याने त्यांनी दोन महिने या किल्ल्यावर विश्रांती घेतली होती. छ.शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर १६८२ मध्ये औरंगजेब महाराष्ट्रात आला. इ.स.१६९९ मध्ये औरंगजेबाने साताऱ्याच्या दुर्गाला वेढा घातला. तयवेली गडावरचा किल्लेदार प्रयागजी प्रभू होते. १३ एप्रिल १७०० च्या पहाटे मोगलांनी सुरूंग लावण्यासाठी दोन भुयारे खणली आणि बत्ती देताच क्षणभरात मंगळाईचा बुरूज आकाशात भिरकावला गेला. तटावरील काही मराठे दगावले तेवढयातच दुसरा स्फोट झाला. मोठा तट पुढे घुसणाऱ्या मोगलांवर ढासळला व दीड हजार मोगल सैन्य मारले गेले. किल्ल्यावरील सर्व दाणागोटा व दारूगोळा संपला आणि २१ एप्रिल रोजी किल्ला मोगलांनी जिंकून घेतला. किल्ल्यावर मोगली निशाण फडकण्यास तब्बल साडेचार महिने लागले. या किल्ल्याचे नामकरण आझमतारा झाले. पुढे ताराबाईच्या सैन्याने पुन्हा किल्ला जिंकला व त्याचे नामांतर अजिंक्यतारा किल्ला केले. पण पुन्हा किल्ला मोगलांच्या स्वाधीन झाला. १७०८ मध्ये शाहूने किल्ला घेतला

आणि स्वतःस राज्याभिषेक करुन घेतला. पुढे पेशव्यांकडे हा किल्ला गेला. दुसऱ्या शाहूच्या निधनानंतर किल्ला ११ फेब्रुवारी १८१८ मध्ये इंग्रजाकडे गेला.

**गडावरील पाहण्यासारखी ठिकाणे :–**

साताऱ्यातून ज्या मार्गाने आपण गडावर प्रवेश करतो. त्या मार्गावर दोन दरवाजे आहेत. आजही या दोन दरवाजापैकी पहिला दरवाजा सुस्थितीत आहे. दरवाजाचे दोन्ही बुरूज आज अस्तित्त्वात आहेत. दरवाजातून आत शिरल्यावर उजवीकडे हनुमानाचे मंदिर आहे. डावीकडे सरळ रस्त्याने पुठे गेल्यावर वाटेत महादेवाचे मंदीर लागते. समोर प्रसारभारती केंद्राचे कार्यालय व मागे प्रसारभारती केंद्राचे दोन टॉवर आहेत पुढे गेल्यावर एक डावीकडे जाणारी वाट दिसते. या वाटेत ताराबाई यांचा निवास असलेला पण आता ढासळलेला राजवाडा आणि कोठार आहे. वाटेच्या शेवती मंगळाईदेवीचे मंदिर लागते. मंदराच्या समोरच मंगळाईचा बुरूज आहे. मंदिराच्या समोरच मंगळाईचा बुरुज आहे. मंदिराच्या आवारात अनेक शिल्पे आढळतात. या वाटेने थेट तटबंदीच्या साहयाने पुढे जाणे म्हणजे गडाला प्रदक्षिणा घालण्यासारखेच आहे. गडाच्या उत्तरेला देखील दरवाजा आहेत. तो तटबंदीवरून प्रदक्षिणा मारताना नजरेस पडतो गडाला प्रदक्षिणा घालून आल्या मार्गाने खाली उतरावे लागते. किल्ल्यावरुन समोरच यवेतश्वराचे पठार, चंदन–वंदन, कल्याणगड, जरंडा आणि सज्ञनगड हा परिसर दिसते.[६२]

**सज्ञनगड :–**

सज्ञनगड हा भारताच्या महाराष्ट्र राज्यातील एक किल्ला आहे. आश्वलायन ऋषीचे वास्तव्याचे स्थान म्हणून आश्वलायनगड, अस्वलांची येथे वस्ती म्हणून अस्वलगड, नवरसतारा अशी आणखीही काही नावे इतर कालखंडात याला लाभली आहेत. परळी गावाकडील दरवाजातून किल्ल्यात प्रवेश करता येतो. इतर ठिकाणी उभा कडा किंवा बांधीव तटबंदीने प्रवेश दुष्कर केला आहे. प्रतापगडाच्या पायथ्यापासून सहयाद्रीची एक उपरांग शंभू महादेव या नावाने पूर्वेकडे जाते. या रांगेचे तीन फाटे फुटतात. त्यापैकी एका रांगेवर समर्थ रामदासांच्या पदस्पर्शाने पावन झलोला सज्ञनगड उर्फ परळीचा किल्ला वसलेला आहे. सातारा शहराच्या नैऋत्येस अवघ्या दहा किलोमीटर अंतराव उरमोडी उर्फ उर्वशी नदीच्या खोऱ्यात हा दुर्ग उभा आहे. हा किल्ला समुद्रसपाटीपासून सुमारे ३००० फूट उंच आहे. तर पठारापासून १००० फूट उंच आहे. किल्ल्याचा आकार शंखाकृती आहे. याचा परीघ १ कि.मी.हून अधिक आहे. पश्चिोस

खेड, चिपळूण, उत्तरेस महाबळेश्वर, प्रतापगड, रायगड, दक्षिणेकडे कळंब, ईशान्येस सातारा शहर व अजिंक्यतारा आहे. प्राचीन काळी या डोंगरावर आश्वालयन ऋषीचे वास्तव्य होते. त्यामुळे या किल्ल्याला 'आश्वालयनगड' म्हणू लागले. या किल्ल्याची उभारणी शिलाहार राजा भोज हयाने ११ व्या शतकात केली. २ एप्रिल १६७३ मध्ये शिवाजीराजांनी हा किल्ला आदिलशहाकडून जिंकून घेतला. समर्थ रामदास स्वामी गडावर कायमच्या वास्तव्यासाठी आले. किल्ल्याचे नाव सज्ञनगड झाले. १८ जानेवारी १६८२ मध्ये रामदास स्वामींचे निधन झाले. यानंतर पुढे २१ एप्रिल १७०० मध्ये फत्तेउल्लाखानाने सज्जनगडास वेढा घातला. ६ जून १७०० ला सज्जनगड मोगलांच्या ताब्यात गेला व त्याचे नाव नवरसतारा म्हणून नामकरण झाले. इ.स.१७०९ मध्ये मराठयांनी पुन्हा किल्ला जिंकला. इ.स.१८१८ मध्ये किल्ला इंग्रजांच्या हाती पडला.

**गडावरील पाहण्यासारखी ठिकाणे :**

गड चढण्यासाठी पायऱ्या आहेत. अर्ध्या वाटेवर समर्थ शिष्य कल्याणस्वामी यांचे मंदिर आहे. पुढे गेल्यावर एका बाजूस मारूतीचे व दुसऱ्या बाजूस गौतमीचे मंदिर आहे. किल्ल्याचा दरवाजात श्रीधर स्वामी यांनी स्थापन केलेल्या मारूती व वराहाच्या मूर्ती आहेत. प्रवेशद्वाराच्या डाव्या बुरूजाजवळ आगलाई देवीचे मंदिर आहे अंगापूरच्या कृष्णा नदीच्या डोहात रामदासांना रामाची मूर्ती व अंगलाईची मूर्ती सापडली होती. आंगलाई मंदिर समर्थानी बांधले. शके १६०३ माघ नवमी (सन १६८२) रोजी रामदासांनी समाधी घेतली. म्हणून या तिथीला दासनवमी म्हणतात. समाधीवर राममूर्ती बसवून शिष्यांनी देऊळ बांधले. राममंदिराच्या सभामंडपात सिद्धीविनायक व हनुमानाची मूर्ती आहे. मुख्य मंदिरात राम, लक्ष्मण, सीता यंच्या पंचधातूच्या मूर्ती आहेत. जवळच समर्थांची धातूची मूर्ती आहे. भुयारात समर्थांचे समाधिस्थान आहे. समाधी मागील कोनाडयात पितळी पेटीत दत्तात्रेयाच्या पादुका आहेत. मंदिराबाहेर एका कोपऱ्यात मारूती आहे. दुसऱ्या कोपऱ्यात समर्थ शिष्या वेण्णा हिचे वृंदावन आहे. मंदिरापुढे उत्तर बाजूस आणखी एक शिष्या आक्काबाई हिचे वृंदावन आहे. माघ वदय प्रतिपदा ते नवमी या काळात दासनवमी साजरी करतात. गडावर शिरताना लागणाऱ्या पहिल्या दरवाजाला 'छत्रपती शिवाजी महाराज द्वार' असे म्हणतात. हे द्वार आग्नेय दिशेस आहे. दुसरा दरवाजा पूर्वाभिमुख असून त्याला 'समर्थद्वार' असेही म्हणतात. आजही हे दरवाजे रात्री दहानंतर बंद होतात. दुसऱ्या

दारातून शिरताना समोरच एक शिलालेख आढळतो. त्याचा मराठी अर्थ खालीलप्रमाणे ङ्क 'ऐश्वर्य तुझ्या दारातून तोंड दाखवत आहे. हिंमत त्याच्या कामामुळे सर्व फुलांना प्रफुल्लित करत आहे. तू विवंचना दूर होण्याचे स्थान आहेस परंतु पुन्हा विवंचना मुक्त आहेस तुझ्यापासून सर्व विवंचना दूर होतात.' या पायऱ्यांनी आपण गडावर प्रवेश करतो त्या पायऱ्या संपायच्या अगोदर एक वाट उजवीकडे जाते. या वाटेने ५ मिनिटे पुढे गेल्यावर एक रामघळ लागते. ही रामघळ समर्थांची एकांतात बसणयची जागा होती. गडावर प्रवेश केल्यावर डावीकडे वळावे. समोरच घोडयांना पाणी पाजण्यासाठीचे घोडाळे तळे दिसते. घोडाळे तळयाच्या मागच्या बाजूस एक मशीदवजा इमारत आहे, तर समोरच आंग्लाईदेवीचे मंदिर आहे. ही देवी समर्थांना चाफळच्या राममूर्ती बरोबरच अंगापूरच्या डोहात सापडली. गडावरील प्रमुख आकर्षण म्हणजे सर्म्थाचा मठ व श्रीरामाचे मंदिर. समर्थ रामदासांच्या निर्वानानंतर भुयारातील स्मारक व त्यावर श्रीरामाचे मंदरि उभारले गेले. मंदिरालगतच अशोकवन, वेणाबाईचे वृंदावन, ओवऱ्या आणि समर्थाचा मठ या वास्तू आहेत. जीर्णोद्धार केलेल्या मठात शेजघर नावाची खोली आहे. त्यामध्ये पितळी खुरांचा पलंग, तंजावर मठाच्या मेरूस्वामी यांनी समर्थांना प्रत्यक्ष पाहून काढलेले चित्र, समर्थाची कुबडी, गुप्ती, दंडा, सोटा, पाण्याचे दोन मोठे हंडे, पाणी पिण्याचा मोठा तांब्या, पिकदाणी, बदामी आकाराचा पानाचा डबा, वल्कले व प्रताप मारूतीची मूर्ती आहे. या गुप्तीमध्ये एक लांबच लांब धारदार तलवार आहे. राममंदिर व मठांच्या दरम्यान असलेल्या दरवाजाने पश्चिमेकडे गेल्यास उजव्या हातास एक चौथरा व त्यावर शेंदूर फासलेला गोटा आहे. त्यास ब्रम्हपिसा म्हणतात. गडाच्या पश्चिम टोकावर एक मारूती मंदिर आहे. त्यास धाब्याचा मारूती असे म्हणतात. गडाच्या उत्तरेस वाटेवरच गायमारूती व कल्याण स्वामी मंदिर आहे. सज्जनगडाच्या पायथ्याशी परळी गावालगतच केदारेश्वर महादेव विरूपाक्ष मंदिर अशी २ प्राचीन शिव मंदिरे आहेत. तेथील कोरीव शिल्प पाहण्याजोगे आहे. कुसगावापासून जवळच मोरघळ नावाची गुहा प्रेक्षणीय आहे. गडावर जाण्यासाठी दोन मार्ग आहेत. सातारा ते परळी अंतर १० कि.मी.चे आहे. परळी हे पायथ्याचे गाव. परळीपासून गडावर जाण्यासाठी पायऱ्या आहेत. साधारण १८० पायऱ्यानंतर गडाचा दरवाजा लागतो. सातारा परळी रस्त्यावर परळीच्या अलीकडे ३ किलोमीटरवर गजवाडी गाव लागते. तेथून गडाच्या कातळमाथ्यापर्यंत गाडीने जाता येते. येथून पुढे १०० पायऱ्यानंतर दरवाजा लागतो.[६३]

**चंदनगड, वंदनगड**

हे दोन गड कोरेगाव तालुक्याच्या सरहद्दीवर आहेत. हे गड जुळे असल्याने त्यांना चंदन, वंदन या नावाने ओळखले जाते. चंदनगडाची उंची २२०० फूट असुन चारही बाजूला उंच शिळा आहेत. गडावर विस्तृत मैदान असून भव्य दर्गा आहे.[६४]

**वसंतगड :**

वसंतगड हा किल्ला पुणे–बंगरूळ हा राष्ट्रीय महामार्गावरील उंब्रज आणि कराडच्या मध्ये रस्त्याच्या पश्चिमेकडे आहे. वसंतगड या किल्ल्याच्या पायथ्याला तळबीड गाव आहे. राष्ट्रीय महामार्गावर तळबीड फाटयाला उतरून तीन कि.मी.पश्चिमेकडे असलेल्या तळबीडला जावे लागते. वसंतगड इतिहास प्रसिद्ध अशा तळबीड परिसराचे रक्षण करणारा किल्ला होता. मराठा साम्राज्याचे सरसेनापती हंबीरराव मोहिते आणि त्याांचै कन्या रणरागिणी महाराणी ताराबाई या तळबीड गावचे होते. तळबीड गावात सरसेनापती हंबीरराव मोहिते यांचे स्मारक आहे. तळबीड गावातूनच गडावर वाट जाते. गडावर पोहोचण्यासाठी ४५ मिनिटे लागतात. दुसरा रस्ता सुपने या गावातून ही आहे. तिसरा रस्ता वसंतगड या गावातून जाणारा आहे. वसतंगडाची निर्मिती भोज शिलाहार राजाने केली. इ.स.१६५९ मध्ये शिवरायांनी वसंतगड स्वराज्यत सामील करून घेतला. जिंजीहून परत आल्यानंतर छत्रपती राजाराम महाराज काही दिवस वसंतगडावर मुक्कामी होते. इ.स.१७०० साली औरंगजेब बादशहाने हा किल्ला जिंकला.

**गडावरील प्रेक्षणिय स्थळे :**

वसंतगडाचे मुख्य प्रवेशद्वार इंग्रजांनी तोफांच्या भडिमाराने भग्न केले आहे. आत जाताच डाव्या हातास एका घुमटीत गणेशाची सुंदर मूर्ती आहे. येथून सरळ जाणाऱ्या पायवाटेने गेल्यानंतर गडाच्या मध्यभागी असलेल्या श्रीचंद्रसुन महाराजांच्या मंदिराशेजारी आपण येऊन पोहचतो. मंदीर सुरेख असून आत गाभाऱ्यात चंद्रसुन महाराजांची मूर्ती आहे. चैत्रातल्या दुसऱ्या पंधरवडयात वसंतगडावर मोठी जत्रा भरते. मंदिराच्या पलिकडेच जुन्या राजवाडयाचे अवशेष दिसतात. डाव्या बाजूने मंदिराच्या बाहेरील वाटेने पुढे गेल्यास वाटेत आपणास चुन्याच्या घाणीचे अवशेय दिसतत. पुढे कोयना तळे व करष्णा तळे अशी दोन तळी आहेत. त्यांच्या काठावर जुन्या समाध्या व सतीशिळा आहेत. गडाच्या चारी बाजूंनी चार डौलदार बुरूज आहेत.

त्यावर चढण्यासाठी दगडी जिनेही आहेत. गडाच्या पश्चिम भागातगोमुखी बांधणीचा दरवाजा असून हया दरवाजाचे व त्याच्या तटबंदीचे बांधकाम आजही चांगल्या अवस्थेत आहे.[६५]

**सदाशिवगड**

किल्ले सदाशिवगडचा डोंगर कऱ्हाडपासून ६ कि.मी.वर आहे. याची समुद्रसपाटीपासूनची उंची सुमारे ३०५० फूट आहे. पायथ्याशी असलेल्या ओगलेवाडी(हजारमाची) या गावातून या डोंगरावर जात येते. संपूर्ण रस्ता पायऱ्यांचा असून सुमारे १००० पायऱ्या आहेत. सदाशिवगडचा डोंगर अफझलखानाच्या वधानंतर (१० नोव्हेंबर १६५९) छत्रपती शिवाजी राजांच्या ताब्यात आला. कऱ्हाडवर नजर ठेवण्याच्या दृष्टीने व कराडहून पलूस–विटाकडे जाणाऱ्या सुर्लीघाटावर नियंत्रण ठेवण्याच्या सोयीसाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी सदाशिवगड बांधून काढला. सध्या गडावर महादेवाचे प्रशस्त मंदीर आहे. समोर एक आड(चौकोनी विहीर) असून त्यात १२ महिने पाणी असते. शेजारीच मारूतीचे छोटेसे देऊळ आहे. बाकी गडावर किल्ल्याचे कोणतेही अवशेष शिल्लक नाहीत काही ठिकाणी केवळ जोतीच शिल्लक आहेत.[६६]

**वैराटगड**

वाई शहराच्या आग्नेय दिशेला ८ कि.मी.अंतरावर वैराटगड आहे. हा गड ही पन्हाळयाचे शिलाहार राजाने बांधला आहे. गडावर जाण्यासाठी रस्ता अरूंद व कच्चा आहे. गडावर शंकर दत्त आणि मातंगी देवी यांची मंदिरे आहेत. गडावर काही चोरवाटा आणि चोरघरे आहेत. आणिबाणीच्या प्रसंगी दडून राहण्यासाठी याचा वापर केला जात असे. या गडावर एक वैशिष्टयपूर्ण असे एक तळघर आहे. जमिनीच्या आत असलेले हे तळघर अतिशय विस्तृत आहे. २०० फूट पेक्षा जास्त लांब भूयार आहे.[६७]

**केंजळगड–**

वाई शहराच्या वायव्येला सपाट चौकोनी आकाराचा माथा दृष्टीस पडतो. तोच हा केंजळगड. हा गड रायरेश्वर व पांडवगड या किल्ल्यांच्यामध्ये आहे.

**मकरंदगड**

मकरंदगड याला सॅडल बँक असेही म्हणतात. कारण याचा आकार तट्टूच्या पाठीसारखा आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी वासोटा आणि प्रतापगड यांना जोडणारा हा किल्ला इ.स.च्या १६५६ च्या सुमारास बांधला. या गडाचे वैशिष्टय म्हणजे या गडाच्या एका बाजूने महाबळेश्वर

दिसते तर दुसऱ्या बाजूने कोकण प्रांताचे आणि समुद्रकिनाऱ्याचे विलोभनीय दर्शन दुर्बिणीच्या सहाय्याने घेता येते. गडाच्या माथ्यावर छत्रपती शिवाजी महाराजांनी बांधलेली शंकराचे मंदीर आहे.[६८]

**केंजळगड**

हा किल्ला १२ व्या सतकात राज भोज यांनी बांथला. या गडावर पूर्वेला एक महादेवाचे व देवीचे मंदीर पडलेल्या अवस्थेत आहेत. या किल्ल्यावरुन पांडवगड, कमलगड, रायरेश्वर पठार, चंदनवंदन, धोम धरण दिसते.[६९]

**दातेगड किल्ला**

दातेगड किल्ल्यालाच सुंदरगड असे म्हणतात. या गडावर असलेली तलवार आकाराची विहीर हेच महत्त्वाचे आकर्षण आहे. या तलवारीच्या विहिरीचा सर्व भाग खडकात कोरलेला आहे.

**गुणवंतगड**

गुणवंतगड हा किल्ला पाटणच्या नैऋत्येस सहा मैल अंतरावर आहे. १८ व्या शतकात या गडावर पेशव्यांचे सैन्य होते. इ.स.१८१८ मध्ये कोणतीही लढाई किंवा प्रतिकार न होता हा किल्ला ब्रिटीशांच्या ताब्यात आला.[७०]

**कल्याणगड**

कोरेगावपासून १३ कि.मी. अंतरावर कल्याणगड हा किल्ला आहे. याला नांदगिरीचा किल्ला म्हणून ओळखतात. पन्हाळयाच्या शिलाहार वंशीय राजा दुसरा भोज याने १२ व्या शतकात हा किल्ला बांधला. इ.स.१६७३ साली छत्रपती शिवाजी महाराजांच्या सैन्याने तो जिंकूण घेतला. नांदगिरी हे येथील परगण्याचे मुख्य ठिकाण होते. मराठेशाहीत ते तालुक्याचे ठिकाण होते. कल्याणगड चढताना अर्ध्या वाटेवर पाण्याची खांब टाक लागते. गडावर गेल्यावर प्रथम उत्तराभिमुख प्रवेशद्वार लागते. त्यातून आत गेल्यावर तटाशेजारून खाली जाणारी वाट लागते. पुढे सुमारो ३० मीटर लांबीचे एक भुयार लागते. या भुयारात कायम गुडघाभर स्वच्छ पाणी असते. आतमध्ये ९ व्या सतकात स्थापलेली तीर्थकार पार्श्वनाथ यांची मूर्ती आहे. त्याचजवळ देवीची मूर्ती आहे. तर डाव्या बाजूला दत्तात्रयाची मूर्ती आहे. या सर्व मूर्ती सुबक आणि रेखीव आहेत. या गुहेला या मूर्तीमुळेच पारसनाथ गुहा अथवा दत्तगुहा असे म्हणतात.[७१]

**पांडवगड**

वाई शहरापासुन चार मैलावर वायव्य दिशेला पांडवगड हा गड आहे. चौकोनी आकाराचा माथा असलेला पांडवगड हा गड आहे. पन्हाळयाचा शिलाहार राजा भोज याने इ.स.१२०० च्या दरम्यान हा किल्ला बांधला गडावर जाण्यासाठी पहिला डोंगर चढून दुसरा उंच डोंगर चढावा लागतो. वाटेत विहीरी आहेत. पांडवगडाच्या माथ्यावर पाण्याची अनेक तळी आहेत. माथ्यावरच पडलेल्या वाडयाच्या मध्यभागी पांडजाई देवीचे व दुसरे एक अशी देवीची दोन मंदिरे आहेत.[७२]

**संतोषगड**

संतोषगड या गडालाच किल्ले ताथवडा असे म्हणतात. संतोषगड हा फलटणपासून २० कि.मी. अंतरावर आहे. हा किल्ला मध्यम आकाराचा असला तरी भक्कम आहे. त्याची बांधणी छत्रपती शिवरायांनी केली आहे. संतोषगड आपल्याला तीन टप्प्यात चढावा लागतो. पहिला टप्पा चढल्यावर आपण एका मठात पोहचतो. या मठाजवळ तीन गुहा असून त्यात एक तळे आणि एक मूर्ती दिसते. ठिसर व चढणीचा डोंगर चढून दुसऱ्या टप्प्यावर आल्यावर दोन प्रवेशद्वारातून जाताना मारूतीचे मंदीर दिसते. गडाच्या तिसऱ्या टप्प्यावर बालेकिल्ला आहे.तिथे तातोबा महादेवाचे मंदीर पाहण्यासारखे आहे. गडावर अनेक भुयारे व गुहा आहेत. या भुयाऱ्यांच्या मार्गात पाण्यात भरपूर साठा आहे.[७३]

**सुभान मंगळ–**

नीरा नदीच्या दक्षिण काठावर वसलेल्या या गावात एक भुईकोट किल्ला आहे. त्याला किल्ले सुभानमंगळ असे नाव आहे. हा किल्ला फार उंच नाही अगर याचा विस्तारही मोठा नाही. या किल्ल्याभोवती मातीचा तट बांधलेला आहे. परंतु आज मात्र हा किल्ला ढासळलेल्या अवस्थेत असून सध्या तेथे पाहण्याजोगे फारच कमी आहे. उंचीने थोटका पण आकाराने नेटका. या किल्ल्याभोवती मातीच्या भेंडयाचे तट आढळतात.[७४]

**फलटण**

फलटण हे भारतातील एक पुरातन शहर आहे. फलटण हे साताऱ्यापासून सुमारे ६७ कि.मी.तर पुण्यापासून सुमारे ११० कि.मी. दूर आहे. पुण्यहून सासवड, जेजुरी, निरा, लोणंद या मार्गे तसेच साताऱ्यहून वडुथ– वाठार(रेल्वे स्टेशन) आदर्की या मार्गे फलटणला बसने

जाता येते. पूर्वी या गावात मोठया प्रमाणात फळफळावळ पिकत होती. यावरून फलस्थानचे फलटण हे नाव पडले. मालोजीराजे व छ. शिवाजीराजे यांना या घराण्यातील अनुक्रमे दिपाबाई व सईबाई या मुली दिल्या होत्या तसेच शिवाजी महाराजांची मुलगी या घराण्यात दिली होती. त्याचबरोबर जैन धर्मियांचे वास्तव्य व त्यांची मंदिरे मोठया प्रमाणात आहेत.

**फलटण श्रीराम मंदिर–**

सातारा जिल्यातील फलटण येथे संस्थानी वातावरणाच्या खुणा आजही आढळतात. फ्लतन शहरातील श्रीराम मंदिर हे फलटण शहराचे भूषण आहे. हे श्रीराम मंदिर २२५ वर्षापूर्वीचे आहे. या मंदीरभोवती उंच दगडी भिंत आहे. भव्य प्रवेशद्वारातून आत प्रवेश केल्यावर डाव्या बाजूला राजवाडा तर उजव्या बाजूला श्रीरामाचे मंदीर आहे. मंदीर पूर्वाभिमुख असून मंदीरासमोर तीन दीपमाला अअहेत. गाभाऱ्यातील राम–लक्ष्मण व सीता यांच्या मूर्ती नयनमनोहर आहेत. हेमाडपंती शैलीतील मंदीर असून याचे शिखर व कळस अत्यंत प्रेक्षणीय आहेत. श्रीराम मंदीराला लागूनच राधा–कृष्ण, एकमुखीदत्त व गरूड यांची मंदीरे आहेत. फलटण हे महानुभव संप्रदायाचे प्रमुख केंद्र असून फलटणला महानुभव पंथाची काशीच म्हटले जाते. येथील श्रीकृष्ण मंदीर व चक्रधरस्वामींचे मंदिर प्रेक्षणीय आहे.[७५]

**वाई –**

वाई सातारा जिल्हयातील एक तालुका व महत्त्वाचे सहर आहे. हे सुंदर कृष्णाकाठ लाबलेले गाव असून येथे अनेक घाट नदीवर विकसित केलेले आहेत. वाईजवळ मेणवली येथे नाना फडणवीसांचा वाडा आहे. तसेच येथील गणपती मंदिराही प्रसिद्ध आहे. वाई कृष्णा नदीच्या काठावर असलेली आणि दक्षिण काशी म्हणून प्रसिद्धीस पावलेले धार्मिक क्षेत्र आहे. ढोल्या गणपतीची भव्य मूर्ती सरदार रास्ते यांनी १७६२ मध्ये एकाच दगडातून सलगपणे घडविली. हेच वाईचे ग्रामदैवत आहे. वाई येथील वैशिष्ट म्हणजे श्री सिद्धेश्वर मंदिरातील श्री सिद्धनाथांची संजीवन समाधी, गंगारामेश्वर, काशी विश्वनाथ, लक्ष्मीनारायण, समर्थ रामदासांनी स्थापन केलेले रोकडोबा हनुमानाचे मंदिर. वाई येथूनच मराठी विश्वकोशाचे प्रकासन केले जाते. सातारा जिल्हयातील वाई हे गाव अठराव्या व एकोणिसाव्या शतकामध्ये महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी होती. याच्या खुणा आजही जागोजाग पहायला मिळतात. कृष्णेच्या तिरावर वसलेले वाई, जसे ऐतिहासिक दृष्टया प्रसिद्ध आहेत तेच इथल्या कृष्णा नदीवरील

वैशिष्टयपूर्ण घाटांसाठी आणि मंदिरासाठी खूप प्रसिद्ध आहे. स्वामी केवलानंद यांनी येथे प्राज्ञपाशाळेची स्थापना केली. विश्वकोशाचे प्रकाशन येथून होते. आजपर्यंत विश्वकोशाचे १९ खंड प्रकाशित झाले आहेत. वाईपासून जवळच भृगऋषींची समाधी आहे. वाईमधील गणपती आळीतील लो.टिळक ग्रंथालयाला १९९० साली महाराष्ट्र राज्याचा उत्कृष्ट सार्वजनिक ग्रंथालयाचा डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार प्राप्त झाला. १९९१–९२ मध्ये ग्रंथालयाने हीरक महोत्सव साजरा केला. या ग्रंथालयात ३० हजाराच्यावर ग्रंथसंपदा आहे. वाईतून २ कि.मी. अंतरावर पाचगणी घाटात रेशीम उत्पादन केंद्र आहे. येथे एकर क्षेत्रावर तुतीची लागवड होत असून त्यावर रेशमी किडे पाळले जातात.

**ढोल्या गणपती मंदीर परिसर –**

वाई मधील घाट हे उपासनेसाठी वापरण्यात येत असत. पेशव्यांचा या शहरामध्ये धार्मिक कार्यासाठी मोठया प्रमाणावर वावर होता. त्यामुळे येथील मंदीरांच्या रचना पेशवेकाळाची साक्ष देतात. घाटावर वसलेली गणपती, विष्णू आणि लक्ष्मी यांची मंदिर स्थापत्य कलेचा उत्कृष्ट नमुना आहे. या सगळया मंदिरांच्या शैलीमध्ये समानता आहे. धातूवरील कलाकुसर, लाकडी स्तंभांचा कलात्मक वापर आणि पाषाणाने दिलेले अभेद्यपण हे यांचे वैशिष्टय. या मंदिरामध्ये लक्ष्मीचे मंदिर विशेष प्रसिद्ध आहे. उपलब्ध पुराव्यानुसार हे मंदीर आनंदराव रास्ते यांन १७७८ मध्ये बांधले. गाभाऱ्यात गणपतीची पाषाणाची ६ फूट व लांबी ७ फूट असी बैठकी मूर्ती आहे. मंदिराच्या भव्य सभागृहाला तिन्ही बाजूंनी कमानी आहेत. रास्त्यानी लक्ष्मीला दागदागिन्यांनी मढविले एवढेच नाही तर पूजाअर्चा व उपचारांची कायमची सोय करून ठेवली. मंदिराच्या प्रवेशाचा पश्चिमाभिमुख दरवाजा आहे. यानंतर येतो. प्रशस्त सभामंडप. पच स्तंभ असलेल्या या सभामंडपाला काहीशा निमुळत्या असलेल्या छतामुळे गुहेसारखा आकार आलेला आहे. मंदिराच्या मुख्य शिखराला साठ उपशिखरे आहेत. उपशिखरांच्या चारही बाजूंना छत्र्या कोरलेल्या आहेत. या शिखरांवरचे नक्षीकाम मराठा स्थापत्य शैलीचे उत्तम उदाहरण होय शिखराची रचना लक्ष्मी यंत्रासारखी करण्यात आली आहे. हे शिखर अठरा मीटर उंच आहे. आणि सर्वात वरचा आकार कलशाचा आकाराचा आहे. भौमितिक आकृत्यांचा वैविध्यपूर्ण वापर करण्यात आला आहे. गाभाऱ्यामध्ये लक्ष्मीची काळया पाषाणातील मूर्ती आहे. तिच्या हातात ढाल, तलवार आदी आयुध धारण केली आहेत. या

लक्ष्मीला सोनेरी पैठणी, नक्षीदार सोन्याचा मुकुट आणि प्रभावळ पेशव्यांच्या काळातील कलात्मकतेच दर्शन घडविते. देवीची पुजा उत्सव, सणवार नियमितपने पार पाडले जातात. सभामंडपामध्ये कीर्तन, भजन होते. त्या दृष्टीने या सभामंडपाची रचना करण्यात आली आहे. येथे आवाज घुमत असल्यामुळे ध्वनीक्षेपकाशिवाय शेवटच्या श्रोत्यापर्यंत आवाज पोहचू शकतो. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या मते वाई म्हणजे विणकर लोकांची वस्ती होती. डॉ.ह.वि.संकलिया या संशोधकांच्या मते, या गावाचे नाव इ.स.वी.सनाच्या आठव्या शतकात वायी असे होते. त्यामुळे वायी असे नाव पडले. कालांतराने त्याचे नाव वाई असे झाले.[७७]

**पाचगणी :–**

पाचगणी या भागालाच पाचगडांची भूमी पांचगडी व त्याचा भ्रंश होऊन पाच डोंगरावर वसलेले गाव म्हणून पांचगणी असे नाव पडले आहे. सहयाद्रीच्या माथ्यावर टेबल लँडप्रमाणेच पाच टेकडया आहेत. थंड कोरडया व उत्साहवर्धक हवामानमुळे आरोग्य सुधारण्यास मदत होते. त्यामुळे पाचगणीला आरोग्यधाम असे म्हणण्यात येते. थंड हवेचे ठिकाण म्हणून केवळ राज्यातच नव्हे तर देश पातळीवर लौकिकास आले आहे. विविध प्रेक्षणीय पॉईंटस, भिलार टेबल लँड, किडीज पार्क आहेत. शिवाय मॉरल रिआर्मामेंट सेंटर आहे. तसेच येथ देश–विदेशातून विद्यार्थी शिक्षणासाठी येतात. गुरेघर येथे मॅप्रो फ्रुट प्रॉडक्टस ही जाम फॅक्टरी ८ एकर परिसरात आहे. तेथील ग्रीन हाऊसमध्ये शेकडे प्रकारचे कॅक्टस पाहायला मिळतात.

**नायगाव :–**

शिरवळपासून ५ कि.मी. उत्तरेला नायगाव आहे. हे थोर समाजसुधारक महात्मा जोतीबा फुले यांच्या सुविध्य पत्नी. स्त्री शिक्षणाच्या आद्यप्रवर्तक क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे जन्मगाव. आज त्याच्या राहत्या घराच्या जागेवर त्यांचे राष्ट्रीय स्मारक उभारण्यात आले आहे. येथे सावित्रीबाईंचा अर्धपुतळा उभारून जुन्या पद्धतीचा भव्य वाडाही बांधण्यात आला आहे. सावित्रीबाईची जयंती येथे साजरी केली जाते. येथे महिला अध्यापक विद्यालयही सुरू करण्यात आले आहे.

**म्हसवड :–**

सातारा पंढरपूर मार्गावर माण तालुक्यातील म्हसवड हे तालुक्याचे गाव आहे. येथे प्रसिद्ध असे श्री सिद्धनाथ व माता जोगेश्वरी यांच मंदीर आहेप. दरवर्षी मार्गशिर्ष शुद्ध प्रतिपदा

या दिवशी येथे मोठी यात्रा भरते. त्या दिवशी त्याची मोठया रथातून मिरवणूक काठतात. त्यापूर्वी कार्तिक शुद्ध प्रतिपदा ते द्वादशी अस बारा दिवस श्री सिद्धनाथ व देवी जोगेश्वरी यांचा लग्नसोहळा साजरा केला जातो देवालयाच्या सभामंडपात लोखंडी जाळीमध्ये हत्तीची मूर्ती स्थापना केली आहे. मुख्य शिखराची उंची १०० फुटाहून अधिक आहे. श्री. सिद्धनाथ म्हणजे कालभैरव हे शंकराचे रूप आहे. त्यांच्या हातात त्रिशुल, डमरू, शिगी ही आयुधे आहेत. गळयात रूद्राक्ष व नरमुंडमाळ आहे. डाव्या हातात दैत्यशिर आहे. त्यातून पडणारे रक्त कुत्रा प्राशन करीत आहे. सिद्धनाथाच्या कमरेला व डोक्याला शेष आहे. माता जोगश्वरी हे पार्वतीचेच एक रुप आहे. तिच्या हातात त्रिशुल डमरू, शेष ही आयुधे आहेत. पायाजवळ सिद्धनाथाचा मुलगा अग्नीबाळाची मूर्ती आहे. सिद्धेश्वर हे कर्नाटक व आंध्रप्रदेशातील अनेकांचे कुलदैवत आहे.[७९]

**चाफळ**

चाफळ हे भारताच्या महाराष्ट्र राज्यातील सातारा जिल्हयातील एक गाव आहे. चाफळ हे मांड नदीच्या उत्तर तीरावर वसले आहे. याच्या चारही बाजूंनी सहयाद्रीच्या पर्वतरांगा आहेत. चाफळ समर्थ संप्रदायची राजधानी ठरली समर्थ रामदासांनी महाबळेश्वरपासून कराडपर्यंत हनुमंताची अनेक मंदिरे उभी केली. रामनवमी आणि हनुमानजयंती हे उत्सव सुरु केले. येथे समर्थ रामदास स्वामी यांनी स्थापलेले राममंदिर आणि दोन मारूती मंदिरे आहेत. येथील प्रताप मारूतीचे मंदिर हे श्रीराम मंदिरासमोर असून दासमारूतीचे मंदिर श्रीराममंदिराच्या मागे आहे. समर्थ रामदासाच्या जीवन कार्यातचा फळचे फार मोठे महत्त्व आहे. समर्थानी चाफळचे राममंदिर शके १५६९ (सन १६४८) मध्ये आपले शिष्य व गावकरी यांच्या मदतीने बांधले. अंगापूरच्या डोहातील रामाची मूर्ती त्यांनी बाहेर काढली व तिची स्थापना या देवळात केली. श्रीरामांसमोर हनुमंताची मूर्ती असली पाहिजे म्हणून समर्थानी सुंदरगडी मंदीर बांधून त्यात दासमारूतीची स्थापना केली. ही मूर्ती सुमोर ६ फूट उंचीची आहे. चेहऱ्यावर अत्यंत विनम्र भाव, समोर असलेल्या प्रभू श्रीरामाच्या चरणावर विसावलेले नेत्र, अशीही मूर्ती आहे. हया मारूतीसाठी बांधलेले मंदीर सुमारे सव्वातीनशे वर्षानंतरही चांगलया स्थितीत आहे. चाफळपासून १.५ कि.मी.अंतरावर माजलगाव येथे ही रामदासांनी ११ मारूतीपैकी एकाची स्थापना केली. मारूती मंदिराचे सभागृह नऊ खणाचे असून त्याच्या खांबावर अप्रतिम कोरीव काम आहे.

गाभाऱ्यामध्ये राम लक्ष्मण व सीता यांच्या मोठया व सुंदर असा संगमरवरी मूर्ती आहेत. त्यापुढं दगडी राममूर्ती आहेत. या मंदिराचे शिखर ही उंच आणि कलात्मतेने नटलेले आहे. येथे एक ध्यानगुंफा म्हणजेच समर्थाची ध्यानस्थ बसण्याची एकांताची जागा होय. जमिनीखालील या गुहेत जाताना पहिली उंच पायरी उतरल्यावर आणखी चार पायऱ्या उतराव्या लागतात मग एक दगडी चौकट लागते. महाराष्ट्र कवी यशवंत दिनकर पेंढारकर यांचे हे मूळगाव होय.[८०]

**शिखर शिंगणापूर :**

शिखर शिंगणापूर सातारा जिल्हयातील माण तालुक्यात आहे. शिखर शिंगणापूरचा शंभूमहादेव म्हणजे महाराष्ट्रातील अनेकांचे कुलदैवत. सातारा सोलापूर व पुणे या तीन जिल्हयांच्या सीमेवर शंभूमहादेवाच्या डोंगररांगेतील सिखरावर हे मंदिर आहे सातारा जिल्हयातील माण तालुक्यामध्ये दहिवडी गावापासून २० कि.मी. अंतरावर हे मंदिर आहे. इथे असलेल्या डोंगराला शंभूमहादेवाचा डोंगर म्हणतात. या डोंगराच्या पायथ्याशी शिंगणापूर गाव आहे. हा डोंगर म्हणजे सहयाद्रीचाच एक फाटा असल्याने डोंगरावर दाट झाडी आहे. महादेवाचे मंदिर याच डोंगरावर आहे. मंदिरात जायला पायऱ्या चढून जावे लागते. त्यापुढे आणखी थोडे चढून गेल्यावर खडकेश्वर मंदिर आहे. या मंदिराचे शिखर हा स्थापत्य कलेचा उत्कृष्ट नमुना आहे. शिखरावर अगदी नाजूक नक्षीकाम केले आहे. या मंदिराच्या आवारात अनेक दिपमाळा आहेत. या मंदिराच्या पस्चिमेकडे अमृतेश्वराचे हेमाडपंथी मंदिर आहे. मंदिरात चार वेळी पूजा केली जाते. दरवर्षी चैत्र शु.अष्टमीला शंकरपार्वती विवाह सोहळा अगदी सग्रसंगीत साजरा केला जातो. या महादेवाला अभिषेक करण्यासाठी खालून कावडीत पाणी आणतात. मंदिराला दगडी तटबंदीआहे आणि या मंदिराच्या आवारात पाच मोठे नंदी आहेत. शिवाजी महाराजांच्या घराण्यात शिखरशिंगणापूरच्या महादेवाचे अतिशय महत्त्व होते. इथे असणारा तलाव शिवतीर्थ असे म्हणतात. मंदिराचे आणखी एक वैशिष्टय म्हणजे मोठया घंटा आहेत. या घंटापैकी एक घंटा ब्रिटिशांकडून मंदिराला मिळाली आहे. मंदिराच्या गाभाऱ्यामध्ये दोन शिवलिंग आहेत. त्यांनाच शिवपार्वतीचे प्रतिक मानतात.[८१]

**श्री.भैरवनाथ मंदिर किकली तालुका –वाई (सातारा)**

सातारा जिल्हयातील वाई तालुक्यात वसलेल्या किकली गावातील पुरातन हेमाडपंती स्थापत्य आलेले हे मंदरि आहे. राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४ पासून ५ कि.मी. अंतरावर किकली

हे गाव असून या ठिकाणी हे मंदिर आहे. ऑक्टोबर महिन्यात या गावची यात्रा भरते. या यात्राचे वैशिष्टय हे आहे की, भैरवनाथाचा छबिना हा दिवसा असतो. ही यात्रा दसऱ्यानंतरच्या शनिवार व रविवार या दिवशी भरते. पुणे–सातारा या राष्ट्रीय हमरस्त्याने वाई–महाबळेश्वरकडे जाताना खंबाटकी घाट उतरल्यावर भुईंज हे गाव लागते. तिथेच डावीकडे चंदन–वंदन किल्ल्यांची जोडी नजरेस पडते. या दोन किल्ल्यांच्यामध्ये एक रूंद खिंड आहे. दोन्ही गडमाथ्यांकडून उतरत आलेले तीन टप्पे पायऱ्यासारखे दिसतात. किकली गावात देखण्या प्रवेशद्वाराचे, दीपमाळा असणारे, चिरेबंदी बांधणीचे एक शिवमंदीर आहे. त्याला श्रीभैरवनाथ मंदीर म्हणतात. खूप कलाकुसर असणारे हे ठिकाण आहे. गावात शिरण्यापूर्वीच उजव्या हाताचे भैरवाचे(महादेव) चिरेबंदी मंदरि लक्ष वेधून घेते. आत शिरल्यावर त्याचे महत्त्व पुढच्या किल्ल्याहून अधिक असल्याचे सहज जाणवते. हेमाडपंती शैलीतील हे यादवकालीन मंदीर आहे. प्रवेशद्वार,मुखमंडप, कक्षासन, सभामंडप, अंतराळ आणि गर्भगृह अशी याची रचना आहे. यातील मंदिराचे भरजरी खांब आणि त्यावरील शिल्पकाम देखणे आहे.[८२]

**माहुली–**

कृष्णा व वेण्णा नद्यांच्या संगमावरील पवित्र क्षेत्र माहूली येथे कृष्णा नदी गावाच्यामधून वाहते. त्यामुळे श्रीक्षेत्र माहूली व संगम माहूली असे गावाचे दोन भाग पडतात. याठिकाणी श्रीमंत शाहू महाराजांची समाधी आहे. पेशवाईत नावाजलेले न्यायाधीश रामशास्त्री प्रभुणे यांचे हे जन्मगांव. येथे राणी ताराबाईचे स्मारक आहे. छत्रपती शाहू महाराजांच्या निधनानंतर त्यांची पत्नी सोयराबाई सती गेली. त्यांचे स्मरण म्हणून नदीशेजारील वाळवंटात दोन शिवलिंगे स्थापन करण्यात आलेली आहेत.[१८३]

**धावडशी**

साताऱ्याच्या वायव्येस धावडशी गाव ब्रम्हेंद्रस्वामींना १९२८ मध्ये छत्रपती शाहूंकडून इनाम म्हणून मिळाले होते. सन १९४५ मध्ये ब्रम्हेद्र स्वामी निवर्तल्यानंतर छत्रपती शाहूंनी त्यांच्या समाधीवर हे मंदिर बांधले. झाशीची राणी लक्ष्मीबाई धावडशीच्या तांबे कुटुंबातल्याच होत्या. आज ही येथे त्यांच्या वाडयाचे अवशेष पहावयास मिळतात.[८४]

**दिवशी धारेश्वर**

दिवशी येथील धरेश्वर हे महादेवाचे मंदीर प्रसिद्ध आहे. याचे पुजारी हे बहुसंख्येने जंगम आणि लिंगायत असून अविवाहित असतात. येथे गुंफा व एक झरा आहे. ही गुहा २०० फुट, ३५ फुट रूंद व ७ फुट उंच आहे. पाटणपासून अंदाजे २० कि.मी अंतरावर शंकराचे रूप असलेले हे नाईकबा मंदीर या भागात प्रसिद्ध आहे. येथे पिंडीभोवती चांदीचा मुखवटा आहे. दसरा व चैत्र पंचमीला येथे यात्रा भरते.[८५]

**बहुलेश्वर मंदिर**

बहुलेश्वर मंदिर हे गाव निसरे या गावातून ३ मैल अंतरावर आहे. हे गाव ऐतिहासिक शिवमंदिरासाठी प्रसिद्ध आहे. बहुलेश्वरांनी एका गुराख्याला दर्शन देऊन येथे लिंगाची स्थापना करण्याची प्रेरणा दिली अशी आख्यायिका आहे. दरवर्षी श्रवणी सोमवार आणि महाशिवरात्रीच्या दिवशी या मंदिरात भाविक मोठया संख्येने येतात.

**मेरूलिंग मंदिर :-**

मेरूलिंग जावली तालुक्यातील तीर्थक्षेत्र आहे. सहयाद्रीच्या पर्वतरांगेतील मेरूलिंग पर्वतावर मेरूलिंग मंदिर व मेरूलिंग गाव वसले आहे. हे गाव म्हणजे एक निसर्गरम्य व शीतल गिरीस्थान आहे.

**पाल**

तारळी नदी किनारी पाल येथे खंडोबाचे देवस्थान आहे. पुणे–बेंगलोर महामार्गावर काशीळच्या पश्चिमेस सुमारे ७ कि.मी. अंतरावर हे ठिकाण आहे. तारळी नदीच्या काठी वसलेले पाल हे गाव होय. हे गव खंडोबाच्या मंदिरामुळे प्रसिद्ध पावले आहे. चारी बाजूला तटबंदी असलेले हे हेमांडपंथी मंदिर आहे. मंदिराच्या आजूबाजूला पिंडनाग, नंदी यांची चित्रे कोरलेली आहेत. तसेच खंडोबाची दुसरी बायको बाणुबाई यांचीही मूर्ती दिसते.[८७]

**मनोरे –**

कराडमधील एक प्रेक्षणीय स्थळ मनोरे होय. हे मनोरे म्हणजे एक जुनी दगडी मशीद आहे. कराड शहरात मुस्लिम बांधवाची संख्या मोठी आहे. या मशिदीत रोज अनेक लोक नमाज पढण्यासाठी येतात. मशिदीचे बांधकाम दगडी आहे. छताजवळ बाहेरच्या चारही बाजूंना कोरीव नक्षीकाम आहे. मशिदीच्या आतमध्ये दगडी शिलालेखावर उर्दू भाषेत कोरलेला काही मजकूर

आहे. या मशिदीच्या मागे लाकडी महाद्वार असून त्याच्या दाव्या व उजव्या अशा दोन्ही बाजूंना गोलाकार दगडी जीने बांधण्यात आले आहेत. मनोऱ्यांच्या शिख रावरून कराडच्या भोवतालचा लांबवरचा परिसर दिसतो. विजापूरचा सुलतान अली आदिलशहा पहिला याच्या १५५७ च्या काळात जुनी दगडी मशीद इब्राहिमखान याने उभारली.[८८]

**अभयारण्य**

सातारा जिल्हयाच्या पश्चिम भागातील महाबळेश्वर, पाटण, वाई व जावळी या डोंगराळ भागात तुलनेने दाट वने आहेत. कोयना नदीच्या खोऱ्यत जावळी, पाटण या भागात कोयना अभयारण्य घोषित करण्यात आले. हे वन्यजीव अभयारणय असून येथे गवा, वाघ, रानडुक्कर, सांबर हे प्राणी हमखास आढळतात. सातारा जिल्हयातील मायणी तलावाच्या परिसरात पक्ष्यांसाठी राखीव असलेले अभयारण्य विकसित करण्यात आलेले आहे. चांदोली(जि.सांगली, ता.बत्तीस शिराळा) हे धरण वारणा नदीवर बांधण्यात आलेले आहे. या धरणाच्या पाणलोट क्षेत्रात चांदोली अभयारण्य हे येते. या अभयारण्यात सातारा जिल्हयातील कऱ्हाड परिसरातील ३ गावांचा समावेश होतो.

**कोयना अभयारण्य**

सातारा ज्लिहयाच्या पश्चिम भागात कोयना धरणाच्या पाणलोट क्षेत्रात कोयना अभयारण्य येते. जंगलात बुलबुल, घारराण, कोंबडा, सुर्यपक्षी हे पक्षी, हरीण, रानगवा, लांडगा, रानडुक्कर, अस्वल, वाघ हे पाणी करवंद, जांभूळ, चिंच, करंज्या, पळस, सग इ.वृक्ष विपूल प्रमाणात आढळतात. विविध प्रकारच्या वनौषधी बरोबर तमालपत्र, चारोळी, दगडफूल, कडूलिंब, दालचिनी इ.मसाल्याच्या पदार्थाच्या वनस्पती आढळतात. तापोळयापासुन शिवसागर जलाशयातून मेटवलीला जाता येते. या अभयारण्यात वासोटा हा भव्य किल्ला आहे. विस्तीर्ण अशा शिवसागर जलाशय आणि कोयना धरण यांच्या दरम्यानच्या या अभयारण्यात लांडगे, हरणे आणि वाघ आहेत.

**कास तलाव व बामणोली**

सातारापासून पश्चिमेला यवतेश्वरमार्गे २७ कि.मी.अंतरावर समुद्रसपाटीपासून १४३० मीटर उंचीवर कास पठार लागते. या तलावात अनेक नैसर्गिक झरे असल्यामुळे बारमाही पाणी असते. या तलावातून सातारा शहराला पाणीपुरवठा केला जातो. या पठारावर जांभूळ करवंदे,

फणस, आंबा, हिरडा व अनेक दुर्मिळ औषधी झाडे अस्तित्त्वात आहेत. कासपासून फक्त १२ कि.मी. अंतरावर बामणोली हे निसर्गप्रेमीचे आवडते ठिकाण आहे. नौकाविहार करण्यासाठी उत्कृष्ठ ठिकाण आहे.

**चाळकेवाडी व वनकुसवडे**

सातारा जिल्हा उर्जा जिल्हा म्हणून प्रसिद्ध पावला. तो चाळकेवाडी व वनकुसवडे पठारावरील पवनउर्जा प्रकल्पामुळे ५० मीटर उंचीच्या मनोऱ्यावरून तीन पात्यांच्या विडटर्बाईन वाऱ्याच्या गतीज उर्जेचा वापर करून विद्युत जनित्र फिरविले जाते. यात पवन उर्जा निर्माण केली जाते. आशिया खंडातील सर्वात मोठा प्रकल्प येथे साकारला जात आहे. ८५७ पवनविद्युत जनित्राच्या साहाय्याने ३१३ मॅगावॅट विज निर्माण केली जाते.[८९]

**ठोसेघर**

येथील धबधबे व सभोवतालचे निसर्ग समृद्ध वातावरण यामुळे हे ठिकाण महत्त्वाचे पर्यटन केंद्र आहे. ठोसेघरचा मुख्य धबधबा ६०० फूट खोल दरीत पडताना पाहणे रोमांचकारी आहे. धबधबा पाहताना याठिकाणी अनेक दुर्घटना घडल्या आहेत. या दुर्घटना थांबविण्यासाठी याठिकाणी निरिक्षण गॅलरी आणि संरक्षण तारेच्या भिंतीची सोय करण्यात आलेली आहे.

**महाबळेश्वर**

महाराष्ट्राचे नंदनवन समजले जाणारे ठिकाण म्हणजे महाबळेश्वर पाचगणीचा तो निसर्गरम्य परिसर होय. जुने महाबळेश्वर व नवे महाबळेश्वर असे महाबळेश्वरचे दोन भाग करण्यात आलेले आहेत. समुद्रसपाटीपासून १३७२ मीटर उंचीवर वसलेले थंड हवेचे ठिकाण व पर्यटनाचे महत्त्वाचे केंद्र कृष्णा, वेण्णा, कोयना, सावित्री व गायित्री या पाच नद्या येथून उगम पावतात. वेण्णा तलावात नौकाविहाराची सोय आहे. येथील महाबळेश्वरचे देऊळ यादव राजाने १३ व्या शतकात बांधले. छत्रपती शिवरायांनी अफझलखानाच्या तंबूवरचे कापून आणलेले हे सुवर्णकळस महाबळेश्वर मंदिरास अर्पण केले. केल्स पॉईंट, एल्फिन्स्टन पॉईंट, कॅरनट पीक हंटर पॉईंट, एको पॉईंट,ऑर्थरसीट पॉईंट, विडो पॉईंट, चायनामन धबधबा, फाक लेड पॉईंट, कसलरॉक व सावित्री पॉईंट, मार्झोरी पॉईंट, नॉर्थकोर्ट पॉईंट, लॉडविक पॉईंट, बॉम्बे पॉईंट, विल्सन पॉईंट व माखरिया पॉईंट हत्तीचा माथा इत्यादी पॉईंट आहेत. निसर्गाची विविध रूपे पाहण्यासाठी या ठिकाणी सामान्यापासून ते पदाधिकाऱ्यापर्यंत अनेक व्यक्ती येतात.

महाबळेश्वरास बालकवींनी निसर्गदेवतेला पडलेले सुंदर स्वप्न असे म्हटले आहे. या ठिकाणी मधुमक्षिका पालन केंद्र आहे. विल्सन पॉईंटजवळ गहू गेरवा संशोधन केंद्र आहे. येथे गव्हावरील तांबेरा रोगाचा अभ्यास व संशोधन चालते.[१०]

क्षेत्र महाबळेश्वर येथील एका कडयावर सर्वात प्राचीन असे हेमाडपंथी शिवमंदीर आहे. त्यात ठेवलेल्या कृष्णेच्या मूर्तीमुळे त्याला कृष्णाबाई मंदिर असेही म्हणतात. याठिकाणी अतिमहाबळेश्वर व महाबळेश्वरही दोन मोठी शिवमंदिर बांधलेली आहेत. इ.स.१२१५ मध्ये यादवराज्यांनी बांधलेल्या या हेमाडपंथी मंदिराजबळ चंद्रराव मोरे यांनी पंचगंगा मंदिर बांधले त्यात कृष्णा, सावित्री, वेण्णा, कोयना, गायत्री या पाच नव उगम पावल्या आहेत. षा मंदिरामुळेच याला तीर्थक्षेत्राचा दर्जा प्राप्त झाला आहे.

**जुने महाबळेश्वर**

सातारा जिल्हयात महाबळेश्वर व पाचगणी ही भारतातील सुप्रसिद्ध थंड हवेची ठिकाणे आहेत. ब्रिटिश काळात महाबळेश्वरही मुंबई प्रांताची उन्हाळयातील राजधानी होती. ब्रिटिश अधिकारी लॉडविक यांनी या स्थानाचा प्रथम विकस केला. सहयाद्रीच्या रांगेत वसलेल्या महाबळेश्वर गावाचे ग्रामदैवत महाबळी आहे. या महबळीचे मंदीर यादवकाळात यादवराजांनी बांधले. छत्रपती शिवाजी महाराजांनी या मंदिराचा जीणोद्धार केला. महाबळी या नावावरुन आसपासच्या वस्तीचे महाबळेश्वर असे नामकरण झाले. अशी कथा प्रचलित आहे. पश्चिम घाटाची डोंगररांग, उंच कडे, खोल दऱ्या, दाट जंगले याचे विपुल प्रमाण महाबळेश्वरमध्ये असून ब्रिटिश काळापासून काही मुलभूत सोयी सुविधांच्या विकास येथे झालेला आहे. महाबळेश्वर हे समुद्रसपाटीपासून सुमारे १३७२ मीटर उंचीवर असून या उंचीवर पठारावर वसलेले आहे. येथील लिंगमाळा धबधबा, विल्सन पॉईंट, एल्फिन्स्टन पॉईंट, बॉम्बे पॉईंट, लॉडविक पॉईंट, ऑर्थर सीट, वेण्णा तलाव इत्यादी ठिकाणे प्रेक्षणीय आहेत. महाबळेश्वरजवळ क्षेत्रमहाबळेश्वराचे (महादेवाचे मंदीर आहे. महाबळेश्वरपासून सुमारे २० कि.मी. अंतरावर असलेले पाचगणी हेही जगप्रसिद्ध पर्यटनस्थळ असून याला लाभलेल्या निसर्ग संपन्नतेमुळे भारतातील स्वित्झर्लंड म्हटले जाते. ब्रिटिश काळापासून महाबळेश्वराला लाबलेला उत्कृष्ट हिल स्टेशन हा लौकिक आजही कायम आहे. समुद्रसपाटीपासून १.३७२ मीटर उंचीवर पश्चिम घाटांच्या रांगेत वसलेले महाबळेश्वर हे थंड हवेचे व सहलीचे निसर्गरम्य ठिकाण आहे. सहयाद्रीच्या पठारावर वसलेल्या

या ठिकाणी चांगली घटनदाट वनश्री आहे. महाबळेश्वर येथील महाबळेश्वर येथील महाबळेश्वर मंदिर लागून असलेले जावळीचे खोरे आणि प्रतापगड या स्थळांना शिवरायांच्या नावाचा व कर्तृत्त्वाचा ऐतिहासिक सम्दर्भ आहे. महाबळेश्वरला पावसाचे प्रमाण खूप असून पावसाळयात हा परिसर जलमय असतो. येथील निसर्ग स्टॅनबेरीज, रासबेरीज, जांभळ, लाल रंगाचीमुळे प्रसिद्ध आहेत. महाबळेश्वरचा मध तर खूपच चविष्ट आणि प्रसिद्ध आहे. गुलकंदही येथे मोठया प्रमाणावर मिळतो. अतिशय नैसर्गिक देखाव्यासाठी हे स्थान प्रसिद्ध आहे.

**नवे महाबळेश्वर**[११]

कोयना धरणाचा शिवसागर जलाशय व कांदाटी घनदाट जंगलांच्या परिसरात नवे महाबळेश्वर आहे.

**विल्सन पॉईंट–**

महाबळेश्वर मधील महत्त्वाचा व उंच पॉईंट म्हणजे विल्सन पॉईंट या पॉईंटवर तीन बुरूज आहेत. पहिल्या बुरुजच्या दक्षिणेकडे पोलो ग्रांऊंड, मकरंदगड आणि कोयनाखोऱ्याचा आसमंत दिसतो. दुसऱ्या बुरूजावर प्रातःकाली आल्यास सुर्योदयाचे अप्रतिम दर्शन घडते. पूर्वेला पाचगणी दिसते. तिसऱ्या बुरूजावरून उत्तरेकडील क्षेत्र महाबळेश्वर एल्फिन्स्टन पॉईंट, कॅनॉट पॉईंट, खालचे रांजणवाडी गाव आणि वेण्णा नदीचे खोरे दिसते.

**बॉम्बे पॉईंट**

जुन्या मुंबई रस्त्याजवळ हा पॉईंट असल्याने याला बॉम्बे पॉईंट हे नाव पडले. पर्यटकांच्या सर्वात आवडत्या पॉईंटपैकी हा एक पॉईंट आहे. अस्ताला जाणाऱ्या सूर्याचे दर्शन हे या पॉईंटचे खास आकर्षण आहे. त्यामुळे सूर्यास्ताच्या अगोदर या पॉईंटजवळ भरपूर घर्दी होते. यालाच सन सेट पॉईंट म्हणतात.

**हत्तीचा माथा :–**

याचे अंतर सहा कि.मी.एवढे आहे. पर्वत शिखरांचे हे पश्चिमेकडील सर्वात लांबचे टोक आहे. याची रूंदी ३.७ मीटर असून याची खोली कोयना खोऱ्यापर्यत सुमारे ८०० मीटर इतकी आहे. त्यामुळे या पॉईंटचा आकार हत्तीचा माथा आणि सोंडेसारखा दिसतो. समोर प्रतापगड स्पष्ट दिसतो.

**ऑर्थर सीट व विडो पॉईंट :-**

महाबळेश्वराच्या कडयावरती असलेला ऑर्थर सीट नावाचा सर्वात प्रेक्षणीय असा पॉईंट आहे. ऑर्थर मॅलेट याच्या स्मरणार्थ या पॉईंटला हे नाव देण्यात आले आहे. या कडयावरून डाव्या बाजूला सावित्रीच्या खोऱ्याचे खोलकडे दिसतात. तर उजव्या बाजूला घटनदाट अन्य दिसते. सर्वत्र दूरवर पर्वतशिखरे दिसतात. तोरणा, रायगड, कांगारी हे किल्ले दिसतात. शिखरे तरंगणाऱ्या ढगांनी झाकलेली दिसतात. ऑर्थर सीटकडे जाताना टायगर स्प्रिंग नावाचा झरा लागतो. येथे सर्व ऋतुत पाण्याचा प्रवासवहतो. सावित्री नदीचा गुप्त प्रवाह येथे प्रकट होतो. ऑर्थर सीटपासून खाली २०० फुट अंतरावर विंडो पॉईंट आहे. येथे दगडांची खिडकीसारखी नैसर्गिक रचना पाहावयास मिळते.

**वेण्णा लेक व प्रतापसिंह उद्यान**

महाबळेश्वर पाचगणी रोडवर २.५ कि.मी. अंतरावर वेण्णा नदीचे पाणी साठल्याने निर्माण झालेला वेण्णा तलाव आहे. येथे पर्यटकांना नौकानयन व जलविहाराचा आनंदही घेता येतो. घोडयावरून रपेट मारता येते. या तलावाच्या मागे घनदाट अरण्यही आहे. तर शेजारी रस्त्याला लागूनच प्रतापसिंह उद्यान आहे. तेथे अनेक शोभिवंत फुलझाडे आणि वृक्ष आहेत.[१२]

**कोयना धरण**

पाटण तालुक्यातील हेळवाक या गावाजवळ कोयना धरण आहे. डोंगररांगांनी निर्माण झालेल्या खोल दरीत कोयना नदीत अडवून हे प्रचंड धरण बांधण्यात आले आहे. या धरणाजवळ वसलेल्या वस्तीवजा गावाला कोयनानगर असे म्हणतात. महाराष्ट्राला वरदान ठरलेले कोयना धरणाच्या हे विशाल शिवसागर जलाशयात १३ मार्च १९९९ ला लेकटॅपिगचा यशस्वी प्रयोग करण्यात आला. या धरणावर चार टप्प्यामध्ये विद्युतनिर्मिती करण्यात येते. विद्युत केंद्र पाहण्यासाठी कुंभार्ली घाट उतरून पायथ्याच्या पोफळी या गावी जावे लागते. इथल्या विद्युतनिर्मितीमुळे हे धरण म्हणजे महाराष्ट्राची भाग्यलक्ष्मी म्हणतात. जलाशयाच्या खालून चार कि.मी.चा बोगदा तयार करून त्यातून पाण्याचा प्रवाह नेऊन वीजनिर्मिती करण्यात आली आहे. पोफळी येथे विद्युतनिर्मिती केंद्र आहे. कोयनानगर परिसरात नवनिर्मित भव्य नेहरू स्मारक उद्यान आहे.

**तापोळा**

यालाच महाराष्ट्राचे मिनी काश्मीर म्हणतात. हे प्रसिद्ध आहे ते येथील नौका विहारासाठी बाजूला असलेली घनदार झाडी व उंच डोंगर व त्यामध्ये असणारा विस्तीर्ण असा शिवसागर जलाशयाच्या फुगवटयाची शेवटची बाजू होय. या जलाशयाच्या काठावर डोंगर पायथ्याशी अनेक छोटी–छोटी खेडी वसलेली आहेत. त्यामध्ये तापोळयाबरोबर बामणोली, खरसुंडी, पावशेवाडी इ.गावांचा समावेश आहे. या गावांना लॉचेस शिवाय दळणवळणाचा दुसरा मार्ग नाही. तापोळयाला जाण्यासाठी दुतर्फा झाडी असलेला एक पदरी पक्का डांबरी रस्ता आहे. तीव्र उताराचा वळणावळणाचा रस्ता उतरताना गर्द झाडांनी भरलेले डोंगर पाहून मौज वाटते.[९३]

**मायणी इंदिरा गांधी पक्षी अभयारण्य**

मायणी या ठिकाणी असलेला तलाव हा १०० वर्षपेक्षा ही जुना आहे. या दुष्काळी भागातील शेतीला पाण्याची सोय व्हावी या उद्देश्याने हा तलाव बांधण्यात आला. वनखात्याच्यामार्फत या तलावाच्या सर्वत्र मोठया प्रमाणावर वृक्ष वाढवून या परिसराचे अभयारण्यात रूपांतर केले आहे. म्हणजेच या ठिकाणी पक्षांसाठी विविध प्रकारचे खाद्य आणि निवाऱ्यासाठी उंच झाडी व झुडपे अशी अनुकूल परिस्थिती निर्माण झाल्यामुळे केवळ देशातीलच नव्हे तर परदेसातील नाना प्रकारचे पक्षी या ठिकाणी हिवाळयात निवाऱ्यासाठी येतात. यामध्ये गरूड, ससाणा, फ्लेमिंगो(रोहित विविध जातीची बदके) सारस (कारकोचे) इ.पक्षांची संख्या मोठी असते. पाण्यात बुडया मारणारे पाणबुडे तसेच पाण्याबरून पळत जाणारे नाम्या पक्षी येथे पाहायला मिळतात. १.५ हेक्टर परिसरात हे विस्तारलेले हे इंदिरा गांधी पक्षी अभयारण्य होय.[९४]

**वीर धरण**

नीरा नदीवर वीर  या गावाजवळ ब्रिटिशांनी एक धरण बांधले असून ते वीर धरण या नावानेच प्रसिद्ध आहे. या धरणाच्या जलाशयाला येसाजी कंक जलाशय असे नाव दिले आहे. शिवाजी महाराजांचा शूर सेनानी म्हणून येसाजी कंक ओळखले जातात. या धरणामुळे मोठे जमीन क्षेत्र सिंचनाखाली आहे.[९५]

## वस्तूसंग्रहालये

### औंध वस्तूसंग्रहालय

बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांनी ८ हजारपेक्षा जास्त वस्तू असलेले हे वस्तूसंग्रहालय १९३८ साली बांधले. विविध प्रदेशात निर्माण झालेली व त्या त्या प्रदेशाची वैशिष्टय सांगणारी चित्रे, संगमरवरातून कोरलेलीशिल्प, कोरीव काम केलेली धातूची, लाकडाची वस्तू, हस्तीदंत कोरीव कलाकृती आणि स्ट्राँगरूमधील दुर्मिळ मौलिक ऐतिहासिक रत्न यांचे दुर्मिळ दर्शन या ठिकाणी पहावयास मिळते. ते महाराष्ट्र शासनाच्या पुरातत्त्व वस्तुसंग्रहालय विभागाच्या ताव्यात आहे.[९६]

### छत्रपती शिवाजी वस्तूसंग्रहालय

सातारा या जिल्हयाचे ठिकाणी शेतकरी निवास येथे या संग्रहालयाची सुरूवात सन १९६७ साली करण्यात आली. याठिकाणी दुर्मिळ ऐतिहासिक पुरातन वस्तूंचा संग्रह आहे. हे संग्रहालय पुरातत्त्व खात्याच्या अंतर्गत आहे. या संग्रहालयात प्रामुख्याने वस्तु, साधने, शस्त्रे आणि पोशाखांचा संग्रह आहे. येथे भाले, कटयारी, खंजीर शिरस्त्राणे, चिलखते, तलवारी, तोफगोळे, वाघनखे, बंदुकांचे प्रकार, दारूच्या पुडयाच्या शिंगाडा, रणशिंग, जेडची मूठ, बिचवा, पालखीच्या दांदयावरील मानचिन्हे, सोनसळी, पडदे, गुप्तीचे प्रकार, संगीनी, अंकुश, परशु, गुप्ती, धनुष्यबाण, किल्ल्याचा दरवाजा फोडणयसाठी हत्तीकडून वापरावयचे शस्त्र, पिस्तुले इ. विविध प्रकारची युद्ध साहित्य व साधने येथे मांडलेली आहेत. वस्त्र विभागामध्ये अंगरखा, पैठणी, फेटे, बख्तर, बाहू आच्छादने, जरिबुट्टीचे कपडे, साडया, तुमान अनेक प्रकारच्या पगडया, शेला इ. समावेश होतो. शिवाजी महाराजांची आजपर्यंतची वंशावळ या संग्रहालयामध्ये लावली आहे.[९७]

### सातारा शहरातील इतर महत्त्वाची स्थळे [९८]

#### चार भिंती :

अजिंक्यताऱ्यालगत असलेल्या टेकडीवर चारभिंती येथे १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धात आहुती देणाऱ्या वीरांच्या स्मरणार्थ स्मारक उभारण्यात आला हाो. हा स्तंभ ३० फूट उंचीचा असून त्याभोवती चारी बाजूंना १० फूट उंचीच्या चारभिंती आहेत. स्मारक स्तंभांच्या डाव्या

बाजूवर १८५७ च्या धामधुमीतला हिंदुस्थानचा नकाशा तर उजव्या बाजूला भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील ठळक घटना इसवीसनासहित दिल्या आहेत.

**जुना राजवाडा**

छत्रपती प्रतापसिंह महाराज (पहिले) यांनी हा वाडा बांधला. सध्या या वाडयात जिल्हा परिषदेचे प्रतापसिंह महाराज(पहिले) यांच्या नावाने प्रतापसिंह हायस्कूल सुरू आहे.

**नवा राजवाडा–**

आप्पासाहेब महाराज यांनी जुन्या राजवाडयाला लागूनच नवा राजवाडा बांधला आहे. या वाडयात पूर्वी कोर्टाचे कामकाज चालत असे.

**नटराज मंदिर :**

दक्षिणात्य शैलीचे उत्तर चितंबरम हे चार गोपुराचे मंदरि कृष्णानगर या ठिकाणी आहे. शामराव शानभाग यांनी हे मंदरि स्वखर्चातून बांधले आहे. मूर्तीप्रतिष्ठापना कांची पीठाचे अधिपती श्री.नरेंद्र सरस्वती यांचे हस्ते करण्यात आली. या मंदिरात नटराजाची पंचधातूची साडेचार फुटी उंचीची मूर्ती आहे. मंदिर समुहाच्या भोवताली चौकोनी आकाराची उंच तटभिंत आहे. तटभिंतीला चार मुख्य दिशांना प्रत्येकी पासष्ट फूट उंचीची चार गोपुरे आहेत. त्यांच्या बांधकामासाठी महाराष्ट्र, कर्नाटक, तामिळनाडू आणि आंध्रप्रदेश सरकारने खर्च दिल्याने त्यांना त्यांची नावे देण्यात आली आहेत.

**श्री.कुरणेश्वर मंदिर**

पहिले बाजीराव पेशवे यांचे मेहुणे कृष्णाजी चासकर यांनी १७२३ मध्ये हे दगडी मंदिर बांधले. शहराच्या पश्चिमेला बोगद्याच्या बाहेर १.५ किलोमिटरवर खिंडीच्या गणपतीचे देवस्थान आहे. याठिकाणी गणपतीची स्वयंभूमूर्ती असून हा परिसर कुरणेश्वर या नावाने ओळखला जातो.

**धननीची बाग शाहू बोर्डींग**

सन १९२४ साली सातारा शहरामध्ये कर्मवीर भाऊराव पाटील यांनी छत्रपती शाहू बोर्डींग हाऊस नावाचे छात्रालय सुरू करण्यात आले. कमवा व शिकाा या योजनेद्वारे स्वावलंबनाचे आणि शिस्तीचे संस्कार या छात्रालयातील विद्यार्थ्यांवर केले जाऊ लागले. ते ठिकाण म्हणजेच धननीची बाग व शाहू बोर्डींग होय.

**शहरातील इतर ठिकाणे :**

या महत्वपूर्ण ठिकाणांशिवाय प्रतापसिंह उद्यान, शाहू उद्यान, भैरोबा मंदिर, गारेचा गणपती, पंचमुखी गणपती, ढोल्या गणपती, गोल मारूती, फाशीचा वड, शाही मस्जिद, अवर लेडी ऑफ हेल्थ चर्च, फुटके तळे, क्रांतीस्तंभ ही प्रेक्षणिय स्थळे आहेत.

**कराड शहर परिसरातील इतर महत्त्वाची स्थळे**[९९]

**कृष्णाघाट**

कराड शहराच्या उत्तरेकडे कृष्णा कोयनेचा संगम झालेला आहे. यशवंतराव चव्हाणांची समाधी येथेच आहे. या समाधीजवळ एक सुंदर उद्यान तयार करण्यात आले आहे. उद्यानात सर्वत्र हिरवळ, फुलझाडे, शोभेची झाडे तसेच अनेक डेरेदार वृक्ष आहेत. त्यामुळे हा परिसर रमणीय दिसतो. या उद्यानात एका बाजूला लहान मुलांना खेळण्यासाठी घसरगुंडी, झोपाळे तसेच अनेक नवनवीन खेळ बसविण्यात आले आहेत. या उद्यानत सर्वांना मोफत प्रवेश मिळतो. या समाधीचे दर्शन घेण्यासाठी स्थानिक जनतेबरोबरच पर्यटक व राजकीय नेते मंडळीचीही वर्दळ वाढली आहे. सर्वात जुने मंदिर रत्नेश्वराचे याच घाटावर आहे. या मंदिरावर मुस्लिम शिल्पकलेप्रमाणे ४ मनोरे व हिंदू कलेप्रमाणे कळस या मंदिरावर बघायला मिळतो. कृष्णामाईच्या देवीची यात्रा चैत्र वद्य १ व शेवटच्या श्रावणी सोमवारी भरते.

**सागरेश्वर**

कराड तासगाव रोडवर यशवंत घाटाच्या पायथ्याला २२ मंदिरांचा परिसर आहे. किर्लोस्करवाडी ते देवराष्ट्रे जवळील १०८८ चौ.हेक्टर क्षेत्रात हे अभयारण्य विस्तारले आहे. यात सागरेश्वर, कुबेर, कपिलेश्वर, त्र्यंबकेश्वर, नागेश्वर, रामेश्वर यांची मंदिरे आहेत. कर्कोटक नावच्या ऋषींचीही समाधी येथे आहे. सगरेश्वर अभयारण्यात काळवीट, हरिण, मोर, ससे, लांडगे, हे प्राणी बघायला मिळतात. प्रमुख्याने हे अभयारण्य हरिणासाठी प्रसिद्ध आहे.

**वाई शहर परिसरातील इतर महत्त्वाची स्थळे**[१००]

**रायरेश्वर**

रायरेश्वर डोंगरावरील रायरेश्वर मंदिरात आपल्या मावळयासमवेत हिंदवी स्वराज्य स्थापनेची शपथ घेतली होती. गडावरून वाई व भोरचा परिसर तसेच पश्चिमेस कोकण प्रांतातील सावित्री नदीचे खोरे दृष्टिस पडते.

**धोम**

वाईपासून ९ कि.मी.अंतरावर असलेले धोम धरण येथेच कृष्णा नदीच्या काठावर बांधलेले महादेवाचे मंदीर पाहण्यासारखे आहे.

**काळूबाई मंदिर मांढरदेव**

महाराष्ट्रामध्ये प्रसिद्ध असलेले व लाखो भाविकांचे कुलदैवत असलेले काळूबाईचे ठाणी मांढरदेवी डोंगराव आहे. डोंगराच्या पठारावर मांढरदेव हे गाव आहे. या पठाराची समुद्रसपाटीपासूनची उंची ४५१७ फूट आहे. काळूबाईचे मंदीर ३५० वर्षापूर्वीचे आहे.

**मेणवली**

कृष्णा नदीकाठी असलेले मेणवली गावात पेशवाईतील एक मुत्सद्दी व राजकारणी नाना फडणवीस यांचा गढीचा वाडा आहे. कृष्णा नदीच्या काठावरील घाट व मंदीर प्रेक्षणिय आहेत. घाटावरील एका छोटया मंदिरात भली मोठी धातूची घंटा अडकविली आहे. वसई युद्धातील विजयानंतर चिमाजी आप्पा यांनी येथील किल्ल्यावरून १ क्विंटल वजनाची घंटा येताना विजयचिन्ह म्हणून आणली होती. नदीकाठावरील घाट चंद्रकोरी आकाराचा असून मेणवलेश्वराचे प्राचीन मंदिर आहे.

**रेशीम केंद्र**

वाईपासून २ कि.मी.अंतरावर पाचगणी घाटात रेशीम उत्पादन केद्र आहे. या केंद्रात रेशीम धागा तयार केला जातो. तसेच जिल्हयातील रेशीम उद्योग विस्तार कामे केली जातात. येथे ८ एकर क्षेत्रावर तुतीची लागवड असुन त्यावर रेशीम किडे पोसले जातात. या किडयांच्या कोशापासून धागा काढला जातो.

**कोरेगाव परिसरातील इतर महत्त्वाची स्थळे**[१०१]

**मारूती मंदीर जरंडेश्वर :–**

सातारा कोरेगाव मार्गाच्या मध्यावर जांब बु।। गावामध्ये जरंडेश्वर डोंगर आहे. या डोंगरावर मारूतीची स्थापना समर्थानी केली असून मारूतीचे मंदिर, मंडप, धर्मशाळा, गोविंदबाबा सिधये नावाच्या हनुमान भक्ताने बांधला अशी अख्यायीका आहे कि जेव्हा हनुमंताने लक्ष्मणाला वाचविण्यासाठी हिमालयातील संजिवनी बुटी आणली त्यावेळी त्याने संपुर्ण

पर्वत उचलून आणला. त्यावेळी त्या पर्वतातील एक खडा पडला तो खडा म्हणजे जरंडेश्वर होय आणि या डोंगराचे वैशिष्ठय म्हणजे येथे अनेक औषधी वनस्पती आढळतात.

**गोपाळनाथ समाधी, त्रिपुटी**

नाथसिद्ध श्री गोपाळनाथ महाराजांच्या वास्तव्यामुळे पवित्र झालेले त्रिपुटी गाव होय. या ठिकाणी गोपाळनाथाची समाधी व मठ आहे. गोपाळनाथांनी वेदान्त शिरोमणी हा ग्रंथ लिहिला. त्यांच्या हैबती नावाच्या शिष्याने नाथलीला विलास हा ग्रंथ लिहून त्यामध्ये गोपाळनाथ यांचे सविस्तर वर्णन केले आहे.

**यमाई मंदिर**

औंध गावाशेजारी मूळ पीठ नावाचा ८०० फूट उंचीचा डोंगर आहे. त्यावर औंधची ग्रामदेवता तसेच प्रतिनिधी घराण्याची कुलदेवता यमाईदेवी मदिर आहे. यमाईदेवी महाराष्ट्रातील पंचमहादेवतापैकी एक आहे.

**सातारा परिसरातील लेणी:**

सातारा परिसराला फार मोठा प्राचिन इतिहास लाभलेला आहेत. आजच्या सातारा जिल्हयाच्या भुप्रदेशाची प्राचीन परंपरा अभ्यासली असता त्यात या प्रदेशाचे प्राचीनत्व सिध्द करणाऱ्या अनेक बाबी समोर येतात. या इतिहासाची साक्ष दर्शवणारी पुरापुराश्मयुगिन, मध्यपुराश्मयुगिन, व उत्तरपुराश्मयुगिन हत्यारे विविध ठिकाणी सापडलेली आहेत. प्रारंभिक ऐतिहासिक कालखंडानंतर या प्रदेशावर सातवाहन राज्यकर्त्यांची सत्ता आल्याच्या नोंदी ठळकपणे दिसतात.या भुप्रदेशात अनेक ठिकाणी सातवाहन काळात व त्या नंतरच्या कालखंडात अनेक लेणी, मंदीरे उभारण्यात आलेली आहेत. प्रस्तूत शोधनिबंधात मी याच काळातील लेण्यांची निर्मीतीचे संशोधन करण्याचा प्रयत्न करणार आहे.प्रस्तूत भुप्रदेशातील लेण्यांचा अभ्यास करण्यापुर्वी आपण 'लेणी' म्हणजे काय? याचा आढावा घेणे गरजेचे आहे.

**लेणी** :

लेणी म्हणजे डोंगरातील खडक फोडून तयार केलेली गुहागृहे होय. प्राचीन काळात बौध्द भिक्षू वर्षावासासाठी म्हणजे पावसाळी निवासासाठी अशा गुहागृहातून राहत असत.[१०२] आरंभी या गुहा अनलंकृत असाव्या परंतू पुढे त्यामध्ये शिल्पे व मुर्ती खोदण्यात आल्या तसेच भिंतिंवर विविधरंगी चित्रे रेखून त्या सुशोभित करण्यात आल्या.अशा प्रकारे आधी ओक्याबोक्या

वाटणाऱ्या या गृहांवर ही चित्रांची व शिल्पांची लेणी चढवली गेली. बौध्द लोक या गुहागृहांना 'लेण' या शब्दाने संबोधित असत.बहुतेक प्रत्येक लेण्यात ते लेणे कोणी खोदविले त्याचा नामनिर्देश असतो.नाशिकजवळच्या पांडवलेण्यात 'लेण' हा शब्द प्रथम आलेला दिसतो.ि तथे म्हटले आहे की, 'एतच लेण महादेवी महाराज माता महाराज पतामही ददाती निकायस महावनियान भिक्षू संघस'. ' लेण' हा शब्द संस्कृत लयन = गृह या शब्दावरून आला आहे.[१०३] सातवाहन व त्यानंतरच्या कालखंडात भारताचा परदेशांसोबत चालणाऱ्या सामुद्रीक व्यापारामधील फार मोठा हिस्सा महाराष्ट्रातील बंदरांचा होता यास्तव येथील व्यापारी मंडळी अतिशय धनवान होती. याचप्रमाणे महाराष्ट्रातील बहुजन समाजाचे सहकार्य आणि महाराष्ट्रतील धार्मिक सहीष्णूता या सर्व कारणांचा परिपाक म्हणजे या परिसरात मोठया प्रमाणावर धार्मिक लेणी खोदण्यात आली. भारतात एक सहस्त्र लेणी आहेत. यामध्ये ब्राम्हणी, जैन व बौध्द लेणी आहेत व बौध्द लेण्यांची संख्या अधिक आहे. महाराष्ट्रातील एकसंध व कणखर दगडांचा सह्याद्रीचा परिसर नऊशे लेण्यांनी समृध्द आहे.[१०४] धार्मिक लेण्यांचे मुख्यत्वे तीन वर्ग बौध्द, जैन आणि ब्राम्हणी मानले जातात.

**कराडची लेणी :**

कराडजवळची सर्व लेणी बौध्दधर्मीय आहेत त्याचप्रमाणे ती बौध्द धर्मातील एक प्रमुख पंथ हीनयान (थेरवादी) आहेत. यातील सहा चैत्यगृहे असून बाकी विहार आहेत. हीनयान पंथीयांची सर्व लक्षणे या लेण्यांमध्ये आहेत ती पुढीलप्रमाणे १.मोठया हॉलमध्ये खांब नाहीत २.खोदकामात ओबडधोबडपणा ३.चैत्याचे विशेष स्वरूप ४.सर्व गुहागृहामध्ये असलेला शिल्पांचा अभाव. या लेण्यांची रचना गुहांच्या प्रवेशव्दाराजवळ एक व्हरांडा, उभे खांब व नंतर हॉल अशी रचना आहे. हॉलमध्ये बाके आहेत.काही ठिकाणी स्तूप आहेत. प्राचीन काळी नालंदा, तक्षशिला व मगध ही प्रमुख विश्वविद्यालये होती. त्यापैकी मगध विश्वविद्यालयाची शाखा आगाशिवांतील कऱ्हाडच्या लेण्यांत होती. डोंगराच्या पायथ्यालगत जखिणवाडी गांव आहे.जखिणवाडी हा 'यक्षिणवाटीका' या शब्दाचा अपभ्रंश दिसतो. बौध्द धर्मात 'यक्षयक्षिणीचे' अस्तित्व मानले जाई.सदर गावाच्या नावावरूनही आगाशिवच्या लेण्यांतील बौध्दभिक्षूंच्या वास्तव्याची पुष्टी मिळते.[१०५]

**लेण्यांकडे जाण्याचा मार्ग :**

कराडजवळची ही लेणी राष्ट्रीय महामार्ग क्रमांक चार पासून अतिशय जवळ आहेत.या लेण्याकडे जाण्यासाठी साताऱ्यावरून कोल्हापूरच्या दिशेने जात असताना कराडजवळ रस्त्याच्या उजव्या दिशेला आगाशिवचा डोंगर लागतो व याच ठिकाणी ही लेणी आहेत. आगाशिवच्या लेण्यांकडे जाण्याचे प्रमुख तीन मार्ग आहेत. १.पुणे बेंगलोर हायवेवरून ढेबेवाडी रस्त्याने चचेगांव ओढयापासून वर जाता येते. २.किर्लोस्कर कारखान्याच्या दक्षिणेकडे जावून काही लेणी पाहता येतात. ३.जखिणवाडीच्या पश्चिमेकडील डोंगर चढून भैरव दऱ्यातून लेणी पाहता येतात. दगडांच्या ओबडधोबड पायऱ्या व पायवाट आहे.या मार्गे जाताना आगशिव देवतेचे दर्शन घेता येते.[१०६]

**लेण्यांचा कालखंड :-**

कराडची लेणी ही बौध्द काळचा महत्त्वपूर्ण इतिहास व्यक्त करतात. बौध्दलेणी खोदण्याचे मुख्यत्वे दोन टप्पे मानले जातात. पहिला टप्यातील हीनयान लेणींची सुरूवात इसवीसनपुर्व दुसऱ्या शतकात झाली आणि या टप्प्याचे काम संपले ते इसवीसनाच्या दुसऱ्या शतकात.दुसऱ्या टप्प्यातील महायान लेणीचा प्रारंभ इसवीसनाच्या पाचव्या शतकात झाला असे मानले जाते. या अनुषंगाने अभ्यासकांपुढील प्रश्न असा की, या दोन टप्प्यांच्या मधल्या काळातील परिस्थिती या संदर्भात काय होती, कशी होती हा आहे आणि यावेळी कराड येथील लेण्यांचे महत्व लक्षात येते.बरीचशी लहान आकाराची लेणी, स्तंभ विरहीत चैत्यगृहे व मंडप, सपाट छत, खोदलेल्या खोल्यातील कोरलेले मंचक, स्तूपांचे प्राथमिक आकार, चौकोनी स्तंभयुक्त ओवऱ्या आणि शिल्पविरहीतता व अनलंकृतता या सगळयांचा संकेत या लेणी ख्रिस्ताब्दाच्या पहिल्या काही शतकातील असावीत असा होतो.[१०७]

**लेण्यांची विभागणी :**

आगशिवची लेणी ही प्राचीन काळी डोंगरात कोरलेली ६५ पेक्षा अधिक लेणी आहेत.त्याची स्थलसापेक्ष तीन गटात विभागणी केली जाते. सर बार्टल फ्रेअर यांनी या लेण्यांची पहिली नोंद करून पुढीलप्रमाणे तीन गटात केलेली विभागणी स्वीकारार्ह मानली गेली आहे.१) जखिणवाडीची लेणी : ही एकुण २३ लेणी येथील डोंगराच्या दक्षिणेकडील बाजूला असून कराडपासून सुमारे ६ कि.मी. अंतरावर पश्चिमेस आहे. २) आगशिवची लेणी : आगशिव

डोंगराच्या एका कडयाच्या उत्तरेकडील बाजूला कोयनेच्या दरीकडे तोंड करून आहेत, ती १९ लेणी. ३)विखुरलेली लेणी : या गटातील लेणी आजूबाजूस विखुरलेली असून कोयना खोऱ्याकडे तोंड करून आहेत, ती एकुण २२ आहेत.[१०८] याचप्रमाणे चचेगाव परिसरातील चार लेणी, कपारीवजा लेणी, आणि पिण्याच्या पाण्याची खोदलेली टाकी आहेत. ही सर्व लेणी कराड परिसरात कराडपासून ४ ते ७ कि.मी.अंतरावर असल्याने त्यांना कराडची लेणी असेच संबोधले जाते. प्राचीन मगध विद्यापीठाची एक शाखा आगाशिव लेण्यात होती.[१०९]

**१) जखिणवाडीची लेणी :**

याठिकाणी सर्व लेण्यांची माहीती देणे अशक्य असलेने मी मला जी लेणी महत्वाची वाटली त्यांची या ठिकाणी माहीती देत आहे.**लेणे क्र.१ :** हे लेणे म्हाणजे एक छोटा विहार आहे.दर्शनी बाजूला ओवरी त्यापुढे सभामंडप असून त्याच्या पाठीमागील भिंतीमध्ये एक ओटा आहे.त्याही मागे दोन खोल्या खोदलेल्या असून त्यात मंचक खोदलेले दिसतात. **लेणे क्र.५ :** या लेण्यामध्ये हीनयान पंथीयांच्या उत्तरकालखंडातील घटकांचे दर्शन घडते.हे एक चैत्यगृह आहे. भारतीय पुरातत्व विभागाने याला नव्याने ६ वा क्रमांक दिलेला आहे. या चैत्यगृहाचा प्रवेश नैऋत्य दिशेला आहे. आत स्तूप असून अधिष्ठानावर अर्धाण्ड, हार्मिका, छत्रदंड, आणि छत्र अशी स्तूपाची रचना आहे. स्तंभविरहीत तरीही चापाकृती चैत्यगृहाचे हा एक उत्तम नमुना आहे.[११०] या प्रमुख लेण्यांच्या शिवाय या ठिकाणी लेणे क्र.०६, ११, १२, १६, ही लेणी पाहण्यासारखी आहेत.

**२) आगशिवची लेणी :**

या दुसऱ्या गटात एकुण १८ लेणी असून या गटातील लेण्यांचा प्रवेश हा कोयना नदीच्या खोऱ्याच्या दिशेने आहे. **लेणे क्र.२४ :** या गटातील पहीले लेणे हे आहे. हा एक विहार आहे. या ठिकाणी ओवरी आणि मंडप आहे ओवरीला दोन चौकोनी असणाऱ्या अनलंकृत असणाऱ्या स्तभांनी आधार दिलेला होता.या ठिकाणच्या मंडपाच्या उजवीकडील भिंतीत चार खोल्या, मागच्या भिंतीत तीन खोल्या आणि डावीकडील भिंतीमध्ये एक खोली खोदण्यात आलेली आहे. **लेणे क्र.२९ :** हे लेणे अक्षम्य दुर्लक्षामुळे खराब झालेले आहे.याची मधली भिंत पडल्यामुळे दोन लेणी एकत्र आलेली दिसतात. या लेण्यात चार खोल्या असून चारही खोल्यांना उजेडासाठी वातायन खोदलेली दिसतात. **लेणे क्र.३० :** हा एक विहार आहे व या विहाराच्या

मंडपात १२ खोल्या खोदलेल्या दिसतात. या लेण्याची बरीच पडझड झालेली दिसते. या विहाराच्या वरच्या बाजूला एक कि.मी.अंतरावर आणखी एक लेण्यांचा समुह आहे. या समुहातील लेण्यांना ३१ ते ३५ क्रमांक देण्यात आलेले आहेत. हे सर्व विहारच आहेत. ही लेणी साधी व लहान असल्याने व या ठिकाणी वर्णन करण्यासारखे आणि प्रेक्षणिय अशा प्रकाराचे काही नसल्याने यांची माहिती जास्त मिळत नाही. लेण्यांच्या या दुसऱ्या गटात एकही चैत्यगृह नाही. याचा अर्थ असा होतो की, या ठिकाणी अधिवास करणरे सर्व भिक्षू हे जखिणवाडीच्या गटात असणाऱ्या चैत्यांचा उपयोग दैनंदिन प्रार्थना व पूजाअर्चा करण्यासाठी करत असावेत.[१११]

**३)विखुरलेली लेणी :**

कराडच्या या ठिकाणच्या लेण्यांचा खरे तर समुह नाही. ही सर्व विखूरलेली लेणी आहेत. यातील काही लेणी पश्चिमाभिमुखी असून काही लेणी उत्तराभिमुखी आहेत. या लेणी समुहात लेणी क्र.४२ ते ६३ यांचा समावेश होतो. या लेण्यामधील काही लेण्यात पाहण्यासारखे किंवा अभ्यासकांना अभ्यासासाठी उपयुक्त असे काहीच नाही.मात्र लेणे क्र.४७ मध्ये कराडच्या या लेण्यांमध्ये आजपर्यंत ज्ञात झालेला एकमेव उत्कींण असलेला लेख सापडला आहे. तो लेख पुढीलप्रमाणे आहे, गोपाळपुतस संघमित्रस लेणं देयधम[११२] म्हणजे गोपाळच्या संघमित्र नामक मुलाने हे पुण्यप्रद दान दिले आहे. लेणे क्र.४८ हे एक चैत्यगृह आहे. हे चैत्यगृह थोडे वेगळया पध्दतीचे आहे. या चैत्यगृहाचे वैशिष्टय म्हणजे या लेण्यात असणाऱ्या स्तूपाच्या समोरील बाजूच्या भिंतीवर एक अतिशय सुंदर अशा प्रकारची शिल्पाकृती असल्याची दिसते. या शिल्पाकृतीमध्ये पुरूषाच्या डोक्यावर समोरच्या बाजूला गाठ असलेला फेटा आहे या प्रकारचा फेटा सातवाहनकाळात खोदण्यात आलेल्या इतर लेण्यामध्ये दिसतो.उदा.पितळखोरे, अजिंठे, कार्ले, बेडसे आदी ठिकाणच्या शिल्पांमध्ये असा फेटा दिसतो. याने कटिअंबर नेसलेले असून त्याच्या दोन्ही हातात ज्या वस्तू आहेत त्या वस्तू शिल्प झिजून खराब झाल्याने ओळखता येत नाहीत. या पुरूषाच्या शिल्पाच्या डाव्या बाजूला एका स्त्रीचे शिल्प आहे. ही स्त्री त्या पुरूषाला आलिंगन देण्याच्या पवित्र्यात उभी आहे. या दोन्ही शिल्पांच्या वरच्या बाजूला असणारे शिल्प ओळखता येत नाही.[११३]

**चचेगांव लेणी :**

आगाशिवच्या पुढेच चचेगांव आहे. येथील आगाशिव डोंगराच्या रांगेतीलच डोंगरावर काही लेणी आढळतात. यामध्ये एक चैत्यगृह आणि तीन विहार आहेत. यामध्ये कोणत्याही प्रकारची शिल्पे आढळत नाहीत. येथील दगड कच्चा असल्याने लेणी अर्धवट सोडली असल्याची शक्यता आहे.[११४]

**तामकाणे लेणी :**

पाटण तालुक्याच्या वायव्य दिशेला साधारणतः ५ कि.मी.अंतरावर तामकाणे नावाचेगाव आहे. या गावच्या पश्चिमेला दोन पुर्वाभिमुखी बौध्द लेणी आहेत. या दोन लेणींपैकी एक विहार व एक चैत्यगृह आहे. येथे कोणत्याही प्रकारचे शिल्पकाम किंवा शिलालेख नाही.लेणी साध्या असून त्यातील चैत्यगृहात छत्र असणारा स्तूप आहे.चैत्यगृहाला लागूनच विहार आहे. लेण्याच्या नैऋत्य व अग्नेय कोपऱ्यात दोन दालने आहेत. या लेण्यांची बरीच पडझड झालेली आहे. यांच्या खोदकामावरून या लेणी कराडच्या लेण्यांच्या समकालीन असाव्यात असे वाटते.[११५]

**येरफळ लेणी :**

कराड–पाटण रस्त्यावर पाटणच्या वायव्य दिशेला साधारणपणे दोन ते अडीच किलोमिटर अंतरावर येरफळ नावाचे गाव आहे. या गावत एक लहान चैत्यगृह दोन लहान विहार व एक अर्धवट सोडून दिलेले लेणे असा लेणी समुह आहे. या लेणी डॉ.के.एम.ढवळीकर आणि डॉ.सुरेश जाधव यांनी दिनांक ९ डिसेंबर १९७९ ला शोधून काढल्या.[११६] काळाच्या ओघात या लेण्यांमध्ये काही गोसाव्यांनी शिवलिंगाची स्थापना केली आणि या लेणी समुहालयात काही मुर्तीशिल्पे आणि वीरगळ आणून ठेवले. मात्र टिळक महाराष्ट्र विद्यापीठातील काही इतिहास संशोधकांनी या लेणीसमुहाचा अभ्यास करून ही बौध्द लेणी असल्याचा निर्वाळा नुकताच दिलेला आहे. येथील चैत्यगृह साधे चापाकृती असून त्याचे छत गजपृष्ठाकृती आहे. चैत्याच्या दक्षिणेला दोन खोल्या खोदलेल्या असून चैत्याला लागून असणाऱ्या खोलीत बसण्यासाठी ओटा खोदण्यात आलेला आहे.याच्या पुर्व दिशेला एक खोदीव पाण्याचे टाके आहे.[११७] येथील स्तूपाचा अण्ड पुर्णपणे गोलाकार आहे. या स्तूपाच्या अण्डावरील भागात लाकडी हार्मिका, यष्टी वा छत्र बसवण्यासाठी एक खोबणी तयार केलेली दिसते. यावरून ही लेणी हीनयान काळात खोदलेली

असावीत. या लेण्यांच्या व कराडच्या चैत्य लेणे क्र.सहा यांच्या निर्माण काळात फारसे अंतर वाटत नसल्याने हे चैत्य लेणे इसवी सनाच्या दुसऱ्या शतकाच्या पुर्वार्धातील असावे.[११८]

**पांडवगड लेणी :**

सातान्याजवळ असणाऱ्या वाईपासून सहा कि.मी.अंतरावर पांडवगड नावाचा किल्ला आहे. या किल्ल्याच्या ईशान्य बाजूस डोंगराच्या पुढे आलेल्या भागात धावडी गावाच्या हद्दीत पांडवगड लेणी आहेत. या पांडवगड लेण्यांमध्ये प्रमुख दोन लेणी असून एक उपलेणे आहे.यामधील लेणे क्र.१ हा विहार आहे. याच्या आतमध्ये आणखी आठ खोल्या आहेत. याच्या प्रवेशव्दारातून आत गेल्यानंतर पूर्व दिशेला दोन व उत्तर दिशेला चार विहार आहेत. प्रत्येक विहारात झोपण्यासाठी शयनओटा आहे.लेणे क्र.२ चे छत सपाट आहे. या लेण्यात एक स्तूप असून त्याचा मुख्य भाग पडलेला आहे.लेण्यामध्ये उजव्या बाजूला गवाक्षे असलेल्या चार आणि मागील बाजूला दोन अशा सहा खोल्या आहेत.चैत्यगृहाला लागूनच मागच्या भिंतीत मध्यभागी उपलेणे आहे. यामध्ये एक स्तूप आहे मात्र त्याची मोठया प्रमाणावर झिज होऊन तो खराब झाल्याने ओबडधोबड दिसतो. या स्तूपाची हार्मिका तोडून स्तूपाचे लिंगात परिवर्तन करण्यात आले असावे. या लेण्यात एक शिल्पाकृती आहे.एका मुख्य देवतेच्या बाजूने अनेक भक्तगण बसलेले दिसतात बहुधा ही ही देवता बुध्द असावा. ही लेणी पाले १ व ८, शेलारवाडी ८ आणि कराड ४८ ची समकालीन असल्याने इसवी सनाच्या तिसऱ्या शतकाच्या उत्तरार्धातील असली तरी यातील शिल्पपट सहाव्या शतकात महायान काळात कोरला असावा.[११९]

**लोहारे लेणी :**

वाईच्या उत्तरेस चार कि.मी.अंतरावर सुलतानपूर नावचे खेडे आहे. या खेडयाजवळ लोहारे नावाचे गांव असून या गावाच्या जवळ असणाऱ्या टेकडयामध्ये आठ बौध्द लेणींचा समुह आहे. या अत्यंत दुर्लक्षित अवस्थेत आहेत. या गुहा मुलतः हीनयान पंथीय बौध्दांच्या आहेत. पण तेथे असलेला स्तूप शिवलिंग असे समजून या गुहांना 'पालपेश्वराच्या गुहा' असे म्हणतात.[१२०] या लेण्यांतील पहीले लेणे एक विहार आहे तर दुसरे लेणे चैत्यगृह आहे. या दुसऱ्या लेण्यात डावीकडे भिंतीला लागून बसण्यासाठी लांबसडक ओटा असून उजवीकडील भिंतीत मध्यभागी चार खोल्या आहेत. प्रत्येक खोलीत बसण्यासाठीचा ओटा आहे. मागील बाजूच्या भिंतीच्या मध्यभागी चैत्यगृह व त्याच्या दोन्ही बाजूस दोन कक्ष आहेत. येथील

स्तूपाच्या अण्डावरील हार्मिका तोडण्यात आलेली असून या स्तूपाचे शिवलिंग करण्यात आलेले आहे.[१२१] डाव्या लेण्याच्या बाजूकडील भिंतीवर खराब झालेल्या अवस्थेतील शिल्पपट आहे. या शिल्पातील मुख्य देवतेच्या दोन्ही अंगास असलेल्या भक्तांचे डोके, हात व पाय छिन्नविछिन्न झालेले असल्यामुळे ते ओळखता येत नाही. यातील मुख्य देवता मात्र बुध्दाची असावी आणि हे शिल्प नंतर महायान काळात ६ व्या शतकात केव्हातरी खोदले असावे.[१२२] हे लेणे कराड चैत्य लेणे क्र.२८ चे समकालीन असल्याने ते इसवी सनाच्या तिसऱ्या शतकाच्या मध्यात किंवा उत्तरार्धात निर्माण केले असावे.[१२३] या लेण्याच्या वायव्य दिशेला चैत्यलेण्याइतकेच मोठे विहार लेणे आहे. या विहारात एक अतिशय खराब झालेला शिल्पपट असून त्यात दोन उभ्या स्त्रीया व दोन बसलेले पुरूष असल्याचे जाणवते.

**शिरवळ लेणी :-**

पूणेसातारा रस्त्यावर खंडाळा तालूक्यात शिरवळ हे एक प्रमुख गाव आहे. शिरवळ गावापासून साधारणपणे ४.५ कि.मी.अंतरावर निरा नदीच्या खोऱ्यात मांढरदेव डोंगराच्या दक्षिणेकडे आलेल्या एका शृंगात हा लेणीसमुह आहे. या लेण्यात पहीले लेणे चैत्यगृह आहे. चैत्यगृहात साधा स्तूप असून स्तूपावर हार्मिका आहे. ही हार्मिका छताला भिडली आहे. स्तूपासमोर हिंदू भाविकांनी शिवलिंग उभारले आहे.[१२४] स्तूपाच्या रचनेवरून हे लेणे इसवी सनाच्या दुसऱ्या शतकाच्या उत्तरार्धातील असावे.[१२५] यानंतरचे या समुहातील लेणे अत्यंत महत्वाचे लेणे आहे. हा विहार आहे. याच्या आतमध्ये उजव्या व डाव्या बाजूच्या भिंतीमध्ये प्रत्येकी तीन आणि मागील समोरील भिंतीमध्ये तीन असे नऊ कक्षे आहेत.आतील सभामंडप चौरस आकाराचा आहे. चौथ्या खोलीस बाहेरील बाजूस गवाक्ष आहे तसेच सातव्या खोलीत बसण्यासाठी ओटा आहे. या पुढील लेणी त्याकडे झालेल्या दुर्लक्षामुळे अतिशय खराब झालेल्या दिसतात.[१२६]

**ब्राम्हणी लेणी :**

पुराणांमधून वर्णित केलेल्या देवदेवतांचा आणि त्यांच्या अवतारांच्या प्रतिमा ज्या ठिकाणी खोदलेल्या आहेत त्या लेण्यांना ब्राम्हणी लेणी असे म्हटले जाते.

**पाटेश्वर लेणी :**

सातारा शहराच्या अग्नेय दिशेला देगांव गावाच्या पुर्वेला डोंगर माथ्यावर शैव पंथीय लेणी आहेत. या ठिकाणी पाण्याची कुंडे, पुष्करिण्या, दीपमाळा, मंदिरे आणि गुंफाचा समावेश होतो. या गुंफेचे प्रवेशव्दार पश्चिम दिशेला आहे. दरवाज्यावर कमान आहे. या कमानीच्या दरवाजातून आत गेल्यावर मंडप लागतो. मंडपात गर्भगृहमुखी नंदी आहे व मध्यभागी शिवलिंग आहे. मंडपाच्या पुढे मोकळे मैदान आहे आणि चारही बाजूस दगडी भिंत बांधलेली आहे. मोकळया प्रांगणाच्या तीन बाजूंना दालने आहेत. उजवीकडील दालनात दोन गर्भगृहे आहेत. प्रत्येक गर्भगृहात एक शिवलिंग आहे. बाहेरच्या मोकळया जागेत दोन सुटी आणि दोन जमिनीत बसवलेली शिवलिंगे आहेत. याशिवाय तेथे अग्निदेवाचीही मुर्ती आढळते. बहुतांशी शिवलिंगाची पीठे चौकोनी असून त्यांवरील लिंगांची संख्या उल्लेखनीय आहे. या ठिकाणी नेहमीपेक्षा दोन आगळीवेगळी शिवलिंगे आहेत. यात नेहमी आढळते किंवा आढळतात तशी शिवलिंगे नसून त्यात पंच्याहत्तर दलांचे कमळ दाखवले आहे आणि या प्रत्येक दलात मध्यभागी लिंगासारखा उंचवटा आहे. ही शिवलिंगे नक्कीच यंत्र या प्रकारात मोडतात. या लेण्यातील सर्वात विशेष बाब म्हणजे मध्यभागी काहीशा खोलगट जमिनीत बसवलेले एक मोठे शिवलिंग आणि या शिवलिंगाच्या भोवती अकरा रांगांमध्ये असलेली एक हजार छोटी लिंगे होय. या दालनाच्या भिंतीत तीन मोठी देवकोष्टे आहेत. यामध्ये उभट प्रस्तर आहेत. या प्रस्तरावर शिवलिंगाच्या रांगा कोरलेल्या असून वर देवमुर्ती कोरलेली आहे. या तीन उभट प्रस्तरांमध्ये कोरलेल्या देवमुर्तींपैकी दोन मुर्ती विष्णू आणि तिसरी मुर्ती बहुतेक ब्रम्हदेवाची असावी. याचप्रमाणे अनेक छोटया देवकोष्टामध्ये ब्रम्हदेव व अग्निदेव यांच्या मुर्ती आहेत. भिंतीलगतच्या कट्टयावर अनेक लिंगे आहेत अशी दहा लिंगपीठे आहेत. या ठिकाणी एक देवनागरी लिपीतील लेख आहे मात्र अक्षरे खराब झाल्याने तो वाचता येत नाही.[१२७]

या लेण्यात दुसरी गुंफाही अतिशय सौंदर्यपुर्ण आहे. ही गुंफा उत्तराभिमुखी आहे व या गुंफेच्या मध्यभागी अग्निदेवाची मुर्ती आहे. याच ठिकाणी तीन देवता कोरलेले शिल्पपट आहेत. या अग्निमंदीरामागे तीन गुंफा आहेत. यातील दोन उत्तराभिमुखी तर एक गुंफा पश्चिमाभिमुखी आहे. या गुहांमध्ये अतिशय भव्य अशा प्रकारची शिवलिंगे आाहेत.[१२८]

**पाचगणी लेणी (राजपुरी लेणी) :**

पाचगणीच्या अग्नेय दिशेला अंदाजे ५ कि.मी.अंतरावर राजपुरी नावाच्या गावाजवळ चार लेणी आहेत. येथील शैलगृहात दहाव्या वा अकराव्या शतकातील सोमनथदेवाचा मराठी देवनागरीतील शिलालेख आहे. यामध्ये काही व्यक्तिनामे, ग्रामनामे व राजपुरी येथील सोमनाथाच्या देवळाचा इतिहास आलेला आहे. या दैवताचा प्रथम अवतार जलसंपात (किंवा जलसंपत्ती) देवाने जेव्हा सोमभुविनिस (सोमनथास) उपदेश केला तेव्हा झाला होता. पुढे सोमनाथास श्रीपती नायकाच्या वंशातील कोणा विनायकाने उंच नेले व त्याच्याच वंशातील ईदोप्य नामक व्यक्तीने सोमनाथाचे देऊळ बाधले.[१२९]

**समारोपः**

सांस्कृतिक व ऐतिहासिक दृष्टया समृध्द असणाऱ्या सातारा जिल्हयात अनेक गोष्टी पाहण्यासारख्या आहेत. पुरातत्वीय दृष्टीकोणातून सातारा जिल्हा अत्यंत महत्वाचा जिल्हा आहे. सातारा जिल्हयात असणारे विविध जातीधर्माचे लोक त्यांचे सणवार उत्सव मोठया आनंदाने साजरे करत असल्याचे दिसते. या सांस्कृतिक इतिहासात मोलाची भर घातली आहे ती येथील सण उत्सव, यात्रा, वारकरी संप्रदाय, साहित्य व साहित्यिक, नाटयक्षेत्र, पारंपारिक कला, चित्रपट, शिल्पकला व चित्रकला, क्रीडा क्षेत्र, पर्यटनस्थळे, वस्तूसंग्रहालये आणि लेणी यांनी. प्रस्तूत प्रकरणात मी या सर्व बाबींचा उहापोह केलेल आहे. या सर्व गोष्टी सातारा जिल्हयाला भूषणावाह असल्याचे याठिकाणी जाणवते.

## संदर्भ


१. प्रकट मुलाखत, कुलकर्णी रूपेश सुर्यकांत, गडकर आळी सातारा दि.१५.१२.२०११ वेळ दु.०३.४५

२. कित्ता

३. प्रकट मुलाखत, कदम गोविंदराव, सोनगांव तर्फ सातारा दि.१९.०१.२०१२ वेळ दु.०२.१५

४. प्रकट मुलाखत, नावडकर बाबुराव, सोनगांव तर्फ सातारा दि.२०.०१.२०१२ वेळ स.१०.००

५. डॉ.दीक्षित दुर्गा,(संपा) डायमंड महाराष्ट्र संस्कृतीकोष, डायमंड पब्लिकेशन, पुणे,२००९, पृ.१८७

६. प्रकट मुलाखत, मुळीक लहु दाजी, जांब बु।। दि.२५.०१.२०१२ वेळ दु.०१.४५

७. खरे ग.ह., बोराटे व.म., अशी आमुची वाई, अक्षरभांडार प्रकाशन, पुणे, १९७९ पृ.१२

८. डोळे रामदासी अनंतदास, श्री चौंडे महाराज यांचे चरित्र, पुणे,१९३८, पृ.४३

९. डॉ.कोरडे दत्तात्रय ज्ञानदेव, वाई शहराचा राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक इतिहास इ.स.१९०० ते २००० पीएच.डी. प्रबंध, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, २०१२, पृ. ३०६

१०. खरे ग.ह., बोराटे व.म., उपरोक्त, पृ.७६, ७७

११. डॉ.पाटील ए.जे., कऱ्हाडचा इतिहास, इ.स.१९५० ते २००० पीएच.डी. प्रबंध, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, २०११, पृ.२००

१२. पुढारी सातारा दि.१७.०१.२०१४ पृ.०१/ ऐक्य दि.१७.०१.२०१४ पृ.०५

१३. दै.पुढारी १५.०१.२०१४ पृ.५
दै.लोकसत्ता पश्चिम महाराष्ट्र वृत्तांत दि.१४.०१.२०१४. पृ.१
दै.ऐक्य १३.०१.२०१४ पृ.३

१४. दै.सकाळ सातारा टुडे दि.१६.०१.२०१४ पृ.३

१५. दै.पुढारी सातारा दि.१५.०१.२०१४ पृ.०५

१६. प्रकट मुलाखत श्री.चंद्रकांत काकडे मु.पो.सालपे ता.खंडाळा जि.सातारा

दि.१५.०२.२०११

१७. दै.पुढारी दि.३१.१२.२०१३

१८. प्रत्यक्ष सर्वेक्षण दि.१४.०१.२०००, लोकसत्ता पश्चिम महाराष्ट्र वृत्तांत दि.१५.०१.२०१४

१९. दै.पुढारी अमृतसिध्दी ०३.०१.२०१४ पृ.११

२०. प्रकट मुलाखत श्री.अब्दुल मोमीन २१५ प्रतापगंज पेठ सातारा ता.जि.सातारा दि.१९.०८.२०१२

२१. कित्ता

२२. कित्ता

२३. प्रकट मुलाखत श्री.जमीर अजिझ काझी २२७ मंगळवार पेठ कराड ता.कराड जि.सातारा दि.०९.११.२०११

२४. कित्ता

२५. प्रकट मुलाखत श्री.सोनावणे राजेंद्र भिमराव मु.पो.निरगुडी ता.फलटण जि.सातारा दि.०१.०६.२०१३

२६. कित्ता

२७. प्रकट मुलाखत श्री.डिसुझा अल्फ्रेड ३१५ सदरबझार सातारा ता.सातारा जि.सातारा दि.१९.०७.२०१२

२८. प्रकट मुलाखत ह.भ.प.नारायण मुळे पाटण दि.०२.०८.२०११

२९. महाराष्ट्र साहित्य परिषद,पुणे शाखा शाहूपुरी, सातारा २२ वे विभागिय साहित्य संमेलन स्मरणिका अक्षरधन पृ.क्र. ४२ ते ४७

३०. महाराष्ट्र साहित्य परिषद,पुणे शाखा शाहूपुरी, सातारा २२ वे विभागिय साहित्य संमेलन स्मरणिका अक्षरधन पृ.क्र. ३५

३१. कित्ता

३२. कित्ता

३३. कित्ता

३४. कित्ता

३५. दै.सकाळ, ब्रँड सातारा सातारा आवृत्ती वर्धापनदिन विशेषांक दि. ०७.०५.२०१२ पृ.१० व १६

३६. कित्ता

३७. कित्ता

३८. कित्ता

३९. कित्ता

४०. कित्ता

४१. कित्ता

४२. कित्ता

४३. प्रकट मुलाखत नितीन बानुगडे पाटील, रहिमतपूर दि.१९.०८.२०११,

४४. गॅझेटीअर पृ.७२४

४५. दै.सकाळ, ब्रँड सातारा सातारा आवृत्ती वर्धापनदिन विशेषांक दि. ०७.०५.२०१२ पृ.१० व १६

४६. खांडगे प्रकाश, (लेख) महाराष्ट्राच्या लोककला, सांस्कृतिक महाराष्ट्र परिचय पुस्तिका, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई, १९९७, पृ.१९

४७. खांडगे प्रकाश

४८. गॅझेटीअर पृ.७२४

४९. गॅझेटीअर पृ.७२३ व ७२४

५०. दै.सकाळ, ब्रँड सातारा सातारा आवृत्ती वर्धापनदिन विशेषांक दि. ०७.०५.२०१२ पृ.११

५१. कित्ता

५२. कित्ता

५३. कित्ता

५४. सातारा गॅझेटीअर पृ.७२७

५५. सातारा नगरपालिका, आमचा सातारा, सातारा, ३० जून १९६७, पृ.३२

५६. सातारा गॅझेटीअर पृ.७२८

५७. कित्ता

५८. कित्ता

५९. दै.सकाळ, ब्रँड सातारा सातारा आवृत्ती वर्धापनदिन विशेषांक दि. ०७.०५.२०१२ पृ.१४

६०. प्रत्यक्ष सर्वेक्षण दि.०७.११.२००९

६१. प्रत्यक्ष सर्वेक्षण दि.०१.०६.२०११

६२. प्रत्यक्ष सर्वेक्षण दि.१५.०८.२०११

६३. प्रत्यक्ष सर्वेक्षण दि.२१.३.२०१०

६४. प्रत्यक्ष सर्वेक्षण दि.२५.२.२०१२

६५. प्रत्यक्ष सर्वेक्षण दि.१२.०३.२००९

६६. प्रत्यक्ष सर्वेक्षण दि.२१.७.२०१३

६७. प्रत्यक्ष सर्वेक्षण दि.०६.०९.२०१२

६८. प्रत्यक्ष सर्वेक्षण दि.०९.०७.२०१३

६९. प्रत्यक्ष सर्वेक्षण दि.२१.०३.२०१३

७०. प्रत्यक्ष सर्वेक्षण दि.२२.०१.२०११

७१. प्रत्यक्ष सर्वेक्षण दि.०७.०३.२००९

७२. प्रत्यक्ष सर्वेक्षण दि.०८.११.२०१३

७३. प्रत्यक्ष सर्वेक्षण दि.१३.५.२०१२

७४. प्रत्यक्ष सर्वेक्षण दि.१८.०५.२०१२

७५. प्रत्यक्ष सर्वेक्षण दि.०९.०९.२०१३

७६. प्रत्यक्ष सर्वेक्षण दि.०७.०९.२०१३

७७. प्रत्यक्ष सर्वेक्षण दि.१६.०९.२०१२

७८. प्रत्यक्ष सर्वेक्षण दि.१७.०५.२०१३

७९. प्रत्यक्ष सर्वेक्षण दि.२१.०६.२०१३

८०. प्रत्यक्ष सर्वेक्षण दि.२२.०७.२०१३

८१. प्रत्यक्ष सर्वेक्षण दि.०९.०४.२०१३

८२. प्रत्यक्ष सर्वेक्षण दि.२१.०४.२०१३

८३. प्रत्यक्ष सर्वेक्षण दि.२२..१.२०१२

८४. प्रत्यक्ष सर्वेक्षण दि.२५.०३.२०११

८५. प्रत्यक्ष सर्वेक्षण दि.०७.०९.२०१३

८६. प्रत्यक्ष सर्वेक्षण दि.०८.०२.२०११

८७. प्रत्यक्ष सर्वेक्षण दि.१३.१२.२०११

८८. प्रत्यक्ष सर्वेक्षण दि.११.०४.२०१३

८९. प्रत्यक्ष सर्वेक्षण दि.०५.०९.२००९

९०. प्रत्यक्ष सर्वेक्षण दि.२१.०१.२०१३

९१. प्रत्यक्ष सर्वेक्षण दि.२३.०४.२०११

९२. प्रत्यक्ष सर्वेक्षण दि.१६.०७.२०१३

९३. प्रत्यक्ष सर्वेक्षण दि.२९.१२.२०१२

९४. प्रत्यक्ष सर्वेक्षण दि.०३.०६.२००९

९५. प्रत्यक्ष सर्वेक्षण दि.३०.१२.२०१२

९६. प्रत्यक्ष सर्वेक्षण दि.२५.०१.२०१३

९७. प्रत्यक्ष सर्वेक्षण दि.१०.११.२०१४

९८. प्रत्यक्ष सर्वेक्षण दि.२८.०२.२०१२

९९. प्रत्यक्ष सर्वेक्षण दि.३१.१२.२०१०

१००. प्रत्यक्ष सर्वेक्षण दि.०३.०८.२००९

१०१. प्रत्यक्ष सर्वेक्षण दि.२१.०५.२०१३

१०२. प्रत्यक्ष सर्वेक्षण दि.२०.०६.२०१३

१०३. जोशी सु.ह.,महाराष्ट्रातील लेणी, डायमंड प्रकाशन, पुणे, २००८, पृष्ठ क्र.०१

१०४. कित्ता, पृष्ठ क्र.०१

१०५. डॉ.दिक्षित दुर्गा(संपा), डायमंड महाराष्ट्र संस्कृतीकोष, डायमंड पब्लिकेशन, पुणे, २००९, पृष्ठ क्र.७२

१०६. डॉ.पाटील अ.ज., कऱ्हाडचा इतिहास, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे यांचेकडे पीएच.डी पदवीसाठी सादर केलेला शोधप्रबंध, जुलै २०११, पृष्ठ क्र.३५६

१०७. गुप्ते य.रा.,कराड संदर्भग्रंथ, पी.डी.पाटील गौरव प्रतिष्ठान, कराड, २००४ पृष्ठ क्र.०४

१०८. डॉ.पाठक अ.शं.(संपा) महाराष्ट्र राज्य गॅझेटीअर सातारा जिल्हा, महाराष्ट्र शासन, मुंबई, मराठी आवृत्ती (सुधारीत)१९९९ पृष्ठ क्र.७५१

१०९. जेम्स; बर्जेस जेम्स.दि केव्ह टेंपल ऑफ इंडीया आर्किऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडीया, १८८० पृष्ठ क्र.२१४

११०. जोशी सु.ह.उपरोक्त पृष्ठ क्र.१६

१११. प्रत्यक्ष सर्वेक्षण दि.२१.०५.२००८

११२. ढवळीकर एम.के., लेट हिनयान केव्हज ऑफ वेस्टर्न इंडीया, डेक्कन कॉलेज, पोस्ट ग्रॅज्यूएट ॲण्ड रिसर्च इन्स्टिटयूट, पुणे, १९८४, पृष्ठ क्र.२९

११३. प्रत्यक्ष सर्वेक्षण दि.२१.१२.२०१२

११४. प्रत्यक्ष सर्वेक्षण दि.२१ १०.२०१२

११५. नागराजू एस, बुध्दीस्ट आर्किटेक्चर ऑफ वेस्टर्न इंडीया, आगम कला प्रकाशन, दिल्ली, १९८१, पृष्ठ क्र.३३६

११६. प्रत्यक्ष सर्वेक्षण दि.२२ १०.२०१२

११७. डॉ.पाटील अ.ज., उपरोक्त पृष्ठ क्र.३५५

११८. प्रत्यक्ष सर्वेक्षण दि.३० .०६. २०१२

११९. ढवळीकर के.एम., उपरोक्त, पृष्ठ क्र.३३

१२०. प्रत्यक्ष सर्वेक्षण दि.३० .०८.२०१२

१२१. ढवळीकर के.एम., उपरोक्त, पृष्ठ क्र.३३

१२२. कित्ता, पृष्ठ क्र.३५

१२३. डॉ.कोरडे डी.डी. वाई शहराचा राजकिय, सामाजिक व सांस्कृतिक इतिहास,टिळक महाराष्ट्र विद्यापीठ,पुणे यांचेकडे पीएच.डी पदवीसाठी सादर केलेला शोधप्रबंध,ऑक्टोबर २०१२,

पृष्ठ क्र.३५६

१२४. डॉ.पाठक अ.शं.(संपा) उपरोक्त, पृष्ठ क्र.८६३

१२५. ढवळीकर के.एम., उपरोक्त, पृष्ठ क्र.३५

१२६. कित्ता, पृष्ठ क्र.३३

१२७. ढवळीकर के.एम., उपरोक्त, पृष्ठ क्र.३७

१२८. प्रत्यक्ष सर्वेक्षण दि.०४.११. २०१२

१२९. देव शां.भा., महाराष्ट्र व गोवे शिलालेखताम्रपटांची वर्णनात्मक संदर्भ सूची, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९९२, पृष्ठ क्र.३१२

# प्रकरण सहावे
# मूल्यमापन

**प्रस्तावना** :

सातारा जिल्हयाचा राजकीय, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक इतिहास इ.स.१९४७ ते २००० या कालखंडातील अभ्यास संशोधनाच्या माध्यमातून समाजासमोर आणण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधप्रबंधाच्या आधारे करण्यात आलेला आहे. मानवी जिवनाची समग्र वाटचाल म्हणजे इतिहास होय. आपले पूर्वज कोण होते ? ज्याला आपण आपली भूमी म्हणतो. तिथे काय घडले ? आणि आत्ता आपल्या आसपास जी परिस्थिती दिसते ती ती कशी निर्माण झाली? या सगळयांचे सांगड घालावी, पूर्वी चुकातून लागलेला ठेचा, जखमा तपासून पाहून आज शहाणे व्हावे आणि त्यांनी केलेल्या चांगल्या गोष्टींचे धडे गिरवून ते समाजाचरणात आणावे हे मुख्य उद्देश संशोधनाचे असतात. प्रत्येक रूढीला, परंपरेला इतिहास असतो. धर्माला, समाजाला, इतिहास असतो. हिंसेला इतिहास असतो. शोषणाला इतिहास असतो. पण इतिहासाला मर्यादा असतात. काळात जितके मागे जावे तितके दिसणारे चित्र अंधारमय होते. अनेक खुणा, पुरावे काळाच्या ओघात नष्ट झालेले दिसतात. स्पष्ट प्रकाश असणारे कोनाडे फक्त राजेरजवाडयांच्या बखरकाराकडे सापडतात. तिथे धुसर तुकडे हातात येतात. त्यातून केवळ युद्धांचा, राज्यबदलांचा, कटांचा, राजांच्या कर्तृत्त्वांचा आणि त्यांच्या विक्षिप्तपणाचा इतिहास हाती लागतो. पण हा पूर्ण इतिहास नव्हे. खरा इतिहास जाणून घ्यायचा झाला, तर राजांच्या महालांतून खाली उतरून सामान्य समाजात शिरावे लागते. ज्याला राजधानीत राजा बदलला म्हणून काहीही फरक पडत नाही, किंबहुना ज्याला राजधानी कुठची हेही माहित नसेल, अशा सामान्य माणसाला पडणारे प्रश्न, त्याचे जीवन नियंत्रित करणाऱ्या सामाजिक शक्ती, आणि त्यातून आपले जीवन सुधारण्यासाठी त्याने दिलेला लढा हाखरा इतिहास होय. आज स्थानिक इतिहासाचा अभ्यास हा जागतिक स्तरावर करण्यात येऊ लागलेला आहे. जेव्हा हा स्थानिक इतिहास सर्वत्र अभ्यासला जाईल व त्या सर्व इतिहासाचे एकत्रिकरण करण्यात येईल तेव्हा सर्व जगताचा सुक्ष्म इतिहास समोर येईल. त्यामुळेच आज स्थानिक इतिहासाच्या अत्र्यासाला महत्व प्राप्त झालेले दिसते.

सातारा जिल्हयाला खुप प्राचिन इतिहास आहे. सातारा जिल्हयाची निर्मिती जरी सन १९६० साली झालेली असली तरीही या प्रदेशाचे प्रचीनत्व या प्रदेशाचे वेगळेपण दर्शवते.'स्वातंत्र्योत्तरकालीन सातारचा इतिहास : राजकीय, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक इ.स.१९४७ ते २०००' या विषयावर संशोधन करताना या ठिकाणी प्रथमतः सातारा जिल्हयाचा भौगेलिक विस्तार पाहणे आवश्यक ठरले. सातारा जिल्हा हा महाराष्ट्राच्या दक्षिण मध्य भागात असुन त्याचा दक्षिणोत्तर विस्तार १२० किलोमीटर तर पूर्व–पश्चिम विस्तार १४५ किलोमीटर आहे. सातारा जिल्हा विस्तीर्ण दख्खनच्या पठाराचा एक भाग असून काळया अग्निजन्य ज्वालामुखी दगडाचा प्रदेश आहे. जिल्हयात सहयाद्री आणि त्याच्या शाखा व शंभू महादेव डोंगररांग आणि तिच्या शाखा या दोन पर्वतरांगा आहेत. निरा, कृष्णा, कोयना, वेण्णा, उरमोडी, कुडाळी, तारळी, वसना, येरळा व माणगंगा या प्रमुख नद्या सातारा जिल्हयातून वाहत आहेत. या प्रदेशातील पर्जन्यमानाची माहीती घेतल्यास जिल्हयाचा पश्चिम घाट प्रदेशात जास्त पर्जन्य व पुर्वेकडे कमी पर्जन्य होतो.

सातारा जिल्हयाची ऐतिहासिक पार्श्वभूमी पाहताना सातारा जिल्हयामध्ये विविध ठिकाणी झालेल्या पुरातत्वीय संशोधनातून येथे पुरापुराश्मयुगिन मानवाचे अस्तित्व दर्शवणारे पुरावे सापडलेले आहेत. सोनगांव, माहुली, चिंचनेर अशा अनेक ठिकाणी अश्मयुगिन हत्यारे मिळालेली आहेत. प्रारंभिक ऐतिहासिक काळानंतर सातवाहन काळात कराड हे एक मोठे व्यापारी केंद्र म्हणून विकसित झाले होते. यांच्या कार्यकाळानंतर येथे राष्ट्रकुट राजांनी वर्चस्व निर्माण केले. मध्ययुगिन काळात येथे तघलक, बहामनी यांची सत्ता होती. आदिलशाही राजवटीत येथे अनेक किल्ले व वास्तू उभारण्यात आल्या. छ.शिवाजी महाराजांच्या स्वराज्यातील महत्त्वपूर्ण प्रदेश म्हणून या भागाकडे पाहीले जात होते तर सातारा शहराला मराठयांच्या राजधानीचा दर्जा शाहु महाराजांच्या काळात मिळाला. त्यामुळे सातारा शहराला ऐतिहासिक महत्व प्राप्त झाले.

सातारा जिल्हयाचा एकंदर इतिहास पाहता स्वातंत्र्यपुर्व काळातही या प्रदेशाला राजकीय सामाजिकदृष्टया महत्वाचे स्थान आहे. भारतीय स्वातंत्र्य चळवळीत या जिल्हयाचे योगदान मोठे आहे. या भागातले सन १९४२ चे भूमिगत आंदोलन तर देशपातळीवर गाजले. क्रांतीसिंह नाना पाटील व त्यांच्या कार्यकर्त्यांनी या काळात ब्रिटीशांना सळो की पळो करून

सोडले होते. ही स्वातंत्र्यचळवळ सुरू असतानाच सामाजिक चळवळीतही हा जिल्हा आघाडीवर होता. सत्यशोधक चळवळ, गणेश मेळा व कर्मवीर भाऊराव पाटील यांनी स्थापन केलेल्या रयत शिक्षण संस्थेने शिक्षण क्षेत्रात भरीव कार्य करण्यास सुरूवात केली होती.

स्वातंत्र्यपुर्व काळातील ही परंपरा प्रगतीची व जागृत परंपरा स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही तशीच गतीमान राहीलेली आहे. महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये सातारा जिल्हयाला महत्वाचे स्थान आहे. भारतीय स्वातंत्र्य चळवळीत ज्याप्रमाणे सातारा जिल्हयाने महत्त्वपूर्ण भुमिका बजावली आहे. सन १९४२ च्या लढयामधे क्रांतीसिंह नाना पाटील व अन्य प्रभूतींनी त्याप्रमाणे चळवळीत भाग घेऊन साताऱ्याचे योगदान सिध्द केले आहे त्याचप्रमाणे स्वातंत्र्योत्तर कालखंडातही महाराष्ट्राच्याच नव्हे तर देशाच्या राजकारणामध्ये सातारा जिल्हयाचे नाव घेतले जात होते. सातारा जिल्हा हा स्वातंत्र्यपुर्व कालखंडामध्ये फार विस्तारित होता किंवा मुंबई प्रांतामध्ये आजच्या सांगली व सातारा या दोन जिल्हयांचा मिळून सातारा जिल्हा होत होता.स्वातंत्र्यानंतर या एवढया मोठया प्रदेशाचे प्रशासन करणे जड जाऊ लागल्यानंतर या सातारा जिल्हयाचे १ ऑगस्ट १९४९ रोजी विभाजन करण्यात आले आणि उत्तर सातारा व दक्षिण सातारा असे दोन वेगवेगळे जिल्हे अस्तित्वात आले.भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर येथे प्रजासत्ताक शासनपध्दतीचा स्वीकार करण्यात आला. या जिल्हयातील विधानसभेच्या विविध मतदारसंघांचे प्रतिनिधीत्व करण्यासाठी सन १९५१–५२ ते सन १९९९–२००० या काळात अकरा वेळा निवडणूका झालेल्या आहेत. तर लोकसभेच्या प्रतिनिधीत्वासाठी तेरा वेळा निवडणूका झालेल्या आहेत. या निवडणूकांची तपशिलवार माहीती अभ्यासली असताना एक बाब प्रकर्षाने जाणवते की सातारा जिल्हयातील विधानसभेची वा लोकसभेची निवडणूक असो अगदी पहिल्या निवडणूकीपासून या जिल्हयावर काँग्रेस पक्षाचा प्रभाव नियमितपणे असलेला दिसतो.

महाराष्ट्र राज्याच्या विधानसभेच्या पहिल्या निवडणूकीपासून या जिल्हयात शेतकरी कामगार पक्षाने आपले स्थान निर्माण केलेले होते व क्रांतिसिंह नाना पाटील, श्री.यशवंतराव मोहीते यासारख्या नेतेमंडळींनी आपला प्रभावही निर्माण केलेला होता. संयुक्त महाराष्ट्राच्या मुद्यावरून काँग्रेसमधील प्रमुख नेतेमंडळींनी काँग्रेस सोडली त्यावेळी सातारा जिल्हयात काँग्रेस संपेल असे वातावरण निर्माण झालेले होते. परंतू याच वेळी सातारा काँग्रेसलाच नाही तर

महाराष्ट्राला श्री.यशवंतराव चव्हाण यांच्यासारखा नेता मिळाला. त्यांनी या संधीचा फायदा घेत महाराष्ट्र काँग्रेसवर नुसते वर्चस्व निर्माण केले नाही या काळात सातारा जिल्हा आणि व्दैभाषिक राज्यात काँग्रेस पुन्हा सत्तेवर आणली. यासाठी त्यांनी नेहमी बेरजेचे राजकारण केले. जो व्यक्ती निवडून येण्याची शक्यता अधिक असेल त्याला त्यांनी काँग्रेस पक्षात ओढले याचे उत्तम उदाहरण म्हणजे श्री.यशवंतराव मोहीते होय. शेकाप पक्षाचा हक्काने निवडून येणारा उमेदवार काँग्रेस पक्षाचा कट्टर विरोधक असणाऱ्या श्री.यशवंतराव मोहीतेंना श्री.यशवंतराव चव्हाणांनी काँग्रेस पक्षात सामिल करून घेतले.

सन १९५७ साली मुंबईच्या त्रिभाषिक प्रांताच्या निवडणूकीत सातारा जिल्हयात मोठी राजकीय उलथापालथ झाली. मुंबई प्रांताची पहिली पाच वर्ष पार पडल्यानंतर संयुक्त महाराष्ट्राची चळवळ रंगात आली. त्रिभाषिक राज्याच्या दुसऱ्या निवडणूकीत संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचा वणवा पेटून सातारा जिल्हयातील काँग्रेस होरपळली. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचा परिणाम होवून माण, खटाव, फलटण, वाई, जावली, सातारा, कराड दक्षिण या सात मतदारसंघात काँग्रेस पराभूत झाली आणि महाराष्ट्र एकीकरण समितीने विजयाचे निशाण ठिकठिकाणी उभे केले.

या निवडणूकीत सातारा जिल्हयात काँग्रेस पक्षाला पराभवाचा सामना करावा लागला असला तरी याच निवडणूकीच्यानंतर व्दैभाषिक राज्याचे मुख्यमंत्री म्हणून श्री.यशवंतराव चव्हाण यांची निवड झाली. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मीतीनंतर या राज्याचे पहिले मुख्यमंत्री होण्याचा मानही श्री.यशवंतराव चव्हाणांना मिळाला. याच दरम्यान सन १९६२ साली चीनने भारतावर आक्रमण केले व पं.नेहरूंनी भारताच्या संरक्षणमंत्रीपदावर साताररच्या या श्री.यशवंतराव चव्हाण यांना आमंत्रित केले. श्री.यशवंतराव चव्हाण केंद्रिय राजकारणात गेले परंतू साताररमध्ये त्यांच्यामागे श्री.किसन वीर यशस्वीरित्या काँग्रेसचे राजकारण चालवत होते व श्री.यशवंतराव चव्हाणांना अपेक्षित असणारी राजकीय समिकरणेही जुळवीत होते. याच कालखंडात पाटण मधून निवडून येणाऱ्या श्री.बाळासाहेब देसाई यांनी महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात विविध पदांवर काम करत काँग्रेस पक्षात श्री.यशवंतराव चव्हाण साहेबांच्या नंतरचा शक्तिशाली नेता म्हणून आपली ओळख निर्माण करण्याचा प्रयत्न केला परंतू श्री.यशवंतराव चव्हाण यांनी केंद्रिय

राजकारणात प्रवेश केल्यावरही मुख्यमंत्री पदासाठी श्री.बाळासाहेब देसाईंचे नाव घेतले गेले नाही त्यामुळे श्री.बाळासाहेब देसाईंचे मुख्यमंत्री होण्याचे स्वप्न अधुरे राहीले.

सातारा जिल्हयाला नात्यागोत्याचे राजकारण नवखे नाही. श्री.यशवंतराव चव्हाणांचे भाचे श्री.धोंडीराम शिधोजी जगताप यांना सातारा विधानसभा मतदारसंघातून तिकीट देऊन श्री.यशवंतराव चव्हाणांनी त्यांना निवडून आणण्याचा अटोकाट प्रयत्न केला. त्यानंतर १९६७च्या निवडणूकीतही बेरजेचे राजकारण करून श्री.यशवंतराव चव्हाणांनी त्यांनाच तिकीट दिले. मात्र सातारमध्ये छत्रपती शिवरायांच्या वंशजांचे राजघराणे असले तरी त्यांचा मानमरातब राखत या घराण्याला सक्रिय राजकारणापासून लांबच ठेवण्यात आले होते किंबहुना त्यांनी राजकारणाकडे येऊ नयेच असे वातावरण तयार करण्यात आल्याचे जाणवते. देशभरात विविध ठिकाणची राजघराणी सक्रिय राजकारणात होती. मात्र सातारमध्ये भोसले राजघराण्याला राजकारणापासून दूर ठेवण्यात श्री.यशवंतराव चव्हाणांना यश मिळालेले होते. राजकारणातील धुर्त खेळयामध्ये ही बाब लक्षात घेण्यासारखी होती.

पश्चिम महाराष्ट्रातील राजकारण सुरूवातीपासूनच टोकाच्या पातळीवर असले तरी राजकारण बाजूला ठेवून सर्वजण एकत्र यायचे. त्यावेळची संयुक्त महाराष्ट्राची चळवळ असो किंवा कोयनानगरचा भुकंप. अशा नैसर्गिक आपत्तीत नेत्यांनी कायम एकजूट दाखवली. देशावर चिनी आक्रमण झाल्यावर पंडित जवाहरलाल नेहरू यांनी श्री.यशवंतराव चव्हाणांना संरक्षणमंत्रीपद दिले. त्यावेळी हिमालयाच्या रक्षणासाठी सहयाद्री धावला असे रसभरीत वर्णन आचार्य अत्रे यांनी वृत्तपत्रात केले होते. दिल्लीतील कारभाराची सुत्रे सांभाळल्यानंतर श्री.यशवंतराव चव्हाण राज्याच्या राजकारणात फारसे आलेच नाहीत.

सन १९७८ साली ही परिस्थीती बदलली आणि सातारच्या राजघराण्यातून श्री.छ.अभयसिंहराजे भोसले हे प्रथमतः विधानसभा निवडणूकीत जनता पक्षाच्या माध्यमातून निवडून आले व पुढील कालखंडात विविध खात्यांची मंत्रिपदे सांभाळली. पाटणमधून श्री.विक्रमसिंह पाटणकर यांनी देसाईंना तोड देत आपले वर्चस्व मतदारसंघावर निर्माण केले. पुढील कालखंडात सार्वजनिक बांधकाम खात्यांचे मंत्रीही ते झाले.सन १९७८ नंतर झालेल्या विधानसभा निवडणूकांच्या पार्श्वभूमीवर राज्याच्या राजकारणात मोठी उलथापालथ झाली. राजकारण हे सत्तेसाठी असते, याची ओळख श्री.शरद पवारांनी महाराष्ट्राला करून दिली.

त्याचवेळी सत्ताप्राप्तीसाठी आमदारांची प्रचंड फोडाफोडी झाली. श्री.शरद पवारांनी ३८ आमदारांना श्री.किसन वीरांच्या पुढाकाराने फोडून पुलोदचा प्रयोग केला.एका बाजूला सातारा जिल्हयात  श्री.यशवंतराव चव्हाण आणि श्री.शरद पवार यांचा झंझावात सुरू असताना राजघराण्याने सातारा मात्र अजिंक्य ठेवला.

सातारा जिल्हयात सलग चारवेळा आमदार होण्याचा प्रथम बहुमान मिळवणारी व्यक्ती होती श्री.केशवराव पाटील. प्रथमतः प्रजा समाजवादी पक्षाकडून व नंतर कॉंग्रेस पक्षाकडून निवडणूका लढवून त्यांनी खटाव मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व केलेले आहे.तर अशाच प्रकारे कोरेगांव मतदारसंघातून नाभिक समाजातील एका व्यक्तिने कॉंग्रेस निष्ठेने वागत आमदारकी प्राप्त केली ते म्हणजे श्री.शंकरराव जगताप होय. सन १९८० ते १९८५ या काळात विधानसभा उपाध्यक्ष व १९८५ ते १९९० या काळात विधानसभा अध्यक्ष अशा महत्त्वपूर्ण जागी काम केलेल्या श्री.शंकरराव जगताप यांनी कोरेगांव तालुक्याचे पाचवेळा प्रतिनिधीत्व केले.

सन १९८५ ची निवडणूक सातारा जिल्हयाच्या दृष्टीने वेगळी होती. या निवडणूकीच्यापुर्वी श्री.यशवंतराव चव्हाण आणि श्री.किसन वीर हे जिल्हयाच्या राजकारणाचे प्रमुख आधारवड गळून पडलेले होते. कॉंग्रेस अर्सच्या प्रयोगानंतर कॉंग्रेस एसच्या स्थापनेमुळे सातारा जिल्हयात प्रचंड उलथापालथ झाली. श्री.शरद पवारांच्या धोरणी राजकारणाला संपुर्ण राज्यातून पाठींबा मिळत असतानाच १९८५ची निवडणूक एस(समाजवादी) कॉंग्रेसच्या लाटेवर हेलखावे खावू लागली. श्री.शरद पवारांना याच निवडणूकीत सातारा जिल्हयाची नस सापडली. श्री.प्रतापराव भोसले, श्री.छ.अभयसिंहराजे भोसले, श्री.विलासराव उंडाळकर असे मातब्बर नेते या निवडणूकीने घडवले.सातारा जिल्हयातील लोकसभा निवडणूकांचा आढावा घेतला तर सन १९५२ ते २००० या कालखंडात तेरा लोकसभा निवडणूका झाल्या यातील सातारा मतदारसंघात सन १९५७ ची निवडणूक कम्युनिस्ट पक्षातर्फे क्रांतिसिंह नाना पाटील यांनी सन १९९६ ची निवडणूक शिवसेनेच्या श्री.हिंदूराव नाईक निंबाळकर अशा दोन व्यक्ती व निवडणूका वगळता काय़म कॉंग्रेस पक्षाने या निवडणूका जिंकल्या आहेत.तर कराड मतदार संघात शेकाप पक्षातर्फे श्री.चव्हाण दाजीसाहेब रामराव यांनी लढवलेली  सन १९५७ ची निवडणूक वगळता सर्व निवडणूका या कॉंग्रेस पक्षाने जिंकलेल्या आहेत.

या सर्व कालखंडात सातारा जिल्हयात काँग्रेसशिवाय कोणत्याही पक्षाला आपले बस्तान बसवता आलेले नाही. संपुर्ण जिल्हा श्री.शरद पवारांच्या मागे जेव्हा त्यांनी हाक दिली तेंव्हा उभा राहिलेला दिसते. श्री.शरद पवार यांनी सन १९९९ मधे आपला स्वतंत्र राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष स्थापन केला. या वेळीही सातारा जिल्हयाचे सर्वाधीक आमदार त्यांच्यासोबत गेल्याचे दिसते. सातारा जिल्हयाचा राजकीय अभ्यास करताना असे दिसून येते की सातारा जिल्हयातील लोकसभेच्या व विधिमंडाळाच्या पहिल्या तिन निवडणूकांमधून समाजातील विविध थरातील लोकांना यश प्राप्त झालेले आहे. त्यानंतर मात्र सातारमधील विविध मतदारसंघात काही अपवाद वगळता घराणेशाही निर्माण झाली. एकाच व्यक्तीने आपल्या मतदारसंघवार आपले बस्तान बसवले व जनतेनेही नव्या व्यक्तीला संधी देण्याचे टाळत त्यांनाच परत निवडून दिले. सातारा जिल्हयाच्या राजकारणात फक्त काँग्रेस पक्षाचेच वर्चस्व असल्याचे जाणवते. सुरूवातीच्या काळात शेतकरी कामगार पक्षामार्फत क्रांतिसिंह नाना पाटील यांनी सातारा जिल्हयात काँग्रेस पक्षाला कडवा विरोध केला मात्र त्यांच्या नंतर श्री.यशवंतराव चव्हाणांच्या नेतृत्वात सातारा जिल्हा हा काँग्रेसचा प्रमुख बालेकिल्ला म्हणून महाराष्ट्र आणि देशात ओळखला गेलेला आहे.

सातारा जिल्हयातील सामाजिक परिस्थितीचे विवेचन करता ग्रामीण भागात बदल होऊ लागलेला दिसत आहे. खेडयांवर शहरी संस्कृतीचा प्रभाव पडून मातीची व कुडामेढीची असणारी घरे बदलली. वैज्ञानिक प्रगतीचा समाजाला झालेला स्पर्श आणि काळासोबत झालेल्या शैक्षणिक विकासामुळे पुर्वपार चालत आलेल्या रूढी परंपरांमध्ये परीवर्तन झाले. असल्याचे जाणवते. धार्मिक संस्कार पुर्णपणे नाहीसे झालेले नाहीत मात्र हिंदू धर्मशास्त्राप्रमाणे होणारे नित्य नियमाचे संस्कार आजही चालू आहेत. अस्पृश्यता व बलुतेदारी या पध्दती आता दृष्य स्वरूपात पुर्णपणे नाहीशा झाल्या आहेत परंतु याचे दुसरे स्वरूप आज जातीय व धर्माच्या राजकारणात दिसते आहे. या अनुशंगाने पुन्हा जातीय व धार्मिक संघटना निर्माण होऊन फक्त त्या त्या समाजाचे नेतृत्व करून आपली अलगता स्पष्टपणे दर्शवताहेत. सातारा जिल्हयात ब्राम्हण एकूण लोकसंखेच्या प्रमाणात अत्यल्प आहेत व नोकरी आणि व्यवसायात अधिकांश लोक असल्याचे दिसते. मराठा समाज शेती, सैन्य व पोलीस अशा नोकऱ्या करताना दिसतो आहे. या समाजापैकी अत्यल्प लोक व्यवसाय करताना दिसतात.

समाजरचनेत फारसा बदल झालेला नसला तरीही पुर्वीप्रमाणे जाती व पोटजाती मधील दुरावा मात्र आहे तेवढाच आहे. जातीधर्माचे राजकारण अजूनही चालू असल्याचे जाणवते. जिल्हयात ब्राम्हण जातीचे प्रमाण कमी असुन शिक्षण, नोकरी, व्यापाराच्या निमित्ताने हा समाज आजही समाजरचनेच्या वरच्या वर्गात आहे. मराठा समाज हा शेती व्यवस्थेसोबतच राजकारण व समाजकारणात आलेला असून शैक्षणिक क्षेत्रात त्याचा सहभाग वाढलेला आहे. या समाजातील तरूण मुलांचा ओढा सैन्य दलाकडे वाढलेला आहे. असे असले तरी मराठा समाजातील काही मुले व मुली संगणक क्षेत्राकडे वळालेली आहेत व त्याप्रकारच्या विविध देशविदेशातील कंपन्यांमध्ये काम करताहेत उरलेली शेती व पशुपालन यावर आपला उदरनिर्वाह चालवत आहेत.

सातारा जिल्हयात मराठा, कुणबी, ब्राम्हण, महार/बौद्ध/नवबौद्ध, मांग, माळी, सुतार, न्हावी, कुंभार, चांभार, लोहार, सोनार, शिंपी, गुरव, रामोशी, जंगम, ढोर, कासार, कोष्टी, भोई, धनगर, गोंधळी, कैकाडी, कोमटी, कातकरी, कोल्हाटी, गोसावी, कासार, कोष्टी, भोई, धनगर, गोंधळी, कैकाडी, कोमटी, घडशी, घिसाडी, नंदीवाले, पाथरवट, बुरूड, लोणारी, वडार, वंजारी, साळी/विणकर आणि मुसलमान इ.प्रमुख जाती असून त्यांचे रितीरीवाज अव्याहतपणे चालू असतात.

सातारा जिल्हयातील अनुसुचित जातीमध्ये समाविष्ठ केलेल्या जातींमध्ये महार, मांग, चांभार, ढोर, होलार व खाटीक या जातींचा समावेश आहे. या अनुसुचित जातींमध्ये महार, मांग व चांभार या जातींची लोकसंख्या अधिक आहे. अनुसुचित जातींच्या सामाजिक उन्नतीसाठी आरक्षण व राखीव जागांची निर्मीती तसेच विविध योजना सुरू केल्याने या समाजाच्या सामाजिक स्तरामध्ये हळुहळू बदल होऊ लागल्याचे चित्र दिसत होते. सर्व जातीधर्माचे लोक येथे गुण्यागोविंदाने एकत्र राहातात. इतकेच नाही तर हिंदू, मुस्लिमच नव्हे तर सर्व जातीधर्मिय एकत्र येऊन विविध यात्रा, सण समारंभ साजरे करत असल्याचे दिसते.

सातारा जिल्हयात शिक्षण, लोककल्याण व इतर क्षेत्रात सेवाभावी वृत्तीने अनेक संस्था कार्यरत आहेत. सातारा जिल्हयात शिक्षणाचा आढावा घेताना कर्मवीर भाऊराव पाटलांनी १९१९ मध्ये जिल्हयात ‘रयत शिक्षण संस्थेची’ स्थापना करून सातारा जिल्हयाच्या शैक्षणिक विकासात सिंहाचा वाटा उचलला असल्याचे दिसते. आपल्या कार्याची सुरूवात त्यांनी

जात व धर्म हे भेद झुगारून सामाजिक समता प्रस्थपित करण्याच्या उद्देशाने केली. त्यांनी स्वावलंबी शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. तसेच वसतिगृहाची स्थापना केली. स्वावलंबी शिक्षण योजनेत ‘कमवा व शिका’ यावर भर देऊन शिक्षण जीवनाभिमुख करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या ‘स्वावलंबन, स्वाभिमान, स्वाध्याय व स्वातंत्र्य’ च्या चार तत्त्वावरील शिक्षण योजनेमुळे शिक्षणाचा पाया भक्कम झाला. कर्मवीर भाऊराव पाटलांप्रमाणेच सातारा जिल्हयातील बापुजी साळुंखे यांनी रयत शिक्षण संस्थेच्या कार्यास वाहून घेतले. नंतर त्यांनी ‘स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची’ स्थापना करून त्याद्वारे शिक्षण प्रसार केला.

सातारा जिल्हयात विसाव्या शतकाच्या शेवटच्या दोन दशकात आणि एकविसाव्या शतकाच्या पहिल्या दशकाच्या सुरूवातीला सामाजिक चळवळींनी विविध प्रश्नावर मांडलेली भुमिका कौतुकास्पद आहे. या चळवळींचे क्षेत्र सातारा जिल्हयापुरते मर्यादित नव्हते तर महाराष्ट्रभर या चळवळी विस्तारित झालेल्या आहेत. लोकजगृती आणि जनसामान्यांचे संघटन करून शासनावर दबाव आणायचा आणि विकासकामे करायची असा प्रयत्न चळवळींनी चालवला. या चळवळींचा मुख्य आधारस्तंभ हा फुले, शाहु आणि आंबेडकर हा होता. वास्तववादी विरोध करण्याचे काम या चळवळींनी केले आहे. अशा चळवळी जनमाणसांचा मोठा आधार बनल्या. डॉ.एन.डी.पाटील, डॉ.नरेंद्र दाभोळकर, श्री.लक्ष्मण माने, डॉ.आ.ह.साळुंखे अशी कितीतरी नावे सातारा जिल्हयातून मोठी झालेली आहेत. या सर्वानी असंघटीत असणाऱ्या समाजाला एकत्रित करून त्यांची मोट बांधली. शेतमजूर, स्त्रिया, कामगार, दलित, आदिवासी आणि पारधी हा कष्टकरी समाज चळवळीच्या माध्यमातून एकत्र आला. हे सर्व सातारा जिल्हयातच घडले कारण म्हणजे या जिल्हयाला असणारी सत्यशोधक व धार्मिक परिवर्तनाचा पुरस्कार करणाया विचारांची पार्श्वभूमी होय. सातारमध्ये सत्यशोधक विचारसरणी यशस्वीरित्या वाढवण्यासाठी कर्मवीर भाऊराव पाटील, केशवराव विचारे आदींनी प्रयत्न केले.

स्वातंत्रोत्तर सातारची सामाजिक परिस्थीती पाहत असताना आपणास ज्या संस्था या समाजात राहुन सामाजिक कार्य करत होत्या त्या समाजवादी युवक दल, विद्रोही चळवळ, भटक्या विमुक्त जातीजमाती चळवळ, मुक्तांगण चळवळ, समता आंदोलन, आंबेडकर आकादमी सातारा, अंधश्रध्दा चळवळ, परिवर्तन व्यसनमुक्ती चळवळ, कामगार चळवळ आणि

स्त्री चळवळ यासारख्या चळवळी जिल्हयालाच नाही तर देशाला मार्गदर्शक ठरलेल्या आहे.या चळवळींच्या माध्यमातून अनेक सामाजिक कार्यकर्ते घडले.

सातारा जिल्हयाच्या अनुशंगाने महत्त्वपूर्ण चळवळ म्हणजे अंधश्रध्दा निर्मूलन चळवळ होय. सातारा जिल्हयात निर्माण होऊन ज्या चळवळीचा महाराष्ट्र नव्हे तर देशभर प्रसार झाला ती चूकीच्या प्रथा परंपरा व रूढींच्या विरोधातील चळवळ म्हणजे अंधश्रध्दा निर्मूलन चळवळ होय. डॉ.नरेंद्र दाभोळकर यांनी ही चळवळ सातारा जिल्हयात सुरू केली व आज या चळवळीने महाराष्ट्रभर अंधश्रध्दा निर्मुलनासाठी कार्यकर्त्यांची फौज निर्माण केलेली आहे. अंधश्रध्दा निर्मूलनाचा विचार, उच्चार, संघर्ष व त्यांची सैध्दांतिक मांडणी या पाचही आघाडयांवर अंधश्रध्दा निर्मूलन समिती व डॉ.नरेंद्र दाभोळकर कार्यरत होते.त्यांचे विचार व त्यांची मांडणी तात्विक मांडणी स्तुत्य आहे.कृतिशीलतेमुळे त्यांच्या विचारांना आत्मप्रत्ययाची झळाळी प्राप्त झालेली आहे. त्यांचा ‘गणेश मूर्तीचे विसर्जन नको दान करा’ हा विचार तसेच दारूबंदी विरूध्द महिलांनी संघटन करावे हा विचार त्यांनी वृत्तपत्रातून दिला.डॉ. नरेंद्र दाभोळकर यांचा धर्म, श्रध्दा यांचा दांडगा अभ्यास होता. डॉक्टर असल्याने त्यांचा वैज्ञानिक दृष्टिकोन उत्तम होता. या चळवळीत काम करत असताना डॉ.नरेंद्र दाभोळकर यांची हत्या झाली तरीही त्यांच्या विचारांचा वारसा घेऊन ही चळवळ पुढे कार्यरत आहे.

स्त्रिया हे या समाजाचा एक अंग आहे. सातारा जिल्हयात सन १९४७ पासून एवढया मोठया प्रमाणावर सामाजिक सुधारणा चळवळी झाल्या सन २००० पर्यंत या स्त्री अत्याचारांच्या घटना कमी व्हायला हव्या होत्या त्यात कमी आली नाही. जिल्हयात पुर्वी हुंडापध्दत होती स्वातंत्र्य मिळाल्यावर स्त्रीयांच्यावरील या अत्याचारात घट होईल असे वाटलेले होते मात्र सन २००० पर्यंतही हुंडापध्दत बंद झालेली नव्हती उलट या पध्दतीला समाजातील श्रीमंत व प्रतिष्ठीत लोकांनी प्रतिष्ठा मिळवून दिली आहे. मुलाची शैक्षणिक पात्रता, घराणे यावर हुंडा जास्त घेतला जावू लागलेले होता. स्त्रीयांना राजकीय क्षेत्रात जोपर्यंत आरक्षण नव्हते तोपर्यंत स्त्रीया अपवादानेच राजकारणात असल्याचे दिसते. परंतू राजकीय क्षेत्रात आरक्षण मिळाल्यापासून त्यांचे राजकारणाकडे येण्याचे प्रमाण वाढलेले दिसते. त्याचप्रमाणे राजकारणासोबतच स्त्रिया विविध क्षेत्रात आपले अस्तित्व दर्शवताना दिसतात.

शेती व शेतीपुरक उद्योगधंदे यांनी सातारा जिल्हयाच्या आर्थिक विकासात महत्वाचे

योगदान दिलेले आहे. सातारा जिल्हयातून वाहणाऱ्या नद्यांनी या प्रदेशाला सुपीक केलेले आहे. सातारा जिल्हयातील महाबळेश्वर, पाटण, जावली, वाई व सातारा या तालुक्यांमध्ये होणारी पर्जन्यवृष्टी ही जास्त प्रमाणात आहे तर उरलेल्या तालुक्यांमध्ये उन्हाळयात पिण्याच्या पाण्यासाठी शासनाला पाणीपुरवठा करावा लागतो.याचप्रमाणे जिल्हयाच्या पश्चिम भागतील मृदा कमी प्रतीची असुन पुर्व भागात मात्र हीच मृदा काळी व सुपीक आहे. या सर्व परिस्थीतीवर मात करत येथिल जनतेने आपला आर्थिक विकास घडवण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

कुपर उद्योग समुह व मुथा यासारख्या उद्योगसमुहांनी सातारा जिल्हयात आपल्या व्यवसायाचा श्रीगणेशा केला आणी जगभर नावलौकीक प्राप्त केलेला आहे. यांच्यानंतर मात्र काही मोजके औद्योगिक कारखाने वगळता सातारा जिल्हयात औद्योगिक विकास झालेला दिसत नाही. सन १९७१ नंतरच खऱ्या अर्थाने इथल्या औद्योगिक विकासाला आरंभ झाला. विविध महामंडळांच्या माध्यमातून औद्योगिकरणासाठी आर्थिक मदत पुरवण्यात आली व सातारा जिल्हयात विविध ठिकाणी एम.आय.डी.सी.च्या माध्यमातून औद्योगिक विकास करण्याचा प्रयत्न झाला. परंतू उद्योगांसाठी लागणारी विज व जागा यांच्यामुळे हा विकासाचा वेग फारच मंदावलेला दिसतो. स्वातंत्रोत्तर काळात किंवहुना स्वतंत्र सातारा जिल्हयाच्या निर्मितीनंतरही सातारा जिल्हयाचा आर्थिक विकास म्हणावा इतका झालेला दिसत नाही.

सहकारी तत्वांवर सातारा जिल्हयात साखर कारखाने निर्माण झाले. या साखर कारखान्यांच्या धर्तीवर अनेक प्रकारच्या सहकारी संस्था उदा. दुध संघ, बँका, कृषी उत्पन्न बाजार समित्या व खरेदी विक्री संघ आणि सहकारी औद्योगिक संस्थांची निर्मीती जिल्हयात झाली आणि या जिल्हयातील शेतकरी वर्गास आपल्या शेतीउत्पादनांना योग्य न्याय मिळू लागला. सहकारी बँकांमुळे आर्थिक चणचण दुर होऊ लागली. परंतू काळाच्या ओघात या सहकारी संस्थांमधील काही संस्था डबघाईस आलेल्या दिसतात तर काही संस्था बंद झालेल्या आहेत.

सातारा जिल्हयाचा आर्थिक इतिहास पाहीला असता लक्षात येते की सातारा जिल्हयाच्या आर्थिक विकासासाठी आवश्यक असणारी भौगौलिक परिस्थीती येथे उपलब्ध असताना देखिल मुलभूत सुविधांच्या अभावामुळे उद्योगधंद्यांसाठी लागणार कच्चा माल व मानवी बळ याची कमतरता भासत नाही स्वातंत्र्योत्तर कालखंडात परंतू राजकीय ईच्छाशक्तीची

यासाठी हवी त्या प्रमाणात मदत होत नसल्याने सातारा जिल्हयाची औद्योगिक ओळख वाढली जात नाही उलट पुसली जात आहे. एकविसाव्या शतकात सेझ सारख्या संस्थांमुळे या आर्थिक विकासाचा वेग वाढेल अशी अपेक्षा आहे.

सातारा जिल्हयाला सशक्त साहित्य परंपरा साहित्यिक लाभलेली आहे. या साहित्यीकांच्यामध्ये कवी विहंग, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, श्री.ना.ह.आपटे, श्री.बाबूराव गोखले, श्री.चिंतामणराव कोल्हटकर श्री.यशवंतराव चव्हाण, श्री.श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, प्रा.रा.ग.जाधव, पंडीत सप्रे, श्री.रा.ना.चव्हाण, अशा मान्यवरांचा समावेश होतो. या परंपरेत श्री.जी.ए.कुलकर्णी यांच्या प्रभावात लिहीणारे वाईचे श्री.एस.डी.ईनामदार, श्री.प्रकाश संत, श्री.माधव पिटके, बालसाहित्य व विनोदी लेखन करणारे श्री.म.वि.कोल्हटकर,अनुवादक, कथाकार आणि समिक्षक श्री.व.के.पाटील, वैचारीक व समिक्षात्मक लेखन करणारे श्री.शंकर सारडा आणि डॉ.आ.ह.साळुंखे कादंबरीकार नाटककार आणि स्त्री प्रतिमांचे चित्रण करणारे कवी प्रमोद कोपर्डे, लोककलेच्या संदर्भात स्वतंत्र रचना देणारे श्री.दिलीप जगताप, ललित लेखक श्री.श्रीनिवास कुलकर्णी यांचा समावेश होतो. सातारच्या साहित्य परंपरेचे एक दुर्दैव म्हणजे सातारला एवढया मोठया प्रमाणावर वाचक वर्ग असूनही सातारमध्ये एकही नामवंत प्रकाशन संस्था निर्माण झाली नाही आणि ज्या निर्माण झाल्या त्या रूजल्या नाहीत.

सातारा जिल्हयाच्या रंगभूमीला प्रदीर्घ इतिहास आहे. पन्नास व साठीच्या दशक सातारच्या रंगभूमीचा रचनात्मक पाया घालणार सुवर्णकाळ होता. तर सातारा जिल्हयात सत्तर व ऐंशीच्या दशकात नाटयकालावंत मोठया प्रमाणात निर्माण झाले. ‘अभिनव कलामंदिर’ आणि ‘कलामंदिर’ या संस्थांनी ऐतिहासिक व सामाजिक नाटके सादर केली. लोकांनी लोकांच्या प्रश्नासाठी सुरू केलेली नाटयचळवळ हे ब्रिदवाक्य घेऊन ‘लोकरंगमंच’ने वाटचाल सुरू केली. लोकरंगमंचची चळवळ विराम पावली असताना तोच विचार ‘लोकायत’च्या माध्यमातून पुढे नेला. पुढे लोकायतही बंद पडली परंतू तरीही लोकरंगमंचचा विराम भरून काढण्याचे काम श्री.किरण माने यांनी ‘सारांश सातारा’च्या माध्यमातून सुरू ठेवले. वाईचे प्रतीक थिएटर्स , कऱ्हाडच्या ‘रसगंध’ संस्था, ‘अदाकार’ या संस्थांनी सातारा जिल्हयाच्या रंगभूमीला जिवंत ठेवण्याचे कार्य केले.पारंपारीक कलांमध्ये गोंधळ, शाहीर व तमाशा हे प्रमुख असून तमाशामध्ये कांताबाई साताराकर, यमुनाबाई वाईकर, व्दारका सातारकर, अनुसया सातारकर, रोशन

सातारकर,उषा वाईकर यांनी ही लोकनाटय कला जिवंत ठेवण्यात महत्वाची भूमिका बजावलेली दिसते.

सातारच्या चित्रपटसृष्टीला सॉलीवूड या नावाने संबोधले जाते. अगदी सुरूवातीच्या काळात मुख्यत्वे महाबळेश्वर आणि पाचगणी ही चित्रीकरणाची स्थळे होती.परंतू पुढे माहुली, भुईंज आणि सातारा जिल्हयात विविध ठिकाणी चित्रीकरण होऊ लागले. मराठी चित्रपट निर्मितीमध्येही सातारा आघाडीवर आहे. थोडक्यात या चित्रपटक्षेत्रातही सातारचे सॉलीवूड आपले नाव कोरत असल्याचे दिसते आहे.

सातारा जिल्हयाने खेळांमध्ये जागतिक पातळीवर नावलौकीक मिळवलेला आहे. कुस्ती हा क्रीडाप्रकार साताऱ्यात अत्यंत आवडीचा होता. विविध स्पर्धांमध्ये या खेळाडूंनी भारताचे प्रतिनिधीत्व केलेले आहे. डॉ.नरेंद्र दाभोळकर यांनी सातारचा नावलौकीक वाढवला. नरेंद्र दाभोळकर राष्ट्रीय–आंतरराष्ट्रीय स्तरावराचे उत्तम कबड्डीपटू म्हणून क्रीडा जगतात प्रसिद्ध होते. कबड्डीवर उपलब्ध असलेले एकमेव शास्त्रशुद्ध पुस्तकही त्यांनी लिहिले. त्याचप्रमाणे सातारमध्ये द्रोणाचार्य, दादोजी कोंडदेव, शिवछत्रपती पुरस्कार विजेते व पुरस्कारप्राप्त क्रीडा संघटक असणारे अनेक लोक आहेत.

सातारा जिल्हयात प्रतापगड, व्याघ्रगड, किंवा वासोटा किल्ला, अंजिक्यतारा, सज्जनगड, चंदनगड, वंदनगड, वसंतगड, सदाशिवगड, वैराटगड, केंजळगड, दातेगड, गुणवंतगड, कल्याणगड, पांडवगड, संतोषगड, सुभानमंगळ असे अनेक किल्ले व डोंगर सातारा जिल्हयात असुन सातारा जिल्हयाच्या प्रदेशात अनेक ठिकाणी झालेल्या युध्दांच्या खाणाखुणा हे किल्ले दर्शवतात.ज्याप्रमाणे किल्ले आपले अस्तित्व दर्शवताना त्या प्रदेशाचा इतिहास मांडतात तश्याच प्रकारे पुराणकालीन वास्तू व अवशेषही इतिहासाची मांडणी करतात. सातारा जिल्हयाच्या विविध भागात अशा अनेक वास्तू आजही इतिहास घेऊन उभ्या आहेत.

सातारा जिल्हयामधे दोन वस्तूसंग्रहालये असून ती औंध वस्तूसंग्रहालय व छत्रपती शिवाजी वस्तूसंग्रहालय होत. सातारा या जिल्हयाच्या ठिकाणी ‘शेतकरी निवास’ येथे या संग्रहालयाची सुरूवात सन १९६७ साली करण्यात आली. या ठिकाणी दुर्मिळ ऐतिहासिक पुरातन वस्तूंचा संग्रह आहे. तसेच औध येथील वस्तूसंग्रहालयात विविध प्रदेशात निर्माण

झालेली व त्या त्या प्रदेशाची वैशिष्टये सांगणारी चित्रे, संगमरवरातून कोरलेली शिल्पे, कोरीव काम केलेली धातूची, लाकडाच्या वस्तू, हस्तीदंत कोरीव कलाकृती आहे.

सातारा जिल्हयाच्या भुप्रदेशाची प्राचीन परंपरेच्या इतिहासाची साक्ष दर्शवणारी पुरापुराश्मयुगिन, मध्यपुराश्मयुगिन, व उत्तरपुराश्मयुगिन हत्यारे विविध ठिकाणी सापडलेली आहेत. कराडजवळची आगाशिव लेणी, वाईजवळची पांडवगड लेणी, लोहारेची बौध्द लेणी, शिरवळ जवळील लेणीसमूह, देगांव गावाच्या पुर्वेला डोंगर माथ्यावर असणारी शैव पंथीय लेणी आणि पाचगणीच्या जवळ असणारी चार लेणी सातारा जिल्हयाचे प्राचिन काळातील अस्तित्व दर्शवत आहेत. त्याचप्रमाणे सातारच्या पर्यटन व्यवसायासही मदत करताहेत.

प्रस्तूत संशोधनासाठी उपलब्ध संदर्भ साधनांच्या आधारे संशोधनात्मक इतिहास लिहीताना 'स्थानिक इतिहासावर' प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केलेला आहे. जिल्हयाची ऐतिहासिक पार्श्वभूमी, राजकीय परिस्थीती, सामाजिक परिस्थीती व सांस्कृतिक विकासाचे अवलोकन करण्याचा प्रयत्न या ठिकाणी मी केलेला आहे. थोडक्यात सातारा जिल्हयाचा स्वातंत्र्येत्तर काळातील राजकीय, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतीक इतिहास मांडण्याचा मी प्रयत्न केलेला आहे.

**निष्कर्ष :**

'स्वातंत्र्योत्तरकालीन सातारचा इतिहास : राजकीय, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक इ.स.१९४७ ते २०००' या विषयाच्या संशोधनांती माझ्यासमोर काही वैशिष्ठयपुर्ण बाबी समोर आल्या. त्या पुढीलप्रमाणे मांडता येतील.

१. **सातारा जिल्हयातील राजकीय नेतृत्वाचा देशाच्या व राज्याच्या राजकीय क्षेत्रावर दबदबा होता.**

स्वातंत्र्योत्तर सातारा जिल्हयात निर्माण झालेल्या विविध राजकीय व्यक्तींनी महाराष्ट्राच्या राजकारणात सातारा जिल्हयाचे प्रतिनिधित्व तर केलेच परंतू देशाच्या राजकारणावरही सातारा जिल्हयाचा कायमस्वरूपी ठसा उमटवला. क्रांतिसिंह नाना पाटील, श्री.यशवंतराव चव्हाण, श्री.किसन वीर, श्री.यशवंतराव मोहीते, लोकनायक बाळासाहेब देसाई, श्री.शंकरराव जगताप यासारख्या राजकीय क्षेत्रात मुरलेल्या नेत्यांनी सातारा जिल्हयाचे राजकारण केले. या नेतेमंडळींनी आपल्या कारकिर्दीत इतर कोणत्याही बाबीपेक्षा समाजनिष्ठेने केले.श्री.यशवंतराव

चव्हाण यांनी महाराष्ट्राचे प्रथम मुख्यमंत्री म्हणून आणि भारताचे संरक्षणमंत्री अशा महत्वाच्या राजकीय पदांवर काम करून सातारा जिल्हयाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवलेला आहे तर श्री.शंकरराव जगताप यांनी महाराष्ट्र विधानसभेच्या उपसभापती व नंतर सभापती अशा महत्त्वपूर्ण पदांवर काम केले आहे.

**२. सातारा जिल्हयातील राजकीय नेतेमंडळींनी राजकारणातून समाजकारण साधले.**

सातारा जिल्हयातील विविध नेतेमंडळींनी राजकारण फक्त राजकीय फायद्यासाठी केले नाही तर या राजकारणाच्या माध्यमातून समाजविकास साधण्याचा प्रयत्न केला. वेळप्रसंगी पक्षबदल करण्याची आवश्यक्ता भासली तर ते करण्यास त्यांनी मागेपुढे पाहीले नाही. थोडक्यात पक्षनिष्ठेपेक्षा सामजिक विकासाला त्यांनी प्राधान्य दिले.

वरील सर्व बाबीसह एक आणखी महत्वाची बाब म्हणजे या सातारा जिल्हयाच्या जनतेने साठच्या दशकापासून राजकारणात कायमस्वरूपी घराणेशाहीला प्रोत्साहन देत आमदार व खासदार यांच्या वारसदारांना नेतृत्व दिलेले आहे मात्र जर हे नेतृत्व जनतेच्या प्रश्नांना वाचा फोडू शकत नसेल तर त्यावेळी जनतेने आजवर चालत आलेल्या घराणेशाहीला विरोध करणे आवश्यक आहे.

**३. सातारा जिल्हयातून विविध सामाजिक चळवळींचा आरंभ झालेला आहे.**

सन १९४७ ते २००० या कालावधीमध्ये सातारा जिल्हयातील समाजरचनेत फार मोठा बदल झालेला नाही. मात्र अनेक चूकीच्या प्रथा परंपरांच्या विरोधात सातारा जिल्हयात अनेक सामाजिक चळवळी निर्माण झाल्याने त्या काही प्रमाणात का होईना नष्ट झाल्या आहेत. सातारा जिल्हयात निर्माण झालेल्या महाराष्ट्र अंधश्रध्दा निमुर्लन चळवळीने महाराष्ट्रभर जनजागृतीची मोहीम राबण्याचे कार्य यशस्वीरीत्या केलेले आहे.

सातारा जिल्हा हा समाज सुधारकांचे आगार आहे मात्र तरीही येथे अजुनही काही अनिष्ट प्रथा परंपरा चालू आहेत त्यावर नियंत्रण मिळवणे आवश्यक आहे. सातारा जिल्हयातील दलित चळवळ डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या मृत्यूनंतर एका नेतृत्वाखाली न चालता ती अनेक लहान लहान गटात विखूरली गेली परंतू तिचे अस्तित्व मात्र टिकून आहे. सातारा जिल्हयातील ही दलित चळवळ वाढण्यासाठी व या चळवळीच्या माध्यमातून दलित समाजाचा विकास

होण्यासाठी ही चळवळ नव्या जोमाने एकत्र होणे आवश्यक आहे. विविध गटातटाच्या राजकारणातून बाहेर पडून दलित नेतृत्वाने एकत्र येणे आवश्यक आहे.

**४. आपला सांस्कृतिक वारसा जपण्याचा प्रयत्न स्वातंत्र्योत्तर कालखंडात करण्याचा प्रयत्न केलेला आहे.**

सातारा जिल्हयातील जनतेने पिढयानपिढया चालत आलेल्या सांस्कृतिक प्रथा, परंपरा व सण–उत्सव मोठया प्रमाणावर साजरे करून आपला सांस्कृतिक वारसा जपलेला आहे. विविध धर्माचे, विविध जातीचे लोक एकत्रित येऊन हे सण उत्सव मोठया प्रमाणावर साजरे करतात. स्वातंत्र्योत्तर काळात यात्रांना पुर्वीपेक्षा जास्त महत्व आलेले आहे. सर्वसामान्य वर्गातील लोक यात्रा व दिवाळी या दोन उत्सवांच्या प्रसंगी मोठया प्रमाणावर खर्च करून उत्सव साजरे करतात. आपला सांस्कृतिक वारसा जोपासण्याच्या नावाखाली यात्रा व इतर प्रसंगी होणाऱ्या चुकीच्या प्रकारांवर आळा घातला गेला पाहीजे.

**५. स्वातंत्र्योत्तर कालखंडात पारंपारीक कला, नाटय, चित्रपटसृष्टी यांचा विकास झालेला आहे.**

सातारा जिल्हयातील विविध जातीजमातीतील पारंपारीक कलांचे जतन त्या त्या जातीजमातीतील लोक करतात. उदा.धनगरी नृत्य. या पारंपारीकतेसोबतच आधुनिकतेचा बाजही त्यांच्या कलाप्रकारांमध्ये असतो. सातारा, कराड, वाई या सारख्या ठिकाणी नाटयसंस्थांची स्थापना होऊन त्या संस्थांच्या मार्फत प्रायोगिक व व्यावसाईक रंगभूमीवर नाटय चळवळ वाढवण्याचा प्रयत्न झालेला आहे. बॉलिवूड प्रमाणे सातारचे सॉलीवूडही चित्रपटक्षेत्रात आपले स्थान मजबूतरित्या टिकवून आहे व येथे मराठी, हिंदी व दाक्षिणात्य चित्रपटांचे चित्रिकरण होताना दिसते. सातारमधील सिनेनाटयचळवळ आणखी कशी विकसित होईल याकडे लक्ष देणे आवश्यक असून सॉलीवूडचा विकास होणे गरजेचे आहे.

**६. सातारा जिल्हयाची क्रिडा संस्कृती जोपासण्याचे कार्य येथिल खेळाडूंनी केलेले दिसते.**

श्री.खाशाबा जाधव, कै.नंदा जाधव व डॉ.नरेंद्र दाभोळकर यासारख्या खेळाडूंनी भारतातच नाही तर आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध क्रीडाप्रकारात यश संपादन करून सातारा जिल्हयाचा नावलौकीक वाढवलेला आहे. त्याचप्रमाणे श्री.बबनराव उथळे, श्री.आनंद कोल्हापूरे यासारख्या क्रीडा संघटकांनी सातारा जिल्हयातील गुणवंत खेळाडूंना प्रोत्साहन देऊन त्यांना

योग्य मार्गदर्शन केलेले आहे. त्याचमुळे सातारा जिल्हयातील अशा विविध मार्गदर्शकांचाही महाराष्ट्र शासनाने द्रोणाचार्य, दादोजी कोंडदेव व शिवछत्रपती पुरस्कारांनी सन्मान केलेला आहे. या क्रीडा संस्कृतीचा विकास होण्यासाठी यावर आणखी खर्च होणे अपेक्षित आहे.

**७. स्वातंत्र्योत्तर सातारा जिल्हयात पर्याटनस्थळांच्या माध्यमातून पर्याटनाला चालना मिळालेली आहे.**

सातारा जिल्हयाची भौगोलिक रचना ही वेगळया प्रकारची आहे. या जिल्हयातील काही तालुक्यांमध्ये सहयाद्री पर्वतरांगांनी अनेक उंच डोंगररांगा निर्माण केलेल्या आहेत तर या उलट काही तालुक्यांत सपाट माळरान प्रदेश आहे. या सहयाद्रीच्या डोंगररांगातून अनेक पर्याटनस्थळांची निर्मीती झालेली आहे. महाबळेश्वर हे तर मिनी काश्मिर म्हणून ओळखले जाते. या डोंगररांगांतून वाहणा–या नद्या, त्यावरील धबधबे व निसर्गसौंदर्य हे पाहणे पर्याटकांसाठी पर्वणीच आहे.

छ.शिवरायांच्या पदस्पार्शाने पावन झालेल्या या प्रदेशात अनेक किल्ले आहेत. त्यांच्या या किल्ल्यांची भ्रमंती करणे, अनेक ऐतिहासिक स्थळांना, लेण्यांना व वस्तूसंग्रहालयास भेटी देणे यासाठी अनेक पर्याटक सातारा जिल्हयास भेट देताना आढळतात.

या सर्व पर्याटनस्थळांच्या विकासाचे काम हाती घेतले गेले आहे परंतू त्यात वृध्दी होणे आवश्यक आहे. ऐतिहासिक स्मारके व अवशेषांचे जतन योग्य प्रकारे होणे आवश्यक आहे. पर्याटनाच्या हेतूने प्राचिन लेण्यांच्या संवर्धनासाठी शासन स्तरावर प्रयत्न होणे अत्यंत आवश्यक आहे.

**८. सातारा जिल्हयात स्वातंत्रोत्तर कालखंडात विविध सहकारी औद्योगिक संस्था उभ्या राहील्या.**

सातारा जिल्हयातील जनतेच्या आर्थिक विकासात अनेक सहकारी संस्थांच्या माध्यमातून औद्योगिक विकास करण्याचा प्रयत्न झालेला आहे. शेतीपुरक उद्योगधंदे निर्माण झाले. सहकारी तत्वावर निर्माण झालेले साखर कारखाने शेतक–यांच्या आर्थिक विकासाला उपयुक्त झाले. सातारा जिल्हयात विविध तालुक्यात स्थापन झालेल्या बाजारसमित्या व खरेदी विक्री संघामुळे शेतीमालास योग्य दर मिळणे शक्य झाले.

जिल्हयात ठिकठिकाणी शासनाने निर्माण केलेल्या औद्योगिक वसाहतींच्यामुळे युवकांना रोजगार मिळाला व अनेक युवकांना आपले उद्योग स्थापन करणेस प्रोत्साहन मिळाले. शासनाच्या आर्थिक मदतीने हे नवीन उद्योगधंदे स्पर्धेत काही काळ टिकून राहील्याचे दिसते.

जिल्हयाच्या राजकीय नेतृत्वांनी जिल्हयाच्या आर्थिक विकासाकडे लक्ष देऊन त्याच्या विकासासाठी पक्षीय व इतर मतभेद विसरून कार्य करणे गरजेचे आहे. जिल्हयात बंद पडलेले औद्योगिक समुह व कारखाने पुन्हा कसे कार्यान्वित करता येतील व युवकांना रोजगार कशा प्रकारे निर्माण करता येईल यावर लक्ष देणे आवश्यक आहे.

**पुढील संशोधनासाठी दिशा**

१. सातारा जिल्हयाचा आर्थिक अभ्यास करणे.

२. स्वातंत्र्योत्तर सातारा जिल्हयाचा व शेजारील पुणे आणि कोल्हापूर जिल्हयांचा तुलनात्मक अभ्यास करून सातारा जिल्हा यांच्या तुलनेत कोठे आहे याची मांडणी करणे.

३. सन २००० नंतर जिल्हयास मिळालेल्या नेतृत्वांनी जिल्हा कसा प्रगतीकडे नेण्याचा प्रयत्न केला आहे.

# संदर्भ ग्रंथ सूची

**प्राथमिक साधने इंग्रजी :**

**1.Debate**

Maharashtra Legislative Assembly, July & August 1961

**2. Reports**


A. Election commission of India - general election, 1951 to the legislative assembly of Maharashtra, statical reports 1951, 1957, 1962, 1967, 1972, 1978, 1980, 1985, 1990, 1995, 1999.

B. Election commission of India - general elections, lok sabha statistical reports 1951, 1957, 1962, 1967, 1971, 1977, 1980, 1984, 1989, 1991, 1996, 1999,


**प्राथमिक साधने मराठी :**


१. उपमुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र विकास महामंडळ यांचे रजिस्टर

२. उपनिबंधक, श्रमिक संघ, पुणे यांचे रजिस्टर

३. क्रिमिनल क्लासेस इन दि बॉम्बे प्रेसीडेन्सी, १९०८

४. जिल्हा आरोग्य अधिकारी, सातारा विविध फाईल

५. जिल्हा जनगणना निर्देशग्रंथ, १९६१

६. बँकिंग स्टॅटिस्टिक्स बेसिक स्टॅटिस्टिकल रिटर्न्स, व्हाल्यूम २०, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, मार्च १९९१

७. सांख्यिकी गोषवारा, महाराष्ट्र राज्य

८. सातारा जिल्हा जनगणना निर्देशग्रंथ, सातारा, १९६१

९. सार्वजनिक न्यास उपविभागीय नोंदणी कार्यालय, सातारा, नोंदणी फाईल.

१०. सोर्स मटेरिअल फॉर अ हिस्ट्री ऑफ फ्रिडम मुव्हमेंट इन इंडीया खंड १, १८१८–१८८५, मुंबई शासन, १९५७.

## गॅझेटीअर :

1. महाराष्ट्र राज्य गॅझेटीअर,सातारा जिल्हा, दार्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन, १९६३, १९९९.

## पीएच.डी. शोधप्रबंध :

1. डॉ.कोरडे डी.डी., वाई शहराचा राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक इतिहास, इ.स.१९०० ते २००० पीएच.डी.प्रबंध, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, ऑक्टोबर २०१२.
2. डॉ.पाटील ए.जे.,कऱ्हाडचा इतिहास, पीएच.डी प्रबंध, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, जुलै २०११.
3. डॉ.पवार व्ही.पी.,कोयना प्रकल्प : एक ऐतिहासिक अभ्यास' (१९५४ ते २०१०) पीएच.डी प्रबंध, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, मे २०१३.
4. डॉ.वरेकर एन.ए., स्वातंत्र्योत्तर काळातील सातारा शहर : एक नागरी ऐतिहासिक अभ्यास', पीएच.डी प्रबंध, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, जुन २००९.

## एम.फिल शोधप्रबंध :

१. काळे व्ही.सी., सातारा जिल्हयातील किल्ल्यांचे मराठा स्वातंत्र्ययुध्दातील ऐतिहासिक महत्व १६८९–१९०७, एम.फिल.प्रबंध, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, २००८.

२.देशमुख आर.के. किसन वीर : जीवन व कार्य, एम.फिल प्रबंध, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, १९९०.

३.बोडखे एस.एस., कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शिक्षणविषयक विचार : एक अध्ययन, एम.फिल. प्रबंध, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक, फेब्रुवारी २००९.

## मुलाखती :

१. श्री.काकडे चंद्रकांत मु.पो.सालपे ता.खंडाळा जि.सातारा, दि.०६.११.२०१५ वेळ स.११.०० वा.

२. श्री.कुलकर्णी रूपेश सुर्यकांत, सातारा ता.जि.सातारा दि.१५.१२.२०११,वेळ दु.०३.४५ वा.

३. श्री.कदम गोविंदराव, सोनगांव तर्फ सातारा ता.जि.सातारा दि.१९.०१.२०१२ वेळ दु.०२.१५ वा.

४. श्री.काझी जमीर अजिझ, मंगळवार पेठ, कराड,जि.सातारा वेळ स.११.३० वा.

५. डॉ.गावडे सदाशिव, फलटण, जि.सातारा, दि.३१.१२.२०११ वेळ स.११.३० वा.

६. श्री.गुदगे मोहनराव,मु.पो.मायणी, दि. २८/०५/२०१५ स.११.०० वा.

७. श्री.जगताप रामराव, मु.पो.जकातवाडी.ता.जि.सातारा दि.०६.०५.२०१५, वेळ स.११:०० वा.

८. ॲड.जगताप सुनिता वाघोली. ता.कोरेगांव जि.सातारा दि.१९.१२.२०१३ वेळ स.११:०० वा.

९. श्री.जमिर व्ही .एन., मु.पो.कोयनानगर, दि ०९.६.२०१० स.१०.०० वा.

१०. श्री.ठोके मो.नि. मु.पो.अतित.ता.जि.सातारा दि. २४.१०.२०१४, वेळ स.१०:०० वा.

११. श्री.डिसुझा अल्फ्रेड, सदरबझार सातारा ता.सातारा जि.सातारा, वेळ दु.०१.००वा.

१२. श्री.नावडकर बाबुराव, सोनगांव ता.जि.सातारा दि.२०.०१.२०१२ वेळ स.१०.०० वा.

१३. श्री.पाटील लक्ष्मणराव, सोनगांव,.ता.जि.सातारा दि. २८.०८.२०११,वेळ दु.१२:४५ वा.

१४. श्री.पाटणकर नारायण , म्हावशी ता.पाटण जि.सातारा दि.२०.११.२०१३ संध्या.०५:०० वा.

१५. श्री.पवार व्ही.डी. जळव, ता.जि.सातारा दि १९.१.२०११संध्या.०४.०० वा.

१६. श्री.पाटील नितीन बानुगडे,रहिमतपूर, जि.सातारा,दि.१९.०८.२०११,वेळ स.१०.०० वा.

१७. श्रीमती.पाटील इंदीराताई, सातारा, दि. २६/०५/२०१५ दु.०५.०० वा.

१८. श्रीमती.पाटील गौराताई, सातारा, दि. २६/०५/२०१५ दु.०४.०० वा.

१९. श्री.पाटणकर नारायण , म्हावशी, दि.२०.११.२०१३ संध्या.०५:०० वा.

२०. श्री.पवार व्ही .डी., मु.पो.जळव, दि १९.१.२०११ संध्या.०४.०० वा.

२१. श्री.मांडके विजय ता.जि.सातारा १२/०२/२०१५ दुपारी ०१:०० वा.

२२. श्री.माने लक्ष्मण, ता.जि.सातारा२९/०८/२०१४ संध्याकाळी ०५:०० वा.

२३. श्री.मोमीन अब्दुल, २१५ प्रतापगंज पेठ सातारा ता.जि.सातारा, वेळ स.०९:३०वा.

२४. श्री.महाबळेश्वरकर प्रभाकर,ता.जि.सातारा दि.१५/०५/२००७सकाळी ११:०० वा.

२५. श्री.मुळीक लहु दाजी, जांब ब्रु।। ता.कोरेगांव जि.सातारा दि.२५.०१.२०१२ वेळ दु.०१.४५
२६. श्री.शिंदे पुरूषोत्तम, मु.पो.काटवटे, दि १९.१.२०११ दु.०१.०० वा.
२७. श्री.शिंदे पुरूषोत्तम, पाटण जि.सातारा दि १९.१.२०११ स.११.३० वा.
२८. श्री.शिंदे बबन शिवराम, काटवटे ता.महाबळेश्वर जि.सातारा दि १९.१.२०११, दु.०१.०० वा.
२९. श्री.सरकाळे राजेंद्र, मरळी ता.पाटण जि.सातारा दि १९.१.२०११ स.११:०० वा.
३०. श्री.साळुंखे आ.ह. ता.जि.सातारा२७/१०/२०१३ दुपारी ०३:०० वा.
३१. श्री.सोनावणे राजेंद्र भिमराव मु.पो.निरगुडी जि.सातारा, वेळ दु.०३.४५ वा.
३२. ह.भ.प.मुळे नारायण, पाटण, ता.जि.सातारा दि.०२.०८.२०११ वेळ दु.०१.४५ वा.

**प्रत्यक्ष सर्वेक्षण :**

1. दि.०७/०३/२००९ ते दि.२५/०३/२०१३

**दुय्यम साधने :**

**इंग्रजी :**

१. Shri.Chavan Y.B., Pradhan R.D.(Ed.) Selected Speeches in Parliament 3 Volumes.

**मराठी :**

**ग्रंथ :**

१. डॉ.इंगळे व.न., पत्रीसरकार : चरित्र, व्यक्तिमत्व आणि चळवळ, पुणे, १९७५.
२. डॉ.इन्थोवेन आर.ई., ट्राईब्ज ॲण्ड कास्टस ऑफ बॉम्बे, खंड २, १९२२.
३. श्री.काचोळे दा.धों.सामाजिक संशोधन पध्दती, कैलास पब्लीकेशन, औरंगाबाद, पहीली आवृत्ती, १९९३.
४. डॉ. कोठारी के.ए., एकॉनॉमिक ॲन्ड इंडस्ट्रियल गाईड ऑफ इंडिया, १९७६
५. डॉ.कणगली एस.एम., पुण्याचा माहितीगार, १९४९
६. डॉ.कुलकर्णी अ.रा., खरे ग.ह., (संपा.), मराठयांचा इतिहास, कुलकर्णी खंड– ३, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ, नागपूर, १९८६.

७. डॉ.कॅशमॅन रिचर्ड, दि मिथ ऑफ लोकमान्य : टिळक ॲण्ड मास पॉलिटीक्स् इन महाराष्ट्र, युनिव्हर्सिटी ऑफ कॅलिफोर्निया प्रेस, कॅलिफोर्निया, १९७५.
८. श्री.काळे बाबूराव, यशवंतराव चव्हाण, गो.य.राणे प्रकाशन पुणे, व्दितियावृत्ती, १९६५
९. श्री.केळकर न.चि., गतगोष्टी, जतकर प्रकाशन, यवतमाळ, १९८६.
१०. श्री.खांडगे प्रकाश, (लेख) महाराष्ट्राच्या लोककला, सांस्कृतिक महाराष्ट्र परिचय पुस्तिका, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई, १९९७.
११. डॉ.खरे ग.ह., बोराटे व.म., अशी आमुची वाई, अक्षरभांडार प्रकाशन, पुणे, १९७९.
१२. श्री.गोखले पु.पा., जागृत सातारा, कराड,१९३५.
१३. डॉ.गोडबोले अरूण, युनायटेड वेस्टर्न बँक, उदय, उत्कर्ष आणि अस्त, सातारा २००७.
१४. श्री.गुप्ते य.रा.,कराड संदर्भग्रंथ, पी.डी.पाटील गौरव प्रतिष्ठान, कराड, २००४.
१५. श्री.गोरे ना.ग.,भ्रम आणि निरास, मूळावर घाव, राजहंस प्रकाशन,.
१६. डॉ.गेल ऑम्वेट अे कल्चरल रिवोल्ट इन अे कोलोनिअल सोसायटी : दिनॉनब्राम्हण मुव्हमेट इन वेस्टर्न इंडिया, १८७३ टू १९३०
१७. डॉ.ग्रोव्हर बी.एल., बेल्हेकर एन.के., आधुनिक भारताचा इतिहास, एस चाँद कंपनी पब्लिकेशन नवी दिल्ली, २००३.
१८. डॉ.चौधरी के.के.(संपा.) सोर्स मटेरिअल फॉर हिस्ट्री ऑफ फ्रिडम मुव्हमेंट, महाराष्ट्र शासन, मुंबई, खंड ११, १९९०.
१९. श्री.चव्हाण यशवंतराव, सहयाद्रीचे वारे, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, तिसरी आवृत्ती, मुंबई, १९९२.
२०. श्री.चव्हाण यशवंतराव, युगांतर, कॉन्टीनेंटल प्रकाशन, पुणे, १९९९
२१. श्री.चव्हाण यशवंतराव,सहयाद्रिचे वारे, मुंबई, १९६२
२२. श्री.चव्हाण यशवंतराव, भूमिका, प्रेस्टीज प्रकाशन,प्रथमावृत्ती, पुणे, १९७९
२३. श्री.चव्हाण यशवंतराव, कृष्णाकाठ, प्रेस्टीज प्रकाशन,प्रथमावृत्ती, पुणे, १९८७,
२४. श्री.जोशी रामभाऊ, यशवंतरावांचे अंतरंग विरंगुळा, यशोदा प्रकाशन, पुणे, २००८
२५. श्री.जोशी सु.ह.,महाराष्ट्रातील लेणी, डायमंड प्रकाशन, पुणे, २००८.

२६. श्री.ठाकरे के.एस., प्रतापसिंह छत्रपती आणि रंगो बापूजी, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९८४.

२७. श्री.डोळे रामदासी अनंतदास, श्री चौंडे महाराज यांचे चरित्र, पुणे,१९३८.

२८. डॉ.ढवळीकर एम.के., लेट हिनयान केव्हज ऑफ वेस्टर्न इंडीया, डेक्कन कॉलेज, पोस्ट ग्रॅज्यूएट ॲण्ड रिसर्च इन्स्टिटयूट, पुणे, १९८४.

२९. श्री.थोरात संभाजीबाबा, यशवंतराव चव्हाण झुंझार नेतृत्वाचा शोध आणि बोध, आगाशिव प्रकाशन, कराड, १९८८.

३०. डॉ.दुकळे प्रकाश, यशवंतराव चव्हाण : माणूस आणि लेखक, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, २०१२.

३१. डॉ.दाभोळकर नरेंद्र, भ्रम आणि निरास, प्रस्तावना,राजहंस प्रकाशन,.

३२. डॉ.दाभोळकर नरेंद्र, विचार तर कराल, राजहंस प्रकाशन, पुणे, मनोगत.

३३. डॉ.दाभोळकर नरेंद्र ,प्रश्नचिन्ह आणि पूर्णविराम ,राजहंस प्रकाशन पुणे.सप्टें.२०१३.

३४. डॉ.दाभोळकर नरेंद्र ,तिमिरातून तेजाकडे ,राजहंस प्रकाशन , पुणे, सप्टें.२०१३.

३५. डॉ.देव शां.भा., महाराष्ट्र व गोवे शिलालेखताम्रपटांची वर्णनात्मक संदर्भ सूची, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९९२.

३६. डॉ.दिवान चंद्रशेखर, राजकिय सिध्दांत आणि राजकिय विश्लेषण, विद्या प्रकाशन,नागपूर, १९९४.

३७. डॉ.दिक्षित दुर्गा (संपा.)डायमंड महाराष्ट्र संस्कृतीकोष, डायमंड प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २००९.

३८. श्री.धर्माधिकारी बी.व्ही., क्रांतीवीर, विशकर्मा प्रकाशन सातारा, १९६९.

३९. डॉ.नागराजू एस, बुध्दीस्ट आर्किटेक्चर ऑफ वेस्टर्न इंडीया, आगम कला प्रकाशन, दिल्ली,१९८१.

४०. श्री.पाटणे संभाजीराव, स्वातंत्र्यसंग्रामातील सातारा जिल्हा, भि.दा.भिलारे गुरूजी, संयोजक ऑगस्ट क्रांती सुवर्ण महोत्सव समिती सातारा, १९९२.

४१. श्री.पाटील उत्तमराव –लाड आप्पासाहेब, क्रांतीवीर नाना पाटील, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९८७.

४२. श्री. पाटील दिनकर, क्रांतिसिंह नाना पाटील आणि शेतकरी च्ळवळ, किर्ती प्रकाशन, पुणे, १९९०.

४३. श्री.पाटील बी.एच.,(संपा.),किसन वीर जीवन दर्शन, किसन वीर सत्कार समिती, सातारा, १९६७.

४४. श्री.पाटील रा.तू.सांगली सातायाचे राजकारण परखड प्रकाशन कराड, १९८६.

४५. श्री.पाटील रा.तु. यशवंतराव चव्हाण : एक कर्तबगार पण वादग्रस्त मुसद्दी, जनवाणी प्रकाशन, कराड, १९८७.

४६. श्री. पाटील विलास, क्रांतिसिंह नाना पाटील, क्रांतिवैभव प्रकाशन, पुणे, १९८६.

४७. डॉ.जेम्स; बर्जेस जेम्स.दि केव्ह टेंपल ऑफ इंडीया आर्किऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडीया, १८८०.

४८. श्री.बहुलेकर बाळासाहेब, आपला सातारा, मावळा प्रकाशन, मार्च १९९४.

४९. श्री.बहुलेकर वसंत, लोकनायक बाळासाहेब देसाई, मा.श्री. शंभुराज देसाई मरळी, ता.पाटण जि.सातारा.

५०. श्री.भगत रा.तु.(संपा.), सिंहगर्जना : क्रांतिसिंह नाना पाटील यांची निवडक भाषणे, क्रांतिवैभव प्रकाशन, पुणे, १९८०.

५१. श्री.भोळे भा.ल.यशवंतराव चव्हाण राजकारण आणि साहित्य, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९८५

५२. श्री.मढीकर दिलीप, क्रांतीसिंह नाना पाटील : चरित्र आणि कार्य ललितराज प्रकाशन, पुणे, १९९०.

५३. सौ. मिसाळ सवितादेवी, महाराष्ट्राचे भाग्यविधाते, ना.बाळासाहेब देसाई, १९६७.

५४. डॉ.मेहंदळे विश्वास, यशवंतराव ते विलासराव, अनुबंध प्रकाशन, पुणे, २००७.

५५. डॉ.रसेल आर. व्ही., हिरालाल, ट्राईब्ज ॲण्ड कास्टस इन दि सेंट्रल प्रॉव्हिन्सेस अऑफ इंडिया, खंड ४, १९९३, (पुनर्मुद्रित)

५६. श्री. वकील सी.एन., को–ऑरेटिव्ह मुव्हमेंट इन दि बॉम्बे स्टेट, १९५३

५७. श्री.वाघ रामनाथ (संपा.), युगप्रवर्तक यशवंतराव चव्हाण, यशवंतराव चव्हाण व्यासपीठ, अहमदनगर,व्दितिय आवृत्ती, १९७८.

५८. श्री.शेलार बजरंग, कोयनेचे पाणी, आधुनिक साहित्य प्रकाशन, उरूल, ता.पाटण, जि.सातारा.

५९. सातारा नगरपालिका, आमचा सातारा, सातारा, ३० जून १९६७.

६०. श्री.सुर्यवंशी कृ.गो., बहुजन हिताय बहुजन सुखाय, जगताप–कारले प्रकाशन, पुणे १९७०.

६१. डॉ.सरदेसाई गो.स., मराठी रियासत(सुधारीत आवृत्ती), पॉप्युलर प्रकाशन, खंड ८, १९९२.

६२. श्री.सारडा शंकर, यशवंतराव कर्तृत्व आणि नेतृत्व, दिलिपराज प्रकाशन, पुणे, २००३

**नियतकालिक :**

१. लोकराज्य, कर्मवीर भाऊराव पाटील विशेषांक, जुलै १९८७

**विशेषांक :**

१. किसन वीर स्मृती विशेषांक, यशवंत शिक्षण संस्था, सुरूर,१९८१.

२. कोष्टी प्रभाकर, शैक्षणिक वाटचाल, सातारा जि.प.गौरवगाथा, रौप्य महोत्सवी विशेषांक, १९९५.

३. ठोके मो.नि.(संपा.), 'श्री. यशवंतराव मोहिते गौरव ग्रंथ', ७ नोव्हेंबर १९९५.

४. दौलत, ना.बाळासाहेब देसाई एकसष्ठी सत्कार समिती अंक, १९७१.

५. मराठा चेंबर्स ऑफ कॉमर्स, सातारा डायरी, २००७, सातारा शहर व परीसरातील उद्योग व व्यापार याबाबत परीपुर्ण माहीती,२००७.

६. वार्षिक औद्योगिक सर्वेक्षण, सातारा जिल्हा.

७. शतसंवत्सरीक स्मृती ग्रंथ, कराड नगरपालिका, १८५५–१९५५

८. सातारा नगरपालीका शतसंवत्सरीक महोत्सवी अंक, १९५३.

९. सुवर्ण महोत्सवी वर्ष, 'सहकार गौरव ग्रंथ', सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.सातारा, सन १९९९–२०००.

१०.स्व.यशवंतराव चव्हाण, जन्मशताब्दी विशेषांक.

११.

## स्मरणिका :

१. उद्योगस्मृती, महाराष्ट्र औद्यौगिक विकास महामंडळ सुवर्ण महोत्सव स्मरणिका, मुंबई,२०१२.

२. महाराष्ट्र साहित्य परिषद,पुणे शाखा शाहूपुरी, सातारा २२ वे विभागिय साहित्य संमेलन स्मरणिका अक्षरधन,२०१३.

३. स्मृतीग्रंथ आठवणीची पुष्पांजली, प्रकाशक ॲड. सुनिताताई शंकरराव जगताप, सातारा सप्टेंबर २०१३

## अहवाल :

१. अजिंक्यतारा सहकारी साखर कारखाना वार्षिक अहवाल, सन १९८४–८५

२. आंबेडकर आकादमी सातारा, कार्यवृत्तांत २००२

३. जोशी ब.स.(संपा.), वाईतील कोल्हाटी जमात, कृष्णाई (वार्षिक), मानव्य व वाणिज्य महाविद्यालय, वाई, १९७९.

४. महाराष्ट्र अंधश्रध्दा समिती, वार्षिक अहवाल २००५०६

५. रयत शिक्षण संस्था, सातारा, वार्षिक अहवाल, १९८९–९०

६. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, वार्षिक अहवाल, १९९५–९६.

७. सातारा जिल्हा उद्योग केंद्र, ॲक्शन प्लॅन, (१९८३–८४ ते १९८७–८८)

८. सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.सातारा वार्षीक अहवाल,१९९९–२०००.

## दैनिके :

१. दै.तरूण भारत

२. दै.पुढारी

३. दै.लोकमत

४. दै.लोकसत्ता

५. दै.सकाळ

६. दै.स्वप्ननगरी

## इंटरनेट वेबसाईट :

1. http://www.biographical sketch member of parliament xii lok sabha
2. http://www.dainikgomantak.com
3. http://www.eicin/statistic report
4. http://www.marathisrushti.com
5. http://www.sahyadribana.com
6. http://www.sahyadribana.com
7. http://www.vikramsinhpatankar.in

# प्रश्नावली

## राजकीय व्यक्तिची माहीती मिळवण्यासाठी तयार केलेली प्रश्नावली

नाव : ______________________________

पत्ता : ______________________________

वय : ____________ वर्षे पुरूष/स्त्री : ____________

धर्म : ____________ जात : ____________

विवाहीत/ अविवाहीत : ______________________________

व्यवसाय : ______________________________

१. आपण ____________ या राजकीय व्यक्तिमत्वास ओळखता काय?

______________________________

२. ____________ यांच्या राजकीय कारकिर्दीच्या आरंभाविषयी आपण काय सांगू शकाल?

______________________________

______________________________

३. ____________ यांच्या राजकीय कारकिर्दीच्या चढउताराविषयी आपण काय सांगाल?

______________________________

______________________________

४. ____________ यांच्या राजकीय वाटचालीचा या भागाला फायदा झाला काय ?

______________________________

______________________________

५. ____________ यांनी राजकीय क्षेत्रात विविध पदे भुषवली त्यासंदर्भात आपण काय सांगाल?

______________________________

---

६. ________ यांनी राजकारणासोबत आर्थिक क्षेत्रात कोणते योगदान दिलेले आहे?

---

---

७. ______ यांचे सहकार क्षेत्रातील योगदान आहे काय व असल्यास त्याची विस्तृत माहीती द्या ?

---

---

८. ________ यांनी राजकारण हे समाजकारणासाठी केले काय व त्यांचे सामाजिक क्षेत्रातील योगदान काय आहे त्याची विस्तृत माहीती द्या ?

९. या माहीतीशिवाय आपण ________ यांच्याविषयी आणखी काय सांगू ईच्छिता?

---

---

# सामाजिक माहीती मिळवण्यासाठी तयार केलेली प्रश्नावली

नाव :______________________________________________

पत्ता : ______________________________________________

वय : ________________ वर्षे पुरूष/स्त्री :________________

धर्म : ________________ जात :________________

विवाहीत/ अविवाहीत :________________________________

व्यवसाय :______________________________________________

१.आपण जातीतील प्रथा परंपरांच्या विषयी आपण काय माहीती द्याल?

______________________________________________

______________________________________________

२. आपल्या जातीतील सांस्कृतिक उत्सवात आपण कधीपासून सहभागी होत आहे?

______________________________________________

______________________________________________

३.हा सण फक्त आपण व आपले जातबंधूच साजरा करता काय?

______________________________________________

______________________________________________

४. हा सण साजरा करण्यामागे काही विशिष्ट हेतू आहेत काय?

______________________________________________

______________________________________________

_ ५. या सणाचे थोडक्यात वर्णन करा?


६.आपल्या सण उत्सवातील प्रथा व परंपरांचे पालन पुर्वीप्रमाणे होते आहे काय? बदल होत असल्यास ते बदल कोणते आहेत व का झाले याची माहीती द्या?

७. हा सण साजरा करताना आपणासोबत इतर जाती व धर्माचे लोक असतात काय?


८. इतर जाती व धर्मियांकडून आपणास सण साजरा करताना कधी अडचणी निर्माण झाल्या का?

९. इतर जाती व धर्मियांशी आपले कसे संबंध आहेत?

१०. याशिवाय आपण आपल्या जातीच्या विषयी व परंपरांच्याबाबत कोणती माहीती देऊ ईच्छिता?




महाराष्ट्राचा नकाशा (संदर्भ- डॉ. दास्ताने संतोष, महाराष्ट्र २०१२) ऑक्टोबर, २००९




संदर्भ - सातारा जिल्हयाचा नकाशा (सातारा जिल्हा गॅझेटियर,१९९९)